# शांतीची फुलं

ॐ मृत्युंजयाय रुद्राय निलकंठाय शंभवे।
अमृतेशाय शर्वाय महादेवाय ते नमः॥

डोळे बंद करुन स्वतःचा शोध घ्या, मन शांत करुन श्रध्दा ठेवा, विचार करुन इतरत्र भ्रमण करणारी बुध्दी स्मित करा, हृदयाची स्पंदने शांत करा, काळजाची तार छेडून भक्तीचा नाद करा, सद्गुरु जनार्दनावर जबाबदारी टाकून शेवटचा श्वास सोडा व सद्गुरुपुढे लीन होऊन विघ्नहर्ता व सुखकर्ता श्री गणेशाच्या आरतीने 'शांतीची फुलं' वाचण्यात सुरुवात करा.

सुखकर्ता दुःखहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची।
सर्वांगी सुंदर उटि शेंदुराची।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची॥ १॥
जय देव जय देव जय मंगल मूर्ती।
दर्शनमात्रे मनःकामना पुरती॥ धृ॥
रत्नखचित करा तुज गौरीकुमरा।
चंदनाची उटी कुंकूमकेशरा॥
हिरे जडित मुकूट शोभतो बरा।
रुणझुणती नुपूरे चरणी घागरीया॥२॥
लंबोदर पितांबर फणी.वरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना।
दास रामाचा वाट पाहे सदना॥
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना॥ ३॥

निसर्गाचे मायावी छत ह्या विश्वात पांघरून घातलेले असल्याने या विश्वात काहीच उणे पडत नाही, नेहमी निखारे फुलवून प्राणी मात्रांचे रक्षण करणारा व हवाहवासा वाटणारा हा निसर्ग या दैवी शक्तीचेच निर्माण झालेला आहे. या नक्षत्ररुपी सजलेल्या आकाशगंगेत पृथ्वी हा सर्व संपन्न असा ग्रह आहे, या पृथ्वी ग्रहात आपण एक आकर्षक विश्व म्हणू या. या विश्वरुपी घराची निर्मिती या देवदेवतांनी केलेली आहे, त्या विश्वरुपी घराचे छत हे नक्षत्राने सजलेले व नववधुंनहूनही आकर्षक वाटणारे आकाश आहे, तर पालन पोषण करुन वाढवणारी व जोपासणारी अशी त्याची माता ही धरा आहे, ज्या वसुंधरेवर आजही इतके मोठे विशाल

जग इतर ग्रहावर एखाद्या हुकूमशाही राज्याप्रमाणे राज्य करीत आहे. या दैवाने निर्माण केलेल्या विश्वरूपी घरात काही प्रगतीशील देश सर्वात उंचावर स्थिर झालेले आहेत. तर काही देश ह्या विश्वरूपी घराचे प्रवेशद्वार बनून ह्या आकाशगंगेचे स्वागत करीत आहे. जो - तो देश आपआपल्यापरीने स्थिर होऊन आपआपले कार्य वटवण्याचे यथायोग्य कर्तव्य सिध्दीस नेत आहे. पण माझ्या सुजलाम् सुफलाम विकसनशील पथावर मार्गक्रमण करणारा भारत देश त्या विश्वरूपी घरातील देवघर आहे, ज्या देवघरात अनेक देवदेवतांनी जन्म घेतला, वास्तव्य केले, विश्वात शांती दिली व धार्मिक कार्याची तेजोमय ज्योत पेटवून आजही विश्वाच्या घरास शोभा आणण्याचे कार्य केले आहे. जेव्हा जेव्हा या विश्वाचे असित्व संपण्याचा ओघ दिसतो तेव्हा तेव्हा या विश्वात ग्लानी येवून नाश पावण्याचा संभव दिसतो. जेव्हा जेव्हा हे विश्व चाकोरी बध्द आयुष्य सोडून कुठेतरी भरकटत जावून संपण्याचा कालखंड तयार होतो तेव्हा तेव्हा या विश्वाचे देवघर संबोधणाऱ्या भारत देशात तेजोमय ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य देवदेवता करीत असतात व विश्वात नवीन आशा अन् कल्पना रेखाटण्याचा प्रयत्नही करत असतात. विश्वाची निर्मिती झाल्या बरोबर या निसर्गाने प्राणीमात्रात वेळ, मन, बुध्दी या अतुच्य देणग्या दान केल्या आहेत, पण जशी वेळ बदलते तसे मन बदलते, जसे मन बदलते तशीच बुध्दी बदलते व एकदा बुध्दी बदलली की पुर्ण मनुष्यच बदलतो बघा, असाच बदलणारा मनुष्य या विश्वात ग्लानी आणण्याचा प्रयत्न करतो तेव्हा भारत भूमीतील देवदेवतांनी पेटवलेली ज्योत विझण्याचा झोतात येते तेव्हा कुणीतरी महापुरुष, देव अथवा देवता या भारत भूमीतील देवघरात जन्म घेतात व तीच विझणारी ज्योत पुन्हा अधिक तेवत ठेवून विश्वात वाचण्याचा प्रयत्न करीत असतात या पुण्यवान भारत मातेच्या कुशीत कौरव-पांडवाचे महाभारत नावीत महायुध्द सुरु झाले होते सर्वांना आशादायी वाटणारे पांडव जेव्हा पराभवाच्या छायेत येण्यास सुरुवात झाली होती, दुर्जनाचे अस्तित्वही फुलण्याच्या ओघात जमा झाले होते तेव्हा या भारतमातेच्या धार्मिक कार्यात ग्लानी येण्यास सुरुवात झाली होती व पांडव बंधुत सर्वांचे नाक ठरणारा व गुरुजनांचे सर्व गुणपात्र असणारा कुंतीपुत्र अर्जुन जेव्हा शस्त्र चालविण्यास असमर्थ होऊ लागला तेव्हा या भारत भूमीचे रक्षण करण्यासाठी मृत्यु लोकांता जन्म घेणारा देवकीपुत्र श्रीकृष्ण या पांडवपुत्र अर्जुनाचे रथ चालविण्याचे काम करीत होता. या पांडवांनी धर्म केला होता, त्यामुळेच त्यांचे अंगी देवसुध्दा राबला होता, सारथ्याचे कार्य रंगविणारा श्रीकृष्ण त्या गांडीद धनुर्धारी अर्जुनास म्हणाला, 'अरे अर्जुना उचल ते धनुष्य व लाव बाण' समोरील काळ बघून अर्जुनाची मती खळलेली होती त्यामुळे तो युध्दास अधिकच असमर्थ होऊ लागला होता. प्रबळ शत्रु धर्मावर ग्लानी आणून दानवी बीजे पेरण्याच्या तयारीत लागले होते. श्रीकृष्णास वाटले की, एकदा यांची दानवी बीजे भारत भूमीत रुजली की संपूर्ण देवघर छन्न विछिन्न होऊन संपुष्टात येईल आणि विश्वच नाहीसे होईल. त्याचवेळी ह्या यशोदापालीत श्रीकृणाने या कुरुक्षेत्रावर त्या अर्जुनास

आपले खरे अस्तित्व दाखविले व भगवतगीता ऐकवली. इतके अतिविशाल रुप बघून अर्जुन शांत झाला, इतरस्त मार्गक्रमण करणारे त्याचे मन काही क्षणात मुळ कार्यस्थळी पोहचले, श्रीकृष्ण भगवतगीतेची एक एक ओवी मुखातून बाहेर टाकत होता, बाहेर पडणाऱ्या ओवीचे प्रत्येक अक्षर अर्जुनाच्या रोमारोमात संचार करीत होते, रक्त सळसळून कार्यहीन झालेले वलशाही बाहू पुन्हा एकदा गांडीव धनुष्याकडे ओढले गेले व धर्माचे रक्षण त्याचेकडून पुन्हा एकदा झाले, त्याचवेळी भगवान श्रीकृष्ण त्या पार्थास बोलला होता...

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।

याचा मतीतार्थ असा की हे अर्जुना जेव्हा जेव्हा या भारत भूमीस ग्लानी येईल तेव्हा तेव्हा कुणीतरी महान पुरुष या भारत रुपी देवघरात जन्मास येईल व धर्माचे रक्षण करील याच या भगवंताच्या उक्तीप्रमाणे अनेक साधुसंतांनी देवदेवतांनी या भारत भूमीत जन्म घेतला व धर्माचे रक्षण केले. श्रीकृष्णाने अर्जुनास उपदेशावर सांगितलेली भगवद्गीता सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचवून त्यांच्या मध्ये धर्माची भावना जागृत करण्यासाठी, धर्मकांडावर टिका करण्याचा नास्तिक लोकांना वठणीवर आणण्यासाठी, प्राणी मात्रांनाही सजीवयुक्त आत्म आहे हे सिध्द करण्यासाठी, श्री संत ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्रातील विठ्ठल पंत कुलकर्णी व मातोश्री रुखमाई देवी यांच्या पोटी आपेगावी जन्म घेतला व हिंदुची हीच भगवी ध्वजा तेवत ठेवून वाऱ्याच्या झुळकेवर फडकवण्यासाठी नेवासे येथे ज्ञानेश्वरी लिहीली. १३ व्या शतकातील ज्ञानेश्वरी आजही भारतातील धार्मिक ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य करीत आहे. महाराष्ट्रात जन्म होऊन भागवत धर्माची पताका पंजाब पर्यंत रोवण्याचे कार्य श्री संत एकनाथ महाराजांनी केले, अनेक पध्दतीने देव प्राप्त करुन पंढरीचा विठोबा प्रसन्न करुन घेण्याची भूमिका नामदेव महाराजांनी रेखाटली, त्याच वेळी पुंडलीक, गोरा कुंभार, चोखा मेळा, सावता माळी, सखुबाई, जनाबाई यांनी अभंग लिहून देवांची फुले फुलवून सुगंध देण्याचे काम अवघ्या भारतात केले. देव शोधायला जाणारे व स्वतः देव होऊन पुष्पक विमानातून देवघरी जाणारे, देहू गावात जन्म होऊन अनेक अभंग लिहून १८ पगड जातीच्या धार्मिक लोकांना त्या चंद्रभागेच्या वाळवंटात एकत्र आणून हिंदवी ध्वजेखाली उभे करण्याचे कार्य संत तुकोबा महाराजांनी केले. अशा अनेक थोर संतांनी अनेक महत्वाच्या भूमिका घेऊन त्या पार पाडून या भारतासारख्या देवघराचे शतकानुशतके ग्लानी येणाऱ्या असमानी संकटापासून रक्षण केले. १७ व्या शतकाच्या पूर्वार्धात ही भारत भूमी कंलकीत होऊ लागली होती. अनेक नको, नको ते अत्याचार भारतावर होऊ लागले होते, पर्यायाने अनेक भारतीय परकीयांच्या जाचाला कंटाळून धर्मांतर करु लागले होते. अनेकांना ते सहन न झाल्याने मृत्युलोक सोडावा लागला होता, बालकांची हृदय मंदिराची देवता ठरणारी आई परकीयांची गुलाम होऊ लागली होती, अशा वेळी जिजाईच्या पोटी शिवनेरी येथे शिवाजी जन्मास

आला, हर हर महादेव या भगवान शिवाच्या जयघोषात रायरेश्वराच्या मंदिरासमोर हिंदवी स्वराज्याची बीजे परेली व तिची रोपटी अवघ्या भारतात उगली आणि पुन्हा धर्मावरील ग्लानी टळली, हिंदवी स्वराज्याची बीजे रोवून अवघ्या हिंदुस्थानात तुफान उधळून टाकणाऱ्या त्या शिवाजी महाराजास मार्गदर्शन लाभले. ते एका महान संताचे व ते संत म्हणजे रामदास स्वामी. या एका संतामुळे हिंदुस्थानच्या या संस्थापकास श्रीमान योगी या दोन्ही पदव्या एकाच वेळी लाभल्या. भगवान श्रीकृष्णाने ऐनवेळी अर्जुनात सांगितलेले गीता वाक्य युगानुयुगे खरे ठरत आहे व आजच्या कलीयुगात ही ते सत्य होत आहे, त्याची खरी खुरी प्रचीती आपणास 'शांतीची फुलं' यातुन दिसून येईल.

२० व्या शतकाची घौडदौड अवघ्या विश्वात सुरु होणार होती. इंग्रजांचे अमानुषपणे अत्याचार या भारत भूमीवर व तिच्या लेकरांवर होत होते. सर्वत्र बंदुका, तोफा यांचा भडीमार सुरु झालेला होता. शिवनिर्मीत हिंदुस्थान आता पुर्णपणे इंग्रजांच्या जबड्यात अडकलेला होता. अत्याचाराचा कळस इंग्रज माणसांनी गाठला होता. हिंदुस्थानातील सुवर्ण प्रदेश जशाचा तसा परदेशात चालला होता. सुजलाम सुफलाम भारत ओसाड बनु लागला होता. अनेक क्रांतीवीर आपआपल्या परीने भारतास वाचवण्याचा प्रयत्न करीत होते. इंग्रजांना पायबंद घालण्यासाठी भारतीय जनता उपाय शोधीत होती. भारत माता की जय, इन्क्लाब जिंदाबाद, वंदे मातरम् आदी घोषवाक्यांना तिलांजली मिळू लागली होती अध्यात्मिक आधारावर चालणारे लोक भगवान श्रीकृष्णाचे हे...

यदा यदा हि धर्मस्य ग्लानीर्भवती भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मांन सृजाम्यहम् ।।

हे वाक्य आठवून अनेक भारतीयांमध्ये महापुरुष शोधीत होते. आता धर्मास पुर्णतः ग्लानी लागण्याची वेळ येवून ठेपली होती. आपल्याच विश्वातील एक भव्यदिव्य समजले जाणारे इतर घरे भारतासारख्या देवस्थानावर अत्याचार वाढवून या विश्वाचेच नुकसान करीत होते. अखेर विसाव्या शतकाच्या पालवी फुटलीच कोकीळेच्या सुमधूर स्वराने व वसंताच्या अल्पशा अस्तित्वाने कोंबड्याने बांग देवून विसाव्या शतकाचे कसेबसे स्वागत केले. संस्कृतीशील विविधतेने नटलेल्या हिंदुस्थान आता का बदलला होता ? क्षणापुर्वीचे पालखे का उघडे झाले होते ? ब्रिटीश साम्राज्याने हिंदुस्थानातील हिंदु पुर्णपणे बदलवण्याचा धडा गिरवीणे सुरु केले होते. राजकीय कलाटणी हिंदुस्थानच्या इतिहासात मिळू लागली होती. भारतातील देवघराची छपरे इंग्रजांच्या वाऱ्याने उडू लागली होती तर इंग्रजी पावसाने अनेक देवघरे ओसाड बनवले जात होते. महान संबोधल्या जाणाऱ्या भारतातील लहान महाराष्ट्रात अनेक साधुसंतांनी जन्म घेवून भारत भूमीचे रक्षण आजपर्यंत नेटामे केले होते. अनेक क्रांतीवीरांनी राजकीय लोकांनी नव्हे नव्हे तर साधुसंतांनी महाराष्ट्रात जन्म घेवून हिंदु धर्मास वाचवुन महाराष्ट्राची भूमी पुनीत केलेली होती. त्याच पुनीत झालेल्या महाराष्ट्राच्या

भूमीतील उस्मानाबाद जिल्हात ठाण असलेल्या तुळजाभवानीने शुभाशिर्वाद दिलेल्या शहाजपुत्राने अर्थात शिवाजीने जी हिंदवी ध्वजा फार धाडसाने अभिमानाने शौर्याने अवघ्या हिंदुस्थानात रोवली होती तीच ध्वजा २० व्या शतकात ठिकठिकाणी कोलमडून पडली जात होती. ब्रिटीशांनी अवघा भारत ताब्यात घेतला होता. प्रत्येक ठिकाणी क्रांतीवीर तर कित्येक ठिकाणी थोर समाजसुधारकांनी जन्म घेऊन कार्याचा महिमा गाण्यास सुरुवात केलेली होती. स्वराज्य हा माझा जन्मसिध्द हक्क आहे आणि तो मी मिळवणारच असे म्हणणारे, सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ? असे जाब विचारणारे लोकमान्य टिळक, हे राम म्हणून आत्मा सोडणारे गांधी, मेरी झांशी नही दुंगी । असे घोड्यावर स्वार होवून म्हणणारी झाशीची राणी लक्ष्मीबाई, इन्कलाब झिंदाबाद असे म्हणून कोवळ्या तारुण्यात आनंदाने फाशी स्विकारणारे भगत सिंह, राजगुरु , सुखदेव इ. परदेशी माल नही चलेगा असे म्हणून गाडी खाली प्राणत्याग करणारे बाबु गेनु, बॅरीस्टर होणेची इच्छा बाळगुन हिंदुस्थानात परत येवू अशी आशा धरून हिंदुस्थानासाठी फ्रान्सचा किनारा टपक्यात गिळणारे, अंदमानात जन्मठेपेची शिक्षा घेऊन 'ने मजशी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला सागरा' हे गीत लिहिणारे विनायक दामोधर सावरकर असे कितीतरी थोर महापुरुष क्रांतीवर विसाव्या शतकात हिंदुस्थानाला परकीयांच्या जबड्यातून मुक्त करण्याचे कार्य करत होते, परंतु कुठेतरी कमतरता भासतच होती, कुठेतरी कशाची तरी उणीव जाणवतच होती, धर्मास निर्माण झालेली ग्लानी कुठेही कमी होण्याची पुसटशी चिन्हेही दिसत नव्हती. गंगा, जमुना, सरस्वती या सारख्या पवीत्र नद्यांचे जल क्रांतीवीरांच्या रक्ताने भरून वाहता वाहता एखाद्या महान संताची वाट पाहत होते. अती उंचावरील डोंगरावरील झाड ही स्वतःला दुर्भागी समजू लागले होत. दिवसेंदिवस इंग्रजांच्या तोफेतून, बंदुकीतून अधिकाधिक गोळ्या हवेत संचार करीत होत्या इंग्रजांसाठी सुर्य मावळतच नव्हता पण भारत मातेचा एक आणि दोन असे कित्येक क्रांतीवीर प्राण गमावीत होते, भारत मातेच्या कुशीत जन्मास येवूच नाही असे कित्येक अल्पबुध्दीवान लोक आयुष्य संपविण्याच्या विचारात मग्न झाले होते. जिकडे तिकडे अंधकार पसरलेला होता. झाडी, झुडपे, वेली, पाने, फुले, पक्षी, प्राणी, मानव, नद्या, नाले, चंद्र, सुर्य तारे हे सर्व जणु काय अनाथ निरागस बालकाप्रमाणे धायमोकलून रडत होते, पोट आणि तोंड एकाच वेळी कार्यहीन होऊन शांत बसले होते. नजर काहीच बघण्याच्या मनस्थितीत नव्हती. हृदय इंग्रजी पावसात कधी वाहून जाऊ म्हणून थरथर कापत होते. हातपाय एकमेकांत स्थिर होऊन वर्तमानात भविष्य उगवून नको असे हिरहिरीने सांगीत होते, मृत्यु लोकांतील वातावरण नकोसे झालेले होते ही परिस्थिती इ. १९१०-११ च्या सुमारास चालु होती. तेव्हा महर्षी नारद मुनी या मृत्यु लोकांत प्रभात फेरी मारणेसाठी आले असावे, मृत्यु लोकांतील नकोशे झालेले वातावरण बघून नारदांच्या मुखातून नारायण... नारायण... असे शब्द बाहेर आले व ही कल्पना त्वरीत देवलोकांत कळवावी अशी इच्छा

Scanned by CamScanner

नारद मुनींना सुचली असावी. त्यामुळे डाव्या हाताने चिपळ्या वाजवीत व उजव्या हाताच्या मधल्या बोटाने वीण्याची तार छेडत नारदमुनी देवलोकांत हजर झाले असावे, ब्रह्मा विष्णु महेश तिनही लोक जणूकाय त्या दिवशी स्वर्ग मंचकातील आसनावर रुढ झालेले होते. नारायण...नारायण म्हणत नारदमुनींनी स्वर्गमंचन गाठले व सांगणेस सुरुवात केली असावी, देवा दी देव ! महादेव हा काय सृष्टीचा खेळ चाललेला आहे, स्वतः विष्णुंनी अवतार घेतलेल्या भारतभूमीच्या देवघरात आज काय वातावरण घडत आहे, प्रभु रामचंद्राच्या, बालक्रिडा करुन युगानुयुगे रक्षण करील असे अर्जुनास सांगणाऱ्या श्रीकृष्णाच्या भूमीत आज काय विशाद नाट्य रंगले आहे जरा बघून या. त्या हिंदु धर्मास आता पुर्ण ग्लानी आलेली आहे. कुठे गेले ती गीता उपदेश करणारे बाळकृष्ण, कुठे गेले ते पुंडलीकासाठी अठ्ठावीस युगांपासून एका वीटेवर उभे राहणारे विठोबाराय. महादेव आता काही तरी करा व मृत्यु लोकांतील हिंदु धर्मास वाचवा. नव्हे नव्हे तर हिंदु धर्मास वाचवून येणाऱ्या एकविसाव्या शतकात पर्यायाने कलीयुगात नवीन दिशाही द्यावी लागेल, तरच दैव ही भाषा अस्तित्वात राहील'', असे म्हणून महर्षी नारदांने नारायण...नारायण म्हणून काढता पाय घेतला असावा. आता मृत्युलोकांपेक्षा स्वर्गलोकी वेगळेच वादळ सुरु झाले अनेक दानवांपासून मृत्युलोकांचे रक्षण करणारे देव विचार करु लागले मृत्यु लोकांत असलेले महापुरुष कमी पडु लागले आहेत आपणास पुन्हा अवतार घ्यावा लागेल या चर्चेस आता उधाण आले असावे.

'स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा
मृत्यु लोकी व्हावा जन्म आम्हा'

या जगद्गुरु संत शिरोमणी तुकोबा महाराजांच्या ओवी नुसार स्वर्गलोकी मृत्युलोकांत जन्म होण्याविषयी कळसाटेपण्याइतकी चर्चा विसंगु लागली असावी तितक्यात देवलोकांत एक निर्णय पक्का झाला व भगवान शिवानेच या भुतलावर जन्म घेण्याचा निर्णय घेतला असावा. 'जन्म कुठे घ्यावा याची चिंता लागली असावी देवा', मागे म्हटल्याप्रमाणे या विश्वाचे देवघर भारत आहे. या भारत भूमीतील देवघरात अनेक थोर साधु संतांनी जन्म घेतलेले अनेक क्रांतिवीरांनी जन्म घेतलेले, स्वतः ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहीलेले महाराष्ट्र राज्य फार अभिमानाने विराजमान झालेले आहे. त्या पुण्यवान भूमित नगर, पुणे, औरंगाबद, नाशिक या सारखे जिल्हा आनंदाने निखारलेले आहेत. या विशाल धर्माची ज्योत कुठे पटवायची याची विचारसरणी महादेव करीत असतांना त्यांच्या बुध्दीने त्यांच्या मनाला वेळेसरशी कळवीले असावे श्रीकृष्णाने पुणीत झालेल्या भारत भूमीत संतांनी देव प्रसन्न केलेल्या महाराष्ट्र राज्यात संभाजीनगर हा जिल्हा हुकूमशाही राजाप्रमाणे देवघरातील सिंहासनावर आरुढ झालेला आहे. जो संभाजीनगर जिल्हा संपुर्ण महाराष्ट्र राज्याचे भौगोलिक व अध्यात्मिक दृष्टया केंद्र बिंदु आहे याच संभाजीनगर जिल्ह्यात जन्म घेण्याचा विचार त्यांच्या बुध्दीने त्यांच्या मनाला सादर केला. व ठरवले की शके १८३६ मध्ये इ.स.

१९१४ मध्ये मृत्यु लोकांत जन्म होऊन धर्मावरील ही ग्लानी दुर करावयाची व नवीन येणाऱ्या कलीयुगात विश्वाचे अस्तित्व टिकवण्यासाठी अध्यात्माचे बाळकडू पाजायचे. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, मिराबाई, मुक्ताबाई अशा अनेक थोर संतांनी पुनीत झालेल्या महाराष्ट्राच्या काळ्याभोर मातीत मराठवाडा महाराष्ट्राचे भौगोलिक व अध्यात्मीकाचे केंद्रस्थान म्हणून ओळखला जातो त्याच संभाजीनगर जिल्ह्यात कन्नड तालुका आहे. मराठी अशिक्षीत स्त्री असून आपल्या काव्य प्रतिभेने अवघ्या देशभरात नावलौकीक मिळवणाऱ्या बहिणाबाई चौधरीचे तालुक्याचे गांव होते. अशा अतिभव्य दिव्य कन्नड तालुक्यात टापरगांव हे धुळे वेरुळ रस्त्याच्या पश्चिमेला शिवना नदीच्या तीरी वसलेले टुमदार पण छोटेसे गांव आहे. गावाची रचना तशी ओबडधोबडच होती. विजापूरच्या निजामशाहीचे पांघरून या गावावर पुर्णतः पडलेले होते. मोगलांच्या अस्तित्वाने शिवना नदीचे पाणी हिंदुच्या रक्ताने वाहत होते. जवळजवळ हिंदु देवदेवतांचे देवालय उध्वस्त झालेले होते. निसर्गाच्या कुशित जन्म घेतलेल्या या टापरगावचे वातावरण तशे फुललेच होतेच पण वातावरणात संचारणाऱ्या परकीय सत्रांनी ते दुषीत झालेले होते. गावाची मांडणी फारशी जुन्या पध्दतीचीच होती. मोठमोठ्या वाड्यांची रांगच गावच्या एका कोपऱ्याला इंग्रजांच्या ताब्यात बंदीस्त होती, तर गोरगरीबांच्या झोपड्यांचे छत्त इंग्रजी पावसाने कोलमडून गेलेले होते. टापरगावच्या लोकांची राहणी तशी साधी सरळ होती, परंतु बोली मात्र मऱ्हाटमोळी होती. अशा या साध्या पण पुण्यवान पवित्र भूमित मुहर्त मार्तंडकारांनी समाधी घेतलेली आहे. आपण सर्वसाधारणपणे विवाह करतांना मुहर्त बघतो त्या सर्व मुहूर्ताची पूर्व रचना या मुहूर्तमार्तडकरांनी आखलेली आहे. अशा या मुहूर्तमार्तडकारांची समाधी कन्नड तालुक्यातील टापरगांवी आहे. आजही ज्या वधुवरांचे विवाह जुळत नसतील तर त्या गावातील मुहूर्तमार्तडांच्या समाधीस्थळापुढे विवाह लावले जातात. ती यशस्वी होतात. अशा या पुण्यपान भूमीत माहिते पाटील हे एक नावलौकीक मिळवलेले सदगृहस्थ वास्तव्य करीत होते. माहिते पाटील हे टापरगावचे नाक समजले जात होते. जुनाट लाकडी परंतु मजबुत माडीचे घर त्यांचे निवासस्थान म्हणून संबोधले जात होते. माहिते पाटलांनी तीन पुत्ररत्न व सहा कन्यारत्न होते त्यांत बळवंतराव होते , नंतरचे बाबुराव हे पोथी वाचण्यात कुशाग्र होते व व्याख्यात पंडीत होते. श्रीपतराव हे थोरले असल्याने घरातील सर्व कारभार बघण्यात निपुण होते. माहिते पाटलांनी ईश्वराने सहा कन्यारत्न दिलेले होते त्यात सर्वात मोठ्या आसराबाई होत्या त्यांचा विवाह आठेगावच्या तरुणाशी झालेला होता. त्यानंतरच्या वेणुबाई यांना बनसेंद्रा या गावी दिलेले होते तीन नंबरच्या कलावतीबाई यांना शिर्डी येथे दिलेले होते. चार नंबरच्या म्हाळसामाता यांना संभाजीनगर जिल्ह्यात असलेल्या वैजापूर तालुक्यात दहेगांव येथे उगले घराण्यात सुन म्हणून दिले होते. त्यांच्या पाठच्या धुपताबाई यांना रेलला तर सर्वात शेवटच्या मुक्ताबाईंना पिंपळगांव येथे सुना म्हणून मोहिते पाटलांनी दिले होते. त्या

कन्यारत्नापैकी भगवान शिवाने मातोश्री म्हाळसा मातेच्या उदरी जन्म घेण्याचा निश्चय केला.

इ.स. १९१० च्या दरम्यान मातोश्री म्हाळसाईच्या विवाह मोहिते पाटलांनी वैजापूर तालुक्यातील दहेगांवातील नारायण पाटील यांच्या थोरल्या चिरंजावांशी करण्याचे ठरविले व आप्पा साहेब नारायण पाटील हे ही म्हाळसाबाईशी विवाहबध्द होण्यास तयार झाले ही स्त्री अशी होती की ती 'स्त्री' या संबोधनात पुरेपुर पात्र होती, त्या मातेचा स्वभाव साक्षात कृष्णमाता देवकी, प्रभुरामचंद्र माता कौशल्या यांच्या स्वभावासारखाच होता, मनाने अत्यंत निर्मळ, अत्यंत शांत, अंतकरणाने दयाळू, बोलण्याने मायाळू होत्या भगवान शिवाचा जन्मच या मातेच्या उदरातून होणार आहे हे विधीलिखीत होते की काय ? हे देवच जाणो. अशा या म्हाळसामातेचा विवाह सोहळा आप्पासाहेब उगले यांच्याशी ठरला. लग्नाचा सोहळा होण्यापूर्वी मोहितेपाटील वराच्या गावात सखोल माहिती घेण्यासाठी देहगांव येथे येऊन पोहचले, नारायण पाटील यांच्या मुलाशी आपल्या कन्येचा विवाह जुळला खरा पण सद्यस्थितीत काय परिस्थिती आहे अशी प्रश्नावली घेऊन मोहिते पाटील वैजापुरातून दहेगावात उतरले . वैजापुराहून पुर्वेस १२ ते १३ मैल अंतरावर वसलेले हे दहेगाव , पानाफुंलांनी व्यापलेलं होतं तसं गाव छोटसं पण निसर्गाने नटलेलं, माणसांनी फुललेलं, गुरढोरांनी बहरलेलं, कोकीळेच्या वसंतातील मधुर स्वरांनी मधुरलेले, सुर्यनारायणाच्या प्रकाशाने उजळलेले, सायंकाळी उडणाऱ्या फुलापाखरांनी मोहकलेल, नदीच्या पाण्याने खळाळलेलं, काळ्याभोर रात्रीत काजव्यांनी रंगलेले पण परकीय संतांनी पोरकं झालेले होतं. नारायण पाटील उगले तशी फार प्रख्यात व्यक्ती होती. गावात मोहिते पाटलांइतकीच त्यांची शान होती. दीडशे एकर काळीभोर कसदार जमीन त्यांच्या घराण्याला लाभली होती...

घरापुढे बांधलेली गुरं-ढोरं घराच वैभव वाढवीत होती, नारायण पाटलांना दोन पुत्र होते. पहिले आप्पासाहेब व दुसरे कनिष्ठ बाजीराव, नारायण पाटलांच्या रोमारोमात भक्तीचे वारे संचारले होते . त्या परिसरांवर मोगली घराण्याचा दबदबा असल्याने दहेगावातील बहुतांशी प्रजाजनाचा संबंध हिंदुच्या राष्ट्रभाषेशी आल्याने सहाजिकच नारायण पाटलांना हिंदी भाषा अवगत असणार, त्यांचे पोथी पुराण वाचण्याइतपत शिक्षणही झालेले होतं, त्यामुळे पोथी पुराणं वाचण्यात त्यांना फारच मंत्रमुग्धता वाटत होती. नारायण पाटलाचे वरीष्ठ चिरंजीव अर्थातच आप्पा साहेब हे तसे पोथी पुराणअवगत शास्त्र पंडीत नव्हते परंतु घरातील वारसदार म्हणून अथवा मोठी व कर्तबगार व्यक्ती म्हणून शेतीचा व इतर कारभार ते चोख बजावत होते. बाजीराव साहेब हे तसे फारसे कोणत्याच गोष्टीत निपूण नव्हते त्यांचा स्वभाव फार कडक , तापट व तेज होता. कधी कधी स्वतः आप्पासाहेब देखील त्यांच्याशी नमुन बात करत होते. अशी माहिती मिळाल्यानंतर थोड्या वेळाने मोहिते पाटलांच्या व

उगले पाटलांच्या पुर्व संमतीने म्हाळसाबाई व आप्पासाहेबांच्या विवाह इ.स. १९१० दरम्यान ठरला. विवाहाचा मुहूर्त स्वत: म्हाळसाईचे बंधु बाबुराव मोहिते यांनी काढला. विवाहस्थळ हे टापरगांवच होते. काय भाग्य समजावे त्या दांमपत्याचे त्यांचा विवाह काढणाऱ्या मुहूर्तकाराच्या समाधीपुढे होणार होता. टापरगांवी मोहिते पाटलाच्या म्हाळसाई नामक कन्येचा विवाह संपन्न होणार असल्याने गावात जय्यत तयारी सुरु झाली आणि नाहीतरी म्हाळसाईच्या शांत स्वभावामुळे गावात त्यांचा एक आदर होता. त्यामुळे त्यांच्या विवाहास गर्दी राहणार हे निश्चितच होते. दहेगावच्या नारायण पाटलाच्या वडील पुत्राचा विवाह असल्याने बरीचशी मंडळी लग्नासाठी टापरगांवात रवाना झाली. डोणगांव – वेरूळ फाटा असा रस्ता धरून वरासह वऱ्हाडी मंडळी टापरगांवात पोहचली. जुन्या काळच्या विधीप्रमाणे सर्व काही आटोपले. ब्राम्हण बुवांच्या मंगल अष्टकांनी मोहिते पाटील व उगले पाटील यांच्या शुभ अक्षदाने मुहूर्त मार्तंडकराच्या आशिर्वादात्मक साक्षी रुपाने म्हाळसाई व आप्पासाहेब यांचा विवाह झाला. मोहिते घराण्यात जन्म पावणारी ही थोर पुण्यवान माता आता उगले घराण्यात प्रवेशा बंद झाली. वऱ्हाडी मंडळीचे जेवण आटोपल्यानंतर चौथ्या क्रमांकावर जन्म घेणारी म्हाळसाई आईवडीलांचे टपकणारे आनंदाश्रु हृदयात साठवून वडीलधाऱ्या मंडळीचे चरणस्पर्श नमस्कार करीत होती. सुर्य आता तसा थोड्या अधिक प्रमाणात पश्चिमेस कललेला होता. वाऱ्याची मंद वाहणारी झुळूक वधुवरांना नाजुक हलकासा आशिर्वाद देवून निघून जात होती. पूर्वपुण्याईने पवित्र झालेल्या या दांपत्याचा विवाह सुखरुप झालेला पाहून नभात लवकर हजेरी लावणारा चंद्र फुलून बघत होता. सुर्यनारायणाच्या सोनेरी किरणांनी डोंगरावरील कुरणे फुलांकीत करून सोडले होते. विशाल आकाशात झेप घेणारी व इवलेसे पंख धारण करून जीवनाचा पाढा चिवचिव करून गाणारी रानातील पाखरं त्या कातरवेळी त्या नववधूस निरोप देण्यासाठी विवाह मंडपाच्या आजुबाजुच्या वृक्षांवर विराजमान झालेली होती. पांढऱ्या केतकीच्या फुलात स्वर्ग पाहणारी व नाजुकतेची प्रतिक ठरणारी इवलीसी फुलपाखरं विशाल अंत:करण घेऊन म्हाळसा मातेस निरोप देण्यासाठी गुंग झाली होती. एक अनोखी कातरवेळ आता त्या दिवसाच्या अंतीम निरोपासाठी तयार झाली होती. कातरवेळ ही कातरवेळच असते, मोहिते घराण्यात जन्मास आलेल्या या म्हाळसा मातेचा विवाह दहेगावच्या आप्पा पाटील उगलेशी होऊन ती आता एका शिवपुत्राच्या प्राप्तीसाठीच जाणार होती व अशा महान मातेच्या निरोपासाठी ती कातरवेळ रंगलेली होती, ही वेळच अशी असते साऱ्या दिवसभाराचा सार त्या कातरवेळेत भरलेला असतो. दिवसभर कार्य करणाऱ्या सुर्यापासून ते गुरे जनावरांना विसावा देणारी ती एक कांता असते, एखाद्या व्यक्तीस दुसऱ्या व्यक्तीपासून दूर नेणारी ती एक प्रतिभाशाली समयवाहिनी असते तर कधी कधी निराशांत होणाऱ्यांना फुलांकित करून मृगजळ रुपी आशेची किरणे दाखविणारी ती एक विलोभनीय भ्रांता असते. अशी तीच कातरवेळ आता म्हाळसा मातेच्या निरोपासाठी उद्वीग्न झाली होती. मातेच्या

ममतेचे पाखर आज पोरकं होणार होतं, रत्नाप्रमाणे जतन केलेली म्हाळसाई बोटावर मोजण्या इतक्या क्षणात चिमणी प्रमाणे उडून जाणार होती. आई दारातून व वडील मंडपातून लेकीस निरोप देण्यासाठी उभे होते. 'सुखी रहा बाळ' हाच लाखमोलाचा आशिर्वाद त्या मातेने तिच्या ममतेने विखुरलेल्या हृदयापासून लेकीस दिला. 'गंगा जमुना डोळ्यात का उभ्या केल्यात, म्हाळसा , जा मुली जा दिल्या घरी सुखी रहा... सुखी रहा... रहा..' असे आनंदाचे सुखद अश्रु हृदयात साठवून वडील म्हणाले व परत फिरले . म्हाळसाई जाणाऱ्या सुर्यासरशी सासरी जाण्यास निघाली. दोन तीन तासांचा रस्ता संपल्यावर दहेगाव आले. म्हाळसाई साठी तेच दहेगांव आता सासर नि माहेर झाले होते. म्हाळसाई प्रथमच दहेगावात पाऊल टाकणार होत्या व ती देवता ह्या उगले पाटलांच्या घराण्यात जेष्ठ सुन म्हणून प्रवेश करणार होती. दीडशे एकर काळ्या मातीच्या रखवाल्याची ही जेष्ठ सुन असल्याने सारं दहेगांव नवीन दांपत्याचे स्वागत करण्यासाठी दहेगावच्या वेशीत लोटलं गेलं, म्हाळसाईने उजवे पाऊल गावच्या उंबरठ्यात ठेवून गावात पदार्पण केले. आपल्या स्वागतास इतके लोक बघून म्हाळसाईचे हृदय, अंत:करण, मन, एकरूप होऊन भारावून गेलं. जेष्ठ सुनेच्या जबाबदारीचा भान आपणास मिळाला म्हणजे आपण किती भाग्यवान आहोत याच विचारात ही माता सासर घराकडे रवाना झाली. सुन घरात येणार म्हणून घरासमोरील ओटा व अंगन गोमातेच्या पवित्र शेणाने सारवले होते, घरातील तांब्याची पळी दाराच्या उजव्या बाजुला टांगली गेली होती, तुळशी प्रमाणे सुशोभीत करणारी सुन घराण्यात लाभाल्याने सासुने तुळशीवृंदावन सजवले होते, म्हाळसाईला बघण्यासाठी मंद वारा आतुर झालेला होता, तेजस्वी तारकांनी नक्षत्ररुपी सजवलेले आकाश म्हळसाईचे स्वागत करीत होते, सुनेला दृष्ट लागली असेल म्हणून सासुबाईने बाजरीच्या भाकरीच्या कोरभर तुकडा व त्यावर जाड मीठ, हिरव्या पाच ते सहा मिरच्या व चार पाच लिंबाच्या पत्रीने दृष्ट काढून तो घास कुत्र्यापुढे फेकला, जोंधळ्याच्या राशीने भरलेले माप उजव्या पायाने खाली पाडून म्हाळसाईने उंबरठा ओलांडून गृहप्रवेश केला, नवी नवरी असल्याने सर्व वडीलधाऱ्या मंडळीच्या दर्शनानंतर देवदेवतांचे दर्शन घेतले व उज्वल भविष्याची सुखद स्वप्नांना रंग भरत लग्नाची पहिली रात्र कळत न कळत विलीन झाली. चंद्रतारकांनी सजलेली ती रात्र विलीन झाल्यानंतर म्हाळसाईच्या आयुष्यातील दुसऱ्या पर्वाची स्वागत करणेसाठी पहाट आतुर झाली होती. चंद्र हजेरी लावून आकाश गंगेकडे रजा मागत होता. तर सुर्य कामावर रुजु होणेसाठी तळमळत होता, शेजारील कोंबड्याने बांग दिली, गावाच्या पूर्वेस असलेल्या विशाल वृक्षाच्या पंगतीत सोनेरी झालर उमटली गेली वेगवेगळे सुर काढत पशुपक्षी घराभोवती प्रदक्षिणा घालीत होते. म्हाळसाईला निद्र झोपेतून जाग आली नवीनच नवरी असल्याने घरात कुठे काय आहे याची जाणीव नसल्याने सर्वप्रथम काय करावे हा प्रश्न म्हाळसाईच्या डोक्यात भिनला काही न करता म्हाळसाई उठल्या व जात्याकडे गेल्या. सुपात पायलीभर जोंधळे घेतले व जात्याच्या

मुखकमलात टाकून दळणेस सुरु केले व दळणाचा आवाज नारायण पाटलांच्या कानावर येताच त्यांना जाग आली सुनेचे दळण बघून मनोमन सुखावले . घराण्यात साक्षात लक्ष्मीचे पदार्पण झाले या विचार पुष्पाने भारावून त्यांनी सुटकेचा निश्वास सोडला. पहाटेच्या गार वाऱ्यात हिरव्या कुरणांवर मनमुराद आनंद लुटून दिवसभराच्या कार्यासाठी लागणाऱ्या ताकतीसाठी अन्नग्रहण प्रित्यर्थ नारायणरावांनी बैल सोडले व रानात जाऊन बसले काही कालावधी नंतर म्हाळसाईचे दळण पूर्णतः दळून झाले व खराटा घेऊन अंगण साफ करण्यासाठी ही माऊली प्रथमच त्या दिवशी घराबाहेर आली होती. तिने दहेगांव पाहिले होते ते केवळ रात्रीच्या चमकणाऱ्या काजव्यात नी थोडासा प्रकाश देणाऱ्या कंदीलात . पण आता सकाळ होणार होती, वातावरणातील काळे आकाश अलगद निळेशार होऊ लागले होते, पुसटसे दहेगाव नजरेत सामावण्याचा प्रयत्न म्हाळसाई करत होत्या हळूहळू धुके नष्ट होऊन सुर्याचा सोनेरी पटटा त्या झाडाझुडपाच्या कुशीतून जन्मास आलेला होता. त्यांच्या खराट्याच्या आवाजाने सुर्यनारायणाने अलगद डोके वर काढले होते, सासुबाईना पुसटशी जाग आली होती. त्यांना अंथरुणावरून उठण्याअगोदर सुनबाईने अंगणही साफ करुन ठेवलं होतं, अंगावरची हळद अजून जराही दूर झालेली नव्हती तरी काम करून आपले स्थान कोणते आहे ती माऊली समाजात दाखवून देत होती. अंगण साफ होताच गोमातेच्या शेणान सारासुर करुन म्हाळसाई घरात गेल्या. आप्पा पाटील उठल्यानंतर पित्याच्या जागी गुरे चारण्यासाठी गेले, धाकटे दीर बाजीराव हे नावाप्रमाणेच होते, ते मात्र घरातच अंथरुणाशी मैत्री करुन त्यावरच विसावलेले होते. सासुबाईने सुन नवीन आहे म्हणून स्वतःच आंघोळीसाठी पाणी तापवण्यासाठी ठेवलेले होते, सर्व सकाळचे काम आटोपलेले बघून सासुबाई म्हणाल्या,

म्हाळासा थोडं शांत बस बघु, कालच लगीन झालयं तुझं, अजून हळदीचं पिवळं अंग हायं, अजून इतक काम करु नगं, व्हईल हळूहळू , तू अस कर स्वयंपाक कर, अनं न्याहरी घेऊन वावरात जा अनं दुपारच्याला घरी ये उन्हात जास्त वेळ बसु नगं, आजरी बिजारी होईल बाई.

हा आत्याबाई ,

एवढे उत्तर देवून म्हाळसाई सासर घरी प्रथमच स्वयंपाक करण्यास लागल्या, स्वयंपाक पाटीत घेवून म्हाळसाई शेतावर निघाल्या हळूहळू वावर शोधत त्या वावरात पोहचल्या. लग्न जरी झाले असले तरी सध्याच्या कलीयुगाप्रमाणे आप्पासाहेब त्यांच्याशी एक शब्द सुध्दा बोलले नव्हते. तशीच न्याहरी ठेवून त्या सासू आज्ञानुसार त्या घरी निघाल्या दुपार टळून गेली पुन्हा सायंकाळ आपले अस्तित्व फुलवू लागली, म्हळासाईला कालचा अप्रतीम दिवस आठवला काही क्षण मोहितेपाटलांच्या आठवणीने त्या गुंग झाल्या, आईबापाच्या सुखद झालर कालच्या लग्नरुपी वादळाने उडून गेली व नवऱ्याने बांधलेल्या रेशीम गाठीनं नवीन साथ दिली याच सुखदुखात आठवणीनं म्हळासाईच अंतकरण हेलावून

गेलं, अश्रुची रांग डोळ्यात दाटली गेली. अश्रु पुसता पुसता भावी आयुष्याची स्वप्न रंगवता रंगवता म्हाळसाईच्या गालावर हास्याच्या छटा उमटल्या. सायंकाळी ही झाडलोट केली घरात आवरासावर केली, जळणासाठी सरपण चुलीजवळ आणले व सहा सात वाजेच्या सुमारास स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. बाजीराव केव्हाच गावात गप्पा मारणेसाठी घराबाहेर पडले होते, नारायणराव व आप्पासाहेब शेतातून घरी परतले होते व गुराढोरांची आवाराआवर करुन बाहेर बसले होते. सासुबाईंनी दोघांनाही चहा दिला, चहाची ताटली हातात घेत असतांना नारायण पाटील बोलले,

'अगं सुन बाईला ज्यास्त काम सांगु नगं... नवीन हायं, मोठ्याची लेक हायं.

मोठ्याची हाय म्हणून काम सांगायच नाही काय? असा प्रश्न विचारत आप्पासाहेब घराबाहेर आले.

तसं नव्हं कालच तर लगीन झालयं, तीनं उठल्यापासून खुप काम केलया आपल्या घरात शोभेल अशी देवी हाय. आपल्या घरातील लक्ष्मीचं आहे.

असे गुणगान करीत सासुसासरे जेवणासाठी आत आले. सर्वांचेच जेवण आटोपल्यानंतर जो तो आपआपल्या जागी झोपी गेला, म्हाळसाईच्या पापणीला अजून झोपेची तार येत नव्हती. धाब्याच्या घराची पाटई बघता बघता अंथरूणावर पडून विचार करीत होत्या, आपल्या आई वडीलांनी चांगल्या ठिकाणी सून म्हणून दिले, आई वडिलांसम जीव लावणारे सासु-सासरे, भावी आयुष्यात साजेसा असा पती, घराण्याला शोभेल अशी धनदौलत, जीवाला अधार म्हणून अखेरपर्यंत पुरेल अशी काळी कसदार जमीन, सार काही सौभाग्यवतीचं लेणं ईश्वरानं आपणास दान केलं याच विचाराने म्हाळसाई झोपी गेल्या. पुन्हा रोज तसेच नित्यक्रम सुरु झाले. दिवसामागून दिवस जावू लागले. दहेगाव आता पुरेशे आपले झाल्यासारखे वाटू लागले. घरातील जेष्ठ सुनेची जबाबदारी दिवसेंदिवस अंगावर पडू लगाली, नवीन अशा घेऊन उगलेला सुर्यनारायण काही तरी अपेक्षा पदरात सोडून जात होता, मनात असलेले स्वप्न हळूहळू पुर्ण होईल अशी आशेची पालवी म्हाळसाईच्या मनात हळूच फुलत होती. घरातील चुल पेटण्यापासून तर सायंकाळची जेवणाची भांडी घासण्यात म्हाळसाई दंग असत होत्या, उगले घराण्यात शोभणाऱ्या या मोहितेपाटलांची कन्या खरोखर एका स्त्रीत्वाला सुशोभीत दिसेल असाच अलंकार होती. लग्न दिवसापासून माहेर सोडलेली ही मोहिते कन्या अजूनपर्यंत एकदाही सासर सोडून माहेरी गेलेली नव्हती. पोळ्याचा सण आठ दिवसावर येवून ठेपला होता. आपल्या म्हाळसाईला पोळ्याला घरी आणू या असा अट्टाहास बाबुराव नामक बंधुनी मोहितेपाटलांशी धरला होता सर्वांची इच्छा बघुन लेकीस सणानिमित्ताने घरी नेण्यासाठी दहेगांवी आले, उतरल्या उतरल्या गावातील उगलेपाटलांच्या घराकडे पायांनी चाल केली. बऱ्याच दिवसांपासून काळजाइतक्या जपलेल्या म्हाळसाईला बघीतलेले नसल्याने नजर फक्त उगले पाटलांच्या घराचाच शोध

घेत होती. मन सारखे घोटाळत होते. हृदय पित्याच्या ममतेने बहरून उठले होते. बुध्दीत म्हाळसाई खेरीज दुसरा विचार नव्हता, लेकीच्या विरहाने सद्‌गतीत झालेल्या अंत:करणाने मोहितेपाटलांनी उगले पाटलांच्या घराच्या पायरीवर पाऊल टाकले, राम ...राम पाटील या सहर्ष स्वागताने नारायण पाटलांनी मोहित्यांचे स्वागत केले. 'अगं म्हाळसा पाणी आण बघू आपल्याकडे पाहुणे आल्याती, ते पाव्हणं टापरगावचं हायती ?' विशाल नजरेने पाहुण्यांची मुर्ती हृदयात सामावून म्हाळसाई मनातल्या मनात उदगरल्या,

'बाबा आल्याती.'

त्वरीत पाण्याने भरलेला तांब्या व वाटीत गुळ घेऊन म्हाळासाई पाटलांकडे गेल्या. पित्याचे पाणी पिऊन झाल्यावर हिंदु स्त्रीला शोभेल असा डोईवर पदर घेऊन वडीलांचे चरणस्पर्शी नतमस्तक होऊन वंदन केले. 'सुखी रहा' असा वडीलांनी दिलेला आशिर्वाद म्हाळसाईच्या कानी पडताच त्या आतल्या खोलीत रवाना झाल्या. सासुबाईंनी स्वयंपाक करणेस लावला, लागलीच चुल पेटवून म्हाळसाईने पोळी शिकरण केले व पित्यास जेवू घातले. जेवण वैगेरे किरकोळ गप्पा मारल्यानंतर मोहिते पाटील हळुचपणे नारायण पाटालांना म्हणाले, 'पोळ्याला म्हाळासाईला नईन म्हणतोय, दोन तीन दिवस ... आता बरीच दिवस झाल्याती आमच्या बाबुला खत लागलीया म्हाळसाईची, वाईस दोन तीन दिस पाठवलं तरं बर होईल बघा.'

'दोन तीन दिसच का ? सात आठ दिस न्या की, जशी आणली तशी माहेरी गेलीच न्हाय लयं गुणगान लेक हायं तुमची'. नारायण आप्पा असे पुढे बोलत म्हणाले, 'आजच्या दिस मुक्काम करा, अन सकाळच्या नाहीतर दुपारला जावा, म्हाळसाला घेऊन टापरगांवला.'

'बरं तसंच करतोया'. असं बोलून मोहिते पाटलांनी मुक्काम ठोकला. माहेर घरी जावायचे म्हणून ह्या नव्या नवरीला डोळे मिटण्याची सुध्दा सवड झाली नाही. दुसऱ्या दिवशी अकरा वाजेच्या सुमारास म्हाळसाई सर्वांच्या पाया पडून वडीलांसोबत माहेरी जाणेस निघाली. वैजापुरच्या स्टॅन्डवर एस.टी. गाडीची वाट पाहता पाहता बराच उशिर झाला, शेवटी रंगारी देवगांव, बोरगांव, निरगुडी मार्गे टापरगांव जाणारी एस.टी. स्टॅन्ड वर अचानक म्हाळासाईच्या डोळ्यासमोर येवून थबकली. वडीलांसह म्हाळासाई गाडीत बसल्या, डोळ्या समोरचं आता पर्यंतच वातावरण त्या पूर्णपणे विसरल्या होत्या. सारं नव्या घडीचे पालखे आता माहेरी मंदीराने दुमदुमले होते. कधी टपक्यात टापरगांव येईल या विचाराने ही माता पुर्णपणे ग्रासली होती. तात्पुरत्या घडीला त्या दहेगांव विसरल्या होत्या, आई कशी असल, गावात काय काय बदल झाले असल, घरात काय वातावरण असेल, आपण गेल्यावर काय काय करायचे या विचाराने म्हाळसाईच्या मनावर पांघरून घातले. गाडी चालकाने कंडक्टरच्या बेलचा इशारा ऐकताच गाडी सुरु केली व एका मागून एक गावे मागे टाकण्यास सुरुवात

झाली. म्हाळसाईचे मन केव्हाच टापरगांवला जाऊन ठेपलं होतं, मात्र नजर टापरगांवला शिवलेली नव्हती. अखेर शिवना नदीचे पात्र ओलांडून व लिंबाच्या, वडाच्या फांदीतून गाडीने प्रवास सुरु केला ते शिवनेचे पात्र, ती घनदाट झाडीची फांदी हे सर्व बघून भविष्याचा विचार करत वर्तमानाला पळवणारी म्हाळसाई आता भूतकाळात गडप झाल्या होत्या. एकेकाळी त्याच फांदीतून जावून ह्याच शिवनातीरी सखीसह आपण धुणे धुतलं होतं , या पात्रात आपण कधी तरी स्नान केलं होतं, याच फांदीतील सरपण आपण जाळणेसाठी नेलं होत, आपले बंधुराय पोळ्याला बैल धुण्यासाठी येथेच येत होते, याच भुतकाळाने गांव कसं आलं त्याची जाणीवही होऊ दिली नाही, त्याच लिंबाच्या झाडाखाली ब्रेक दाबताच गाडी उभी राहिली. म्हाळसाई पुन्हा एकदा वर्तमानाच्या सिंहासनावर रूढ झाल्या व वडीलांपाठोपाठ खाली उतरल्या. तेच टापरगांव ! तेच लोक, त्याच स्त्रिया, तेच पशुपक्षी, तीच काळी जमीन, तीच फुलपाखरं, तीच सायंकाळ, तीच ती समाधी जागा सर्वकाही तेच होते, हा विचार करता करता अधूनमधून बाबांशी गप्पा मारता मारता म्हाळसाई गावात शिरल्या. आज आपली प्रेमळ लेक येणार म्हणून आईनं लाल मिरच्या केव्हाच उंबऱ्यात आणल्या होत्या. बहीण उन्हातून येणार म्हणून गुळपाणी घेऊन बाबुराव बंधु केव्हाच ओट्यावर जावून बसले होते, तिच्या स्वागतासाठी निसर्ग देखील खुलला होता, अंगणातील सडाही त्या मातेच्या चरणाची वाट पाहत होता किती तरी विलोभनीय नाट्यमय चित्र त्या टापरगांवच्या रंगमंचावर रंगले होते त्याचे वर्णन करणे देखील कठीण आहे. काही मोजक्याच क्षणात अचानक म्हाळसाई पिशवी घेऊन अंगणात दाखल झाल्या, आईकडे बघताच मनात साठवलेले सुख दुख त्या टपकणाऱ्या अश्रूंनी सांगून दिलं, 'आई' हा शब्द मुखातून उच्चारत म्हाळसाई ओटा चढल्या आईने मिरच्या ओवाळून चुलीत टाकल्या, गुळपाणी देवून थकून आलेल्या बहीणीच्या आत्म्यास शांतता दिली . अनेक दिवसापासून सासरी गेलेली कन्या आज सणानिमित्त घरी परतल्याचे बघून घरातील सर्व सजीव निर्जीव वस्तुंना व्यक्तीस फार आनंद झाला. सायंकाळी खास जेवण करुन आनंदाची बीजे मनात रुजवत म्हाळसाई झोपी गेल्या. दुसऱ्या दिवशी लवकर उठल्याच नाहीत हेच नेमकं स्त्रिसाठी माहेर असतं बघा, सासरी पहाटे उठून जात्यावर जोंधळे दळणारी म्हाळसाई आज माहेर घरी किती निवांत, शांत, एकांत झोपी गेल्या होत्या, हाच फरक नेमका सासर आणि माहेरमध्ये असतो. आठ वाजता जाग येवून ह्या सासुरवासीन म्हाळसाई उठल्या व स्नान आटोपून आई सोबत सहज म्हणून नदीवर धुणं धुण्यासाठी गेल्या तिथे अनेक बालपणीच्या सख्या भेटल्या अनेक दुरवर सुना म्हणून गेलेल्या सख्या पोळ्या निमित्ताने घरी परतलेल्या होत्या मग काय ते दृश्य असेल सर्व सासरी गेलेल्या मैत्रीणी एकमेकांना भेटत आहेत, आपआपल्या सासु विषयी सासऱ्याविषयी, पतीविषयी विचारत आहेत. सारं मनातलं सुखदुख त्या मैत्रीणी आपआपसात सांगत आहे असं सार चित्रण पलटल्यावर म्हाळसाई वडीलधाऱ्या मंडळीच्या देवासह पाया

पडून घरी परतल्या दुपारी आई सोबत गप्पा मारल्या पुन्हा तोच एक अनोखी दिव्या प्रभात मांडणारी सांयकाळ फुलली.

बाबुरावांनी बैलं शिवनावर धुवून व मळ्यात जाऊन बैगड लावून सजवुन आणले. त्या बैलांला त्यांनी मनापासून रंगवले होते, त्यामुळे साजेश्या सांजकाळेसे शोभेल अशी ती बैलरुपी लक्ष्मी घराला शोभून दिसत होती. गावच्या वेशीतल्या हनुमन्ताच्या मंदिरास पाच फेऱ्या मारण्यासाठी तिघ बंधू बैल घेऊन गेले. म्हाळसाईने अंगण शेणाने सारवुन सजवलं होतं. आईने सणासाठी पुरणपोळी केली होती. आता म्हाळसाई घडणाऱ्या प्रत्येक क्षणाला मनात साठवत होती.

बाबुरावांसह इतरांनी बैल घरासमोर आणले इतर पाचही बहिणींप्रमाणे लाडक्या असणाऱ्या म्हाळसाईला घरच्या लक्ष्मीचे पुजन करण्यास सांगितले. बैल त्यांच्या निवासस्थानी बांधल्यावर सर्व बहिण भावांनी प्रेमाने जेवण केले. मंत्रमुग्धाने नटलेली, निसर्गाने फुललेली, बैलाच्या गळ्यातील घुगरांनी मधुरलेली, नक्षत्रांनी सजलेली, काजव्यांनी मंतरलेली व म्हाळसाईने स्वप्नाने रंगवलेली रात्र कशी विलीन झाली हे कळालेच नाही. नंतर आलेल्या सकाळ सायंकाळी कशा कळत नकळत मावळल्या कळाले नाही. जाण्याचा दुसरा दिवस येऊन ठेपला, उद्या लेकीला सासरी जायचे म्हणून मातोश्री आवरासावर करीत होत्या. म्हाळसाई मात्र उदास न होता आनंदातच होत्या. स्त्री या शब्दांची जडणघडण मुळात दोन अक्षराने झालेली असते व तो शब्दच मुळातच जोडाक्षर असतो. स्त्रियांचा पुर्वार्ध वडीलांकडे तर उत्तरार्थ पतीकडे सोपवलेला असतो. ती जन्मःतच एका घरची स्वामीनी तर दुसऱ्या घरची बंदिनी असते. लग्नापूर्वी ती त्या जन्मदात्या आईवडीलांची व त्या घराची एक सदस्य असते. परंतु ब्राम्हण जेव्हा मंगलाष्टकातून बोलतो...

लाभो संतती संपदा बहु तुम्हा लाभोतही सद्‌गुण
साधोनी स्थिर कर्मयोग आपुल्या व्हा बांधवा भुषण
सारे राष्ट्र दुरुनी हेची कथीती किर्ती करा उज्वल
साई सध्याश्रम हा तुम्हा वधुवरा देवो सदा मंगलम्

व शुभमंगल झाल्यानंतर ती सासरची बंदनी बनते. पती हा तिचा सर्वस्व असतो. तीचे सासर हेच तिचे माहेर बनते अन् सासरच दुःख हेच तीचे माहेरचे सुख बनत असते. त्या संपुर्ण विचाराची कल्पना म्हाळसाईस जन्मातच होती की काय हे श्री भगवान शिवच जाणोत. परंतु त्यांच्या चेहऱ्यावर कुठेही दुःखची चिन्हे दिसत नव्हती. सर्व क्षण नेहमी सुखातच स्विकारावा हाच जीवनाचा पाढा आतापर्यंत म्हाळसाईने रेखाटला होता. त्या दिवशी उलट त्या फार आनंदात होत्या. 'आई उद्या जावयाचे आहे ये एखाद्या दिवशी माझे घरी', असे त्या मातोश्रीस विनवून सांगत होत्या. सांयकाळी सर्व भाऊ, ध्रुपताबाई मुक्ताबाई व आईवडीलांसोबत त्यांनी अन्न ग्रहण केले. जेवण झाल्यावर वडील बोलले,

'म्हाळसा चांगली रहा. मोठे कुटूंब आहे सासु सासऱ्यांना दिरांना, नवऱ्याला उलट बोलू नको गाईची सेवा करायची, अंग गाय ही घराची शोभा असते, सासु सासऱ्यांनाच आईबाप समज.'

यातून कि[illegible] संस्कृतीशील संस्कार त्या मातेवर मातपित्याचे पडले होते हे लक्षात येते. दुसऱ्या दिवशी सासरी जायचे असल्याने पतीचा, सासुसासऱ्याचा, शेताचाच विचार म्हाळसाई करीत होत्या, केवळ माहेरचाच नव्हे तर सासरचा विचार करणारी ही जगतवंदनीय म्हाळसा माता शांत निद्रेत झोपी गेली होती. दहेगावी नांदायला जाण्याच्या कारणाने या माहेरवासीन म्हाळसाई त्या दिवशी लवकर उठल्या. सुर्यापासून तर निसर्गाने खोलवर रुजवलेल्या लिंबाच्या मुळापर्यंत सर्वचजण म्हळासाईस निरोप देण्यास सज्ज झाले होते. दहा वाजेचा टाईम असावा भाकरी बांधून म्हाळसाईने पिशवीत ठेवली, आजुबाजुच्या स्त्रियांशी नतमस्तक होऊन चरणस्पर्शी नमस्कार केला [illegible] बंधुच्या व दोन बहिणीच्या डोळ्यात अश्रुधारा भरल्या होत्या, आईला दुःख असूनही हसतमुखाने लेकीकडे बघत होती. बाबुरावाने बहीणीची पिशवी हातात धरली होती, म्हाळसाईचे अंतकरण पुर्णतः बरसणाऱ्या ढगाप्रमाणे भरून आलं. आईच्या कुशीत साऱ्या अश्रुंची साठवण करुन ही शिवजन्मास आणणारी माता... 'येते आई' असे बोलून पायरीखाली उतरली. मुक्ताईने गुळणाकरणेसाठी पाण्याने भरलेला तांब्या म्हाळसाईच्या हातावर टेकवला गुळणा करुन पोटभर पाणी पिल्यानंतर उजव्या हाताने इशारा करत म्हाळसाई सासरी निघाल्या.

सासरी पोहचताच त्यांनी माहेरच्या आठवणींना सासरी कर्तव्याआड केले. पुन्हा आपल्या कामांना सुरुवात केली. अनेक दिवस ओलांडल्यानंतर, सासरी माहेरी जाण्यायेण्यानंतर, सुख दुखाशी झालर धरुन सोडल्यानंतर, नैसर्गिक नियमानुसार अथवा नैसर्गिक कालचक्रानुसार म्हाळसाई ह्या गरोदर राहिल्या. त्यांना दिवस गेले. पाच महिन्याच्या गरोदर असतांना देखील त्यांनी शेतात निंदणी, खुरपणी, वेचणी, एवढी कामे केली, सांजसकाळी घरात स्वयंपाक केला, दररोज नित्यनियमाने संडासाजवट करुन अंगणातील लक्ष्मी फुलत ठेवली. सकाळी व सायंकाळी गुरांकडे जातीने लक्ष दिले. मात्र सहाव्या महिन्यापासून त्यांना वरील सर्व कामे सहज करणे अशक्य होऊ लागली, त्यानंतर मात्र त्या घरीच राहू लागल्या. सहाव्या महिन्याच्या उत्तरार्धात पतीचे व म्हाळसाईचे काही किरकोळ भांडण झाले होते. त्यामुळे दिवसेंदिवस त्या उदासच राहू लागल्या. पोटातील भगवान शिवाच्या अवताराचा गर्भ दिवसेंदिवस वाढत होता, तर म्हाळसाईची तब्येत वाढत्या गर्भाने खुलत होती, मुलीला सातवा महिना लागला म्हणून मोहिते पाटील तिला घेणेसाठी दहेगांवी आले, सातव्या महिन्याचे डोहाळ्याचे जेवण फार मोठ्या थाटामाटात देवून उगले घराण्याने त्यांची सून प्रसुतीसाठी माहेरघरी पाठवली. आपण मामा होणार या अविर्भावाने बाबुराव अत्यंत खुशीत होते, लेक काही दिवसांनी प्रसुत होणार म्हणून लहान सहान गोष्टींची पुर्व

तयारी अगोदरच त्यांच्या मातोश्रीने चालु केली होती. वडील घरात लागणाऱ्या कोणत्याच गोष्टीचे उणे पडू देत नव्हते. सर्व काही निर्मळ वाहत्या शिवनातीरावरील जलाप्रमाणे स्वच्छ व सुंदर होतं. वडीलांचे मोहिते घराणं दैवावर विसंबलेल होतं. दैव या गोष्टीवर त्यांचा पूर्णतः विश्वास होता. मोहिते पाटलांचे बाबुराव नामक चिरंजीव नेहमीच पोथी पुराण वाचत असे, त्यामुळे शास्त्रीय पारायण विद्येत त्यांचा चांगलाच हातखंड होता, एवढेच नव्हे तर जन्म कुंडलीपासून तर उज्वल आयुष्यातील भावी जीवनापर्यंत सर्व भाकीतेही ते करत असत, यावरून सर्व घराणं अध्यात्माचे बाळकडू प्यालेले होते व अशा या धार्मिक घराण्यातच श्री भगवान शिवाने जन्म घेण्याचे ठरवले होते. नाहीतर सृष्टीचे रक्षण करावयाचे असेल तर अध्यात्मकतेचे बळ हे प्रबळ पाहिजे, कोणतीही गोष्ट ही अध्यात्मकतेच्या बळावर नेटाने प्रवास करु शकते हे लक्षात ठेवा हाच विचार भगवान शिवाने केला असावा व मातोश्री म्हाळसा मातेच्या उदर कमलातून जन्म घेण्याचा निश्चय केला असावा. म्हाळसा मातेस आता सातवा महिना पुर्णतः सुरु झाला होता . डोहाळे लागल्यानंतर लगेचच बाबुरावांनी घरात पोथी पारायण सुरू केले, सातव्या महिन्याच्या पहिल्या दिवसापासूनच त्यांनी बहिणीशेजारी खाट टाकून पोथीचा पहिला अध्याय वाचण्यास सुरुवात केली, मोहिते पाटलांचे त्यावेळी जुने कडीपाटाचे घर होते त्या जुनाट घराच्या आतल्या पुर्वेकडील दारात मातोश्री म्हाळसाईची बसण्याची जागा होती तिच्या शेजारीच बाबुराव पोथी वाचीत असत. बाबुराव हे टापरगावच्या पंचक्रोशीतील विख्यात प्रख्यात नामवंत ज्योतिष्कार म्हणून प्रसिध्दीस होते व असे विलोभनीय शास्त्र पंडीत स्वतः जातीने बहिणीजवळ भागवत पुराण पोथी वाचत होते, म्हणून काय अध्यात्मकेचे बाळकडु त्या म्हाळसाईच्या उदारातील शिवअवतारास मिळत असेल याचा तुम्हीच विचार करा, भगवान श्रीकृष्णाने अर्जुन पत्नी सुभद्रा हिस ऐन गर्भ अवस्थेत चक्रव्युहाची गोष्ट सांगितली, जिथपर्यंत गोष्ट तिने ऐकली तिथपर्यंतच अनुकरण निर्माण झालेल्या अभिमन्युने करावे अगदी तसेच झाले. बाबुराव बंधूंनी बहिणीजवळ बसून रात्रंदिवस अध्यात्माची धर्माच्या कार्याची ज्योत तेवत ठेवावी, पुराणातील दैव सांगावे व सर्व त्या म्हाळसाईने ऐकावे व अगदी हुबेहुब अभिमन्यु सारखेच संस्कार त्या शिवअवतार रुपी जनार्दनावर व्हावे हा किती परम भाग्याचा योग असेलना. मामाने वाचलेली पोथी घेऊन ती जनार्दन नामक मुर्ती जगाच्या कल्याणासाठी संताची विभूती झाली व धार्मिकतेचे कार्य केले. तेच कार्य आज एकविसाव्या शतकात सांगणेसाठी माझ्यासारख्या अल्पवयीन बालकास 'शांतीची फुलं' लिहिण्यास बुध्दी दिली याचे काय वर्णन करु.

एक एक दिवस पुढे येत होता व एकएक दिवस झपाट्याने मागेही जात होता, म्हाळसाईच्या उदरातील शिवाचा गर्भ हळूहळू वाढत होता, आईला वाटणारी काळजी दिवसेंदिवस वाढू लागली होती. वडीलांच्या पायाला आता गती लागली होती तर बाबुरावांच्या

पोथी पारायणाचा एकएक अध्याय संपत होता. रोज नित्य दर्शन देणारा सूर्य म्हाळसाई पुत्राची वाट बघून निघून जात होता. सायंकाळची हजेरी लावण्यासाठी चंद्र दिवस असताच आकाशात उपस्थित राहू लागला होता. किलबील करणारी फुलपाखरे मुहूर्तमार्तंडकरांच्या समाधी मंदिराच्या शिखरातून उगले घराण्याच्या कुलदीपकाची वाट पाहत होते, हवेत मंद गतीने वाहणारा वारा मध्येच टापरगावच्या शिवारात विसाव्यासाठी थांबत होता, शिवनाचे पाणी खळाळत होते, नवीन जन्मास येणाऱ्या शिवाच्या अवताराला पाहण्यास येण्यासाठी आकाशातील सजलेले तारके दुरूनच लुकलुकत होते व अशा रीतीने एका पाठोपाठ दिवस झपाट्याने जात होते. आता सप्टेंबर महिना उगला म्हाळसाईला पुर्णपणे नववा महिना लागला, याच महिन्यात म्हाळसाई प्रसुत होतील असे भाकित बाबुरावांनी केले होते. मातापित्यास चिंता वाटू लागली म्हाळसाईने पुर्णपणे अंथरून आपलेसे केले होते, घरातील वातावरण पुर्णतः बदलण्याच्या स्वरूपात जमा झाले होते. महर्षी नारदासह सर्व देवलोक स्वर्गलोकांतून मृत्युलोकातील टापरगावकडे डोकाऊ लागले होते. सप्टेंबर महिन्याच्या पंधरवाडा तसा सुखरुप निघून गेला होता. अखेर एक एक दिवस जावून २३ तारीख उगवली, निरभ्र आकाशात सुर्य काही वेगळेच प्रदर्शन मांडू लागला होता, मृत्यु लोकांतील वातावरण त्या दिवशी फारच बदलले होते, सकाळी अकरा वाजेपासून म्हाळसाईस थोडेसे अस्वस्थ वाटू लागले होते. बाबुरावाच्या मुखातुन पोथीच्या ओव्या, इतर दिवसांपेक्षा त्या दिवशी जरा अधिकच गतीने बाहेर पडू लागल्या होत्या, घरातील हालचाली वाढु लागल्या होत्या, मातोश्रीचे काळीज तडफडू लागलं होत तर वडीलांच्या पायात यशश्री संचारली होती. सायंकाळी पुन्हा म्हाळसाई थोड्या शांत झाल्या त्यांना पुन्हा थोडं बरं वाटु लागलं. सुर्यास्त झाला व चंद्रोदय झाला, एका अनोळख्या शितल स्पर्शाने नि बकुळेच्या मादक गंधाने रंगलेली रात्र देखील शिवना तीराशी जन्म घेणाऱ्या बालकाचा शोध घेऊ लागली, ललीत पंचमीच्या आदल्या दिवसाची ती रम्य रात्र होती, असेल नसेल सारे तारे आकाशात लुकलुकत होते. थंडगार वाऱ्यात घरट्यात विसावा घेणारी पाखरे देखील त्या रात्री टापरगावात संचार करुन जन्मास येणाऱ्या बालकाच्या स्वागतासाठी तयार झालेले होते. लाल देठ नी पांढरी फुले जन्मास आणून सखोल सुगंध देणारा पारीजातक फारच लवकर फुलला होता, मंदगतीने वाहणारा वारा जोरात वाहू लागला होता, वाहता वाहता मध्येच जन्मास येणाऱ्या बालकाची चौकशी करत होता. हळूहळू खळाळून वाहणारी शिवना नदी मात्र दुथडी भरून वाहू लागली होती. भगवान श्रीकृष्ण जन्माच्या वेळेस जसे वातावरण रंगले होते जशी अवस्था देवकी मातेची झाली होती तशीच अवस्था म्हाळसा मातेची झाली होती. जशी यमुना सदगतीत होऊन वाहत होती तशीच ही शिवना नदी ही वाहू लागली होती. चंद्र ही जावून नवीन आशेचा, अपेक्षीची पहाट फुलली, हवेतील बोचरी थंडी गुलाबी होऊन रंगली, पक्षांची रांग किलबील करु लागली, पारीजातकाच्या मनमोहक गंधाने बकुळाही लाजली. कोकीळेनेही

झाडावर बसुन स्वरांची मधुर चाल लावली, शिवनाच्या पात्रातील डोकवणारी कमळेही फुलली चोवीस सप्टेंबरची तारीख उगवली ललीत पंचमीने चाल करण्यास सुरुवात केली अनुराधा नक्षत्राने पंचाग फुलवलेले, भगवान शिवाच्या किंबहुना ब्रम्हा, विष्णु, महेश अशा त्रिदेव दत्ताच्या गुरुवाराने अस्तित्व मांडले, ब्रम्ह मुहूर्ताची वेळ नजीक येवून ठेपली. वेळ सात वाजेच्या पुढची झाली होती, बाबुरावांच्या पोथीचा शेवटच्या अध्यायाच्या सहाच ओव्या बाकी होत्या, प्रभु रामचंद्राच्या जन्माच्या वेळी जशा कळा कौशल्या मातेस येत होत्या तशाच कळा आता मातोश्री म्हाळसा मातेस येवू लागल्या होत्या. 'आई फार कळा येतात' असे म्हणत म्हाळसाई ओरडल्या. आईने धाव घेतली ती सुईने बाईकडे पाटलाच्या लेकीला कळा येत आहेत हे ऐकताच सुईन बाई लुगड्याचा पदर खोचून पळतच पाटलांच्या मागच्या घरात शिरल्या, म्हाळसाई जोरात उसासा टाकू लागल्या तर बाबुरावाकडून पाटावर उरलेल्या पोथीच्या ओव्या बाहेर पडू लागल्या . ७.४४ मिनीटे झाली, ब्रम्ह मुहूर्त लागला, वाहणारं पाणी शांत झालं, किलबील करणारी पाखरं वाड्याच्या शिखरावर गोळा झाली, वडील व इतर भाऊ ओट्यावर काळजीत पडलेले मनं व चेहरा घेऊन बसले होते. त्याचवेळी बाबुरावांच्या पोथीची शेवटची ओळ पूर्ण झाली व पुर्णपणे पोथी संपल्यावर २४ सप्टेंबर १९१४ रोजी या शिवअवतारी बालकाने हसतमुखाने सकाळी ७.४५ मिनिटाने पृथ्वीतलावर जन्म घेतला. या निर्माण होणाऱ्या बालकाने सृष्टीचे रक्षण करणेसाठी अध्यात्मिकतेचे बळ वाढण्यासाठी मामाची पुर्ण पोथी जन्म घेणाऱ्या मातेच्या उदरी एकली व पोथी संपल्यावरच ऐनवेळी जन्म घेतला यावरुन अध्यात्मिक काय भानगड आहे हे लक्षात आले असेलच, बाबुरावांनी पोथी पुराणे गासोड्यात बांधून देव्हाऱ्यात ठेवली. भारत भुमीत जन्म घेणाऱ्या देवाने आता पृथ्वी नाचू लागली, बाबुरावांच्या पत्नीने जोरात बाहेर येवून मोहिते पाटलांना सांगितले, 'मुलगा जन्मास आला' बळवंतरावाने वाहणाऱ्या वाऱ्याला, खळखळणाऱ्या पाण्याला, शांत बसलेल्या पाखरांना, बालकाची वाट पाहणाऱ्या सुर्याला अन नक्षत्राला ओरडून सांगितले, 'म्हाळासाई प्रसुत झाल्या, त्यांना पुत्ररत्न लाभले अन् मला भाचा झाला'. फार नाट्यमय वातावरण त्या इंगजांच्या गुलामगिरीत असणाऱ्या टापरगावात रंगले, म्हाळसाईच्या कळा बंद झाल्या, हृदय कमलातून अनेक कमळ उगवले. मातोश्रींना होणारा आनंद गगनचुंबी टिपणाऱ्या ढगांना जाऊन भिडत होता. मोहिते पाटील फेटा बांधुन गावात साखर वाटणेसाठी घराबाहेर पडले, सुईन बाई आनंदाने म्हाळसाईचे संपुर्ण आवरून घरी जाण्यास तयार झाल्या. अंगणातील तुळशीची पाने वाऱ्याच्या आनंदात सामील होऊ लागली. पक्षांनी आकाश सजले, कोकीळेच्या गायनाने वातावरण दंगले, शिवनाच्या पाण्याने पाण्यातले मासेही रमले, बालकाच्या जन्माने बकुळी, पारिजातक, जाई, जुई, चमलीच नव्हे तर गुलाबाची तसेच गुलबक्षीची फुले फुलली, अशा या नाट्यमय वातावरणात बाबुराव पाटील बालकाची हळूहळू कुंडली काढत होते. आई, भावजया, दोन बहिणी व बळवंतराव

म्हाळसाईस काय हवं नको ते या विषयी तिला सातत्याने विचारत होते. मोहिते पाटलांनी संपुर्ण गावात साखर वाटून दहेगांवी पुत्ररत्न झाल्याचा निरोप पाठविला. गोठ्यातील गुराढोरांना ही आनंद व्हावा म्हणून एक वाफा घास कापून भरघोस चारा त्यांचेसमोर खाण्यासाठी दिला. बालकाचा जन्मवेळ बघून बाबुराव पाटलांनी कुंडली काढण्यात सुरुवात केव्हाच केली होती.

दि. २४ सप्टेंबर १९१४ शके १८३६ आनंदनाम संवत्सर आश्विन मास शुक्ल पक्ष अनुराधा नक्षत्र ललीत पंचमी वार गुरुवार वेळ ७.४५ मिनीटाचा बाबुराव पाटलांनी घरातील सर्वांना सांगितले की जन्मास येणारा बालक ब्रम्ह मुहूर्तावर जन्मास आला. त्यातल्या त्यात ललीत पंचमीचा दिवस, त्या दिवसाला योग लाभेल असेच अनुराधा नक्षत्र ही आले आहे. जन्मास आलेला म्हाळसाईचा पुत्र हा फार मोठा साधक आहे अशी घोषणा मामांनी कुंडली बघुनच केली. कुंडलीच्या आधारानुसार मामांनी नारायण हे नामकरण केले, तर हे बालक जनतेसाठी आदर होईल असे समजताच बारस्याच्या दिवशी 'जनार्दन' हे शुभ नांव दिले. हा जिथे जाईल तिथे याचा जयजयकार होईल, हा जिथे बसेल तिथे यास सर्वकाही प्राप्त होईल, हा फार मोठा साधक बनून एक महान संत होईल अशी घोषणा मामांनी बारस्याच्या दिवशी केली. बारस्याच्या दिवशी फार मोठा कार्यक्रम मोहिते पाटलांच्या घरी आनंदाने पार पडला होता. सकाळी सकाळी गाव पंगत दिली, सायंकाळी किर्तन ठेवले होते, कितनातच बाबुरावांनी भाच्याची कुंडली जाहीर केली. बारा दिवसाचा हा तेजस्वी बाळ आई शेजारी जगाच्या कल्याणासाठी सुरुवात कशापासून करावयाची इंग्रजाच्या जाचातून भारत भूमीस वाचवून भगवान श्रीकृष्णाचे पार्थ अर्जुनास सांगितलेले गीता वाक्य खरे करावयाचे आहेच, पण सुरुवात कशापासून करावयाची याची चिंता करत करत ते बाळ आता झोपी गेलं होतं. हा भगवान शिवाचा अवतार बाराव्या दिवशी फार खुलून दिसत होता, आईच्या कुशित मग्न झाला होता. छोटासा हसरा चेहरा, इवलेसे नाक, नशीबवान हात, उंच कपाळ, भारत भूमीवर प्रवास करणारे ते पाय, काय वर्णन करावे त्या भारतभूमी देवघरात जन्मास आलेल्या शिवअवताराचे खरोखर त्या उगले घराण्याच्या वाड्याला शोभेस असाच होता. बारस्याच्या दिवशी किर्तनकार बाबांनी किर्तन म्हणण्यास सुरुवात केली व सेवेसाठी अभंग निवडला तो असा

**इवलेसे रोप लावीयले द्वारी त्याचा वेलु गेला गगनावरी**
**मोगरा फुलला मोगरा फुलला फुले वेचिताशी भारु कळीयाशी आला ।।**

बघा जन्मास आलेल्या बालकास शोभेल अशाच ओवीने त्या महाराजांनी बारस्याच्या किर्तनास सुरुवात केली. हा किती चंपाष्टीचा योग असेल हे आता तुम्हीच ठरवा, त्या अभंगाचा प्रत्येक चरणाचा प्रति अर्थ त्या जन्मास आलेल्या बालकास लागू होत होता. अभंगाचा अर्थ असा होता की इवलेसे रोप अंगणात अथवा घरासमोर लावले त्याचा

वेल हा गगनचुंबी आकाशात गेला व त्या आकाशाला टिपणाऱ्या वेलाला मोगऱ्याची सुगंध देणारी व इतरांना मोहून घेणारी फुलं फुलली आणि जेव्हा ती फुलं गोळा करण्यास सुरुवात केली तेव्हा ती वेल कळ्यावर येऊन पोहचली, म्हणजेच तो वेल इतरांना कायम सुगंध देणारी फुल उमलण्यासाठी सातत्याने कळी तयार करण्याचे कार्य करु लागलेला असतो अगदी हुबेहुब त्या रोपट्यासारखे कार्य या इवल्याशा जनार्दनाने केले, ते बालक त्या पाळण्यात इवलेसे होते, त्याची ही भक्तीकार्य त्या वेलासारखं आकाशापर्यंत गेले. त्या बालकाने भक्तीची, धर्माची फुलं अवघ्या भारत भूमीत फुलवली, त्याच फुलांचा सुगंध त्या वेळच्या विसाव्या शतकातील लोकांनी घेतला, अगदी मोगऱ्याच्या फुलाप्रमाणे जनार्दनाने फुलवलेली भक्तीची फुलं जेव्हा विसाव्या शतकातील लोकांनी गोळा केली, तेव्हा पुन्हा एकविसाव्या शतकातील लोकांसाठी पुन्हा त्यांनी भक्तीच्या कळ्या तयार केल्या व फुले तयार करुन भक्तीचा सुगंध दिला व आजही त्या इवल्याशा रोपट्याप्रमाणे जनार्दन स्वामी भक्तीच्या कळ्या उमलविण्याचे कार्य सातत्याने अहोरात्र करीत आहे. व त्याच एका उमललेल्या फुलाच्या भक्तीरुपी सुगंधाने मोहित होऊन मी शांतीची फुलं ही कांदबरी त्याच इवल्याशा पण आकाशापर्यंत भिडलेल्या त्याच त्या पाळण्यातील श्री जनार्दन स्वामींवर लिहित आहे. त्या बारशाच्या छोट्याशा बालकास शोभेल असाच साजेसा अभंग महाराजांनी किर्तनासाठी निवडला होता यावरून दैव व योग यांचा किती परस्पर दुवा असतो हे लगेचच लक्षात येते


**बोलीले लेकुरे वेडीवाकुडी उत्तरे । क्षमा करा अपराध महाराज तुम्ही सिध्द ॥**

या जगद्‌गुरु जगदवंदनीय संतश्रेष्ठ संतशिरोमणी तुकोबा महाराजांच्या ओवीनेच कीर्तनाची सांगता केली. महाराजांनी त्यानंतर बालकास पाळण्याजवळ जाऊन भरभरीत नजरेने पाहिले व हृदयातही सामावून घेतले, त्या लगानग्या बालकात महाराजांना काय दिसले ते त्यांनाच ठाऊक, पण आशिर्वाद न देता महाराजांनी त्या बालकाच्या चरणाचे दर्शन घेतले व बोलले 'हा फार मोठा योगी माणूस आहे. जगाचे कल्याण याचे हातून होणार आहे व आपली भूमी याच्या चरणाने पुनीत होणार आहे.' असे सांगून महाराज घरी निघून गेले. सगळं आटोपल्यावर बाबुरावांनी काढलेल्या जन्मकुंडली इतरांना दाखविली ती कुंडली अशी होती

श्री. रा.रा. आप्पासाहेब नारायण उगले यांचा मुलगा
श्रीमान नारायण उगले उर्फ जनार्दन आप्पासाहेब उगले
सवंत १९७० शके १९३६ मिती – अश्विन शुध्द ललीत पंचमी, वार गुरुवार
जन्म तारीख २४/९/१९१४
जन्म वेळ : सकाळ – १९.४५ मिनीटे (७.४५)

| | | | |
|---|---|---|---|
| तुळ – लग्न | जन्म नक्षत्र – अनुराधा | | चरण – नारायण |
| राशी – वृश्चिक | गण – देव | योनी – मृग | नाडी – मध्य |

गोत्र – प्रवर शाखा




जन्मकुंडली दाखविल्यानंतर म्हाळसाई लहानग्या जनार्दनाला पोटाशी घेऊन झोपल्या. १२ दिवसाचा प्रवास करुन जगाची चिंता करणारे लहानगे जनार्दन स्वामी डोळे मिटून शांत निद्रेत त्या जगत वंदनीय मातेच्या उदरी विसावा घेत होते. तेराव्या दिवसाची पहाट उगवली, जगासाठी संताची विभुती ठरणारा हा बालक केव्हाच जागे होऊन हातापायाची हसतमुखाने खेळत होता. म्हाळसाईने अजुन झोपेस स्वतःपासून दुर केलेले नव्हते. किलबील करणाऱ्या चिमण्यांच्या आवाजाने अन महकुन देणाऱ्या बकुळीच्या सुगंधाने म्हाळसाईच्या डोळ्यावरची तार दुर झाली. चिटकलेली पापणी दुर होताच म्हाळसाईच लक्ष तिच्या बालकावर गेले त्या लहानग्या बालकाकडे लक्ष जाताच म्हाळसाईच्या लगेच लक्षात आले, ज्याप्रमाणे भारताच्या स्वातंत्र्यासाठी आझाद हिंद सेनेची स्थापना करणाऱ्या, अवघ्या हिंदुस्थानचे रक्त तळमळण्यास लावणाऱ्या व देशासाठी अहोरात्र परिश्रम घेणाऱ्या सुभाष बाबुंनी १३ व्या दिवसी शेजारी बसणाऱ्या आजोबाच्या पिस्तुलाला हात लावला होता, नव्हे नव्हे तर त्या पिस्तुलाकडे चांगला कटाक्ष लावून बघितले होते. अगदी त्याचप्रमाणे हा लहानगा जनार्दनबाबा तेराव्या दिवशी ऐन पहाटेच्या प्रारभी घरात लावलेल्या भगवान शिवाच्या मुर्तीकडे कटाक्ष लावून पाहत होता. एवढेच नव्हे तर दोन्ही छोटे छोटे हात मुर्तीकडे पसरवले होते हे म्हाळसाईने जेव्हा पाहिले तेव्हा त्यांच्या मनात अनेक स्वप्नाची पालवी एखाद्या तंबुप्रमाणे उभी राहीली, म्हाळासाईला त्या लहानग्या जनार्दनाचे फार कौतुक वाटलेच पण आसरा ही वाटला. लगेचच म्हाळसाईने बाबुराव बंधूस हाक मारली...

''दादा ये दादा इकडे ये... हा जना बघ कसे शिवशंकरजींच्या मुर्तीकडे हात पसरवितो.''

बहिणीची हाक ऐकताच चहाची बशी ओट्यावर ठेवत बाबुराव आत गेले व बघितले. सुर्याकडे झेप घेणाऱ्या वज्रमुखी मारुतीची प्रतिमा डोल्यासमोर आणीत बाबुराव

म्हटले.., ''अग ताई हा कोणी साधासुधा पोरगा नाही साक्षात देव आहे देव... मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ते असेच''

हा लहानगा जनार्दनबाबा अवघ्या विश्वाला तारणेसाठी भगवान शिवाचा अवतार घेऊन आला आहे हेच जणू काय तो आपल्या मातेस भगवान शिवाच्या फोटोकडे हात पसरवुन अप्रत्यक्षरित्या सांगत होता. सांगता सांगता पाळण्यात खेळत होता. खेळता खेळता हसतही होता. हसता हसता एक दिवस समोर उगवत होता. उगवणारा दिवस या लहानग्या बाळास भारत भूमीत रंगणाऱ्या दिवसाचे वर्णन करुन जात होता. अमावस्येनंतर चंद्र जसा कलेकलेने आभाळी वाढावा तसा हा लहानगा विश्वविधाता जनार्दन बाबा कलेकलेने पाळण्यात वाढत होता. म्हाळसा मातेस आता प्रसुत होऊन सव्वा महिना पुर्ण झाला होता. म्हणून ही जनार्दनास जन्म देणारी माता आता या लहानग्या बाळास अंगणात येवून, घेऊन बसु लागली होती. उगवणारा सुर्य या शिवअवतारी बालकाचे दर्शन घेऊन मावळत होता. तर दर्शन घेऊन संपुर्ण रात्रभर कार्य करण्यासाठी चंद्र तयार होत होता. असे दिवसामागून दिवस निघून जात होते. दहेगावचे नारायण आप्पा उगले हा बालक दोन महिन्याचा झाला तेव्हा त्यास बघण्यास आले . बालकाची मुद्रा, काया, बघून नारायण स्वामी खुपच सुखावले, तेही जबरदस्त धार्मिक वृत्तीचे असल्याने आपल्या कुळदिपकाबद्दल काहीशी जाणीव त्यांना ही झाली असेलच यात शंकाच नाही. बालकास जन्म देणारे शिवपिता म्हणून यथायोग्य पितृत्व करणारे आप्पासाहेब अजून मात्र त्यांच्या बालकास बघण्यासाठी आलेले नव्हते. आजोबांनी त्यांच्या सद्गुणी पण अजुन खुपच लहान वयाच्या नातवाचे उदंड कौतुक केले. दोन दिवसाचा मुक्काम आटोपल्यावर आप्पांना पाठवून देतो असे सांगून बालकाचे गोड पापे घेऊन नारायण पाटील तसेच शांततेत दहेगांवी जाण्यास निघाले. घरी आल्यावर पत्नीजवळ व लेकाजवळ हवे तेवढे पुरेशे गोड कौतुकाचे गाणे आपल्या लहानग्या जनार्दनाविषयी गायिले. पाळण्यात शिवशंकराच्या फोटोकडे सातत्याने बघून हात पसरविणारा लहानगा बालक आता घरासमोर ओट्यावर रांगु लागला. लहानपणाचे गुण त्याचेही भगवान श्रीकृष्णाच्या खोडकर, नादान, खेळाडु, गुणासारखे न उतरता ते उभेउभ प्रभु रामचंद्रांच्या गुणांसारखे उमटले... मातेचे दुध पिता... पिता... हे बालक आता गोमातेचे दूध प्राशन करु लागले. आईला इकडे जाऊ नको तिकडे जाऊ नको असे सांगण्याची गरज पडत नव्हती. शांत, मृदू, निरागस , कनवाळू, दयाळू याच वृत्तीचे गुण त्या बालकाच्या डोळ्यातील बाहुल्यात चमकत होते. हळुहळू वाढणाऱ्या बालकास त्याचे मामा गावातील विठ्ठल मंदिरात घेऊन जाऊ लागले. मंदिरात गेल्यावर त्याचा लहानगा हातात हात धरून ते त्यांना घंटानाद शिकवू लागले. नंतर विठुमाऊलीच्या चरणाचे नमस्कार करणे शिकवू लागले. विठु माऊली, संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, नामदेव, चोखामेळा इ. संताच्या जीवन कार्याची ज्योत त्या लहानग्या जनार्दनात पेटवू लागली. ज्या दिवसापासून त्या लहानग्या जनार्दनाने

चिमुकल्या हाताने विठ्ठल मंदिरातील घंटानादास सुरुवात केली त्या दिवसापासून ही पृथ्वी थरारली, आनंदाने सदगतीत होऊन नाचली होती. पशुपक्षी सर्व नैसर्गिक आपत्यांनी पृथ्वीला आनंदाने साक्ष दिली होती. या विश्वरुपी अतिभव्य निसर्गनिर्मीत घरातील देवघरात आता त्या चिमुकल्या जनार्दनांनी प्रवेश करुन भक्तीज्योत पेटवली होती. न कळणाऱ्या वयापासून या लहान बाळात बाबुराव मामा विठ्ठल मंदिरात नेऊन भक्तीचे बाळकडू देत होते तर ते चिमुकले बाळ आनंदाने त्या विठुमाऊलीच्या चरणावर नतमस्तक होऊन मामांनी दिलेले भक्तीचे बाळकडू प्राशन करत होते. बाळकडू प्राशन करता करता ते लहानगे बाळ कधी हसत तर कधी खेळत होते व खेळता खेळता हळूहळू लहानाचे मोठेही होत होते. मामांनी दादाजी कोंडदेवाची तर मातेने जिजाईची भूमिका स्विकारली होती. ज्या शिंदखेडच्या जाधवांच्या कुळात जन्म घेतलेल्या जिजाईने भगवान रामाच्या, बाळक्रिडा करुन, कालिया मर्दन करणाऱ्या देवकीपुत्र गोपालाच्या, हिरण्यकश्यपु पुत्र प्रल्हादाच्या, सम्राट अशोकाच्या, नव्हे नव्हे तर संत ज्ञानेश्वर, मुक्ताईच्या गोष्टी सांगून त्या बाल शिवाजीच्या अंगात धर्माविषयीच्या , प्रजाकार्याविषयाची, भारत भूमीच्या रक्षणाची प्रतिबिंबे रुजवली होती व अखेर यातून हा शिवराय नामी महाराष्ट्राच नव्हे तर अवघ्या हिंदुस्थानचा हिंदु संस्थापक बनला होता, त्या प्रमाणाची योग्यता म्हाळसाईनेही अंगात हुबेहुब उतरवली होती. अगदी त्याच साधुसंताच्या, देवदेवताच्या या भारतभूमीच्या रक्षणाच्या या अध्यात्मिक गोडव्याच्या मुळ्या या जनार्दन नामक बाळरुपी मातीत रुजवल्या होत्या व आज त्याच जनार्दन नामक बाळरुपी मातीततून इकडेतिकडे एकट्या महाराष्ट्रात नव्हे तर अवघ्या भारत भूमीत याच मुळीतून भक्तीतुन मोठ मोठी वृक्षे तयार झाली त्याच भक्तीच्या वृक्षावर असंख्य अध्यात्मिकतेची, भक्तीची फुले फुलवुन एक बाग तयार झाली व त्याच भक्तीच्या बागेतील ही 'शांतीची फुलं' समजा. जिजाऊची भूमिका अत्यंत उभेउभ त्या टापरगावच्या रंगमंचकावर या म्हाळसाईने पार केली होती. तर दादोजी कोंडदेवाची भूमिका पार पाडण्याचा प्रयत्न बाबु मामांनी केला होता. जसे दादोजींनी त्या शिवनेरीवर लहानगी तलवार देवून युध्दाची कल्पना सांगून भारत भुमिच्या इतिहासाची जाणीव करुन दिली तशीच या बाबुराव मामांनी या तीन वर्षाच्या या बालकास विठ्ठलाच्या देवालयात नेवून लहान लहान टाळ देवून अध्यात्मीकतेचे बाळकडू पाजून भारत भूमीवर आलेल्या धार्मिक ग्लानीची जाणीव करुन दिली. वा किती योगायोग, किती भक्तीची रसायने लहानपणी हा योगी प्यालेला होता हे लक्षात घ्या. पाळण्यातले लहानगे बालक पुर्णपणे सहा वर्षाचे झाले होते त्या बालकाचे हातपाय आता पुर्णपणे भारत भूमीच्या रक्षणासाठी ओढू लागले, नजर अवघ्या भारत भूमीवर होणाऱ्या अत्याचारांवर जावू लागली, हृदयातील भावना भारतीयांच्या मनाला टिपून भिडत होत्या , बुध्दी केवळ धार्मिक विचाराच्या विचारात गुंग होऊ लागली तर मन कुठल्यान कुठल्या तरी देवालयात जावून भिडत होतं अशा परिस्थितीत बालकास शाळेत टाकण्याचा हट्टहास

बळवंतराव मामांनी धरला. त्यावेळी स्वतंत्र शाळा होत्या. शाळेची त्याला शिक्षणदेण्याची त्याला सुसंस्कृत करण्याची इर्षा सर्वांनाच लागली होती. त्यावेळी म्हणजे इंग्रजांच्या काळखंडात शालेय शिक्षण आतासारखे उपलब्ध नव्हते. परंतु गावठी शाळेमध्ये जावून कसेबसे शिक्षण घेता येईल अशी सोय उपलब्ध होती. सहा वर्षाचे जनार्दन नामक बालक शालेय शिक्षणासाठी आनंदाने शाळेत जावू लागले. शाळेत विद्यादान देणारे, विद्यादानातून समाजप्रबोधन करणारे, समाज प्रबोधन करुन जीवना विषयीची व्याख्या सांगणारे गुरु त्यांना लाभले. प्रत्येकाला गुरु असतो. म्हणूनच जगतवंदनीय श्री संत तुकोबा महाराज म्हणतात

ज्याने गुरु नाही केला
त्याचा जन्म वाया गेला ।।

अहो क्षणोक्षणी आपणास गुरुची गरज असते. एक पाऊल उचलावे तर दुसरे पाऊल टाकणेसाठी या मनाला गुरु करावे लागतात, तेव्हा जर्नादन स्वामी जरी एक विलोभनीय दैवत असले तरी त्यांना गुरु करावाच लागला. एका गुरुची विद्या ग्रहण करणेसाठी त्यांना शालेय परिसर गाठावाच लागला. देवकीनंद श्रीकृष्णास सांदीपणी ऋणींच्या आश्रमात जाऊन विद्या ग्रहण करुन त्यांना स्वतःला गुरु करावे लागले. तात्पर्य त्यांना विद्याग्रहण करणेसाठी आश्रमात जावे लागले. धुर्नविद्येत कुशाग्र अशा कुंतीपुत्र अर्जुनाला देखील द्रोणाचार्य सारख्या गुरुकडुन ज्ञान घ्यावे लागले, एवढेच नव्हे तर मागासवर्गीय समाजात जन्म घेऊन उच्चांकित धुर्नधारी बनण्यासा कयास धरणाऱ्या एकलव्याला मातीच्या मुर्तीला गुरु मानावे लागले. तेव्हा साहिजकच स्वामीजींना लहान वयात शालेय आवारात जावून शिक्षकाकडून ज्ञानाचा मार्ग विचारुन घ्यावा लागला. याचाच विचार करीता हे लहानगे बाळ इयत्ता पहिलीमध्ये पार आनंदाने बळवंतरावाच्या खांद्यावर बसून जावू लागले. स्वतः भगवान शिवाचा अवतार असल्याने शालेय शिक्षणात तरबेज असणार यात शंकाच नाही. शिक्षण घेता घेता, शालेय शिक्षणाचे ज्ञान कुशाग्र बुध्दीत साठवता साठवता आईकडून भक्तीचे, ज्ञानाचे बाळकडू पिता पिता बाबुराव मामांकडून पोथीपुराणांची माहिती आत्मसाता करता करता, बळवंत मामा कडुन गुरांविषयीची संकल्पना दैवरुपात मांडता मांडता तर आजोबाकडून काळ्या कसदार वसुंधरेबदलची सखोल ज्ञानदेवता घेता घेता दिवस निघून चालले होते. लहानगे बाळ आता पहिलीतून दुसरीत गेले होते, फार लवकर अ...आ....ई चा व द... दैवाचा या शब्दांची व बाळाची जिवस्य ओळख झाली. त्या दिवशी सोमवार होता. हे लहानगे जनार्दन स्वामी थोडे उशिराच घरी आले घरातील व्यक्तींना वाटले की हा कोठे गेला, तर ही मुर्ती कोठेही न जाता एका वृध्द माणसांजवळ काहीतरी बोलत होती. बळवंतरावाच्या पत्नी त्यांना शोधण्यासाठी गेल्या व त्यांनी बघीतलेकी हे बालक कुणाशी तरी बोलत आहे, जवळ जावून श्रीमतीने बघीतले तर ती व्यक्ती दुसरी कोणी नसून ती

वैजापुर तालुक्यातील नारायण आप्पा उगले होते. आजोबांशी गप्पा मारता मारता हे बालक फार सुंदर दिसत होते. केवळ दुसऱ्या इयत्तेत शिक्षण घेत असणारे पण फार मोठ्या व्यक्तीकडू अधिक जास्त तत्वज्ञानाने बोलणारे हे बाळ आजोबाशी काय बोलले हे दैवच जाणो. भराभरा चालून गेल्यावर श्रीमती बोलल्या ,

'काय वो जना का एवढ्या गप्पा मारता आज्याशी. अनं त्याबी एखल्या एखल्या, त्यांना घरी येवून द्याच व मग बोलायच, चला घरी'.

असे म्हणून त्या आल्यातशा घरी गेल्या. बाळाला कडेवर घेवून आजोबा मोहिते पाटलांच्या घराकडे निघाले. मुलगा आजोबाच्या कडेवर बघून म्हाळसाईला सुखही अन् दुख ही मनोमन वाटले. आज मुलगा सात वर्षाचा झाला अजून त्याचे वडील त्याला पाहणेसाठी सुध्दा आले नाहीत व नेहमीच जना मला विचारतो, 'बाई आजोबांच्या गावाला चलनां. बाबांच्या घरी चलनां, तेव्हा मी काय उत्तर देत असेल, यांना एकदाही माझी व पोराची आठवण येत नसेल का, साध्या कारणांवरून इतके का रागावले असतील ते ? या भावनाशील विचाराने म्हाळसाईच्या नयनात अश्रुच्या धारा तरारळ्या पण आलेले सासरे काहीतरी निरोप घेऊन आले असतील या विचाराने मन सुखवाले. त्या दिवशी दिवसभर आजोबाने नातवाला व नातवाने आजोबाला क्षणभरही सोडले नाही. दुसऱ्या दिवशी आलेले नारायण पाटील घरी जाणेस निघाले तेव्हा ह्या बालकाने क्षणाचाही विचार न करता आजोबांस विचारले,

'बाबा आम्हांला का नेत नाही तुम्ही ?'

'तुझ्या बापाला पाठवून देतो हं तुम्हाला घ्यायला, मग तु आणि तुझी माय व बाप संगच या आपल्या घराला हां '.

असे प्रतीउत्तर एकूण बाळ शांत झाले. आजोबा निघून गेल्यावर आठ दिवस झाले, अजूनही आप्पासाहेबांचा पाय टापरगांवला लागला नव्हता. एक एक उगवणारा दिवस म्हळासाईच्या मनाला निराशाच देवून जात होता. येणारा दिवस आशा घेवून उगवत होता पण मावळतांना मात्र निराशाच देवून जात होता. पतीविना ही जगतवृंदनीय माता जणुकाय उन्हात उभी होती. 'स्त्री' या संबोधनास काही नसेल तरी चालते परंतु तिच्या सौभाग्याचा धनी तिला आयुष्यभर हवा असतो. प्रत्येक पती हा प्रत्येक स्त्रिचा जणु काय सौंदर्याचा लेणं असणारा कुंकू असतो. तिच्यासाठी तो या विशाल आकाशाचा खांब नि या अनंत भूमातेचे क्षितीज असतो. तिच्यासाठी तो अथांग सागराचा किनारा असतो अशा या धन्यापासून वंचीत झालेल्या म्हाळसाई आता जणू काय उन्हात उभ्या होत्या, त्यांना त्या धन्याच्या सावलीची नितांत गरज होती, परंतु ती माता जेव्हा जेव्हा पती विरहीत उन्हात उभी दिसायची तेव्हा तेव्हा ती जनार्दन नामक लहान मुर्ती तिच्या समोर जायची व एखाद्या माऊलीहुन अधिक सावली त्या मातेस ही लहान मुर्ती द्यायची. या मुलास बघितल्या

बघितल्या सारं दिवसभराच दुःख शुन्यातच घरी परतायच व शतके नोंदवणारे सुखच पदरी दिसायचे . काय लिला असेल त्या प्रभूची. दिवसामागुन दिवस जात होते, आज उगवणारा सुर्य सायंकाळ घेऊन मावळत होता. हा जर्नादन बाळ हळुहळु मोठा होत होता, आता ती विभुती तिसऱ्या इयत्तेत जावु लागली होती, साऱ्या विश्वाचे कल्याण त्याचे हातुन होणार होते हे त्या वेळच्या लोकांना कळत नव्हते. त्या लोकांना जर हे कळले असते तर ज्ञानेश्वरांना ताटीत बंदिस्त व्हावे लागलेच नसते, त्याना पाठीवर मांडे भाजावे लागलेच नसते, त्यांना रेड्याला वेद बोलायला लावले नसते. त्यावेळच्या लोकांना त्यावेळच्या विभुतीची माहिती प्राप्त झाली असती तर भगवान श्रीकृष्णाला सख्या मामाने तसे दिवस आणलेच नसते, तसे जर माहित असते तर श्री रामाला वनवासात जावे लागले नसते, तसे जर माहित राहिले असते तर श्री कालीदास माऊली, तुकोबा महाराज, कान्होपात्रा या सारख्या महान संतांना धर्म मार्तडांनी छळलेच नसते. तसेच जर जनार्दन स्वामींच्या बाबतीत त्यावेळच्या समाजाला हे कळले असते तर त्यांचे वडील ते आठ वर्षाचे होण्याअगोदर केव्हाच त्यांना बघण्यासाठी आले असते. आठ वर्षाच्या या बालकाचे मन निरागस होते. त्या बालकाच्या हृदयाच्या कप्पाकप्प्यात भक्तीची भावना व प्राणी मात्रांवरील दया दडलेली होती. काळजाच्या प्रत्येक छेडल्या जाणाऱ्या तारेतुन दैव हाच नाद बाहेर पडत होता. अशा या थोर लहानग्या बालकास बघुन त्या मातेस मनोमन दुःख होत होते. त्यास बघून तिचे रक्त आटत होते, तिचे हृदय पाझरून सारखे वाहत होते, तिच्या मनात या बालकाच्या पित्याचीच प्रतिमा उमटत होती. जेव्हा हे जनार्दन नामक बालक सायंकाळी घरी आल्यावर आजी आजोंबाजवळ बसत होते, बसल्या बसल्या समोरून येणाऱ्या पिता पुत्रांना बघत होते व चटकन जावून आईस विचारीत होते. तेव्हा 'येतील रे तुझे बाबा', असे म्हणून आई त्याच्या बोलण्यास पुर्णविराम देत होती. अशा या परिस्थितीत हे बालक हळूहळु वाढत होतं, एवढे असूनही ती माता किती धन्य असेल नाही ज्या मातेच्या हातात या थोर जनार्दनाच्या पाळण्याची दोरी होती, त्या पाळण्यात हा शिवअवतारी जगाचा कल्याणकर्ता पुरुष हासत, रडत, खेळत, नाचत होता. या बालकास कोणही मित्र आवडत नसे कारण प्रत्येक आपल्या जिवनाच्या व्याख्या वेगवेगल्या बनवलेल्या असतात व जशी जीवनाची व्याख्या असेल तसेच जीवनाचा अर्थ मोकळा होत असतो. या बालकाच्या व्याख्यात अध्यात्म, प्रेम, ममता, दैव भक्ती, या शिवाय दुसरे शब्दच नव्हते. म्हणूनच हे बालक इतरांपेक्षा वेगळेच राहत होतं. वेगळच वागत होतं. त्या लहानग्या बालकाचे सारे अस्तित्व हे आगळे वेगळे होते. बालक हे कितीही मोठं असलं तरी ते मातेच्या डोळ्यातील बाहुलं असतं यामुळेच ती माता त्या इतरांपासून दूर राहणाऱ्या बालकाची अधिकाधिक काळजी घेत असे. कारण सध्याच्या परिस्थीतीत तरी तिला तिच्याशिवाय दुसरा भक्कम आधार नव्हता. तेव्हा ती साहजिकच त्या मुलाचे अधिक जोपासना करीत होती. जनार्दन स्वामींना बालपणी दुसरा काहीच छंद नव्हता. ते कधीही बालकृष्णासारखे विटीदांडू खेळले

नाहीत. त्यांच्यातील बालपणाचा गुण हा प्रभु रामचंद्रासारखा होता. ज्याप्रमाणे प्रभु रामचंद्र बालपण अवस्थेतुन जात होते त्यावेळी ते कधीच काही इतर छंदात गुरफटून गेले नव्हते. त्यांनी लहान पणात आपले धनुष्य उचलले होते, ज्या कार्यासाठी त्यांनी जन्म घेतला होता त्या कार्याशी ते मर्यादीत स्वरुपाचे जीवन जगले अगदी तशीच भूमिका या दहेगांवी राहत असलेल्या उगलेंच्या जनार्दन स्वामींनी घेतली होती. इतर मोहपाशाला बळी न पडता लहान पणाच्या बालअवस्थेपासून भगवान शिवाच्या वाळूपासून पिंडी, साळुंक्या तयार करु लागले. मृत्युलोकांत जन्मास मिळालेल्या जीवनातील एकूण एक क्षण त्यांनी मोलाचा व अनमोल वाटुन घेतला, आपल्या कार्याची सुरुवात व शेवटही हा शिवालय बांधुनच करायचा असाच मनाशी कयास ते पिंडी तयार करता करता बांधु लागले. सकाळी उठल्यावर बाबुराव मामांसह पुजेस बसत, आजोबांसह हळुहळु पोथी वाचत व मातेच्या ममतेने दोन तीन घास जेवण करीत, त्यानंतर बळवंत मामांसह शाळेत जात, शाळेतून आल्यावर हातपाय स्वच्छ करुन गाईचे दर्शन घेत, त्यानंतर शिवनातीरी जात, तेथे वाळुपासून छान छोटीशी नाजुक पिंड तयार करत त्यावर पाणी, हळूहळू टिपकत पडेल याचा अंदाज घेत, पिंड बनवतांना बराचसा उशिर होऊन जायचा त्यानंतर सुर्यनारायण घरी जाण्याच्या तयारीत लागायचा. एकदा दिवस कालवंडला की मग हे बालक घरी येत असे, घरी आल्यावर आईचे बाबांचे आजींचे पदस्पर्शाचे दर्शन घेत असे. पिंडीचे कौतिक फार हिरहिरीने आजीबाई ऐकत असायचे. हा बाल शिव लहानपाणापासूनच वाळूपासून तयार केलेल्या पिंडीचे दर्शन घेत म्हणजेच बालपणीच शिवभक्तीचे बाळकडू हे बालक चांगलच प्यालेलं होतं. लहानपणापासूनच त्यास शिवभक्तीचे वेड लागलेले होतं. तो दिवस सोमवार चा होता त्या दिवशी कधी मित्रांबरोबर न मिसळणारा हा लहानगा बालक मित्राबरोबर खेळता खेळता घरापासून फार दूर गेला. दुर गेल्यानंतर त्यांनी टापरगावच्या नैऋत्य दिशेस शिवना व गंधारी या दोन नदीच्या संगमावर विसावा घेतला, त्या दोन पवित्र अशा नदी तीरावरील नैसर्गिक वातावरणाने या बालमुलावर भुरळ घातली त्याच विलोभापाई या लहान मुलाचे मन मोहित झाले, दोन्ही नद्यांच्या प्रवाहाचा मिलाप त्या ठिकाणावर झाल्यामुळे पाण्याला एक तिसरीच रुपरेषा प्राप्त झाली होती. त्या रुपरेषेत अनेक बदके, पाणकोंबड्या स्नान करीत होत्या, वातावरणात या शिवअवतारास बघुन विलक्षणीय बहरले होते. पशुपक्षी हवेत संचारले होते. धुसमुस घालून गरीबाचा दिवा विझवणारा वारा शांत तालात संगीत देत होता. दोन्ही सरीतांचे खळाखळणार पाणी एका लयात स्वर बध्द होत होतं. अशा अतिभव्य विलोभनीय वातावरणाला बघून या नऊ वर्षीय जनार्दनाचं मन मोहकलं होतं. त्यांना अशा द्वीसंगमावर एक शिवपींड करण्याची इच्छा झाली, त्वरीत बारीक रेती गोळा केली व पिंड बनवण्याचे कार्य हाती घेतले, काही कालावधी ओलांडल्यानंतर त्यांनी एक छानशी एक पिंड तयार केली. त्या तयार केलेल्या शिवपिंडीवर त्यांनी अभिषेक केला, लहान वयात साधारणपणे झाडाची ओळख देखील असत नाही,

अगदी तसेच याही बालकाच्या बाबतीत झालं, यानीही कुठल्यातरी झाडाचा पाला तोडला व त्या अभिषेक केलेल्या पिंडीवर वाहिला व त्यातला काही पाला मातेस दाखवण्यासाठी हातात ठेवला, ही लहान मुर्ती घरापासून न सांगता त्या द्विसंगमावर खेळण्यासाठी गेली असल्याने घरी कळत न कळत विचारपूस सुरु झाली होती, सायंकाळ मात्र पुर्णतः हा उमललेली नव्हती व घरी सुर्यनारायणाच्या अस्ताअगोदर जाणे हे त्यांना ठाऊक असल्याने ते जरा वेगातच घराकडे निघाले, घरी पोहचल्यानंतर म्हाळसाई जरा रागावल्या असल्याने त्यांनी जरा चढत्या स्वरात विचारले,

काय रे, एवढा वेळ कुठे होता तु ?

आई मी आपल्या शिवना व गांधारी नदीच्या पात्रावर सवंगड्यांसह गेलो होतो, तिथं ते सार बघून मी तिथच रमलो, मग मी तिथल्या दोन्ही नदीच्या भेटीच्या जागेतून बारीक रेती घेतली आणि पिंड तयार केली' आई मी त्या पिंडीवर अभिषेकही केला.

आणि त्यातला उरवलेला पाला दाखवित म्हणाले,

'हाच पाला मी त्या पिंडीवर वाहिला आणि मग आता यावेळी घरी आलो.'

हे त्या बालकाचे बाणेदार उत्तर ऐकूण त्या मातेचा बाणेदार डोळ्यांनी तो चेहरा व वाहिलेली पाने बघितली, त्या माईस निसर्गाची जाणीव होतीच, तिनं त्या पानांकडे कटाक्ष टाकताच ओळखले व स्वतःशीच पुटपुटल्या 'अरे ही तर बेलाची पाने आहेत, आणि तु ही पाने त्या अभिषेक केलेल्या पिंडीवर वाहिली अन् ती पिंड ही त्या शिवना आणि गांधारीच्या भेटीच्या जागी बनवली होती, आणि तेही आज सोमवारी, अरे पोरा किती गुणी आहेस तु, काय सांगु तुला जे जे शिव महादेवाला आवडते तेच तु केलेरे माझ्या लेकरा. असे बोलून त्यांनी जनार्दनाला पोटाशी धरले व आनंदाचे अश्रु डोळ्यातून टपकले, त्या मातेस शिवशंकराला काय काय लागते हे कळाले होते. पण आपला हा पुत्रच श्री भगवान महादेवांचाच अवतार आहे हे कळाले नव्हते, नाहीतर प्रभु जनार्दनाला ते सांगावयाचे नव्हते . जर मातेस पुत्र हा देवअवतार आहे हे कळले असते तर भरत माता कैकयीने प्रभु रामचंद्रास चौदा वर्षे वनवासात पाठविलेच नसते. अशी शिवाची भक्ती करता करता दिवस निघून जात होते, नऊ वर्षाचा हा बालक झाल्यावर त्याचे आजोबा खास सुनेला व नातवाला घेणेसाठी टापरगांवला आले होते, आल्या आल्या मोहितेपाटलांनी 'राम राम' या शब्दाने त्यांचा पाहुणचार केला. चहापाणी आटोपल्यावर नारायण आप्पा सायंकाळच सात वाजता उदगारले,

'मी म्हाळसा व जनाला घ्यावयास आलो'

हे ऐकताच बाबुराव, बळवंतराव व श्रीपतराव या तीनही बंधुनी विरोध केला.

आज आमच्या बहिणीला आणून नऊ वर्षे झाली तेव्हा तुम्ही तिला घ्यायला आले, इतक्या दिवस आम्ही तुमच्या विनवण्या केल्या तेव्हा कुठे गेली तुमची सुन, कुठे गेला

तुमचा नातु, नाही नाही आता ते जमणार नाही, आम्हांला काय आमची बहीण जड नाही, आम्ही तिला शेवटपर्यंत सांभाळू. असे उत्तर ऐकताच उगले पाटील चाचपडत बोलले,

'चुकलं असेल आमचं, पण तुम्ही नका चुकू. उद्या जातो घेऊन तिलाबी आणि त्यालाबी.'

'बरं जा घेऊन'

असं बोलून मोहिते पाटलांनी आवरतं घेतलं. जेवण आटोपल्यावर सर्वांनी आपआपली अंग जमिनीला अर्पण केली. म्हाळसाईला झोप लागली नव्हती तब्बल नऊ वर्षांनी सासरी जायचे म्हणजे विलक्षणीय आस तिच्या अंतकरणात दाटला होता. सौभाग्यतेचा लेणं ठरणारा त्या बालकाचा पिता तिने फार दिवसांपासून बघितलेला नव्हता. सारे दहेगावचे वातावरण त्या मातेच्या नतमस्तकात तैनात झाले, पुन्हा डोळ्यासमोर तेच दहेगावचे वातावरण तयार करुन स्वप्नांच्या रांगा मनात उभ्या करत ती माता झोपी गेली. नऊ वर्षानंतर म्हाळसाई नांदायला जाणार म्हणून मातोश्री फार लवकर जाग्या झाल्या होत्या. स्वप्नांची दुनिया रंगवत उशिरा झोपी गेलेल्या म्हाळसाई अजुनतरी झोपल्या जागेवरून दूर गेलेल्या नव्हत्या. दिवसभर वाळुच्या पिंडी बनवण्यात दंग झालेल्या आहे उगले घराण्यातील कुलदिपक अजुनतरी उठलेलं नव्हते. आता संपुर्ण दिवस अगदी स्वच्छ आणि स्पष्ट उगवलेला होता. न्याहरी करुन नारायण आप्पा आता जाण्याच्या तयारीत लागले होते. म्हाळसाई हातात पिशवी घेऊन आईवडीलांच्या चरणांशी नतमस्तक होऊन जनार्दनाचा हात धरून खाली उतरत होत्या. आई वडीलांच्या डोळ्यात अश्रु मावेनासे झाले. विठ्ठल भक्तीची सुरुवात करुन देणाऱ्या बाबुराव मामांस मनापासून रडु दाटलं होतं. त्याला शाळात टाका असं वारंवार सांगणारे बळवंतराव डोळ्यांवर हात ठेवून अश्रु पुसत होते व इतर कौटुंबीक मंडळी जनाची काळजी घ्या असे सांगत होते. 'बाई म्हाळसा सुखी रहा, कुणाला काही बोलू नको, जनाची काळजी घे, गाईची सेवा कर.' हेच अखेरचे बोल त्या मातेच्या आईवडीलांनी मुलीला सासरी सुखी राहणेसाठी शिदोरी म्हणून दिले. गोठ्यातील गाई, वासरे, बैल, पशुपक्षी, फुले, पाने, झाडे असेल नसेल सारे टापरगावचे वातावरण या जगतवंदनीय मातेला व त्या विश्वविधात्या जनार्दनाला निरोप देण्यासाठी तयार झालेले होते. सर्वाचा निरोप स्विकारून ही माता पुत्रासह सासऱ्या सोबत सासरी जाणेस निघाली होती बालपणी बाबुरावांसह प्यायलेलं भक्तीच बाळकडू अजुनही त्या मुलाच्या स्मरणात होते, त्यात आता आजोबा धार्मिक वृत्तीचे मिळाले. आईने या बालकाच्या मनात भक्तीचा एक अनोखा दिवा तयार केला होता, बाबु मामांनी त्या दिव्याच्या वातीला एक अजोड प्रकाश दिला होता, त्याच बालकाच्या मनातील दिवा प्रखरतेने जळणायासाठी आता आजोबा त्या वातीसाठी भक्ती भावाने तेल देत होता. असा हा पुण्यवान मातेचा पुत्ररत्न धार्मिक आजोबासह कार्याची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी मुळ गावी जाण्यास निघाला होता. आजोबा हे अतिशय

धार्मिक वृत्तीचे होते, त्यांच्या कपाळावर नेहमी भस्म असायचा, एक ग्रहस्थी असूनही मस्तकावर जटा धार्मिकतेचे छत्र म्हणून उपस्थित असायच्या. स्त्रिला जसे मणीमंगळसुत्र हे तिच्या धन्याचे प्रतिक असते तसेच देवाचे प्रतिक म्हणून नारायण पाटलाच्या गळ्यात नेहमी रुद्राक्षमाळा लोंबकळत असायच्या. जे जे त्या शिवबालकास हवे होते तेते त्यास आगामी येणारी परिस्थिती देत होती. यातच सारं रहस्य दडलेलं होत. आजोबा आणि नातू हे जणुकाही एकाच विश्वातले कार्यसंस्थापक होते, जशी राजा शिवाजीस संपुर्णतः अप्रत्यक्षरीत्या प्रेरणा शहाजी राजांची होती तशीच या जनार्दन स्वामीस संपुर्णतः बालप्रेरणा या नारायण आप्पा नामक आजोबाची होती. हे बालक जन्मतःच शांत, हसरं, लाजरं, अनोख्या वृत्तीच होतं. कुणाच्याही नजरेत भरेल असे त्याचे व्यक्तीमत्व होतं, कुणाच्याही मनाला हळूच स्पर्श करील असे त्याचे भौतिक वातावरण होतं, कुणाच्याही अंतकरणाला विलोभनीय वाटून भावना निर्माण करुन सहज आपलेसे करुन जाईल अस त्याचं लक्षण होतं. दिडशे एकर जमीनीच्या मालकाचा पाटील समजल्या जाणाऱ्या घराण्याचा, गावची शान हा किताब पटकवणाऱ्या नारायण पाटलाचा नातु कसा असेल याची चर्चाच अवघ्या दहेगावात सुरु झाली. तब्बल नऊ वर्षाच्या अंतराने म्हाळसाई व तिचा अनोखा अतिभव्य दिव्य असा जनार्दन नामक पुत्र दहेगावात आला. ही चर्चा वाऱ्यासारशी दहेगाव परसरली. अवघे दहेगांव उत्साहीत झाले. वारा आनंदाने धुमाकुळ न घालता नाचता नाचता वाहत होता. सर्व पशुपक्षी त्या बालकाच्या स्वागतासाठी दहेगावच्या वेशीवर केव्हाच उपस्थित झाले होते. वेशीचे दर्शन घेऊन म्हाळसाई पुत्रासह घरी आल्या. आपला नातु घरी आला हे बघुन आजीबाईने त्याला अंतकरणाशी कवटाळले व पटापट सहा सात पापे घेतले. बाजीरावांचा स्वभाव कडक होता पण त्यांनीही त्यास जवळ घेण्याचा प्रयत्न केला होता. नऊ वर्षानंतर आज प्रथमच पत्नीकडे व पुत्राकडे बघणाऱ्या आप्पासाहेबांनी पत्नीकडे हसून बघीतले. त्या सौभाग्याच्या केवळ छोट्याशा हसण्याने त्या माऊलीचा नऊ वर्षाचा क्षिणभाग , राग, द्वेष जणुकाय विलीन होऊन मनातून हद्दपार झाला. पुर्ववत ग्रहवातावरण तयार झाले. असेल नसेल सर्वच दुःख या बालकाच्या आगमनाने शिवपार निघून गेले. या बालाकाची वार्ता जेव्हा हा... हा.. म्हणता अवघ्या दहेगावात पसरली व अवघे दहेगाव त्या बालकांस पाहण्यासाठी उगले पाटलांच्या वाड्याकडे उलटले. एकतर नारायण आप्पा हे अवघ्या दहेगावचे श्रीमंत व मनमिळावु धार्मिक वृत्तीचे सद्‌गृहस्थ होते. व म्हाळसाई या देखील शांत, सुशील होत्या. त्यातल्या त्यात ते बालक अतिशय मोहक वृत्तीचे होते. त्याचमुळे अवघ्या दहेगावातील मंडळी त्यास बघण्यास पाटलाच्या घराला पाय लावू लागले. त्या दहेगावच्या दह्यात जणुकाय ईश्वरानेही साखरच पाठवली होती की ज्या साखरेच्या गोडीने अवघे दहेगांव गोड झाले होते. म्हाळसाईला येवून आता नऊ दिवस पूर्ण झाले होते. दहावा दिवस उगवला, दहाव्या दिवशी एका ब्राम्हणाची पत्नी म्हाळसाईच्या मुलास बघण्यासाठी घरी आली म्हाळसाईला

त्या श्रीमतीने विचारले,

' कुठे आहे तुमचा जना... ?'

'थांबा बोलाविते',

असे म्हणून स्वामींना म्हाळसाईने हाक मारली,

'जना अरे जना, इकडे ये पाहू ह्या बाई तुला पायला आल्या. त्यांच्या पाया पड. इकडे ये.'

धावत पळत हा बालक त्या समस्त श्रीमतींपुढे जाऊन उभा राहिला. ब्राम्हणाच्या पत्नीने भरल्या नजरेने त्याच्याकडे बघितले ती काही क्षण थांबली व थोडी भांबावुन गेली त्या मातेस त्या बालकाच्या नजरेत साक्षात श्री भगवान शिवाची प्रतिमा दिसली. जशी यशोदा पालीत भगवान श्रीकृष्णाने यशोदा मातेसच माती खाणाऱ्या मुखातून अवघ्या विश्वाचे दर्शन करुन दिले. तसेच ह्या म्हाळसाई पुत्राने त्या ब्राम्हणाच्या श्रीमतीस भरल्या नजरेने साक्षात भगवान शिवशंकराची प्रतिमा दाखवुन दिली. त्या बालकाने डोळ्यावरील पापणी मिटताच ती स्त्री पुर्ण शुध्दीवर आली व म्हणाली बाळा माझ्या पाय पडू नकोस उलट तिनेच त्या बालकाचे चरणस्पर्श वंदन केले. व भविष्यात ती त्या देवअवतारास भगवान शिवच आहे असे मानुन त्यास देव मानुन भजु लागली. या दहेगावात म्हाळसाई पुत्राने दाखवलेला पहिलाच चमत्कार होता. नारायण पाटील हे धार्मिक असल्याने दिवसेंदिवस या बालकाच्या भक्तीरुपी बुध्दीत अधिकाधिक वाढ होऊ लागली होती आता शालेय शिक्षण जवळजवळ सपुष्टात आले होते. सर्व मन धार्मिक लिनतेत लिन होऊ लागले होते. सकाळी सकाळी आजोबा जेव्हा बैल चारण्यास जात तेव्हा हे बालक उठू लागले होते, त्यानंतर स्नान करून तांब्या भरून पाण्याने काट्या मारुतीस पाणी घालू लागले होते, पाणी घातल्यानंतर गावात एक चक्कर मारू लागले होते, सर्व सकाळची कामे पुर्ण झाल्यानंतर नारायण आप्पा त्यास धार्मिकतेच्या दोन गोष्टी सांगत असे, सकाळची न्याहरी करुन वडीलांसोबत हा बालक आता शेतातही जाऊ लागला होता. दिवसभर बैल चारण, शेतातील हरळ गोळा करणे व सायंकाळच्या वेळी गुरांच्या रात्रीच्या जेवणासाठी गवत गोळा करुन ते बैलगाडीत ठेवत असे. धरी आल्यावर सर्वप्रथम गाईस चारा घालीत असत त्यानंतर हातपाय स्वच्छ केल्यावर आई बरोबर चहा घेत व पुन्हा आजोंबा सोबत पोथी भागवत अथवा पुराण वाचीत असत. असे नित्य दिनक्रमण आखल्यानंतर दिवस कसे लपंडावाचे खेळ खेळून निघून जात होते हेच कळत नव्हते. असे आता दिवसामागुन दिवस हसत, खेळत, रमत गमत निघून जात होते. आजोबाच्या छत्राखाली यांची धार्मिकतेचे रोपे मनातल्या मनात चांगलीच रुजवत चालली होती. त्या रोपट्यास आता कुठेतरी उंच शिखरे गाठणारी पालवी बहरली होती, पण अचानक एक दिवस नारायण आप्पा आजारी पडले, अहोरात्र शेतातील काळ्या मातीशी खेळणारे नारायण पाटील आता अंथरुणावर खिळले होते. जवळजवळ जीवनाचा प्रवास संपविण्याच्या

अंदाजातच ही व्यक्ती जात होती घरातील व्यक्ती चिंतीत झाली व अखेर ही असामान्य विभुती मृत्युलोक सोडून स्वर्गमंचनी जाऊन दाखल झाली. या बालकाच्या मनातील भक्तीचं छोटस रोपटं आता कुठेतरी नुकतेच त्या आजोबाच्या छत्राखाली पानाफुलांनी बहरलं होतं. तितक्यात हे मायेचं, प्रेमाचं, भक्तीचं , आधारचं, अद्वैत शक्ती, सर्वस्वच आयुष्यात पुरुन उरल इतक्या संपत्तीचं, इतक्या मनमिळावूपणाच छत्रच उडून गेलं. हे छत्र उडून गेल्याचं बघुन या बालकाच्या मनातील असंख्य सुप्त उमलणाऱ्या कळ्या कोमलुन गेल्या. असंख्य लुकलुकणारे तारे ढगाआडा काळाच्या ओघात गडप झाले. असंख्य शक्तीशाली धार्मिकतेचा मनातील फलंदाज शुन्यातच मनोरुपी तंबुत परतला. आजोबा वारल्यानंतर जनार्दन स्वामीच्या धार्मिक प्रवासात अनेक लहान मोठे अडथळे येऊ लागले, त्या अर्जुनरुपी जनार्दनाचा सारथी श्रीकष्णरुपी नारायण पाटील आता निघून गेल्याने तो धार्मिक रथ एकट्या या अर्जुनारुपी जनार्दनाला चालवावा लागला. परंतु हा योध्दा दिवसेंदिवस मोठा हाऊ लागल्याने घरातील वडीलांच्या व चुलत्याच्या ह्या बालकाविषयीच्या व्याख्याच बदलुन गेल्या म्हणून ते केवळ शेतातील काम कर असंच या बालकास सुचवीत होते, त्यामुळे या योध्दयाच्या धार्मिक रथाला अडथळा येवू लागला तरीही या धार्मिक रथाच्या भक्तीच्या चाकाची गती कधीही कमी झाली नाही, आजोबा रुपी छत्र गेले, वडीलारुपी अडथळे आले तरीही धार्मिक रथास बळ आले व कार्य सिध्दीस जावु लागले.

उलट या रथाची गती वाढली, या भारत भूमीतील देवघरातील सर्वच भक्तीची द्वारे या रथात खुली झाली, हा रथ कैलासपती भगवान, महेशरुपी जनार्दनाचा होता. धार्मिक वस्तुंनी तो रथ बनवलेला होता. भक्तीची चाके त्यास त्या अर्जुनरुपी जनार्दनाने बसवलेले होते. हिंदवी स्वराज्याची तळपणारी भगवी ध्वजा या रथाच्या शिखरावर इंग्रजी वाऱ्याच्या विरोधात झुंज देवून अलिशानपणे फडकत होती. त्याचा विरोध मोडत ही जनार्दन नामक विभुती भागवत वाचुन येणाऱ्या दिवसाचे स्वागत करीत होती, तर हरीपाठाने जाणाऱ्या दिवसाची सांगताही करत होती. याच कालखंडाच्या सुरुवातीस म्हाळसाई व आप्पासाहेब यांची ग्रहसुत्रे पुर्ववत जुळले व नैसर्गिक नियमानुसार त्यांना पुन्हा दोन पुत्र झाले. त्यात दोन नंबरचे वामनराव व शेवटचे दत्तु पाटील हे आहेत. त्या तिन भावंडामध्ये हा जगाचा पालन कर्ता त्यांना सांभाळता सांभळता हळूहळू तरुण होत होता. नारायण पाटील वैकुंठाला गेले असल्याने घराची सर्वच जबाबदारी त्या आप्पासाहेबावर आली. आप्पासाहेबांच्या सांगणेवरुन सर्वच कामे ही लहान बाजीरावावर येवू लागली. बाजीराव हे नेहमीच नावाप्रमाणे राहयला पाहत होते. किंबहुना कामचुकार करण्यास बघत होते, शिवाय घरातील सहसा सर्वच बाजूत त्यांना बळकट वाटत असल्याने ते स्वतःला हुकूमशाह समजत असे व तसे समजून जास्तीत जास्त काम या जनार्दनांना सांगण्याचा प्रयत्न करत असत. पण चुलत्या पुतण्याच्या या वागण्यात जमीन अस्मानचा फरक होता. जनार्दन स्वामी हे काम व आई यात

नेहमीच सौख्य मानत असत. त्यांनी त्यांच्या जीवनात जितके महत्व मातेस दिले होते, तितकेच महत्व कामासही दिले होते. काम , भक्ती, आई या तीन सुत्राचा वापर त्यांनी जीवनभर योग्य रीतीनेच केला, त्याचमुळे चुलत्यांनी सांगितलेले काम ते अचुकपणे बजावत होते, कारण अवघ्या जीवनाचा सार त्यांनी आई, भक्ती, काम या सुत्रीत मांडला होता. भक्तीच्या अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शन करणारे नवनीत रुपी आजोबा त्यांना सोडून गेल्यामुळे भावी जीवनातील भक्तीच्या अभ्यासक्रमात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्यांना कुणीच नव्हते, वडील वयामानाच्या दृटीने होते ते केवळ वडील व चुलते पण तेही त्या मार्गदशनाबाबत असमर्थ होते या सर्व गोष्टीवर मात करुन भक्तीची फळे त्या तरुण बालकाला देणारी केवळ एकच व्यक्ती उरली होती व ती ही म्हणजे जगाची दर्शन घडवणारी जगतवंदनीय माता म्हणजे म्हाळसाई . पण म्हाळसाई कडून मिळणारी शिदोरी पुरेल एवढी व्यापक नव्हती कारण ती शिदोरी चाखतांना चुलते व वडील हे नेहमीच त्यांना विरोध करीत होते. आजोबाच्या प्रेमरुपी छत्राखाली हवाहवासा निखारा फुललेल्या या नातवाला चुलत्याचा व वडीलाचा विरोध कधीच वाटला नाही. पण आता ही प्रेमाची विभुतीच निघून गेली होती व प्रेम दूर निघून गेल्यावर सर्वात जवळचे वाटणारे सवंगडी तेही म्हणजेच अश्रु... अश्रु. पण मुलगा मोठा झाला की तो आईवडीलांचा अभिमान बनत असतो, त्याच्या स्वप्नरुपी रंगील जीवनाचा तो एक सागवानी मजबुत खांब बनत असतो. त्याच्या अंतःकरणाला विसावा देणारा तो एक पानांनी फुलांनी, कळ्यांनी, पारंभ्यांनी बहरलेल्या वटवृक्ष बनत असतो. मनाच्या निराशेला शांत करुन नवीन आशा दाखवणारा एक प्रवाशी ठरत असतो. उरलेले कार्य पुर्ण करण्यासाठी तो एक उत्तराधिकारी बनत असतो. त्यांना तो विशाल आकाशास आधारीत क्षितीज वाटत असतो. एवढेच नव्हे तर अत्यंत शेवटच्या क्षणी आईवडीलांच्या मुखात पाणी घालणारा तो पाणाड्या बनत असतो. याच कारणमिमांसामुळे नारायण आप्पांना वडील पुत्राकडून फारच अपेक्षा ठेवल्या होत्या. त्याचवेळी ते प्रत्येक वेळी स्वामींच्या धार्मिक मार्गात अडथळा बनत होते. त्यांना वाटत होते की हा आपला मोठा मुलगा आहे, एवढ्या दिडशे एकर जमीनीचा तोही एक मालक आहे, आपले आपल्या गावात काय स्थान आहे, त्यांनी ही आपल्या परंपरेसारखी सुत्र हातात घेतली पाहिजेत, अर्थात त्यांचा हेतू काही वावगा नव्हता. पण त्यांना त्यांच्या पुत्राची पारखच करता आली . त्या महापुत्राने ज्या कार्यासाठी जन्म घेतला, तो ते कार्य सोडून पाटीलकी घेईलच कशाला. आपले काम बरोबर आहे असे वाटणारी व्यक्ती जर आशेने काम करीत असेल व त्यास जोरदार विरोध झाला तर ती व्यक्ती कधीही मागे हटत नाही, उलट अजूनच तुफान गतीने ती त्याच उर्वरीत कार्याचा शुभारंभ करीत असते. अगदी तसेच हा जनार्दन रुपी धार्मिक वृक्ष आता फारच बळकट झाला होता आणि त्याला आता धार्मिक मुळांसह उपटणेही आता शक्य नव्हते. त्याच्या पेशीपेशीत धार्मिकतेचे रसग्रहण होत होते, त्याच्या कोमाकोमात भक्तीचा अंकुर फुटत होता,

कारण या जनार्दन रुपी वटवृक्षाला पाणी घालण्याचे कार्य त्याच्या आजोबाने केले होते. व आता जरी ते आजोबा पाणी घालण्यासाठी हयात नसेल तरीही स्वतःच्या भक्तीरुपी मुळातून धार्मिकतेचे पाणी शोधण्याइतकी बळकट हा वटवृक्ष वाढला होता. या वटवृक्षाचे प्रत्येक पान धार्मिकतेचा वारा सोबत घेत, त्यांच्या पानापानात, फुलांफुलांत, फळात, धार्मिकतेचा पगडा उमटत होता. त्यास विरोध करणारे विरोध करीत होते, परंतु हा जनार्दन नामक वटवृक्ष आता पुर्णतः बहरुन गेला होता. पहाटची सुरुवात तो त्याच्या उमलणाऱ्या नाजुक कळीतुन करायचा तर मावळत्या सुर्याची सांगता तो त्या फुलांच्या धार्मिक सुवासातुन करायचा. ह्या पडणाऱ्या पावसाला अडविणारा कोण आहे, राज्याच्या हुकूमाला मोडणारा कोण आहे, लष्करी गतीने धडाडीने मर्यादा आखणाऱ्या पहिल्या बाजीराव पेशव्यास हरविणारा कोण आहे. यक्षाची उत्तरे देणारा धर्मराजाखेरीज दुसरा व्यक्ती कोण आहे, देवाने तारणाऱ्याला मारणारा कोण आहे तसेच या शिवअवतारास भक्तीपासून अतिप्रचंड विरोध करणारा कोण आहे. नाही.. असेल तरीही त्याचा विरोध काय कामाचा. या भारत रुपी देवघरात जन्मास, आलेल्या व विश्वात तारणाऱ्या जनार्दनरुपी शिवअवतारास विरोधकाचा विरोधही निष्फळ होता. त्यांचा रस्ता बदलवणारा कोणीच नव्हता. या जनार्दन रुपी नदीच्या पाण्याची दिशा बदलविणारे आता कोणीच नव्हते. त्यांच्या चंचल भक्तीच्या मनाला गवसणी घालणारं कुणीच नव्हतं व कुणी असला तरीही त्याचा उपयोगही नव्हता. जनार्दन नामक तरुण मुलगा आपले काहीच ऐकत नाही, त्याचे घरात अजिबातच लक्ष नाही धार्मिकतेच्या अधिन गेलेल्या या पुत्रास काय करावे हा प्रश्न आता आप्पासाहेबांना भेडसावत होता. म्हाळसाईस मध्येच बोलण्याचा तर अजिबातच हक्क नव्हता. आपल्या पाटील घराण्याला हा पुत्र म्हणजे एक लागलेला व न मिटला जाणारा कलंक आहे, हेच उद्‌गार आप्पासाहेब सर्वांना ऐकवत होते, स्वामींनी त्यांच्या वागण्यात काहीच बदल केला नाही, उलट दैवी क्षेत्रात अधिकच अमुलाग्रही बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला, असा तडेजोड, तडाखेबाज वातावरणात बाजीरावांना एक उपाय सापडला व तो उपाय म्हणजे जनार्दनांचे लग्न. मुलगा तरुण असून भरकटलेला असेल तर त्याच लग्न लावुन देणं हा एकमेव उपाय असतो. स्वराज्य संस्थापकाचा मुलगा राजेसंभाजी असे संसार सोडून भरकटले होते तेव्हा राजांनी त्यांचा विवाह येशुबाईंशी लावुन दिला होता, अगदी तशीच विचारसरणी डोळ्यासमोर मांडून बाजीराव आप्पांना म्हणाले,

'बस... त्याचे एकदा त्यांचे लगीन लावुन द्या, म्हणजे आपोआप ठिकाणावर येईल.' लहान भावाने अचुक व प्रथम योग्य सल्ला दिला असा पोकळ भास आप्पांना झाला व त्वरीत ते उद्‌गारले,

अगदी बरोबर आहे हे बाजीराव याचे एकदाच लग्नच लावुन देवु आपोआप ठिकाणावर वागत जाईल.

दोघाही भावांचा विचार झाला व झालेला विचार अंतीम निर्णयापर्यंत योग्यच मानला गेला. अत्यंत अडचणीच्या समस्येत हा तरुण ओवला गेला होता. आजोबाचे छत्र विसावले गेले होते, मातेचे वडीलांपुढे काही चालत नव्हते आता काय करावे हा प्रश्न या शिव अवताराच्या मनात होता. मी तर असेच म्हणेल मालोजी राजाचा शहाजी व विठोजी ही मुले जशी त्याच्या प्रमाणे शुर निघाली तशी मात्र नारायण पाटलांची आप्पासाहेब व बाजीराव ही मुले धार्मिक बाबतीत शुर निघाली नाहीत. किंबहुना मातोश्री जिजाबाईंना पुत्र शिवबा हा स्वराज्याचा संस्थापक म्हणून घडविता आला पण नातु संभाजी घडविता मात्र नाही आला. तसेच परंतु येथे उलटे झाले, नारायण पाटलांना मुलं शिवाजीराजा प्रमाणे घडविता नाही आली, नातु मात्र संभाजी पेक्षा श्रेष्ठ शिवाजीप्रमाणे नक्कीच घडविता आला याची पावती आजही घडलेल्या इतिहासात जगाला दिल्याखेरीज राहणार नाही, या जनार्दन नामक बालकाचे पाय तर बालपणीच भक्तीच्या पाळण्यात दिसत होते. मग घरच्यांचाच एवढा विरोध का ? कुणास ठाऊक लहान वयातच बाबु मामांपासून तर आजोबांपर्यंत सर्वांनी भक्तीचे पाठ त्याचेकडून गिरवुन घेतले होते. लहान वयापासून लिखाण वाचन, पठण सुरु झालेले होते. क्षणभंगुर उल्हासित करणाऱ्या विलोभनीय संसारामध्ये रमणे हे त्या तरुणांस अजिबातच पसंत नव्हते, सुखाचा शोध घेणे, नको त्या विलाशी गोष्टींचा मोह धरणे, चैनीत जीवन जगणे अशा या जीवनाच्या व्याख्येपासून तो कितीतरी मैल अंतरावरुन प्रवास करीत होता. ज्याप्रमाणे धडाडीने अवघ्या हिंदुस्थानच्या सिमा रुंदवणाऱ्या पहिल्या बाजीरावात निर्माण करतांना ईश्वराने चैन, विलास शांत, पराजय, अपयश या गोष्टी वजा करुन धैर्य धाडस, चैतन्य विशालगती आक्रमक धोरण, सदाजय , सर्वयश अशाच गोष्टींचाच भरणा केला होता, अगदी तसेच या शिवअवतारी जनार्दनाची निर्मीती करतांना स्वत: भगवान शिवाने आराम, खंडता, निराशा, विलास या सारख्या गोष्टींच्या जागी अखंडता, अशा, सदकार्य , धार्मिक प्रतिमा या सारख्या गुणांचाच भरणा केला होता म्हणूनच की काय पण सर्व विरोधकाचा विरोध या भक्तीरुपी मनाच्या सागरात साठवुन नित्यनियमाने काट्या मारुतीला तांब्याने पाणी घालून ते उगवणाऱ्या दिवसाचे ते स्वागत करीत होते. दिवसेंदिवस घरातील वाद अधिकच तीव्र होऊ लागला होता. एक दिवस म्हाळसाबाईस आप्पासाहेब व बाजीराव यांनी जरा विस्तृत भाषेत सांगितले , तु त्याला तुझ्या भाषेत त्याला चांगले समजावून सांग आजपासून आम्ही त्यांच्यासाठी मुलगी पाहू राहयलो, तरी तु त्याला नीट सांग. असे सांगुन आप्पासाहेब व बाजीराव यांनी मुलगी पाहण्याचे सुरु केले. जनार्दन स्वामीचे चुलते फार व्याग्र बुध्दीचे होते. एकापेक्षा एक योजना त्यांच्या बुध्दीच्या चरणात रुंदावत होत्या. अखेर एक गोष्ट लक्षात आली की आपण यास कितीही सांगा हा लग्नास तयारच होणार नाही आणि मुलीच्या गावी जावून लग्नास तर अजिबातच तयार होणार नाही, असा विचार करत बाजीराव खुलआम बोलले,

'आप्पासाहेब जना तर लग्नास तयारच नाही त्याचे लग्न करणे आपणास गरजेचे आहे हा आपल्या पाटील घराण्याच्या इज्जतीचा प्रश्न आहे.'

'त्यासाठी मी काय करु बाजीराव ? ' श्वास टाकत आप्पा उद्गरले.

'यावरच एक भक्कम उपाय आहे.'

'कोणता'

जनाचं आणि माझ्या ताईच लगीन एका मंडपात करु, म्हणजे हे पहा हा जना काय पोरीच्या गावाला जावून लगीन लावणार नाही त्यापेक्षा आपल्या आक्काच लगीन इथच लावणार आहे त्या दिवशी त्याचेसाठी आपण शोधलेली नवरीच इकडे आणु व त्याचबी लगीन लावुन देवू, आपल्या भाऊबंदाच्या दडपणांन खुद उभा राहील तो लग्नाला.

उपाय लई चांगला आहे.

असे म्हणून आप्पांनी बाजीरावाच्या म्हणण्याला पुर्ण प्रतिसाद दिला व लगेचच मुलीला शोधण्यास गेले. ताईच्या लग्नाची चर्चा अवघ्या गावात झाली, त्या चर्चेत स्वामींच्या लग्नाचीही चर्चा होऊ लागली. घरात आवरासावर सुरु झाली, गोवऱ्या, लाकडे, काठ्या इ. जळण साहित्याने वाड्यामागील परिसर भरला गेला. शेण व बारीक रेती यांनी घरातील बाया घराच्या भिंती रंगवु लागल्या, पाहुणे मंडळी लग्ननिमित्ताने घरी आल्याने बराचसा महत्वपुर्ण बदल उगले पाटलांच्या घरात जाणवू लागला. स्त्रिया घरातील काम आवरीत होत्या तर कै. नारायण पाटील यांचे दोन्ही चिरंजीव जनार्दनांना वधु शोधत होते. हा जनार्दन नामक तरुण लग्न करावयाचे नाही या विचाराला आपलसं करुन बसला होता. पण वडील व चुलते लग्न करायचे या भिष्म प्रतिज्ञेशी निगडीत होते. आता काय करावे हाच प्रश्न त्या शिवअवतारी बालकास पडला होता. लग्न होणार म्हणून बाजीरावांची ताई खुलत होती तर लग्न होणार म्हणून आप्पासाहेबांचा हा पुत्र वैतागत होता. पुर्णतः विरोधी प्रकार या उगले पाटलांच्या घरात उभा राहिला होता. जर काही मदत लागत असेल तर मदत घेण्याचा प्रयत्न प्रत्येक प्राणी घेत असतो. त्यातल्या त्यात जर मानव प्राण्यात काही हवे असेल व त्यासाठी जर त्यास कुणाची मदत आवश्यक असेल तर तो ती मदत घेणेसाठी त्याच्या जीवनातील सर्वात जवळच्या शोध घेतो व त्या कडुन पुरेपुर मदत मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. आणि ती व्यक्ती म्हणजे जगाची दोरी ओढणारी जगाचे रुप दाखवणारी व बालकाच्या हृदयमंदिराची सर्वात पहिली देवता म्हणून सन्मान पटकवणारी 'आई'. म्हणतात ना

'स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी'

या निसर्ग नियमाने स्वामींनी सर्वप्रथम आईकडे धाव घेतली. आईकडे नक्कीच आश्रय मिळेल ही एक मनाला फुलवणारी आशेची कळी स्वामींच्या मनमंदिरात खुलत होती व फार मोठ्या आशेने स्वामी आईकडे गेले व म्हणाले ,

'आई मला लगन नाही करायच. मला देवाची भक्ती करायची. आई तु तरी काही सांग'. असच मागणं स्वामींनी आईकडे केलं. आईने स्वामीच्या चेहऱ्याकडे बारकाईने लक्ष दिले, मनात भक्ती, हृदयात भाव चेहऱ्यावर तेज असच प्रदर्शन त्या मातेस होत होतं, जन्मत:च भक्तीचा प्रसाद जणु काय आपल्या बालाकाने सोबत आणला आहे. अशीच अप्रत्यक्षरित्या जाणीव त्या मातेस होत होती, आताच्या क्षणी जीवाचे रान करणाऱ्या, लेकरासाठी स्वत:चे काळीज काढुन देणाऱ्या ह्या म्हाळसा माता स्वामींना पदराआड टिपत होत्या, आई विषयीची सखोल भावना या बालकाच्या अंतकरणात दडलेली होती. मातेस कसे स्थान द्यावे ही आधुनिक युगातील मानवाने खरोखर जनार्दन स्वामींकडून शिकावे, मातेस ते दैवत मानीत, जसा संपुर्णता दिवसाचा सार हा एक कातरवेळेत दडलेला आहे तसा आयुष्याचा सार संपुर्ण हा मातेच्या चरणात दडलेला आहे अशी स्वामीची आईविषयीची भावना होती. मातेला पुत्राचे बोलणे ऐकूण धक्काच बसला कोणत्याही मातेला सर्वस्व म्हणून ठरलेल्या तिच्या पती विषयीच्या प्रेमाची व नवमांस नऊ दिवस पोटात वाढणाऱ्या पुत्राच्या प्रेमाची तुलनाच करता येत नाही. आता काय करावं हाच प्रश्न या जगतवंदनीय म्हाळसा मातेस पडला. या जनार्दन स्वामीच्या वेड्या भक्तीने ग्रासलेल्या मनाला आवर घालणेसाठी या मातेचे मातृत्व कमी पडले. तिच्या मनात केवळ द्वीधाच परिस्थीती निर्माण झालेली होती. एका बाजुला सौभाग्यवतीचे लक्षण ठरणारे, स्त्री भुषण कुंकू म्हणून गणले जाणारे व स्त्री जीवनाचे सर्वस्व म्हणून भविष्य रेखाटणारे आप्पा पाटील तर दुसऱ्या बाजुला भावी जीवनात जनतेला आदरातीर्थी वाटणारे, उज्वल भविष्याचा आशादायी आराखडा आखणारे व शिवअवतार म्हणून या मातेच्या उदरी जन्म घेणारे स्वामी जनार्दन होते. दोघेही मनाचा खेळ या मातेच्या अंतरमनात रंगला होता काय करावे हे या मातेस सुचत नव्हते, पडणाऱ्या पावसाला जसे अडवता येत नाही, तसे पतिव्रता स्त्रिला पतीचा शब्द मोडता येत नाही हेच हिंदु स्त्रीचे लक्षण आहे म्हणतात ना..,

डोक्यावर पदर
पतीचा आदर,
सेवेला सादर
तिच इंडियन मदर ॥

अगदी याच दृष्टीने त्या मातेच्या डोळ्यातील बाहुल्या काही क्षणासाठी विसावणाऱ्या पावसाच्या दवबिंदुसारखा आसवांचा ओघ जमा होत गेला व ती माता बोलली.

'बाळ जनार्दन ऐक माझं घे करुन एकदाच लगीन मग पुढचं पुढं पाहु.'

आईचा शब्द त्यांना ओलांडता आला नाही. आई पुढे काहीच बोलण्याची हिंमत होत नव्हती व 'हो' बोलुन त्यांनी मातेस मुखकमल चरणांसह सोडले.

स्वामी तिन्ही जगाचा

आई विना भिकारी ।।

हे संतचरण त्यांना खोटे ठरु द्यावयाचे नव्हते. आईचा अपमानही त्यांना करायचा नव्हता, लग्नाला हो म्हणून संसारही त्यांना करायचा नव्हता. हाच निश्चय त्यांच्या मनात प्रवेश करीत होता. वडील व चुलते मुलीचा शोध घेत होते, आत्तापासूनच ईश्वराने जनार्दन स्वामीची परिक्षा पाहण्याचे काम चालु झाले होते. नको म्हणणाऱ्या व्यक्तीला होकार फार लवकर मिळत असतो हा ही एक निसर्गाने निर्माण केलेला प्रमुख नियम आहे तोच नियम स्वामींच्याही जीवनात येवून गेला. याच निसर्ग निर्मीत नियमानुसार स्वामींसाठी त्यांच्या वडीलांनी एक नववधु शोधुन काढली, भालगावच्या सुरशे घराण्यात एक कन्या, तिच्या परीने ती सुकन्या पण जनार्दनाच्या परीने ती दुकन्या म्हणून वाढत होती, बघा काय सृष्टीचा नमस्कार वृष्टीचा चमत्कार होता. त्या सुरशे घराण्यात वाढणाऱ्या वधुचे नाव ही या शिवअवतारी वरास शोभेल असेच होते. त्या भालगांव येथील सुरशे घराण्यातील त्या वधुचे नांव हे 'पार्वतीबाई' असे होते. आईस होकार देवूनही लग्न करावयाचे नाही असे त्यांचे ठामपणी त्यांचे एक मन त्यांना सारखे हिनवून सांगत होते, ज्याच्या मनात भक्तीचे फुल उमलत होते, मनात ज्यांच्या मनात समाजासाठी धर्माविषयीच्या भावना दडलेल्या होत्या, ज्यांच्या देहात साधना लपली होती, ज्यांच्या अंतःकरणात दैवप्राप्तीचे रहस्य खेळत होतं तो कसा काय लग्नास होकार देईल हे तुम्हीच सांगा आणि दैवअवतारी पुरुषाने लग्न करणे ही काय भाकर खाण्याइतकी सोपी गोष्ट नाही.

श्री समर्थ रामदासांना नारायण पंतांनी लग्नास तयार केले होते तेही स्वामीप्रमाणे लग्नास तायर होत नव्हते, पण त्यांनीही आईवडीलांचा मान लक्षात ठेवून लग्नास होकार दिला होता. सर्व नवरदेवांप्रमाणे रामदासांना पिवळी हळद लावली गेली, सर्व जण पाहुणे मंडळी देखील आनंदात मंडपातून इकडे तिकडे फिरत होते, विवाहाचा दिवस उजाडला, सर्व तयारी झाली, ब्राम्हण, वऱ्हाडी मंडळी वाजंत्रीसह सर्व विवाहस सज्ज झाली, नवरीला तिच्या मामांसह मंडपात बोलावले गेले, मुलाचा (रामदासांचा ) मामा वरासह विवाह मंडपात उपस्थित होते. ब्राम्हणाने मंगलाष्टके म्हणण्यास सुरुवात केली, त्या मंगलाष्टकातील एकूण एक शब्द फार मोलाचा अनं मोलाचा असतो. त्या शब्दा शब्दात फार मोठा अतीभव्य दिव्य असा अर्थ दडलेला आहे. ब्राम्हणांच्या मुख ओठातून त्यांच्या अनमोल मंगलष्टकांची एक एक ओळ बाहेर पडु लागली. त्याचवेळी त्यांच्या शब्दाशब्दांची अनुमणीका समर्थांनी मनातल्या मनात व्यवहारात आणण्यात सुरुवात केली, एक कडवे संपले ब्राम्हणबुवा बोलले... शुभ मंगल सावधान...

याच ओळीचे शब्द त्यांच्या मनात काही क्षणात फिरून आले, त्यांनी या ओळीचा अर्थ असा लावला की 'तुम्ही आजपासून विवाहीत होत आहेत, हे कौमार्य संपुर्ण एका वेगळ्या पर्वात तुम्ही पदार्पण करीत आहात. तेव्हा ... सा व धा न.. असा मतितार्थ स्वामींनी

मनातल्या मनात लावला. व वेगवेगळ्या कापडांनी सजवलेला लग्न मंडप व लोकांनी अक्षदा फेकून रंगलेला तो लग्नमंडप, समोर हात जोडून वरमाळा टाकण्याच्या बेतात उभ्या असणाऱ्या वधुने नटलेला तो विवाह मंडप त्यांनी सोडला, बोहल्यावर उभा असलेला हा समर्थ रामदास रुपी वर काही क्षणात लग्न मंडपातून ब्राम्हणाच्या दुसऱ्या कडव्या आधीच पळून गेला. यावरुन थोर महात्म्यांनी लग्न करणे ही काही साधी गोष्ट नाही हे तुमच्या लक्षात आल्याखेरजी राहिले नसेल. तसेच लग्नबाबत हो.. नाही असा विचार जरी स्वामींच्या मनात येत असला तरी त्यांना मातेचा शब्द ओलांडता येणार नव्हता, जगाची विभुती बनणाऱ्या या संतांच्या अंगी मातेचा शब्द मोडण्याची ताकद नव्हती. संपुर्ण जीवनाचा सार हा एकट्या मातेत आहे, अशी व्याख्या करणाऱ्या या स्वामींमध्ये आईच्या शब्दाबाहेर जाण्याची हिंमत होत नव्हती. काय परिस्थीती या शिवअवतारावर ओढवली असेल, काय परिक्षा बघण्याचे दिवस त्यांचेवर आले होते. हे असं का? कुणास ठाऊक वाचकांनो, कर्णाला हरवुन अर्जुनाकडून सृष्टीचे रक्षण करणेसासाठी भगवान श्रीकृष्णाने त्याच्या रथाचे एक चाक भूमीत रुतवले होते व ऐन युध्दात शस्त्र न उठवण्यासाठी त्यांच्या बुध्दीला तयार केले होते. श्रीराम प्रभुला स्वतःला वनवासाला जाण्याइतकी परिस्थिती ईश्वराने तयार केली होती. साक्षात भगवान श्रीकृष्णाला मावशीच्या घरी पोहचवण्यासाठी किती खडतर परिक्षा वासुदेवांना द्यावी लागली होती. तेव्हा हा तर नुकताच विसावलेला शिवअवतार होता.

वडील व चुलते मुलगी बघुन आले, स्वामींना कळले की त्यांचा विवाह काही दिवसांनी मालगांवच्या सुरशे घराण्यातील पार्वताबाईशी होणार आहे, त्यांच्या अंतर्गत असलेल्या विरोधी मनाने त्यांना सुचविले की तु गृहत्याग कर, स्वामी उठले व सरळ मागील घरात जावून माते समोर जावून बसले. त्यांच्या पायांची चाहुल म्हाळसाईस आल्याने त्यांना पुसटशी जाग आली म्हाळसाई उठून म्हणाल्या ..

काय रे जना ? झोपला नाही व्हय ?

नाही, बाई, झोपच लागत नाही ?

का ? म्हाळसाबाईने विचारले ,

स्वामी स्तब्ध होवून उतरले,

'बाई मला गृहत्याग करावासा वाटतो '.

हे ऐकताच हृदयातील प्रेम ओसांडून वाहणारी म्हाळसाई शांत झाली. डोक्यावरची फळी निसटुन टांगती तलवार जणू काय तिच्या मानेशी तरंगत होती. ह्या शांत स्वभावाच्या मातेच्या हृदय कमलात असंख्य भल्या भल्या लाटा निर्माण झाल्या प्रत्येक निर्माण होणाऱ्या लाटेत तिला मायेचा तुटता पाझर जाणवत होता. मायेच्या ममतेचा पान्हा तिच्या अंतकरणात दाटुन येत होता. तिच्यातल्या वाहाणाऱ्या रक्ता रक्तात कुठेतरी खंडता पडण्याचा भास तिला होत होता... काही विचार करुन म्हाळसाईने या पुत्रास छातीशी धरले व स्वतः काही मधल्या

प्रतीच्या आवाजाने म्हाळसाई बोलल्या,

'नाही जना नाही, हा माझा जीव जीवनात आसुस्तर तुला घर सोडून जाता येयच नाही. तुला ह्या तुझ्या आईची शपत आहे... तुला, मला सोडून जाताच येणार नाही.. रे माझ्या जना'.

ही जनार्दन नामक विभुती जरी साक्षात भगवान शिवाची अवतार मुर्ती असली तरीही त्या विभूतीला आईची शपथ मोडण्याची ताकतच त्या विभुतीत नव्हती. एवढे शांत पण खंबीर उत्तर ऐकताच स्वामनी पुन्हा मुळ ठिकाणी जावून पोहचले. आईचे टपकणारे ते आश्रू स्वामीच्या हृदयाच्या कप्याकप्यात जावून पोहोचले. याच आश्रुची शिदोरी ह्या जनार्दनाला आयुष्यभर पुरली ही आणि पुरुन उरली. मातेच्या ह्या शपथेने हृदयात अनेक कल्पना, भावना बंदिस्त झाल्या व नाईलाजाने भालगावच्या पार्वताबाईशी विवाहास तयार व्हावे लागले.

इ.स. १९२६-२७ दरम्यान दिवसा मागून दिवस जावु लागले, लग्नाचा दिवस उजाडला गेला, स्वामींची तयारी भावबंधांनी केली. बाजीराव पाटलाच्याही मुलीची चांगल्या रीतीने तयारी झाली होती. ताईच्या वराकडील मंडळी वरासह दहेगावात हजर झालेली होती. तर पार्वता बाईसह भालेगावची वऱ्हाडी मंडळी नुकतेच गावाच्या वेशीत उतरले होते हळुहळु लग्नाचा मुहूर्त जवळ येत होता. पार्वतीबाई व ताईबाई लग्नास उत्सुक होत्या तर काही क्षणांनी आपण विवाहात समाविष्ट होणार ह्या विचारांनी जनार्दन स्वामी वैतागले होते, ह्या शिवअवतारी जनार्दनाचे लग्न बघण्यासाठी खळाळुन वाहणारी नदी शांत झाली होती. सुर्य अत्यंत लालभडक होवून हे लग्न बघण्याच्या तयारीत होता. निळ्याभोर आकाशात एकही ढग उपस्थित नव्हता, दाम्पत्यांच्या विवाहासाठी तळमत होते, गावभर पंखाच्या साह्याने संचार करणारी पाखर आज मात्र ओळीने झाडावर अक्षदा टाकण्यासाठी बसले होते, पानाफुलातून आशिर्वादाने सुगंध दरवळत होता, जणु काय अवघी सृष्टीच ह्या स्वामीच्या लग्नासाठी नटुन थटुन आधीन झाली होती आणि हे मृत्युलोकातील चित्र स्वर्गमंचकी विराजीत असणाऱ्या देवांना देखील विलोभनीय वाटले असावे, अशाच मंगलमय वातावरणात स्वामींचे शुमंगल ब्राम्हमाने मंगलाष्टक बोलून पुर्ण केले, सुरसे घराण्यातील ही पार्वताबाई आता उगले घराण्याची सुन म्हणून दहेगावात रुजु झाली.

लग्न लागले, दिवस मावळला जी ती पाहुणे मंडळी ज्याच्या त्याच्या घरी सुखरूप पोहोचली गेली. वरमाळा घालून आपण ग्रहस्थ झालो, आता काय करायचं हाच प्रश्न स्वामींपुढे दत्त म्हणून उभा राहिला. शेवटी डोक्याला हात लावून पुढील आयुष्याचाच आता ते विचार करु लागले होते, पूर्वीच ह्या भारत भूमीरुपी जन्म घेण्याच्या जनार्दन स्वामीचे मन रमत नव्हते तर आता याच्या नंतर काय फरक पडणार आहे. काहीच नाही उलट लग्न झाल्यावर ते दिवसेंदविस अधिकच खिन्न उदास होत होते, त्यांचे मन क्षणभरही त्या

विसाव्यासाठी थांबत नव्हते आईची शपथ व गृह –त्याग ह्या दोन विचारांना त्यांनी त्यांच्या मनात थारा दिला होता व नेमके ते दोन विचार दुसरे काहीच सुचवू देत नव्हते. लग्न केल्यावर भक्ती मार्गात भरकटलेला आपला कर्तबगार मुलगा पुन्हा ठिकाण्यावर येईल असे वाटून घेणाऱ्या आप्पाच्या व बाजीरावांच्या अपेक्षा संपुर्णतः सपाटून आपटल्या . लग्ना अगोदर तरी हा तसा होता. आता हा असा झाला. असाच विचार दोघांही भावांच्या मनात आणि बुध्दी फिरत होता. पार्वताबाई ह्या तर फक्त ब्राम्हणबुवांचे मंगलाष्टक संपेपर्यंत पत्नी होत्या. त्या नंतर त्यांनी भरल्या नजरेने देखिल त्यांच्याकडे पत्नी ह्या नात्याने बघितले नाही. किती भक्तीची उपासना त्यांच्या अंतकरणात बसली होती. हे भगवान शिवच जाणो.

आता दिवसामागुन दिवस जावु लागले, घरच्या व्यक्ती स्वामींना कामाविषयी बोलू लागल्या, मुलगा मोठा झाला की खुप काम करावे आई वडीलांना त्यांच्या प्रत्येक कामात मदत करावी अशाच अपेक्षा प्रत्येक माता –पित्यांची असते कारण मुलगा मोठा झाला की तो आई वडिलांचा अभिमान बनत असतो . त्यांच्या विषयाच्या ज्या अपेक्षा ते मनात बाळगतात त्या तो पुर्ण करेल असाच आत्मविश्वास प्रत्येक पित्याच्या मनात घर करुन बसलेला असतो अगदी तशाच अपेक्षा आप्पासाहेबांना पुत्र जनार्दनाकडून होत्या. त्यांना सुरुवतीस वाटले की हा आपल्या आशाआकांक्षा पुर्ण करणार नाही. म्हणून त्यांनी त्यांच्या विवाहही लावून दिला होता परंतु विवाहानंतर त्यांना त्यांच्या पुत्ररत्नाकडून वेगळ्याच प्रतिमा दिसू लागल्या होत्या. मुलाच्या विचाराने त्यांचे डोके ठिकाणावर राहत नसल्याने ते पुत्राचा राग कधी कधी म्हाळसाईवरही काढत होते. स्वामींनी त्यांच्या वागण्यात मात्र काहीच फरक केला नाही . उठल्या उठल्या स्नान करायचे, त्यानंतर भागवत पोथी, पुराण वाचायचे परंतु पोथी वाचण्याअगोदर तांब्याभर पाणी काट्या मारुतीस वाहून पुर्ण गावाला चक्कर मारायचे, त्यानंतर देवदेव करत थोडे फार काम करायचे, दुपार झाल्यावर पुन्हा थंड पाण्याने स्नान करायचे, पुन्हा स्नान केल्यावर देवाचे नामस्मरण करायचे ,पुन्हा थोड फार उरलेलं काम करायचे त्यानंतर कातरवेळ झाली की घरी यायचे, घरी आल्यानंतर गुरांना चारा–वैरण करायचे, पुन्हा स्नान करायचे, स्नान आटोपल्यावर पुन्हा विधी , भागवत, पुरान वाचायचे नंतर अन्नग्रहन करत असत व देवाचे नामस्नरण करत झोपी जायचे पुन्हा दुसऱ्या दिवसी असाच नित्यक्रम ते करत असायचे. त्यांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात कधीच कुणाचा हस्तक्षेप होऊ दिला नाही. घरात कसेही वातावरण असले तरीही त्यांनी कधीच त्यांच्या स्वतःच्या वागण्यात बदल केला नाही.

एक दिवस बाजीराव पाटलांना व आप्पासाहेबांना स्वामींचा खुप राग आला. ते त्यांना वाटेल ते बोलले. स्वामींच्या मनाला वडीलांचे व चुलत्यांचे बोल खुपच लागले म्हणतात ना वेड्याला काडीचा मारा अनं शहाण्याला शब्दांचा मार, हजार तलवारींपेक्षा एक शब्द अधिक तेज असतो. ह्याच तेजस्वी शब्दांनी स्वांमीचे मन गहिवरले व कासाविस होऊन

अवघ्या मृत्युलोकांत भ्रमण करुन आले नंतर त्यांनी अत्यंत मनापासून कामास सुरुवात केली. शिवअवतारी रुपात जन्म घेणारा हा जनार्दन बाबा दहेगावच्या शेतात खुप खुप राबला, त्यांनी तेव्हापासून काम करुन भक्तींची बीजे रोवण्याच्या संकल्प केला व तोच संकल्प तडीस नेण्याचाही प्रयत्न सुरु केला. व नीट वागण्याचाही प्रयत्न सुरु केला.

सुरुवातीलाच त्यांनी शेतकाम करण्याचे ठरवले. सकाळीच अंघोळ झाल्यानंतर पुन्हा त्यांनी विधी व इतर त्यांचे धार्मिक केलेचे, जरी त्यांनी आजपासून निटवागण्याचा प्रयत्न केला असला तरीही धार्मिक कार्य सोडण्याचा मात्र निर्णय कदापीही मनात आणला नव्हता. धार्मिक विधी वैगेरे झाल्यानंतर बैल सोडून शेतात चारण्यास नेत असत, म्हाळासाईकडून न्याहरी नेत असत व सकाळी आठ वाजता वखार जूंपून बागेतील परिसर वखरण्यास सुरुवात करत, बैलांना ऊन लागेपर्यंत बागेचा परिसर वखारून टाकत, तद्नंतर ती बैल त्यांनी सावलीला बांधत व चारा त्यांना दुपारचे जेवण म्हणून देत असत. स्वतः मात्र उन्हात विश्रांती न घेता बागेतील हरळ गोळा करुन बागेतील बांधावर गोळा करत. बरोबर पुन्हा तीन नंतर बईलं वखारीस जुपूंन ते शेत ओखरण्यास सुरुवात करत, सायंकाळ झाली की बैलांना संध्याकाळसाठी पुन्हा गवत गोळा करत व बैलगाडीत टाकून घरी परत आणत. आल्यावर पुन्हा गुरांना पाणी पाजण्यासाठी विहीरीवर नेत असत, तद्नंतर त्यांना चारा वैरण देऊन स्नान करत असत, स्नान संध्या आटोपल्यावर पुन्हा नित्यनियमाने विधी, आरती, पुजा करत व थोडावेळ मातेजवळ जावून बसत, अशाप्रकारचा नित्यक्रम त्यांचा सुरु झाला. नित्यनियमात जरी बदल झाला असला तरीही त्यांनी धार्मिक गोष्टीत हस्तक्षेप केला नाही. धार्मिक विधी नियम रोजच्या स्थितीतच त्यांनी दिवसेंदिवस पुढे नेण्याचा कयास केला. एवढे असूनही घरातील मंडळी नाराजच होती कारण त्यांना ह्यांचा भक्तीमार्ग आवडतच नव्हता. व आता त्यांच्या घराच्यांनी त्यांच्यावर पहाटे पासून बैल शेतात नेऊन शेतात मोटेने पाणी भरण्याचं कामगिरी सोपविली व त्यांचे चुलते बाजीराव पाटील हे बरोबर जाणार होते.

पहाटे चारचा सुमार असेल स्वामी नेहमी प्रमाणे उठले बैल बैलगाडीस जुंपले व शेतात पाणी भरण्यासाठी निघाले पण निघतांना त्यांनी त्यांच्या सोबत भगवत गिताही नेली, बाजीराव पाटील हे तेथेच झोपडी करुन राहत होते कारण सुगीचे दिवस असले की, प्रत्येक शेतकरी हा शेत राखण्यासाठी शेतातच मुक्काम करत असे, त्याचप्रमाणे बाजीराव पाटीलही त्या दिवशी शेतातच मुक्कामी होते, गेल्या गेल्या स्वामींनी बैल चरण्यासाठी सोडून दिले व थंड पाण्याने स्नानास विहीरीवर गेले, आंघोळ चालु असतांनाच बैलांच्या गळ्यातील घुगरांच्या मधुर आवाजाने बाजीराव पाटलांचे कान थबकले व बाजीरावांचे धडपडून जागे झाले, त्यांना वाटले की आपण आत्ता नकळत यांच्या सर्व क्रिया बघू. बघा वाचकांनो काय सृष्टीचा चमत्कार होता. बाजीराव पाटील झोपडीच्या विखुरलेल्या पाचटातून बाहेर बघु लागले. डोळ्याला दिसेल इतका पुरेसा प्रकाश अजून सुर्याने दिलेला नव्हता. कुठं मधूनच

एखाद्या पक्षी मध्येच आवाज काढून बाजीरावाचे मन आणि नजर चुकवत होता, जनार्दनांचा शोध घेणाऱ्या यांच्या डोळ्यांनी काही क्षणात बैलांचे चित्र किंबहुना प्रतिमा टिपल्या व शेजारीच एक तरुण ही तेथे बसलेला आहे हे ही त्यांच्या दोन्ही डोळ्यांनी एकाच वेळी मनाला कळवले. बाजीराव पाटील मुलगा (पुतण्या) आत्ता पुन्हा संसारालाच लागला असे समजून मनोमन काहीशे सुखावले परंतु खरतर त्यावेळी स्वामी बैलांजवळ बसलेले नसून स्नान आटोपून तांब्याभर पाणी काट्यामारुतीस घालून गावात एक प्रभातर फेरी मारणेसाठी रवाना झाले होते. म्हणूनच तपसाधना झाल्यानंर प्रवचनातून स्वामी आपणास नेहमी सांगायचे.

''बाबाहो आपले काम आपणच करावे , देवाचे काम तो खुद करुन घेतो, आपले काम हे चिंता करावयाचे नसून फक्त देवाचे चिंतन करायचे आहे, आपली चिंता करायचे काम त्यांचे, त्यांची चिंता तो खुद्द करतो ''. यावर लगेच बाबु महात्मा (आत्ताचे उत्तराधिकारी) म्हणायचे...

आता माझी चिंता...
तुज नारायणा...

या तरुण वयातच त्यांनी त्यांचे परमेश्वराचे चिंतनाचे काम केले, मात्र त्यांच्या चिंतेचे कार्य हे स्वतः स्वतः भगवान शिवानेच केले म्हणून तर स्वामी काठ्या मारुतीस पाणी घालून गावात प्रभातफेरी मारणेसाठी गेले असता बाजीराव पाटलांच्या डोळ्यांना बैलांजवळ एक तरुण दिसला यावरून परमेश्वर भक्ताला केव्हा... कुठे ... व कधी मदत करेल हे सांगताच येत नाही. पाणी घालुन आल्यानंतर स्वामींनी कातड्यापासून बनवलेल्या मोटेला बैल जुंपले व शेतातील कपाशीसाठी (कापसासाठी) पाणी देण्यास सुरुवात केली. आता मात्र क्षणापुर्वीचे काळोखाचे पालखे निघुन गेले होते. चिमण्या देखील स्पष्ट दिसेल इतका पुरेसा सुर्यप्रकाश त्यावेळी वातावरणात पसरलेला असल्याने चुलत्याच्या भितीने स्वामींनी सरळ सरळ मोट जुपूंन पाणी भरण्याचे ठरवले...

वसंताचा काळ राज्य करीत असल्याने वसंताला फुलून सजवण्याचे कार्य झाडावर बसलेले कोकीळा मधुर गीत गाऊन करत होती. कानांना पुसटसा ऐकू येईल तितकासा चिवचिवाट चिमण्या करत होत्या, अशा मोहक वातावरणात स्वामींनी पाण्याची मोट पाण्यात सोडली, कोकीळेच्या सुमधुर गीतांना बैलींच्या गळ्यातील घुंगरांनी स्वरबध्द केले या स्वबध्द गीताला चिमण्यांनी चिवचिवाट करुन ताल बसवला व अशा नादातच या जनार्दनांनी विधी वाचून लय बसवण्यास सुरुवात केली. पुजा अर्चा सर्व झाली होती. विधी मात्र बाकी होती, विधी म्हणण्याची जबरदस्त इच्छा होती. परंतु चुलत्यांची भिती होती, व त्यामुळेच त्यांनी कपाशीला पाणी भरण्यास सुरुवात केली पण...

मनात आवड असली की सवड आपोआपाच निर्माण होते किंबहुना 'इच्छा तेथे मार्ग' याच प्रमाणे स्वामींच्या मनात विधी वाचण्याचे जबरदस्त इच्छा होती, म्हणूनच त्यांनी

विधी बरोबरच ठेवली होती. व किती रम्य वातावरणात त्यांची विधी सुरु होती. विधी चालु होती, विधी मुखातून गाता गाता कपाशीला पाणी भरण्याचे क्रिया ही वेगाने चालली होती, त्या भव्य मनमोहक वातावरणात स्वामी विधी म्हणत होते, बैल गळ्यातील घुंगरे वाजवुन आनंदाने मान डोलवत त्या मुखातून बाहेर येणाऱ्या विधीस स्वर देवून पाण्याने भरलेली मोट सहज रित्या ओढत होते, ते बैल ज्यावेळी मान डोलवून सुखावत होते त्याचवेळी त्यांची शिंगे जणु काय हात वर करुन नाचत होती, कोकिळा जास्तीत जास्त सुमधुर संगीत देवून विधीत संपुर्णतः सहभागी होण्याचा प्रयत्न करत होती, मोटेने बाहेर येणारे पाणी खळाळून प्रतिसाद देवून लहानगेतील जाईजुईंना सुखावून सुवासीक मोहकणारे वातावरण तयार करण्यास प्रोत्साहन देत होते, तर बाजीराव पाटील यांच्या विधीचा आवाज ऐकून मनातल्या मनात विचार करुन वेगळ्याच नजरेने स्वामींकडे बघत होते. पाणी भरण्याचे काम चालु असल्याने बाजीराव पाटलांना काहीच बोलता आले नाही, खाली मान घालुन ते सरळ घरीच परतले. दिवसामागून दिवस जात होते, हाच नित्यक्रम जशाचा तसा पुढे चालला होता, परमेश्वराचे चिंतन करण्याचे काम स्वामीचे चालले होते तर यांची चिंता करण्याचे काम परमेश्वराचे चालले होते. अशातच सुर्याचे उगवणे अनं मावळणे चालू होते, पर्यायाने एकएक दिवस पुढे सरसावत होता.

अशाच परिस्थितीत दहेगांव शेजारी 'शिऊर' या गावी शंकर स्वामींची वारी भरते, शिवाय शंकर स्वामी हे ही एक विठ्ठलाचे निस्सिम भक्त होते या वारीत आपण जावे ही इच्छा स्वामींच्या मनात देवघर करुन बसली होती, पण जावे कसे ही पुसटशी भिती मनात येवून दाखल झाली होती, स्वामी जरी साक्षात भगवान शिवाचे अवतार असले . तरी त्यांच्या मनात विठ्ठला विषयीचा सखोल भावना रुजलेली होती व बालपणी त्यांनी बाबुराव मामांबरोबर सर्वप्रथम विठ्ठल मंदिरातच प्रवेश कला होता. याच आधारे लक्षात घ्या, त्यांना ह्या तरुणपणात विठ्ठलाच्या दर्शनासाठी शिऊरला जाण्याची किती प्रबळ सदिच्छा निर्माण झाली असेल उद्या वारी आहे, असा आजचा दिवस उजाडला वारीला तर जायचे पण काय करावे घरातील व्यक्ती जावू देणार नाही याची संपुर्ण खात्री स्वामींना होती, तरी देखील आईजवळ एक शब्द टाकावा अशी आशा त्यांच्या मनात अंकुर घेऊन फुटली व फार मोठ्या आशेने स्वामी मातेजवळ गेले व म्हणाले, 'बाई मला एक विचायराच होतं ?'

' काय'

मला उद्या शिऊरला वारीला जायचं होतं

अरे इच्चार तुझ्या बा... ला.. अनं जाय... 'पण बाई .. बा ... जाऊ नाही देणार'.

'मग मी काय करु ?' स्वामी बोलले,

'बाई इच्चारनां बा ला'

'बरं इच्चारून पाहते तव्हर तु जवारीवरचे पाखरं हाकलं व्हय ?'

अशा विश्वासाने म्हाळसाई बोलल्या. मध्यान्ह झाला, जेवणाची वेळ झाली, स्वामींसह सर्वजण विष्णुचे प्रतिक मानल्या जाणाऱ्या लिंबाच्या झाडाखाली थंडगार सावलीत जेवणासाठी बसले. जेवता जेवता बाजीरावांचा व आप्पासाहेबांचा पिकाचा विषय निघाला, थोडा व फार अन्न पोटात गेले असेल तितक्यात म्हाळसाईने आप्पांना विचारले,

'मी काय म्हणत ? जना म्हणत होता वारीला जायचं ?'

कुठल्या ? शांत आवाजात आप्पासाहेबांनी विचारले.

'शिउरच्या' मृदु स्वरात म्हाळसाईने सांगितले.

विचार करुन हो, म्हणनारं तितक्यात बाजीराव पाटील क्रोधी चेहरा करुन चढल्या आवाजात बोलले.

नाही ... नाही... वारी बिरी काई नाही. उद्या आपली जवारी राखयचेचं काम कर, आत्ताच कुठ ठिकाण्यावर आला. आणि जायं म्हणी वारीला, नाही नाही वारी बिरी काही जमायची नाही...

बाजीराव पाटलांचे हे चढत्या आवाजाचे उद्‌गार एकूण तोंडापर्यंत जाणारा अन्नाचा घास स्वामींच्या हातातून कळत नकळत ताटात पडला, त्यांना माहीत होते की चुलते हे वडिलापेक्षा वयाने लहान असून त्यांच्यापुढे कुणाचेच काही चालत नाहीत. चुलत्याचा निर्णय हा अंतिम निर्णय असतो. व अगदी तसेच झाले. त्यांच्या निर्णयापुढे न आप्पासाहेब बोलले आणि न म्हाळसाई बोलल्या जेवण करुन ज्याच्या त्याच्या कामास निघून गेला इतर दिवसांपेक्षा त्या दिवशी थोडा वेळ लवकरच स्वामी घरी आले, घरी येऊन विधी नियम वाचून थोडे फार अन्न ग्रहण करुन लगेच अंथरुनावर जावून पडले . शंकर स्वामींच्या वारीचा पयार्याने शिऊरच्या वारीचा व विठ्ठल दर्शनाचाच विचार ह्याच्या बुध्दीत भ्रमण करत होता तर मन अप्रत्यक्षरीत्या शिऊरला जावून भिडले होते. वडील चुलते यांनी अत्यंत स्पष्ट असा नकार दिला आहे, दर्शनाला जाने त्या नकाराहून अधिकच गरजेचे आहे ह्याच विचारात हा शिवअवतारी महापुरुष गुंतला होता अखेर जे व्हायचे ते होईल पण आपण शिऊरला वारीला जायचेच हा निर्णय घेऊन स्वामीनी निद्राअवस्तेत प्रवेश केला दुसरा दिवस उगवला, स्वामी नेहमी प्रेमाने पहाटे बैल घेऊन शेतात गेले, बाजीरावाचे तर संपुर्ण लक्षचं होते, नित्यनियमा प्रमाणे सर्व विधि नियम आटोपला व मधल्या मार्गे शिऊरला जाण्यास पायीच निघाले. तिथे नऊ वाजता पोहचले. तिथे गेल्यावर दर्शन घेतले काही वेळ नामस्मरण केले नंतर दहेगावच्या वारकऱ्याना भेटले व सायंकाळी साडेपाचच्या सुमारास पुन्हा शेतावर हजर झाले. घरातील व्यक्ती त्यांना काहीच बोलल्या नाही. कारण त्यांचा जनार्दन त्यांना दिवसभर ज्वारी राखतांना दिसला व नेहमीप्रमाणे दुपारी लिंबाच्या झाडाखाली जेवणासही आला होता त्यामुळे त्यांना हा वारीला गेला नाही हे वाटले साहजिकच आहे, परंतु खरे जनार्दन हे खरोखर वारीलाच गेले होते. मग त्यांना असे का वाटले त्यांचे तसे वाटने बरोबर होते. कारण त्यांना दिवसभर

दिसणारा जनार्दन हा त्यांचा जनार्दन नसून साक्षात शंकर होता. परंतु जसे आशावादी माणसाला काही कळत नाही तसेच त्यांच्या घरातील व्यक्तींना काहीच कळाले नाही, मग दुसऱ्या दिवशी सदाशिवराव हे वारकरी जेव्हा आप्पासाहेबांना भेटले व म्हणाले,

'काय राव ? तुमचा जना पायी –पायीच वारीला आला होता '.

काय !

असे आश्चर्याने बाजीरावांनी विचारले, पार्वताबाईसह सर्व जन हे सारं बोलणं ऐकत होते, 'पण... तो तर दिवसभर ज्वारीच्या वावरात होता आणि दुपारी आमच्या संग जेवलाबी'. असे आश्चर्याच्या स्वरात आप्पासाहेब उद्‌गारले.

'आहो अस नाही व्हायचं तो सगळ्या वारकऱ्यांना भेटला ? काय रे जना'. ह्यावेळी स्वामी फक्त शांतचर्या करुन हसत होते.

हे अस कसं होईल ? याच विचाराने सदाशिवराव आल्या रस्त्यानं परतले तर बाजीरावसह सर्वजण विचाराच्या बुचकळ्यात पडले. अशा तऱ्हेने जो तो ज्याच्या त्याच्या कामाला निघून गेला. आता येथून पुढे खरोखर भगवान शंकराने आपले रुप प्रगट करण्यास सुरुवात केली असावी, दिवसामागून दिवस जावु लागले, घरच्यांचे लक्ष अधिकच तेज होत गेले. तर स्वामी एक एक अनुभव दाखवित गेले. असाच एक अनुभव पुन्हा त्यांनी एकदा त्यांच्या घरातील सदस्यांना दाखवुन दिला.

आपणास चांगलेच ठाऊक आहे की महाराष्ट्रात अनेक साधु संतांनी किंबहुना थोर महापुरुषांनी जन्म घेतला आहे. त्यातल्या त्यात पुणे, नगर आणि संभाजीनगर सर्वात जास्त प्रसिध्द आहे. म्हणून भगवान शिवाने देखील घृष्णेश्वराचे अस्तित्व असणाऱ्या संभाजीनगर जिल्ह्यातच अवतार घेण्याचे ठरविले असावे, अशाच या संभाजीनगर जिल्ह्यात संत एकनाथ यांनी 'पैठण' या तिर्थक्षेत्राच्या परिसरात जन्म घेऊन संत दर्शनाचा महिमा अवघ्या हिंदुस्थानाचा समजावून सांगितला. एवढेच नव्हे तर अवघ्या देशाला त्यानीच समाज प्रबोधनासाठी योग्य असे मार्गदर्शन केले, व आजही श्रीक्षेत्र पैठण एक विलोभनीय व तिर्थक्षेत्राचे ठिकाण मांडले जाते. अशाच या तिर्थक्षेत्री जाऊन एकनाथाच्या चरणाचे दर्शन घ्यावे ही प्रबळ इच्छा स्वामींना वाटली, परंतु 'पैठण' या तिर्थक्षेत्री जाण्यास घरच्यांच्या होणाऱ्या विरोध त्यांना उपजत पुर्णतः ठाऊक असल्याने घरच्यांना पैठणला जायचे आहे ? असा प्रश्न विचारुन नाही असे त्यांना कळत न कळत वाटू लागले, जसे जसे दिवस पुढे जात होते, तसे तसे ह्या 'जर्नादन' नामक तरुणास भक्तीचे अधिकच वेड लागत होते. 'घर' हे फक्त शरीराला राहण्यासाठीच एक केवळ निमित्त मात्र ठिकाण होते. मात्र मनासाठी वेगवेगळ्या ठिकाणी स्थापित झालेले तिर्थक्षेत्र पुरेशे होते. ज्या ठिकाणी मन ओढ करते त्याच ठिकाणीच मनुष्य आपल्या देहास नेण्याचा प्रयत्न करतो. ज्याच्या मनात केवळ भक्तीचे माहेर हे देवालयच होते त्याला त्याच्या माहेर घराशिवाय करमेलच कसं, अगदी तसेच स्वामींच्या मनात

बालपणापासून हे भक्तीचे वारे संचारले होते, त्यामुळे त्यांच्या भविष्यातला वेध हा नेहमीच तिर्थक्षेत्रासीच निगडीत असायचा. वारीस होणारा प्रचंड विरोध लक्षात घेऊन स्वामी एकनाथांना कसे भेटायचे याचाच विचार क्रिडेत ते मग्न राहू लागले. गावातील वारकरी मंडळी दरवर्षी पैठणला जातात, याचीही कल्पना त्यांना ठाऊक असल्याने त्यांनी एकदमच ठरवले की काही झाले तरी वारकऱ्यांसह पैठणला जायचे आणि तेही घरच्यांना न विचारता, पुर्णतः मनाशी ठरवल्याने नित्यनियमाप्रमाणे सकाळी उठून काट्या मारुतीस पाणी घातले व सांगितले की देवा मी माझं परमेश्वराचे चिंतन करण्याचे काम करतो, तु मात्र माझी चिंता करायचे काम कर अशी सर्व जबाबदारी परमेश्वरावर टाकून स्वामी गावातील वारकऱ्यांसह पैठणला निघाले, तेथे गेले तर त्यांच्या वडीलांना त्यांचा मुलगा जनार्दन हा तिथे एकनाथाचे दर्शन घेतांना दिसला, त्या वारीस अचानक जाण्याची इच्छा आप्पासाहेबांना झाल्याने ते नंतरच्या गाडीने पैठणला आले होते. त्यांनी स्वामींना बघीतल्यावर डोक्याला हात लावून विचार केला, की मी जेव्हा निघालो तेव्हा हा मोट हाकीत होता, आता हा इथे कसा ? ही कदाचित रुप प्रगट करण्याचीच स्वतः भगवंताचीच इच्छा असावी. अत्यंत चपळाईने मुखातून शब्द उच्चारून आप्पांनी विचारले, 'काय रे ? तु इथे कसा '

तेव्हा फक्त 'हा' म्हणून स्वामी हसत हसत एकनाथांना निरोप देवून निघून गेले. तद्नंतर घाई घाईत दर्शन घेवून आप्पासाहेबांनी दहेगांवी येण्यास गाडी पकडली व दहेगांव वेशीत येवून उतरले व लगबग घाईने घराकडे काढता पाय घेतला, सायंकाळी सहा-साडेसहा वाजेचा समय झाला असावा आप्पासाहेबांना मनोमन वाटले की हा अजुन घरी आला नसेल घरी येताच त्यांनी घरासमोर नजर फिरवली व जागीच शांत होऊन बसले कारण सकाळी ज्या कपड्यांमध्ये स्वामींना मोट हाकतांना त्यांनी बघितले होते त्याच कपड्यांमध्ये ते ह्या वेळी करड्या रंगाचे गाईचे चरवी घेवून दूध काढतांना दिसले, आप्पासाहेबांना अंगणात इतके शांत बसल्याचे बघून म्हाळसाई व बाजीरावांना थोडे विशेषच वाटले म्हणून त्यांना आप्पांना विचारले,

'काय झाले ?'

अरे हा जना आज दिवसभर काय करीत होता ?

हा प्रश्न त्यांनी विचारला. त्यावर बाजीराव उत्तरले,

'अरे आज तर त्याने खुप काम केले, सकाळपासून बसला सुध्दा नाही'

हे उद्‌गार ऐकूण आप्पांना पुसटशी वेगळीच जाणीव झाली त्यांना आता पुरेपुर वाटले की हा सर्वसामान्य मुलगा नाही हा कुणीतरी वेगळाच अवतार आहे. 'पण तुम्ही असं का विचारलं असं म्हाळसाईने विचाराले'. 'काही नाही सहजच' असे म्हणत आप्पांनी गृहप्रवेश केला, या प्रियदर्शनी वेळी स्वामी केवळ हसतच होते यापुढे स्वामींनी हळुहळू अवतार प्रगट करण्यास सुरुवात केली व तिर्थक्षेत्री जावून पवित्र करण्यासही सुरुवात केली.

त्यानंतर आप्पासाहेबांनी त्यांना भक्तीत अडथळा आणण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. दिवसेंदिवस भक्तीची ओढ लागल्याने त्यांना आता घरातील व्यक्तीही परक्या वाटू लागल्या. आता भक्तीशिवाय दुसरे काहीच सुचत नव्हते. बाण लावलेल्या अर्जुनास जसे माशाच्या डोळ्याशिवाय दुसरे काहीच दिसत नव्हते तसेच या तरुण जनार्दनाला भक्तीशिवाय दुसरे काहीच दिसत नव्हते, वडीलांचा जरी आता देवांच्या भक्तीसाठी फारसा विरोध नसला तरी चुलत्याचा मात्र प्रखर विरोध होता, शिवाय घरात इच्छेविरुद्द नजरेस पडणारी व नुसती नावाला पार्वताबाई असणारी पत्नी, याचा स्वामींना वीट आला होता म्हणून दुसरीकडे जाण्याचा विचार त्यांनी मनात आणला व लवकरच त्यावर उपाय ही सापडला. त्यांनी आत्याच्या आता गावी म्हणजे कौठखेडे येथे जाण्याचा निर्णय घेतला. अशा विचारात डुबलेल्या मनाने त्यांनी आईस विचारले, 'बाई मी काही दिवसांसाठी आत्याच्या घरी जातो' थोडा वातावरणात व वागण्यात बदल होईल या विचाराने म्हाळसाई सह घरातील सर्वांनी परवानगी दिली. हसऱ्या चेहऱ्याने आत्याचे घर गाठले, एवढ्या दिवसातुन आज प्रथमच भाचा घरी आल्याने योग्य अशा रीतीने स्वामीचे स्वागत केले. किती धन्य असेल ती माता की तिच्या घरी साक्षात भगवान काही दिवसांसाठी राहिला आहे, पण मनुष्याला देह मिळाला कळला मात्र नाही याच उक्तीप्रमाणे तिला स्वामीचा अवतार कळलाच नाही. पाहुणा आला या नात्याने सुरुवातीचे दोन चार दिवस फार सन्मानाने त्यांनी स्वामींना वागवले पण पाहुणा चार दिवसांपेक्षा जास्त दिवस घरी आला तर घरातील व्यक्तीपेक्षाही त्याचा मान कमी होतो हा ही एक निसर्ग नियम आहे याच नियमानुसार आत्यालाही हा पाहुणा म्हणून आलेल्या भाच्याचा कंटाळा येवू लागला, स्वामी पाहुणे म्हणून जरी आत्याच्या घरी गेले असले तरी त्यांनी त्यांची विधी सोबत नेलेली होती. स्वामींनी तिथेही त्यांचा नित्यक्रम सोडला नाही व आत्याला कधीच घरकामात मदत करण्याचे टाळले नाही. त्यांनी काम भक्ती याचा सातत्याने विचार केला. सकाळी ब्रम्हमुहूर्तावर उठणे, गावातील देवालयात जावून देवाला पाणी घालने, त्यानंतर त्याही गावाला एक प्रभात फेरी मारणे, दोन तास गीता विधी नित्यनियमाने वाचणे, दिवसभर मामांबरोबर (आत्यांच्या पतीबरोबर) शेतात काम करणे, घरी आल्यावर गुरांना चारा घालणे, स्नान करुन पुन्हा विधी आरती म्हणने, त्यानंतर जेवण करुन आत्याला दळण कांडुन देणे, घरातील झाडलोट करणे, अंगण गोमातेच्या शेणाने सारवुन स्वच्छ करणे, नित्य रोज तुळशीला पाणी घालणे या सारखे सर्व काम झाल्यावर गावात भजन किर्तन ऐकायला जाणे, वारकरी संप्रादयातील लोकांजवळ बसून देवाविषयीची माहिती घेणे, माहिती देणे असा दिवसभराचा उपक्रम त्यांचा चाललेला होता. इतके सत्कार्य करुनही त्यांना त्यांचा पुसटसा कंटाळा आलेला होता, परंतु त्यांनी आतापर्यंत भाच्याला एक शब्दानेही दुखावले नव्हते, मात्र भाच्याच्या देवांचा खुपच कंटाळा आलेला होता, स्वामींना येवून आता पुर्ण तिन आठवडे झाले होते. त्यांच्या भक्तीचा ओहोळ अवघ्या कौठखेडे गावाला प्रदक्षिणा

मारून पूर्ण झाला होता. याच दरम्यान स्वामींना नारुचा त्रास झाला होता. संपुर्ण गावात ते एक बाबा म्हणून प्रसिध्द झाले. गावाने त्यांची प्रशंसा करुन त्यांची वाहवा करणेस सुरुवात केली होती, पण तितक्यात आत्याने त्यांच्या वागण्याविषयी अधूनमधून कुरकुर सुरु केली होती. ज्या ठिकाणी स्वामी जात होते, त्या ठिकाणी ते भक्तीविषयी आतोनात ज्ञान घेत होते व ज्ञान घेता घेता ते ज्ञान देण्याचे ही काम करीत होते व जेथे ज्ञानाची गंगा घरोघरी पोहचली, की नेमके घरात काहीतरी कारण निर्माण व्हायचे व स्वामी ते गांव सोडून निघून जायचे. पण एकदा जर त्यांनी त्या गावास निरोप दिला तर पुन्हा ते त्या गावात कधीच परत जात नव्हते. अशीच हाकाटी नेमकी कौटखेडे या गावातही घडली. भक्तीचा दिवा त्यांनी अवघ्या कौटखेड्यातही घराघरांत लावला, सर्वांकडे ज्ञानाचा प्रकाश दिसू लागला, जो तो धर्माच्या , भक्तीच्या दिव्याच्या प्रकाशाने उजळू लागला व नेमके तेव्हाच स्वामीची आत्या स्वामींना त्यांच्या दिनश्चर्येबद्दल काहीतरी बोलली एवढे काम करुन ही आत्या बोलल्या स्वामींचे मन आतल्याआत छिन्नविच्छीन्न झाले. त्यांनी या परमार्थासाठी खुप जणांचे बोलणे ऐकले, अपमानाने तर कळसच गाठला. मनाची त्राही त्राही झाल्यानंतर त्यांनी खुप हालाखीच्या परिस्थीतीचाही स्विकार केला होता. एवढे करुनही त्यांनी भक्तीचा मार्ग पुढे निरंतर चालुच ठेवला होता. जवळचे रक्ताचे नाते कधी कधी कसे दुर जातात हेच या सृष्टीतील मानव प्राण्यास कळत नाही. आपलीच माणसे आपल्यापासून का दुरावतात हेच कळत नाही. नंतर आपलीच माणसं आपल्यापासून कितीही दूर गेली तरी ही ती आपलीच असतात असंच का वाटतं. असो स्वामीच्या जिवनात घरच्यांचे व नातेवाईकांचे प्रेम दुरुनच हुलकावण्या देवून निघून जात होते. याची जाणीव मात्र त्यांना पदोपदी वाटत होती, आपल्याच व्यक्तींनी आपणास परकेपणा का दाखववा ? किंबहुना आपल्या वाटणाऱ्या व्यक्तींनी आपला परके म्हणूनच का स्विकार करावा ? याच विचाराने त्यांना कौटखेडे सोडायला लावले व दहेगांव शेजारी अर्थात दहेगांवापासून पूर्वेस दोन मैल अंतरावर बोर नदीच्या तिरावर वसलेल्या छोट्याश्या करंज गावी जाण्यास भाग पाडले, करंजगाव हे स्वामींची कर्मभूमी स्थान म्हणून जगप्रसिध्द आहे. आजही ते ठिकाण स्वामींची सर्वप्रथमची कर्मभूमी म्हणून स्वामींच्या भक्तीच्या मनात अजरामर आहे. करंजगाव तसे क्षेत्रफळाच्या दृष्टीने खुप छोटेसे आहे व तेथील लोकसंख्याही क्षेत्रफळाला साजेशी एवढीच आहे. स्वामींनी ऐन तारुण्यात कौटखेड्यास भक्तीचा दिवा पेटवून आनंदाने निरोप दिला व करंज गावास प्रेमाने साष्टांग नमस्कार केला. सायंकाळच्या रम्य अशा वातावरणात त्यांनी करंजगावच्या शिवात पाय टाकून प्रवेश केला. प्रवेश करतेवेळी सुर्यासह रात्रीच्या काळोखात चकाकणाऱ्या काजव्यांनीही स्वामींच्या देहाचे मनोभावाने स्वागत केले स्वामींच्या मनात काही सेकंदात भक्तीचे वादळ संचारले मनाच संचारलेल्या वादळ काही क्षणात द्रवरुप झाले व द्रवरुप होऊन अवघ्या करंजगावाचा समाचार घेऊन आले. स्वामींनी तेथे एखाद्या मोठ्या माणसाच्या घरी शेती

काम करण्याचे ठरवले व काम करता करता शेतात भक्तीचे रोपटे लावण्याचे ठरवीले व त्या रोपट्यास भरपूर भक्तीचे खतपाणी घालायचे व त्यास येणाऱ्या प्रत्येक फुलातून अवघे गावचं भक्तीत फुलवायचे ठरविले. प्रथम दिवशी स्वामींनी गावातील मारुतीच्या मंदिरात मुक्काम केला. सर्व मनातील आशा आकांक्षा त्यांना जणु काय त्या ब्रह्मचारी अंजनी सुतास सांगुन टाकायचे होते की काय कुणास ठाऊक परंतु स्वामींजीनी प्रथमचा मुक्काम हा हनुमानाच्या मंदिरात केला. माणिक शेठ नावाचे एक श्रीमंत भाग्यवान सद्गृहस्थ तेथे राहात होते, त्यांना भरपूर जमीन होती ते वाणी असल्याने त्यांचा दुकानाचाही धंदा होता. इ.स. १९२८ च्या पासपास स्वामी फिरत फिरत त्यांच्या घरी गेले व म्हटले,

'रामराम शेठजी'

'कोण हवंय तुम्हाला', असा प्रतिप्रश्न माणिक शेठने विचारला.

'मला काम हवंय'.

केवळ एवढेच प्रतिउत्तर स्वामींनी त्यास दिले.

काय काम करशील रे...

'सांगाल ते काम करीन.'

मग आजपासून सर्व शेतीची कामे तुझ्याकडे.

असं म्हणून माणिक शेठने स्वामींना शेतावर नेले. शेतीजवळच त्याचे घर होते व शेजारी एक झोपडी होती, स्वामींचे निवासस्थान त्या झोपडीतच होते, सर्वप्रथम स्वामींनी ती झोपडी व्यवस्थीत साफ केली त्यानंतर त्यांची विधी व गिता उजव्या कोपऱ्यात ठेवली व आवरासावर करुन माणिक शेठबरोबर शेतीचा परिसर बघितला. माणिकशेठ हे स्वभावाने अत्यंत मायाळू होते माणसे ओळखण्याची पारख त्यांच्यात जबरदस्त होती. हा कुणीतरी असामान्य व्यक्ती आहे हे त्यांच्या काही दिवसातच लक्षात आले, त्यांच्या प्रेमाने अखेर हे सिध्द करुन दिले का कधी कधी रक्ताच्या नात्यापेक्षा परकीय व्यक्ती जास्त कामात येत असते, नंतर त्यांनी स्वामींना सकाळी मोटेने पाणी भरण्यास सांगितले त्यानंतर शेतीत नांगरण,वखरणे, कोळपणे सांगितले सायंकाळी गुराढोराचे आवरुन रात्री खळ्यांमध्ये (शेताच्या विशिष्ट जागेत आपण पीक साठवतो) पिकाचे राखण करण्यास सांगितले. सर्व सुचना योग्य रितीने ऐकल्यानंतर स्वामींनी दुसऱ्या दिवसापासून नित्यक्रम करुन कामास सुरुवात केली. सर्व काम अत्यंत व्यवस्थित होत असल्याचे बघून माणिक शेठला मनोमन खुप आनंद झाला. त्यांना वाटले की इतके सुरळीत काम होतात तरी कसे म्हणून त्यांनी एक संपुर्ण दिवस स्वामींचे काम बघण्याचे ठरवले, त्या दिवशी पहाटे चार वाजता माणिकशेठ जागे झाले होते. आता मालकाने स्वतः भगवान शिवाचे काम बघण्याचे ठरविले होते, त्यांनी बघितले साडेचार वाजता स्वामी बैल घेऊन शेतावर गेले, तेथे बैलांना चारण्यास सोडले, स्वतःने विहीरीवर जाऊन स्नान केले स्नान झाल्यावर तांब्याभर पाणी घेऊन गावातील

मारुतीस वाहिले, तद्नंतर संपुर्ण गावाला एक प्रदक्षिणा हात जोडून घातली, त्यानंतर मोटेला बैल जुंपले व मोटेने पाणी शेतात जाता जाता विधी, आरती म्हणण्यास सुरुवात केली. माणिक शेठला हे बघून स्वामींचा अभिमान वाटला, की हा मनुष्य पाणी भरता भरता विधी वाचतो म्हणजे बाहेर पडणारे पाणी त्या विधीने किती पवित्र होत असेल व त्या पवित्र पाण्याने निघणारे पिक किती अलौकीक प्रतिचे असेल याची प्रचिती शेठला यावेळी आली. स्वामीचे कार्य ते पुढे बघतच होते पाणी भरून झाल्यावर स्वामी गुरांना चारा घालत व स्वतःही जेवन करत तद्नंतर ते मात्र ते पुन्हा शेतीतील नांगरनी वखरनी करत व दुपारी थंड पाण्याने स्नान करत असत, सायंकाळ झाली की गुरं ढोरं घेवून घरी परतत, थोडी पार ते गाईची सेवा करत नंतर गुरांना चारा वैरण करुन स्नानास जात, स्नान संध्या आटोपून पुन्हा पुजा विधी करत असत, पुन्हा जेवण करुन शेतातील पिक राखण्यास निघून जात. एवढी स्वामीची दिनश्चर्या पाहून माणिक शेठ गहिवरले त्यांच्या मनात स्वामींच्या व्यक्तीमहत्वाविषयीचा मायेचा पाझर फुटला व सर्वीकडे माया, ममता, प्रेम, आस्था, जिव्हाळा, याचीच जाणीव होऊ लागली कारण माणिक शेठही हे एक दैवध्यानी ग्रहस्थ होते, ते देवावर विसंबुन होते असे म्हणले तरी वावगे ठरणार नाही, प्रत्येक आषाढी एकादशीला ते पंढरपुरला जात असत, असेच एकदा झाले दोन दिवसांवर आषाढी एकादशी राहिली असेल, माणिक शेठने स्वामींसह सर्व गड्यांना बजावुन सांगितले मी दोन दिवस पंढरपुरला जात आहे, तरी पण नीट व्यवस्थीत ज्याचे त्याचे काम करा, देवघरातील पत्नीस व मुलासही कामावर नीट लक्ष ठेवण्यास सांगितले व सायंकाळी पंढरपुरला निघून गेले. पंढरपुरचे नुसते नांव ऐकताच स्वामीजींच्या हृदय कमलातून विठ्ठलाच्या दर्शनासाठी आतुर झालेली सर्व भक्तीचे फुलं उमलली व उमललेल्या फुलातून केवळ विठ्ठलाची प्रतिमा साकार झाली. त्यांना वाटले की शेठला विचारावे मलाही येऊ द्या पंढरीला पणं नुकतेच कामाला लागलेले असल्याने विचारण्याची हिंमत झाली नाही, रात्रभर अंथरुणावर पंढरपुरचा विचार करत स्वामी पडले होते, शेवटी पंढरपुरला जायचेच हे निश्चित केले मग काहीही होवो हा प्रश्न त्यांच्या मनात उपस्थितच झाला नाही. नेहमी प्रमाणे आजही मनात आणले , आपले काम आपण करावे त्याचं काम तो बरोबर करुन घेतो या विचाराने मारुतीस पाणी घालून स्वामी पंढरपुराला निघाले, व पोहचलेही.

तिथं माणिकशेठ चंद्रभागेतून स्नान करुन दर्शनाला जाणारच होते, स्नान झाल्यावर पुडलीकाचे दर्शन घेतले, संत नामदेवांचे दर्शन घेऊन वर मान करणार तितक्यात त्यांना स्वामी विठ्ठलाचे दर्शन घेऊन परततांना दिसले, स्वामींना बघून माणिकशेठ तिथेच नामदेवाजवळ बसले, त्यांच्या मनात काय परिस्थिती निर्माण झाली असेल याचे काय वर्णन करु, त्यांच्या मनात त्यांच्या विषयीच्या इतक्या भयंकर आश्चर्याच्या लाटा निर्माण झाल्या. की त्या लाटांची बरोबरी चंद्रग्रहणाच्या वेळी भरती झालेल्या सागराच्या लाटाही करु शकत

नव्हत्या. 'तु इथं कसा' ? हा प्रश्न शेठ विचारणार तितक्यात स्वामी दिसेनासे झाले.

'हा....कसा... काय... चमत्कार... झाला' असे अस्पष्ट उद्‌गार काढताच माणिक शेठ विठ्ठलाच्या मंदिरात घुसले व मनात असंख्य प्रश्नाचं जाळं घेऊन करंजगावाकडे रवाना झाले. कधी एकदा करंजगाव येईल व मी कधी एकदा घरी जाऊन त्याला भेटेल असेच त्यावेळी माणिक शेठला वाटत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी दहा वाजता माणिक शेठ करंजगावी पोहचले, घरी गेल्यावर बघीतले तर पत्नी मुलांसह शेतात गेलेली होती. जाऊन बघताच स्वामी नांगर चालवीत होते, दोन दिवस अपेक्षेपेक्षा ज़ास्त शेत नांगरले होते, गेल्या गेल्या त्यांनी पत्नीला विचारले,

काय गं , जनार्दनांनी कालपरवा काय काम केले,

पत्नी सौम्य आवाजात स्वामींकडे बघत बोलल्या,

'परवाच्या दिवशी सर्व मुंग शेतातून मळ्यात आणला आणि कालच्या दिवशी एवढे वावर नांगरले.

पत्नीचे हे सौम्यपणे भरवश्याचे उद्‌गार ऐकून माणिकराव भांबावले व पाणी द्या प्यायला असे म्हणून तिथेच बसले व पाणी पिल्यानंतर त्यांनी क्षण भर विचार केला मनात आलेल्या विचारांनी त्यांना एवढेच सांगितले की हा कोणी सर्वसामान्य मनुष्य नसून एक असामान्य योगी आहे. या दिवसापासून माणिक शेठने जणु काय खुप काही शिक्षण अवगत केले व तेव्हा पासून त्यांनी स्वामींना काम कमी सांगिण्यासही सुरुवात केली. स्वामी जेव्हा काम करत तेव्हा माणिकशेठला त्यांच्या विषयी वेगळेच कुतूहल वाटायचे व मनात असेल नसेल तेवढ्या शंका निर्माण व्हायच्या काय करावे नि काय नाही करावे हाच प्रश्न त्यांना नेहमी व्हायचा त्या करता त्यांनी एक सखोल परीक्षा घेण्याचे ठरविले. आता मात्र स्वामींना त्यांच्या घरी येऊन बरेचसे दिवस झाले होते, त्यादिवशी कार्तिक अमावस्या होती, त्या अमावस्यानिमित्ताने गावात एक कीर्तन ठेवले होते, माणिकशेठने ते कीर्तन त्यांच्या शेताजवळ ठेवले , किर्तनाचे ठिकाण हे जाणून बुजून खळ्याजवळ ठेवले व खळ्यात स्वामींना तुर राखण्यास लावले त्यांना माहित होते की स्वामी किर्तनाला आल्याखेरीज राहणार नाही, म्हणून त्यांनी तेथेच कीर्तन ठेवले, किर्तन सुरु झाले, सेवेसाठी महाराजांनी जगदवंदनीय जगद्‌गुरु संत शिरोमणी तुकोबा महाराजांचा अभंग निवडला,

**कवणाचे माय बाप**
**कवणाचे गणगोत**
**अभ्राची माया जाईल लया**
**मृगजळ वत जाईल लया ।।**

हा अभंग स्वामींच्या जिवनाला साजेसाच होता, अभंगातील ओव्याचा अर्थ मनात करुन स्वामींच्या जिवनाशी लावण्याचा प्रयत्न करा तुम्हांला आपोआप लक्षात येईल. दोन

टाळकऱ्यांनी अभंगास सुर लावला किर्तनकार महाराजांनी उपरने कमरेस गुंढाळून अभंग म्हटला म्हटलेला अभंग वाऱ्यासरशी स्वामीच्या कानात जावून बसला, संपूर्ण मनात फिरून बुध्दीत शिरला केवळ भक्तीचाच मळा आता त्या सुपीक बुध्दीत फुलत असल्याने स्वामीनी तुर धान्य असलेले खळे सोडले व माणिकशेठ न बघीतल्यामुळे चक्क त्यांच्या पुढे जावून बसले. मात्र माणिकशेठला पुर्ण कळाले. त्यांनी त्यांना ओळखलेही व जोरात आवाज दिला

'जनार्दन'

लगेचच दुसरा जनार्दन खळ्यातून आला. त्यांच्या समोर बसलेल्या जनार्दनाने त्यांच्याकडे बघितलेही नाही. ते त्यांचे किर्तन ऐकण्यात मग्न होते. उलट खळ्यातून तुर राखणारा दुसराच जनार्दन माणिकशेठकडे पळत आला. शेठने आता एक व्यक्ती एकाच वेळी दोन स्वरुपात बघितल्या त्यांच्या मनात काय वादळ निर्माण झाले असेल त्यांचे वर्णन आता तुम्ही 'शांतीचे फुलं' वाचता वाचता करा. म्हणजे दैव काय भानगड आहे हे तुमच्या लक्षात आल्या खेरीज राहणार नाही. त्यानंतर मात्र त्यांनी स्वामींना दैवच मानले. स्वामीही दैवअवतारी पुरुष आहे हे ओळखणारी सर्व प्रथमची व्यक्ती म्हणजे माणिकशेठ होय व तेथून पुढे माणिकशेठ हे त्यांना जास्त काम करण्यास सांगत नव्हते पण स्वतःहून शिऊरच्या वारीस ते स्वामींना बरोबर नेऊ लागले होते कुठेही कीर्तन असले की स्वामींना बरोबर नेत असत तेव्हा पासून स्वामींकडून ते जास्तीजास्त भक्तीविषयीची व दैवाविषयीची माहिती विचारत असे स्वामींना माणिकशेठ सारख्या श्रीमंत व्यक्ती बरोबर राहत असल्याचे बघून गावातील लोकांमध्ये त्यांच्याविषयीची वेगळीच वाटु लागली. स्वामींना सर्व प्रथम बाबाजी म्हणून हाक मारणारी पहिली व्यक्ती म्हणजे माणिकशेठ हीच होय. माणिकशेठ सारखी श्रीमंत व्यक्ती त्यांना बाबजी म्हणतात हे बघून अवघे करंजगांव स्वामींना बाबाजी म्हणू लागले. व बाबाजी याच नावाने ओळखू ही लागले, माणिकशेठ प्रत्येक कार्यक्रमात अथवा भजन, प्रवचनात स्वामींना बरोबर नेऊ लागले, मालक आपल्याला मानतो म्हणून काम करु नये, ही विचार सरणी मात्र स्वामींची न्वहती, मालकाशी कामचुकारपणा करावा ही भावना स्वामींच्या मनात कधीच निर्माण झाली नाही. मालकाने कितीही मनोभानेने आपणास वागविले, किंबहुना आपणास काम कमी करण्यास सांगितले म्हणून कमी काम करावे, कामात कामचुकारपणा करावा अथवा मजेत दिवस घालवावे या भूमिकेत स्वामी कधीच करंजगांव येथील माणिकराव यांच्या रंगमंचावर वावरले नाही, उलट आपल्या भक्तीची ध्वजा त्यांनी तेथे चोख बजावली. स्वामींना करंजगावात येवून आता तीन चार वर्ष पूर्ण होत आले होते. स्वामींच्या मनात आतापर्यंत तरी करंजगावाबद्ल काहीच आगळंवेगळं आलेलं नव्हतं. कुठेही भजनाला, किर्तनाला, माणिकशेठ बरोबर जाणे हे आता नेहमीचे झाले असल्याने स्वामी त्यांचेबरोबर आता प्रत्येक यात्रेस जाऊ लागले. एकदा शिऊरची वारी आली. स्वामींना त्या वारीत जाण्याची नेहमी प्रमाणेच इच्छा निर्माण झाली व माणिकशेठ ही त्यांना घेऊन जात असल्याने

स्वामींना माणिकरावांना वारी बद्दल विचारण्याची गरज पडली नाही. वारीला जाणे हे वारकरी संप्रदयाचे प्रमुख लक्षण आहे, अर्थातच तेथे शिऊरला वारकरी पंथाचे सदस्य जमा झालेले होते, स्वामी जर शिवअवतारी असले तरी पण ते वारकरी संप्रदयाला अपेक्षेपेक्षा जास्त मान देत होते. जेव्हा स्वामी शेठसह शिऊरला गेले तेव्हा तेथे त्यांची भेट ह.भ.प. लक्ष्मणबुवा वागळीकर यांच्याशी झाली. ह.भ.प. लक्ष्मणबुवा वागळीकर महाराज हे त्यावेळी त्या पंचक्रोशीत फार विद्वान प्रवचनकार व किर्तनकार म्हणून प्रसिध्द होते, त्यांचा हात धरणारी दुसरी व्यक्ती या वारकरी सांप्रदयात शोधून सापडणार नाही, सर्व ज्ञानी अशा वारकरी महाराजांची भेट झाल्याने स्वामींना त्या भक्ती ज्ञानाचे ज्ञान देण्यासाठी जणू काय परमेश्वरच भेटला, अशीच धारणा आपणास करावी लागेल व जेव्हा स्वामींची व लक्ष्मणबुवांची समोरा समोर भेट झाली तेव्हा मात्र असंख्य भक्तीचे दिवे नव्या वातीला उजेड तयार करुन प्रकाश देण्यासाठी तल्लीन झाल्या, अशीच कल्पना स्वामींना वाटु लागली. लक्ष्मणबुवांकडून सर्व प्रथम वारकरी सांप्रदयाचा गुरु मंत्र स्वामींनी ग्रहण करुन आत्मसात केला. स्वामींच्या भक्तीमय जिवनाचे सर्वात प्रथमचे गुरु म्हणजे लक्ष्मण बुवा वागळीकर महाराज. स्वामींनी त्यांना गुरु केल्यानंतर त्यांच्याकडुन असेल नसेल तेवढी भक्तीची व धार्मिक कार्याची शिदोरी घेतली, तीच शिदोरी त्यांना जन्मोजन्मा पर्यंत पुरक ठरली व आजही शांतीच्या फुलात लिहिण्या इतकी पुरली. कारण ती लक्ष्मणबुवांनी दिलेली शिदोरी ही साधीसुधी शिदोरी नव्हती, तो एक गुरुंचा महाप्रसाद होता तो एक गुरुने दिलेला आशिर्वाद होता. भविष्यात मनुष्याच्या विलासीन, आशेसाठी सर्व काही कमी पडते परंतु गुरुंनी दिलेला आशिर्वाद कधीच कमी पडत नाही. व त्या आशिर्वादाचे मोलही करता येत नाही. असा भव्य दिव्य आशिर्वाद स्वामींना लक्ष्मणबुवा वागळीकर यांनी एका गुरुच्या स्वरुपात दिला. खरंतर स्वामींनी भक्तीची सुरुवात लक्ष्मणबुवांनी दिलेल्या मुळाक्षरांनीच केली. स्वामींना दोन स्वरुपात बघण्याचा योग सर्वप्रथम माणिकशेठलाच आला वआत्ताही स्वामींनी गुरु केले त्या गुरु स्वामींसारख्या शिष्या सोबत बघण्याचा ही योग माणिक शेठलाच आला, आत्ता एक गुरु प्राप्त शिष्य भक्तीची आराधना करुन बनवलेली धार्मिकतेची पताका रोवण्यासाठी एका साध्या कामगाराच्या स्वरुपात माणिकरावां बरोबर करंजगांवात दाखल झाला. स्वामींनी देवदेव तर केलेच पण घाम गाळेपर्यंत कष्ट ही केले. हे आजच्या एकोणीसाव्या शतकातील तरुण पिढीस विलोभनीय वाटण्यासारखेच आहे. म्हणूनच स्वामींनी त्यांच्या जीवनाच्या व्याख्येत आई-भक्ती-श्रम (काम) यांना अत्यंत महत्व दिले आहे. भक्ती तर करायचीच होती पण काम करुन शक्तीही मिळवायची होती. तारुण्याचे लक्षण हे घाम गळेपर्यंत कष्ट करणे आहे. हे स्वामींनी आजच्या तरुणांना जणू काय उघड उघड दाखवून दिले, बालपण हे भविष्यातील देहाचे बाळकडू पिण्याचे असते, तर तारुण्य हे घाम गळेपर्यंत कष्ट करण्याचे असते हेच स्वामींनी आत्ता दाखवून दिले, म्हणून स्वामींना श्रमदान फारच आवडते. गुरु दिक्षा घेऊन ती सर्वांना वाटण्यासाठी हा शिवअवतारी

शिष्य आता माणिकशेठ सह त्यांच्या निवासस्थानी सुखरुप येवून पोहचला होता. माणिकशेठ आता तर स्वामींना साक्षात परमेश्वरच मानु लागले होते. कारण त्यांच्या लक्षात आले होते की स्वामींचा उपवास हा अत्यंत कडक असतो. ते उपवासाच्या दिवशी फराळ तर दुरच पण पाणी देखील घेत नसत, व एवढ्या उपाशीपोटी दिवसभरचा नित्यक्रम तर सुरुच असायचा पण शेतात काम करणे ही चालु असायचे. स्वामींची ईश्वर भक्ती बघून माणिकशेठ गहीवरून गेले, असेच दिवस निघून जाऊ लागले. अशाच काळात एक विलक्षण घटना त्या कर्मभूमीत घडली. १९३१-३२ मध्ये जुलै-ऑगस्टच्या दरम्यानच्या कालखंडातील तो दिवस असावा. परंतु तो उगवणारा दिवस कसा असेल हे देवच जाणोत. दुपराची वेळ होती. स्वामींनी नांगर सोडल व बैलांना सावलीत बांधून स्वामी दुपारच्या स्नानासाठी विहिरीवर गेले. स्वामींचा स्नानबद्दल एक नियम होता ते १०० मंत्राचा जप झाल्याखेरीज पाण्याबाहेर कधीच निघत नव्हते. त्यादिवशीही तसेच झाले. माणिकशेठच्या विहीरीवरील इंजिन स्वामींनी चालु केले. विहीरीतील पाणी पाईपाद्वारे त्या थारोळ्यात धो धो आवाज करत बाहेर पडत होतं. स्वामींनी त्यांचा उजवा पाय पाण्यात बुडवून थारोळ्यात प्रवेश करुन स्नानास सुरवात केली. पण त्याचक्षणी अचानक वातावरण बदलले गेले. सुर्यदेवता ढगाआडे निघून गेली. माणिकशेठच्या शेतातील हिरवीगार ज्वारी वातावरणाचा रंग बघण्यास मग्न झाली. अचानक अंत:करण दाटुन यावे तसा हवेत गारवा दाटून आला. विलक्षण बदल त्या परिसरात निसर्गाने घडवून आणला होता. आकाशात दामिनी चमकावी व कुठेतरी धरतीवर कडाकड आवाज करुन पडावी तशी थंडी त्या पंचक्रोशीत पडली सर्वत्र हिव पडलं... हिव पडलं असाच ध्वनी येऊ लागला होता. हिरव्या गार पानांनी मढलेली ती ज्वारी काही क्षणात भुईसपाट झाली. अशा वातावरणात माणिकशेठचे इंजिन टकटक आवाज करीत स्वामींना स्ना घालत होते. मंत्र पठणाचे कार्य चालुच होते. काही क्षणानंतर वातावरण पुन्हा जसेच्या तसे झाले व त्याचवेळी स्वामींचे स्नानही पूर्ण झाले. स्वामींची डोळे उघडून बघितले तर सर्व ज्वारी धरतीच्या कुशीत पडून रडत होती. स्वामींना फार दु:ख झाले. त्यानंतर त्यांनी उठण्याचा प्रयत्न केला तर त्यांच्या लक्षात आले की त्यांचा एक पाय हा कायमचाच निकामी झाला होता. परंतु स्वामींना त्याचे काहीही दु:ख झाले नाही उलट त्यांना आनंद झाला कारण त्यांचा एक पाय जरी निकामी झाला असला तरीपण त्यांनी सावलती बांधलेल्या बैलांना काहीही झालेले नव्हते. बैलं बघून स्वामींना आनंद झाला व तसेच ते एका पायाच्या आधारावर झाडाखाली गेले.

माणिकशेठ थंडी गेल्यावर शेतात स्वामींना बघण्यासाठी आले तेव्हा स्वामींना झाडाखाली बघून आनंद झाला. मात्र स्वामींचा पाय गेल्याचे कळल्यावर पराकोटीचे दु:ख झाले. त्यानंतरही स्वामी काम करत होते व अशातच दिवस निघून जात होते.

पण सन १९३२-३३ च्या वर्षाचा डिसेंबरचा महिना असावा सहा सात वर्षाची

भूमिका करंजगावात पार पाडल्यानंतर स्वामींना अचानक करंजगांव सोडावेसे वाटले, तेथे कार्याचा महिमा पूर्ण झाला. जेथे कार्याची ध्वजा फडकवली गेली तेथे अवताराचे अस्तित्व संपले, तेथे निरोप घेवून पुढील गावात पुढील ठिकाणी आपल्या कार्याचा महिमा गावा, तेथे आपली धर्माची ध्वजा फडकवावी, तेथे आपली भक्तीची बीजे रुजवावी. तेथे भक्तीचा आराखडा आखावा अशीच भूमिका या शिवअवतारी स्वामी जनार्दनांची होती. त्यांनी हा... हा... म्हणता अवघे करंजगाव आता भक्तीच्या प्रकाशाने उजळवले होते. माणिकशेठ नामक निमित्तमात्र व्यक्तीच्या शेतात , काम करुन भक्तीची फुले उगवून किंबहुना फुलवून अवघे करंजगांव त्यांनी भक्तीच्या फुलांच्या सुवासाने मोहकून टाकले होते. एवढेच नव्हे तर मनुष्याने जन्मास आल्यावर तारुण्यात घाम गळेपर्यंत कष्ट करावे याची जाणीव ही नुकतीच करंजगांवातील नव्हे तर अवघ्या विश्वातील तरुणांना करु दिली. माणिकशेठ नामक निमित्त मात्र मनुष्याच्या घरी काम करुन हिंदवी धर्माची ती दैववान ध्वजा ह्या देवअवतारी महापुरुषाने आता करंजगावी रोवली होती. व पुन्हा मायगावी जाण्याची तयारी ही केली होती. दिनांक २५ डिसेंबर १९३२ मध्यें त्यांनी करंजगांव सोडण्याचा मनाशी पुर्णतः विचार केला व स्वामी माणिकरावांना म्हणाले,

'मला जाण्याची परवानगी द्या मालक',

म्हणजे ?

शेठजींनी आश्चर्याने विचारले.

'मला आता माझ्या गावाला परत जावयाचे आहे.'

अत्यंत साध्या शब्दात स्वामी बोलले .

का ?

माझं इथलं काम संपले, आता पुढचे काम करायला पाहिजे, कसं हाय मालक आपण आपलं काम करावं देव त्याचं त्याचं सांभाळून घेतो.'

स्वामींचे शांत, दमदार, विलोभनीय, विश्वसनीय , आदरार्थी बोलणे ऐकूण शेठ अत्यंत शांत झाले, त्यांनी त्यांच्या नजरेने जे पाखरु पाहिलं होतं ते पाखरुच आता उडून जाणार... असल्याने त्यांच्या बुध्दीला जणू काय ग्रहण लागले होते. मनात दाटुन आलेल्या भावनांची तहान पाण्याचा सागर असूनही जणू काय भागत नव्हती. मन खिन्न, उदास , निवांत, एकांत, शांत होऊन स्वामी जेथे रहात होते जेथे जाऊन टिपत होते, तर नजरेत फक्त अश्रुंचाच पूर दाटला होता. साध्या हिरव्या रंगाच्या अंबाच्या वनात सापडलेल्या पोपटाला आपल्या सोबत न्यावे, त्याला आपला नितांत लळा लावावा, किंबहुना आपल्या मनास त्याचा लळा लागावा , तो सर्व तोपरी आपणास हवा हवासा वाटावा व कधी ना कधी तरी तो आपल्या समोर आपल्या काळजाची तार छेडून हिरव्या गार पाचुच्या रानात निघून जावा, अगदी तसेच आपणास एकाच वेळी दोन दर्शन घडवणारी ही दैव मूर्ती आपल्याच समोर

आपणास सोडून जाणार आहे. ही कल्पनाच माणिक शेठला करता येईना, जशी अवस्था त्या राव्याच्या मालकास झाली असेल त्यापेक्षा कितीतरी अधिकपट हालाखीच्या परिस्थितीचे चक्रवादळ ह्या माणिक शेठच्या मनात काही क्षणात निर्माण झाले, पण हा देव अवतारी पुरुष आपल्या घरी इतक्या दिवस वावरला यातच त्यांना आता सुख मानले. तितक्यात माणिकरावांनी एक प्रश्न टाकला, 'तुम्ही जरुर जा, पण माझं एक दान तुम्हाला घ्यावं लागलं.'

स्वामी 'हो' म्हटले, कारण मालकाचा अपमान करणे, ही प्रथा स्वामीजवळ उपलब्ध नव्हती.

माणिकशेठने 'बारा एकर' जमीन स्वामींना दान केली, त्यावेळी बारा एकर जमीन म्हणजे फार झाली.

'बारा एकर' ऐकताच स्वामींची चर्चा शांत झाली, त्यांना काय करावे कळत नव्हते. स्वामींनी, शेठनी दिलेल्या १२ एकरचा स्विकार केला पण त्या मोबदल्यात सहा-सात वर्षाच्या कामाचा मोबदला घेतला नाही, स्वामींना जिवनात फुकटचे काही कधीच काही घेतले नाही. मोबदला म्हणून ते काही ना काही देतच होते. व हाच नियम त्यांनी अखेरपर्यंत पाळला, एक दैवमान पुरुष आपल्या घरी आहे. म्हणून मनातल्या मनात आनंद बाळगणारे माणिकराव आता स्वामी जाणार म्हणून फार निराश होते. ह्या जन्मतः जन्मास आलेल्या प्रत्येक प्राण्यास निरोप द्यावाच लागतो. एक पाऊल टाकायचे असेल तर मागच्या पाऊलालाही निरोप द्यावाच लागतो. हा निरोप देतांना मात्र फार अतिशय दुःख निर्माण होते हा एक निसर्गाचा नियम आहे. प्रत्येक क्षण येतो प्रत्येक क्षणांच्या स्वागतासाठी अगोदरच्या क्षणास निरोपच द्यावाच लागतो. आयुष्यात येणारे क्षण नेहमी मोजून मापुन टिपावे कारण एकदा गेलेले क्षण परत कधीच आणता येत नाही. स्वामीं बरोबर घालवलेले क्षण माणिकरावांना आठवत होते पण मात्र परत आणता येत नव्हते, कारण ते येणारेच नव्हते.

फार बिकट परिस्थिती माणिकरावांच्या मनात निर्माण झाली होती. कोणत्याही गोष्टीस आनंदाने निरोप देणे ही हिंदुस्थानच्या हिंदु धर्माचा अभिमानांची शान आहे. अगदी तसेच ह्या माणिकशेठला स्वामींना निरोप देण्याचे दुःख हृदयापासून झाले होते. तरीही दुःखाचे अश्रु गाळत का होईना पण हसतमुखाने त्यांनी निरोप द्यायचे ठरवले होते. पत्नीस सांगून त्यांनी स्वामींची इच्छा नसतांनाही पाचपक्वानाचे जेवण तयार केले. स्वामींसह सर्व कामागारांना जेवण दिले, व मनातल्या मनात एक परमभाग्य पदरात पाडून घेतले. स्वामी गाव सोडता आहे ही वार्ता अवघ्या जना-जनांच्या मना-मनात फिरली व त्यामुळे अवघे गाव स्वामींच्या झोपडी जवळ गोळा झाले.

लोक-लोकांनाच सांगु लागले, 'अरे... चला... बाबाजी चालले, ... बाबाजी... आपल्याला सोडून... चालले', अवघ्या गावकऱ्यांच्या डोळ्यात गंगा यमुना जमा झाल्या.

सर्व जण बाबांचे नतमस्तक होऊन चरणस्पर्श करत होते. कुणी रडत होते, तर कुणी बाबांकडे सारखे निरखुन बघत होते. करंजगावातील बोरनदीतील छोट्या माश्या पासून तर उंच आकाशातील राखेतून झेप घेणाऱ्या फिनीक्स पक्षापर्यत सर्वचजण बाबास निरोप देण्यासाठी एकत्र आली होती. सर्व सजिवांच्या डोळ्यात केवळ अश्रुच दिसत होती.

साक्षात परब्रम्ह भगवान श्रीकृष्ण, गोकुळ सोडून जेव्हा मथुरेत जाणार होते तेव्हा जशी परिस्थिती त्या गोकुळात निर्माण झाली होती, जेव्हा प्रभुरामचंद्र माता कैकयीचा आदेश ऐकूण वनवासात जाणार होते तेव्हा जशी परिस्थिती त्या शरयु तिरावार बसलेल्या अयोध्या नगरीत निर्माण झाली होती. अगदी परिस्थिती आता ह्या बोरनदी तिरावर बसलेल्या करंजगावात निर्माण झाली होती. बाबांनी हात जोडून भूमातेस वंदन केले, डोके टेकवून गो मातेस नमन केले, तर डोळे मिटून व हात जोडून करंजगाव या कर्म भूमीस व तेथील प्रजाजनास अभिवादन केले व भरल्या नजरेने व त्या नजरेतून टपकणाऱ्या आसवांनी त्यांनी करंजगावास सांष्टांग नमस्कार केला व करंजगावचा शिव सोडला.

सारे धाय मोकलुन रडत होते. माणिकशेठचा जिवावरचा तर ताबाच सुटला होता पण आपण स्वामींना १२ एकर जमीन दान दिली व स्वामी एकदा तरी जमीन बघण्यास येतील या एका वेड्या आशेने त्या भावसागारात बुडून गेलेला मनास अधार देण्यांचा प्रयत्न करत होते. गायी गुरांसह चमेलीच्या फुलांनी मनात तीव्र दुःख असूनही स्वामींना आनंदानेच निरोप दिला होता. स्वामी करंजगावचा शिव ओलांडून अदृष्य झाले होते. ज्या ठिकाणी कार्य सिध्दीस गेले त्या ठिकाणाला तिलांजली देणे हे स्वामींचे सूत्रच होते व भविष्यातही त्यांनी यात काहीच बदल केला नाही. सर्व करंजगावकर गावकरी आपआपल्या घरी बाबाजींना देव म्हणून भजु लागले. तर इतर लोक करंजगाव ही बाबाजींची कर्मभूमी म्हणून ओळखु लागले.

इ.स. डिसेंबर १९३२-३३ ला स्वामी दहेगांवी शिवाच्या रेषेत येऊन बसले गावातील शिवाला व हनुमंत रायांना नतमस्तक घेऊन दोन्ही हातांनी वदंन केले. स्वामींना प्रथमतः घरी जाण्यांची इच्छाच होईना, स्वामी मनात इच्छा नसतांनी घराच्या ओट्यासमोर जाऊन उभे राहिले, सात - आठ वर्षांच्या अंतराने स्वामी घरी गेले होते. तितक्यात वामनरावांच्या पत्नी समोर आल्या त्यांनी स्वामींना क्षणात ओळखले व म्हणाल्या,

भाऊजी घरात यांना.

पण स्वामींना घरात जाण्याची मनिषा होईना, त्यांना फक्त त्यांच्या आईस बघायचे होते. फार दिवसापासून केवळ भक्तीच्या शोधासाठी व धर्माच्या प्रसारासाठी गेलेली ही स्वामीरुपी मूर्ती आज जन्म देवून दुनिया दाखवणाऱ्या मातेला बघण्यासही तराळून गेली होती. वामनरावांच्या पत्नीस काहीच उत्तर न देता स्वामी केवळ एवढेच बोलले,

'बाई , कुठ हाय'

'घरामंधी बसली आहे.' असं त्वरीत उत्तर त्या श्रीमंतीने दिले.

'बोलवा मग त्यांना' असे बोलून स्वामी शांत बसले.

भक्तीची पालवी नुकतीच फुटलेल्या ह्या स्वामींच्या वेड्या मनात हृदयमंदिराच्या देवतेची आस लागली होती. धावत पळत श्रीमती आत गेल्या व फार मोठ्या विशाल अंतःकरणाने कंठातून जोरदार आवाज काढत त्या म्हणाल्या,

'आत्याबाई....... भा......व ...... जी .......आलेत... ते तुमास्नी याद करतायेत , चला.... लवकर'.

खुप दिवसापासून या लहान भाऊजाईने देवासारख्या दिराला बघितले नव्हते व आज चक्क ते घरी आले, हेच त्यांना फार चुकवत होते. त्यांनी स्वामी घरी आल्याने इतका आनंदा झाला होता की, त्या स्वतःशी देखील नीट व्यवस्थीत बोलू शकत नव्हत्या तेव्हा त्या आत्याबाईंना व्यवस्थीत सांगितलच कशाकाय? बोबड्या आवाजात त्यांनी आत्याबाई जवळ पुसटसे वर्णन केले. इतक्या दिवसा पासून आज आपला भाऊ आला, म्हणून फार आनंदाने वामनराव, दत्तुपंत बाहेर आले, भावाला बघून हास्याच्या छटा त्यांच्या गालावर उमटल्या, घरातील सर्वात मोठा, कर्तबगार व भावी आयुष्यातील उत्तराधिकारी ठरणारा पुत्र जनार्दन आज घरी परतला हे ऐकून क्रोधी आप्पासाहेब देखील पानवलेल्या अंतःकरणाने दरवाज्यापर्यंत धावत पळत आले... बाळ... म्हणतं ते तेथेच धबकले, प्रभुरामचंद्रांनी जेव्हा चौदा वर्षानंतर वनवासातून परतले होते व जेव्हा मातोश्री कौशल्या मातेस समजले की, प्रभु श्रीराम आज परत आले तेव्हा, ती माता डोळ्यात गंगा जमुना उभ्या करुन भरल्या नजरेने प्रभु रामचंद्रास बघण्यास आल्या होत्या, अगदी तशीच स्थिती ह्या जगद्‌वंदनीय म्हाळसा मातेची झाली होती. डोळ्यात आसवे, मनात भावना, हृदयात वात्सल्य, अंतःकरणात प्रेम, व पायात विलक्षण गती अशाच अवस्थेत मातोश्री म्हाळसाईनी लुगड्याचा पदर सावरत स्वामींना गळ्याशी धरले व रडत .... रडत उद्‌गारल्या ,

'बाळ... जना....आ...ला.. का ... रे... माझा भाऊ.... किती दमला... माझा जना'.

रडत रडत ही माता एकेक श्वास टाकत होत्या, स्वामींना पदरात टिपत होत्या फार विलक्षण प्रेम हे त्या मातेच्या हृदयकमलात दाटून आले होते. ह्या मातेच्या ममतेला आज खरा पान्हा फुटला असे वाटत होते, ती माता मनात असंख्य आनंदाचे तारे फुलवत रडत होती व मध्येच आपल्या परत आलेल्या शिव अवतारी पुत्राचे मुक्के (पापे) घेत होती... विशाल अंतःकरणाने भरलेले स्वामीचे मन सद्‌गदित झाले, आईला बघताच त्यांच्या हृदयात असंख्य ममतेच्या कळ्या फुलल्या ' साऱ्या जन्माचा साऱ्या आयुष्याचा सार हा एकट्या आईत आहे. ' असे म्हणणाऱ्या स्वामीची स्थिती आईला बघून कशी झाली असेल याच वर्णन माझ्या सारख्या एकवीस वर्षीय बालकास ह्या शांतीच्या फुलातून कसे येईल'

'स्वामी तिन्ही जगाचा
आई – विणा भिकारी'

अशी हाकाटी देणाऱ्या ह्या स्वामीस खुप खुप रडू आले. भगवान श्रीकृष्ण जेव्हा गोकुळातुन मथुरेत परतले व आई देवकीला भेटले तेव्हा त्यांच्या नयनातून देखील असंख्य अश्रुंच्या धारा त्या मातेच्या चरणी टपकल्या होत्या. तेव्हा हे तर नुकतेच जन्म घेतलेले व कार्यास शुभारंभ केलेले स्वामी जनार्दन होते. असंख्य आसवांच्या थेंबासह त्यांनी मातेच्या चरणाशी लोळून नमन केले.

...आई, 'फक्त ... माझा... जना... आला... माझा जना आला...' त्या एवढ्याच बोलत होत्या. त्यानंतर आईने स्वतःच्या हाताने स्वामीस स्वयंपाक खाऊ घातला. जेवण झाल्यावर बाजीराव पाटलांनी विचारले 'काय रे ? इतके दिवस कुठे होता.'

'करंजगावला'

कुणाच्या घरी,

'माणिकशेठच्या'

'मग किती पैसे आणले' चुलत्याच्या हव्यासालक प्रश्न ऐकून स्वामींना खूप राग आला, पण चुलत्याच्या पुढे व वडील व्यक्तीला माघारी बोलण्याचे वळण नसल्याने ते फक्त बोलले, 'काहीच नाही'.

का ? रागावून बाजीरावांनी विचारले,

'त्यांनी मला बारा एकर जमीन दान दिली व तिचा मोबदला म्हणून मीच ते पैसे घेतले नाही.'

मुलाचे हे बोलणे ऐकूण म्हाळसाई व आप्पासाहेबांना बराचसा आनंद झाला, तर बारा एकर जमीन वाढली म्हणून चुलत्याला लोभ वाटला.

एवढे बर झालं. जमिन पदरात पाडून घेतली. जन्मात आज पहिल्यांदा चांगला वागला, असे लोभी उद्‌गार काढत बाजीराव पाटील बोलले. आत्तापर्यंत स्वामीजी खालीच बसलेले होते त्यामुळे त्यांच्या घरातील व्यक्तीस त्यांचा स्नान पुजेत एक पाय गमवला हे माहीत नव्हते. परंतु नंतर स्वामी जेव्हा बसत्या जागेवरुन उठले तेव्हा म्हाळसाईस कळाले, आईने विचारल्यानंतर स्वामींनी त्याबाबतचा जसा न तसा वृत्तांत सांगितला. त्यावेळेस म्हाळसाईस फार वाईट वाटले . पण काय करणार स्वामींच्या भक्तीपुढे स्वतः मातोश्री देखील काही म्हणत नव्हत्या.

सायंकाळी झाली, स्वामींनी गुरांचे सर्व आवरले, स्नान केले व पुजा म्हणण्यास सुरुवात केली, घरातील दत्तुपतांसह ते थेट बाजीरावांना विशेष वाटले की, याचा नित्यक्रम अजुनही जसा न तसा आहे, त्यानंतर आईचे दर्शन घेऊन झोपी गेले, जीवनातली नियमावली स्वामींनी कधीच बदलवली नाही. दुसऱ्या दिवशीही रोजचेच कार्यक्रम चालु झाले. सन

१९३३ ला घरात चुलत्याचे व वडीलांचे थोडे खटके उडु लागले, बाजीरावासाहेब हे नको तिथे जास्त पैसे खर्च करु लागले, त्यामुळे त्यांच्या घरच्यांवर बरेचसे कर्ज झाले, कर्ज फेडण्यासाठी बाजीराव पाटील आता जमिनही गहाण ठेवू लागले होते. म्हणजेच घरात नको तेवढ्या कटकटी सुरु झाल्या होत्या स्वामींच्या मनाला हे सार कुठं तरी खटकत होतं पण ते काहीच करू शकत नव्हते. घरातील तणाव दिवसेंदिवस वाढतच गेल्या. चुलते प्रमाणापेक्षा जास्त अधिकार गाजवु लागले होते. त्यांच्या जाचाला कंटाळून आप्पासाहेब हे तब्बेतीने खालवून चालले होते. त्यावेळी आत्ताच्या स्त्रियांसारखे अधिकार नव्हता त्यामुळे म्हाळसाईला एक शब्दही बाहेर बोलण्याची परवानगी नव्हती. अशाच परिस्थितीत घरातील चुलते खुपच बोलू लागले होते त्यांचे बोलणे आता मात्र स्वामींच्या मना पार गेले, स्वामींनी खाली मान घालून सर्व बोलणे सहन केले व तसेच दुःखी मनाने ते अंधरणावर लोळले व घरापासून दूर मात्र मातेसह राहण्याचा विचार करु लागले. गावातच एक पडक्या घरात स्वामी खरोखर म्हाळसाईसह राहण्यास गेले, त्यांचे शब्द आता म्हाळसाईनेही मोडले नव्हते. स्वामींनी दुसरी खोली साफ केली, मातेने सर्व सामान व्यवस्थित लावले, घराच्या उजव्या कोपऱ्यात स्वामींनी पोथी लावली म्हणजेच पहिल्या दिवसापासून पोथी वाचण्यास सुरुवात केली. काही थोड्या फार दिवसाच्या अंतराने आई जवळचे सर्व पैसे संपले, नारायण आप्पांनी त्यांना दुसरीकडे जाण्यासाठी विरोध केला होता तरीही हे दुसरीकडे राहण्यास गेल्याने आप्पासाहेब त्यांना पैसेच देत नव्हते, याशिवायही बाजीरावांच्या स्वभाव असा... त्यामुळे आता स्वामींच्या संत पणाच्या लक्षणाची परिक्षा देवाने घ्यायची ठरवली असावी, कारण प्रभुरामचंद्र स्वतः देव होते. तरीही त्यांना चौदा वर्ष वनवासात असंख्य अडचणीस तोंड द्यावे लागले होते. तेव्हा हे तर एक संत होते. जून १९३४ ते १९३५ पर्यंत स्वामींची फारच हाल झाले त्यांनी संपुर्ण जीवन नुसत्या घुगरी या अन्नपदार्थावर काढले, या कालखंडात स्वामींना पदोपदी अडचणी येत होत्या पण देव दैवाची सुध्दा परिक्षा बघतो तेव्हा स्वामींची बघणारच यात शंकाच नाही. बाबा एक पायाने अधू झाले होते तरी देखील पहाटे नेहमीप्रमाणे वेळी उठत होते. स्नान संध्या आटोपून विधी करत होते. एका पायाने फरफटत फरफटत अवघ्या गावास वळसा घालत होते. ह्या भक्तीमुळे पाय गमवला होता तरी देखिल काट्या मारुतीस पाणी घालण्याचे टळले नव्हते, देवास त्यांनी त्याला आवडते तसेच वागवले. बाबा मातेसह 'घुगरी' खाऊन दिवस काढत होते. तिकडे बाजीराव पाटलांचे व आप्पासाहेबांचे कडाक्याचे भांडण झाले त्यामुळे दोघेही वेगळे निघाले, बाजीराव पाटलांचे प्रमाणापेक्षा जास्त कर्ज झाल्याने बरीचशी जमीन त्यांनी कर्ज फेडण्यासाठी कामी आली होती. परंतु तरीही थोडेसे कर्ज बाकीच होते. आप्पासाहेबांनीही बऱ्यापैकी जमीन सावकाराकडे गहाण ठेवली होती. म्हाळसाईसह स्वामीची थोडी थोडी उपासमार होऊ लागली होती. पण काय करणार परिस्थितीला इलाज नव्हता, अशा परिस्थितीत जुन १९३४ मध्ये दहेगावात स्वामींनी

शाळा काढली. बालवयात मामांनी शिकवलेल्या शाळेपर्यंतच्या ज्ञानावर वयोस्कर माणसांना शिकवायचे ठरवले व राहत असलेल्या पडक्या घरातच त्यांनी शालेय वर्गाची स्थापन केली. कर्मवीर भाऊराव पाटलांनही एका वडाच्या झाडाखालीच पहिली रयत शिक्षण संस्था शाळा भरवली होती. अगदी तसेच ह्या राष्ट्रसंतानेही पहिली शाळा त्यांच्याच पडक्या घरात भरवली. त्यांचे लहान बंधु दत्तुपंत व गावातील इतर इच्छुक सदस्य बाबांच्या शाळेतील प्रथमचे सदस्य झाले होते. तेच बाबांचे शिष्य होते. विधी नमन पठण आटोपल्यानंतर ते वर्ग भरवत होते व हळुहळु पैसा गोळा करत होते, त्यातूनच घरातील परिस्थिती सावरण्याचा प्रयत्नही ते करत होते. स्वामींजवळ एक एक पैसा येत होता तर तिकडे चुलत्यांचे सर्वच पैसे समाप्त झाले होते. चुलत्यांना वाटले की याला माणिकशेठने बारा एकर जमीन दान केली आहे. जेव्हा याला ती दान केली तेव्हा मात्र आपण एकत्र होतो. म्हणून नियमानुसार आपणही त्या जमिनीत निम्मा वाटा घ्यावा, त्यामुळे त्यांनी सरळ स्वामींच्या पडक्या घरात पाऊल टाकले व फार दबावाने माणिकशेठच्या जमिनीत वाटा मागितला, बाजीरावांचे म्हणणे स्वामींच्या लगेच लक्षात आले व त्यांनी ती जमीन वडीलांना व चुलत्यांना हसत मुखानं दान दिली. हव्यासी बाजीराव पाटलांनी लगेच करंजगाव गाठले व जमिनीस गिऱ्हाईक पाहिले . एखाद्याचे ग्रह फिरले की असे असते, घरची बरीचशी जमीन विकून त्यांनी कर्ज फेडले होते तर अठरा विश्व दारिद्य त्यांचे पाठ सोडत नव्हते . माणिकशेठने दान दिलेल्या बारा एकर जमिनपैकी सहा एकर जमिन त्यांनी लासूर गावातील सावकारास विकली व मिळालेले पैसे कसे हळुहळू सपंले एवढेच ते बघत बसले. १९३४ मध्ये काढलेली शाळा स्वामींना गरिबीच्या परिस्थितीतून बाहेर काढत होती पुर्ण एक वर्षात विद्यार्थ्यांना वाचायचे, लिहायचे शिकवल्या नंतर त्यांनी शाळा बंद केली त्यावेळी स्वामींजवळ थोडे – फार पैसे गाठीला उरले होते. त्यांनी त्याच पडक्या घरात आता किराणा दुकान टाकायचे ठरवले मग त्यासाठी त्यांनी एका पायाने कसेबसे लासुरगाव गाठले व बिड्या आणल्या. आता त्यांच्या दुकानात ह्या चार – पाच वस्तू मिळू लागल्या होत्या, दुकानाने स्वामींना तळागाळाच्या परिस्थीतीतून मुले बरेचसे वर काढले होते. परंतु अजुनही म्हाळसाई व स्वामी बराचश्या हालाखिच्या महासागरात अडकलेले होते. थोडे फार पैसे आईजवळ आल्याने आईने घरी निरोप पाठवला की दत्तुपंतांना पाठवून द्या मातेचा व वडील बंधुचा (गुरुंचा) आदेश आल्याचे ऐकून दत्तुपंत पळतच आले, जसे ज्ञानेश्वर माऊलींनी स्वतः निवृत्तींना गुरु मानले होते. तसेच पंतांनीही मानले होते. पंत आल्या आल्या प्रश्न मालिकेत शिरले,

'काय मातोश्री'

आरे बाबा दत्तु हे पैसे घे आधी वर पाच घमिले बारीक माती आणि इटकरीची दहावीस खांड आणुन दे आणि ते पुढचं घर लिपू दे.

'हो' म्हणतच पंत गेले. वयाने लहान असल्याने त्यांचा वडील भावात व आईमध्ये

फार जीव होता, काही क्षणात त्यांनी विटा व बारीक रेती आणली व आई–मुलगा मिळुन स्वामींची पुढची खोली दुरुस्त केली . पुढे संक्रातीला सण जवळ आला होता, १४ जाने. १९३५ चा तो कालखंड असेल व या सणाला 'पुरण पोळी' या गोड अन्नास हिंदु समाजात फार महत्व असते, व यासाठी गुळ लागेलच हा विचार स्वामींनी केला व संक्रांतीच्या अगोदर दोन दिवस स्वामी झकडणं काठी –टेकवत टेकवत परसोडा या रेल्वे स्टेशनाच्या गावी गेले. दहेगावापासून १० मैल अंतरावर आग्नेय दिशेला परसोडा नावाचे एक बऱ्यापैकी सुधारलेले गांव होतं. इंग्रजांनी तेथे रेल्वे स्टेशनही ठेवलं होतं व आजही आहे, अशा परसोडा या गावी स्वामी एका पायावर व एका काठीच्या आधारावर सकाळी अकरा बरा वाजेच्या दरम्यान पोहचले असतील तेथे वाण्याच्या दुकानातून एक खुप मोठी 'गुळाची भेली' विकत घेतली, दोन – तीन बारदानांच्या घडीत ती भेली ठेवली व फरपटत ती भेली घेऊन दहेगावाकडे निघाले, रात्री आठ वाजेपर्यंत ते त्या बारदानात बांधलेल्या भेलीसह घरी आले, बऱ्याच ठिकाणातून फरफटत चालल्याने रक्तस्त्राव होत होता. मात्र स्वामींना त्यांचे काहीच वाटत नव्हते उलट तेथून आल्यानंतर त्यांनी स्नान केले व पुजा म्हणण्यास सुरुवात केली. आता स्वामींच्या जटा व दाढीचे केस बरेचसे वाढले होते. भक्तीमुळे एक पाय अधु झाला होता तरी देखिल पहाटेची पुजा त्यांची ही टळत नव्हती . जेव्हा पहाटे पहाटे तांब्याभर पाणी मारुतीस वाहून गावाला प्रदक्षिणा घालायला जायचे तेव्हा त्या दहेगावातील लोक त्यांना दलिंदर म्हणत पण म्हणणारे स्वतःच दलिंदर होते. यांची जाणीव त्यांना फार उशीरा झाली. संक्रांतीच्या सणाप्रित्यर्थ आणलेली गुळाची भेली संपूर्ण विकली गेली होती व थोडी फार परिस्थितीही सुधारुन लागली होती. गुळभेली सणाला व्यवस्थित पुरली व बाबांच्या आर्थिक परिस्थितीला जरासी चालना मिळाली. १९३६ पर्यंत बाबांनी गुळाची बेली दुकान व शाळा इत्यादी उपक्रम राबवुन आतापर्यंत बरीचशी आर्थिक परिस्थिती सुधारवण्याचा प्रयत्न केला होता पण बाबाला आर्थिक जोरावार सुखी रहायचे नव्हते तर केवळ मातोश्री म्हाळसाई मातेस आनंदी बघायचे होते. निदान ... निदान ती आपल्या साठी घर सोडून रहाते याचा तिला कधी पाश्चाताप झाला नाही पाहिजे अशीच विचारसरणी बाबांनी डोळ्यासमोर ठेवली होती. व त्यामुळेच ते नेहमी घरातील अन्नासाठी अहोरात्र परिश्रम करत होते. देवाने मात्र अजुनही त्यांची परिक्षा बघण्यात कमतरता केली नव्हती.

थोड्या फार पैशाची व्यवस्था लागल्याने स्वामींनी इ.स. १९३७ दरम्यान एक घोडी विकत घेतली, स्वामी त्या घोडीच्या गळ्यात हात टाकून लासुर येथे जात होते, लासुर येथे गेल्यावर तिथून किराणा बाजार घेत असे व त्या घोडीवर किराणा टाकत असे व पुन्हा त्या घोडीवर एक हात टाकून एका पायाच्या आधारावर बऱ्याच वेळानंतर ते दहेगांवी पोहचत असे, असाच नित्यक्रम चालत होते. व तोच किराणा ते दुकानात टेवून किंबहुना तो विकून उदरनिर्वाह करत होते. कार्यासाठी येणारा प्रत्येक दिवस अतुरतेने स्वामींच्या कार्याची वाट

पाहत होता तर स्वर्गमंचकी विराजमान असलेले देव देवता स्वामींची परीक्षा घेवून दहेगावच्या रंगमंचकावरील स्वामीची नाट्यमय खेळीच बघत होते. स्वामी आईला सुखी ठेवण्यासाठी एका पायाच्या आधारावर फार कष्ट करुन कसा बसा उदरनिर्वाह करत होते, व ही सारी रांगोळी दहेगावचे प्रजाजन उघड्या डोळ्याने बघत होते. घोडीच्या आधारावर एक वर्ष स्वामीनी जरा बऱ्यापैकी कांढल्यानंतर सन १९३८ मध्ये मे जून महिन्याच्या दरम्यान एक गाय व एक म्हैस विकत घेतली. गायी म्हणजे स्वामींची माता होय, कारण स्वामींनी त्यांच्या जीवनात गाय या प्राण्यास मातेइतके महत्व दिले आहे. गाय व म्हैस यांच्या दुधावर आता स्वामींनी त्यांच्या खडतर परिस्थितीला तोंड देण्याचे ठरवले होते. त्यांनी फार विलोभनीय परिस्थितीला तोंड देऊन एका वेळची वाचाही फोडली. आता पुन्हा स्वामींची परिस्थिती वडील व चुलत्याच्या परिस्थितीशी समतुल्य होऊ लागली होती. तितक्यात चुलत्यांना हे पहावेना असे झाले.

ज्याप्रकारे सन १७६१ मध्ये पानिपतच्या युध्दाने अवघी मराठी सत्तेचा विनाश झाला होता. परंतु माधवराव पेशव्याने पुन्हा एकदा मराठी सत्तेची ज्योत मोठ्या दिमाखाने पुण्यात पेटवली होती व तिचा प्रकाश दक्षिणोत्तर सारखाचा ठेवला होता पण जेव्हा जेव्हा माधवराव हालाखीच्या परिस्थितीतून नेवून शिखरे उभारत होते तेव्हा तेव्हा त्यांचे काका रघुनाथराव हे आड होते अगदी त्याचप्रमाणे स्वामी कशा तरी प्रकारे परिस्थिती सुधारत होते. तितक्यात त्याचे काका बाजीराव पाटील हे आड येत होते. ह्याही वेळी तेच झाले. इ.स. १९३८ मध्ये एक गाय व म्हैस विकत घेतल्यानंतर घरी परिस्थिती सुधारली तितक्यात त्यांचे काका आड आले व पैशासाठी ते थेट स्वामींच्या घरी गेले व म्हणून लागले,

'हे घर तुझं नाही, ह्या घरात माझाही निम्मा वाटा आहे, तवा तु कायी तर कर.'

यावर स्वामीनी घराचा पूर्ण मोबदला बाजीरावांना दिला परंतु ते एक शब्दही काकांना उलटून बोलले नाही. या वरुन आपण एकच म्हणू

**जया अंगी मोठेपण ।**
**तया यातना कठीण ।।**

भरपूर कठीण यातना सहन करुन स्वामींनी मोठेपणाचे प्रदर्शन घडवून दिले, हाच फरक नेमका तुमच्या आमच्यात आणि स्वामींमध्ये आहे. पण बाबा हो 'देव तारी त्याला कोण मारी' काकांनी जरी घराचा मोबदला घेतला तरी स्वामींना वाईट वाटले नाही, उलट ते आईला म्हणाले,

बायी... ये ... बायी जाऊदे, ज्याचं होतं त्यांनी नेलं आपलं काय गेलं.

यावरून आपणास त्यांच्या विशाल अंतकरणांची जाणीव आल्याखेरीज राहणार नाही. उलट डिसेंबर १९३८ दरम्यान नंतर स्वामींनी अजुन चार गायी व दोन बैल विकत घेतले, ते सकाळी पूजा झाल्यावर बैलांना चारत, गाय – म्हशीच्या दुधावर घर चालवत व

चार पाच वाजता गुरांना चारा घेण्यास जात, स्वामींचे दोन्ही धाकटे भाऊ वामनराव व दत्तु पंतही त्यांच्या बरोबर त्यांच्या जात असे व त्यांना वाटायचे की चारा आणण्यासाठी आपण आपल्या वडील बंधुला मदत करु पण तेथे नेमके उलटे व्हायचे, जेव्हा स्वामी त्याच्यासह शेतात जायचे तेव्हा अत्यंत भराभर ते गवत कापत असे व त्यांच्या भावांचे थोडे गवत होईपर्यंत स्वामी त्यांच्या अगोदर गवताने गाडीभरत असे व त्यांची गाडी भरून झाल्यावर ते लगेच त्याच्या भावास गवत कापण्यास मदत करत असे . मात्र गवत कापतांना दुसरा कोणताही विषय न होता केवळ भक्तीचीच गीते ते गात असे. दिवसा एवढे काम केल्यानंतरही त्यांची सायंकाळची स्नान पुजा अटळच होती, स्नान झाल्यावर पोधी-पुराण ते नेहमी प्रमाणे वाचत असे, हे सर्व बघून दहेगावचे लोक हरपले. त्यांना जनाची नाही पण मनाचीच लाज वाटू लागली. त्यांनी स्वतःशीच विचार केला असावा, की हा एका पायाने अधू केवळ भक्तीमुळेच झाला, एवढे असूनही किती त्रासातून घरची परिस्थिती सुधारवली , एवढे करुनही याने भक्तीत थोडाही विलंब केला नाही. एवढे असूनही त्यांनी अंजनीपुत्र हनुमानाची पुजा सोडली नाही. आणि ह्याच विचाराने त्यांनी आता स्वामींची पोथी दररोज ऐकण्यास सुरुवात केली व दररोज पोथी ते ऐकण्यास स्वामीच्या घरी जाऊ लागले. आता स्वामींच्या कार्यास खरी – खुरी सुरुवात झाली. असे समजू जसे कार्य कौठखेड व करंजगावी त्यांनी केले अगदी तसेच कार्य त्यांना दहेगांवी करायचे होते व तसेच झाले . दहेगावातील लोक त्याच्या मुखातून पडणाऱ्या वाणीने मंत्रमुग्ध होऊ लागले होते. दररोज त्यांच्या भक्ती कार्याचा माहिमा गाऊ लागले होते. गजानन पाटील, शामराव पाटील, रघुनाथ पाटील असे बरेचसे सवंगडी ह्या शिवारातील मित्राच्या कार्याची महती गाऊ लागले होते. वरील मित्रमंडळींनी स्वामींची शेती नांगरुन – वखरुन तयार करुन त्यात जोंधळे पेरून दिले, आता तर अजुनच फरक यांच्या परिस्थितीत झाली. पिकांची कापणी झाल्यानंतर नऊ– दहा पोते जोंधळे स्वामींना मिळाले. त्यात निम्मे जोंधळे गावातील गोर गरिबांना वाटून दिले व पुन्हा चुलत्याने केवीलपणाने धान्याची मागणी केल्याने त्यांनीही चार पोते जोंधळे देऊन टाकले. याचे सर्व नवल मात्र गावातील वडीलधाऱ्यांना वाटले. स्वामी नेमके कोण आहे, स्वामी नेमक्या कोणत्या रुपात आहे याची कल्पना त्यांना करता येईना यावर उपाय म्हणून ते सर्वजण स्वामींची पोथी ऐकण्यात येऊ लागले. सर्व गाव आता हळूहळू स्वामींना त्यांच्यात सर्वपोटी मदत करु लागले होते. स्वामींच्या भक्तीमार्गात अडथळा येणारी प्रमुख व्यक्ती म्हणजे त्यांचे काका. चार पोते जोंधळे दिल्यानंतरही काकाची तहान भुक संपुष्टात आलेली नव्हती. कारण तो एक प्रकारचा कृष्ण मामा कंसच होता. आता त्यांनी स्वामींकडे उघड–उघड पैशांची मागणी केली होती. तरीही स्वामी त्यांना काहीच बोलले नाही व स्वतःच्या घरात असलेले थोडेफार पैसे त्यांनी चुलत्यास एक सप्रेम भेट म्हणून दिले. चुलत्यांचे आता सर्व काही संपले होते. कारण त्याने एका देवअवतारी पुरुषास भक्तीपासून दुर करण्याचा प्रयत्न केला होता.

भक्तीचा सुगंध जन्मत:च घेऊन आलेली ही जनार्दन कळी आता हळुहळू बहरु लागली होती व तिच्याच सुहासाने आता ते दहेगाव सुध्दा मोहळून गेले होते. हसत-खेळत रडत गात जीवनाचे लोकीगत चालतच होते, उगवणारा सूर्य काहीतरी नवीन घेऊन उगवत होता व काही तरी नवजुन मनामनात भरुन मावळा होता. इ.स. १९३९ च्या वर्षातील आषाढी एकादशी तोंडावर येवून उभी राहिली, पाऊसाचा एक थेंबही धरतीला भेटला नव्हता, असा परिस्थितीत स्वामींना वारीला जाण्याची प्रखर इच्छा झाली, आतापर्यंत 'भक्ती' हा शब्द समजल्यापासून एकही पंढरीची वारी त्यांनी सोडली नव्हती व मागीलप्रमाणे ह्याही वर्षी वारीला जाण्याची इच्छा झाली. परंतु पावसांची उपस्थिती एकही नक्षत्रात झालेली नव्हती त्यामुळे गावातील वारकरी फारसा प्रतिसाद त्यांना देत नव्हते. पण मी वारी चुकवणार नाही. असे त्यांनी सदाशिवभाऊ वारकऱ्यास सांगितले व त्याप्रमाणे स्वामींनी म्हाळसाईचे चरण स्पर्श केल्यावर पंढरीची वाट धरली . एका पायाच्या जोरावर व दुसऱ्याच्या कशातरी आधारावर स्वामी विठ्ठलाच्या द्वारी जाऊन पोहचले. देवाजवळ काय मागितले हे तेच जाणो पण येतांना मात्र विठ्ठल रुखमाईच्या मुर्ती घेऊन आले. येता येता ते लासुर येथे थांबले व लासुर येथे त्यांनी त्या मुर्त्या एका वाणी समाजाच्या ग्रहस्थाकडे ठेवल्या व एक दिवसाच्या अंतराने दहेगावी परतले . स्वामी ज्या दिवशी वारी करुन मुळगावी परतले त्याच दिवशी त्याच मुळगांवी किंबहुना दहेगावी सारा दुष्काळ धुवून निघेल इतका पाऊस पडला . पहाटे नाद घालुन वातावरण फुलवणाऱ्या कोकीळेपासून तर थेट भक्तीस विरोध करणाऱ्या बाजीराव पर्यंत सर्वांनाच त्या पडणाऱ्या पाऊसाने सुखावून टाकले. 'बाबाजी पंढरीकरुन आले म्हणून पाऊस झाला,' असे दहेगावातील वारकरी संप्रदायातील विठ्ठल भक्तासह इतर भक्त म्हणू लागले. त्यानंतर स्वामींनी गावातील होतकरू भक्तांना सांगितले,

'बाबाहो, आपण काय करु, लासुरला एक वाण्याच्या इढं विठ्ठलाची आणि रख्माईची मूर्ती आहे, तर तेवढी मुर्ती आपण इठपर्यंत वाजत गाजत आणू आणि मग तिची प्राणप्रतिष्ठा करु' पाऊस पडल्यामुळे दहेगावची जनता बरीचशी सुशांत झाली होती. त्यामुळे सर्वश्री बाबांच्या निर्णयास अनुमती दिली, व सोमवारच्या शुभमूहूर्तावर यांनी जाण्यांची तयारी केली. फार धुमधडाक्यात वाजत-गाजत स्वामी वारकरी मंडळीसह लासुरहून निघाले. स्वामींनी त्या मुर्त्या लासुलाच ठेवल्या कारण लासुर हे देवी दक्षिणीमातेचे जन्म गावं, पवित्र अशा शिवना तिरावर वसलेलं हे छोटसं पण टुमदार असे गाव. लासुर म्हणजे भगवान शिव-शंकराच्या पत्नीचे माहेर म्हणजे देवी पार्वती मातेचे ते माहेर गावं. अशा पुण्यवान गावातुन मुर्तीसह स्वामी दहेगावकडे निघाले, टाळ मृदूंगाच्या स्वरात फार आनंदाने स्वामी त्या विठ्ठल रुख्मीणीला घेवून दहेगांवी आले.

स्वामींनी मुर्तीसह दहेगावी प्रवेश केल्या केल्या सर्व प्रथम त्यांनी काट्या मारुतीस पाणी घातले कारण यशदायक देव म्हणजे 'हनुमान'. म्हणून त्यांनी सर्वप्रथम हनुमानास

पाणी वाहिले, त्यानंतर संपूर्ण गावात एक प्रदक्षिणा घातली व गावाच्या एका कोपऱ्याला एक घर होते त्या घरात त्यांनी

'बोला... भगवान शिवनाथ की जय

... श्री विठोबा रुख्माई की जय...

... हर ... हर महादेव'

ह्या घोषण्यांच्या नादात त्या मुर्तीची स्थापना केली, नंतर लगेचच त्यांनी त्या मुर्तींची प्राण – प्रतिष्ठाही केली. मुर्तींची प्राण प्रतिष्ठा करणे ही खेळी त्यांच्याजवळ उपजत होती. कारण बालवयात ते टापरगावच्या नदीतीरी शिवलींग करत असे व त्यावर बेलाची पाने वाहून अभिषेक करत व अभिषेक करुन ते त्या शिवलिंगाची प्राण प्रतिष्ठाही करत असे त्यामुळे प्राण प्रतिष्ठा करणेही खेळी त्यांना जन्मतःच ईश्वराने दान केली होती.

प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर राजा मेघही निनादला व जोराने बरसला, अवघे दहेगाव त्या विठ्ठल रुख्माईच्या घराकडे उलटले. सर्व जण आनंदाने... बाबाजी की जय... बाबाजी की जय ओरडू लागले, व बाबा केवळ म्हणत

'विठोबा ... रुख्माई की जय,

हर.... हर... महादेव

अशा तऱ्हेने आनंदाने प्राण प्रतिष्ठा केल्यानंतर स्वामींनी त्यांचे निवासस्थान बदलवले. स्वामी आता विठ्ठल रुख्माईजवळ राहू लागले. त्यांनी आता मातोश्री म्हाळासईला त्याच्या घरी म्हणजे आप्पासाहेबांकडे व पुत्र दत्तपंत व वामनराव यांच्या येथे राहण्यास लावले. स्वामीचे जीवन आता त्याच विठ्ठल –रुख्माईच्या चरणाशी लीन झाले. त्यांनी त्यांचे जीवन सातत्याने कार्यस्वरुप त्याच मुर्तीच्या सेवेसाठी व्यथीत करण्याचे ठरवले. मातोश्री म्हाळसामाता किंवा बंधू वामन राव किंवा दत्तुपंत आता त्यांना सकाळ–संध्याकाळ जेवणाचा डबा घेऊन जात असे. मग जेवणाचा डबा घेऊन गेल्यावर बाबा नेहमी त्यांना थोडेफार भक्तीचा महिमा सांगत असे, त्यांना धर्माची, देव–देवतांची महती सांगत असे. त्यामुळे त्यांच्या बंधुंच्या विचारात बदल होत होता व तेही त्यांच्या परिने दैवाला साक्षी ठेवून भक्ती करण्याचा प्रयत्न करत असतं. मुर्तीची प्राणप्रतिष्ठ झाल्यानंतर पंधरा दिवसांनतर बाबाच्या शरीर प्रकृतीत बदल व्हायला लागला, त्यांची विचारसरणी अतिउच्च टोकाला जाऊन बदलु लागली होती. त्याच्या मनामध्ये एक विलक्षण तेज निर्माण झालं होतं. परंतु त्यांची तब्येत आता फारच खालवत चालली होती. कारण स्वामींची आराधनेसाठी एक वेळच्या अन्नाचा त्याग केला होता, त्यांनी नेहमीच्या जेवण्यातही अचानक बदल केला होता. त्यांनी एका वेळच्या अन्नाचा तर त्याग केलाच होता परंतु एका वेळच्या अन्नातही काही आगळावेगळा बदल घडवून आणला, ते आत्तापर्यंत साधे परंतु सर्व प्रकारचे जेवण ग्रहण करणे पसतं करत होते. परंतु त्यात ते फक्त हाताच्या तळव्याइतकी बाजरीभाकरी घेत पण त्या भाकरीत नेहमीच

केवळ शेपुची भाजी एकत्र केलेली असत असेच आणि एवढेच अन्न ते वयाच्या ऐन तारुण्यात म्हणजे पंचविसाव्या वर्षी ग्रहण करु लागले होते. आणि त्यामुळे त्यांच्या प्रकृतीत अन् विचारामध्ये बदल होत होता. परंतु घरच्यांना एका वेळच्या अन्नाच्या त्याग केल्याने गंभीर चिंता वाहत होती. स्वामींनी त्यांना जेवणाबद्दल विचारले की ते म्हणत, 'चिंता करु नका मला काही होणार नाही, मला दोन वेळा अन्न ग्रहण करण्याची अजिबातच इच्छा राहिली नाही तरी तुम्ही काळजी करु नका.' असे उत्तर देवून स्वामी घरातील व्यक्तीच्या मनाचे सांत्वन करत होते. त्यांनी त्यांच्या जुन्या व पडक्या घरात पांडुरंगाची निस्सीम सेवा केली. व पांडुरंगानेही त्यांना आपलेच मानले होते. साऱ्या भक्तीचा सार हा गीतेत आणि विधीत आहे. यांची जाणीव त्यांना वयाच्या पंचविसाव्या वर्षी अत्यंत पूरक पटली व आत्मसातही झाली. म्हणून परमेश्वराच्या जयघोषात त्यांच्याच नामस्मरणात ते तल्लीन राहू लागले व एक एक दिवसांची सांगताही करु लागले. सांगता करता करता सन १९४० चे वर्ष कसे उगवले तेच कळाले नाही. १९४० च्या एक जानेवारीचीही सुरुवात त्यांनी काट्या मारुतीस पाणी घालूनच केली आणि शेवटही त्यांनी विधी वाचूनच केला. १९४० च्या वर्षात स्वामींना जरा उदास उदासच वाटत होते, का ? कुणास टाऊक हे पण ते उदासच होते. यांचे कारणही त्यांनाही माहित नव्हते, परंतु ह्या उदासीनतेचे कारण स्वामींना नंतर कळाले, वयाच्या सव्वीसाव्या वर्षी त्यांना फार जोराचा फटका बसला. इतका मोठा दुःखाचा डोंगर त्याच्या तरुणमनावर बसला की त्यांना बाहेर पडण्याचा मार्गही सापडत नव्हता, जणू काय त्यांच्या जीवनातील एकही आशेचा किरण बाकी राहिला नव्हता. जिकडे नजर जाईल तिकडे केवळ अंधारच वावरत होता. त्या काळोख्या रात्रीला पंचर करुन उजेड देणारा एकही काजवा त्यांच्या मनात शिल्लक राहिलेला नव्हता. सारी सुखदुःख त्यांच्या अंतकरणाच्या सिमेतून हद्दपार झाली होती. कारण त्यांच्या मनरुपी विशाल आकाशाचा जो आधार खांब वाटायचा तो खांबच आता कोलमडून गेला होता, त्यांना त्यांच्या आयुष्यात जे क्षितीज लोभस वाटायचे ते क्षितीजच आता मृगजळ झाले होते. त्यांना विशाल अशा जीवनरुपी सागरात जो बुडत्याला काठीचा आधार वाटायचा तो काठीचा आधारच आता त्या विशाल सागरात गडप झाला होता. त्यांना जो प्रकाश भविष्यातला मार्गदर्शक वाटत होता तो मार्गदर्शक आता भूतकाळात विलीन झाला होता. टू-बी ऑर नॉट टू बी 'काय करावे मी काय करु नये हा प्रश्नच स्वामींना आता वेड लागवू लागला होता, त्यावर उत्तर द्यायला त्यांचे मनच तयार होत नव्हते. कारण त्यांना वसंतात मधुर गितांचा वर्षाव करुन विधीला साथ देणारी कोकिळाच आता घरटे सोडून ह्या जगाच्या सिमेपलीकडे गेली होती. त्या त्यांच्या भक्तीरुपी सागराला भरती आणणारी त्यांची सरीताच आता खंडीत झाली होती, राखेतून निर्माण होणाची जिद्द बाळगणाऱ्या फिनिक्स पक्षाची राखच १९४०च्या वर्षात वाऱ्यासारखी उडून गेली होती. त्या भक्तीच्या मंत्राने भरलेल्या सागरांची लाटच आता त्यावर विसंबून असणाऱ्या आनंद

पक्षालाही पोरकी झाली होती. साऱ्या आयुष्यातली सार ठरणारी, बालकांची हृदयमंदिराची पहिली देवता म्हणून सन्मान पटकवणारी, बालकासाठी डोळ्यातील बाहुले बनणारी, लंगडे असूनही सर्व प्रवास सुरळीतपणे पार पाडणारी, ती जगदवंदनीय मातोश्री म्हाळसा माता स्वामींना उर्वरीत कार्यासाठी मृत्युलोकी सोडून स्वर्गवासी निघून गेली. जुलै ऑगस्ट १९४० च्या दरम्यान ही दैवअवतारी माता एका शिवावतारास जन्म देऊन , योग्य असे भक्तीचे प्रशिक्षण देऊन आजही आपणास शांतीच्या फुलातून मार्गदर्शन मिळेल, एवढी जन्मभराची शिदोरी देऊन, त्यांच्या भक्तीच्या फुलाचा सुगंध घेऊन नवीन कार्यासाठी मातोश्री जिजाईसारखी दिशा दाखवून मृत्युलोकातून निघून गेली. स्वामी त्यावेळी विधी वाचून आसनास्थ झाले होते. वामनराव उशाला तर दत्तुपंत हृदयाजवळ बसले होते, आप्पासाहेब सौभाग्यवतीच्या पायाजवळ जागेवर शांत बसले होते. वातावरण फारच बदलेले होते. बाजीरावांची सुन पळत पळत स्वामीकडे गेली व म्हणाली...

भावजी... सासुबाई.. गे... ल्या....

'नाही .....ना ... ना... ही... असे मोठ्या आवाजात स्वामी ओरडले. घरावर बसलेली चिमणी फडफडली स्वामी उठले, एक पाय फरफटीत मातोश्री जवळ गेले. दोन्ही भावंडाच्या डोळ्यातील अश्रु स्वामींच्या नजरेस पडले.... स्वामींच्या एका मातेरुपी पायाचा आधार निस्तनाबुत झाला व स्वामी धडकन मातेच्या हृदयाजवळ जाऊन पडले व ओरडले...

'बा... यी ..... ये ... बायी ... उठना ... उठ ... मी आलो पाय .... ... उठ... ये... बायी.. आता मी... कुणा.. जवळ.... राहू... ये बायी... माला कोण... ये आता ... ये बायी.' अश्रूंच्या रांगा स्वामींच्या डोळ्यातून टपकत होत्या. सव्वीस वर्षाचे स्वामी, सोळा वर्षाचे वामनराव तर चौदा वर्षाच्या दत्तुपंतास मृत्युलोकात टाकून ही देवता एका एकी निघून गेली. स्वामींना व त्या दोघांना बाजीरावासह आप्पासाहेबांनी कसा बसा आवर घातला, पण स्वामी काहीच करत नव्हते, नुसतेच शांत बसले होते, आई वारल्यानंतर नऊ दिवस नऊ वर्षाप्रमाणे निघून गेले, अद्याप म्हाळसाईच्या मृत्युजागेवरील दिवा मिनमिणीतच होता. पर्यायाने कुठेही दुःखाचे सावट दुरावलेले नव्हते. सर्व दिवस हे दुःखात व शोक सागरात निघून गेले, पूर्णतः नऊ दिवस स्वामींनी मिणमिणत्या दिव्याजवळील जागा सोडलेली नव्हती. उगले घराण्यातील शोककालीन दहावा दिवस उजाडला गेला, त्या दिवशी म्हाळसाईचा दशक्रिया विधीचा कार्यक्रम होता. साधारणतः दहा साडे दहापर्यंत सर्व तयारी झाली व सर्व उगले घराण्यातील पुरुषांनी डोक्यावरील व दाढी वरील केस काढून सुतक पाळले. स्वामींनी सुतक म्हणून केवळ थंडगार पाण्याने तीन वेळा स्नान केले, त्यांनी जटा व दाढीवरील केस काढण्यास प्रखर विरोध केला, दशक्रिया विधीचा दहावा दिवस कसा तरी दुःखद वातावरणात पार पडला, परंतु स्वामींनी जटा काढून सुतक पाळण्यास विरोध केल्याने त्यांना फारसे कुणी आडवे आले नाही. परंतु तीन दिवसाच्या विलंबानंतर म्हणजे तेराव्याच्या

दिवशी बाजारीव पाटील भयंकर रागावले, असेल नसेल तेवढा सारा राग त्यांनी त्या दिवशी स्वामींवर काढला. स्वामींच्या अंत:करणाला त्यांचे बोलने आरपार होवून गेले, पण काय करणार सुख दुखाची साठवण करणारी त्यांची म्हाळसाई नामक सरिताच आता विशाल सागरात काही क्षणापूर्वी विलीन झालेली होती व आता ह्या भक्तीरुपी मनाचे गाऱ्हाणे ऐकण्यास जवळचं अस कुणी उरलचं नव्हतं. म्हणूनच बाजीराव पाटील बोलल्या नंतर खुपच प्रमाणात अश्रु डोळ्यातू बाहेर टपकत होते. चुलते एवढया प्रखर आवाजत बोलले तरीही स्वामींनी त्यांच्या निर्णयास यत्किंचीतही बदल केला नाही. चुलत्याला स्वामींच्या इतका राग आला की चुलते उठले व थेट 'सजन' नावाच्या न्हाव्याकडे गेले व त्याला सरळ सरळ घरी आणले, स्वत: पाटलाचाच हुकूम होता म्हणून संजन न्हाव्याने क्षणाचाही विलंब न लावता पाटलांची पाठ धरली व उगले घराण्याची पायरी गाठली, चार गावातील नातेवाईकांनी स्वामींना धरले व सजन न्हाव्याने वस्तारा लावण्यास सुरुवात केली, त्यादिवशी मात्र स्वामींनी त्यांनी पुर्ण शक्ती सजन न्हाव्यासह बाजीरावांनाही दाखवून दिली. सजन न्हाव्याने वस्ताऱ्यात पान टाकले व दाढीस पाणी लावले, आता उजव्या हाताच्या पहिल्या तीन बोटांच्या चिमटीत वस्तारा पकडला तर डाव्याहातात गोल धरला वस्तारा चालवणार तितक्यात वस्तारा फिरून गेला. काही करता वस्तारा दाढीवर आघात करण्यास तयार होईना, सजन न्हावी त्याच्या परिने आटोकाट प्रयत्न करीत होता परंतु वस्तारा नेहमीप्रमाणे उलटाच होत होता. सजनचा हात वस्ताऱ्यासह थकला व धावत पळत तो बाजीराव पाटलांकडे गेला व सर्व काही सांगितले.

हे असे होणार नाही चल मी बी येतो.

असे म्हणत बाजीराव स्वत: सजन बरोबर स्वामींकडे गेले व सांगितले,

'लाव तो दाढीला'

स्वामी केवळ त्यांच्याकडे उघड्या डोळ्याने बघत होते.

बाजीरावाच्या आदेशाचे सजन न्हाव्याने त्वरीत पालन केले. व वस्तारा उचलून लगेचच स्वामींच्या हनुवटीवर ठेवला, बाजीराव अर्जुनाप्रमाणे एकाग्रतेने न्हाव्याच्या वस्ताऱ्यावर नि स्वामींच्या हनुवटीकडे पहात होते. ह्याही वेळी नेहमी प्रमाणेच झाले, वस्तारा चालवणार तितक्यात तो उलटा झाला, बाजीराव पाटलांचे डोळे गरागर फिरू लागले, चेहऱ्यावर घामाचे दव बिंदू साचले तर सजन न्हाव्याचे हात थरथरले व वस्तारा हातातून गळून त्याच्याच पायावर पडला, शेवटी आपले साहित्य आणलेल्या कापडावर ठेवून कापडाची वळकुटी केली, स्वामींच्या चरणाचे डोके टेकवून दर्शन घेतले व आल्यावाटेने घरी निघून गेला. त्या स्वामींच्या दहेगावातील दुसऱ्या चमत्काराने अवघे गाव चिनभीन झाले व लोक स्वामींच्या दर्शनाला येऊ लागले, जन्मदाती माता, माऊली म्हाळसाई जरी आपणास सोडून गेल्या असल्या तरी आपण आपल्या कर्तव्याआड मातेचा मृत्यु आणू नये असेच स्वामींला वाटले व पुन्हा एकदा असेल नसेल सारे दु:ख पोटात घालून ज्या कार्यास आपण

या भुतलावर जन्मास आलो, त्या कार्याची जाणीव ठेवून ते कार्यास लागले. आता दिवसा मागून दिवस जाऊ लागले, बाजीराव त्यांना आता फारसा विरोध करत नव्हते, मातेचा मृत्यु होऊन आता जवळजवळ तीन चार वर्ष झाले होते. व तोपर्यंत स्वामींनी बरेचसे धार्मिक चित्र त्या देहगांवच्या कागदावर रेखाटले होते. आता केवळ त्या धार्मिक चित्रावर भक्तीचे रंग भरावयाचे राहिले होते. स्वामी दररोज दुपारी लहान लहान मुलांना, समवयस्क माणसांना, वडील थोरांना कोणत्याही झाडाखाली घेऊन बसत होते व धार्मिकतेचे प्रवचन फुलवून सांगत होते. त्यात त्रिकाल स्नान व पूजा यांची महती सांगत दोन वेळची विधी वाचण्यास सांगत, आईची, गाईची व शेतीची समानता दर्शवत होते.

'आई –भक्ती काम ' या त्रिसुत्रीच्या ज्ञानाचे बाळकडून पाजत होते. व अशाच भक्तीच्या गजरात दिवसांची सांगता करत होते.

आठवड्यातील एक दिवस देहगाव येथे बाजार भरत असे व बाजाराच्या दिवशी गावात जत्रे इतकी मंडळी जमत असे, त्या दिवशी वेगवेगळ्या ठिकाणाहून लोक भाजीपाला वैगरे माळवे घेऊन दहेगांवी विक्रीसाठी येत असे, अशाचप्रकारे दहेगावच्या दक्षिणेस काही मैल अंतरावर 'गोळवाडी' नावाचे शंभर दिडशे घराचे एक छोटेस गाव आहे. त्यागावातून सूमन वाघचौरे नावाची गृहीणी दहेगावात माळणे विकण्यास येत होती स्वामींचे घराणे हे पाटील आहे हे तिला माहित होते व ओळखही होती. शिवाय ती गृहीणी ही एक धार्मिक स्त्री होती. तिच्या मुखातून बाहेर पडणाऱ्या प्रत्येक शब्दात धार्मिकतेचा अर्थ बसलेला होता. व ती नेहमीच भक्तीत गुंग असायची. तिला एके दिवशी माहित झाले की बाबाजी हे छान प्रवचन करतात व तिच्या मनात एकदा जिज्ञासा निर्माण झाले की आपण एकदा तरी ह्या बाबाजींचे प्रवचन ऐकावे, म्हणून मनाला भक्तीने आवर घालण्यासाठी ती प्रवचन ऐकण्यास गेली, बाबांचे प्रथमचे प्रवचन तिच्या रोमारोमात संचार करु लागले. व मना–मनात भिनले तिचे ते भक्तीचे मन त्या प्रवचनाने संपुर्णतः तृप्त झाले. त्या स्त्रीस स्वामींचे प्रवचन ऐकून खूप काही बदल करावेसे वाटले व आता ती श्रीमती दररोज त्या गोळवाडी शिवारातून दहेगावी येऊ लागली, बऱ्याच दिवसानंतर म्हणजे सन १९४४–४५ मध्ये गोळवाडीत एक हरीनाम सप्ताह बसला होता सुमनबाईने स्वामींना सप्ताह बद्दलचे सर्व काही सांगितले यावर स्वामी खुप आनंदित झाले मातोश्री म्हाळसाई वारल्यानंतर तब्बल चार वर्षानंतर आज स्वामी प्रथमच आनंदित झाले होते. स्वामींनाही आता गोळवाडीत सप्ताहासाठी जाण्यांची इच्छा प्राप्त झाली व ते सुमनबाईस म्हणाले,

'आक्का, माझी बायी आता ह्या जगात राहिली नाही, तवा, आता तू माझ्या बाबाला विचारुन बघ.'

स्वामींनी सांगितल्याप्रमणे सुमनबाईने आप्पासाहेबांना विचारले, मातेच्या मायेने पारखे झालेल्या मुलाच्या इच्छा नाकारण्यास आप्पासाहेब असमर्थ ठरले व त्वरीत जाण्यास

संमती दिली, मग सुमनबाई त्याच्यापतीसह दहेगावी बैलगाडी घेऊन आल्या व बैलगाडीत स्वामीनी गोळवाडीत घेऊन गेल्या. स्वामींना तेथेही त्यांची पोथी बरोबर नेली होती. स्वामी आता गोळवाडीत होते तरीही सकाळी मारुतीस पाणी घालण्यापासून तर सायंकाळची पुजा करेपर्यंतच्या सर्व नित्यक्रम त्यांनी तसेच ठेवले होते. त्यात कोणत्याही प्रकारचा बदल त्यांनी केला नव्हता किंबहुना त्यात कोणत्याही बिकट परिस्थिती त्यांच्या दिनश्चर्येत हस्तक्षेप घेऊ दिला नाही. गोळवाडीच्या गणेश मंदिरात त्यांनी वास्तव्य केले व तिथे उजव्या कोपऱ्यात बसून १९४४-४५ मध्ये पोथी वाचण्यास सुरुवात केली. सकाळ संध्याकाळ स्वामी निरंकार राहत असत. त्यांनी गोळवाडीत एका लवंगेवर सात दिवस पोथी वाचत काढले, म्हणजे रोज फक्त एकच लवंग खायची व तिच्याच जोरावर दिवस -रात्र पोथी वाचायची, म्हणजे किती भक्तीची आस, किती आराधना या स्वामींमध्ये होती याचा विचार करा. स्वामींचे सात दिवस कसे निघून गेले हे सुमनबाईना कळाले नाही. सुमनबाईनीही स्वामींना एक आराध्य दैवत मानले, तर गावकऱ्यांनी स्वामींची ईश्वर भक्ती पाहून दोन दिवस पुन्हा तेथे राहण्याचा आग्रह केला. स्वामींची ईश्वर भक्ती जबरदस्त होती. त्यांनी ह्याच ईश्वरभक्तीपाई आतापर्यंत कौठ खेड्यात, करंजगावात, दहेगावात भक्तीचा एक यशस्वी मळा तयार केला होता. आता हरिनाम सप्ताहाच्या निमित्रमात्र कारणाने गोळवाडीतही भक्तीचे रोपटे लावले होते. लोक आता स्वामींच्या भक्ती कार्यात रमु लागले होते. स्वामींनी त्यांना अत्यंत योग्य आणि सुलभ अशी शिदोरी दिली की जी शिदोरी त्यांना जन्मभर पुरलीही आणि शांतीच्या फुलात लिहिण्यासाठी उरलीही . गावकरांच्या आग्रहखातर त्यांनी दोन दिवस गोळवाडीत मुक्काम केला. दिनचर्या भक्तीसह निट समजावून सांगितली व दहाव्या दिवशी सकाळीस स्वामी सुमन आक्कांच्या बैलगाडीतून परत दहेगावी येण्यासाठी निघाले, अवघ्या सात ते नऊ दिवसात गोळवाडीत राहून तिथे धर्माचा किंबहुना हिंदवी भगवी ध्वजा रोवून, भक्तीची गुंफन घालुन, अवघ्या गोळवाडीकऱ्यांचे मन जिंकुन हा शिवावतार पुन्हा मुळगांवी जाण्यास निघाला. त्यांच्या निरोप देण्यासाठी सुमन आक्का सह गावातील भक्तीमंडळ जमले होते, व पुन्हा येईल असे बोलून स्वामी गोळवाडीच्या शिवातून दहेगावाच्या शिवारात निघून गेले. गांवी परत आल्यावर त्यांच्या भक्तांनी सवंगड्यासह स्वामीचा हात धरून त्यांना-त्यांच्या विठ्ठल रुक्माई प्राणप्रतिष्ठा स्थापित घरात नेले. पुन्हा एकदा नव्याने स्वामींनी तेथेच मुक्काम केला. आल्या दिवसापासून त्यांनी त्यांच्या कार्यास शुभारंभ केला, गावातील मनाजोगते लोक भक्तीमार्गात विलीन झाल्याने त्यांना आता गावात राहण्याची इच्छा राहिली नव्हती, त्यांनी त्यांच्या जीवनात रक्ताचे नाते केवळ मातेशी जोडले होते. तसे बंधु व पिता यांना त्यानी सन्मानानेच ठेवले. परंतु विवाहकरुन पार्वताबाईस दुःखी मात्र शेवटपर्यंत ठेवले, पण मात्र त्या दुःखी राहिल्याच नाही, जणू काय त्यांची बुध्दी ही परमेश्वराने बदलली होती की काय, परंतु त्यांनी पतीच्या ईश्वरभक्तीच्या सुखातच त्यांचे सुख मानले. त्यांना पतीच्या भक्तीचाच अपार आनंद

वाटत होता. बाजीराव पाटलांनी अनेकदा विरोध केला तरी देखील त्यांनी माधवरावपेशव्याप्रमाणे आपले कार्यच तडीस नेण्याचा प्रयत्न केला. लग्नापूर्वीच गृहत्यागाचा विचार स्वामींच्या मनाला टिपून गेला होता परंतु ममतेने भरलेल्या मातृतुल्य मातेच्या अमृतरूपी दुधाच्या शपथेने तो ग्रहत्यागाचा विचारच फेटाळून लावला होता व एका शपथीच्या बंधनात हा शिव अवतारी पुरुष अडकला गेला होता. आता मात्र मातेच्या शब्दाचा अर्थ संपला होता कारण माता बोलल्या होत्या, 'माजा जीव जीवात असेपर्यंत तुला घर सोडता येणार नाही'. परंतु आता ते बोलणे निरर्थक झाले होते. आणि शिवाय दहेगावच्या पंचक्रोशित हवा तेवढा प्रचारही झाला होता. परंतु अजुन एक दोन वर्ष येथेच काढावित असा सल्ला वयाने लहान असलेल्या दत्तुपंतांनी दिला होता. स्वामींचा दत्तुमध्ये फार जीव होता आणि ते अजून लहानच होते. याच कारणास्तव स्वामी दहेगावातच रमले, नवीन जन्मास येणाऱ्या पिढीस ते एक गुरु झाले, भक्तीच्या मार्गात समाविष्ट होणाऱ्या प्रजाजनांने ते एक वाटाड्या झाले, गोरगरीब भक्तासाठी ते साक्षात देव झाले व तेवढे करुनही १९४५ मध्ये सुमनबाईच्या घरी विठ्ठल रुख्माईची व गणेशाची प्राणप्रतिष्ठा करण्यासाठी गोळवाडीत पुन्हा एकदा गेले. तेथे जाऊन तेथील देवदेवतांची प्राणप्रतिष्ठा केल्यानंतर स्वामी पुन्हा मुळगावात परतले, भक्तीचा महिमा गात असलेल्या मनात केवळ ग्रहत्यागाचाच विचार भ्रमण करत होता, दत्तुपंतही आता हळुहळू सर्व गोष्टी समजतील इतपत मोठे झाले होते, वामनरावही लग्नाच्या वयाचे झाले होते. आप्पासाहेबंची जबाबदारी कर्तत्वानं मोठे झालेले वामनराव सांभाळतील तर त्यांची सेवा विचारांनी परिपक्व झालेले दत्तुपंत करतील याची जाणीव आता स्वामींना पूर्णपणे झाली होती. म्हणून त्यांनी ग्रहत्यागाची योग्यपणे रुपरेषा आखली. स्वामींना ग्रहत्याग करायचा होता परंतु त्यांना निमित्तमात्र मनुष्यप्राणी ह्या भुतलावर सापडत नव्हता असच समजा.

शेवटी सन १९४६–४७ चा वर्षकाल खंड उगवला, इंग्रज – भारत पाकिस्तान सिमा प्रश्न फार अटी तटीवर येऊन पोहचला होता. इंग्रजाचे सावट दुर होते की नाही हीच चिंता क्रांतीवीर, नेतेमंडळ सह अवघ्या हिंदुस्थानी जनतेस वाटत होते. ज्या कार्यासाठी ह्या भुतलावर जन्म घेतला होता, त्या कार्यासाठी पृथ्वीवर जन्मास आलेल्या कार्यपुरुषास तपसाधना करणे गरजेचे वाटत होते, परंतु त्या तपसाधनेसाठी एक चांगले ठिकाण शोधून काहीतरी निमित्तमात्र प्राण्याच्या निमित्ताने त्या भागात प्रवेश करायचा होता व तेच कारण भगवान शिवानेच निर्माण केले असावे. अगोदर विशद केल्याप्रमाणे सन १९४६–४७ चे वर्ष उगवले काहीतरी प्रचंड आत्मविश्वास त्या उगणाऱ्या दिवसांत दिसत होता व कितीतरी जबरदस्त आशा देऊन तो उगणारा दिवस मावळतं ह्या आशा महत्वपुर्ण दिवसांचे काय वर्णन करु त्यादिवशी गोळवाडीची सुमन आक्का लिंबाच्या झाडाखाली येऊन बसल्या, प्रवचन संपल्या नंतर ती जाण्याच्याच बेतात होती. स्वामीचे दुरुनच दर्शन घेऊन श्रीमती सुमनबाई वाघचौरे निघाल्या, स्वामींपासून चाळीस पन्नास पाऊले दूर गेल्यानंतर ह्या

अचानक थबकल्या व जागच्या जागी स्तब्ध होऊन उभ्या राहिल्या का ? कुणास ठाऊक परंतु त्या पुढे न जाता परत मागे फिरल्या होत्या. त्याच्या कितीतरी अधिकपट वेगाने त्या मागे फिरल्या व स्वामीपुढे जाऊन उभ्या राहिल्या आणि अंत–करणापासून उद्‌गारल्या,

'बाबाजी एक सांगु'.

काय ?

'रागावणार तर नाही ना ' थोड्या खालच्या स्वरात सुमन आक्का पुटपुटल्या

'नाही... नाही... सांग...' हसत हसत बाबा बोलले.

'अंदरसुरला नागेश्वरीच्या मंदिराजवळ एक लई मोठा सप्ताह होणार आहे. यामुळे आमच्या गावातले लई माणसं जाणार हाय तवा तुम्ही बी येईल का ?'

बाबाजींना केवळ निमित्त पाहिजे होते व आता तर अत्यंत चांगलं निमित्त सुमन आक्का व सप्ताहाच्या रुपानं गवसले होते, अंदरसुल येथील नागेश्वरी परिसरासारखीच जागा स्वामींना हवी होती व आता तर तीही योगायोगाने सापडली होती, नाशिक जिल्ह्यातील येवला तालुक्यातील अंदरसुल येथील नागेश्वरी मंदिराची जागा ह्या जनार्दन स्वामींसाठी अत्यंत अनुकूल होती. कारण अगोदर प्रभुरामचंद्राच्या पवित्र चरणांनी पावन झालेली ही नाशिकची पुण्यवान भूमी आहे. फ्रान्सचा किनारा काही क्षणात गाठून भारत भूमीच्या रक्षणासाठी लढणाऱ्या विनायक सावरकर यांच्या क्रांतीने अमर झालेली व साक्षात भगवान शिवाने अजस्त्र जटातून उगम केलेल्या गोदावरीचे स्थान असलेली हा नाशिकची भूमी आहे. अशाच ह्या भूमीत आजही भगवान शिवाचे अस्तित्व असलेली अगणिक जागा म्हणजे अंदरसुल येथील नागेश्वर मंदिराची जागा व अशा जागेत आपण सप्ताहास जाणार ही संकल्पना स्वामींच्या मनात पुरेपुर ठसली व हीच जागा भावी आयुष्यासाठी योग्य पूर्ण वाटली. व लगेचच सुमनबाईस स्वामी उद्‌गारले,

हो, मी जरुर येईल पण...,

'पण काय ? सुमनबाई मनात शंका घेऊन उद्‌गारल्या .

'तसं काही नाही, पण बाबाला ईच्यारावा लागलं. '

'म्या ईच्यारुका आप्पासनी ?' हा प्रश्न त्यांनी त्वरीत मुखातून बाहेर टाकला.

'हा... हा... ईच्यार, मी बी तुला हेच सांगणार होतो.' हसत मुखाने स्वामी बोलले.

तशाच अवस्थेत भक्तीची प्रश्नावली घेऊन सुमनआक्का उगले पाटलांच्या वाड्याकडे गेल्या तर योगा योगाने आप्पाही तेथेच ओट्यावर बसलेले होते.

सुमन अक्काला बघुन आप्पासाहेब म्हणाले, 'ये सुमन ये, काय काम काढलं आज इकडं '

काहि नाही, वाईस बाबाचं ईच्यारच होतं.

काय ?

अंदर... सु... ल, 'एवढचं बोलणार तितक्यात आप्पा उद्‌गारले
॥ जाय घेऊन ॥

स्वामींना अंदरसुलला जाण्याची पुर्ण परवानगी आप्पासाहेबांनी दिली होती व 'जाय' शब्द त्यांच्या मुखातून आज प्रथमतः व अखेरतः पडला होता व तेच झाले, स्वामी गेले ते गेलेच पुन्हा परत घरी आलेच नाही. ठरल्याप्रमाणे श्रीमान वाघचौरे बैलगाडी घेऊन दहेगावी आले व स्वामींना घेऊन निघाले, स्वामींनी जाण्याअगोदर भर दुपारी स्नान केले, काट्या मारुतीस पाणी घातले, संपुर्ण गावाला एक प्रदक्षिणा मारली, विठ्ठल रुख्माईचे हात जोडून नतमस्तक होऊन दर्शन घेतले, शेतात जाऊन काळी माती भाळी लावली, गुराजवळ जाऊन गायीपुढे लिन होऊन गायीचे दर्शन घेतले, वडीलांचे दर्शन घेऊन... 'जातो बाबा... जातो..., वामन दत्तुला... सांभाळा.' असे म्हणून श्रीमान वाघचौरे यांच्या बैलगाडीत जाऊन बसले व वर हात करुन दहेगावास निरोप दिला, तो का... य ...म... चा ... व ही शंकररुपी निर्मित विभुती हळूहळू बैलगाडीने गोळवाडी येथे येऊन पोहचली नंतर गोळवाडीकर भाविक मंडळ हे स्वामींसह नागेश्वराच्या परिसरात अंदरसुल येथे जाण्यास निघाले. स्वामींना अंदरसुल येथे जाऊन नेमके काय करायचे होते हे त्यावेळी कुणालाच कळाले नाही. केवळ अंदरसुलला चालले म्हणून चालले असा वर वर अर्थ दहेगाव शिवारातील जनतेने लावला, पण स्वामींना अंदरसुलला जाऊन तपसाधना करायची होती, ह्या मिळालेल्या देहाला समजून घ्यायचे होते, एक जगाच्या कल्याणासाठी जगाची विभूती बनायचे होते, मृत्युलोक सोडून गेले तरीही जनकल्याणासाठी चिरकाल अप्रत्यक्षरुपाने ह्या मृत्युलोकातच राहयचे होते, मातोश्री म्हाळसाईचे नाव त्रिभुवनात गाजवुन आधुनिक जनतेला 'आईची' महती पटवून द्यायची होती, ह्या देशात पुन्हा एकदा भक्तीच्या ध्वज तयार करुन धार्मिकतेच्या जोरावर ठेवायचा होता, धर्मजागृतीने महान कार्य करायचे होते, अनेक शिवालये बांधून एक आगळे वेगळे आशिर्वाद भक्तांसाठी देऊन जायचे होते, 'आई – विधी– श्रमदान' ही त्रिसुती अवघ्या आयुष्याचा सार आहे ही भावना प्रत्येक सामान्य व्यक्तीच्या मनात बिंबवायची होती, कृषी व गो सेवेचे महत्व तरुण वर्गास सांगायचे होते, गोर गरीबांच्या लेकरांना प्रगतीपथावर नेण्यासाठी आश्रमे गुरुकुले बांधायचे होते. एवढेच नव्हे तर हिंदुस्थानातील धर्तीवर परकियांपासून निर्माण झालेल्या ग्लानिस तिलांजली देऊन अर्जुनास भगवान श्रीकृष्णाने सांगितले वाक्य खरे करायचे होते व या सर्वांसाठी आता अंदरसुलच गाठायचे होते.

नीट बारकाईने विचार केला तर एक गोष्ट आपल्या लक्षात आल्या खेरीज राहणार नाही, की त्याकाळातही अनेक विद्या विभुषीत लोक वास्तव्य करुन जीवन जगत होते. ह्या रंगबदलत्या झगमगत्या दुनियेत एक नववधुहून अतिसुंदर नटलेलं एक आकाश आहे. ह्या आकाशाच्या छताखाली कित्येक जन्मास येतात, वाढतात आणि कालांतराने लय पावतात, आपणही जन्मासआलो व आपणही काळाच्या ओघात मरणार आहेत हे त्रिकाल बाधीत

सत्य वाक्य आहे, परंतु त्या साधनारुपी स्वामींमध्ये नि तुम्हा आम्हा मध्ये काय फरक आहे, त्यांनाही वेळ... मन... बुध्दी आपल्यासारखीच होती. तर मग त्याच्यात नि आपल्यात नेमका कोणता बदल आहे.

खरं तर स्वामींची जीवन जगण्याची विचारसरणीच वेगळी होती, आपल्यात आणि त्यांच्यात हाच तर नेमका विशाल मतभेद साधणारा फरक होता. स्वामींनी जन्मतःच भक्तीची पुरेपुर शिदोरी बरोबर आणली होती, कि जी शिदोरी आजही शांतिच्या फुलांत मला व्यक्त करण्यास मिळाली. छत्रपती शिवाजी राजा निर्माण करणाऱ्या जिजाई सारखी म्हाळसाई स्वामींना लाभली होती. समशेर हातात देऊन स्वराजाची बाळकडू पाजणाऱ्या दादाजी कोंडदेवाप्रमाणे टापरगांव येथील बाबुराव मामा व बळवंतराव मामा लाभले होते. जन्मतःच रोमा रोमात भक्तीचे वारे संचार करत असल्याने त्यांच्या जीवन जगण्याच्या व्याख्येत आणि आपल्या जीवन जगण्याच्या व्याख्येत जमीन असमानचा फरक होता. आईच्या शब्दाला मान द्यायचा असल्याने त्यांनी आतापर्यंत ग्रहत्याग केलेला नव्हता परंतु आता त्यांना त्यांच्या साधनेसाठी अनुकूल अशी यथायोग्य परिस्थिती निर्माण झाली होती. लहानपणापासून मारुती आणि विठ्ठलांची सेवा करून सबका मालिक एक ही साईबाबांची वाणी त्यांनी सत्य करुन दिली होती. व आता मुळ स्वरुपाच्या छावणीत दाखल व्हायचे होते. त्यामुळेच अंदरसुल येथे जाऊन त्यांना आपल्या गुणांची अनुमती ह्या भौतिक जिवास घडून द्यायची होती. त्या सद्‌गुरु जर्नादनांचा प्राण हा आपल्यासारखा आत्मा नव्हता तो एक विलक्षण तेजस्वी महामेरू होता. त्यांनी विधी, भागवत गोसेवा, कृषीसेवा , माता या सर्वांना त्यांचा प्राण मानला. त्यांनी स्वतःला सातत्याने ईश्वर भक्तीस वाहून घेतले श्री संत तुकाराम महाराज साधकास उद्देशून म्हणतात,

**सकाळ वेदांची निज सारे**
**ते सद्‌गुरु स्वरुप सावरा**
**ऐसा शिष्यासी निर्धारा निरंतर असावा**
**जो भावे भजे गुरुचरणी ।**
**तो नांदे सच्चिदानंद भुवनी ।**
**हे सत्य सत्य माझी वाणी ।**

विकल्प कोणी न धरावा याचा मतितार्थ असा की जो नेहमी आपल्या सद्‌गुरुच्या पाऊलावर पाऊल ठेवून राहतो त्याच्या सेवेत तो सदा स्वतःला सुखी समजतो, जो साधक साधना करुन परमेश्वराच्या चरणाशी लीन होतो. तो त्रिभुवनात राज्य करतो. ज्याने परमेश्वराचे चरण भजले, त्याला तो जे मागेल ते मिळते.

आणि तुकोबा महाराजांच्या विचारानुसार हे सर्व गुण ह्या तरुण साधकात पुरेपुर उतरलेले होते. व तो तेच गुण साकार करण्यासाठी आता अंदरसुलला निघाला होता. आणि

जो साधक नेहमी दुसऱ्यांचे हित साधण्याचा प्रयत्न करतो, स्वतः घाण घेऊन इतरांना स्वच्छ करतो तो साधक त्रिलोकात पुरुष उतरतो हे लक्षात घ्या. कोणत्याही साधकाला जिवनाची व्याख्या तयार करतांना फार मेहनत घ्यावी लागते, फार विचार करावा लागतो. कारण त्या साधकाच्या जीवनव्याख्येत लोभ, माया, मत्सर, विलास, मी पणा ह्या गोष्टींना तिलांजली दिलेली असते व यापैकी एक गोष्ट अंगीकारली तरीही त्याच्या जन्माचा मृत्युलोकांत राहून काही उपयोग होत नाही. कारण दुर्गुण हे नेहमी क्षण भंगुर असतात ते काही क्षणासाठी मनाला आनंद देतात व नंतर तेच मृगजळ बनत असतात. ह्या भक्तीची महिमा गाणाऱ्या साधकास त्यांची भक्तीची आगगाडी जर रुळावरून स्टेशनापर्यंत न्यायची असेल तर त्याला सर्व रस्ता भक्तीने सजवावा लागतो, कारण जर कुठे काही दुर्गुणांचा शिरकाव त्या भक्तीरुपी रुळावर आला तर ती रेल्वे भक्तांना त्या गाडीतुन योग्य स्टेशनावर नेऊन तारण्याऐवजी एखाद्या स्मशनात नेऊन मारल्याखेरीज राहणार नाही. या सर्वांचा यथायोग्य सारासार विचार स्वामींनी केलेला होता व त्याच भक्तींच्या रस्त्यासाठी एक साधनारुपी भक्तीयुक्त आगगाडी त्यांना तयार करायची होती व तीच गाडी तयार करण्याचे ठिकाण म्हणून नागेश्वरी मंदिरांची त्यांनी निवड केली होती व त्यांच अंदरसुलाकडे ते झेपावत होते. स्वामींनी आत्तापर्यंत संभाजीनगर जिल्हा सोडलेलाच नव्हता. आज ते प्रथमच प्रभु रामचंद्रांनी पावन झालेल्या नाशिकच्या भूमित प्रवेश करणार होते. गोळवाडीच्या भक्तांनी ट्रॅक्टरवर अंदरसुलला जाण्याचा कयास केला होता.

त्यामुळे त्यांनी ट्रॅक्टरच रस्त्यावर उभा केला, स्वामींना बसण्यासाठी बारदान केव्हाच ट्रॉलीमध्ये टाकले गेलेले होते. एक पाय कायमरुपी निकामी झाला असल्याने गावातील दोन जणांनी स्वामींना ट्रॉलीमध्ये बसवले, इतर भक्तजणही स्वामींजवळ जाऊन बसले व ठि क मध्यान्यवेळी ट्रॅक्टरचालकाने ट्रॅक्टर चालु केला व वैजापुर रस्त्याला लावला. आता जगासाठी कायमस्वरुपी आशिर्वाद देण्यासाठी हा शिवजीचा अवतार त्या लोखंडी ट्रॉलीमधून अंदरसुलाकडे रवाना झाला. रस्त्याने केवळ देव... भक्ती... हाच विषय त्यांना अपुरा पडला देवाच्या जयघोषात ट्रॅक्टर वैजापूर सोडून येवला रस्त्याला लागला. औरंगाबाद सिमेस स्वामी हात जोडून निरोप दिला व नाशिक सिमेस नतमस्तक होऊन विनम्र अभिवादन केले. झाडे, झुडपे स्वामींच्या स्वागतासाठी रस्त्याच्या दुतर्फा हात जोडून उभे होते. तेजस्वी व स्वच्छ किरणांनी स्वामींचे नाशिक भूमीतील आगमण स्वीकारले होते. श्रीकृष्ण जेव्हा विदुरासह गोकुळ सोडून मधुरेत येत होते तेव्हा जसे वातावरण सजले होते. अगदी तसेच वातावरण आता नाशिक भूमीत रंगले होते. ट्रॅक्टरच्या चाकांनी सुरेगाव ओलांडून अंदरसुलचा शिव केव्हाच पार केला होता. गोळवाडी भक्त मंडळांनी स्वामींना ट्रॉली मधून उचलून नागेश्वर मंदिराशेजारील वृक्षाखाली बसवले, निसर्गसौंदर्याने नटलेले ते छोटस् अंदरसुल गांव नाशिक औरंगाबद ह्या महामार्गावरील उत्तरेला स्थापित झालेलं हे टुमदार गाव आहे. गावापासून

अर्धा किलोमीटर अंतरावर हे नागेश्वरांचे अतिप्राचीन पण जागृत देवालय आहे. त्यांची प्रतिमा सहज पाण्यात दिसेल इतक्या अंतरावरून 'कोळगंगा' नामक सरीता सदान कदा वाहते, कुणालाही नागेश्वरांचे दर्शन घ्यायचे असेल तर चरण धुवून शुद्ध अंतःकरणाने ह्या शिवाचे दर्शन व्हावे ह्याचमुळे ती कोळगंगा नित्यनेहमी वाहत असावी. अगस्ती ऋषींनी तेथे तपसाधना करुन तेथे नागेश्वरांची स्थापना केली अशी आख्यायिका आजही सांगितली जाते. परंतु त्या कोळगंगेच्या शिवारात नेहमी नाग राहत होते. नव्हे , नव्हेतर ते तेथेच लपंडाव खेळत असायचे म्हणून तेथे एक शिवालय स्थापले व त्यास नागेश्वरी हे नाव दिले. असेही सांगितले जाते. परंतु ते एक भगवान शिवाचे जागृत ठाण आहे असे मानले जाते. अशा गंगेच्या तिरी असलेल्या भगवान शिवाच्या नागेश्वरी मंदिराजवळ ही महान विभुती बारदानावर जाऊन डोळे मिटून शांत बसली होती. डोळे मिटवून ही माऊली कदाचित हाच विचार करत असावी. की ह्या भारतभूमीसारख्या देवघररुपी भूमीमध्ये आज काय वातावरण रंगले आहे. ह्या वातावरणामुळे 'धर्म' नावाची गोष्टच ही जनता विसरली आहे. आपआपल्या संसारात गुंग राहून ही जनता दिवसेंदिवस विलासी होत आहे. जर जन्मात जन्मास आलेला मानव कळत नकळत त्याला जन्मास घालणाऱ्या प्रभुलाच विसरून चालला आहे, ज्या माता पित्यांनी त्याला जगाच्या आराखडा दाखवला त्या माता –पित्याला वंदन करण्यास तो आता समृद्धीचा कमीपणा समजू लागला आहे. नीट सुखाचा, समृध्दीचा, यशाचा रस्ता सोडून बदलत्या वेळेनुसार अथवा बदलत्या ऋतुनुसार मनात बदल करुन व बदलत्या मनानुसार बुध्दीत बदल करुन आजचा मानव काही वेगळ्याच धुंदीत वावरत आहे. ज्या दुर्गुणाने वाईट वळण लागते या दुर्गुणाला सगुण मानुन जीवनास वेगळच वळण लावण्याचा प्रयत्न करीत आहे. विज्ञानाच्या जोरावर अथवा थोड्या बहु बौद्धीक जोरावर स्वतःची प्रशंसा करून तो रात्रीच्या गर्भात काही वेगळेच स्वप्न बघत चालला आहे. ह्या विचारांनी मग्न झालेली स्वामीची चर्चा जरा वेगळीच जाणवत होती, यदाकदाचित स्वामींच्या मनात असेही आले असावे की ह्या मानवास एवढेही कळत नाही की हा लाभलेला नर देह क्षणभंगुर आहे, जन्मास येतांना आपण काहीच आणले नव्हते आणि जातांनाही काही काहीच नेणार नाही . ही जीवन ज्योती 'कधी' , कुठे, केव्हा ? विझेल याचा भरवंसा नाही. का? कुणास ठाऊक हा मानव प्राणी हे माझं ते माझं अस का ? म्हणतोस परंतु त्या वेड्याला एवढेही कळत नाही की दुनिया कधी आपल्याला टुकरावेल हे सांगताच नाही. असो काही ही विचार करत असो पण कोणत्या न कोणत्या तरी विचारात ही ३३–३४ वर्षाची तरूण मुर्ती सन १९४७–४८ मध्ये त्या झाडाखाली विचार करत शांत बसली होती. काही क्षणांच्या विलंबानंतर गोळवाडी कर मंडळी स्वामीजवळ आली व दुसरीकडे चला म्हणू लागली. कारण सप्ताहाचा कार्यक्रम हा नागेश्वरी मंदिराजवळ नसून गावात होता. परंतु स्वामींनी सर्व प्रथम कोळगंगेच्या पात्रात स्नान केले विनम्र मनाने नागेश्वरांचे दर्शन घेतले व गावकऱ्यांसह सप्ताहाच्या जागेवर हजर

झाले, तद्नंतर हळुहळू सर्व प्राथमिक कार्यक्रम पार पडल्यावर सप्ताहास सुरुवात झाली. पोथी पुराण वाचणे दररोज चालु होते. रोज सकाळी प्रवचन, सायंकाळी किर्तन होत होते. मंदिरात अखंड विनानाद चालुच होता. अशा पुण्यस्मरणीय कार्यक्रमात सुद्धा स्वामींनी त्यांचा नित्यक्रम सोडला नव्हता. सकाळी कोळगंगेत ते थंड पाण्याने स्नान करणे, तांब्याभर पाणी नागेश्वराला वाहणे, त्यांच्या भोवती एक प्रदक्षिणा घालणे, तेथेच एका कोपऱ्यात बारदाणावर बसून विधी वाचणे अथवा गितेचा एखादा अध्याय वाचणे, पुन्हा सप्ताहाच्या सभा मंडपात जाऊन पोथी पुराण वाचणे, दुपार झाली की स्नान करुन पुजा विधी करणे व सायंकाळ झाली की पुन्हा स्नान करणे, किर्तन ऐकण्यास जाणे, नंतर किर्तन संपले की बारदानावर आसनास्थ होऊन शिव.... शिव... शिव असा शिवनामाचा जप करणे हे नित्यक्रम स्वामींचे चालु हेते. असे करता करता कार्यक्रमाचा अखेरचा दिवस उगवला गेला.

सकाळी नऊ वाजता काल्याचे किर्तन होते, स्वामींच्या जिवनातले वैष्णव धर्माचे किंबहुना वारकरी संप्रदायाचे हे अखेरचे किर्तन होते. त्यानंतर मात्र स्वामींनी वैष्णव धर्मास तिलांजली देऊन केवळ मुळरुपास्तव शिवनामाचा जप केला त्या गोपाळकाल्याची सांगता ही दहीहंडी फोडून होणार होती, म्हणजे स्वामींनी त्यांच्या जीवनातली तपसाधनेची सुरुवात भगवान श्रीकृष्णाच्या नावाच्या गोपाळकाल्याच्या प्रसादाने केली. ते सप्ताहाचे किर्तन त्याच्या जीवनातले अखेरचे किर्तन होते. परंतु फार सुरेख स्वामींना साजेसा असाच अभंग त्या किर्तनकार महाराजांनी त्यावेळी सेवेसाठी निवडला होता. नाही तरी आतापर्यंत स्वामींनी जेही किर्तन ऐकले ते फार सुरेखच होते. त्यातील प्रत्येक ओवी ही स्वामींच्या जीवनाशी मिळतीजुळती होती आणि हेही किर्तन अगदी तसेच होते.

सुरुवातीस कट्टर वैष्णवधर्म स्विकारणाऱ्या वारकरी संप्रदायातील टाळकऱ्यांनी महाराजांनी गायलेल्या अभंगास सुर लावला व नंतर महाराजांनी कमरेभोवती पागोटे गुंडाळुन किर्तनास योग्य वेळी सुरुवात केली. महाराजांनी सेवेसाठी निवडलेला अभंग हा जगद्गुरु संतशिरोमणी तुकोबा महाराजांचा होता व त्यातला अर्थ नि अर्थ जुळताच होता. त्यांनी सेवेसाठी निवडलेला अभंग हा असा होता.

**आम्ही जातो आमच्या गावा।**
**आमुचा राम – राम घ्यावा।**
**तुमची आमची हेचि भेटी।**
**येथुनिया जन्म तुटी।**

डोकं शांत ठेवून अभंगाचा अर्थ मनातल्या मनात लावण्याचा प्रयत्न करा, आपोआप तुम्हांला अर्थ कळेल. महाराजांनी निवडलेल्या अभंगाचा मतिदार्थ असा की मी आता माझ्या माझ्या गावाला जातो किंबहुना मी माझ्या कार्यास आता सुरुवात करतो, माझा हा अखेरचा नमस्कार स्विकार करा, आपली भेट भावी आयुष्यात होणार नाही, त्यामुळेच हा अखेरचा

रामराम तुम्ही स्विकार करा, आजची तुमची आणि माझी ही शेवटची भेट आहे. ह्या भेटीनंतर मात्र आपण भविष्यात कधीच भेटणार नाही, कारण मनुष्य जेव्हा एखाद्या गोष्टीस निरोप देतो तेव्हा त्याची भेट होण्याची शक्यता भविष्यात कमी असते परंतु कधी तरी भेट होईल अशी आशा असते, पण जेव्हा मनुष्य एखाद्या भेटीस निरोप देतो तेव्हा मात्र त्यांची भविष्यात होणारी भेट कधी सफल होत नाही. कारण ज्या वेळेस तो त्यांच्या भेटीस निरोप देतो त्यावेळेस त्यांचा जन्मच एकमेकांपासून तुटला जातो. व एकाच आशय नेमका स्वामींच्या जीवनाशी हुबेहुब जुळत होता. जणु काय स्वामींच अप्रत्यक्षपणे त्या गोळवाडीकरांना व त्या दहेगावातील कुटूंबीयांना सांगत होते की, तुम्ही आता तुमच्या तुमच्या गावाला जा, मी माझ्या माझ्या गावाला आलो आहे, हा माझा अखेरच रामराम घेऊन गोळवाडीस परत जावा, ही तुमची माझी अखेरची भेट आहे व नंतर मनुष्यरुपाने आपली भेट होणार नाही. कारण येथूनच माझ्या मनुष्य देहाचा आणि तुमच्या देहाचा जन्म तुटणार आहे.

बघा हा काय सृष्टीचा चमत्कार आहे, स्वामींच्या जिवनाशी तंतोतंत पणे जुळणारा हा अभंग सेवेसाठी आणि तो ही काल्याच्या किर्तनासाठी निवडला होता, मग नंतर काही दृष्टांत वर्तविल्यानंतर महाराजांनी

**'बोलिले लेकरु। वेडीवाकुडे उत्तरे**
**क्षमा करा अपराध। महाराज तुम्ही सिध्द।**

हे चरण गायले अन् किर्तनास पुर्णविराम दिला. गोपालकाल्याचा प्रसाद घेऊन स्वामी नागेश्वराच्या परिसरात गेले व शांत पणे तेथेच एका झाडाखाली बसले. गोळवाडीकरांनी प्रसाद ग्रहण केला व जाण्याच्या तयारीस लागले व म्हणू लागले,

'बाबाजी कुठे गेले, आपल्याला जायचं आहे , वेळ होऊ राहिला, लांब जायचं आहे, 'शोधता –शोधता नागेश्वरीच्या परिसरात आले व पाहिले तर बाबा हे डोळे मिटून शांत बसले होते. गावकरी स्वामींजवळ गेले आणि म्हणू लागले..

'चला ... बाबाजी ... चला...लई उशीर होईल
घरी जायला'

यावर स्वामी हसत मुखाने उद्‌गारले,

'नाही तुम्ही जा आता, मी येथे थांबतो'.

का बरं ?

'आरे बाबाही आता तर कुठं सुरुवात झाली, मी मग ठरवन घरी कधी येयाचं! तुम्ही जावं आता'. थोडेसी नाराजी व्यक्त करुन स्वामीजवळचे ठिकाण गावकऱ्यांनी सोडले व जाता जाता मागे वळून पाहता पहात ट्रॅक्टरजवळ गेले, स्वामीं घरी का बरं येत नाही त्यांच्या घरच्यांनी ईच्यारल तर काय सांगायचं ह्या प्रश्नाकल्हीळानं गोळवाडीकरांनी अंदरसुल सोडले व गोळवाडीकडे प्रयाण केले.

नंतर एक दोन दिवसांनी स्वामींनी नागेश्वरीचा रम्य परिसर सोडला व थेट गावाच्या पूर्वेस असलेल्या स्मशान भूमीमध्ये राहू लागले. गावकऱ्यांच्या विरोधामुळे कदाचित स्वामींनी स्मशानभूमीत राहणे पसंत केले असावे आणि नाही तरी स्वामींजी हे साक्षात शिवाचे अवतार होते आणि शिव म्हणजे 'एकटे' भगवान शंकर नेहमी एकटे असत ते सर्वांपासून नेहमीच दूर असता, एकदा स्वतः भगवान शिवाला एक प्रश्न नारदाने विचारला, 'नारायण नारायण तुम्हाला एक प्रश्न विचारतो'

'विचारा – विचारा नारद मुनी'

असे हसत मुखाने शिवजीने उद्‌गारे काढले .

'देवाधि – देव महादेव तुम्ही महादेव असूनही तुम्ही गावा बाहेर का राहतात ?'

यावर सुरेख उत्तर भगवान महेशांनी नारदास दिले

'महर्षी आम्हांस गावातल्या भुतांपेक्षा स्मशनातील भुते जास्त परवडतात'. उत्तर ऐकून नारायण नारायण म्हणून महर्षीने कैलास सोडले. व हे स्वामी हे एक महान शिवअवतार होते. यामुळेच कदाचित यांनाही इतरांपासून दूर राहण्यास आवडत असावे.

स्वामींनी पहिला दिवस स्मशानात मुक्काम केला, नेहमीच्या नियमानुसार सायंकाळी सहा–साडे सहा वाजता स्नान केले, तद्‌नंतर एक तांब्याभर पाण्याने पूर्ण स्मशान भूमीस एक चक्कर मारला, त्या स्मशानभूमीचे वंदन केले व तेथेच विधी वाचण्यास बसले. त्याच दिवशी गावातील एक दोन जणांनी स्वामींचे हे नित्यक्रम बघितले व चकीत होऊन गेले. त्यांना जोरदार आश्चर्याचा चौकार बसला, त्यांनी ही वार्ता अंदरसुलच्या सरपंचास कळवली. त्याने ही स्वामींचा एक दिवस बघितला व तोही इतरांप्रमाणे चकीत होऊन गेला. चौथ्यादिवशी सरपंच इतर प्रमुख लोकांसह स्वामींजवळ गेले व त्यांचे पाय धरलेत व म्हणाले

'बाबा आमचे चुकले, आम्हांला माफ करा आणि परत नागेश्वरी मंदिरात चला बाबा... चला बाबा...'

स्वामींनी त्यांचे गाऱ्हाणे ऐकले व शिष्याची योग्य इच्छापूर्ती करणे ही आद्य गुरुचे कर्तव्य असते, याच उक्तीप्रमाणे स्वामींनी गावकऱ्यांचे ऐकले व पुन्हा नागेश्वरी मंदिरात गेले. आता येथुन पुढे नाशिक जिल्ह्यात धर्माचा व भक्तीचा प्रवास करण्यास सुरुवात झाली. स्वामींजवळ एक कफनी, एक काठी , एक बारदान एक तांब्या व पोथी – भागवत एवढेच काय ते होते. तेथे गेल्यानंतर स्वामींनी सर्व प्रथम झाडूने सर्व देवालय स्वच्छ केले. तिथे मंदिराच्या उजव्या कोपऱ्यात त्यांनी बारदान अंथरुन सर्व साहित्य ठेवले. बघा काय सृष्टीचा चमत्कार आहे. ज्या कार्यासाठी स्वामींनी ह्या भारत भूमीत अवतार घेतला ते कार्य खरे सुरु झाले होते. बघा ज्या दिवशी स्वामींनी अंदरसुल येथील नागेश्वर शिवालय गाठले त्यादिवशी भारतभूमीस स्वातंत्र मिळाले. हा योगा योग म्हणता येणार नाही कारण आता तर नुकतेच स्वातंत्र मिळाले होते अजुन धर्माचा व भक्तीचा प्रसार करायचा होता व त्या प्रसारासाठी फार

मोठी शिदोरी लागणार होती व त्याच शिदोरीसाठी स्वामी आता नागेश्वरी येथे तपसाधनेस आले होते. सर्व प्रथम स्वामींनी बारदानाची कुटीया ही नागेश्वरीच्या सभा मंडपात बांधली, तीच स्वामींच्या जीवनातील सर्व प्रथमची कुटीया होती. नागेश्वरी मंदिरा खाली एक भुयार होते व दोन छोटी छोटी देवस्थान होते. त्या देवस्थानापैकी एक देवस्थान श्री गुरुदत्ताचे होते तर दुसरे देवस्थान श्री विठ्ठलाचे होते. स्वामींनी आता ... शिवा... शिवा... शिव.... शिव... हा जप करण्यास सुरुवात केली म्हणजेच शिवभक्तीस सुरुवात केली तर वैष्णवपंथाच्या पंढरीच्या वारीस तिलांजली दिली व स्वामी आता पूर्णत: शिवभक्तीत विलीन झाले होते. तेथे स्वामींपूर्वी एक सहादुबाबा नावाचे पुजारी राहत होते. तेही एक शिव भक्त होते . परंतु त्यांची पुजा ही स्वामींइतकी खडतर होती असे म्हणता येणार नाही. परंतु तेही एक थोर शिवभक्त होते हे लक्षात ठेवा, सुरुवातीच्या कालाखंडात स्वामींचे प्रवास गाणे हे असे होते. पहाटे चार वाजता ब्रह्ममुहूर्तावर उठणे, नागेश्वर बाबाला थंडगार पाण्याने कोळगंगेत स्नान केल्यावर धुवणे, पुजा अर्चा झाल्यावर सभा मंडपाच्या कोपऱ्यात बारदानावर बसून प्रतिदिन एक अध्याय वाचणे, अध्याय झाल्यावर तेथे खाली असलेल्या भुयारात जावून जपाला बसणे, सायंकाळच्या पाच वाजता भुयारातून सभा मंडपाकडे येणे, नंतर देवालयासह सभा मंडप साफ करणे, तेथून पुढे काठीच्या आधारावर कोळगंगेकडे जाणे पुन्हा तिच्या स्नान करणे, तद्नंतर नागेश्वरास पाणी घालणे, विधी वाचणे व सायंकाळी गावकऱ्यांनी आणलेले एक कप दुध घेणे व पुन्हा त्याच नागेश्वरीच्या चरणाजवळ शांत निद्रेत झोपी जाणे असाच नित्यक्रम स्वामींनी सुरुवातीच्या काळात ठेवला. स्वामी तपसाधनेत असतांना मौन धरत होते, ही सर्व तपसाधना स्वामींनी त्या नागेश्वराच्या भुयारात व त्याच्या सभामंडपात केली. स्वामींना येथे राहून जवळ जवळ वर्ष झाले असावे तिकड गोळवाडीकरांनी आप्पासाहेबांना सांगितले की बाबाजी तेथेच रहाणे पसंत करतात व कदाचित ते परत दहेगांवी येऊ शकतात पण मात्र १९४९-५० च्या दरम्यान वडील, बाजीराव पाटलासह काही नातेवाईक घेऊन नागेश्वरी येथे आले. वडील आले तेव्हा स्वामी सभामंडपात पोथी वाचत होते, वडीलांची डोळे रागाने लाल झाले तर चुलत्यांची तळपायाची आग मस्तकाला जाऊन भिडली, अशातच त्यांचा एक नातेवाईक बोलला,

'चाल घरी'

स्वामी हसत म्हणाले, 'घरी येतो पण आधी दर्शन घेऊन येतो.'

स्वामीं आत गेले तर बराच वेळ झाला तरी बाहेर आले नव्हते, घरातील नातेवाईक मंडळी ही सभामंडपात बसून कंटाळली होती, तितक्यात बाजीराव पाटील रागाने ओरडले,

'चला रे आत, हा कसा बाहेर येत नाही तेच पाहू.'

काही क्षणांचाही विलंब न लावता सर्व मंडळी उठली व मंदिराच्या उंबरठ्याजवळ जमा झाली, समोर बघताच एक दहेगाववाला गावकरी जागीच खाली बसला, दुसऱ्याचे

डोळे गरगर फिरु लागले, मन फडफडून आप्पासाहेबांना घाम फुटला तर बाजीराव पाटील उंबरठ्यापासून दहा फुट मागे सरले व स्वामींना दहेगांवी नेण्याचा निर्णय त्यांना काही सेंकदात बदलला.

आम्ही स्वर्गवासी ।
आलो याची कारणासा ।
बोलीले ऋषीकेशसाचे भावी वतीवया ।

ह्या तुकोबारायाच्या ओवीनुसार स्वामींनी आता त्यांच्या अवतारास सुरुवात केली होती. आणि म्हणूनच त्यांना घेण्यास आलेल्या गावकऱ्यांची ही परिस्थिती झाली होती. कारण त्यांनी जेव्हा नागेश्वर देवालयाच्या उंबरठ्यावरुन स्वामींकडे बघितले तेव्हा स्वामी सिध्दासण घालून नागेश्वरजवळ बसले होते व एक पाच फणिचा नाग स्वामींना विळखा घालून विराजमान झालेला होता. यावरून असे दिसून येते की स्वत: शिवानेच त्यांच्या घरातील व गावातील सदस्यांना दाखवून दिले की हा कुणी सर्वसाधारण माणूस नाही, आणि मग काय स्वामींना घेण्यास आलेले गावकरी तोंडातून एक शब्दही न काढता हातपुसत नि धोतराला आवरत दहेगावी परत आले. वा... काय प्रभुची लिला होती. दहेगांवी परत आलेल्या भाऊबंदानी ही बातमी जशीच्या तशी गावातील लोकांना सांगितली व त्यांनाही स्वामींचा आदर्श डोळ्यापुढे ठेवून त्यांचा एक आशिर्वाद मिळावा म्हणून स्वामींनी स्थापित केलेल्या विठ्ठल रुख्माईसाठी एक मंदिर बांधायचे ठरवले १९५३-५४ मध्ये एक छानसे छोटेसे पण अतिसुंदर देवालय बांधले व ब्राम्हणाच्या हातून शुभमुहूर्तावर त्या मुर्तीची प्रतिस्थापना केली. बघा काय दृष्टांत स्वामींनी भाऊबंदांना व गावकऱ्यांना दिला. या अगोदर डिसेंबर १९५१ मध्ये स्वामींनी एक अंदरसुल येथील भक्तांस त्या मुर्ती घेण्यास दहेगावी लावले होते परंतु दहेगाववाल्यांनी त्या दिल्या नाही. त्यावेळेस दहेगाव गावकरी मंडळ बोलले होते की, स्वामींची तेवढीच एक आशिर्वादाची प्रतिमा आमच्या जवळ आहे, आणि ती तुम्ही नेऊ नका. मग स्वामींनी पुन्हा दोन छोट्या छोट्या मुर्तीची स्थापना नागेश्वरात केली होती. इस. १९५२ पासून स्वामीजी अत्यंत कडक रुपात तपसाधनेत विलीन झाले होते.

स्वामींचे विधी, आरती, वाचन, पठण, पूजन, नमन फार गतीने वाढले कारण आता त्यांना केवळ तोच ध्यास होता. भगवान शिवाचे पूर्व छत्र त्यांच्या माथ्यावर होते. मागील कालखंडासारखे कुणी विरोधक नव्हते आणि शिवाय आता एक विलोभनीय स्वातंत्र्यही भारत भूमीस लाभले होते. व आता फक्त जेही करायचे ते कार्यासाठीच करायचे एवढाच ध्यास ह्या योग्यास लागून राहिला होता व यासर्वामुळे ते आता यथायोग्य भक्तीस लागले होते. आत्तापर्यंत घेत असलेला अल्पफलहार त्यांनी केव्हाच त्यागला होता. व जीवनातील सर्व घटनेत बदल करुन वेगवेगळ्या पुरणास जवळ केले, योग्य वेळी योग्य गोष्टीस त्यांनी महत्व दिले होते. ईश्वरभक्ती हीच केवळ त्यांची आशास्थाने होती. आता

स्वामी सकाळी स्नान केल्या केल्या गीतेचा अध्याय वाचू लागले होते. प्रतिदीन एक अध्याय वाचू लागले होते, प्रतिदीन एक अध्याय वाचावा असा त्यांचा बाणा होता म्हणून सकाळी दहा वाजेपर्यंत रोज ते एक अध्याय वाचत होते. त्यानंतर ते १४ गायत्री श्लोक म्हणत व तेच श्लोक १९६५ मध्ये स्वामी जातेगावात असतांना लिहीले गेले. श्लोक झाल्यानंतर गावातील वृध्दांना योग्य अशा विषयावर साधी बोली वापरून ते प्रवचन देत असे, लोकांना भक्तीची ओढ लावण्यावर प्रवचन करत असत, लोकांना आपल्या धर्माचा महिमा सांगत असत, लोकांच्या मनात दुर्गुणाऐवजी सगुणांची भरती करत असत, त्यानंतर स्नान करुन भुयारात जात असे, नंतर पुन्हा स्नान करून विधी वाचत मग सहादु बाबा फलोहार करत तर स्वामी केवळ एक कप लोकांनी आणून दिलेले दूध घेत, पुन्हा गावातील लोकांना अनमोल सल्ला देत असायचे, 'बाबा हो... ज्याने विधी वाचली तो खरा पुण्यवान होतो...'. एवढाच पाढा सर्वप्रथम त्यांनी अंदरसुलवासीयांना शिकवला कारण एकदा विधीची सवय झाली की आपोआप विधीची महती त्यांना कळेल व एकदा विधी कळाली की ते आपोआप ईश्वरसेवेत लागतील असे त्यांना वाटले असावे म्हणून कदाचित त्यांनी सर्वप्रथम गावकऱ्यांना विधी वाचण्यास लावली व नाही तरी तुकोबा महाराज म्हणतात..

ज्याचे मुखी विधी जाण,
तोचि खरा पुण्यवान ।।

प्रवचन दिल्यावर स्वामी पुन्हा पद्मासन घालून तपश्चर्येस बसत, तपसाधनेत मंत्रमुग्ध असतांना स्वामी नेहमी डोळे मिटून पद्मासन घालत होते. वर्षामागून वर्षे जात होते, स्वामी गावकऱ्यांच्या मनात भक्ती रुजवून रोज गीतेचे एकेक अध्याय वाचून रात्रंदिवस तपसाधनेत मग्न राहून ईश्वरास प्राप्त करण्याच्या ओघात येऊन पोहचले होते, स्वामींनी १९५४ नंतरची सर्व तपसाधना ही एक कप दुध व एक लवंग या पदार्थावर केली, स्वामींनी बरेच वर्ष तपसाधना ही केवळी जास्तीत जास्त एका लवंगेवर केली. स्वामीनी तपसाधनेत नुसती गिता पठण अथवा गायत्री श्लोक कथन नाही केले तर त्यांनी शिवपुराण, योगासन, पुराण, ऋग्वेद, सोमवेद, शिवलीला , योगासन व प्राणायाम यांचा अभ्यास केला. स्वामी सहसा जास्तीत जास्त प्राणायम करत. प्राणायाम जास्तीत जास्त ते कामी येतो हा वैज्ञानिक दृष्टीकोन आहे. हा आताचा वैज्ञानिक दृष्टीकोन स्वामींनी त्याकाळात भक्तांना सांगितला होता पण मात्र सांगण्याची भाषा शैली थोडी वेगळी होती. बाबांनी ही इतकी सारी पुराणे वाचून वाचनाचे महत्व जगाला वेळीच पटवून दिले, ईश्वर भक्तीचे वेगवेगळे मार्ग दाखवून दिले व ही सारी पुराणे वाचता वाचता एक पाय निकामी असूनही अठरा अठरा तास एका लवंगेवर तपासाधना करून ईश्वरास प्रकट होण्यास भाग पडले. स्वामींनी तपसाधनेत गीतेस खुपच असाधारण महत्व दिले, भागवत हा मनुष्याच्या प्राण आहे हे त्यांनी भारतभूमीरुपी देवघराला सिध्द करून दिले, स्वामी हे अत्यंत असामान्य खडतर तपस्वी होते, दैव प्राप्तीसाठी

ह्या हवेत उडणाऱ्या मनुष्यरुपी पाखरांनी दाखवून दिले, स्वामी दिवसेंदिवस त्यांचे व्रत अधिकच कडक करत होते, त्याची साधना अधिकच कडक व खडतर होत होती. स्वामी जेव्हा भुयारात तपश्चर्यासाठी जात असे तेव्हा ते तिथे ध्यानस्थ होते. ते जपतप ही करायचे आणि शिरसासन व पद्मासन ही करायचे, बाबाजींनी आता अधिक खडतर तपश्चर्या सुरु केल्याने स्वर्गमंचनी विराजमान झालेल्या सर्व देव लोकांना चिंता लागली असावी व स्वतः ब्रम्हा विष्णुंनी स्वामींच्या भक्तीची उकल काढण्यासाठी थेट कैलासात निरुपगामान केले असावे व तिथे सांगितले असावे.

'हे देवाची देव महादेव, हे कैलासधिपती भगवान शंकर तुम्ही अवतार घेतल्या मनुष्यरुपी मानसाने मृत्युलोकात फार खडतर साधना केली आहे व आज जवळजवळ सहा सात वर्ष झाली व केवळ एक कप दुध नी एक लवंग वर त्याने अठरा अठरा तास तपश्चर्या केली त्यामुळे आता काय करावे हा प्रश्न आम्हांला लागला आहे व याचे उत्तर फक्त तुम्हीच देऊ शकतात. कारण तो जर्नादन नामक तरुण भक्त तुमचीच आराधना करत आहे.'

अशा विकल्पीय परिस्थितीत भगवान शंकरालाही प्रश्न पडला असावा. तितक्यात नारायण नारायण म्हणत स्वतः ब्रम्हपुत्र महर्षी नारद तिथे आले असावे व स्वतः शिव शंकरास म्हटले असावे,

'काय देवाधी देव आता काय प्रश्न पडला तुम्हाला? स्वतः विष्णु ऐवजी तुम्ही जन्म घेतला ना! आता ह्या कलियुगात खडतर तपही केले. मग आता काय झालं प्रसन्न व्हायला.' खरंतर भगवान शिव थोडेसे हसले व म्हणाले,

'अजुनही त्या भक्ताची परिक्षा पुर्णतः झाली नाही पण हे बघा मूनी माझा भक्त जेथे असेल तेथे मी जाईल' व यानुसारच तुकोवा महाराज एका अभंगात म्हणतात..

॥ देव आहे तुझ्यापाशी
पीर तु जागा चुकलाशी
माझे भक्त गाती जेथे
नारदा मी उभा तिथे ।

व खरोखर तेच झाले स्वामी त्या अंदरसुलातील भुयारात तपसाधनेत मग्न असतांना एक जबरदस्त चमत्कार त्या नागेश्वरी मंदिरात झाला. सायंकाळची वेळ होती, एवढे वातावरण निवळले असतांनाही वातावरणात गजबसा शुकशुकाट नांदत होता, भगवान श्रीकृष्णाच्या मामाने पर्यायाने कंस मामाने यशोदाच्या पोटची मुलगी देवकी मातेची ग्राह्य धरून गगन चुंबी निळ्याभोर आकाशात फेकली होती. त्यावेळी एक आकाशवाणी झाली होती अगदी हुबेहुब तशीच आकाशवाणी त्या नागेश्वराच्या दरबारी झाली, ती एक गजबशी आकाशवाणी होती. ''जा बालका जा... जा.. .तुझी तपश्चर्या पुर्ण झाली. तुला आता गुरु करावा लागेल.'' अशी भगवान शिवाजीची आकाशवाणी ऐकताच नारदांनी कैलास सोडले, तर मृत्युलोकात

स्वामी जनार्दनांनी सरळ सरळ नागेश्वरासमोर हात जोडले. स्वामींच्या तपश्चर्येस आता पूर्णतः फळ मिळाले होते मात्र एका विलोभनीय गुरुचा आता त्यांना शोध घ्यायचा होता. कारण गुरु शिवाय खरे फळ कधीच मिळत नसते. कारण जरी एकलव्याला द्रोणाचार्यांने शिष्य म्हणून मान्य केले नसले तरीही एकलव्यासारख्या बालकास गुरुची महिमा माहित होती म्हणून त्याने भर जंगलात द्रोणाचार्यांची मुर्ती बनवली व त्या मुर्तीकडून त्याने अप्रत्यक्षरित्या धर्नुविद्येचे धडे घेतले, एवढेच नाही तर बालपणी स्वतः विठ्ठलास भोजन करण्यास लावणारे श्री संत नामदेव महाराज फार श्रेष्ठ ठरले होते परंतु मात्र तेच नामदेव महाराजांनी गुरु केले नव्हते आणि पुढे त्यांनी विठोबा खेचर यांना गुरु केले ह्या गुरुचा महिमा किती गायला तरी थोडाच आहे. कारण चौदाशे वर्ष आयुष्य लाभणाऱ्या श्रीक्षेत्र पुणतांब्याचे चांगदेव महाराजांना सोळाव्या वर्षी ज्ञानेश्वरी लिहिणाऱ्या लहान ज्ञानेश्वरांनी एका निवृत्तीनाथ ह्या गुरुच्या आशिर्वादावर हारवले होते व त्यास गुरु शिवाय तपश्चर्या निष्फळ आहे हे दाखवून दिले होते. तद्नंतर त्यांनी ज्ञानेश्वरांच्या लहान भगिनीस म्हणजे मुक्ताबाईस एक गुरुचे स्थान देऊन गुरु मानले. हा आहे एका गुरुचा महिमा व आता तेही ह्या सद्गुरुंना हवे होते. ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर असतांना त्यांनी लक्ष्मणबुवा वाघळीकर यांना गुरु मानले होते. परंतु ते एका वैष्णव पंथाचे शिष्य होते. आता स्वतः स्वामींनी वैष्वण धर्माची शिकवण घेऊन शिव नामाचा जप करुन शिवधर्माचा पाढा त्या अंदरसुलात गिरवला असल्याने त्यांनाही आता गुरु करावा लागणार होता आणि हा थोर शिवभक्त तपश्चर्या करता करता गुरुला भेटण्यांची इच्छाही मनोमन बाळगुन होता. मात्र आकाशवाणी झाल्यानंतर लगेच त्यांनी तपश्चर्येस तिलांजली दिलेली नव्हती उलट ती तपसाधना दिवसेंदिवस अधिक खडतर करण्याचा प्रयत्न करत होते.

अंदरसुल येथे तपसाधना चालु असतांना स्वामींनी अलौकिक शक्तीच्या प्रेरणेने प्रेरीत होऊन वेद, शास्त्र, पुराण यांचे वाचन करत असे. एवढे असूनही त्यांची रसाळ वाणी जनतेस मार्गदर्शन करण्याची कार्य पादाक्रांत करत होती. तपसाधना चालू असतांनाच एके दिवशी त्यांच्या मनात एक वेगळाच विचार आला व त्यामुळे ते त्या दिवशी त्यांच्याकडे येणाऱ्या भक्तांची वाट पहात होते. गंगाबाबा, आसाराम बुवा व पांडुरंग बाबा सोनवणे हे त्यांच्या कसेबसे खरे पात्र ठरलेले शिष्य होते. परंतु त्या दिवशी एकानेही मंदिरात अजुनपर्यंत हजेरी लावली नव्हती. स्वामी आता त्यांच्या शिष्यांच्या प्रतिक्षेत एकरुप झाले होते. मात्र शिष्यांनी अजुनपर्यंत तरी नागेश्वराच्या दरबारात उपस्थिती दर्शवलेली नव्हती. स्वामींना त्यावेळी त्या शिष्यगणांना नेमके काय सांगायचे होते हे येणारी वेळच दर्शविणारी होती. परंतु काहीतरी महत्त्वाचे सांगायचे होते हे निश्चितच होते, स्वामी उठून भुयारात जाणार तितक्यात आसारामजी आले व म्हणाले, ''जय बाबजी'' बाबांनी उद्गार काढले, 'कायरे आसाराम इतका येळ कुठ होता? अरे बाबा माणसाने सर्वात जादा महत्त्व येळेला दयावं कारण एकदा

जर येळ गेली तर फिरुन वापस येत नाही',
'चुकलं... चुकलं बाबाजी', अस म्हणत गंगाबाबा व पांडुरंग बावा सोनवणे देवालयात आले.

''बाबा हो मला तुमास्नी एक सांगायचं आहे, तुम्हाला आवडल तर पहा नाही तर माझे काय नाही.''

''काय बाबा?'' सांगा लवकर फार अतुरतेने गंगाबाबाने प्रश्न विचारला तर पांडुरंग बाबाने उत्तर ऐकण्यासाठी उजवा हात उजव्या कानाच्या खालच्या बाजुस लावून कान टवकरावला,

अशातचं स्वामी शांतपणे उद्‌गारले,

'मला तिर्थ यांत्रेला जायचे आहे, कुणाला माझ्याबरोबर येण्याचे आणि कोणाला नाही तेवढं सांगा आणि लागा कामाला'.

सर्वांनी विचार केला व उत्तर दिले, 'आम्हाला साऱ्यांना येयाचे आहे तुमच्यासंग.' भक्ताचे हे खंबीर उत्तर ऐकून स्वामी सद्‌गदित झाले. त्यांना खरोखर खुप आनंद झाला. स्वामींचे कार्य हे जिजाई पूत्र शिवाजीसारखेच होते, एवढेच शिवाजी राजे हिंदू धर्माचा प्रसार करण्यासाठी सवंगड्याबरोबर जाऊन युद्ध करत व तेथे गड जिंकून हिंदू धर्माची हिंदवी ध्वजा रोवत होते. तर स्वामी त्यांच्या भक्तांबरोबर वेगवेगळ्या तिर्थक्षेत्री जात होते, तेथे शिवालयेच बांधत होते व तेथे धर्माचा नि कार्याचा प्रसार करत होते. आता हा तपसाधनेत विलीन होऊन भगवान शंकराची आकाशवाणी ऐकणारा म्हाळसाई पूत्र जनार्दन स्वामी त्याच्या खऱ्या खुऱ्या कार्यासाठी भक्तांसह भक्तीची शिदोरी घेऊन तिर्थक्षेत्रांना भेट देण्यासाठी रवाना होणार होता.

योग्य असा मुहूर्त स्वामींनी काढला व प्रवासाचा दिवस निश्चित केला. गावातील लोकांना थोडेसे विशेषच वाटले. कारण स्वामींना अगोदरच एकपाय साथ देत नव्हता तरीही त्यांनी आत्तापर्यंत बरेच वर्ष एक कप दुध व एक लवंगावर काढले होते व आता हे बाबाजी तिर्थक्षेत्री चालेले होते. बाबांची तिर्थक्षेत्रांना भेट देण्याबाबत वेगळीच व्याख्या होती. बाबा सहजच चालू-चालू भक्तांना उपदेश करायचे, 'एखाद्या तिर्थक्षेत्री आपल्यासारखे सामान्य माणसं गेले तर आपल्याला पूण्य लाभतं पण जर एखाद्या साधू संताने जर एखाद्या तिर्थक्षेत्राला भेट दिली तर ते तिर्थक्षेत्रच पूनीत होतं.' व याच आशयानुसार स्वामींनी तिर्थक्षेत्री जाण्याचा निर्णय घेतला असावा. भगवंताशी भेट घेण्याचा अत्यंत जवळचा मार्ग म्हणजे भक्ती किंबहुना तिर्थक्षेत्री जाऊन मोकळ्या मनाने अथवा उदार अंत:करणाने दर्शन घेणे व स्वामींनी हाच भक्तीचा अनोखा पाढा भक्तांना सांगितला. घुष्णेश्वर, त्र्यंबकेश्वर, परळी, वैजनाथ, औढानागनाथ, रामेश्वर व महाकालेश्वर इत्यादी तिर्थस्थळांना भेट देण्याचा त्यांनी निर्णय घेतला. स्वामींनी सर्व प्रवास हा रेल्वेने केला. स्वामी प्रवासात नेहमीच एक बारदाण, एक

कफनी, एक तांब्या, विधी-पोथी, भागवत व पायाला एक आधार म्हणून एक काठी बाळगत असे. साधरणत: त्यांच्या सर्व वस्तू काठी सोडून शिष्यगणच हातळत होते. स्वामी येवल्याहून रेल्वेत बसले सर्वप्रथम वेरूळ येथे घृष्णेश्वराचे दर्शन घेतले. लहानपनापासून पिंडी तयार करुन त्यावर अभिषेक घालून बेल वाहण्याचे काम स्वामींनी केले असल्याने वेरुळ येथे गेल्या-गेल्या त्यांनी सर्वप्रथम तेथील घृष्णेश्वराच्या दरबारात अभिषेक करुन बेल पान वाहिले. स्वामींचा प्रवासातही शिव-शिव-शिव चा बोल दिसून येते. स्वामी घृष्णेश्वरांचे दर्शन झाल्यावर तत्काळ पुढेच शिवालये घेत होते. जणु काय त्यांना त्यांच्या कार्याची जबरदस्त उत्कंठा लागून राहिलेली होती. का? कुणास ठाऊक पण त्याच्या मनात शिवाविषयीच्या भावनाच अजोड होत्या. वेरुळ येथील घृष्णेश्वरांचे दर्शन घेतल्यानंतर स्वामी भक्तांसह औढा नागनाथ येथे गेले औढा नागनाथ नंतर स्वामी परळी वैजनाथ, गाणगापूर, पंढरपूर, देहू, आळंदी करुन भिमाशंकर हे देवस्थान हृदयात सामावून थेट अंदरसूलात पोहचले. अंदरसुलात पोहचल्यांनंतर स्वामींनी पुन्हा त्यांचा नित्यक्रम पुर्वापार चालू केला. मनुष्य कोठेही जावो परंतु परत आल्यानंतर पुन्हा ज्याच्या त्याच्या कामास लागणे हाच खरा त्याचा मृत्युलोकी येऊन उपयोग होतो. आणि हाच खरा गुणधर्म समजावा. अगदी तसेच मंदीरात आल्यानंतर पुन्हा त्यांनी त्यांचे भुयार आणि त्यांचे पुराण अवलंबले. आता प्रवासाच्या दगदगीने व स्वामींच्या खडतर तपश्चर्येने त्यांची प्रकृती फारच बेजार झाली होती. अंदरसुल येथील शिष्यगणाच्या विनंतीनुसार स्वामींनी कसेबसे उपचार घेतले परंतु ते वैदयकिय उपचारा अगोदरच बरेचसे बरे झाले होते. परंतु स्वामींचा एक पाय जसा न तसा पुर्ववत निकामी झालेला होता. स्वामींनी १९५५ मध्ये एकदा तिर्थक्षेत्री भेट दिल्यानंतर १९५६-५७ मध्ये पुन्हा तिर्थक्षेत्र भेटी द्यायच्या होत्या. पहिल्या बाजीराव पेशव्यासारखे स्वामींना आता उत्तर हिंदुस्थानात जायचे होते. जसे बाजीरावाला दक्षिणेत कर्तृत्व व उत्तरेत प्रभुत्व करायचे होते अगदी तसेच स्वामींना दक्षिणेत शिवालये स्थापन करायचे होते व उत्तरेतील शिवालयांना आत्मसात करायचे होते. याच त्याच्या विशाल धोरणामुळे त्यांनी इ.स. १९५६ च्या अखेरीस व इ.स. १९५७ च्या पूर्वाधात उत्तरेतील तिर्थक्षेत्रांना भेट देण्याची मोहिम हाती घेतली. स्वामींनी पुन्हा एकदा त्यांच्या शिष्यमंडळींना उत्तरेतील तिर्थक्षेत्रांबाबतचे अहवाल सुनावले. त्यात आता मात्र शिष्यांनी थोड्या प्रमाणात विरोध दर्शविला. परंतु त्यांच्या विरोधी धोरणात त्यांची विशेषत: काहीच चुक नव्हती. कारण त्यांना वाटत होते की, स्वामींना एका पायाचा आजार आहे. त्यातले त्यात ते प्रवासात मौनी असतात, तद्नंतर तिन वेळा गार पाण्याने स्नान त्यांच्या पाचवीला पुंजलेले होते. एवढे करुनही प्रवासात एक लवंगेवर तपश्चर्या चालूच होती, यांची कारणीमीमांस लक्षात घेऊन त्यांनी स्वामींना मृगजळाइतका विरोध केला, पण तरीदेखील स्वामींचा हट्ट होता. त्यांना तरी काय माहिती हा कोण अवतार आहे? स्वामी त्यांचा पुसटसा विरोध ऐकून उत्तरले,

''काय नका येऊ मी माझा जातो माझा-माझा.''

शिष्यगणांना वाईट वाटले व पुन्हा बाबाजीचे दर्शन घेऊन ''चला.... जाऊ या बाबाजी,'' असे उत्तरले.

बाबाजी बोलले आपले त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान होईल व त्यांनंतर ओंकारेश्वर येथे अनुष्ठान होईल. बाबाजींच्या कार्याचे त्यांच्या आवताराचे सर्वात पहिले अनुष्ठान हे पुण्यवान पवित्र्य अशा त्रंबक महाराजांची नगरी त्रंबकेश्वर येथे इ.स. १९५६-५७ मध्ये झाले. त्रंबकेश्वर येथील एका सप्ताहाचे अनुष्ठान काही निवडक भक्तांसह झाल्यानंतर स्वामींनी नवरात्राच्या शुभमुहूर्तावर ओंकारेश्वर येथे अनुष्ठान करण्याचे जाहिर केले. व नवरात्राच्या आगोदरच ते भक्तांसह ओंकारेश्वर येथे पोहचले. परंतु ओंकारेश्वर येथे स्वत: भगवंताने स्वामींची इतकी मोठी कसोटी पाहिली कि त्या परिक्षा इतका बिकट प्रसंग स्वामींच्या जीवनात कधीच आला नव्हता. पण साक्षात दैव अवतारी पुरुष असल्याने त्यांना मारणारा तो आणि तारणाराही तोच. याच त्या उक्तीनुसार दैवाने स्वामीची एक अंतिम चाचणी परिक्षा बघितली. आत्तापर्यंतचा बराच विरोध त्यांनी सहन केला, पार्वताबाईशी विवाह, आईची शपथ, आईचे महानिर्वाण, इतरेतर अशा अनेक अडीअडचणी स्वामींच्या जिवनात एका पाठोपाठ एक येऊन गेल्या. परंतु त्यांच्या मुळातच वैराग्याची रसशिला होती, तर तपसाधनेची शिदोरी होती. याच कारणामुळे भर हिवात स्वामीचे एक पाय गेला पण स्वामींनी त्यांच्या हाताने बांधलेले बैल जसेच्या तसे राहिले. स्वत: देवाला एखादे कार्य एखाद्या संताकडून करुन घ्यायचे असेल तर तो प्रथम त्यांची घनघोर परिक्षा बघतो पण नंतर मात्र सर्व काही कार्य त्यांच्याकडून करुन घेतो.

देव घरात चोरी झालेल्या तुकोबा महाराजालाच 'देव' शोधायला लावतो व त्यालाच देव बनवतो. ही सारी लिला विश्वविधात्या भगवंताची आहे व ह्याच एका खडतर परिक्षेत ह्या दैवाने आता स्वामींना वेधले होते. वधले ते वेधले पण परिक्षेत पास करुन तारलेही. ठरल्याप्रमाणे शुभ अशा प्रसंगी गंगाबाबा पांडुरंग देवा व आसाराम इत्यादींसह स्वामी इ.स. १९५६-५७ मध्ये ओंकारेश्वर येथे उतरले. स्वामींच्या जीवनातले हे दुसऱ्यांदा चारिधाम होते.

ते ओंकारेश्वर येथे उतरल्या-उतरल्या त्यांच्यासह आलेल्या शिष्यांना म्हणाले, ''बाबाहो जर आपण पवित्र नदीत स्नान केले तर आपण पवित्र होतो. कारण जे मोठे-मोठे थोर साधू संत होऊन गेले, त्यांनी सगळ्यात आधी ह्या पवित्र नदीत स्नान केले होते व त्यांनी तिर्थक्षेत्र केलेले तिर्थक्षेत्र हे पुण्यवान झालेले असते. त्यामुळेच आपल्या सारख्या पामरांसाठी ते तीर्थ जीवनातल्या यशाचा अखेरचा मुक्काम करतो. त्यामुळेच आपण ज्याही पवित्र ठिकाणी जातो व त्या ठिकाणी जर तिथे नदीअसेल तर तिथल्या नदीत स्नान सगळ्यात आधी करायचे आणि मग नंतर तिथल्या देवाची पुजा करायची व ह्याच तिर्थक्षेत्राला पुन्हा

एकदा पवित्र करण्यासाठी ही जर्नादन नामक महापुण्यवान विभुती आता शिवशंकराचे पवित्र ठिकाणी ओंकारेश्वर येथे उतरली होती. अशा हया महान संताचा जिवन प्रवास हया शांतीच्या फुलातून रेखाटण्यासाठी माझ्यासारख्या पामराचा पेनही अपूर्ण आहे त्या पेनातील शाई ही जणु काय स्वामी जर्नादनी पाठवलेली एक संजीवनी ठरते मग काय परमेश्वराने दान म्हणून दिलेली उजव्या हाताचे बोटेही अपुरे ठरतात. ''शब्द'' नियमीत पुरवणारी बुद्धी स्मित होते. नेहमी छेडल्या जाणाऱ्या हृदयाच्या तारेतून केवळ भक्तीचाच नाद होतो. रक्ताला वाहून नेणाऱ्या पेशी-पेशीत फक्त जनार्दन हेच नाव उमटते वआपोआप कळत-नकळत हात हृदयापाशी येऊन जोडले जातात. स्वामी मध्यान्हाच्या सुमारास ओंकारेश्वर येथे उतरले. पंरतु त्यांच्यातला आसारामजी बाबा कसे तरी कळत-नकळत चुकून जातात. स्वामींना उतरल्या-उतरल्या गंगा बाबा सांगतात कि त्यांच्यासह आलेले आसारामजी रस्त्यात चुकून जातात. पण स्वामींनी डोळे मिटून गंगाबाबास सांगितले की, तो बरोबर मुक्कामाच्या जागी येऊन पोहचले व खरोखर तेच झाले. सायंकाळच्या ४ ते ५ च्या सुमारास आसारामजी मुक्कामाच्या जागी येऊन पोहचतात. बाबांनी नेहमीप्रमाणे त्यांचा मुक्काम शिवालयाशेजारी करायचे ठरवला कारण आता पर्यंत स्वामी जेथेही जात होते ते त्यांचा मुक्काम नेहमी शिवालयात करत असत, व हयाही वेळी त्यांनी त्यांचा मुक्काम हा महाकळंकेश्वर हया मंदिरात करायचा ठरवला, कोणतेही तिर्थक्षेत्र असो अथवा एखादे साधे देवालय असो परंतु तेथील वाहणाऱ्या सरीतास काही अनन्य साधारण महत्व प्राप्त झालेले असते आणि विशेषत: कोणत्याही ठिकाणचा उगम हा नेहमीच नदीतीरी झालेला असतो. नाहीतरी प्राणी म्हणून सर्वात प्रथम उत्पत्ती होणाऱ्या 'अमिबाची' निर्मीतीही ही नदीच्या पाण्यातूनच झालेली आहे. किंबहूना एखाद्या संस्कृतीचा अथवा एखाद्या गावाचाही उगम हा नदीच्या किनारी झालेला आढळून येतो. हया भारतभुमीसारख्या सिंधू संस्कृतीचाही उगम हा सिंधु नदी तिरावरच झालेला आहे, हे ही विशेषच मानले जाते. म्हणून स्वामींनी त्यांच्या जिवनात ''सरीतास'' एक विशेष महत्व दिले आहे. मग ती सरिता साक्षात भगवान शिवाच्या मस्तकातून निर्माण होऊन त्र्यंबकेश्वर येथे उगम पावून श्रेष्ठठरणारी गोदावरी असो अथवा प्रभु रामचंद्र व बंधु लक्ष्मणास सामावून घेणारी शरयु असो किंबहुना भगवान श्रीकृष्णास कालियानिर्मित्ताने स्नान घालणारी ''यमुना'' असो व कोणतीही सरीता असो मात्र ती स्वामींसाठी नेहमीच पवित्र ठरलेली असायची.

आता स्वामींनी त्यांचा मुक्काम ज्या महाकळेकेंश्वर या शिवालयात केला होता अशा त्या महाकळेंकेश्वर शिवालयाजवळून ''नर्मदा'' नदी वाहण्याचे कार्य सातत्याने पार पाडीत होती. 'स्वामी-नदी-शिवालय' यांच्यात काहीतरी विशिष्ठ साधर्म्य होता, कारण स्वामी कोठेही जावो तिथे ते त्रिकाल स्नान करुन पुजा नियम विधी वाचत असे. मग ते साधनेत लीन असो अथवा चारिधामात मग्न असो. नदीतून स्नान करुन घेणे हा त्यांच्या

जिवनातला अमुल्य प्रसंग असायचा. परंतु स्नान करत असतांना १०० मत्रांचा जप झाल्याखेरीज पाण्याबाहेर येण्याचे नाही हा स्वामींच्या स्नानाचा सर्वात पहिला नियम होता. तरीदेखील ''देह जावो अथवा राहो'' हया हाकाटीनुसार स्वामींनी त्यांच्या स्नान नियमात कधी बदल केला नव्हता. ओंकारेश्वर येथील पहिला दिवस हा भिक्षा मागून गेला, स्वामींना दुसऱ्या दिवसापासून तेथे अनुष्ठान सुरु करायचे होते. स्वामींच्या आयुष्यातील दुसरे अनुष्ठान हे महाकळेंकेश्वर येथील शिवालयात झाले आहे. ठरल्याप्रमाणे नवरात्रीच्या पवित्र मुहूर्तावर दुसऱ्या दिवशी स्वामी महाकळंकेंश्वराच्या शिवालयात अनुष्ठानास बसले. उगवणारा सुर्य नर्मदेत कसा विलीन व्हायचा हेच कळत नव्हते व अशा रितीने अनुष्ठाचे पहिले तीन दिवस कसे पार पडले हे त्या महाकळंकेश्वरास सुध्दा कळाले नसावे. अनुष्ठानाचा चौथा दिवस उगवला, निसर्गनियमानुसार मध्यान्हही झाला, मध्यान्हाचे स्नान आटोपून स्वामी तपसाधनेस बसले, तीन चार तास तपसाधना झाल्यानंतर स्वामी उठले, आपली कफनी व तांब्या घेऊन नदीकडे स्नानासाठी निघाले. पाच साडे पाचचा सुमार ओलांडला होता. पशु–पक्षी सर्वजण स्वामींची स्नानसंध्या बघण्यासाठी अतुर झाले होते. नर्मदेचे पाणी फार अफाट लाटा प्राप्त करुन स्वामींच्या स्नानाठिकाणी पसरावून वाहत होते, नर्मदाशेजारील झाडांचे पाने तुफान वाऱ्यामुळे सळसळ वाजत होते, छोटी पाखरं मात्र तुफान वाऱ्यामुळे उपस्थित नव्हते, अशा वादळी परिस्थितीत स्वामींना स्नानाची वैफल्यपूर्ण आस लागली होती. मात्र त्यादिवशी स्वामींसह कुणीच नव्हते. कारण ती वेळच पूर्णपणे स्वामींच्या भक्तीपरिक्षेची होती. व खास हया ईश्वरानेच मुद्यामहून सर्वांना त्यांच्या पासून दूर केले असावे. बर त्या दिवशी स्वामींनी स्नानासाठी एका पायाचा बहुमोल आधारासाठी काठी नेलेली नव्हती, विना काठीच्या आधाराने स्वामी स्नानासाठी नर्मदेकडे झेपावत होते. त्यादिवशी प्रवासात चुकलेले आसारामजी दुकानात सामन घेण्यासाठी महाकलंकेश्वराच्या शिवालयातून शिवापार गेले होते. बाबुराव व गंगाबाबा आजारी असल्याने त्यांनी अल्पप्रमाणात अंथरुणास आपलेसे केलेले होते. पांडुरंगबाबास प्रवासात विशेष थकवा आल्याने चेहरा सोडून तेथेच खांबाला पाठ टेकून बसले होते. पर्यायाने स्वामींना एकटयालाच वाहेर स्नानासाठी जावे लागले होते. एका हातात तांब्या, त्याच हाताच्या खांद्यावर कफनी व एका पायाच्या आधारावर स्वामी आता महाकलेंकेश्वराच्या पायऱ्या बसत–बसत उतरू लागले. एका पायाचा त्रास वाढत होता, सर्व मंचनातून नारद ''नारायण–नारायण'' म्हणत स्वामींकडे बघत असावे, दैवाची परिक्षा व्हावयाची वेळ आता पुर्णत: जवळ येऊन ठेपली होती. स्वामींच्या स्नानाचा मुहूर्त जवळ येऊन थबकला होता. स्नानाची घडी हळूहळू पुढे सरसावत होती. जोडीला कुणाची साथ नव्हती. नर्मदेचा घाट हा पुर्णपणे एकशे पन्नास पायऱ्यांचा होता. जसा सत्ताविस पायऱ्यांचा घाट हा तुकोबा महाराजांच्या देहूच्या इंद्रायणीचा आहे तसाच हा दिडशे पायऱ्यांचा घाट नर्मदेचा होता. स्वामी ज्या जागेकडे स्नानासाठी

सरसावत होते ती जागा विशेष चक्रव्युवह वादळासाठी प्रसिद्ध होती. ती जागा चक्रतिर्थ म्हणून विशेषत: प्रसिध्द होती. तेथे नर्मदेच्या पाण्याचा व्युह तयार होऊन भोवरा निर्माण व्हायचा व ते पाणी थेट नर्मदापाताळात भिडून यायचे व त्या ठिकाणी आतापर्यंत कितीतरी मृत्यु झालेले होते. अशा ठिकाणी एखादा बलाढ्य मासा जरी गेला तरी तरफडत मरुन पाण्याने फुगुन पुढे पाण्यावर तरंगत असायचा. अशा ठिकाणी कुणीही जात नाही व ईश्वराने स्वामींच्या भक्तीची अंतिम परिक्षा घेण्यासाठी तेच ठिकाण नेमले होते. स्वामींच्या बुध्दीने, स्वामींना तेथे नेण्यांसाठी परावृत्त केले होते. त्याच त्या नर्मदेच्या जागी जाणारा कधीही परत येत नसे. जणू काय तेथे स्नानासाठी जाणारा जगाचा अंतिम निरोप घेऊन जातो. अशा ठिकाणाकडे स्वामी पावलोपावली सरकत होते. चक्रतिर्थावर उसळणाऱ्या लाटा फार मोठया आशेने सळसळ करुन येऊन तिरावर सपकन आपटत होत्या. आता स्वामी पूर्णत: त्या नदीतीरी पोहचले होते कारण स्वामी हळूहळू पायऱ्या उतरुन अखेरच्या पायरीवर येऊन ठेपले होते. हात पुढे करून जलास स्पर्श करून स्वामींनी नर्मदा मातेचे दर्शन घेतले व त्याचक्षणी दैवाने परिक्षा बघण्यास सुरुवात केली. स्वामींनी आपला एक पाय पाण्यात सोडला दुसरा पाय सोडणार तितक्यात आजूबाजू बसलेल्या लोकांनी निर्वाणीचा इशारा दिला व जोरात बोलले.

''ए बाबा, तिढ कशाला जातो, तिढ गोल भवरा आहे, तिढ जाणारा पुन्हा परत येईल याची शक्यता फार कमी आहे. आणि आतापर्यंत तिढ गेलेले पुन्हा परत आलेलेच नाही, तवा तु काय तिढ जाऊ नको आणि नाही तरी तुझा एक पाय अधिच असा आणि तुझ्याजवळ काठी बी नाही, म्हणून सांगतो तू जाऊ नको.''

परंतु स्वामींनी त्यांचा एक शब्दही एकला नाही आणि नाही तरी स्वामींनी भक्ती मार्गात अडथळा येणाऱ्यांचे कुणाचेच काही एकलेले नव्हते आणि शिवाय त्यांना ही वैकल्पीक बुध्दी स्वत: ईश्वरानेच दिली असल्याने त्यांच्या बुध्दीत नर्मदास्नानाखेरीज दुसरा विषयच नव्हता आणि मनात भक्ती शिवाय दुसरी आशाच नव्हती. त्यामुळे स्वामींनी नदीतिरी बसलेल्या अनुभवी माणसांचे म्हणणे एकलेच नाही. हा शिवभक्त फार ध्येयवादी होता. अशाच हया स्नानापायी त्यांनी त्यांचा एक पाय ही गमवला होता. ''तरीदेखील मी येथे स्नान करणार'' असे मनोमन म्हणून स्वामींनी नर्मदेत दुसराही पाय सोडला, नर्मदेच्या येणाऱ्या प्रत्येक लाटेने स्वामींचे वस्त्र भिजवून टाकले. आतापर्यंत स्वामी नेहमी दुसऱ्याचा पाय हातात धरुन नदीत स्नान करत कारण स्वामींचा एक पाय व्यवस्थीत साथ देत नव्हता आणि १०० मंत्राचा जप केल्याखेरीज स्वामी पाण्याबाहेर निघत नव्हते, परंतु बघा ही खास ईश्वराची परीक्षा बघण्याचीच वेळ असल्याने स्वामींना दुसऱ्याचा आधार घेण्यासाठी दुसरा तिथं उपस्थितच नव्हता. स्वामींचे वस्त्र आता पुर्णत: नर्मदेच्या पाण्याने ओले चिंब झाले होते. स्वामींनी पायऱ्याजवळच स्नान करण्याचे ठरवल्याने एक हाताने पायरीचा आधार

घेतला होता, पायरीवर आपला डावा हात टेकवून पूर्णत: पाण्यात बुडवून घेण्याचे ठरवले होते, स्वामींनी अगदी तसेच केले. आपल्या डाव्या हाताचे पहिले तीन बोटे नर्मदेच्या शेवटच्या पायरीवर कसेबसे स्थिर केले व आपले पूर्ण शरीर त्या नर्मदा मातेच्या पाण्यात बुडवले आणि तोंडातून एक-एक-एक असे स्नानमंत्र केले होते, नर्मदेचे ते चक्रतिर्थ स्थळ असल्याने पाण्याचा भवरा तयार होत होता, येणाऱ्या प्रत्येक लाटा त्या भोवऱ्यात क्षणात मृगजळ होत होत्या, आपले अंदरसुलाचे भक्त देवाने वेगवेगळ्या कामासाठी वेगवेगळ्या ठिकाणी गुंतून ठेवले होते. जोर-जोरात निर्माण होणाऱ्या पाण्याच्या लाटा त्या भोवऱ्याकडे वेगाने येत होत्या, सुर्य नारायण हया साधकाच्या परिक्षेचा निकाल बघण्यासाठी त्या चक्रतिर्थ स्थळाकडे टक लावून बसला होता. एका हाताच्या तीन बोटांच्या आधारावर स्वामी त्या चक्रतिर्थात उतरले होते. स्वामींचे वस्त्र पूर्ण भिजल्याने पाण्यापेक्षा शरीराचे आकारमान वाढले होते. साठ सत्तर मंत्र आत्तापर्यंत मुखातून बाहेर पडले गेले होते अजून तीस ते चाळीस मंत्र बाकी होते, एका हातावर जबरदस्त भार आला होता. पायरीवर सातत्याने वाहणाऱ्या पाण्यामुळे बरेचसे शैवाल ह्या पायरीवर आश्रीत झालेले होते. डाव्या हाताचा अंगठा त्याच त्या पायरीच्या शैवालांमुळे निसटला होता व पूर्ण शरीराचा भार सांभाळण्यासाठी त्या अठरा-अठरा तास तपश्चर्या करणाऱ्या साधकांची उरलेली दोन बोटे असमर्थ ठरली व अखेर हात निसटलाच. स्वामींना येणाऱ्या लाटेने क्षणार्धात त्या भोवऱ्यात गिळंकृत केले. स्वामी पुरेपूर त्या नदीच्या पाण्यात गेले तरीही मंत्र पढण्याचे कार्य त्याच गतीने चालू होते, पहिली गटांगळी खाऊन स्वामी तीरावार आले तेव्हा स्वामींचा ९० वा मंत्र चालू असावा, पुन्हा पाण्याने आत नेले दुसऱ्या गटांगळी पर्यंत स्वामींनी ९५ वी मंत्र फेरी पुर्ण केली असावी. स्वामी पुन्हा पाण्यात गेले व तिसऱ्या गटांगळीने वर आले तेव्हा पूर्ण शंभर मंत्रांचा जप पूर्ण झाला होता.परंतु दुसऱ्या गटांगळीच्यावेळी आसारामजीने हे बघीतले त्यामुळे ते फार वेगाने नर्मदेच्या पायऱ्या उतरत होते. ते तिसऱ्या गटांगळी पर्यंत नर्मदेच्या अखेरच्या पायरीपर्यंत येण्यास असमर्थ ठरले व मोठमोठयाने अकांत करु लागले. पांडूदेव, गंगाबाबा, बाबुराव त्यांच्या आकांताने काही क्षणात नर्मदापाण्याच्या काठी पोहचले, स्वामींनी तिसऱ्या गटांगळीच्या वेळी ''ए गंगा बाबा येतो आता'' एवढेच शब्द मुखाबाहेर काढले व आता गेले होते.

आसारामजी इतर भक्तांसह तिथेच रडत बसले, तितक्यात स्वामींच्या स्नानाचा तांब्या पाण्यावर तरंगत-तरंगत नर्मदातीरी आला, आसारामजीने तो हातात घेतला, १०० मंत्राचा जप पाण्यात म्हणून आपले स्नान पुर्ण करणाऱ्या हया साधकास स्वत: नर्मदामातेने अवघे ओंकारेश्वर दाखवून तिरावर आणून सोडले, स्वामींच्या बाबतीत घडलेला चमत्कार पाहून तेथील ब्राम्हणमंडळींनी आपआपली पोथी स्वामीकडून मंत्रून घेतली. बाबाजी परत आल्याने त्यांच्या सह आलेल्या भक्तांना झालेल्या आनंदाचे काय वर्णन करु. हया शिवावताराला पुन्हा तिरावर आणण्याचे अनमोल कार्य हे त्या 'नर्मदामातेने' केले. स्वत:

प्रत्यक्ष मृत्युच्या कक्षेत जाऊन साक्षात मृत्युदेवतेस वंदन करून ही विभुती तिरावर सहिसलामत पोहचल्याने त्या भक्तांना झालेला आनंद त्या सुर्यास पाहावेनासा झाल्याने काही क्षणात तो पश्चिमस तंबूत परतला. नंतर पुर्ण अनुष्ठान झाल्याने स्वामींनी ओंकारेश्वर अखेरच्या वंदनासह सोडले व रामेश्वरी गेले. तेथे योग्य त्या प्रकारे दर्शन घेऊन शिवकांची, गाणगापुर, पंढरपुर, देहू आळंदी करत करत एकवीस दिवसानंतर पुन्हा अंदरसुल येथे परतले. दुसऱ्यांदा तिर्थक्षेत्र झाल्यानंतर स्वामी पुन्हा त्यांच्या तपसाधनेत विलीन झाले. पूर्वीपार चाललेला नित्यनियम विधी त्यांनी पुन्हा एकदा त्या अंदरसुलात रेखाटण्यास सुरुवात केली. त्याच त्या भुयारात स्वामीजी अठरा–अठरा तास शिवप्राप्तीसाठी विलीन होते व गुरु शोधण्याच्याही तयारीस ते आता लागले होते.

सन १९५८ चा फेब्रुवारी महिना केवळ अठ्ठावीस दिवसांचा कालखंड घेऊन उगवला, त्या महिन्यात काहीतरी विलक्षण घडणार याची चाहूल त्या नागेश्वरी येथील पूजा करणाऱ्या ''शहादुबाबास'' लागली परंतु त्यांनी त्या आंतरीकमनाच्या वेदनेकडे वास्तविक लक्ष दिले नाही. फेब्रुवारी महिन्यात स्वामी एकेदिवशी नागेश्वर मंदिरात तयार केलेल्या भुयारात मग्न होते. त्याची तपसाधना कठोर बनत होती, तपसाधनेत मग्न असतांना दुपारच्या तीन वाजेचा सुमारास एक दिव्य तेज मुर्तीचे आगमन त्या नागेश्वराच्या दरबारात झाले. ती एक महान तेजस्वी मुर्ती होती. ती अदभुत मुर्ती निवस्त्र असल्याने 'नागबाबा' हया संबोधनाने प्रसिध्द झालेली होती. ते बाबाजींपेक्षा वयाने बरेचसे लहान होते. परंतु कार्यसिध्दीने बरेचसे महान होते, नागेश्वराच्या दरबारात त्यांनी सर्व प्रथम शहादुबाबास बोलावले व दिक्षा देण्याचे सुचवले परंतु सहादुबाबांनी त्यांचा दिक्षा घेण्यास नकार दिला. तितक्यात स्वामी तपसाधना आटोपून भुयाराबाहेर आले. मंदिराच्या पायऱ्या चढता–चढता त्यांनी समोर बघितले त्यांना नागाबावा हे भगवान गोरक्षनाथाच्या अवतारात दिसले. त्यांनी नागाबाबांना दुरुनच हात जोडून वंदन केले. त्यावेळी नागाबाबा सद्गदित होऊन बोलले, ''आओ मौनि तुमही आओ.''

बाबांना फार मोठा आनंदा झाला. नागाबाबांनी मग सहादुबाबांनी नाकारलेली दिक्षा स्वामींना देण्याचे ठरवले. स्वामींनीही फार मोठया आनंदाने घेण्याची ठरविले. नागाबाबांनी स्वामींना दिक्षा दिली. स्वामीनीही ती फार मोठया अविर्भावाने ग्रहण केली. इतक्या लहान वयाच्या मनुष्याची दिक्षा हे बाबाजी का घेतात हा प्रश्न निव्वळ सहादूबाबाच्या मनात भ्रमण करत राहिला परंतु स्वामींना त्या लहान नागाबाबाचे कर्तृत्व बघताचक्षणी कळाले असल्याने त्यांनी ती दिक्षा असामान्य वाटून घेतली. शिवाय भगवान शिवानेही त्यांना गुरु करण्याचा आदेश दिला होता. व हया सर्वोतोपरी कारणावरुन स्वामींनी फार आनंदाने 'ती' स्विकारली होती आणि स्वामींना त्यांनी बघता क्षणीच ''मौनगिरी'' ही असामान्य पदविका बहाल केली होती, नागाबाबांना येऊन आता दोन तीन दिवस पुर्ण झाले होते, स्वामी सकाळी सकाळी स्नान पुजा आटोपून त्यांच्या गुरुंजवळ म्हणजे

नागाबाबांजवळ बसत होते, त्यांची सेवा करु लागले होते. नागाबाबांचे पाय दाबणे, नागाबाबा सांगतील ते ऐकणे, सर्वकाही नागाबाबांच्या आदेशानुसार स्वामी वागत होते. हेच नेमके बाबाजींच्या शिष्यांना खटकले. त्यांना वाटले बाबाजी स्वत: एक तपसाधक असून ते हया नागाबाबाची इतकी का सेवा करतात? शिवाय ते नागाबाबा हे स्वामींपेक्षा वयाने कितीतरी पट लहान आहे. मग स्वामी हया नागाबाबांची सेवा का म्हणून करतात? हा प्रश्न सारखा अंदरसुलवासीयांना खटकत होता त्यामुळे त्यांनी अनेकदा स्वामींना समजावून सांगितले पण त्यांनी त्यांच्या शिष्यगणांचे एकदाही ऐकले नाही. कारण त्यांना माहिती होते की, आपल्या शिष्यांना नागाबाबाचे खरे रुपच कळाले नाही. तरीदेखील स्वामींनी त्यांच्या शिष्यांना वेळोवेळी समजवण्याचा आटोकाट प्रयत्न केला, परंतु त्यांना ते कळाले नाही. येऊन पंधरा दिवस झाल्यानंतर नागाबाबांनी नागेश्वरीच्या शिवालयात दत्तयाग यज्ञ केला व त्या यज्ञासाठी स्वामींनी त्यांचा एक शिष्य म्हणून अहोरात्र परिश्रम घेतले. हे बघून गावातील लोक हैराण झाले. ते आता वाटेल ते बोलू लागले होते. पण अर्जुनास केवळ वृक्षाच्या फांदीवर बसलेल्या पक्ष्याचा डोळा दिसावा अगदी तसे स्वामींना त्या नागाबाबात एक गुरुरुपी भगवान शंकरच दिसत होता. त्यामुळे त्यांनी नागाबाबांची सेवा सोडलीच नाही. त्या साधकरुपी स्वामींना नागाबाबा एक भगवान शिवाचा अवतार वाटला व इतरांना स्वामींपेक्षा वयाने लहान असलेला एक साधा किरकोळ बाबा वाटला. वा–च–कां–नो नेमका हाच फरक आपल्यात नि साधकामध्ये असतो त्यामुळेच सांगतो.

''जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुला
तोचि साधु ओळखावा
देवी तेथेची जाणावा''

दैवाची प्रचिती योग्य वयातच करुन घ्या, आजही संताना ओळखा, त्यांच्या दर्शनाने धन्य व्हा, व अनंत जन्मांचा शिन जाऊ दया. स्वामींनी लहान वय धारण केलेल्या नागाबाबा पूर्णत: ओळखले होते व त्यामुळेच त्यांनी त्यांना अपेक्षेहून जास्त श्रेष्ठ ठरवले होते. एक कर्तव्यसिध्द व कार्यसिध्द पुरुष असे नागाबाबा होते. त्यांनी स्वामींना विभुती मंत्र दिला होता. हया मंत्राच्या आधारामुळे फार मोठे कल्याण होणार होते. त्यांचा विभुतीमंत्र स्वामींनी सर्व शक्ती पणास लावून आत्मसात केलेला होता. तदनंतर विषमंत्रही स्वामींनी ग्रहण केला होता. सर्व दिक्षा दिल्यानंतर नागाबाबांनी १९५९ च्या सप्टेंबर महिन्यांत स्वामींना बीसा मंत्र दिला व तो दिड लाख जपाचा मंत्र योग्या त्या ठिकाणी प्राप्त करण्याचे शिकवले व सांगितले. एवढे सांगून गावकऱ्यांचा त्रास सहन करुन योग्य ते कार्य पूर्ण झाल्यानंतर नागाबाबा अचानक अंदरसुलातून अदृश्य झाले. नागाबाबा फार अचानक अंदरसुलाच्या हद्दपार निघून गेले. नागाबाबांनी दिलेली संपूर्ण दिक्षा स्वामींनी ग्रहन केल्यानंतर, बाबांनी

दिलेले मंत्र स्वामींनी लिहून घेतले होते व रोज स्वामी गुरुंनी दिलेले मंत्र पुजत होते. नागाबाबा गेल्यानंतर स्वामींची साधना अधिकच कठोर होत चालली होती व जन्मास आलेल्या कार्यसिध्दी साठी आता ते पुर्णत: परिपक्व होत होते. सकाळी तीन साडे तीन वाजता उठून नित्य कर्म आटोपून ते साधनेला बसत. तत्पूर्वी ते नागेश्वराची पूजा करत. हे सारे शिवामुळे आहे, अशी त्यांची दृढ संकल्पना होती. अशाच एके दिवशी स्वामींना भगवान शिवाचा पुरेपुर साक्षात्कार झाला व अनेक रिध्दी सिध्दी प्राप्त झाल्या परंतु स्वामींनी त्यांचा वापर कधीच केला नाही. कारण ते स्वत:च एक सिध्द पुरुष होते. शास्त्रप्रचिती आत्मप्रचिती हया सर्व गोष्टी परमार्थामध्ये अत्यंत आवश्यक मानल्या जातात. ज्या गोष्टी स्वामींना अवगत झाल्या होत्या अथवा लोक कल्याणासाठी ज्या विभुत्या स्वामींना प्राप्त झाल्या होत्या त्या सर्वांचा वापर स्वामींनी आता लोककल्याणासाठी वापरण्याचे ठरवले होते. आणि ज्या कार्यासाठी त्यांनी हया भुतलावर अवतार घेतला होता त्या कार्यासाठी त्या सर्वांचा वापर स्वामींनी करायचा होता, आता सर्वसंपन्न असा योगीपणा त्यांच्यात पुरेपुर उतरला होता व त्याचा सर्व उपयोग हया भारत भुमीरुपी देवघराच्या आश्रयास आलेल्या आश्रितांसाठी स्वामींना करायचा होता. नागाबाबा अंदरसुल सोडून काही काळात निघुन गेले होते. परंतु जाता जाता मात्र स्वामींना बरेचसे ज्ञान देऊन गेले होते. त्यांनी दिलेला दिडलाखाचा मंत्र आता स्वामींना अवगत करुन घ्यायचा होता व त्यांच्यासाठी स्वामी जागेच्या शोधात होते. स्वामींना दिलेल्या बिसा मंत्राचे वैशिष्ठ्ये काही अनोखेच होते. त्या मंत्रामुळे स्वामींना वाचाशक्ती प्राप्त होणार होती. गुरुंनी जेवढे जेवढे दान म्हणून दिले होते तेवढे तेवढे एक आदर्श शिष्य हया नात्याने घेण्याचे ठरवले होते. स्वामींनी नागाबाबांना दिलेला मंत्र आपल्या वहित नमुद करुन ठेवला होता, असे म्हटले जाते.

''जिसके पास बीसा
उसके पास जगदिसा''

हा मंत्र सिध्द करण्यासाठी स्वामींना जागा सापडली ती जागा घृष्णेश्वराच्या दरबारात वावरत होती व तो मंत्र सिध्द करण्यासाठी सन १९५९ च्या अखेरीस स्वामी वेरुळ येथे पोहचले, घृष्णेश्वराच्या देवालयातून वेळगंगेला जाण्यासाठी एक घाट आहे. त्या घाटाच्या पूर्व बाजूस एक औदुंबराचे झाड त्यावेळी उपस्थित होते. त्या झाडाशेजारी येळगंगेच्या पुण्यपवित्र पात्रात दोन पाण्याच्या धारा येऊन मिळतात, त्यांच्या मध्यभागी बसुन स्वामींनी अनुष्ठान केले व डिसेंबर १९५९ मध्ये ''बिसा'' नावाच्या दिड लक्ष मंत्राचा जप करुन तो मंत्र आत्मसात करुन घेतला. आता स्वामींना पूर्णत: आत्मज्ञान प्राप्त झाले होते. हया बिसामंत्रामुळे वाचासिध्दी प्राप्त झाली होती. अनुष्ठान झाल्यावर स्वामी आपल्या निवडक अनुयायांसह परळी–वैजनाथला निघाले. रस्त्याच्या डाव्या बाजूला स्वामी भक्तांसह त्यांचे पूजेचे सामान घेऊन उभे होते. समोरुन एक बस भरधाव वेगाने धावत त्यांच्याकडे येत

होती, पांडुरंग देवाने हात दिला, गाडी त्यांच्या जवळ येऊन थांबली. कन्डक्टरने मात्र स्वामींचे एवढे सामान बघून त्यांना घेण्यास स्पेशल नकार दिला. वरुन दोन तीन अपशब्द मुखाबाहेर काढून जोरात फाटक लावून घेतले व डाव्या हाताने बेल वाजवली, बेलचा इशारा चालकाच्या कानांनी चालकाच्या हातांना सांगितला व चालकानं सरळ–सरळ गाडी सुरु करुन गिअर पाडला. गाडीच्या चाकात गती येणार तितक्यात बाबांच्या तोंडातून उद्गार बाहेर पडले,

''मला नेत नाही तु जाशील का?''

परंतु त्या चालकाला व वाहकाला त्यांच्या सरकारी नोकरीचा गर्व असल्याने त्यांनी स्वामींच्या बोलण्याकडे दुलर्क्ष केले व निघून गेले. काही अंतर पुढे न जाता तिथे त्यांच्या बसला अपघात झाला. मात्र याचे दु:ख स्वामींना तिव्र झाल्याने स्वामींनी तेथून पुढे वाचा शक्तीचा दुरुपयोग कधी केलाच नाही, अपघात झालेल्या प्रवाशांना मात्र काहीच झाले नाही. हया परीवशाने स्वामी जरासे सुखावले. यावरुन संताचे रागवणे हे जणू काय, ''कुत्रीने तीच्या पिल्लांच्या बचावासाठी किंबहुना एका जागेहून दुसऱ्या जागेत नेण्यासाठी लावलेले दात होय.'' अंदरसुल येथील लोकांनी कितीही विरोध केला तरीही स्वामींनी नागाबाबांचे चरण कधीच सोडले नाही आणि नागाबाबांनीही त्या भक्ताला, त्या साधकरुपी शिष्याला पूर्ण शिक्षण दिल्याखेरीज अंदरसुलास पूर्णविराम दिला नव्हता. काय नाते असते गुरु–शिष्याचे परंतु हे कळणाऱ्यालाच कळते कारण गुरु शिवाय काहीच नाही गुरुची महती किती सांगितली तरीही ती थोडीच पडते, म्हणून इ.स. १९५४–५५ मध्ये भगवान शिवाने स्वामी गुरु करण्यास लावले होते. नाहीतरी कोणत्याही दिवसाची सुरुवात करतांना आपोआप मुखातुन शब्दबाहेर येतात ते...

''गुरु ब्रहमा गुरुविष्णु गुरुर्दैवो महेश्वरा।
गुरु साक्षात परब्रहम तस्मै श्री. गुरवे नम:।''

आपल्या भारतभुमीसारख्या देवघरात सर्वात जास्त महत्त्व हे गुरुला असते. गुरु खेरीज सारा जन्म निरर्थक आहे. म्हणूनच सतराव्या शतकात अव्वल दर्जाचे संत म्हणून सन्मान पटकवणारे तुकोबा महाराज म्हणतात.

''हरी प्राप्तीसी उपाय। धरावे संताचे ते पाय॥
तुका म्हणे होता ठेवा। तो या भावा सापडला॥
संत दर्शनी हा लाभा। पदयनाम जोडीले॥''

यावरुन आपणांस लक्षात येईल. सदगुरु शिवाय खऱ्या भगवंताच्या स्वरुपाची ओळख होणेच अशक्य आहे, भगवंत आणि सर्वसामान्य मनुष्य यांच्या भेटीचा सर्वात महत्वाचा महामार्ग म्हणजे 'सदगुरु'. त्यामुळे सदगुरुंची सेवा करतांना केव्हा, कधी, कशाची प्राप्ती होईल हे सांगता येणार नाही आणि याच कारणास्तव स्वामींनी १९५७–५८ मध्ये आलेल्या नागाबाबांचे चरण सोडले नाही. संतावर शुध्द अंत:करणाने भाव ठेवला तर परमश्रेष्ठ मोक्षाचे

साधन अद्वितीय असा परमात्माचे ज्ञान प्राप्त झाल्या खेरीज रहात नाही म्हणून स्वामींना गुरु करण्यासाठी अप्रत्यक्षरित्या भगवान शिवाने आकाशवानी केली होती. गुरु हा भक्तांसाठी कधी शितल तर कधी सुर्यासारखा तेज धारण करतो. कारण असे म्हणतात,

''सदगुरु सारखा असा पाठीराखा ।
इतरांचा लेखा कोण जाणे ॥''

आणि अशाच रितीने गुरु शिष्याला साथ देतात नि शेवटी एकत्र येऊन दोघही ब्रहमनंदाचा रस चाखतात. गुरुचा महिमा स्वत: भगवान श्रीकृष्णाला कळाला म्हणून त्यांनी सांदिपणी ऋषींना गुरु केले. व तेराव्या शतकात भुतलावर जन्म घेऊन ज्ञानेश्वरी लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरांनी स्वत:ला उद्देशुन म्हणून घेतले व वडील बंधुस गुरु केले.

''ज्ञानदेवा म्हणे तरलो तरलो,
आता उद्‌धारलो गुरुकृपे''

साधू, संत, सदगुरु यांना शिष्यांना घडवण्यासारखा दुसरा आनंद कदापी मिळत नाही व खऱ्या शिष्यालाही गुरुसेवेसारखा खरा आनंद दुसरा कशातच दिसत नाही.

कारण एकदा एक ऋषी जंगलातून जात होते. जाता-जाता एका वृक्षाच्या छायेखाली ते विसाव्याला थांबले. तितक्यात समोरुन एक डाकू आला. स्वामी केवलळ शांत त्यांच्याकडे बघत राहिले. डाकू हसत... हसत म्हणाला...'' बरं झालं तु भेटला, आता मी तुला आनंदाने ठार करणार, नाही तरी आज शिकारबी मिळाली नव्हती. बरं झालं तु आला.''

ऋषींनी त्या सर्वसामान्य अल्पबुध्दीवान मनुष्याचे सर्व म्हणने ऐकून घेतले व नंतर शांतपणे उद्‌गार काढले, 'बघ तु मला खुशाल मार आणि मलाही तुझी शिकार व्हायला आवडेल पण माझं एक काम कर, तु जर माझं काम केलं आणि नंतर मला ठार मारलं तरीही मी तुला आशिर्वाद देऊन मरलं.' बघा... वा-च-कां-नो बघा किती विशाल अंत:करण असतं गुरुंच.

शिकारी छाती फुगवून म्हणाला,

''सांग, काय काम आहे, तुझंवालं.''

''अरे बाबा ते समोरचं आंब्याचं झाड दिसत ना त्याचे चार पानं तोडून आण.''

'हा त्याच्या एवढेच ना'

हसत हसत डाकू बोलला व धावत जाऊन तलवारीच्या एका घावात चार पान तोडून आणले.

ऋषी पुन्हा म्हणाले, '' वा... वा खुप शुर आहे रे तु, आता एक काम कर जितक्या आनंदाने चार पाने तोडून आणले तितक्याच आनंदाने आता हे चार पानं तेथे जोडून ये''

यावर डाकू हा... हा... करत म्हणाला, ''एवढा मोठा साधू झाला पण तुला अक्कल

नाही.''

'काय झाल?' फार शांत स्वरात स्वामी उद्गारले.

'आरे.. बाबा तोडलेले पान जोडता येतं का?' डाकू बोलला.

'एकदम बरोबर', साधू बोलले, डाकू शांत झाला व साधू पुढे बोलले– ''हे बघ जसं तोडलेलं पान पुन्हा जोडता येत नाही, तस एकदा मारुन टाकलेला माणुस पुन्हा तयार करता येत नाही.''

साधुच्या किंबहुना ऋषीच्या एवढ्याच अनमोल उपदेशाने डाकू शुन्यात घरी परतला व सदगुरुचा पाय धरला. त्याच्या हातातली तलवार पडली व बुध्दीही फिरली, त्याने गुरुंच्या सेवेतच फार मोठा आनंद मानला.

**॥ संतांच्या विभुती जगाच्या कल्यांणा**
**देह कष्टवीती परोपकारे ॥**

हया संताच्या विभुतीमुळे त्या डाकू जगात वावरणाऱ्या डाकूचे कल्याण झाले व त्यांनी (डाकुने) त्या गुरुत त्यांचा प्राण मानले म्हणून तुकोबा महाराज म्हणतात.

**''गुरु हा संत कुळीचा राजा ।**
**गुरु हा प्राण विसावा माझा ।**
**गुरुविना देव नाही दुजा ।**
**पहाता त्रैलोकी ॥''**

गुरुच्या सेवेतच खरा आनंद आहे, असे म्हणत तुकोबा महाराज म्हणतात,

**॥ गुरु सेवेचा आनंद मोठा**
**नाही आनंदाला तोटा ॥**

अशा हया गुरुंचा पगडा प्राप्त झालेला हा जनार्दन बाबा ''बिसा'' मंत्राची प्राप्ती करुन नागेश्वरी मंदीरात भक्तांसह परतला होता. नंतर स्वामींनी आपल्या भक्तांना नागाबाबांची पुर्ण माहिती सांगितली. बाबा शिष्यांना म्हणाले,

''नागाबाबा म्हणजे, नाथ संप्रदायाचा पाया'' हाय, बाबाहो तुम्हाला नवनाथ ग्रंथ ठाऊक हाय, त्याच हया नवनाथांची कार्य महिमा फार जुनी हाय आणि ती युगान युगं तशीच चालू राहणार आहे, मच्छिंद्र नाथ आणि त्यांचा शिष्य गोरखनाथ हयांनी नाथ सांप्रदायाचा पाया लई मजबुत करुन ठेवला आहे. आणि नंतर गोरक्षनाथांनी नाथ संप्रदायातील पाया गहरिनाथांकडे सुपूर्त केला आणि ते तपसाधनेसाठी निघुन गेले, गहरिनाथांनी त्यांच कार्य पुढं चालण्यासाठी नागाबाबाबला अनुग्रह दिला. नागाबाबा हे फार मोठे तेजस्वी पुरुष आहे. जरी ते वयाने माझ्यापरीस लहान असले तरी ते फार महान आहे आणि ते ब्रम्हचारी असल्याने किती वयाचे झाले तरी तरुणच दिसतात आणि ते नागाबाबा अमर आहे. अशा नागाबाबांनी मला मौनगिरी ही बोली वापरली.''

बाबाजींचे हे सारे वाक्य ऐकता-ऐकता अंदरसुलवासी भांबावून गेले व त्यांनी त्या जागेचे हात जोडून दर्शन घेतले ज्या जागेवर काही दिवसांपूर्वी नागाबाबा बसत होते. त्यानंत र स्वामींनी भक्तांना उपदेश करण्याचे कार्य हाती घेतले, नाही तरी आता स्वामींची साधना पुर्ण होत आली होती. आकाशवाणी झाल्याप्रमाणे नागाबाबा सारखे महान गुरुही लाभले होते. ज्या कार्यासाठी जन्मास आले होते त्या कार्याची ध्वज अंदरसुलात पुरेपुर रोवली गेली होती. तपसाधना करुन दोनदा तिर्थक्षेत्रही झाले होते. आता अंदरसुल येथील कार्य पुर्ण झाल्याने त्यांना त्यांचा रथ पुढे न्यायचा होता.

साधारणत: सन १९६० च्या जून, जुलै महिन्यांच्या दरम्यान बाबांच्या शिष्यगणांमध्ये काही झाले कि ते देवोच जाणो. परंतु बाबाजींनी त्यांचा अंदरसुल येथील मुक्कम हालवला व निवडक अशा शिष्यांना सांगितले मला लाखलगावी घेऊन चला. निफाड तालुक्यातील गोदावरी तिरावर विराजमान झालेलं हे छोटसं लाखलगाव आहे. स्वामींच्या आदेशानुसार काही निवडक भक्तांनी स्वामींना लाखलगावी आणले. लाखलगाव हे स्वामींचे सर्वात आवडते गांव. अशा गावी स्वामींनी तीन ते चार महिने मुक्काम केला. मुक्कामात स्वामींनी त्यांच्या कार्याची ध्वजा अवघ्या निफाड तालुक्यात फडकवली. कार्याची महती गाता-गाता स्वामींनी इंग्रजांच्या जखडातून सुटलेल्या भारत भुमीच्या धर्माचाही प्रचार केला आणि निफाडतालुक्यात धर्माचा प्रचार करण्यात तसा फारसा विलंब ही लागला नाही कारण निफाड हे न्यायमुर्ती महादेव रानडे यांचे जन्म गांव, त्यामुळे अगोदर त्या तालुक्यास भारतभूमीच्या मातीची जाणिव होती. सन १९६० च्या अखेरीस लाखलगावातील कार्य पूर्ण झाले तितक्यात अंदरसुलवाले भक्तीमंडळी स्वामींना घेण्यात लाखलगावी आले. कार्य पुर्ण झाल्याने स्वामींनी गंगामाईस निरोप देऊन पुन्हा अंदरसुल गाठले.

स्वामींना आता त्यांचा मुक्काम गावाबाहेरच्या टेकेश्वरी मंदिरात करण्याचे ठरविले होते. भक्तांनी स्वामींची इच्छामोड केली नाही. सर्व परिसर स्वच्छ करुन स्वामी टेकेश्वरीत थांबले. हळूहळू येणाऱ्या जाणाऱ्या भक्तांना स्वामींच्या दर्शनाचा गुण येत होता, कार्यसिध्द प्राप्त झालेल्या हया सिध्दपुरुषांचे कार्य हळूहळू प्रगतीपथाकडे विकसित होऊ लागले होते, ग्लानी आलेल्या धर्मास आकाशात लुकलुकणारे तारे आता दिसु लागले होते. म्हणजे जवळ-जवळ नाशिक जिल्ह्यातील पुर्वेकडील भाग आता पुर्णत: गंगेप्रमाणे निर्मळ झाला होता आणि स्वामींना आता कार्यासाठी दुसऱ्या ठिकाणाचा शोध लागला होता. अशा परिस्थितीत इ.स. १९६२-६३ मधील जानेवारी महिना लागला स्वामींना गावकऱ्यांनी टेकेश्वरीचा जिर्णोध्दार करण्यास सांगितले परंतु वर्गणी गोळा करण्यास थोडासा विलंब लागला तरीदेखील गावकऱ्यांची आशा मंदावली नव्हती व स्वामीही नाराज झाले नव्हते परंतु दरम्यानच्या कालखंडात स्वामी टेकेश्वरी येथे मुक्कामाला असतांना भगवान शंकराचा

साक्षात्कार होऊन ''पिनाकेश्वर मंदीराचा जिर्णोध्दार'' करण्याचे सांगितले होते यासाठी स्वामींना आता जातेगावी येथे जावे लागणार होते. पिनाकेश्वर ठिकाण म्हणजे जाज्वल भगवान शिवाचे ठिकाण आहे. जेव्हा प्रभुश्रीराम हे लंकापती रावणास मारण्यासाठी निघाले होते तेव्हा भगवान शिवाने प्रभुरामचंद्रांना ''पिनकेश'' नावाचे धनुष्य जातेगांवच्या डोंगरावर दिले होते यावरुन त्या ठिकाणी आजही पिनाकेश्वराचे मंदीर आहे. हे स्वामींच्या जन्मा-जन्माचे रहस्य होते आणि म्हणूनच पुढील कार्यासाठी त्या भगवान शंकराने त्याच्या अवतारी पुरुषाला पिनाकेश्वर येथे जाण्यास लावले होते. दुसऱ्या दिवशी कोणाला जास्त न सांगता मला येथून जायचे आहे. एवढेच त्यांनी भक्तांना सांगितले.

बाबाजी ''जाऊ नका'' हीच हाकाटी अंदरसुल वासीयांनी लावून धरली, यावर स्वामी आनंदाने बोलले,

''बाबाहो, माझं कामं झालं, मी चाललो, माझं काम मी करतो, तुमचं काम तुम्ही करा, मला आता दुसरीकडे जायचं आहे, काही चुकलं तरी माफी करा. काही, नाही... देवाचं काम देवच करतो. आपलं काम आपण करावं.''

असे म्हणत स्वामींनी टेकेश्वरी देवताचे व नागेश्वराच दर्शन घेतले. व अंदरसुलवासीयांना निरोप देण्याचे ठरवले. हा...हा.... म्हणता अवघे अंदरसुल त्या कोळगंगेच्या तिरावर स्वामींना निरोप देण्यासाठी गोळा झाले. कोळगंगेच्या पाण्यासह मृत्युची अपेक्षा करणाऱ्या म्हातारीपर्यंत सर्वांनाच तीव्र दुःख झाले. त्यांना झालेल्या दु:खाचे काय वर्णन करु. बारा-तेरा वर्ष ज्या परिसरात स्वामींनी खडतर तपसाधना केली, नागाबाबा सारखे महान संताचे पाय त्या भूमीला लागले, अशा त्या भूमीचे किती परभाग्य समजावे व अशा त्या पुण्यवान भूमीस स्वामींनी आता हात जोडून वंदन करुन पुर्णविराम दिला व अंदरसुल सोडले.

नंतर स्वामी अंदरसुली कधी परत आलेच नाही. एका ठिकाणी कार्य पूर्ण झाले तर ते त्या ठिकाणी पुन्हा परत कधीच जात नसे. अगदी तशाच गतीने स्वामी पुन्हा कधीच परत अंदरसुलाच्या भूमीत परतले नाही. उलट सन १९६३ मध्ये अंदरसुल येथील भक्तांना जातेगावातून विभुती दिली व त्या विभुतीच्या सहाय्याने अंदरसुल येथील टेकेश्वरी मंदीराचा जीर्णोध्दार झाला.

१९६२-६३ च्या काळात स्वामींनी अंदरसुलचा शिव सोडला व पिनकेश्वर ओढीचा मार्ग धरला, स्वामींनी अंदरसुल सोडले तेव्हा स्वामीं जवळ पाच पैसे देखील नव्हते आणि ते पैसे जवळ ठेवतच नव्हते. स्वामींना त्यांच्या जिवनात पैशांचा मोह कधी आलाच नव्हता. आणि म्हणूनच ते द्रव्यापासून सदैव दुरच राहत होते. विनापैशाचे अंदरसुलवरुन पिनाकेश्वर गाठायचे होते, पायी चालण्यासाठी एक पाय पुर्णपणे असमर्थ होता, एक हात काठीच्या आधाराने मुक्त नव्हता. शिवाय दसऱ्या हातात बारदान, विधी, नागाबाबाचे मंत्र,

तांब्याने भरलेली पिशवी. व पेटी होती असे असतांना ह्या मौनगिरी संतांना जातेगावास जाण्याची अतितीव्र इच्छा लागलेली होती. कसेबसे चालत-चालत स्वामी अंदरसुलहून पाच ते सहा मैल दूर अंतरावर येऊन ठेपले होते, वैशाख महिना असल्याने बरेचसे ऊन वातावरणात उतरले होते. बऱ्याचशा घामाच्या धारा जटातून कानाच्या बाळीपर्यंत येऊन पोहचल्या होत्या, अशा परिस्थितीत दहा-पंधरा मिनिटांच्या विश्रांतीसाठी स्वामी तेथेच लिंबाच्या झाडाखाली टेकले व आपल्या भारतभुमीवरील परिस्थितीचे अवलोकन करु लागले, तितक्यात एक मध्यम बांध्याचा मनुष्य स्वामींजवळ येऊन बसला व म्हणाला,

''राम राम बाबा''

स्वामींना आनंद झाला, सद्‌गदित होऊन स्वामी बोलले,

''राम राम.....''

स्वामींच्या जटा बघुन त्या ग्रहस्थाने स्वामींचे दर्शन घेतले व म्हणाला,

''कुठून आले बाबा... आणि कुठ जायचं आहे?''

काही नाही, बाबा अंदरसुलवरुन आले आणि जातेगावला जायंच आहे.

''कसं जाययं बाबा?''

जातो आता हळूहळू......

''नाही... नाही... मी तुम्हाला एश-टीत बसुन देतो: तुम्ही येवल्याला उतरुन जा.''

स्वामींनी विचारले, ''काय नाव आहे रे तुझं''

''शंकर''

स्वामींच्या अंगावर काटा आला.

स्वामींना वाटले ''हा शंकर आहे, हा देव आहे, हा सांगतो, आपल्याला ऐकाव लागलं, कारण हयाच्या नावात देव आहे.''

थोडया वेळाच्या अवधीनंतर एक बस भरदाव वेगानं आली. शंकराने हात देताच ती जागवेर थांबली. त्या सदग्रहस्थाने स्वामींचे येवल्यापर्यंत तिकीट काढून दिले व येवल्याला जायला लावले. स्वामींनी त्याला मन:पुर्वक आशिर्वाद दिला. (त्यानंतर त्याचे फार कल्याण झाले.) स्वामी दोन अडीचच्या सुमारास येवला बसस्थानकावर उतरले. उतरुन थोडा वेळ झाला तितक्यात हमाली काम करणाऱ्या कामगारांची सुट्टी झाली. त्या कामागारांपैकी एक कामगार भगवान शिवाचा शिष्य होता आणि त्याला साधु-संताचे अपार वेड होते, बसस्थानकाच्या उजव्या कोपऱ्यात जटाधारी स्वामींना बघुन तो स्वामींकडे आला, आल्या आल्या त्याने स्वामींचे दर्शन घेतले.

स्वामींनी विचारले, काय करतो रे पोरा,...

''काय नाही बाबा, मी हमाल आहे'' फार अभिमानाने तो उत्तरला.

बाबाही मनोमन सुखावले व म्हणाले,

''बरये बाबा, देव ठेवतो त्याच्यात सुखी मानावं.

देव कधी काय देईल याचा नेम नाही .''

त्याने स्वामींना एक प्रश्न विचारला

''कुठ जायंच बाबा?''

''जाते गावाला''

''चला मी मग बसून देतो एखाद्या गाडीत: स्वामींची पिशवी हातात घेऊन जातेगावास जाणारी बस तो बघतो. जातेगावास जाणारी बस त्याला दिसते, त्याने स्वामींना बसवून दिले, गाडी अजून चालू झालेली नव्हती, स्वामींनी त्याला विचारले, ''काय नावं आहे रे भाऊ?''

''शंकर''

बघा काय चमत्कार होता, स्वामींना भगवान शंकरानेच पिनाकेश्वरला जाण्याची आज्ञा केली होती व त्याच्याच कार्यासाठी स्वामी पिनोकश्वरला चालले होते, परंतु स्वामींजवळ द्रव्य काहीच नव्हते आणि ''द्रव्यामुळे मनुष्य मोहित होतो'' हे सिध्द करण्यासाठी स्वामींनी द्रव्याला हात लावणेही वर्ज्य मानले होते, परंतु एवढे करुनही जातेगावाला जायचे होते. यासाठी स्वामींना दोनदा भगवान शंकराने ''शंकर'' नावं संबोधनाच्या व्यक्तीकडून मदत केली. काय लिला असते प्रभुची हे तोच जाणो.

स्वामींनी ''शंकर'' नावं ऐकताच त्याच्या पाठवरुन मायेचा आशिर्वादात्मक हात फिरवला, व म्हणाले, ''सुखी रहा''

तेवढ्या वेळात कंडक्टर गाडीत चढला, त्या शंकरनामक सदग्रहस्थाने स्वामींचे जातेगाव चे तिकिट काढून दिले व खाली उतरुन दर्शन घेऊन तो निघून गेला. (त्यानंतर तो त्याच्या जिवनात अखेरपर्यंत सुखी राहिला) गाडी फार वेगाने त्या डांबरी रस्त्यावरुन हया महान संताला घेऊन पिनाकेश्वराचे अस्तित्व असणाऱ्या जातेगावाच्या वेधाने धावू लागली. सुसाट वेग धारण करुन धावणारी बस पाच साडे पाचच्या सुमारास जातेगांव पाटीवर थांबली. फुफाटा काही क्षणात त्या चाकांमुळे हवेत गुलाल-बुक्क्या प्रमाणे उधळला गेला, बाबा पाटीजवळ हळूहळू उतरले, हया महान शिवअवताराला उतरुन ती बस काही क्षणात दिसेनासी झाली तर ही महान विभुती त्यांच्या पोथ्यांसह विधी नियमाची पिशवी घेऊन त्या जातेगांवच्या पाटीजवळ बसुन जातेगावचे अवलोकन करत होती. सारी रानात गेलेली रानंपाखर आपल्या पिलांना चारा घेऊन आपआपल्या घरटयातून रवाना होत होती. मधुर गीत गावून दिवसाचे स्वागत करणारी कोकीळा अजून हवेतच भ्रमण करत होती. सायंकाळची शोभा वाढण्यासाठी फुल पाखरं फुलांच्या शाळेत उपस्थितीत दर्शवित होते. अजून फुलपाखरांना जमवण्यासाठी पारीजातक फुलला होता. अशा हया विलोभनिय, रममान

भव्य वातावरणात हा शिवावतार त्याच्या माहेरी एक अनोख्या कार्यासाठी आता जातेगावात उतरला होता. जातेगांव हे ठिकाण तिन जिल्ह्यांच्या सिमेंचे केंद्रस्थान आहे. तिन जिल्ह्याच्या त्रिवेणी संगमावर विराजमान झालेलं हे गांव. प्रभुरामचंद्राच्या पदस्पर्शाने पुनित झालेले नाशिक, महाराष्ट्राचे उत्तर टोक म्हणून प्रसिध्द असलेले जळगांव व अनेक साधु संतांना जन्म घेऊन पावण झालेले संभाजीनगर आणि अशा हया त्रिपवित्र जिल्ह्याच्या सिमेला हया जातेगावाच्या केंद्रबिंदूने जोडलेल्या आहे. असे हे महाकिर्तीवान ठिकाण हया साधकाला कार्यासाठी यथायोग्य होते. तेथून सगळा कार्याचा महिमा रेखाटायला सोपे जाणार होते. दैवाची पताका अवघ्या जगाला ओरडून सांगण्यासाठी हे ठिकाण फार अनुकूल होते. शिवाय याच ठिकाणी भगवान शंकराने प्रभुरामचंद्राला बंधु लक्ष्मण व सितामैया देखत रावणास मारण्यासाठी 'पिनाकेश' नावाचे धनुष्यही दिलेले होते यामुळे ती जागा भगवंतासाठी देखील अनन्यसाधारण होती. अशा जागेस न्याहळता–न्याहळता साडे सहा झाले तरीदेखील स्वामी तेथेच बसून होते.

काही कालावधी ओलांडल्यानंतर उत्तमराव चव्हाण व श्यामराव चव्हाण हे शेतातून घरी परतत होते, घराकडे जातांना त्यांचे लक्ष स्वामींकडे गेले, ते कुतुहूलाने स्वामींकडे आले व स्वामींना कुठुन आले ते वगैरे आणखी काही विचारले यावर स्वामींनी त्यांना सर्व सांगितले, व त्या चव्हाण बंधूना म्हणाले, ''पोराओ मला तुमच्या गावच्या देऊळात घेऊन चला.''

चव्हाण बंधुंनी तसा आनंदाने बाबाजींना प्रतिसाद दिला, उत्तमरावांनी स्वामींच्या विधीचे गासोडे घेतले व शामरावांनी स्वामींच्या सामानाची पेटी घेतली आणि ते दोघही बाबाजींना घेऊन जुन्या महादेवाच्या मंदीरात गेले. दोघही भावांनी बाबाजींचे सामान तिथेच टेकवूले व जाण्याच्या तयारीस लागले. तितक्यात उत्तमरावांना वाटले की हा कुणी साधू माणूस असावा त्याला भविष्य सांगता येईल म्हणून फार लगाबिगीने उत्तमरावांनी स्वामींना सांगितले व विचारलेही,

''बाबा, आम्ही सहा भाऊ आहे, मला नोकरी लागल का?''

यावर बाबा बोलले, ''बाबा, तुला नोकरी लागलं पण आपल्या राज्यात नाही दुसऱ्या राज्यात लागलं आणि बर का शाम, तुला नोकरी नाही लागणार तु असाच राहील.'' बाबांचा आशिर्वाद मनावर न धरता दोघांनीही जूने शिवालय सोडले व घरी आपली गुरढोरं आवरण्यासाठी त्वरीत घराकडे गेले. परंतु बाबाजींचा आशिर्वाद खरा ठरला, आज, तू असाच राहिल असा आशिर्वाद दिलेले शामराव तसेच जातेगावात आहेत व दुसऱ्या राज्यात नोकरी लागले असा आशिर्वाद दिलेले उत्तमराव मात्र 'रतलाम' या शहरात नोकरीला आहेत. बाबाजींनी चव्हाण बंधु गेल्यावर कोपऱ्यात पडलेला केरसुनीचा झाडू घेतला व अख्खे मंदीर स्वच्छ केले. तद्नंतर आपली दोन्ही सामानाची गासोडी मंदीरात ठेवली. स्वामींनी सायंकाळच्या वेळी स्नान केले व पुन्हा मंदिरात डोळे मिटून गुरुंचा मंत्र जपू लागले, मंत्र जपने

झाले बाबाजी मंदीराबाहेर आले तर मंदीराबाहेर जगन कासार, घोटीराम परदेसी व इतर जण पत्ते खेळत होते. पत्ते खेळत असल्याने बाबा त्यांना समजवण्यसाठी गेले तर त्यातल्या काहींनी बाबाजींशी गैरवर्तन करण्याचा प्रयत्न केला, यावर बाबाजी म्हणाले,

''बाबा हे चांगलं नाही, साधुचा असा अपमान करु नये.''

यानंतर जगन्नाथ कासार त्या एक जणावर भयंकर चिडले त्यामुळे तो बाबांना व कासारांना शिव्या देऊन निघुन गेला. साधु संताचा अपमान केल्याने मनष्याचे कधीच चांगले होत नाही म्हणूनच स्वामींचा अपमान करणाऱ्याचे दोन शुभमंगल होऊनही आज एकही वधू त्याच्या सेवेत नाही. हा काळाचा पगडा असतो लक्षात घ्या. काही वेळेच्या अवधीनंतर भगवान शिवाच्या मंदीरात रंगलेला पत्तेचा खेळ मोडला, खेळ मोडल्यानंतर सारे मुलं (व्यक्ती) बाबाजींजवळ जाऊन बसले व काही नं काहीनं.. समस्या विचारल्या, त्यानंतर जगन कासारांनी बाबाजींना विस रुपये देऊ केले, पण बाबाजींनी त्या पैशाचा स्विकार केला नाही, यावर त्यांनी पैशे का घेत नाही? हा प्रश्न विचारला, बाबाजींनी त्यांना सांगितले, ''बाबाहो, मी पैशाला हात लावत नाही.''

''तुम्ही पैसे घेत नाही मग तुम्ही इथपर्यंत कसे आले?'' हा अनमोलाचा प्रश्न कासारांनी विचारला.

मग बाबाजींनी सर्व प्रवासकहानी त्या व्यक्तींपुढे मांडली.

''बरं बाबा, तुम्ही इठ कशाला आले?'' हा प्रश्न एकाने विचारला.''

मी अंदरसुलला टेकेश्वरी मंदीरात असतांना, भगवान शिवाने मला दृष्टांत दिला कि जातेगावातील पिनाकेश्वराचा जिर्णोध्दार कर आणि त्याच्याच जिर्णोध्दारासाठी इढ आलो. आणि बरं का पोराओ मालायना तुमी फक्त डोंगरावर नेऊन सोडा.''

डोंगरावर म्हणताच तेथे उपस्थित असणारे एकमेकांच्या तोंडाकडे आश्चर्याने बघु लागले. त्याच्या चेहऱ्यावरच जातेगावचे वर्णन स्वामींना दिसू लागले. अल्लड वयात पत्ते खेळणारे ते मुलं स्वामींना फार कमी वेळात बोलले. ''अरे बाबा, जातेगावचा डोंगर म्हणजे काय साधा सुधा नाही, भर दिवसा तिथ कुणी जात नाही. माणसाला जवळचा माणुस डोळे फाडले तरी दिसणार नाही इतके दाट झाड आहे. डोंगरावर रस्ता नाही. वाट तर मुळीच नाही. कितीबी चाललं तरी डोंगर सरत नाही. बाबा साप, वाघ, सिंड हे किती असतील याचा तर नेमच नाही आणि जित्ता जाणारा परत जित्ताच येईल याचा तर भरोसाच नाही आणि बाबा तिढ जरी पिनाकेश्वराचे देऊळ असलं मग तु म्हतारा माणुस तिढ जाऊन काय करणार ये, आणि तु तर एका पायाने लंगडाबी आहे. नाही,.. बाबा, तुला जायच तर तू खुशाल जाय एकटा.. आम्ही नाही येणार.''

हसत... हसत बाबा बोलले,

''आरे पोराओ, तिढ आपला देव राहतो, आणि तो किती दिवसापासून एकटा

राहतो, त्याला झाल का काई, देव सारं संभाळून घेतो. बाबाहो, पूर्वीना एक यक्ष राजा होता, त्या यक्षाला एकशेसाठ राण्या होत्या त्याने त्याच्या राणींना एक प्रश्न विचारला, कि राण्याहो तुम्ही आज जे खाता-पिता ते कोणामुळे, त्यात एकशे एकोणसाठी राण्यांनी उत्तर दिले की आम्ही तुमच्यामुळे खातो-पितो, पण पार्वतीने धीटपणानं उत्तर दिले, मी माझ्या ''दैवान'' खाते. यावर राजा म्हणाला, तुझा दैवावरच ईश्वास आहे ना, मग असा एक म्हातारा शोधून आण कि तो इथं आल्या-आल्या लवकर मरेल. देवी पार्वतीला फार मोठा प्रश्न पडला कि आता काय करावे आणि त्यामुळे स्वत: शंकरजी आपला तिढ म्हतारा होऊन मेला, म्हणून तिढ दरवर्षी लोक वरात काढतात, भगवान शंकर आणि माता पार्वतीची तिढ वरात निघते, पोराओ वरात,'' बाबा सांगत होते.

तेथे जमलेले शिष्यगण ऐकत होते. व बाबाने सांगितल्याप्रमाणे आजही महाशिवरात्रीच्या दिवशी जातेगांव येथे फार मोठी यात्रा भरते व भगवान शिवजी आणि माता पार्वतीची वरात निघते. बाबांनी भगवान शिवाचे महत्त्व पटवून दिले. नाही...नाही म्हणणारे मुलं त्वरीत म्हणाले, 'जाऊ बाबा आपण, जरुर जाऊ...' स्वामींना हृदयापासून होकार दिल्यानंतर तिथं जमलेली मुलं आप आपल्या घरी गेली. बाबांना मनोमन फार आनंद वाटला, कारण जातेगावसारख्यागावाच्या आक्राळ विक्राळ डोंगरावर उपस्थितीत असलेल्या भगवान शिवाच्या शिवालयाचा जिणोध्दार करायचा होता. शिवाय भक्तांना भक्तीमार्गात विलीन करुन धर्माची प्रचिती दयावयाची होती आणि जातेगाव सारख्या डोंगरावर विश्वशांतीची प्रचंड ध्वजा हया गगनचुंबी आकाशाला दाखवायचीही होती. ही सद्गुरु जनार्दन विभुती आता त्यांच्या-त्यांच्या कार्यासाठी पूर्णपणे निपुन झाली होती. तरी घरी गेलेली बालके (व्यक्ती) स्वामींचाच विचार करत होती. त्यांना मनोमन वाटू लागले की हा बाबा लंगडा आहे तरीही हया भयानक डोंगरावर त्याची जाण्याची किती प्रबळ इच्छा आहे. आणि वरुन पिनाकेश्वरच्या मंदिराचे जिणोध्दाराचे करायचे सांगतो म्हणजेच हा काय साधा सुधा बुवा नाही. तो एक महान साधू दिसतो. असे मनोमन वाटू लागल्यावर ते आपापसात चर्चा करु लागले कि तो बाबा काय खातो? चला आपण दुध घेऊन, अशा प्रकारे ते मुलं पुन्हा काही क्षणानंतर दुध घेऊन आले तेव्हा बाबांनी त्यांच्या दुधाचा फार आनंदाने स्विकार केला. आता बाबांच्या कार्याला जातेगावात काहीतरी विलक्षण आधार मिळाला होता. त्याच आधाराचे सहाय्य घेऊन स्वामींना जगाची विभुती व्हायचे होते, जगाचे कल्याण करायचे होते, धर्माचे रक्षण करायचे होते व येणाऱ्या एकविसाव्या प्रगतीपथाच्या शतकात दैवाचे अस्तित्व मांडून दाखवायचे होते. दूध घेतल्यानंतर जमलेली मंडळी घरी गेली, स्वामी पुन्हा साधनेला बसले, स्वामींची तपसाधना अतिशय कठोर होती, स्वामींनी त्यांच्या जिवनातील सातत्याने सत्कार्याचा महिमा गाजवला होता, दोन दिवस सकाळ ते सायंकाळचा नित्यक्रम स्वामींनी अंदरसुल सारखाचा चालवला होता. तिसऱ्या दिवशी मात्र जगन्नाथ कसार,

जंगलुबाबा, गोटीराम परदेशी, सर्जेराव पाटील, जनार्दन तेली, बाळू पाटील इत्यादी तरूण मंडळी बैलगाडी करुन जुन्या महादेवाच्या मंदिराजवळ गेले व बाबांनी चला म्हणून सांगितले.

सर्जेराव पाटलांनी स्वामींची साहित्याची मदार बैलगाडीत ठेवली व सर्व जणांनी हाताने उचलून स्वामींना बैलगाडीत बसवले. सायंकाळच्या वेळी बरोबर चार वाजेच्या सुमारास ही जनार्दन बाबा नामक सुन जणु काय पिनाकेश्वराच्या माहेरी चालली होती, खुळूखुळू घंटेचा नाद करीत बैल वेगाने पहाडाच्या दिशेने गाडीला ओढून नेत होते. बाबांनी प्रवासात मौन धारण केले होते. त्यामुळे बैलगाडीत तशी स्तब्धताच होती आणि शिवाय त्या रस्त्याला सहसा कुणी जात नसल्याने आगोदरच रस्त्यावर विशेष शांतता नांदत होती, जसजसे बैल पुढे जात होते तसतसे विशाल बुंदयाची व गर्द पानांची उपस्थिती असलेली झाडे मागे जात होती. स्वामी माहेरी जात असल्याने बऱ्याचश्या पक्षांनी किलबील आवाज काढून त्यांना अनुमोदन दिले. काही दूर अंतर गेल्यावर मात्र सुर्याची सायंकाळची हवीहवीशी वाटणारी किरणे त्या वृक्षांच्या छायेखाली क्षणार्धात गडप झाली होती. निळेगार आकाश डोक्यावर दिसत असतांना ही समोर काळाकुट्ट अंधार डोळयांशी लपंडाव खेळत होता. बराचसा वेळ गेल्यानंतर गाडी बैलांनी डोंगराच्या दुसऱ्या टप्प्यात आणून सोडली. ती आत्मा असलेली बैलं तेथून पुढे चालण्यास मात्र असमर्थ ठरली. बाबांनी मौन धरल्यामुळे ते बोलत नव्हते. तेथून पुढे सर्जेरावांनी बाबांना पाठीवर घेतले तर कासारांनी बाबांचे साहित्य घेतले. काही अंतर चालल्यानंतर जगन बाबांनी व जंगलुबाबांनी स्वामींना खांद्यावर घेतले आता डोंगराचा तिसरा टप्पाही ओलांडला होता. तेथून पुढे पुर्णत: चढता रस्ता होता. शिष्यगणांना तिथून पुढे नेणे अशक्य वाटत होते कारण ते त्यांच्या बाहेर येणारा श्वास पटापट बाहेर टाकत होते. बाबांना प्राणायाम येत होते. त्याचमुळे बाबा त्यांच्या शिष्यांपासून दूर गेले व चालायला लागले. त्यांच्या सोबत आलेल्या शिष्यांना आनंदाचा व आश्चर्याचा सुखद धक्का बसला. ते बाबाकडे बघतच राहिले काही अंतर चालल्या नंतर स्वामींनी लोटांगण घेण्यास सुरुवात केली. लोटांगणाद्वारे स्वामींनी त्या पिनाकेश्वराला पाच चक्कर मारले चक्कर मारल्यानंतर गोटीरामांनी स्वामींना उचलून प्रवेशद्वाराजवळ नेले सर्वांना बाबांचा विशद धक्का बसला. तितक्यात मंदीराच्या गाभाऱ्यातून फार मोठा आवाज आला, शिष्यगण घाबरले. जंगलुबाबाने व कासारबाबांजी काठया घेऊन आवाजाच्या दिशेने मंदिरात शिरकाव केला पण तो व्यर्थ गेला. त्या शिवालयात पिनाकेश्वराच्या पिंडीशिवाय दुसरे काहीच नव्हते. काहीच नाही तरीही आवाज आला हया कुतूहलाने चेहऱ्यावरचा घाम पुसत ते बाबांजवळ आले, व विचारु लागले बाबा हा काय प्रकार आहे. बाबा हसत म्हणाले, ''घाबरु नका पोराओ, आपले स्वागत केले, देवाने, जोरात आरोळी दया.''

पिनाकेश्वर भगवान कि जय

नागेश्वर बाबा कि जय

नर्मदा माता कि जय

घाबरलेले शिष्यगण देवाचा जयजयकार केल्यानंतर पुन्हा मुळस्थितीत आले, तद्नंतर स्वामींना त्या नवीन शिष्यगणांना स्नानांची खुण केली. यावर शिष्यांना नवलच वाटले. एवढया रात्री, इतक्या थंडीत हया लंगडया बाबाला अंघोळ करायची, पण त्यांना स्वामींच्या त्रिकाल स्नानाचे काय महत्त्व माहिती, त्यांनी जवळच असलेल्या खड्डयातील अतिथंड पाण्याने स्वामींना स्नान घातले, त्यानंतर स्वामींनी सर्जेरावासह इतर शिष्यांना स्नान घातले, त्या शिष्यांचा थकवा, कंटाळा, आळसपणा कुठल्या कुठे मावळला हेच त्यांना उमजले नाही तदनंतर स्वामी बादली मध्ये पाणी घेऊन मंदीरात गेले, गेल्या-गेल्या पिनाकेश्वर महाराजांना अंघोळ घातली, सर्व मंदीर शिष्यगणांनी झाडून काढले, नागाबाबांनी दिलेल्या मंत्राचे पूजन केले व विधी वाचण्यास सुरुवात केली. संपुर्ण विधी वाचून झाल्यावर भगवान शिवाची आरती बालले व डोळे मिटून बसले. पाच ते सहा मिनीटानंतर स्वामींनी मिटलेले डोळे उघडले व मुखातुन बोल काढले.

'बर झालं पोराओ तुम्ही माला वर आणलं नाही तर खाली जा ते अंदरसुलचे लोकं आले पा माला न्यायला, जा त्यानंला वर घेऊन या.'

बसलेली शिष्यमंडळी थोडी खाली येऊन बघता तर तीन अंदरसुल येथील स्वामींचे शिष्य त्यांना घ्यायला वर येत होते. शिष्य मंडळींना फार आश्चर्य वाटले व वाटू लागले साधु बाबा साधा सुधा बाबा नाही तर खरोखर देवच आहे. नंतर दहा वाजेच्या सुमारीस जातेगांव शिष्य मंडळींनी अंदरसुल शिष्यमंडळीस पिनाकेश्वराच्या शिवालयात गेले. तेथे नेल्या नंतर त्यांनी स्वामीस परत अंदरसुलास येण्यास आग्रह केला. परंतु स्वामींनी 'नाही' असे उत्तर दिले कारण त्यांना त्यांच्या कार्याची पताका आता जातेगावच्या पहाडावर रोवायची होती व त्याच दिवशी त्यांनी नुकताच श्री गणशा केला होता. स्वामींनी त्यांना रात्रभर तेथेच थांबायला लावले. स्वामींनी ओळखले की जातेगावच्या शिष्यगणांना आता भूक लागली असेल त्यांनी शिष्यांना आत बोलवले व विचारले, ' भूक लागली कारे ?' शिष्यांनी 'हो' सांगितले. तद्नंतर स्वामींनी पाच खारका त्यांच्यापुढे ठेवल्या परंतु शिष्यांना वाटले ह्या खारका पोटात कोणत्या कोपऱ्यात जाऊन बसतील हे सांगता येणार नाही. याचेना काय पोट भरेल काय असे त्यांना मनोमन वाटले. परंतु स्वामींचा हा अनमोल प्रसाद आहे. त्याचा अपमान करु नये. म्हणून त्यांनी त्या खारका खाण्यास सुरुवात केली पण काय चमत्कार तोंडात टाकलेली खारीक संपत नाही तोपर्यंत दुसऱ्या खारका जागेवर तयार असायच्या, पूर्ण पोट भरले तरीही जागेवर पाच खारका जशाच्या तशा होत्या, यावरून संताचा आशिर्वाद लक्षात घ्या. संतांनी दान दिलेला प्रसाद लक्षात घ्या, त्यांचा प्रसाद हा पुरुन उरतो परंतु कमी पडत नाही. खारकांचा चमत्कार जातेगांव वाल्यांच्या मनामनात भरला व स्वामी एक भगवान शिवाचाच अवतार आहे याची जाणीव करुन गेला. ते तेथेच पहाडावर मुक्कामी राहिले. दुसऱ्या दिवशी स्वामींनी

अंदरसुलच्या भक्तांना तेथेच थांबायला लावले व जातेगांव वाल्या भक्तांना घरी जाण्यास लावले. गावात आल्या आल्या भक्तांनी पूर्ण वृत्तांत गावकऱ्यांना सुनावला, गावकऱ्यांना बरेचसे आश्चर्य वाटले व त्यानंतर त्यांनी स्वामींची सेवा करण्याची प्रवृत्ती मनोमन वठवली, त्यानंतर कारभारी फकिर महाजन यांच्या येथून रोज स्वामींना दुध न्यायचे. दुसऱ्या दिवशी कासारबाबां व इतर शिष्य स्वामींना दूध घेऊन जात असतांना त्यांना वाटेत वाघ समोर आला त्यांनी जोरात घोषणा दिली 'श्री जनार्दन बाबा की जय' वाघ रस्त्यातून घोषणा ऐकताच दूर झाला. स्वामी एकेक दुष्टांत भक्तांना देत होते व हे भक्तांना वेळोवेळी ज्ञात होत होते. डोंगरावर दूध नेल्यानंतर जातेगाववासीयांनी बाबांना सर्व हकिगत सांगितली बाबांनी त्यांना सांगितले.

'बाबाहो उद्या येतांना शेण, गोवऱ्या तुप, आणि आगपेटी घेऊन या' नंतर जातेगाववाले शिष्य घरी आले गावातल्या लोकांना एक विशेष वाटायचे 'स्वामी हे एकटेच डोंगरावर कसे राहतात कारण अंदरसुलवाले भक्त रात्री गावात निघून येयचे व दिवसभर पुन्हा तिथं जायचे, 'हा बाबा म्हणजे नेमके कोण आहे ? हा प्रश्न पुन्हा पुन्हा त्यांच्या मनात येत असायचा व विचार करता करताच दिवस निघून जायचा. आता स्वामींना डोंगरावर जाऊन तब्बल ३ दिवस झाले होते. चौथा दिवस उगवला गेला कासाररावांनी व इतर गावकऱ्यांनी स्वामींनी सांगितल्याप्रमाणे तुप, गोवऱ्या, शेण घेतले व डोंगरावर जाण्यास निघाले बाबा हे अंतरयामी आहे. डोंगरावर आलेला लंगडा बाबा साक्षात देव आहे ही प्रचिती संपूर्ण गावाला झाल्याने स्वामींना जवळून बघण्यासाठी दहा पंधरा लोक जगनबाबा सह पहाडाकडे निघाले.

**'जनार्दन बाबा की जय**
**पिनाकेश्वर बाबा की जय**
**नागेश्वर बाबा की जय'**

अशा घोषणा देत सर्वजण डोंगराकडे निघाले व कशा प्रकारे डोंगराच्या शिखरावर जाऊन पोहचले हेही कळाले नाही. बाबा जवळ जाण्यापूर्वी सर्वांना हातपाय धुतले व नंतर बाबाजवळ जाऊन पहाडावर नेलेले साहित्य दिले. स्वामींनी तेथेच होम हवन केला. देवाला अग्नीची अहुती देऊन यज्ञ केला. अनेक मंत्र बोलून दोन तिन तासाचा यज्ञ केला व नंतर सर्वांना भस्म लावला, स्वामींनी त्या यज्ञाने तयार झालेल्या विभूतीवर नागाबाबांचा विभुती मंत्र बोलला व त्याच विभुतीच्या आधाराने स्वामींनी जगाचे कल्याण केले. त्याच विभूतीमंत्राच्या आधारे स्वामींनी भक्तांना एकत्र आणून धर्माचे रक्षण केले, त्याच विभूतीमंत्राच्या साह्याने स्वामींनी शिवालये उभारून भक्तीचा मळा फुलवला. जातेगावच्या डोंगरावर बारा च्या सुमार यज्ञ झाला व विभुतीही तेथेच झाली. बाबांनी तीच विभुती मंत्रून अंदरसुलाच्या भक्तांना दिली व त्याच विभूतीच्या आधाराने अंदरसुल येथील टेकेश्वरी मंदीराचा

जिर्णोद्धार ऑगस्ट १९६३ मध्ये झाला. हे स्वामींच्या विभुतीने जिर्णोद्धार झालेले पहिले शिवालय आहे. तद्नंतर स्वामींनी नित्य नियमाने डोंगरावर येणाऱ्या शिष्यांना भस्म दिला व सांगितले 'तुम्हाला आता रस्तानं येतांना काहीच भय नाही.' त्या दिवशी नेमके लक्ष्मण तात्या लोंढरेकर हेही इतर गावकऱ्यांसह पहाडावर गेले होते. त्यांचे आदल्यादिवशी रात्रीला दोन बैल चोरी गेले होते. त्याग्रहस्थाने स्वामींपुढे आपले गाऱ्हाणे मांडले. स्वामींनी त्यांना रक्षा दिली व सांगितले 'जिथं बैल बांधत होते तिथं ही विभूती टाका, बैल उद्यापर्यंत गोठ्यात येतील. थोडा सुटकेचा निश्वास टाकून गावकरी बाबाजींची विभुती घेऊन

'जनार्दन बाबा की जय, डोंगर के बाबा की जय'

असा आवाज देत खाली आले. सर्व गावकरी त्यादिवशी गावाजवळच्या पिराजवळ बसले होते. रात्र हळुहळू पुढे रेल्वेप्रमाणे चालली होती. स्वामींच्या विभुतीचा प्रताप बघण्याची घटी जवळ येत होती. अखेर तेच झाले. रात्री बारानंतर दोघही बैल गोठ्यात त्यांच्या त्यांच्या खुंट्याजवळ येऊन उभी राहीले. तेवढ्या रात्रीत बाबाजींच्या जयजयकारानेअवघे जातेगांव दुमदुमले, बाबाजी ही केवळ साधी सुधी विभुती नसून चक्क पिनाकेश्वर बाबाच जातेगावला आला आहे असे त्यांना वाटले म्हणून दुसऱ्या दिवसापासून पहाडावर जाणाऱ्या भक्तांमध्ये विलक्षण वाढ झाली. त्यानंतर दिवसामागून दिवस जात होते. जातेगावची मंडळी स्वामींच्या दर्शनाला डोंगरावर जात होती. लोक रोज रोज गाऱ्हाणी सांगत होते बाबा प्रत्येकाला विभुती देवून कल्याण मार्गावर नेत होते. बाबांनी कुणाच्या शेळ्या कोरड्या विहीरीत आहे असं सांगितले तर कुणा रोग्यांना रोगापासून मुक्त केले. दिवसेंदिवस त्यांच्या कार्याचा महिमा जातेगांवच्या परिसरात उमटत होता. त्याचे प्रतिक जातेगाववाले गावकरी त्या भरलेल्या पहाडावर दिसत होते. जातेगावचा पहाड आता शिष्य गणांनी फुलू लागला. आतापर्यंत जातेगावच्या डोंगरावर माणसांची रांग ही केवळ महाशिवरात्रीच्या दिवशी लागत होती. महाशिवरात्रीच्या महान दिवशी पिनाकेश्वर भगवानाची जबरदस्त यात्रा भरत असायची व त्याच निमित्ताने तेथे लोकांची उपस्थिती असायची, सकाळी सकाळी जातेगावातील व त्या पंचक्रोशीतील भक्तजन भितीच्या धसक्याने समुहाने डोंगरावर जायची, तेथे भगवान शिवाला दुध वाहून बेलाचे पान चढवून पुजा करायचे, देवाची वरात निघायची, दिवसभर भारतासारख्या निसर्गाच्या भूमीतील अवात्य निसर्गाचा आनंद लुटायचे, दिवस अस्ताला जाण्यापूर्वी पुंन्हा एकदा पिनाकेश्वराचे दर्शन घ्यायचे व 'पिनाकेश्वर महाराज की जय' असे म्हणून निघायचे. रात्रीचे तेथे कुणी थांबत नसायचे व पुन्हा एकदा शिवरात्रीशिवाय तेथे कुणीही फिरकत नसायचे. म्हणजेच महाशिवरात्री शिवाय लोक डोंगरावर जात देखिल नसायचे. नांदगाव तालुक्यातील जातेगाव हे गांव पिनाकेश्वराच्या अस्तित्वामुळे ऐतिहासिक मानले जाते. भगवान शिव, प्रभुरामचंद्र व विष्णु अवतार बंधु लक्ष्मण अशा त्रिदेवांनी मुक्काम केलेले हे ठिकाण अतिप्राचीन असून जबरदस्त प्रसिध्द होते. समूद्रसपाटीपासून दोन अडीच

किलोमीटर उंचीवर विसावलेले हे पिनाकेश्वराचे मंदिर भारत भूमी सारख्या देवघरात शिखरासारखे शोभून दिसते. आता बाबांना डोंगरावर येऊन बरेचसे दिवस झाले होते. बाबांच्या विभुतीमुळे बरेचसे सहकार्य जातेगवाच्या भूमीत अजरामर झाले होते. लंगडा बाबा हा साक्षात शिवाचा अवतार आहे. याची जाणिव जातेगाववासीयांना अंदरसुलगावकऱ्यांसारखी झाली होती. त्यामुळे आता जातेगावचा डोंगराळ परिसर दिवसभर माणसांनी हळुहळू निशीगंधाच्या फुलाप्रमाणे फुलू लागला होता. गावकऱ्यांना आता महाशिवरात्रींच्या यात्रेची आस लागली होती, बाबांना डोंगरावर येऊन पुरेपुर चार मास झाले होते. स्वामींच्या हिंदु धर्माची ध्वजा फार दिमाखाने त्या जातेगावच्या पहाडावर फडकत होती. स्वामी तेथे यज्ञ होम दर सोमवारी करत होते. गावकऱ्यांना विभुती देत होते. विधीत साऱ्या जीवनाचा सार आहे असे ते वेळोवेळी सांगत होते. उगणारा सूर्यनारायण भक्तांना स्वामींच्या दरबारात घेऊन येत होता व सायंकाळी पुन्हा पहाडाच्या पायथ्याशी नेऊन सोडत होता. स्वामींचे कार्य मात्र रात्रीही विसावा घेत नव्हते. सकाळी उठल्यावर स्नान पूजा करण्यापासून ते सायंकाळच्या ओंकारेश्वराच्या आरतीपर्यंत त्यांचे कार्य अखंड चालु असायचे, भक्तांचे स्वामींजवळचे अस्तित्व हे केवळ सुर्यनारायणाच्या अस्तित्वापुरतेच मर्यादित असायचे. एकदा का सुर्यनारायण जगाचा निरोप घेऊन गेला की लोकंही बाबाचा निरोप घेऊन हळुहळू पहाड उतरायचे पहाड उतरतांना ते केवळ स्वतःचाच विचार करायचे, नाहीतरी तो परिसर त्या वेळेला तो विचार करायला लावायचा, स्वतःचा जीव कसाबसा जातेगावात पोहचला की ते शांततेचा सुस्कारा सोडायचे पण त्यावेळी त्यांच्या मनात बाबांच्या जीवाचा विचार का येत नव्हता ? त्यांनी कधीही बाबांच्या जिवीत्वाचा चिकित्सक बुध्दीने विचार का केला नसावा ? परंतु त्यांना बारा वर्ष खडतर तपसाधना करणाऱ्या म्हाळसाई पुत्राची उंच भरारी कळाली नाही हा त्या येणाऱ्या काळाचाच पकडा समजावा . बरेच दिवस निरोप दिल्यानंतर काही दोन दिवसाच्या अंतरावर महाशिवरात्रीचा दिवस उजडणार होता व अखेर तो दिवस उजडलाच, जातेगांव पंचक्रोशीतील असंख्य भक्तगण यात्रेसाठी जातेगावाच्या शिवारात जमले, जातेगांव भक्तांनी बाबांच्या कथांचा महिमा यात्रेकरूंना सांगितला पण यात्रेकरुंचा त्यावर विश्वास बसला नाही. पण कुतुहलाने त्यांच्या मनात शंकेचे जाळे टाकले, यात्रेकरूंनी सकाळी सात वाजता पहाड चढण्यास सुरुवात केली, जातेगावचे शिष्यगण त्यांच्यासोबत होतेच. जाता जाता ते स्वामींचे साक्षात्कार त्यांना वर्तवत होते काहींचा विश्वास बसायचा तर काही नुसते ऐकण्यापूरते ऐकायचे. बाबा तिथं एकटे रात्री राहतात ही गोष्ट त्यांच्या मनाने ग्रहणच केली नव्हती. डोंगराचे टोक जवळ येत होते. पिनाकेश्वराचा साक्षात्कार झालेला भगवान शिवाचा अवतार कसा असेल या विषयी त्यांच्या मनात विलक्षण ओढ लागली होती. सकाळी दहा वाजेच्या सुमारास यात्रेकरु पहाडावर पोहचले, त्यांनी हातपाय टाकून पिनाकेश्वराचे दर्शन घेतले व बाबांकडे विलक्षण दृष्टीने बघू लागले, बाबा पोत्यावर

बसून 'भागवत' वाचत होते. त्यांनी हिंदु संस्कृतीप्रमाणे बाबांचे दर्शन घेतले. काहीतरी जबरदस्त जाणीव त्यांना स्वामींच्या दर्शनातून झाली. दिवसभर ते बाबांच्या सानिध्यात राहिले, मी धन्य समजतो त्या शिवभक्तांना की ज्यांनी महाशिवरात्रीसारख्या महापुण्यवान दिवशी एकाच वेळी दोन शंकराच्या रुपांची दर्शने घेतली. बाबांनी त्यांना दिवसभर तेथील दगडं नीट लावण्यास लावली. बाबांना श्रमदान फार आवडायचे. 'ज्याने श्रमदान केले त्याने त्रिभुवनात राज्य कमवले' , असे बाबा नेहमी सांगत. भक्तांना श्रमदान करता करता लाखमोलाचा आदेशही देत असायचे, उपदेश करता करता बाबा त्यांना मधुनच म्हणायचे...

'बाबाहो... काम करा काम... काम केल्याने जीवनातले पातक आपोआप नष्ट होते.' आदेश झाल्यावर बाबा मधूनच बोलायचे. 'लोकाहो विधी रोज म्हणायची, ज्याच्या मुखात विधी तो दरबारात पुण्य आहे. म्हणून विधी म्हणायची.' दिवसभर श्रमदान करुन काही बाबाजींचे उपदेश ऐकून यात्रेकरुंनी आकाशात बघितले तर सुर्य बराचसा पश्चिमेकडे सरकला होता. अंधाराचे सावड पडण्याआधी गावात पोहचले पाहिजे अशी आशा धरून यात्रेकरू निघायची तयारी करु लागले, चारच्या सुमारास पिनाकेश्वराचे दर्शन घेऊन यात्रेकरू बाबांकडे गेले व म्हणाले, 'येतो मग.'

बाबा मात्र हसत म्हणाले,' या... या.. घाबरु नका, काही होणार नाही. देव सांभाळून घेतो सगळं. सुखरुप जाशाल पहा...' बाबांचा हा अनमोल आशिर्वाद घेऊन यात्रेकरू खाली उतरु लागले.

'पिनाकेश्वर भगवान की जय' अशी आरोळी देऊन यात्रेकरुंनी पहाड सोडला. उतरता उतरता त्यांच्या मनात केवळ स्वामींचा उपदेशच राज्य करत होता. उतरता उतरता त्यांना आपसात एक विचार केला की, आपण उद्या जाऊन पाहू बाबा आणि त्यांचे दोन–तीन शिष्य राहतात की नाही.' बऱ्याचवेळे नंतर त्यांनी डोंगर सोडून गावात नातेवाईकांच्या घरी मुक्काम ठोकला. संपूर्ण रात्र नक्षत्रांनी सजलेल्या आकाशातील पंचतारांकित चांदण्यांनी लुकलुकत गेली. दिवस उजाडला यात्रेकरुंनी तांबेभर पाण्याने तोंडात चुळ भरली व चहा घेतला व त्वरीतच डोंगराच्या दिशेने निघाले. जीव हाताच्या मुठीत घेऊन बाबा आहे की नाही हा विचार डोक्यात घेऊन यात्रेकरू पटापट डोंगराच्या दिशेने जात होते. बाबाजींना मात्र डोंगरावर कळाले की यात्रेकरू आपली परिक्षा बघण्यासाठी डोंगरावर येत आहे. बाबाजींनी त्यांच्यासमवेत थांबलेल्या शिष्यांना सांगितले 'यात्रेकरू वर येऊ राहिले, तुम्ही तुमच्या कामाला लागा, जो तो ज्याचे त्याचे काम करतो आपण आपले काम करावे , त्यांचे काम त्यांना करु द्या.'

यात्रेकरू हळूहळू चालत डोंगराकडे येत होते. त्यांच्या देहात उत्सुकता भरली होती. मनाची ओढ व पायाची गती एकाच वेळी वाढत चालली होती. सागराला भरती यावी तशी शंका कुशंकाची भरती यात्रेकरुंची मनात भरून येत होती. नदीला पूर यावा, भूमातेला

ज्वालामुखीचा उद्रेक व्हावा, प्रत्यक्षात सूर्याला ग्रहण लागावे, चंद्राची गती खुंटावी, फुलांनी आशेने फुलावे, मधमाशांना अपेक्षेहून जास्त मध गोळा व्हावा, अशा तऱ्हेने त्या शिष्यांच्या मनात कुतुहलाचे स्वामींच्या अस्तित्वाबद्दलचे चिकित्सक आकुंचन निर्माण झाले. गडाचा टप्पा पाय आलोडत होते, मनात विलक्षण विचाराचे चाक फिरत होते, हृदयात विसावा घेणारी स्पंदने अचानक डोंगर जवळ आल्याने वाढू लागले होते. नजर पायांच्या गतीवरुन काही क्षणात पिनाकेश्वर मंदिरातील जनार्दन स्वामींच्या चरणावर जाऊन आदळत होती. कसा कसा विचार करुन सर्व यात्रेकरू डोंगरावर जाऊन पोहचले, मन डोळे व बुध्दी सर्व एकत्रित पणे स्वामींना बघण्याचे कार्य गतित उर्जेप्रमाणे करत होते. चेहऱ्यावर घामाच्या धारा तराळल्या होत्या. कपाळावर गोळा झालेले घामाचे दवबिंदू काही क्षणाच्या विसाव्यासाठी आजपर्यंत थांबलेले होते. परंतु पिनाकेश्वराच्या पहाडावर जाताच ते कळत नकळत कपाळ सोडून जमिनीवर टपकले होते. बाबा सहिसलामत डोंगरावर पुजा करत आहे. हे त्या यात्रेकरूंच्या डोळ्यांनी त्यांच्या मनात कळवले, हृदयाची स्पंदने स्थिरावले, भ्रमंती करुन काही क्षणापूर्वी पहाडावर बाबांचा शोध घेणारे मन शून्यात शांततेच्या निवाऱ्यात जावून बसले, ह्या म्हाळसाई पुत्राची ज्यांना बघण्याची आस लागली होती, त्यांनी गेल्या गेल्या स्वामींचे पाय धरले. पाया पडता पडता स्वामी यात्रेकरुंना म्हणाले, 'बाबाहो, मला काहीच झाल नाही, हे सारं तुमचं आमचं नाही, हे सारं देवाचं आहे, आणि देव सारं काही सांभाळून घेतो.'

बाबांचे उद्‌गार ऐकताच यात्रेकरूंच्या अंगावर रोमांच उठले, त्यांना जाणिव झाली, हा काही साधा सुधा लंगडा बाबा नाही, हा साक्षात देव आहे, तद्‌नंतर फार मोठ्या आवाजाने स्वामींच्या नावाच्या घोषणा देत त्यांनी श्रमदानास सुरुवात केली. आजुबाजुला अव्यवस्थीत असलेले दगडे व्यवस्थित लावण्याचे कार्य स्वामींनी सर्वप्रथम करण्याचे ठरवले होते. त्यामुळे स्वामी भक्तांना थोडाफार उपदेश केल्यानंतर लगेच ते दगडं व्यवस्थित लावण्यास सांगत असे, काम करता करता यात्रेकरुंना जातेगाववाल्या भक्तांनी रात्रीचा वृत्तांत सांगण्यास सुरुवात केली, त्यातल्या त्यात जगन बाबांनी यात्रेकरूंना रात्रीचा वृत्तांत रेखाटला यात्रे करूही काम करता बाबांचे बोल ऐकण्याचे कार्य करत होते. सांगता सांगता जगनबाबा बोलले, रात्र झाली होती, सगळीकडे अंधार पसरला होता. बारा वाजेनंतर कसला तरी आवाज येण्यास सुरुवात झाली होती, बाबांनी अंतरमनाने सर्व समजले, बाबा म्हणाले, 'काहीच होणार नाही, विभूती आणा' स्वामींनी सर्वांना भस्म लावला व सांगितले, 'शांत झोपा', काहीच होणार नाही. तद्‌नंतर आम्हांस गाढ झोपा लागल्या. आवाज येत होता ही संकल्पना केव्हाच मनातून निघून गेली होती. त्यानंतर पहाटे उठून त्यांनी स्नान पुजा केली व सूर्यनारायणाने पुन्हा एकदा प्रकाश टाकून स्वामींच्या कार्यास सुरुवात केली.'

हा सगळा वृत्तांत ऐकून यात्रेकरू भारावून गेले, त्यांनी दिवसभर तेथेच काम केले,

व नंतर स्वामींच्या जयघोषात आपआपल्या गावी गेले आणि स्वामींची महती गावू लागले, आता ह्या उगले घराण्यात जन्मास आलेल्या बालकाची व नागाबाबास पुरेपुर पात्र असणाऱ्या शिष्याची कार्याची ध्वजा अवघ्या जातेगावच्या पंचक्रोशित फडकली. त्यांच्या कार्याचा महिमा अवघ्या जातेगाव शिवारात आनंदला, स्वामींचा हाहा कार बघण्यासाठी विशाल आकाश आणि सागर एकाच वेळी अपुरे पडले. 'डोंगरावर आलेला लंगडा बाबा हा साक्षात भगवान शंकरच आहे. म्हणूनच तो लंगडा असूनही पिनाकेश्वराच्या डोंगरावरील मंदीरात जाऊन बसला आहे.' हीच हाकाटी विसाव्या शतकात वाऱ्यासारखी पसरली, आता स्वामींच्या शिष्यात बरीचशी वाढ झाली होती. ज्याप्रमाणे राजा शिवाजीने जावळीवर विजय प्राप्त केला आणि त्यानंतर त्यांच्या सैन्यसंख्येत प्रचंड वाढ झाली व त्याच सैन्याच्या बळावर त्यांनी हिंदुस्थानची हिंदवी ध्वजा अवघ्या भारतात फडकवली, अगदी तसेच स्वामींच्या बाबतीत घडले शिवरात्रीनंतर स्वामी साक्षात भगवान शिवाचा अवतार आहे ही जाणीव जेव्हा यात्रेकरूंच्या मनात घर करुन बसली, तेव्हापासून स्वामींच्या भक्तात वाढ होऊ लागली व त्यांच्या भक्ताच्या साहयाने स्वामींनी धर्मावरील ग्लानी दूर करण्याचा प्रयत्न केला व आपल्या कार्याची ध्वजा अवघ्या हिंदुस्थानात फडकवली. आता बरेचसे लोक स्वामींचे शिष्य झाले होते. पिनाकेश्वराचा पहाड आता फुलु लागला होता तो दगडांनी नव्हे तर माणसांनी. माणसांच्या रांगाची रांगा आता पिनाकेश्वराच्या पहाडावर दिसू लागल्या होत्या. पिनाकेश्वराला जाण्याचा रस्ता आपोआप लोकांच्या पायवाटने रात्रीही चंद्राच्या प्रकाशात स्पष्टपणे दिसू लागला होता. निसर्गाने खुल्या हाताने दान केलेल्या निसर्गाच्या प्रत्येक आपत्यांमध्ये 'जनार्दन स्वामीच' असल्याची जाणीव आता शिष्य मंडळींना होऊ लागली होती. पिनाकेश्वराच्या प्रत्येक झाडाझुडुपात प्रत्येक पानाफुलांत स्वामी आहे याचे प्रचिती त्यांना होऊ लागली होती. दगडा दगडात , दऱ्या खोऱ्यात पशु पक्षात जनार्दन स्वामीचे अस्तित्व आहे. आपण कशाला घाबरायचे असे आपाआपासत बोलून बोलून भक्तगण रात्रही पहाडावर बिनधास्त पणे जात होते. त्यानंतर कधीही जा स्वामीचे शिवालय सदासर्वदा शिष्यांनी भरलेले असायचे.

लोक सकाळ पासून ते रात्रीपर्यंत किंबहुना दोन दोन दिवस पहाडावरच राहू लागल्याने गावात स्वामीची चर्चा अधिकच वाढू लागली होती. काही नाठाळ लोक स्वामींवर विश्वास ठेवण्यात तयार नव्हते. त्यांना वाटायचे की 'हा भोंदू बाबा आहे, त्यामुळे तो जादू करुन लोकांना तिथ बोलावून घेतो आणि सेवा करायला लावतो. त्यामुळे काही दैवावर विश्वास न ठेवणाऱ्या लोकांनी वाकले गावातील पंचायत समितीचे सदस्य पंडीतराव (रावराजे) रामराव वाघ यांच्याकडे गेले व सांगू लागले. 'त्या डोंगरावरील बाबाने अख्ख्या गावाला येड लावले, तो काही देवाचा अवतार नाही, चला त्याला काढून द्यायला पाहिजे.' हे पंडीतराव सदस्य असल्याने जनतेची मागणी त्यांनाही ऐकावी लागली व सर्व नाठाळ

लोकांसह हेही पहाडावर चालून गेले. तेथे गेले तर बाबाजी कुटीयासमोर बसले होते. दगडं व्यवस्थीत रस्त्याच्या कडेला लावून रस्ता करण्याचे सत्कार्य चालू होते. जुन्या मंदिराच्या कळसावर हिंदवी ध्वजा बाबांचे कार्य बघून नाठाळ लोकांच्या जिद्दीवर दिमाखाने हवेत फडकत होती. पंडीतराव रामवराजे तेथेच कोपऱ्यावर बसले व बघत राहिले, जोही येत होता तोही स्वामींचे दर्शन घेऊन कामाला लागत होता. यांच्या मनात एक सखोल विचार आला. 'आपण तर ह्या बाबाला काढून देणारच आहे, पण याच्या पाया पडलो तर काय फरक पडणार आहे. आणि इतके लोक पाया पडता आपलं काय घोडं मारलं त्या लंगड्या बाबानं' हा विचार केल्यावर रावराजे उठले व सरळ स्वामींकडे गेले. स्वामींनी त्यांच्या चेहऱ्याकडे बघीतले पंडीतराव दर्शनासाठी खाली वाकले, स्वामींनी त्यांच्या पाठीवर हात ठेवून उद्‌गार काढले,

'काय रे बाबा मी काय केलं होतं तुझवालं, तु माला काढून द्यायला आला, दे बाबा काढून, जातो मी निघून'.

स्वामींचे हे अद्‌भूतपूर्व वाक्य ऐकून पंडीतकाकाजी डोक्यावरची टोपी खाली पडली. चेहरा घामांनी सजला, तोंड आश्चर्याने लाल-पिवळे झाले. 'नाही... बाबा... नाही... चुकलं माझं अस म्हणत. 'पंडीत काकांनी स्वामींचे पाय धरले व तेव्हापासून ते नाठाळ प्रजेसह स्वामींजवळ आठ आठ दिवस पहाडावर थांबु लागले. यातुन नाठाळ जनतेला नवा धडा मिळाला. 'लंगडा बाबा भोंदू आहे.' ह्या वाक्यास काही क्षणात तिलांजली मिळाली. आता दैवावर निविश्वास दाखवणारे लोक स्वामींवर विश्वास दाखवू लागले होते. स्वामींच्या कार्यास वेगळ्याच गतीने दिशा मिळाली होती. जन्मास आलेल्या देहाचा आता पुरेपुर वापर होत - होता. जनार्दन नामक संत विभुती त्रिभुवनात गाजत होती. स्वामींनी शिष्यांकडून अवघ्या मंदीरा आसपासचा परिसर स्वच्छ केला होता. मंदिराजवळचे दगडे व्यवस्थीत एका बाजूला ठेवले होते. अजूनपर्यंत मात्र मंदिराचा जिर्णोद्धार त्यांनी केलेला नव्हता. मात्र तो जातेगावातील कार्याचा अंतिम भाग होता की काय हे भगवान शिवच जाणो.

बरेच दिवस उलटले होते. बरेचसे दगडं एका बाजूला व्यवस्थीत लावण्यात आले होते. बरेचसे शिष्यगण स्वामींचे भक्त झाले होते. बराचसा धर्माचा प्रसार जातेगाव परिसरात दुमदुमला होता, बरीचशी ग्लाणी धर्मावरून निघून चालली होती. बरेचसे भक्तीचे दिवे घराघरातून चमकतांना दिसू लागले होते. जातेगावच्या पिनाकेश्वरच्या मंदिरात अनुष्ठान करावे असा विचार बऱ्याचवेळा स्वामींच्या मनात येत होता. स्वामी आता मुहूर्त शोधत होते. स्वामींनी त्यादिवशी बरेचसे शिष्यगण बोलवले, पण शिष्यांना थोडे चुकल्या चुकल्यासारखे वाटले. कारण त्यादिवशी स्वामींनी सर्वांनाच एकत्र बोलावले होते. सर्वजण जमले व 'काय बाबाजी?' हा प्रश्न विचारू लागले. यावर बाबांनी उत्तर दिले.

'आपल्याला येत्या गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर येथे अनुष्ठान करायचे आहे.

कुणाला इच्छा आहे व कुणाला नाही ते सांगा?'
त्यात ९० टक्के लोकांनी होकार दिला तर १० टक्के लोकांनी खाली नकाराची माना घातल्या यावर स्वामी म्हणाले, 'बाबाहो माझं पुरं ऐका मग काय ते ठरवा.'

बाबा पुढे बोलले, 'ज्याच्या मुखात विधी असेल त्याचं वर्णन स्वत: देवाला करता येणार नाही. ज्याच्या जवळ ताकद असेल तोच काम करतो. ज्याच्या मुखात विधी असेल तो पुण्यवान ठरतो. अनुष्ठान करणं म्हणजे पहाटे उठून स्नान करणे, पहाटे साडेतीन वाजून काही वेळानं ब्रम्हनाडी जागृत होती व त्या प्रहरावर भगवंताचा जप करणे यात सर्व हित आहे. आपण जर 'जप' केला नाही तर आपले जीवन व्यर्थ आहे. अनुष्ठान केले नाही तर पुन्हा जन्म नाही. दिवसभर भगवंताचे नाव घ्यायचे, अनुष्ठान करुन मरण आले तरच आपण भाग्यवान होतो आणि ज्यांना अनुष्ठानात मरण आले तर तो कैलासात जातो. बाबाहो, अनुष्ठानाचा खोलमा करु नका. अनुष्ठान केल्याने परमेश्वराची प्राप्ती होते. आणि तुम्ही तुमच्या बायकोला जितके जीव लावतांना तितकं अनुष्ठानाला लावा. ज्याची बाई गेली त्याचा संसार गेला. ज्याचे अनुष्ठान गेले त्याचे दैव प्राप्तीचे योग गेले असे आहे. संताजवळ जर अनुष्ठान केलं तर सारं पाप निघून जातं पहा, कारण आपण नेहमी ऐकतो पहा.

**'जप तप अनुष्ठान।**
**करतो ऋषी मुनी जन।'**

मोठ मोठ्या ऋषींनी अनुष्ठान केलयं बाबाहो, तुम्ही करुन घ्या, गुढी पाडव्याचा योग फार मोठा आहे.

बाबांचे बोल पहाडावरील लोकांना बरेच काही सांगून गेले व काही क्षणात मोठ्याने आवाज ऐकू आला

**'बोला जर्नादन बाबा की जय**
**पिनाकेश्वर बाबा की जय'**

नंतर सर्वांनी अनुष्ठानास संमती दिली. भक्तांनी लगेचच खाली उतरुन बाबांनी सांगितलेला अनुष्ठानाचा महिमा गावकऱ्यांना सांगितला. त्या नंतर बरेचसे शिष्यगण अनुष्ठानास बसण्यास तयार झाले. स्वामींच्या अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक लोक अनुष्ठानाची तयारी करु लागली. स्वामींच्या जीवनातले हे तिसरे अनुष्ठान होते. मात्र 'गुरुंनी' अनुग्रह दिल्यानंतरचे हे प्रथमचे अनुष्ठान जातेगाव शिवारात होणार होते. पाडव्याच्या अगोदरच्या दिवशी सर्व तयारी जातेगांव पहाडावर नियोजनपूर्व केलेली होती. पाण्याची सोय शिष्यांनी सर्व प्रथम लावलेली होती. गुढीपाडव्याच्या दिवशी बरोबर सात वाजता स्वामींनी सर्व शिष्यांना अनुष्ठानास बसविले. यापूर्वी जातेगाववाले गावकरी कधीही अशा धार्मिक कार्यात विलीन झालेले नव्हते. त्यामुळे त्यांना हे सर्व करतांना नाविन्य वाटत होते तर इतर ग्रामस्थांनी असे प्रयोजन कधी बघितले नसल्याने त्यांना हे सर्व बघतांना विशेष कुतुहलता लागत होती.

अनुष्ठानाचे सर्व नियम स्वामींनी भक्तांना सांगितले होतेच, गावातील पाच ते सहा तरुण शिष्यमंडळी शिष्यांच्या सेवेसाठी तैनात झाले होते. आता अनुष्ठानास सुरुवात झालेली होती. बाबांजींची अनुष्ठान प्रक्रिया कशी आहे . बघण्यासाठी अवघे जातेगांव शिवार त्या पहाडाच्या रस्त्यावरून चालतांना दिसत होती. सकाळी सकाळी जप करण्यास सुरुवात झालेली होती. बाबांच्या सत्कार्यात 'स्त्री' ला माता पार्वतीचे स्थान होते परंतु तेथे अनुग्रह घेतलेले अनुष्ठानार्थी असायचे तेथे स्त्रियांना जाण्यास सक्त मनाई असायची, स्वामींच्या दर्शनालाही स्त्रिया ह्या दुरुन प्रणाम करत असायच्या, तरीदेखील जातेगावातील महिमा जाणून घेण्यासाठी जातेगावातील स्त्रियाही डोंगर चढून बराचश्या वर आल्या होत्या. जातेगाववाल्या शिष्य मंडळींनी स्वामींची दिनचर्या बघितली व आत्मसातही केली. ते अनुष्ठानार्थी बाबाजींसोबत ब्रम्हमूहूर्तावर उठत पर्यायाने सकाळी तीन साडेतीन वाजता उठत असत, उठल्यानंतर लगेच दहा वीस मिनीटे ध्यान करत, तदनंतर भूमातेचे वंदन करून स्नान करत. स्नान झाल्यावर चार वाजता नित्य नियम निधी सुरु होत असे. सकाळी चार वाजेपासून ते साडे सहावाजेपर्यंत नित्यनियम विधी होत असे. त्यानंतर भगवान शंकराची व विठ्ठलाची आरती होत असे. त्यानंतर अनुष्ठानार्थ्यांना फराळ देत असे. पुन्हा दुपारी एक वाजता स्नान व पूजा करत, तद्नंतर 'जप' चालत असे. अनुष्ठान चालु असे पर्यंत बोलणे वर्ज्य होते. अनुष्ठान प्रक्रियेत 'शुध्द भावाने जप करणे' यास सर्वाधिक मान असे. पुन्हा सायंकाळी स्नान करत असे. स्नान झाल्यावर पुन्हा ध्यान, विधी आरती होत असे. पुन्हा दोन तास बाबाजी प्रवचन देत असत. असा दिनक्रम बघून जातेगाववासी भक्तजण चक्क झाले. त्यांना बाबाजींचा महिमा काही वेगळाच वाटला. बाबाजींचे कार्य पाहून जातेगांवातील बघ्याची भूमिका करणारे शिष्यगण आता श्रमदानासाठी बाबाजींच्या कुटीयाजवळ जमत असे. बाबाजींनी पहाडाच्या पायऱ्यापासून ते मंदिराच्या परिसर पर्यंतचे दगड व्यवस्थित लावून जाणाऱ्या येणाऱ्यांसाठी रस्ता करण्याचे ठरवले होते. गुढीपाडव्यास चालु झालेल्या अनुष्ठानाचा तो सहावा दिवस होता. गुढीवाडवा १९६४ मध्ये सुरु झालेले अनुष्ठान एक दिवसानंतर संपणार होते. तत्पुर्वी बाबाजींनी सकाळी अकरा वाजता प्रवचनातून अनुष्ठानार्थ्यांना एक उपदेश केला होता. 'बाबाहो माझा भक्त खडकावर जरी असला, तरीही मी त्याला तिथ प्रसाद देईल. श्रीकृष्णाने अर्जुनास सर्व शक्ती दान केली होती परंतु अर्जुनाने तशी त्यांची सेवाही केली होती. बर का लोकोहो, एकदा काय झाल.. नारद मुनी कैलासातून स्वर्गात चालले होते. जाता जाता ते विष्णुला म्हणाले, 'की माझ्या सारखा दुसरा भक्त हा त्रिभुवनात नाही.'

यावर हसत हसत विष्णु म्हणाले, 'काय'?

'काय म्हणतात देवा तुम्ही मी सदान् कदा नारायण... नारायण म्हणत असतो. मग माझ्यासारखा दुसरा भक्त आहे कुणी ?

अहो महर्षी जरा भारतभूमीवरील मथुरेत जाऊन बघा, मी अवतार घेतला आहे, भगवान श्रीकृष्णाचा व तिथं माझा भक्त आहे कुंतीपुत्र अर्जुन. जरा त्याची भक्ती बघून येता का ? मग नारद मुनीने स्वर्ग सोडला व मथुरेचा रस्ता धरला. मूनी अर्जुनाच्या महालात शिरले, अर्जुन गाढ झोपी गेलेला होता. परंतु कृष्ण... कृष्ण असा आवाज येत होता. नारदमुनी खाली वाकले, तर त्यांना कळाले, अर्जुन जरी झोपी गेलेला असला तरी त्याच्या केसा... केसातून केवळ कृष्ण ... कृष्ण असाच आवाज येत होता. त्यावेळी स्वतः भगवान श्रीकृष्ण महर्षींना म्हणाले ह्या अर्जुनाने माझी निस्सीम सेवा केली त्याच्या कारणास्तव मी त्याच्या रथाचा सारथी झालो. त्यांच्यासाठी मी काहीही होईल. यावरून लक्षात घ्या बाबाहो देव आणि शिष्य यांच्यात काय नातं असतं. जसं सहा सात दिवस देवाचं काम मन लावून केलं तसच येथुन पुढे जर केलं तर देव तुम्हाला काय देईल याचा नेम नाही. सर्व प्रवचन आटोपल्यानंतर अनुष्ठानार्थी दुपारच्या स्नानासाठी गेले, स्नानाहून आल्या आल्या त्यांनी बघितले तर स्वामींच्या कुटीयाजवळ फार मोठी गर्दी दिसली. शिष्यगणांनी तिथे जाऊन तपास केला तर त्यांना कळाले की ही मंडळी कन्नड तालुक्यातील एका खेड्यागावातील आहे व एका जमिनदाराच्या मुलाला सर्पदंश झाला होता. गावात कुणी डॉक्टर नसल्याने मुलगा वाचण्याची शक्यता फारच कमी होती. परंतु त्याच गावातील काही जणांनी महाशिवरात्रीच्या यात्रेच्या दिवशी स्वामींकडून विभूती नेली होती. तिथं विभूती त्या सर्पदंशी झालेल्या मुलाला प्यायला दिली व त्यामुळे तो मुलगा काही क्षणात चांगला झाला. आणि तोच आज बाबाजींच्या दर्शनाला येथे आला होता. अनुष्ठार्थींना व इतरांना जेव्हा बाबाजींचा विभुतीचा चमत्कार कळाला व सकाळचा उपदेश ही आठवला. तेव्हा बाबाजी काय चीज आहे हे त्यांना कळाले. उगवणारा सुर्य अखेर मावळला नि अनुष्ठानाचा शेवटचा दिवस उगवला. आज आपण सर्वोतोपरी स्वामींचे शिष्य झालो असेच त्या जातेगाववाल्या शिष्यांना वाटत होते. बाबा आता शिष्यांना प्रवचन सांगून त्यांचे मौन सोडणार होते. बाबांचे प्रवचन म्हणजे लाखमोलाचा उपदेश होता. बाबांच्या मुखातून पडणारे बोल म्हणजे लाखमोलाचा खरेपणा दर्शवणारा सुसंदेश होता. बाबा प्रवचनातून नेहमी साध्या शब्दातून प्रवचन देत असत. ते स्वतः शेतकरी कुटूंबात जन्मास आलेले होते. साध्या बोलण्यात तर खरा रसाळपणा दडलेला आहे हे त्यांच्या प्रवचनातून आजही दिसून येते. बाबाजींचे प्रवचन म्हणजे सर्वांचा आवडता विषय होता. बरोबर दहा वाजता बाबाजींनी अनुष्ठानाच्या अखेरच्या दिवशी प्रवचन करण्यास सुरुवात केली. सर्वत्र शांतता पसरली होती. प्रत्येकजण बाबांचे बोल ऐकण्यासाठी तराळून गेला होता. बाबांनी बोलण्यास सुरुवात केली.

'बाबाहो नेहमी कोणाला काही तरी चांगलं देत राहावं, देणाऱ्याने देत रहावे घेणाऱ्याने घेत रहावे, घेता घेता देणाऱ्याचे एक दिवस हात घ्यावे म्हणजे आपण कोणाकडून तरी चांगल ज्ञान घ्यावं आणि घेता घेता एक दिवस आपणही दुसऱ्याला ते ज्ञान देण्याचा

प्रयत्न करावा, कारण दिल्याने काहीच कमी पडत नाही. अरे कर्णासारखं दानशुर व्हा, बाबाहो, राजा हरिश्चंद्राने सपनामध्ये त्याचे राज्यसुध्दा दान केलं होते. तुम्ही थोडतरी दान करत जा, पुण्य घडलं.. पुण्य तसंच माणसानं सतत उद्योगी राहिलं पाहिजे, रिकामं डोकं म्हणजे सैतानाच घर, त्यामुळे सतत उद्योग करा, काम करा, आता जर आपण इथं निट मंदिर बांधलं तर तुम्हीच सांगा किती भक्त इथं येतील, देवाचं नांव घेतील, या सगळ्याचं पुण्य तुम्हाला लाभलं म्हणून म्हणतो काम करा... काम... जर आपण गोरगरीबांसाठी अन्नदान केलं तर किती गरीबांचं तोंड आणि पोट भरलं आणि किती जण तुम्हांला आशिर्वाद देतील याचा विचार करा... आपण जर कोणाला चार शब्द चांगलं शिकवले तर त्याचं पुण्य आपल्याला लाभते, कारण पूढ चालून तो काही तरी चांगल काम करण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे आपल्या धर्माची शिकवण त्याच्या मनात राहते आणि तो आपल्या धर्मासाठी पुढं चालून काहीतरी चांगलं करतो. सत्संग केल्याने ज्ञानदेवही घरी येतो, संताच्या सान्निध्यात राहिले तर देव कधी भेटेल याचा नेम नाही... दान केले पाडवांनी, धर्म केला पाडवांनी त्यांनी त्यांच्या घरी साक्षात देवाला राबावले, अरे तुम्हीच सांगा भगवान परमात्मा श्रीकृष्ण हा स्वतः अर्जुनाच्या रथाचा सारथी झाला होता, बाबाहो सदाफुली सारखं जीवन जगा, सदाफुली सदान कदा फुललेली असते. आपण जर तिच्या सारखं सदान् कदा चांगलं काम केलं तर आपण सुध्दा सतत आनंदात राहू. सुखी राहू. हे संगळ करता करता प्राण्यांवर दया करा. गाय ही देव असते देव, तेहतीस कोटी देव हे गायीच्या पोटात साई बाबाला दिसले होते. त्यामुळे गाईला देव माना.. देव... प्राण्यामध्ये सुध्दा देव वास्तव करीत राहतो. बाबाजी स्वतः एकदा गाढवाचे पाया पडले होते. संत एकनाथांनी सुध्दा गाढवाला काशीचं पाणी पाजलं होतं. सापाला मारत जाऊ नका. सापाच्या रुपाने कधी कधी शंकरजी तुमचं काम पहायला येतो बरं का...' असे सांगता सांगता बाबा पुढे म्हणाले, 'सार्‍या दिवसाचा सार ह्या संध्याकाळेत असतो. तसेच सार्‍या जन्माचा सार हा 'आई' मध्ये असतो. आपल्याकडे जग दाखवण्याचे काम फक्त आई करते. आईला सांभाळा... आणि हे संगळं करता करता भक्ती करा. देवाची सेवा करा, परमार्थ करा, परमार्थ करणे म्हणजे मोक्ष प्राप्त करणे, संत जे सांगता त्याचा अवलंब करा. साधुची सेवा केल्याने काहीच उणं पडत नाही. देवं म्हणा नाहीतर साधू म्हणा आपल्याला काय देईल याचा भरोसा नाही.. तुकाराम महाराज हे ग्रहस्थी होते, त्यांनी संसार करुन विठ्ठलाची सेवा केली. म्हणून ते देव शोधायला गेले तर देवच होऊन गेले, संताच्या सान्निध्यात राहिल्याने परमेश्वराची प्राप्ती होते. म्हणून सेवा करा, दान धर्म करा, अन्नदान, भुदान, विद्यादान करा सारं काही मिळेल.' असे सर्व दृष्टीकोनातून बाबाजींनी प्रवचन दिल्याने सर्व शिष्यांच्या मनात आता भक्तीची फळे परीपक्व होऊन गेले होते. बाबाजीच्या प्रवचनाने सारे शिष्यगण सुखावले. त्यांचे अंतःकरण पूर्ण शुध्द होऊन गेले व ते खरोखर संताच्या सेवेस तयार झाले. बाबाजींचे प्रवचन त्यांच्या मनात पुरेपुर ठसले व

जीवनभरासाठी ते उपयोगी ठरले. प्रवचनानंतर बाबांनी त्यांचे मौन सोडले. साऱ्या शिष्यांच्या मनात वेगळाच आनंद बहरला गेला, सारे फार मोठया आवाजात म्हणाले...

**बोला... श्री संत जर्नादन बाबा की जय**
**नागा बाबा की जय,**
**नर्मदा माता की जय**
**पिनाकेश्वर महाराज की जय**

त्यानंतर जगनबाबा कासारांनी एक पाळणा गायला

**कलीयुगात अवतार झाला,**
**नाव जर्नादन आहे तपाला,**
**दहेगांव मध्ये जन्म झाला,**
**जोबाळा... जो ... जो रे जो**
**बाबाच्या पुण्याला नाही हो गणणा**
**पूर्वी जन्माच्या सांगितल्या खुणा**
**नाव जनार्दन आहे तयाला**
**जो बाळा... जो ... जो रे जो**

ह्या पाळण्याने स्वामी सुखावले तर भक्त गण आनंदले. अनुष्ठान झाल्यावर सर्वांनी डोंगरावर महाप्रसाद घेतला. व जो तो ज्याच्या त्याच्या घरी परतला. दुसऱ्या दिवसापासून भक्तांच्या संख्येत अधिकच वाढ झाली. स्वामींनी दुसऱ्या दिवसापासून मंदिराच्या कामास सुरुवात करण्याचे ठरवले. स्वामींची इच्छा शिवालये बांधून दैवी शक्ती अस्तित्व दाखवणे ही होते. त्यासाठी स्वामींनी मंदिराची उभारणी करण्याचे ठरवले. परंतु स्वामींनी मंदिरासाठी स्वतः हुन कधीही पैशाची मागणी केली नाही. त्यांना हवे होते ते फक्त श्रमदान त्यासाठी स्वामींनी आपल्या रसाळ वाणीने लोकांना प्रवचने दिले होते. त्यांना श्रमदानाबरोबर अन्नदानाची विशेष आवड होती. व त्यांनी त्यासाठी प्रवचनातून सत्संग करण्याची भावना भक्तांच्या रोमा रोमात रुजावली होती. सत्संगासाठी आपल्या गावात शिवालय बांधणे गरजेचे आहे हे त्यांनी भक्तांना सांगितले होते. सर्वसामान्य भक्तांना देवाचे अस्तित्व पटवण्यासाठी आपण आपल्या पहाडावर भव्य मंदीर बांधू हेही त्यांनी जातेगावच्या शिष्यांना अनुष्ठान चालु असतांना बोलून दाखवले होते. आपण जर भक्तीचे रोपटे शिवालयाच्या रुपाने लावले तर भक्त तेथे विसाव्याला थांबतील, त्या शिवालयाच्या आश्रयातून त्यांचे जीवन सुखी होईल, सारे जण त्या शिवालयात जमतील, दोन चार भक्तीच्या गोष्टी एकतील व जीवन सुधारण्याचा प्रयत्न करतील, म्हणून येथे मंदिर बांधू. असे सांगितल्यावर जातेगावातील भक्तमंडळी स्वामींच्या कार्यासाठी तयार झाले व स्वामीही त्यांच्या कल्याणासाठी अहोरात्र तयार झाले.

स्वामींनी पिनाकेश्वराचे मंदीर बांधायचे ठरवले व त्यानंतर मंदिराचे जिर्णोद्धार करण्याचेही ठरवले होते. आता त्या पहाडीवर शेकडो लोक कामासाठी श्रमदानासाठी जाऊ लागले. सर्व प्रथम बाबांनी चांगल्या दगडांची साठवण करण्याचे ठरवले. अपेक्षेपेक्षा जास्त भक्त त्या जातेगावाच्या पहाडावर श्रमादानासाठी उपस्थित झाले. शेकडो लोक तिथं दगडे गोळा करण्यासाठी गोळा झाले. हळू हळू दगड मंदिराच्या परिसरात जमा होऊ लागले. श्रमदान करता करता बाबाजी उपदेशही देऊ लागले होते. 'श्रमदानासाठी मेहनत लागते, मेहनत.' असे बाबाजी वारंवार सांगत होते, मंदिराचे काम चालु असतांना पंडीतकाका काही वर्गणी गोळा करण्यासाठी काही शिष्यांसह दुसरीकडे फिरु लागले. अंदरसुलवाले काही भक्तजण श्रमदानासाठी रात्रंदिवस जातेगावाच्या पहाडावर हजेरी लावू लागले. बाबा एक एक साक्षात्कार दाखवत होते. भक्तगण दगड गोळा करत होते तर काही भक्त गण श्रमदानासाठी बाबाजींच्या आदेशासाठी भुकालेले होते. श्रमदान चालु असतांनाच १९६४ च्या काळात एक युरोपियन वेरूळची लेणी पाहण्यासाठी महाराष्ट्रातील मनमाड च्या रेल्वे स्टेशनवर उतरला, उतरुन वेरूळला आल्यावर हवामानामुळे व खाद्यपदार्थामुळे त्याचे पोट दु:खू लागले होते. त्याच्या वेदना क्षणा क्षणाने वाढत होत्या. त्याच्यापोटातील निदान करण्यासाठी औरंगाबाद येथील वैद्य देखील असमर्थ ठरले होते. त्याच्या पोटातील वेदना प्रत्येक क्षणी त्याला मरण्याच्या काळासाठी इशारा देत होत्या. त्याला एक स्वामींच्या भक्तांनी सांगितले की तु जातेगावला जा तिथ एक बाबा आहे तो तुला नक्की गुण देईल. युरोपियन हा अतिसंस्कृत असल्याने त्याला बाबांचा भरवसा बसेना परंतु मरण्यापूर्वी साधू बघून मरावे. ह्या इच्छिने तो जातेगावात स्पेशल गाडी करुन आला. जातेगावातील लोकांनी बैलगाडीद्वारे त्याला पहाडावर आणले, तो वर्णाने खुपच गोरा असल्याने श्रमदान करणारे सारे भक्त त्याच्याकडेच बघत होते. त्याचे दोन्ही हात पोटावर होते. उन्हाने त्याची त्वचा संपूर्ण लाल झाली होती. चेहऱ्यावर पूर्ण घाम साचला होता. त्याला साधुचे दर्शन घेणेही माहित नव्हते. त्याला मराठी अजिबातच अवगत नव्हती. तरीही बाबाजी त्याच्याशी बोलले. बाबाजीला पूर्ण भाषा समजली. त्याने काही क्षणात हात जोडले, बाबांनी विभुती त्याला प्यायला सांगितली. 'ओ नो डर्टि' असे म्हणून त्याने ती पिण्यास नकार दिला. पण बाबांच्या डोळ्याकडे बघताच त्याने ती घटाघटा प्राशन केली. मराठी न येणारा युरोपियन ... आनंदाने नाचू लागला... व नाचता ... नाचता 'श्री जनार्दन महाराजा की जय' असे बोलू लागला, त्याला बाबाने आशिर्वाद दिला बाबाला त्याने इंग्रजीत सांगितले, 'सांगा बाबा किती पैसे देऊ.'

बाबा त्याला बोलले,

काही नको बाबा... दहा बारा दगड उचल... तेच पुण्य लाभलं, तु जर पैशे देऊन मंदिर बाधलं तर तुलाच पुण्य होईल पण जर सगळ्यांनी मंदिर बांधलं तर सगळ्यांना पुण्य होईल. म्हणजे पहा... बाबा.. किती उच्चधोरणाचे होते.

ही बाबांची शिकवण... बाबांच्या विभूतीचा फरक युरोपीयनवर झाला व युरोपियन सुध्दा बाबाचा शिष्य झाला. त्यात श्रमदान करणाऱ्या एका सुशिक्षीत माणसाने त्या युरोपियनला इंग्रजीत विचारले, 'तुला मराठी येत नाही मग बाबाची भाषा कशी समजली' यावर युरोपियन हसत म्हणाला, 'बाबा माझ्याशी इंग्रजी भाषेत बोलले.' शिष्यांना बाबाला काय म्हणावे नि काय नाही हेच कळाले नाही. बाबा नेमके कोण आहे याचा विचार देखील भक्तांना करता येईना. बाबांचा चमत्कार, साक्षात्कार बघून भक्तगण दगड वाहता वाहता आनंदाने ओरडले

अरे बोला रे बोला
श्री संत जनार्दन बाबा की जय
श्री नागा बाबा की जय
पिनाकेश्वर बाबा की जय
नर्मदा माता की जय

वाचकांनो लक्षात घ्या बाबांचा महिमा.. लक्षात घ्या बाबांचे कार्य. दगडं गोळा झाल्यावर बाबांनी आजुबाजूंचा तट बांधण्याचे ठरविले. बाबांनी व्यवस्थीत दगडांची रचना करुन तट बांधण्यास सुरुवात केली. बाबाजी स्वतः दगडाचे पारख करुन तटाजवळ बसू लागले. पूर्वीकडील तट एक आठवड्यात पुर्ण झाला. बाबा साक्षात्कार दाखवत होते. हळूहळू रोग्यांना बरे करत होते. भक्तांमध्ये कार्यासाठी प्रेरणा देत होते. दिवसभर तटाचे काम करणारे भक्तजण रात्री स्वामींचेच नाव घेत झोपी जात होते. आता पूर्व पश्चिम तटाच्या कार्याची सुरुवात झाली होती. शेकडो भक्तजण श्रमदासानासाठी पहाडाच्या टोकावर स्वामींच्या शाळेत हजेरी लावत होते. स्वामींच्या कामामुळे पिनाकेश्वराची सेवाही होईल आणि स्वामींचा आशिर्वादही आपल्याला लाभेल किंबहुना श्रमदान केल्यानंतर जीवनात आल्याचा काहीतरी फायदा होईल याचा आनंद चिरकाल आपणास जगण्यासाठी आधार तरी होईल याच वेड्या पण अर्थपूर्ण आशेने पहाडावर बाबाच्या कुटीयाजवळ श्रमदानास जात होते. स्वामी नेहमी म्हणायचे, जेथे स्वच्छता तेथे शांतता, जेथे शांतता तेथे साक्षात देवाची वस्ती असते. स्वच्छतेमुळे साऱ्या दुःखाचा त्रास नाहिसा होऊन सुखाचा आस होतो. जे रंजले गांजले त्यांना कायमचे सुख देण्यासाठी मंदिरे सजले. बाबांना नेहमी वाटत असायचे उत्कृष्ट मंदिरे ही मनुष्याला उत्कृष्ट विचारात गुंतवून ठेवण्याचे अत्यंत सोपे साधन असते. यासाठी आपण ह्या जातेगावच्या पहाडावर एक उत्कृष्ट शिवालय उभारायचे. बाबांच्या आदेशाप्रमाणे पूर्व पश्चिम दिशेची दोन्ही तट व्यवस्थीत बांधले गेले. बाबाला शिष्यांचे कार्य बघून आनंद वाटत होता. दिवसभराचे काम संपल्यावर बाबा शिष्यांना भत्ता किंवा साखर द्यायचे. त्या प्रसादाने शिष्यांचा थकवा कोठल्या कोठे जायचा हेही कळत नसायचा. बाबांनी शिष्यांना फार प्रेम लावले याची साक्ष आजही जातेगांव येथे विराजमान झालेले पिनाकेश्वर महाराज देतील.

काम झाल्यावर बाबा शिष्यांना मायेने जवळ घेत असे. त्यांच्या चेहऱ्यावरुन, डोक्यावरुन, पाठीवरून मायेच्या ममतेने भरलेला हात फिरवत असत. त्या मुळे शिष्यांना त्यांची आई भेटल्यासारखे वाटायचे व कामगारांना आपण दिवसभर काम केले याचा थकवा यतकिंचीतही वाटत नसायचा. बाबांनी सर्व शिष्यांना जवळ घेतले व सांगितले, आपल्याला पुढील आठवड्यापासून पिनाकेश्वर महाराजांसाठी नवीन भव्य दिव्य असे मंदिर बांधायचे आहे तरी पण सर्वांनी पुण्य पदलात पाडून घेण्यासाठी येथे यायचे. बाबाहो आपण जर इथ चांगले मंदीर बांधलं तर किती पुण्य आपल्याला होईल याची गणतीच करता येणार नाही. बाबा पुढे म्हणाले, 'सांगा बर चांगला मंदिर बांधणारा कोण आहे?'

थोडा अवधी विचार केल्यावर एक शिष्य मधून उठून बोलला, बळीराम ... बाबा बळीराम लई चांगलं मंदिर बांधतो तो.

बाबा म्हणाले 'बर त्याला सांगा, बाबानं बोलवालय उद्या पहाडावर.' 'बळीराम' हा सुरुवातीला देव मानण्यासच तयार नव्हता. तद्नंतर तो पहाडावर येण्यासही मान्य करत नव्हता. त्यातल्या त्यात काशिनाथ नावाची एक व्यक्ती बळीरामाच्या घराशेजारी राहत होती. ती व्यक्ती बळीरामाला बाबांचा निरोप सांगण्यास आलेल्या व्यक्तीला म्हणाली, 'कशाला मंदिर बांधता... बाबाला म्हणा, इथं साधा पन्हाळ तुटला तर तो पुरा होत नाही, तवा हे मंदिर होईल असं शक्यच नाही, शिवाय ते मंदिर बी इतक्या अडचणीत ते बी पहाडावर... हं... हं .. द्या सोडून हा विचार.' यावर निरोप सांगायला आलेला बाबाजींचा शिष्य त्याला म्हणाला,

'हे बळीराम, तुला येयचं तर ये, नाहीतर नको येऊ तुझ तू ठरवं मला काय बाबानी जेवढं सांगितल तेवढं म्या तुला सांगितलं, आता येयचं की नाही हे तु पाय मी चाललो.' असे बोलत बोलत बाबाजींचा शिष्य त्याच्या घरी निघून गेला.

बळीरामराव रात्री पोटभर जेवले व झोपण्यासाठी त्यांच्या अंथरुणाकडे गेले, अंथरुणावर पडले, पण झोपच लागेना. त्यांच्या डोळ्यासमोर सारखे बाबाचे चित्र कसे असेल हा विचार बिंबत होता व मनात बाबांच्या शिष्याचे बोल रेंगाळत होते, काय करावे नि काय नाही? हा विचार त्याच्या डोक्यात येऊ लागला . अखेर त्याने ठरवले मंदिर बांधायचे की नाही हे नंतर ठरवू पण डोंगरावर त्या लंगड्याबाबाकडं जाऊन तर येऊ असा निर्णय घेऊन बळीराम राव झोपी गेले. दुसऱ्यादिवशी साडेसात वाजेच्या सुमारास डोंगरावर जाण्यास निघाले. तरा तरा पाय टाकत ते डोंगराच्या शिखरावर पोहचले. तेथे गेल्यावर त्यांना दिसते की बाबा शिष्यांना काही तरी म्हणायला लावत होते हे जाऊन बाबांसमोर बसले, बाबांना कळाले, हेच 'बळीराम' आहे. नंतर बाबा म्हणाले,

'काय बळीरामराव... अरे बाबा, तुझ्या नावात देव आहे आणि तु देवाचं मंदिर बाधायला नाही म्हणतो.'

सनपटी बळीराम थोडे शांत झाले. बाबांजवळून उठले नी पिनाकेश्वर महाराजांचे दर्शन घेतले व येतो बाबा म्हणून काहीच निर्णय न घेता परत जाण्यास निघाले. लगोलग बाबा म्हणाले,

'अरे बळीराम एवढी विभुती आणि साखर घेऊन जा बाबा... घरी.' बाबांचा प्रसाद न नाकारता त्यांनी तो त्यांच्या उपरण्याच्या खालच्या टोकाला बांधला व निघाले. चालता चालता विचार करतच होते व विचार करुन ते आता पायथ्याजवळ येऊन पोहचले होते. पायथ्याच्या शेजारी पिण्यासाठी पाणी होते. डोंगर उतरुण आल्याने त्यांना विलक्षण तहान लागली होती व त्यामुळे ते सहाजिकच पाणी पिण्यासाठी तेथे थांबले. पाणी पिल्यावर त्यांचे उपरणे अचानक त्यांना जड वाटू लागले व मनात आलेल्या शंकेनुसार त्यांनी ते बघितले तर त्यांना धक्काच बसला, बाबांनी दिलेल्या साखरीत किती तरी पटीने वाढ झाली होती. बाबा किती प्रसाद देतात याची जाणीव त्यांना त्या साखरेवरून झाली. पुढचा पाण्याचा घोट न घेता ते पळतच पहाडावर जाण्यास निघाले. काही वेळेने त्यांना पहाडावर पोहचवले. गेल्या गेल्या ते बाबाजींना साखर दाखवणार तितक्यात ती साखर पहिल्या साखरेइतकीच झाली. त्याचा चेहरा विलक्षण बदलला होता. त्याची छाती किती तरी उंचीचे स्पंदने बाहेर फेकत होती. बाबा हसत हसत म्हणाले.

'काय रे बळीराम... बांधतो का बाबा मंदिर'

'मंदिर ना... मग... बांधूना... तुम्ही सांगाल तेव्हा' असे म्हणत बळीराम स्वामींच्या चरणाजवळ आले. बाबांनी मंदिर बांधण्याचा मुहूर्त बळीरामाना नीट समजावून सांगितला. पाया खांदला गेला, दगड रचण्यास बळीरामांनी

जनार्दन बाबा की जय

ह्या जय घोषात सुरुवात केली. बाबा हे स्वतः शिल्प तज्ञ होते. ते स्वतः दगड घडवणाऱ्या जवळ बसत होते. शिल्पाची चिपतळ जर सुर्याकडे तोंड होऊन पडली तरच ते शिल्प बाबा घ्यायला लावत अन्यथा त्या शिल्पास पायथ्याला न्यायला सांगत होते. बाबा मंदिराचे काम सुरु झाल्यापासून कधी बळीरामाजवळ, तर कधी शिल्प घडवणाऱ्या जवळ जाऊन बसत होते, कारण काम करणाऱ्यांची सर्व जबाबदारी ही स्वामींवर होती. त्यामुळे शिष्यांना काही होऊ नाही यासाठी ते नेहमी शिष्यांना विघ्नापासून पाच सहा मिनिटं अगोदरच सावध करीत असे. पिनाकेश्वर मंदिरा बाबतचा संकल्प हा बाबाजींचा जबरदस्त होता कारण बाबांच्या आयुष्यातले हे पहिले-पहिले शिवालय होते आणि केवळ श्रमदानाने ही वास्तू ह्या पहाडावर उभी राहिल याची शक्यताही कमी होती.पण अंधाऱ्या रात्रीला कुठ्मुठ चमकणाऱ्या काजव्याची साथ देखिल लाखमोलाची वाटते यानुसार बाबांच्या ह्या कार्यात लोकांना पुण्यासाठी वर्गनी देणे ही देखील लाखमोलाचे वाटत होते.त्यामुळे पुण्याचे कार्य वर्गणी मार्फत सुरु होते वर्गणीस बाबाचा साफ नकार होता पण कधी कधी शिष्याचेही

म्हणणे गुरुला एकूण घ्यावे लागते.आणि नाही तरी स्वामी हे जे सर्व कार्य करीत होते ते केवळ त्यांच्यासाठीच नव्हते, तर तुम्हा साठीच होते याची जाणिवही भक्तांना होत असल्याने भक्तांनी ह्या शिवालयासाठी सर्वोतोपरी मदत करण्याचे ठरवले होते.बरेचसे श्रमदान करण्याचे कार्य शिष्यगण करत होते बराचसा पाया पूर्ण करण्याचे कार्य बळीरामांनी केले होते.स्वामी रात्रंदिवस जातेगांवच्या पहाडावर जागेच होते व अशा परिस्थितीत पंडीतकाका व अंदरसुलचे काही भक्त वर्गणीसाठी जळगाव जिल्हयातील चाळीसगांव तालुक्यात उतरले होते. पंडीत काका वर्गनी गोळा करत –करत सिंदी या गावात उतरले .काही दानशूर व्यक्तींनी खुल्या हाताने किंबहूना सढळ हाताने स्वामींच्या कार्यासाठी वर्गनी दिली, पण काही नाठाळ लोकांनी वर्गनी देण्यास नकार दिला.असेच वर्गणी गोळा करता करता ते एका घरी गेले व सांगू लागले ,श्री संत जनार्दनबाबा हे जातेगावच्या पहाडावर पिनाकेश्वराचे मंदीर बांधत आहे तरी त्यासाठी काहीतरी पुण्यासाठी देन द्या. तर त्या घरातील प्रमूख पण अल्प बुध्दीमान व्यक्तींनी पंडीत काकांचा जबरदस्त अपमान केला आणि वर्गनीही दिली नाही.काका तसेच निघाले काकांना बाबाजींने आदेश दिला होता की जो जेवण करा म्हणेन त्याच्याच घरी जेवायचे, नाही तर आपण स्वतःहून जेवन द्या म्हणायचे नाही. त्या माणसाने वर्गनी दिली नाही तो जेवण काय देईल, हा विचार करुन पंडीत काका इतरांसह रात्रीचे निघाले जाता जाता एका बंजारी श्रमदात्यांनी त्यांना जेवण दिले.आता त्यांना विलक्षण झोप लागत होती.त्यांनी त्या बंजाऱ्याच्या इथून तीन पोते घेतले व बाहेरच उघड्यावर झोपण्यास गेले .झोपेत त्यांच्या अंगरख्याचे बटन निघाल्याने उघडेच झोपले , शिवाय खिशात वर्गणीचा पैसा होता. हे स्वामींनी अंतरमनाने कळाले व त्यांना वाटले जर हा पैसा चोरी गेला तर हा कलंक माझ्या शिष्यांना लागेल आता काही तरी केलं पाहिजे यासाठी स्वामी स्वतः साप होऊन तेथे गेले आणि त्यांचे शिष्य जिथे झोपले होते , तिथे त्यांच्या आजूबाजूला एक लक्ष्मण रेषा फरफटीने आखली. बघा किती काळजी होती आपल्या शिष्यांची! सकाळी सकाळी काकांना जाग आली व त्यांनी उठून पाहिले तर त्यांच्या भोवती एक सापाची फरफट होती. त्यानंतर त्यांनी स्वतःकडे हि बघितले तर अंगरख्याची सगळीच बटने निघालेली होती मात्र वर्गणी जशीच्या तशी खिशात उपस्थित होती , काकांना थोडेथोडे समजले कि ही सर्व बाबांची कृपा. नाहीतर आपली वर्गणी चोरी झाली असती तर सगळा आळ आपल्याला लागला असता .......त्यांनी सर्वांना उठवले व काही वर्गणी घेऊन जातेगावाकडे रवाना झाले व सायंकाळच्या वेळी पहाडावर गेले. गेल्यागेल्या त्यांनी स्वामींचे दर्शन केले.

बाबा हसत... हसत..... म्हणाले,

'काय वो काका, रात्री थंडी वाजली होती का ? आणि सदरा काढूनच झोपला असता ना, आरे किती संभाळावा तुम्हाला ? काही करता .... काही झालं असतं मग .......जाऊ द्या चला कूटीयात या, दोन –दोन घास खाऊ.' म्हणजे स्वामी ते कोणते

रहस्य होते हेच कळत नाही ते भक्तांचे नुसते मार्गदर्शकच नव्हते तर ते भक्ताचे एक रक्षकही होते. प्रत्येक भक्तांची काळजी घेत स्वामी मंदिराजवळ बसत होते, तर बळीरामराव एकेएक दगड जोडत होते. पहाडावरचे दगड स्वामींच्या योग्य परिक्षणासाठी संपले होते व आता दगडं गरजेचे होते.स्वामींनी कासार बाबांना सांगितले,बाबाहो मला घेऊन पहाडाच्या दुसऱ्या टप्प्यावर चला व सुरुंग पण सोबत घ्या. स्वामींनी स्वतः पहाडाच्या दुसऱ्या टप्प्यात बारा सुरुंग लावले व एवढ्या सुरुंगात बाबा एकटेच त्या सुरुंगाजवळ होते.विशेष असे की पडणारे दगडं हे स्वामींच्या चरणाजवळ येऊन पडत होते पण बाबाला एकाही दगडाचा स्पर्श होत नव्हता,अपेक्षा आकांक्षापेक्षा जास्त दगडं मिळाल्याने बळीरामसह इतर शिष्य आनंदित झाले व बाबांची डोली पुन्हा कूटीयाकडे नेली तदनंतर शिष्यांनी दोन रेड व एक गाडा दगडे वाहण्यासाठी तयार केला आणि सहा गाढव वाळू वाहण्यासाठी तयार केली. बाबा मात्र काम झाल्यावर स्वतः गाढवांना खायला देत होते. मंदीराच्या कामासाठी मुबलक साहित्य श्रमदानासह पहाडावर हजर होते, शिष्यगणामध्ये भरमसाठ वाढ होत होती, दिवसामागून दिवस वेगाने निघून जात होते,अशातच कार्य पुर्ण होत होते.

शंभर दिडशे लोक बळीरामरावांच्या हाताखाली काम करीत होते. बाबा तिथे जवळच बसले होते. अशातच विनायक पांडूरंग कन्नमवार एक मोठे पुढारी बाबाजीकडे आले होते. त्यातच आडगावचे एक जोडपे ही बाबाजींपुढे येऊन बसले. बाबांनी प्रथम त्या गरीब जोडप्याला विचारले,काय रे बाबा काय झालं ? त्यांनी सांगितले बाबा आम्हाला मूल बाळ होता होत नाही आणि लग्न होऊन जवळ जवळ पाच वर्षे झाले. बाबांनी शिष्याला विभूती आणण्यास लावली. त्या दाम्पत्याच्या हातात विभूती टेकवत बाबा म्हणाले, 'ह्या गावात काहीतरी चांगल कामकर तुला पोरगं व्हईल, कारण ह्या गावात देव लइ येळा येऊन जायेल आहे.' त्या माणसाच्या डोक्यात ती विभूती पिल्यानंतर एक विचार आला , की बाबा म्हणतात ह्या गावात काही तरी एक चांगल काम कर आणि ह्या गावात लई वेळा देव येल आहे. पण देव येतांना वेशीतूनच आले असतील म्हणून आपण नवी वेश बांधून देऊ, अशाप्रकारे विचार करत ते जोडपे 'हो' म्हणून बाबांचा निरोप घेऊन निघाले नंतर बाबांनी कन्नमरावांना विचारले, ' काय काम काढले बाबाच्या झोपडीत.' यावर कन्नमवार बोलले, 'बाबाजी आपल्याला तीन दिवसाने सभा घ्यायची आहे. तवा तुम्हीच सांगा कुठे घ्यायची?' तेव्हा बाबा म्हणाले, 'बाबाहो आपली सभा होणार नाही, देशात तीन दिवसाने अंधार होणार आहे.' असे म्हणून स्वामी बळीरामाकडे निघून गेले. कन्नमवारांनी दोन तास श्रमदान केले .पुन्हा तो विषय न काढता बाबांचा प्रसाद घेऊन त्यांनी पहाड सोडला.बाबांनी असे का सांगितले ?हा क्षणभर विचार करुन कामगार त्यांच्या त्यांच्या कामाला लागले. सन १९६५ मध्ये मुलगा होत नाही असे सांगणाऱ्या आडगावच्या दाम्पत्यांनी जातेगावात पूर्वेला वेश बांधली त्यांना एक वर्षाने पुत्ररत्नाचा लाभ झाला व तिसऱ्या दिवशी सभा घेणारे कन्नमवार

एक बातमी घेऊन डोंगरावर गेले .बाबाजी सकाळी–सकाळी भक्तांना सांगत होते , बाबाहो आज आपण काम करायचे नाही,आज फार नुकसान झालं आपल्या देशाचं. तितक्यात कन्नमवार दम टाकत बाबांपुढे उभे राहिले व म्हणाले ,बाबा तुम्ही सांगितले ते खरे झाले.

काय झालं रे बाबा, बाबा म्हणाले.

बाबा , पंडीत नेहरु गेले.

भक्तांना आश्चर्य वाटले, स्वामी काय चीज आहे, याची जाणीव बळीराममिस्तरी सह पुढारी नेतृत्व करणाऱ्या कन्नमवारांनाही झाली. त्यादिवशी सर्व कामकाज स्थगित होते. सारे शिष्य ज्याच्या त्याच्या घरी परतले व पुन्हा दुसऱ्या दिवसापासून सारे जण पहाडावर जाऊन कामासाठी तयार झाले. नंतर कन्नवारांनी बैठक घेऊन मंदीरासाठी प्रचंड निधी उभारण्याची तयारी केली व वर्गणी मिळवूनही दिली आणि ते खरच एक खरेखुरे नेतृत्व करणारे पुढारी म्हणून भारतभुमीसाठी सदैव उपयोगी पडले. बाबाजी दिवसेंदिवस साक्षात्कार दाखवत होते, मंदिराचे काम बरेचसे वरती गेले होते. मे महिन्याच्या १९६५ ची गोष्ट असेल ही वाकल्याचे बोठरे गुरुजी म्हणून एक सुशिक्षित व्यक्ती प्रसिध्द होती. ते मे महिण्याच्या सुट्टीत घरी आले होते, तोपर्यंत बाबाजींची ख्याती बरीचसी उंचावली होती, ते एक पेशाने शिक्षक असूनही त्यांना पहाडावर जाण्याची आशा लागली होती. म्हणून ते इतर शिक्षकांसह डोंगरावर गेले काम चालू होते बाबाजी कुटीयात बसले होते. गेल्या गेल्या त्यांनी बाबाचे दर्शन घेतले , बाबांनी त्यांना त्वरीत सांगितले, जा इथून उठा, जा...... त्या बळीरामाकडे थोडं काम करा आणि मग या इकडं. ह्या शिक्षकवृदांना स्वामींनी दिवसभर काम करायला लावले. सायंकाळच्या वेळी सगळ्यांचे काम आटोपल्यावर सर्व जण बाबाजवळ जमले. बाबांनी या शिक्षकांना सांगितले थांबा आता आरती करुनच जा. बाबांनी सहा वाजता स्नान केले, भगवान शंकराची हरी ओम हरी........हर हर महादेव व विठ्ठलाची आरती अनंतभूजा ह्या आरत्या गायल्या व प्रत्येकाला प्रसाद दिला. प्रसाद देता देता बाबाजी बोठरे गुरुजींना म्हणाले तु सुट्टीत ये बर कां परंतु तदनंतर त्यांचे जाणे झालेच नाही. हे सुट्टीत बाबाकडे न जाता नाशिकला गेले, तेथे कोकणी स्त्रीयांनी यांना करणी केली व मायावी जादूने यांना फार दूर नेले. घरातील व्यक्ती बाबांकडे गेले. बाबांनी त्यांना विभूती दिली व त्याच्या झोपण्याच्या जागेवर टाका असे सांगितले आणि शेवटी म्हटले सात दिवसांनी येईल. तिकडे घरच्यांसह ते बरोबर सातव्या दिवशी घरी आले. घरी आल्या आल्या पंडीतकाकांनी त्यांना बैलगाडीद्वारे पहाडावर नेले, त्यांच्या अंगातले मन बेशूध्द झाले. तेव्हा त्यांच्या अंगातील पिशाच्च म्हणू लागले , तुला काय करायचं आहे, तु साधू आहे ना ...... तु आमच्या नादी लागू नको.बाबांना खरा प्रकार कळला,बाबांनी लगेच यज्ञ पेटवला व यज्ञमंत्र म्हणण्यास सुरवात केली. विभूती गुरुजींच्या अंगावर टाकताच गुरुजी चांगले झाले बाबांनी गुरुजीस सांगितले , की तु आता इथेच रहा. गुरुजी नीट झाले व डोंगरावर राहूनही आता

पूर्ण दोन महिने उलटले होते.एक दिवस बाबा गुरुजींना म्हणाले, हे बघ माझ्या हातात ही अंगठी आहे, त्या अंगठीत चारधाम दिसतात. तु चारीधामाचे दर्शन घे, आज तू जाणार आहे येथून . गुरुजींनी दर्शन घेतले व त्यांच्या मनास थोडे वाईटही वाटले आज आपल्याला बाबा असे का म्हणाले ? हा प्रश्न त्यांच्या मनात घर करुन बसला होता, त्यानंतर बाबांनी थोडे दुध घेतले व मध्यंतरी त्याचे ऑपरेशन झाल्याने डॉक्टरने त्यांना फलाहार घेण्यास लावल्याने त्यांना दूधानंतर फलाहारही देण्यात आला होता. त्यानंतर बाबांनी कल्याण मासिक काढले व गुरुजींना म्हणाले, अरे कारभारी एक कृष्णाच्या मुरलीचा आवाज ऐक ,...... शंकराच्या शंखाचा आवाज ऐक . व तसा आवाज गुरुजींनाही ऐकू येत होता. म्हणजे स्वामी जेव्हा सकाळी विधी करत , तेव्हा स्वत: भगवान परमात्मा श्रीकृष्ण त्यांना बासरीच्या आवाजाने प्रसन्न होत होते तर भगवान शिवशंकर शंखाचा नाद करत होते. थोड्या वेळानंतर शिष्यगण जमा झाले व कामास सुरवात झाली . तितक्यात गुरुजी ज्या शाळेत होते त्या शाळेतील अधिकारी गुरुजींना घेण्यासाठी आले व म्हणाले , काय गुरुजी तीन महिन्यापासून कुठे आहेत ? तितक्यात बाबा म्हणाले, 'इकडे या साहेब प्रसाद खा....' प्रसादाने काय चमत्कार केला हे देवोच जाणे पण साहेबलोक गुरुजींना काही न म्हणता बळीरामांच्या हाताखाली दगडं देऊ लागले. गुरुजींना थोडं विशेषच वाटले, काम झाल्यावर बाबांनी गुरुजींना साहेबासह जाण्यास लावले. गुरुजी शाळेवर दुसऱ्या दिवसापासून दाखल झाले व बघतात तर त्यांची एकही रजा लावलेली नव्हती ......सर्व दिवस हजर दाखविले गेले होते. बाबांचा महिमाच कसा होता हे कळालेच नाही......

मंदिराचे काम दिवसागणीक उंचावर जात होते, बाबाजी कुटीयात बसून दर्शनास आलेल्या भक्तास आशिर्वाद देऊन श्रमदानासाठी परावृत्त करत होते . भक्तगण श्रध्देने, मनाने,तनाने श्रमदान करत होते, परतुं बाबाजीचे वाढते कारकर्म काही नाठाळांना पसंद नव्हते. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ज्याप्रमाणे हिंदवी ध्वजा अवघ्या भारताच्या मुकूटावर चढवण्यासाठी शिवाजी राजा अहोरात्र कष्ट घेत होता,परंतु आपलेच सैन्य परकीयांना फीतूर होऊन राज्यांच्या कार्यास अडथळा बनत होते, अगदी हूबेहूब तसेच काही नाठाळ लोक इ.स.१९६५-६६ च्या दरम्यान जातेगाव डोंगराच्या आसपास राहत होते.त्यांना बाबाजींचा हा कार्यप्रसार मान्य नव्हता . बाबाजी बांधत असलेले शिवालय त्यांना पसंद नव्हते , त्यामुळे त्यांनी भारतीय वनखात्याला एक अर्ज लिहीला होता व त्यात असेही लिहीले होते , की जातेगांव परिसरातील चांगली -चुंगली वने तोडून टाकण्यात आली आहे. आणि डोंगरावरील भोंदू बाबाने लोकांना फसवून एकत्र केले आहे व त्या लोकांनी निसर्गावर अत्याचार केला आहे.

अशा ह्या अर्जामुळे भारत सरकारची चारचाकी गाडी बाबांच्या कुटीयापर्यंत जाण्यास असमर्थ ठरली. त्यामुळे ते सरकारी अधिकारी गावातच थांबले, गावातील भरपूर

लोक घाबरले कारण सरकारी गाडीतून उतरणारा माणूस त्यांनी त्याच दिवशी प्रथमतः गाडीसह बघितला असावा. परंतु सरकारी लोकांनी गावातल्या लोकांपुढे बाबाकडे जाण्याचा ठराव मांडल्याने लोकांनी त्यांना बैलगाडीद्वारे पहाडावर नेले , बाबाला हे अगोदरच कळाले होते. त्यामुळेच बाबांनी एका कागदात विभूती भरली होती. साहेबलोक डोंगरावर जाताच, नवनिर्मीत होणाऱ्या सुबक पिनाकेश्वराच्या शिवालयाकडे ते आश्चर्याने बघत होते. त्यांना पराकोटीचे कुतूहल वाटले, एवढ्या उंचावर इतके सुबक शिवालय हा लंगडाबाबा बांधतो आहे ह्या विचाराने ते आपण कशाला आलो तेच विसरले. तितक्यात त्यांचा प्रमुख अधिकारी म्हणाला,

'कुठं आहे तो लंगडाबाबा?'

बाबाचे श्रमदान करणारे सर्व शिष्य बळीरामसह घाबरले त्यांना वाटले, आता काय होत नि काय नाही.

अधिकाऱ्याचा उंच आवाज ऐकताच बाबा म्हणाले,

'इकडे येरे भाऊ , मी इकडे आहे. काय म्हणती टाच, ऑपरेशन केलं तरी बरी नाही व्हतं , काय झालं नेमक पाहू बरं.'

बाबाचे हे बोल ऐकताच तो गाऱ्यापान चेहऱ्याचा सरकारी कपडे परिधान केलेला साहेब चेहऱ्यावरील घाम पुसू लागला, त्याचा चेहरा लाल झाला. डोळ्यातील बाहूल्या गरागर स्वामींमधील अवतारास शोधू लागल्या , मन शांत होऊन जागीच टेकला व म्हणाला,

बाबा तुम्हाला कसं काय सर्व कळले?

यावर बाबा म्हणाले ,

अरे वेड्या , हे ,सारं देवाचं आहे . हे मंदीर देवाच आहे, हे लोक देवाचं काम करते , हे झाड बी तर देवाचे आहे, मग मी झाड कशाला तोडू.

पुन्हा हे बोल ऐकून साहेब म्हणाला, 'बाबा मला माफ करा, माझ चुकलं, तुम्ही महान देव आहे, बाबा माझी टाच बरी करा, बाबा मी लागलं ती सेवा करेल.' यावर बाबा म्हणाले,

ही वभूती घे आणि म्हण,

**पिनाकेश्वर बाबा की जय**

**नर्मदामाता की जय**

अधिकाऱ्याने घटाघट विभूती गिळली व जोरजोरात आरोळ्या दिल्या , त्याक्षणी त्याचा पाय बरा झाला . अधिकाऱ्याला खूप आनंद झाला. त्याचा आनंद त्या जातेगावच्या पहाडावरही मावेनासा झाला तद्नंतर त्याने त्याच्या दुसऱ्या शिपायांना सांगितले, बाबाच्या नावाच्या घोषणा द्या आणि दिवसभर बळीरामसाहेबाच्या हाताखाली दगडं द्या व स्वतः ही दिवसभर पहाडावर राबला आणि संध्याकाळी बाबाजींचा प्रसाद घेऊन त्यांच्या घरी गेला व अखेरपर्यंत

स्वामीजींचा शिष्य म्हणून राहिला. अशा तऱ्हेने बाबा त्यांच्या कार्याचा महिमा जगापुढे मांडत होते. स्वामींनी जातेगावच्या डोंगरावर खूपच साक्षात्कार दाखवले. इ.स.१९६६ चे पहिले दोन-चार महिने उलटून गेले होते. आता बाबाजींचे डोंगरावरील मंदीर बरेचसे वरती गेले होते. बाबाजींनी ठरवलेल्या मंदीरासाठी पुढारी, अधिकारी,गोर गरीबानी मदत केली होती. बाबाच्या दगड फोडणीसाठी असलेल्या शिष्यांत कितीतरी मुस्लीम बंधू होते. कधी जर एखादा मुस्लीम धर्मात जन्मास आलेल्या मानसांस काही झालं तर तो मुस्लीम युवक फार मोठ्या अभिमानाने म्हणायचा, 'ए जनार्दन बाबा बचाओ' व बाबा त्याच्या त्या नुसत्या हाकेला धावून जायचे हे जनार्दन स्वामी काही साधे साधू संत नव्हते हे तर ते फार मोठे साधक होते , सर्व भक्तांच्या हाकेला सदैव हजर राहून देव ह्या गोष्टीस त्यांनी जातेगावाच्या परिसरात संजीवनी दिली होती. बाबा श्रमदान करणाऱ्या प्रत्येक व्यक्तींना वेळोवेळी चांगला सल्ला देत असायचे . त्यांनी भक्तांसाठी जिवाचे रान केले होते. बाबाजीने जर आरती म्हणण्यास सुरुवात केली आणि डोंगराच्या आसपास कुणी असेल व तो डोंगराकडे येत असेल तर बाबा आरती थांबवत व तो आल्यावर ते आरती सुरु करत. म्हणजे बाबा आपल्या भक्ताची किती काळजी घेत हे यावरुन दिसून येते. बाबा आपल्या भक्तांना पुण्य लाभण्यासाठी आरती देखिल थांबवत होते. किती विशाल दृष्टीकोन होता त्या महात्माचा, किती भक्तांविषयी अर्विभाव होता त्या माउलीच्या हृदयात हे यावरून सहज लक्षात येते. बाबाजींनी त्यांच्या जीवनात स्त्रिला मातेचे स्वरुप दिले होते. कोणत्याही स्त्रिला ते सर्वप्रथम माता मानत होते, त्यांनी त्यांच्या पत्नीलादेखील माताच म्हणून संबोधले होते. आणि जेव्हा त्यांची पत्नी पार्वताबाई सुरशे सन १९६५ साली भालगावी वारल्या तेव्हा बाबा जातगांव डोंगरावर फार मोठ्याने बोलत शिष्यांना म्हणाले,

''बाबाहो आज मी भावसागरातून मुक्त झालो, आज एक स्त्री अजूनही मला पती समजून पतीव्रता राहतो होती ती माउली आज सकाळीच वारली.''

बाबांनी जन्मतःच वैराग्याची शिदोरी आणलेली होती म्हणूनच त्यांनी पत्नीस कधीही पत्नीचे स्थान दिले नाही उलट त्यांना पत्नीस माता मानले, स्वतः कधीच संसार केला नाही पण दुसऱ्याच्या संसारासाठी उंदरसुल येथे अठरा अठरा तास १२ वर्षे तपश्चर्या केली, किती पत्नींना विभूती देऊन त्यांच्या पतीला नीट संसार करायला लावला काही गणतीच नाही, कित्येकांना मुलबाळ नव्हते तर साध्या विभूतीने त्यांना मुलबाळ दिले, प्रवचनातून कितीतरी वेळा बाबाजी लोकांना म्हणत, 'बाबांनो बाईला सांभाळा ......रे ..... ज्याचा बैल चांगला तयाची शेती चांगली ...... ज्याची बाई चांगली त्याचा संसार चांगला, बाईला जीव लावा.' बाबांनी त्यांच्या जीवनात आईला सर्वोच्य स्थाने दिले होते म्हणून तर फार लहाण वयात घर त्याग करण्याची इच्छा असूनही आईची शपथ ओलांडली नाही.

इ.स. १९६६ च्या अखेरीस आशादायक मंदीराचे काम पूर्ण होत आले होते.

बाबांच्या दर्शनाला कितीतरी लोकांमध्ये वाढ झाली होती . बाबांच्या दर्शनाला पुरुषांइतक्या स्त्रियाही जात होत्या. १९६६ च्या अखेरीस नांदगाव तालुक्यातील पर्यायाने जातेगाव पंचक्रोशीतील चार पाच स्त्रिया बाबांच्या दर्शनाला गेल्या जाता जाता पहाडाच्या दुसऱ्याच टप्प्यावर चोरांनी त्यांचे मनी मंगळसूत्र कापले त्या स्त्रिया रडत रडत बाबाजीच्या चरणांसमोर गेल्या. बाबाजी त्यांना म्हणाले, 'जाऊ द्या रडू नका बायोओं चोरं बरोबर मंगळसूत्र आणतील, रडू नका.' तिकडे डोंगराच्या दुसऱ्या टप्प्यात सोनं चोरणाऱ्या चोरांची अचानक दृष्टी गेली ते वाटेल त्या रस्त्याने जायला लागले जाता जाता ते चोरं पहाडाच्या पायथ्याला न जाता पहाडाच्या पिनाकेश्वर मंदीराजवळ गेले मंदीरात गेल्यावर त्यांना दृष्टी आली व समोर बाबाच दिसले . बाबा हसत म्हणाले,

'आरे पोराओ हे चोर आले पहा. त्यांना मांडे (कलीयुगात संबोधली जाणारी पुरणपोळी) द्या खायला कारण ह्यांनी आज त्या माऊलींना रडवून फार मोठं काम केलं आहे.'

चोरानी बाबाजींची माफी मांगितली आणि त्या माऊल्यांचे चरण धरले व चोरीचे प्रायश्चित म्हणून एक दिवस मंदीरात बळीरामाच्या हाताखाली दगडं दिले. बाबाजी किती उदार अंतःकरणाचे योगी पुरुष आहेत याची जाणिव त्यावेळी त्या चोरांना झाली असेल. बाबाजी श्रमदान करणाऱ्या लोकांना कधीच घरून भाकरी आणू देत नसायचे चार – पाच शिष्यांना तेथेच पहाडावर स्वयंपाक करण्यास सांगत असायचे बाबाचे धोरणच तसे होते कि शिवालय बांधता बांधता गुरुकुलेही बांधायचे व गुरुकुलातून गरीब बालके ही देशाची शान बनवायची, गोर गरीबांसाठी आश्रमे बांधायची व त्या आश्रमातून त्यांना दोन वेळचे भोजन द्यायचे . नाहीतरी दोन लोकांना अन्नदान करा असे बाबाजी नेहमीच शिष्यांना उपदेश करायचे, ह्याच अन्नदानाच्या दानामुळे बाबाजी नेहमीच भक्तांना पहाडावर जेवू घालायचे, डिसेंबर १९६६ मध्ये नाशिक जिल्हयातील निफाड तालुक्यातील चांदोरी येथील काही शिष्यमंडळी पहाडावर स्वामींच्या दर्शनाला गेली पहाडावर जाता–जाता त्यांना खूपच दम लागला धापा टाकत – टाकत ते बाबाजीच्या डोलीजवळ टेकले. बाबाजी म्हणाले,

'काय रे दमले का?'

हा बाबाजी

असे ते लोक म्हणाले. बाबाजी म्हणाले,

'मी आता काय करायचं.'

त्यातला एक बोलला, बाबाजी चहा प्यायचा.

बाबांनी लगेच शिष्यांसाठी चहा ठेवण्यास लावला चहा केवळ चार कप ठेवला होता तितक्यात वीस पंचवीस कन्नड तालुक्यातील बाबाजीच्या आजोळचे लोक आले . त्यांना पिनाकेश्वर शिवालयजवळ येईपर्यंत चहा उकळला होता.

बाबाजी म्हणाले,

'चांदोरी वाले शांत झाले आता आधी कन्नडवाल्यांना चहा द्या.'

त्यात चांदोरीच्या चहा मांगणाऱ्या भक्ताला वाटले आधिच चार कप चहा होता आता काय मिळणार आहे आपल्याला ........ पाणी, तो नाराज झाला. बाबाजीला सर्व समजले.

पंडीतकाका चहा घेऊन आले , बाबाजींच्या कुटियात एकच कपबशी होती. एका वेळी एकच जण चहा पिऊ शकत होता. चार कप चहात वीस कन्नडचे भक्त चहा पिले , तरी पातेल्यात चहा जसा चे तसा होता. कन्नडवाले भक्त चहा बिनधास्तपणे पित होते कारण त्यांना माहित नव्हते की फक्त चारच कप चहा ठेवला होता परंतु चांदोरीवाले भक्त त्या चहाच्या पातेल्याकडे आश्चर्याने बघत होते कारण चार कपात वीस जण चहा पिले होते आणि शिवाय अजुनही पातेल्यात चहा होताच. बाबाजी म्हणाले,

'द्या रे चांदोरी वाल्यांना चहा द्या आता.'

चांदोरी भक्त मंडळ चहा पिले व पातेल्यातला चहा संपला . आश्चर्याने चकित झालेल्या चांदोरी ग्रामस्थांना बाबाजीने दगडे घडवायला लावली तर कन्नडवाल्या भक्तांना त्यांनी वाळू गाळायला लावली, त्यात चार पाच जण तसेच बाबाजीजवळ बसून राहिले , बाबांनी त्यांना विचारले , काय रे बाबा हो , जाना काम करा ना.

त्यात एक जण म्हणाला, बाबा मला ओळखलं का ?

नाही बुवा.

बाबा , मी मोहीते पाटलांचा नातु आहे, टापरगावचा.

हा.......हा.... आलं ध्यानात.

हसत हसत बाबा म्हणाले.

मग बाबा एक दिवस चालाना टापरगावला. स्वामींच्या मामांचा मुलगा म्हणाला, 'नाही बाबा, मी तिकडे येऊन काय करु आणि मी एकदा एका ठिकाणाहून जाऊन आलो तर पुन्हा त्या ठिकाणी जात नाही. आणि मी तपसाधना झाल्यावर एकदा आलो होतो माझ्या जन्मभूमीचे दर्शन घ्यायला तुम्ही कुणीच ओळखल नाही , तुझ्या माय न बी नाही ओळखलं मला , आता मी नाही येणार.' बाबांचे हे बोलणं ऐकूण मामांच्या मुलाला थोडं वाईट वाटलं त्यांना वाईट वाटल ते बाबा त्यांच्या गावी येत नाही म्हणून नाही , पण येऊनही आपल्या घरातील व्यक्तींना त्यांना ओळखता आले नाही म्हणून . पण एक लक्षात घ्या साधू संतांना खरच कुणी ओळखत नसतं, म्हणून वाचकांनो मी तुम्हाला एकच सांगू इच्छितो , दारात आलेल्या कोणत्याही साधूला दान द्यायला मागेपुढे पाहू नका. कोण केव्हा कोणत्या स्वरुपात येतो याचे सांगता येत नाही. थोड्या वेळाच्या विलंबानंतर बाबा म्हणाले, बर बसं झालं आता, दोन-चार दगड टाका, घ्या थोड फार पुण्य जा ....... काम करा व्हा. बाबा नातेवाईकांनासुध्दा कामाला लावत होते साऱ्या शिष्यांना एकच समजून ही माऊली

पिनाकेश्वर मंदीराचे बांधकाम पूर्ण करुन जन्मास आलेल्या अवताराचे कार्य करीत होती. त्यादिवशी नेमके बळीराम गवळ्यांने पाच वाजताच सुट्टी घेतली व बाबांकडे येऊन म्हणाले, बाबा आज लई भूक लागली आहे. बाबा म्हणाले, 'बसा जगन आणि ते लोक रोडगे आणि वरण करुन राहिले.'

परंतु जगनबाबाने त्यादिवशी खूपच कमी रोडगे केले होते, सायंकाळची वेळ झाली. सर्व शिष्यगण जेवणासाठी बसली. बाबा म्हणाले,

अरे वाढारे रोडगे ,पण एक काम करा रोडगे वाढल्यानंतर त्यावर झाकण ठेवा बर का? लई घाण उड्र राहीली.

बाबांनी सांगितल्याप्रमाणे रोडग्यांचा अंदाज बघून जगन बाबांनी एकेकच रोडगा ठेवला. वरून झाकण ठेवून दिले. बाबा पुन्हा म्हणाले, 'आरे अजून वाढा ना, खाऊंद्याना, त्यांनी किती काम केल .... द्या त्यांना.' जगन बाबांना वाटले, आता बाबा आपल्याला बोलेल. कारण रोडगे दोन–तीनच राहिले. तरी देखील त्यांनी झाकण उघडले व आर्श्चयाने जोरात आरोळी दिली.

बोला श्री संत जनार्दन बाबा की जय, शिष्यांना वाटले काय झाले. त्यांनी बघीतले तर पातिल्यात रोडगे जसेच्या तसे होते. शिष्यांना बाबाचा महिमा क्षणोक्षणी दिसत होता, यावरुन बाबाला अन्नदान करण्याची किती विलक्षण आवड होती हे लक्षात घ्या. त्यांनी त्या दिवशी पहाडावर खुल्या हाताने अन्नदान केले होते अन्नदान करता करता लोकांनी श्रमदानासाठी जास्तीत जास्त मदत केली होती. पिनाकेश्वराचा केवळ कळसच आता बाकी होता बाकी सर्व मंदीर पुर्णतः झाल्यातच जमा होते. गुढीपाडवा होता इ.स. १९६७ च्या गुढीपाडव्याला आता बाबाजी नेहमीच अनुष्ठान घेत आले होते. व आजही त्यांचे उत्तराधिकारी , महामंडलेश्वर १००८ श्री स्वामी शांतीगिरीजी महाराज हे गुढीपाडव्याला जातेगांव येथे अनुष्ठान घेतात. इ.स. १९६७ ला ठरल्याप्रमाणे अनुष्ठान होणार होते. बाबाजी शिष्यांना सांगत होते, बाबाहो आटपा पटापटा आता, आपलं काम जवळ–जवळ पुरं होत आलं, आपण आता थोड्याच दिवस इथं काम करु मग आपलं मंदिर पूर्ण होणार आहे.शिष्यांना वेगळ वाटायचं की बाबा आता असे का म्हणतात? बाबजींकडे ह्या अनुष्ठानास बसण्यासाठी विचारण्यास प्रचंड गर्दी होऊ लागली, बाबांजी लायक भक्तांना बसण्याची परवानगी देत होते पण जेवणाशिवाय पहाडावरुन ते कुणालाच उतरुन जाऊ देत नसे त्यावेळी पहाडावर भरपूर शिळ्याभाकरी उरल्या होत्या व बाबाजी त्यांचा भुगा करुन भक्तांना खायला देत होते. आणि भक्तही ते आवडीने खात होते, याच कारणास्तव काही दानशूर व्यक्तींनी बाबांच्या कुटीयात भुगा करण्यासाठी खलबत्ता दान दिले होते,पण एके दिवशी एका अल्पबुध्दीवान हव्यासी स्त्रीने दान दिलेला खलबत्ता पिशवीत टाकून घरी आणला , घरी आल्यावर काही वेळेनंतर तिने तो खलबत्ता बाहेर काढला तर त्या लोखंडी खलबत्त्याचा

एक निरर्थक दगड झाला होता , त्या बाईला विलक्षण अवघडल्या सारखे झाले आणि तिला फार वाईट वाटले. दुसऱ्या दिवशी सकाळीच तिने तो दगडी खलबत्ता पिशवीत घातला व पहाडावर आणला आल्या आल्या त्या स्त्रीने तो खलबत्ता त्या खलबत्तेवाल्याजवळ ठेवला तर त्या दगडाचा पुन्हा खलबत्ता तयार झाला व इतर स्त्रीयांबरोबर बाबाकडे गेली बाबा इतर लोकांना प्रवचन देत होते,

'बाबाहो आपले हे अनुष्ठान होणार आहे. त्यासाठी लई लोक बाबाच्या पहाडावर कामासाठी येतात किती लोकं दान देतात आणि काही लोक बाबाला दिलेले दान चोरुन नेतात.'

बाबांचे वाक्य त्या हव्यासी स्त्रीच्या लक्षात आले. तिने बाबांपुढे पदर पसरला व क्षमा मांगितली व बाबांनी त्या माऊलीस मोठ्या सागरदयेने माफ केले, यावरुन बाबाचे विशाल अंत:करण लक्षात येते.

गुढीपाडव्याला ठरल्याप्रमाणे पिनाकेश्वर मंदीरापुढे अनुष्ठानास सुरुवात झाली. अनुष्ठनाचा तिसरा दिवस असेल, सकाळी -सकाळी एक दैवावर विश्वास मानणारी स्त्री आपल्या आजारी मुलाला घेऊन स्वामींकडे आली ती त्या मुलाच्या आजाराने बेजर झालेली होती. त्यामुलाची अंगावरील त्वचा निघून चालली होती व तो काही दिवसातच नक्कीच मृत्यूलोक सोडून जाणार होता, परंतु त्या माऊलीने स्वामींच्या दरबारात त्याला आणले, बाबांनी त्याला पहाडावरील झाडाखाली बसायला लावले व लाखलगावच्या श्रीधर काकांना बोलवले व सांगितले.

तुम्ही अनुष्ठानार्थ्यांनी जेवण केलेल्या ताटात त्यांचे उष्टे पाणी घ्या व मुलाला पाजा आणि त्याला त्याच पाण्याने आंघोळ घाला व त्या माऊलीला सांगितले बाई तु तीन दिवस पिनाकेश्वर बाबाचा जप कर.

तीन दिवसानंतर तो मुलगा पूर्णत: बरा झाला . त्याचवेळी बाबा प्रवचनातून बोलले, 'बाबाहो बघा अनुष्ठ्रणाच्या खरगट्या पाण्याने हा पोरगा चांगला झाला तेव्हा त्या अनुष्ठान केलेल्या मानसाला काय प्राप्त होत असेल हे तुम्हीच जाणून घ्या.'

यावरुन वाचकांनो अनुष्ठान खरे काय असते हे तुम्हीही स्वामी शांतीगिरीजींकडून अनुग्रह घेऊन अनुष्ठान करुन जाणून घ्या तुम्हालाही अनुष्ठानाचा महिमा कळेल हे लक्षात घ्या अनुष्ठानाचे सात दिवस कसे निघून गेले हे कळलेच नाही , बाबाचे अमृतमय प्रवचन डोंक्यात भिनता भिनता अनुष्ठानाचा सातवा दिवस उगवला, बाबाजींनी प्रवचन घेतले महाप्रसादाचा जबरदस्त कार्यक्रम जातेगाव पहाडावर साजरा झाला अनेक भक्तगनांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. चार-पाच वाजले होते पहाडावर भक्तांची वर्दळ महाशिवरात्री सारखी चालूच होती. त्या वर्दळात एक म्हातारी सुनेसह बाबाजींच्या कुटीया समोर उभी राहीली. बाबा म्हणाले,

'काय बाई काय काम काढलं बाबाच्या कुटीयाकडे.'

काही नाही ह्या माझ्या सुनेला पोरगं व्हत नाई ,म्हणलं बाबाकडं जावा, बाबा देईल काही तरी. असे फार मोठ्या आशेन म्हातारी बोलली.

बाबा म्हणाले, 'ते तेवढं आंगण झाड-झूड कर आणि मग ये इकडं, देता भस्म.' म्हातारी सुनेसह झाडझूड करण्यास त्वरीत गेली. बाबाजीला श्रमदान फार आवडायचे श्रमदान करणाऱ्या व्यक्तींना बाबाने फार जवळ घेतले होते. झाडझूड करुन म्हातारी विभूती घेऊन सुनेसह पहाड उतरुन घरी पोहचली आणि सुनेला म्हणाली, अगं सुनबाई ही बाबांची विभूती घे. म्हातारीची सुनबाई जरा वाजवीपेक्षा जास्तच अवजड होत्या पर्यायाने त्या दैवत्वास विरोध करत होत्या त्यांनी बाबाजींची विभूती प्राशन न करता फेकून दिली, नंतर ती फेकलेली विभूती बोटाने गोळा करुन म्हातारीने प्राशन केली तर निसर्गाविरुध्द व वैद्याविरुध्द त्या विभूतीची शक्ती चालली व साठव्या वर्षात पदार्पण करणाऱ्या म्हातारीला नऊ महिन्यांनी पुत्र झाला आणि तोच मुलगा टूनकी या गावात २०।१२।१९८५ला बाबांच्या अनुष्ठानास बसला आणि सात दिवसाचे त्याने तेथे अनुष्ठान केले. हा होता ह्या साधकाचा साक्षात्कार, हा होता हया स्वामींचा विभूतीचा प्रसाद. बाबांजी हे हाडमासाने मानवी होते पण त्यांच्या मानाने ह्या महाराष्ट्राच्या पुण्यवान भुमित स्वतः भगवान शंकरच वावरत होते.

अशा प्रकारे एका पेक्षा एक वरचढ साक्षात्कार दाखवत बाबाजींनी भक्तीचा प्रसार त्या पहाडावर राहून जागोजागी केला भक्तीप्रमाणे धर्मांचाही त्यांनी प्रसार केला. बाबाजी हे ज्या ठिकाणी बसत त्या ठिकाणीच ते प्रवचन देत पण त्यांच्या प्रवचनातून किती लाभ ह्या भारतीय जनतेला व्हायचे याचे काय वर्णन करु. नुकताच परकीयांच्या ताब्यातून मुक्त केलेला हा देश एखाद्या पक्षाप्रमाणे झाला होता. अनेक दिवस पिंजऱ्यात अडकवलेला पक्षी जर मुक्त केला तर त्याला समोर दिसणारे हिरवेगार पाचुचे रान अंधाकरमय वाटत असते व त्यावेळी त्याला गरज लागते ती कुणाच्या तरी मार्गदर्शनाची. कारण विनामार्गदर्शनाशिवाय त्याला एक नविन दिशा मिळत नाही व नविन दिशेशिवाय त्याला नुतन जगच सापडत नाही. अगदी तसाच हा भारत देश होता, त्याला सक्त गरज होती ती संतांची, त्याला पुरेपुर गरज होती ती योग्य मार्गदर्शकाची, त्याला नितांत गरज होती ती एका योगीमय नावाड्याची व त्या संताची भूमिका केली स्वामी जनार्दनाने ,त्या नावाड्याची भूमिका केली ती एका साधकाने त्यांनी योग्य प्रदेश बघून हिंदवी धर्माची भगवी ध्वजा फार अभिमानाने रोवली, त्या ध्वजेखाली अनेक गोरगरीब एकत्र केले, त्यांच्यासाठी साध्या नि सरळ वाणीचा अवलंब केला त्यांना प्रवचन सांगून भक्तीची फळे चाखायला दिली, त्यांना साक्षात्कार दाखवून दैवावर विश्वास ठेवण्यास भाग पाडले, त्यांना अनुष्ठान करुन पुण्याचा मार्ग दाखवून दिला आणि त्याच भक्तांसाठी त्यांनी श्रमदानातून आता अतिभव्यदिव्य असे पिनाकेश्वराचे शिवालय पूर्णपणे उभे केले होते. स्वामींनी स्वतःच्या आशिर्वादाने व पिनाकेश्वराच्या प्रेरणेने बळीरामाच्या हातून १९६७ मध्ये हे शिवालय पूर्णपणे उभे केले होते. त्या इंग्रजांच्या सरत्या मावळत्या

राजवटीत स्वामींनी जातेगावाच्या पहाडावर पिनाकेश्वराचे मंदीर फार नेटाने सजवले होते. एवढ्या उंच अंतरावर क्षणोक्षणी निसर्गाच्या धोकादायक भूरचनेमध्ये स्वामींनी श्रमदानातून त्यांच्या कार्याची सुरुवात एक आकर्षक पिनाकेश्वराचे शिवालय बांधून केली होती हेच फार काही सांगून जाते. ह्या शिवालयामुळे कित्येक कोस दूर अंतरावरील लोकांना वाटले ही कुणी साधी लंगडी व्यक्ती नाही तर ही फार मोठी महान व्यक्ती आहे जी विभूती फक्त विभूतीवर जगाचे कल्याण करण्यास अहोरात्र झुंजत आहे निसर्गाच्या कुशीत ह्या जातेगाव पहाडावरील स्वामींचे पिनाकेश्वराचे शिवालय आता संपूर्णतः पूर्ण झाले होते.

शाळुंक्या व नंदीसाठी प्रसिध्द असलेले ठिकाण जयपूर येथे स्वामी स्वतः पंडीतकाकांना घेऊन गेले तेथून महादेवीची पिंड, एकमुखी दत्त, सुर्य, चंद्र, गरुड, हनुमान इत्यादी मुर्त्या आणल्या व विद्वान ब्राम्हणांच्या हातून स्वतःच्या उपस्थितीत स्वतःच्याच खऱ्या रुपाची प्राणप्रतिष्ठा केली. किती कार्यांचा महिमा अपार होता ह्या साधकामध्ये, ह्याची कृपया नोंद आपल्या मनात करा व शांतीच्या फुलातून स्वामी जनार्दन बाबा दिसते का याचा शोध घ्या. मंदीराची प्राणप्रतिष्ठा करण्यापूर्वी स्वामींनी शिवपुराण ,भागवत, विष्णुपूराण, गायत्री इत्यादी ग्रंथ व विधी शेलारगुरुजींकडून लिहून घेतली होती व तिथे ती पुस्तके सर्वांसाठी खुले केले होते. बाबांनी त्यांच्या जिवनात सर्वाधिक महत्व विधीला दिले. बाबाजी नेहमी म्हणत.

ज्याच्या मुखी विधी जाण
तोचि खरा पुण्यवान ॥

अशा प्रकारे बाबांनी जातेगांवच्या भक्तांसाठी विधी तयार केली व त्यानंतर पिनाकेश्वर महाराजाची प्राणप्रतिष्ठा केली , प्राण प्रतिष्ठेच्या दिवशी स्वामींनी ब्राम्हणाला, त्या बळीरामाला व इतर शिष्यांना गळ्याशी लावले, पाठीवर हात ठेवून जन्मो जन्मी पुरेल अशी आशिर्वादाची शिदोरी दिली. त्यांना त्यांच्या श्रमदानाचे श्रेय म्हणून त्यांचे सत्कार केले,प्राणप्रतिष्ठेच्या वेळी स्वामी स्वतः डोळे मिटून किती तरी तास त्या पिनाकेश्वर बाबाजवळ बसलेले होते. ह्या प्राणप्रतिष्ठेमुळे जातेगाव येथील पिनाकेश्वराच्या शिल्पास फार मोठी प्रसिध्दी मिळाली व वेगवेगळ्या ठिकाणच्या भक्तांचे ते एक श्रध्दास्थान बनून गेले . भक्तांना आपोआप भगवंताची गोडी लागली होती, हळूहळू भक्तीची सवय झाली होती , भक्तीतून धर्माची जाणीव मनाला पुर्णतः वाटत होती व अशातच आता स्वामींच्या कार्याची जातेगावातील पूर्तता संपूर्णतः पूर्ण झाली होती. कार्याची पुर्तता झाल्यावर बाबाजी आपला मुक्काम हालवत होते दुसऱ्या ठिकाणी जाऊन आपल्या कार्याची मुहर्तमेढ रोवत होते. बाबाजी त्या दिवशी तसे कुटीयात इतर दिवसांपेक्षा लवकरच गेले. भक्तांनाही त्यातले फारसे नीट ज्ञान झाले नाही. बाबाजीने आरती-विधी केली व जेवढे त्यांना आवश्यक होते तेवढे ध्यान केले आणि झोपी गेले. हा शिव अवतार त्या १९६८ मध्ये इतक्या लवकर का झोपी गेला

याचे ज्ञान मात्र स्वामींच्या खास सेवा करणाऱ्या शिष्यांनाही झाले नाही त्याच दिवशी त्याच रात्री स्वामींना पुन्हा साक्षात्कार झाला तो भगवान सिध्देश्वराचा, भगवान शिवजी ज्याप्रमाणे अंदरसुलला स्वामींच्या स्वप्नात गेले व स्वामींना दृष्टांत दिला कि जा पिनाकेश्वरला, अत्यंत त्याचप्रमाणे स्वामींना ह्याही वेळी भगवान शिवाचा साक्षात्कार झाला, की सिध्देश्वराचे शिवालय बांधावे. स्वामींचे कार्य पूर्ण झाले की भगवान शिवशंकर स्वत: स्वामींना साक्षात्कार दाखवायचे व शिवालय बांधण्यास लावयचे आणि त्या मार्फत योग्य असे भक्तीचे कार्य करण्यास लावायचे. साक्षात्कार झाल्यावर स्वामी अंथूरणावरुन उठले व सामानाची आवरा-आवर करायला लागले. त्यांनी आवरा -आवर केली ती त्यांच्या विधीच्या पुस्तकांची, भागवताची, नागाबाबाने पुणित केलेल्या वेगवेगळ्या पुराणांची, एका बारदाणाची, एका भगवी कपनीची आणि एक पाय भक्तीच्या नादात गमवल्याने, दुसऱ्या पायाला आधार देणाऱ्या त्या निसर्गानेच तयार केलेल्या काठीची इत्यादी सामानांची आवरा-आवर स्वामींनी केली. दुसऱ्या दिवशी स्वामींनी विधी वगैरे केली व पुकारणा केली की मी आज हा पहाड सोडून वेरूळला जाणार आहे. भक्तांचे हात पाय गळाले व ते जागीच टेकले, नाही नाही म्हणत त्यांनी स्वामींना अडवण्याचा परामोच्च प्रयत्न केला परंतु ह्या शिवावताराच्या निर्णयाला कुणीच आवरू शकले नाही. स्वामींचा कार्यक्षेत्र सोडण्याचा निर्णय हा नेहमीच अखेरचा असतो. काही शिष्य गण पळत पळत पहाडाखाली आले व गावात सांगू लागले.

लोको हो ..... आपली माऊली चालली .....आपला ....बाबा चालला .... आपली आई ..... चालली .... आपण आता कोणाकडं जायचं..... आपण कोणाकडं .... भस्म मागायचा ...... चला .... चला ...डोंगरावर चला .....आपला बाबा ....चालला.....आपल्याला सोडून

हा......हा......म्हणता......स्वामी डोंगर सोडून चालले ही बातमी वाऱ्यासारखी अवघ्या जातेगावच्या पंचक्रोशीत फिरली ..... व नर्मदेच्या चक्र तिर्थस्थळासारख्या पाण्याप्रमाणे किती तरी जनता ह्या जनार्दनाच्या अंतिम दर्शनासाठी पहाडाच्या पायथ्याशी जमा झाली.

स्त्रीयांनी लुगड्याचा पदर कमरेवर खोसला , पुरुषांनी डोक्यावरच्या टोप्या हातात घेतल्या , म्हाताऱ्यांनी आप-आपले धोतर डाव्या हाताच्या चार बोटात पकडून उजव्या हातात काठ्या घेतल्या तरुण बालकांनी पायात पादत्राणे घातली व जोरात आरोळी दिली.

आरे जोरात बोला ....... आज आपला बाबा चालला .... बोला ......श्री संत जनार्दन बाबा की जय ..... जय नागाबाबा की जय .... मातोश्री ..... नर्मदामाता की जय .... पिनाकेश्वर भगवान की जय ........ आकाश पाताळ एक झाले , नदीत खळखळणारे पाणी काही क्षणात मंदावले, जातेगांव शिवारातून दुसऱ्या गावी अन्नासाठी दूरवर भ्रमण करणारे पक्षी जातेगावच्या पहाडाकडे सरकले गेले व पंचक्रोशितील सारे भक्तजण स्वामींच्या वेधाने

पिनाकेश्वराचा पहाड चढण्यात जोरात लागले , बाबांचे दर्शन घेण्यासाठी सर्व जण आता जातेगावच्या पहाडाकडेच सरकत होते. तिकडे पहाडावर स्वामी काही निवडक भक्तांच्या साहित्याने कुटीयाचे लाकडं गोळा करीत होते. भक्तजण लाकडं काढता -काढता डोळ्यातून अनमोल अश्रू गाळत होते तर बाबा त्यांना क्षणा-क्षणात अनमोल वाणीनं प्रवचन देत होते. सर्व भक्तीमंडळी आता जातेगावच्या पहाडावर मुंगीप्रमाणे गोळा झाले. स्वामींनी त्यांना वर हात करुन यथायोग्य चिरकाल टिकेल असाच आशिर्वाद दिला व सांगितले.

''बाबाहो, देवाला देवच माना, कायम देवाची पूजा करा, प्राण्यावर दया करा, गायीमध्ये देव शोधण्याचा प्रयत्न करा, बायाओ तुम्ही आपल्या पतिला देवा माना, बाबाहो तुम्ही बायांना कमी समजू नका, ती लक्ष्मी असते, पतिवर्ता बाईने नवऱ्याची सेवा कली तर ती सुर्याला सुध्दा थांबू शकते तवा संसार सांभाळण्यासाठी बायांना जीव लावा, ज्याची बायको निट त्याचा संसार निट, ज्याची बायको वाकडी त्याचा संसार वाकडा, बायाओ हौशीकरता नवरा करुन नका, हौस माणसाला फाडून खाते, शिलवान राहा, शिलवान बाया सासू-सासऱ्याशी प्रेमाने वागतात, आप-आपल्या नवऱ्यावर भाव ठेवा, तुकाराम महाराज म्हणतात, ज्या बाईने नवऱ्याची सेवा केली, नवऱ्यावर भाव ठेवला व पतिवर्ता राहून संसार केला तर तिची देवावर सुध्दा सत्ता होते.

॥ तुका म्हणे पतिवर्ता
तिची देवावरती सत्ता ॥''

बाबा पुढे बोलत होते, जातेगांव परिसरातील भक्तजण एक चित्ताने बाबांचे बोलणे ग्रहण करत होते. बाबा पुढे म्हणाले,

''बायाहो नवऱ्याला ठग देऊ नका, नवरा आपलं दैवत आहे, जर नवऱ्याला त्रास दिला तर तिन्ही लोकात जागा मिळणार नाही तुम्हाला, बाबाहो आईला तुम्ही देव माना, साऱ्या जिवनाचा सार आहे आपल्या आईमध्ये रामदास स्वामी नेहमी म्हणायचे.

॥ स्वामी तिन्ही जगाचा
आई विना भिकारी ॥''

कल्याणकारी बोल देता - देता स्वामींनी प्रवचन संपुष्टात आणले. दर्शनामुळे व प्रवंचनामुळे सुर्यनारायण बराचसा खाली सरकन्याचा प्रयत्न करीत होता. स्वामी म्हणाले,

''बाबाहो येता रे आता.''

स्वामी आता हळूहळू काठाच्या आधारावर पहाड उतरु लागले तितक्यात भावसार,माहेगावकर, बाबूराव पानगव्हाणे स्वामींच्या दर्शनासाठी पिनाकेश्वराकडे येत होते, त्यांनी स्वामींच्या दर्शनासाठी नांदगाववरून जीप आणली होती व तीच जीप आता स्वामींना वेरूळला घेऊन जाणार होती. स्वामींनी जातेगावच्या पहाडाचे डोके टेकून दर्शन घेतले पिनाकेश्वराकडे हात जोडून बगितले व जातो आता असे म्हणून ही जगाची

कल्याणकारक विभूती आता वेरुळकडे निघाली. कातरवेळ झाली होती आणि तुम्हास माहितच आहे की कातरवेळ ही वेळच अशी असते की किती कुणाला आपल्या सासरी घेऊन जाणारी असते तर ती कुणाला माहेरी घेऊन येते. ह्या वेळी एखादी अल्लड कुमारीका कुणाला तरी बघण्याचा प्रयत्न करते तर एखादी माता आपल्या लेकराची वाट बघते अशाच वेळी ही महान विभूती आपल्या घृष्णेश्वराच्या दारी म्हणजे आपल्या माहेरी चालली होती. जातेगांवातील भक्तमंडळी दुःखाचे अश्रू गाळत का होईना पण आनंदाने स्वामींना निरोप देऊन जात होती तर सुर्यही आता मावळतिसाठी रवाना होणार होता. सात वर्ष पिनाकेश्वराच्या पहाडावर वास्तव्य करुन शून्यातून जग निर्माण करुन, एक अति दिव्य न भूतो न भविष्यती असे शिल्प बांधून, उजाड रानावर अथवा माळावर एक हिंदवी ध्वजेचे प्रतिक फडकवून, कार्याचा महीमा करुन भक्तीची बीजे भारत वासीयांच्या मनात पेरुन ही विभूती गाडीत बसून ....... जातेगावच्या शिवापार गेली. हतबल झालेले लोक रोज पिनाकेश्वराचे दर्शन घेण्यासाठी जात राहिले. आजही जातेगावात महाशिवरात्रीस अतिभव्यदिव्य अशी यात्रा भरते व स्वामींच्या परंपरेनुसार त्यांचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या आशिर्वादाने तेथे प्रत्येक वर्षी गुढीपाडव्याला सात दिवसाचे अनुष्ठान होते. स्वामी यापूर्वी घृष्णेश्वराच्या दरबारात गुरु नागाबाबांचा बिसामंत्र सिध्दकरण्यासाठी १९५९ मध्ये आले होते. व आता तर तेथे त्यांच्या अवताराचे एक रुप स्थापीत करण्यास चालले होते. दिवस मावळतीला व मिणमिणते दिवे बत्त्या लावण्याच्या वेळी स्वामी वेरुळ येथे पोहचले. भगवान शिवाचे अखेरचे ज्योर्तिलिंग म्हणजे औरंगाबाद जिल्ह्यातील रत्नपूर तालुक्यातील वेरुळ येथील घृष्णेश्वराचे शिवालय चारीधामाचा अखेरचा मुक्काम म्हणून घृष्णेश्वराचे वेरुळ ते अवघ्या भारतभूमीरुपी देवघरात प्रसिध्द आहे. आपल्या हिंदूस्थानच्या हिंदू धर्माच्या खऱ्या संस्थापकाचे मुळगांव म्हणजे वेरुळ, अवघ्या विश्वात लेणीसाठी प्रसिध्द ठिकाण म्हणजे वेरुळ ह्याच वेरुळ येथील घृष्णेश्वराचा जिर्णोध्दार राजा शिवरायांच्या वाडवडीलांनी केला होता. हिंदवी ध्वजा फडकवणाऱ्या शिवरायांचे मुळचे घराणे ह्या मराठवाड्यातले होते व त्यांच्या सारखीच हिंदवी ध्वजा फडकवणाऱ्या किंबहूना कार्याची महीमा म्हणून भक्तीचा प्रसार करण्याऱ्या म्हाळसाई पुत्राचाही मुळगांव ह्या मराठवाड्यातील होते. आणि तोच हिंदू धर्माचा जगदगूरु स्वामी जनार्दन आता त्याच हिंदवी राज्याची बीजे पेरणाऱ्या शिवरायांच्या मुळगांवी ह्या कातरवेळी येऊन पोहचला होता. बाबाजी गाडीतून उतरले त्यांच्यासह आलेल्या अंदरसूल, वाकला व जातेगावातील काही भक्तांनी सर्व सामान गाडीच्या बाहेर काढले.

स्वामी उतरल्या -उतरल्या घृष्णेश्वराच्या शिवालयात गेले, तेथे त्याच्या समोर पदमासन घालून बसले, नंतर त्यांच्या त्या पिंडीकडे सरकले व डोके टेकवून काहीतरी बोलू लागले ते त्या पिंडीजवळ काय बोलले, हे त्यांना व त्या घृष्णेश्वराला ठाऊक.

काही क्षणानंतर स्वामी बाहेर मंदीराच्या पायरीवर येऊन बसले. पुजाऱ्याशी बातचित करुन शिवालयाची संपूर्ण विचारपूस केली. बाबाजीचे बाकीचे शिष्य बाबाजीच्या आवती भोवती बसले व आपआपसात बोलू लागले. तितक्यात वेरूळ गावातील इतर भक्त तेथे स्वामींजवळ येऊन बसले. त्यातल्या बरीचशीजण स्वामींना ओळखत होती तर बरेचशे स्वामींच्या नावाच्या जयजयकाराला जागृत झालेले होते. जाणकार शिवभक्तांनी आल्याआल्या अवताररुपी शिवाचे दर्शन घेतले व त्यांच्याशी जातेगावातील शिवालयाविषयी मनसोक्त चर्चा करण्यास श्रीगणेशा केला . बऱ्याच दुरवरच्या मोठ्या बाता काढण्याऐवजी स्वामींनी वेरुळ येथील सरपंचा विषयी बोलण्यास सुरुवात केली. त्यातल्या त्यात एका सर्व सामान्य पण चटपट्या मानसाने सरपंचाऐवजी उपसरपंचाला पाचारण केले. स्वामींना उपसरपंचाने बघितले नव्हते किंबहूना त्यांचे नाव लौकीक मात्र वाऱ्याच्या व कानाच्या सहाय्याने ऐकले होते. म्हणून उपसरपंचाचा मान ग्रहण केलेल्या लाला धनसिंगने स्वामींचा सांगावा आल्याचे ऐकताच पायात पायतान घातले व सरळ घृष्णेश्वराचे शिवालय गाठले. ठराविक भाग्यवान लोकांनी त्यांची ओळख स्वामींशी घालून दिली. स्वामींना आता बरचसे कार्य या लालांकडून पार करून घ्यायचे होते. कारण एखाद्या ग्रामचा अथवा वाडीचा सरपंच किंवा उपसरपंच हा छोटासा राजा असतो. त्यावेळी तो त्या गावाचा, त्या लोकांचा, त्या जागेचा एवढेच नव्हे तर त्या वेळेचा सुध्दा प्रमुख असतो. बाबांनी त्या वेरुळ नगरीत जन्मास आलेल्या त्या भाग्यवंतांना सांगण्यास सुरवात केली . मी आता आपल्या ईश्वराचे काम करुन जातेगांववरुन आलो.त्यापूर्वी जातेगावात येण्याचा आदेश मला भगवान शंकराने अंदरसुलात तप पूर्ण झाल्यावर दिला होता व आज तेथे कार्याची पूर्तता झाल्यावर पिनाकेश्वर महादेवाच्या शिवालयात भगवान शंकराचा माता पार्वतीसह साक्षात्कार झाला व आदेश मिळाला की वेरुळ नगरीत जाऊन सिध्देश्वराचा जिर्णोध्दार कर, म्हणून बाबाहो आता तुमच्या घरी आलो, हे सारं देवाचं आहे, तुमचं आमचं काहीच नाही. बाबाजीचे एकूण एक बोल जातेगावातल्या भक्तांप्रमाणे वेरुळ नगरीतील प्रजाजणांच्या हृदयात ठसले व मनोमनी उतरलेले, गावकऱ्यांनी उदंड प्रतिसादाने हात वर केले व मान्यता म्हणून एक जोराची घोषणा दिली .....

**॥ जनार्दन बाबा की जय,**
**घृष्णेश्वर भगवान की जय,**
**सिध्देश्वर भगवान की जय ॥**

हो .... बाबा ..... उद्या येतो.

असे सांगून नविन भक्तमंडळी घरी परतली व स्वामींनी नित्यक्रमाची रेखाटनी करत घृष्णेश्वराच्या शिवालयात मुक्काम ठोकला. घृष्णेश्वराच्या दक्षिणेला सिध्देश्वराचे पुरातन शिवालयही होते. व त्याच्या कारोभाराला आता शुभ सुरवात होणार होती. ह्या तपसाधकाची,

ह्या शिवजींची हिंदवी ध्वजा संपूर्ण विश्वात ह्या भगवान शिवाच्या घृष्णेश्वराच्या साक्षिणे ह्या रंग बदलत्या दुनियेत कमी जास्त पणे वाहणाऱ्या वाऱ्याच्या प्रवाहात फडकणार होती. आकाश -भू-पाताळ ह्या तिन्ही ठिकाणी ठाव घेणाऱ्या दामिनेप्रमाणे ही ह्या जनार्दनाने निर्माण केलेली भगवी ध्वजा तिन्ही लोकांचा ठाव घेणार होती. बाबाजीने त्यांच्या कार्याची महिमा जास्तीत जास्त ह्याच वेरुळ नगरीत रेखाटली होती. बाबाजींच्या शिवनिर्मीती अवताराची मुख्य मुळे ह्याच वेरुळ नगरीत दडलेली होती.तेथूनच त्या मुळांचा प्रसार होऊन अवघ्या भारत भूमित त्या भक्तींच्या मुळांच्या शाखा पसरल्या होत्या त्या बाबाजींच्या भक्तीच्या मुळांची मी काय वर्णन करु? बाबाजीने निर्माण केलेल्या धार्मिक कार्याचे मुख्य कार्यालय हे त्या घृष्णेश्वराच्या वेरुळ नगरीतच होते. ह्याच वेरुळच्या पूण्यवान नगरात बाबाजींची संकल्पीत समाधी स्थापन करण्याचे श्रेय श्री शांतीगिरी महाराजांनी यशस्वीपणे पूर्ण केले ज्या वेरुळच्या पूण्यवान नगरात बाबांचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरीजींनी न भूतो न भविष्यती असा विश्वशांतीधर्म सोहळा मोठ मोठ्या संत दर्शनाने साजरा केला व ह्याच ह्या बाबाजींच्या आवडत्या वेरुळ नगरीत सध्या त्यांचे कार्य यशस्वी पार पाडणारा, साऱ्या जगाचे लक्ष वेधून घेणारा, अवघ्या सृष्टीला वेरुळनगरीकडे बघण्यास लावणारा, संपूर्ण विश्वात शांतिसाठी व धर्माचे रक्षण करण्यासाठी विश्व शांतीधर्म सोहळा यशस्वीपणे पार पाडणारा तद्नंतर १००८ महामंडलेश्वर पदवी धारण करणारा, साक्षात देवाचाच अवतार असणारा, बाबाजींच्या आवड्त्या गावी पर्यायाने लाखलागावी पुण्यवान फुलामातेच्या उदरी जन्म घेणारा व सर्वांत महत्वाचे ह्या बाबजींचे उत्तराधिकारी पद भूषवणारा देवावतारी पुरुष स्वामी शांतिगिरीजी महाराज आहे.

ह्या जगद्गुरु जनार्दन स्वामींनी त्यांच्या कार्याची सुरु झालेली सर्वात प्रथमची शाखा प्रभू रामचंद्राच्या चरणाने पुनीत झालेल्या नासिक भूमीतील (युवला तालुक्यातील) अंदरसूल या गावी आहे व सध्या ह्या तपसाधना जागेत स्वामींच्या कार्याची धूरा सांभाळण्याचे कार्य परमानंदगिरीजी महाराज करता आहेत. त्याच वेरुळ नगरीतील भक्तीची एक शाखा म्हणजे शिवपुरी आश्रम म्हणता येईल. कारण शिवपुरी आश्रम हा बाबांचा सर्वात आवडता व अखेरचा आश्रम आहे. अशा ह्या खडकाळ वस्तीत वसलेल्या ह्या शिवपुरी आश्रमात स्वामींचे कार्य करण्याची जबाबदारी सेवागिरीबाबा बघता आहे. नतंर शाखा जोराने उगली ती नांदगांव तालुक्यातील निमगावात ज्या ठीकाणी आज भोलेगिरी बाबा उत्तराधिकाऱ्यांच्या आशिर्वादात्मक प्रेरणेने स्वामींनी संकल्प केलेले रुद्रायेश्वर मंदीर बांधत आहेत.

माधव म्हणजे साक्षात भगवान श्री कृष्ण व श्रीकृष्णाने जशी त्यांची हस्तीनापुरची भूमी सांभाळली तशी स्वामींच्या महानिर्वाणाची भूमी सांभाळण्याचे कार्य स्वतः माधवगिरीबाबा तपोवनात नासिक येथे करत आहे.

अरे जा तु जिथं जाशील तिथं रमशील असे बाबाजी ज्या भक्ताला फार मोठ्या

अभिमानाने म्हणाले होते असे रमेशगिरीबाबा स्वतः जातीने स्वामींच्या समाधी स्थळी कार्यरत आहे. भक्तहो ह्या बाबांच्या भक्ती शाखांचे काय वर्णन करु.

प्रत्येक झाडाचे मुळ हे सर्वांत महत्त्वाचे असते व स्वामींच्या भक्तीच्या वृक्षाचे मुळ हे वेरूळ नगरीतच दडलेले आहे व स्वामीजी आत्ताशी खरोखर मुळावर कार्यकरण्यासाठी त्या मुळाच्या वेरुळ नगरीत आले होते. घृष्णेश्वराच्या दक्षिणेला भरपूर ओसाड जागा पडलेली होती त्याच ओसाड जागेत आपण भगवान शिवाचे सिध्देश्वर नामक शिवालय बांधून अशी योजना त्यावेळी बाबांच्या डोक्यात आली त्या जागेत मोठ मोठे खड्डे व जिर्ण झालेल्या समाधी कशा बशा परिस्थितीत उपस्थितीत होत्या बाबाजींनी घृष्णेश्वराच्याच पुजाऱ्याकडून ती जागा विकत घेतली व ठरल्याप्रमाणे जमलेल्या भक्तजणांनी श्रमदानास सुरवात केली. भक्तांनी फार मनपूर्वक कार्य करण्यास सुरवात केली कारण त्यांना ठाऊक होते की , बाबाजींना श्रमदान फार आवडते व श्रमदान केल्याने बाबा जन्मभर पुरेल असा आशिर्वाद प्रसाद म्हणून देतात. भक्तांनी सुरवातीचे आठ दिवस जागा व्यवस्थित करण्यासाठी कष्ट घेतले. तो पर्यंत स्वामींचा मुक्काम स्वतः शंकरजींच्या घरात होता म्हणजे घृष्णेश्वराच्या मंदिरात होता. बाबांच्या अशा परिस्थितीत नित्यक्रम टळलेला नव्हताच. जागा पूर्ण चांगली झाल्यावर बाबा शिष्यांना म्हणाले आता आपण येथे एक कुटीया बांधू भक्तांना मात्र ती जागा कुटीया बांधण्यासाठी योग्य वाटतच नव्हती कारण आतापर्यंत ती जागा केवळ भूतवस्ती किंबहूना स्मशानभूमी म्हणून ज्ञात होती पण त्यांना ह्या म्हाळसाईलेकराची ताकदच माहीत नव्हती , तरीदेखील अशा जागेवर स्वामींना कुटीया बांधायचे ठरवले होतेच. वाचकांनो तुम्ही आम्ही जेथे राहतो तेथे एक भव्य दिव्य बंगला असतो, चांगल्याप्रतिचे सिमेंट , विटा,दगड घालून तयार केलेले घर असते. ज्या घरात ह्या हौशी व विलासी मनाला अजूनच लालसा उत्पन्न करणाऱ्या आशादायक वस्तू असतात. परंतु आपल्या बाबाजींनी वेरुळच्या त्या दक्षिण भूमित साध्या गवती पानांची आणि सध्याच्या युगात सर्वांत गौन समजल्या जाणाऱ्या व मध्यम घरात बाहेरचे पाय पुसण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या बारदानाची कुटीया केली व त्या कुटीयात त्यांनी आपल्या सारख्या हौशी वस्तू न ठेवता भागवत,पुराण,गीता,विधी ठेवली, नागाबाबांचे मंत्रपथक ठेवले ते कायम जग कल्याणसाठी उपयोगात येणारे होते. ह्याच जागेत पूर्वी भगवान सदाशिवाचे पुरातन देऊळ होते पण काळाच्या ओघात व बदलत्या दुनियेत त्या शिवालयाची पूर्णपणे पडझड झालेली होती आता त्याच जागेत बाबांना शिवालय बांधून साक्षात्कार झालेल्या सिध्देश्वराचा जिर्णोध्दार करुन प्राणप्रतिष्ठा करायची होती. असे सांगितले जाते की यापूर्वी एकदा पार्वतीमाता पती शंकरावर रागवल्या होत्या व शेजारच्या टेकडावर जाऊन विराजमान झाल्या त्यांच्या खुशीसाठी स्वतः भगवंत माता पार्वतीकडे गेले व त्यांचा राग शांत करुन आपल्यावर अनुनय करावा यासाठी सिध्द झाले म्हणून तेथे सिध्देश्वराची पिंड होती. त्याच सिध्देश्वराच्या स्थापनेसाठी बाबाजींनी घृष्णेश्वराच्या

समोरील दक्षिण बाजूस कुटीया बांधली होती. किती पुण्यवान असेल ते ठिकाण, मी भाग्य समजतो त्या लोकांचे, त्या वेरुळ नगरीचे, तेथील पाना फुलांचे, तेथील किलबिल करणाऱ्या पक्षांचे, तेथील वसंताचे आगमन सुस्वरात करणाऱ्या कोकिळेचे, तेथील फुलांचा मधुमध टिपणाऱ्या नाजूक साजूक फुलपाखरांचे. मी भाग्य समजतो त्या नदी – डोंगर नाल्यांचे. त्या शेतात उगवणाऱ्या पिकांचे व त्याच त्या वेरुळ नगरीचे. ज्या ठिकाणी आता एकाच वेळी एकाच शिवाचे तीन अवतार नांदत होते. स्वामींच्या नवनिर्मिती सिध्देश्वर शिवालयाची चर्चा अवघ्या मराठवाड्यात पशुपक्षांच्या किलबिली प्रमाणे पसरली अनेक भक्तमंडळी बाबाजींच्या श्रमदान करणाऱ्या सातत्य कार्यात एकत्र येऊन मिसळले होते. दहेगांव, अंदरसुल, कोठखोडे, करंजगाव, टापरगाव, जातेगाव, वाकला इत्यादी गावातील बरीचशी मंडळी सुरवातीपासून वेरुळ नगरात उपस्थित झाली होती, आता वेरुळ, वैजापूर, औरंगाबाद, लासूर व अवघ्या मराठवाड्यात पु. बाबाजींच्या महिमा पसरु लागली होती. त्यामुळे भक्तजणात बरीचशी वाढ झाली होती. बाबाजींनी श्रमदान करता–करता अनेक रोग्यांना रोगांपासून मुक्त केले, अनेकांना वंशाला दिवा दिला, अनेकांना तारले व त्याच कारणामिमांसाने येणाऱ्या भक्तजणात विलक्षण वाढ झाली होती व सिध्देश्वराच्या शिवालयाचा पाया घेण्यात सुरवातही झाली होती.

अशा परिस्थितीत एक अत्यंत यथायोग्य गोष्ट घडली, त्याच त्या वेरुळ नगरीत एक जोशी काकू नावाची प्रख्यात व सर्वसामान्य स्त्री वास्तव्य करीत होती. काही नैसर्गिक पूर्ततेच्या आभावामुळे अथवा शारिरिक दोषामुळे ह्या भाग्यवान स्त्रीस मुलबाळं होत नव्हतं, तिच्या कुळाचे अंतिम कार्य करणारा कुणी उत्तराधिकारी नव्हता, तिच्या मनात पेटलेल्या आगीस विझवणारा कुणी चिरंजीवी नव्हता, हृदयात वाढणारी स्पंदने हसत मुखाने शांत करणारा कुणी जनार्दन नव्हता, आई म्हणून हाक देणारा कुणी पुत्र नव्हता, नजरेला दिसणारा कुणी कौशल्यापूत्र प्रभू श्रीराम नव्हता किंबहूना खोडकर खोडी करुन मावशीस थकवणारा कुणी बाळकृष्ण नव्हता अशा त्या मुलासाठी आधीन झालेल्या पतिव्रता स्त्रीस जेव्हा समजले की आपल्या वेरुळ नगरीत कुणी मोठा साधू आला आहे, जो सिध्देश्वराच्या शेजारी व घृष्णेश्वराच्या नजरी बारदानाची कुटीया करुन राहतो व ज्या बाबाने अंदसुलात १२ वर्षे तप केले आहे व ज्याने आता नुकतेच जातेगाव पहाडावर भगवान पिनाकेश्वराचे शिवालय बांधले आहे. आज तोच आपल्या वेरुळ भगवान सिध्देश्वराच्या जिर्णोध्दारासाठी आला आहे. ही सर्व माहीती त्या पुण्यवान सामान्य स्त्रीस कळाली आपल्याला काही तरी आशिर्वाद देईल अशी आशा व्यक्त करणारी ती माऊली जनार्दन स्वामींकडे जाण्याच्या विचारात होती मनात मुलबाळ होण्याची जबरदस्त आशा होती, भावात भक्ती होती, हृदयात भगवान शिवचीच मूर्ती होती. सर्वस्व अर्पण करणारी ही माता माऊली स्वामी जनार्दनांच्या कुटीयासमोर येऊन उभी राहीली. तिच्या डोक्यावर पदर होता, अंतःकरणात ईश्वर सेवा

दडलेली होती, मनात पतीचा आदर होता. अशी ती भारतीय संस्कृतीचे प्रतीक ठरणारी माऊली आता स्वामींच्या कुटीयाच्या उजव्या बाजूला बसली होती व स्वामींना म्हणाली,

बाबा मला मुलबाळ नाही, स्वामी तुम्ही मला आशिर्वाद देऊन माझ्या कार्याचा सांभाळ करणारा कुणी वाली द्या, तुम्ही जे दान मागाल ते मी तुम्हास भक्तीभावाने अर्पण करेल.

बाबांना त्या माऊलीच्या प्रत्येक शब्दात मातेची ममता दिसली व स्वतःच्या म्हाळसाईची आठवण आली. बाबांनी नागाबाबासारख्या गुरुंनी दिलेल्या विभूतीमंत्राचा अवलंब करुन विभूती त्या माऊलीस मंत्र मारुन दिली व म्हणाले,

'बाई बाबावर भाव ठेव बाबा तुला नक्की आशिर्वाद देईल. बाई ते सारं देवाच आहे, देव बरोबर सारं साभाळून घेतो.'

विभूती घेऊन ती माऊली घरी परतली, वाचकांनो एक लक्षात ठेवा , देव नेहमी भावेचा, श्रध्देचा, आत्मविश्वासाचा भूकेला असतो. त्या माऊलीने शिवशंकराची मनःपूर्वक पूजा केली व स्वामींनी दिलेली ती रक्षा स्वामींचा आशिर्वाद समजून मोठ्या भावेने प्राशन केली.

दिवसामागून दिवस त्या वेरुळच्या भूमितून निघून गेले. स्वामींनी इच्छिलेल्या घृष्णेश्वराचा पाया संपूर्णतः पूर्ण झाला. भावाने, श्रध्देने बरीचशी जनता त्या जनार्दनाच्या पाठीमागे सिध्देश्वराच्या शिवालयासाठी राबू लागले, श्रमदान करु लागले, लाल रंगाचा दगड मंदीरासाठी लांबून –लांबून त्या घृष्णेश्वराच्या दक्षिणेस आणू लागले. अशाच रितीचे दिवसामागून दिवस त्या जोशीकाकूंच्या जीवनातून कालक्रमण करु लागले, तिच्या जिवनातील नऊ मास नऊ दिवस एकामागून एक असे निघून गेले व निसर्गाच्या नियमानुसार त्या पतिव्रता स्त्रिस पुत्ररत्नाचा लाभ झाला. काय चमत्कार झाला जरा लक्षात घ्या, लग्न होऊन नऊ दहा वर्ष झाले होते तरीही अद्याप पुत्ररत्न नव्हता परंतु स्वामींच्या ह्या विभूतीने तिला आता पुत्ररत्नाचा लाभ झाला होता त्या माऊलीस इतका आनंद झाला की तिचा होणारा आनंद त्या स्वामींच्या बारदानी कुटीयात सुध्दा मावेनासा झाला. प्रसूत होऊन दोन महिण्याच्या अंतराने ती माऊली तिच्या पुत्राला घेऊन पतिसह स्वामींकडे गेली व स्वामींना म्हणाली.

बाबा, माझी कुटीयासमोरची जागा आहे व नाथनाल्याच्या आसपासची जागा आहे, ती मी तुम्हाला दान म्हणून देते, स्वामी ही जागा मी तुम्हाला नव्हे तर आपल्या सर्वांच्या सिध्देश्वराला देते, म्हणून देवासाठी दिलेले दान तुम्ही आनंदाने स्विकारावे ही माझी इच्छा आणि बाबा भक्ताची इच्छा मोडू नका.

परंतु बाबाने कधीच कुणाचे फुकट घेतले नाही, जरा लक्षात घ्या बाबांचा महिमा! बाबांनी त्या भाग्यवान स्त्रीस काही रुपये हे बाबांचा आशिर्वाद म्हणून दिले व जमिन घेतली.

आता तर बाबांचे आश्रम व गुरुकूलांचे स्वप्नही पूर्ण होणार होते. बाबांची इच्छा होती की गोरगरीबांसाठी आश्रम बांधावे, ज्यांना कुणी नाही असे ईश्वरी लेकरे त्या आश्रमात राहतील, बाबांना गुरुकूलांची विलक्षण ओढ होती त्यांना वाटायची की अनेक गोरगरीबाचे मूल हे बुध्दीने हूशार असतात परंतु परिस्थितीने कमजोर असतात, असे मुलं काळाच्या ओघात संपुष्टात येतात. अशा बालकांना गुरुकूले बांधावे त्यांना योग्य शिक्षण द्यावे , माझ्या गुरुकूलातील एक – एक विद्यार्थी हा सैनिक व्हावा, हा डॅक्टर व्हावा, इंजिनीअर व्हावा, समाजास घडवणारा शिक्षक व्हावा व हीच इच्छा आता त्या वेरुळी नगरीत पूर्ण होणार होती. बघा बाबा नेहमी म्हणायचे बाबाहो देवाचे काम देवच सांभाळून घेतो व हीच परिस्थिती आता त्या वेरुळच्या भूमित सत्य रुपाला आली होती. असे म्हणतात ना –

**जगाच्या कल्याणी संताच्या विभूती**
**व संताच्या कार्यी जगाची संमती ।।**

आता ह्या जगाने ह्या संताच्या कार्यासाठी संपूर्ण संमती दिली होती व ह्याच उक्ती प्रमाणे काही भक्त सिध्देश्वराचे शिवालय उभारीत होते तरी काही भक्त त्या स्त्रीने दिलेली जागा शेतीसाठी योग्य करीत होते अशातच काही जण बाबांचे संन्यासी शिष्य बनत होते व संपूर्ण आयुष्य ते बाबाजींच्या चरणीच अर्पण करीत होते. आता बाबाजींच्या कार्याला विलक्षण वेग आला होता. स्वामींनी निर्माण केलेली ही भक्तीभावाची रेल्वे त्या वेरुळ नगरात फार मोठ्या वेगाने धावू लागली होती, अशाच ह्या परिस्थितीत उपसरपंचानी बाबास शृंगार नाल्याची जमीन दान केली, पण आपले बाबाजी कधीच फुकट वस्तू घेत नव्हते कारण ते म्हणायचे फुकटच्या जागेचे महत्व माणसाला कधीच कळत नाही म्हणून बाबांनी ठराविक मोबदला देऊन तीस बत्तीस एकर जमीन आपल्या कार्यास जोडली व जमिन घेण्याचा नित्यक्रम बाबाजींनी अखेरपर्यंत असाच चालू ठेवला. शृंगार नाल्याचा परिसर अत्यंत कठीण होता. जातेगावचा परिसर जसा वाढत्या क्रमाचा व खडतर वाटेचा होता तसाच हा शृंगार नाल्याचा परिसर मात्र उतरत्या क्रमाचा बिकट रस्त्याचा होता. ह्या खडतर नाल्याच्या परिसरात बाबाजींनी त्यांच्या शिष्याची योग्यतेची चाचणी घेतली होती जुन्या अनुभवी शिष्यांच्या सांगण्यावरुन ह्याच खडतर नाल्यातून रात्री–अपरात्री जाऊन बाबाजी सेवा फक्त बाबु महात्म्यांनीच केली जे बाबु महात्मे आज स्वामींचे उत्तराधिकारी पद पू. शांतिगिरी महाराज नावाने सांभाळत आहेत व तेच ह्या नाल्यातील शिष्य चाचणी यशस्वी ठरणारे कृपापात्र शिष्य म्हणून अवघ्या विश्वात गाजले आहे. काही उपजत लोकांच्या सांगण्यानुसार असे म्हणतात की ह्या शृंगार नाल्यात पूर्वी भगवान शिवाची सौभाग्यवती माता पार्वती हीने भक्तांच्या परिक्षेसाठी भिल्लीनीचे रुप धारण केले होते व त्याच त्या भिल्लीणीच्या रुपासाठी त्यांनी ह्या नाल्यात शृंगार केला होता. म्हणून बाबाजींनी त्या जागेस शृंगार नाला असे नामकरण केले आहे, असा त्या पुण्यवान जागेचे महात्मे बाबांनी त्यावेळी

त्या शिष्यांना सांगितले होते. भूदान करणाऱ्या व्यक्तीला इतके पुण्य मिळते की ते त्याच्या पिढीला सुध्दा ते कामे येते. त्यावेळी बाबांनी त्यांच्या कृपापात्र शिष्यांकडून यथायोग्य श्रमदान करुन ती जागा चांगली केली त्या कडीकपारी धारण केलेल्या जागेत स्वामींनी आलिशान शेती तयार केली, स्वामींनी शिष्यांना वेळोवेळी हवे तसे मार्गदर्शन करुन, असेल नसेल त्या संकटांना दूर करुन तेथे सुबक अशी जमीन तयार केली जशा एखाद्या नरकात स्वर्ग तयार करावा , तशा ह्या वेरुळ नगरीत स्वामींनी भारताचे सुंदर टोक म्हणून संबोधले जाणारे काश्मिरच तयार केले होते. ह्या मृत्यूलोकांत जन्म घेऊन मानवी मनाला मनपसंद वाटणारा जसा नंदनवन परिसर तयार करावा. तसाच परिसर स्वामींनी ह्या वेरुळात तयार केला होता. मनाला सुखाची हवा घालणारा असा हा निसर्ग रम्य परिसर आयुष्य भरासाठी कायमचे सुख देणारा संजिवनी ठरावा असाच परिसर बाबाजींनी त्या वेरुळ नगरीत तयार केला होता. असा त्या शृंगार नाल्याच्या पूण्यवान भूमीत स्वामींनी वेगवेगळी भक्तीची झाडे लावली होती व पुढे इ.स. १९७० नंतर त्या झाडांची जोपासना करण्याचे कार्य त्यांच्या उत्तराधिकाऱ्यावर म्हणजे शांतिगिरींवर सोपण्यांत आली होती व आजपर्यंत स्वामी शांतिगिरींनी योग्य रितीने त्या जनार्दनांच्या शांतीच्या वृक्षाची जोपासना केली.त्या जोपासलेल्या शांतिच्या वृक्षास आज किती शातींची फुलं उमलेली हे तुम्ही शांतीची फुलं या कादंबरीतून वाचतच आहात व ही कादंबरी लिहीणारा मी ही एक त्या स्वामी शांतिगिरी महाराजांनी जोपासलेल्या वृक्षांच्या फुलातील एक फुलं आहे. आता हयाच वेरुळ नगरीला ह्या जनार्दन स्वामींनी नाथनाला व शृंगारनाला सजवून राजमुकुटच चढवला होता आता तोच राजमुकूट त्या वेरुळ नगरीत ह्या घृष्णेश्वराच्या दरबारात उगणाऱ्या सुर्यांच्या किरणांनी चमकत होता. हा सारा खेळ त्या सिध्देश्वराच्या साक्षात्काराचाच होता. स्वामींनी संकल्प केलेल्या सिध्देश्वराच्या शिवालयाचे कार्य आता वेगाने सुरु होते त्याचबरोबर नाथनाल्याकडे व शृंगारनाल्याकडे जमीन व्यवस्थीत करण्याचे कार्यही त्याच गतिने कार्यरत होते. स्वामींचे शिवालय बांधण्याचे कार्यच हे अपूर्व होते. स्वामींचे मंदीरे उभारण्याची पध्दतच फार वेगळी होती. त्यांनी शिष्यांना सांगून लाल खाणीतून दगड काढण्यास सुरुवात केली खाणीतून दगड काढतांना ते स्वतः खाणीच्या टोकाजवळ जाऊन बसत होते त्यांना वाटायचे दगड काढतांना माझ्या शिष्यांना काहीच होऊ नये , माझे शिष्य पूर्णतः व्यवस्थित रहावे त्यांची जबाबदारी ही माझ्यावर आहे त्यांना पूर्ण काम होईपर्यंत दगडांमुळे काही इजा होऊ नये म्हणून स्वामी स्वतः तेथे उपस्थित असायचे , श्रमदान करता करता बाबा क्षणोक्षणी शिष्यांना मदत करायचे, क्षणोक्षणी त्यांना साक्षात्कार दाखवून कार्यासाठी उत्तेजन दयायचे विशेष म्हणजे बाबाजीची पालखी जेव्हा रस्त्याने जायची तेव्हा रस्त्यावरील साप, विंचू बाबांच्या दर्शनासाठी काही वेळ थांबायचे व काही करता निघून जायचे अंदरसुलवासी भक्तांसह चारीधाम करतांना बाबांनी जणू भविष्यात बांधणाऱ्या शिवालयाचे शिल्प मनामध्ये तयार

केले की काय पण स्वामींनी तयार केले शिल्प हे खरोखर विलोभणीय वाटायचे. स्वामी स्वत: वास्तूशास्त्रज्ञ होते की काय ? हे मला माहित नाही. परंतु १९६९ मध्ये सिध्देश्वराचे मंदिर बांधतांना स्वामी स्वत: एक-एक दगड पारखून घेत होते. सर्व प्रथम दगड काढणाऱ्या खाणीजवळ ते जाऊन विधीनियमानुसार पुजा आर्चा करत असायचे व नंतरच त्याची सुरूवात करायचे. डोईवर जटा,अंगात कफनी, बसण्यासाठी बारदान, पायात लाकडी खडवा, चेहऱ्यावरील हनुवटीवर दाढी, इतका सतेज चेहरा बघून भक्त प्रसन्न व्हायचे व आनंदाने श्रमदान करायचे, बाबाजींचे उपदेश ऐकायचे ह्या संतांची महिमा नेहमीच अपार असते परंतु काहींना संताची महिमा फार उशिरा कळते. तो पर्यंत संत आपल्यातून निघून गेलेले असतात. परंतु ज्या भक्तांना संताची महती योग्य वेळी कळली होती ती भक्तजन स्वामींच्या सिध्देश्वरासाठी अहोरात्र कष्ट घेत होती. बाबाजीची पालखी आता मंदीराकडून शेतीकडे धावू लागली. जसजसे सिध्देश्वराचे कार्य पूर्ण होत आले तस तसे बाबाजी दान दिलेल्या शेतीकडे वळू लागले होते. एकीकडे श्रमदानातून शिवालयाचे काम कळसापर्यंत येऊन ठेपले होते तर दुसरीकडे उजाड माळरानावरील जमिनीत भक्तीचे फुलं उमलत होते. वेगवेगळ्या परिसरात बाबांच्या विहीरी पाण्याने भरुन येत होत्या, भक्त पाईप लाईन करुन शेतीस त्या पाण्याचा पाठपुरावा करत होते, त्या शेतीतून येणारे उत्पन्न गोरगरीबांसाठी भविष्यात बांधल्या जाणाऱ्या गुरुकूलासाठी उपयोगात आणले जाणार होते, बाबाजी एकेक कार्य हाती घेत होते व हाती घेतलेले एकेक कार्य तेवढ्याच गतीने पूर्ण होत होते.

आता सिध्देश्वराचे काम पूर्ण होत आले होते, मात्र त्या दिवशी बरेचसे भक्तगण बाबाजींजवळ बसले होते व त्यादिवशी काही तरी घटनेमुळे बाबाजींनी मंदीराचे व शेतीचे सर्वंच कार्य बंद ठेवले होते. साधारणत: ही गोष्ट मार्च १९६९ मधील असावी बाबाजी आता भक्तांना प्रवचानातून उपदेश करणार होते बरेचसे शिष्यगण बाबाजी जवळ बसले होते तर बरेचसे समोरही बसले होते. आता बाबांनी प्रवचनास सुरुवात करणार तितक्यात, एका भक्तास बाकीचे शिष्यगण बाबाजीकडे पळतच घेऊन आले.सगळीकडे गोंधळ चालू झाला.सर्व जण त्यांनी आणलेल्या व्यक्तीकडे घाई-घाईने बघण्यासाठी धावून जमा होऊ लागले बाबाजी डोलीतून बोलले, 'अरे जागेवर जा, बाबाहो, काही नाही झालं त्याला, तो आता बाबाजीकडे आला, बाबा कुठ नाही जाऊ देणार त्याला, जा तुम्ही जागेवर बसा.'

बाबांचा आदेश ऐकताच जो-तो ज्याच्या त्याच्या जागेवर रवाना झाला बाबांनी त्यांना विचारले, काय रे बाबा काय झालं त्याला? त्यातला एक जण कविलवाणे तोंड करून म्हणाला, 'काही नाही त्याने काठी समजून सापच हातात धरला आणि म्हणून त्या सापाने त्याला चावलं.'

बाबा म्हणाले, 'सोडा त्याला, ये बाबा ती माती गे बरं खालची जरशीक.' त्यातला एकाने घाई -घाईने ती माती बाबांच्या हातावर ठेवली. बाबांनी तो हात कपाळी

लावला व नंतर ती माती त्याला ज्या ठिकाणी संर्पदंश झाला त्या ठिकाणावर लावली आणि त्याच्या कपाळावर लावली व त्याला म्हणाले,

'ए बाबा म्हणं , नागा बाबा की जय तो म्हणाला नागा...बाबा.....की ......जय' व दोन मिनीटे बाबांच्या पायथ्याशी झोपला, सारे प्रवचन एकायला सज्ज झालेले भक्त जण त्या सर्पदंश झालेल्या व्यक्तीकडे टक लावून पाहत होते.

बाबंनी त्याच्या डोक्यावर हात ठेवला व म्हणाले, 'अरे उठ.'

तो तात्काळ उठला व जोरात बोलला,

**श्री जनार्दन बाबा की जय,**

**नागा बाबा की जय,**

**सिध्देश्वर भगवान की जय.**

साऱ्या भक्तांना बाबांचा महीमा कळाला व त्या व्यक्तीला बाबाजींनी नीट केल्याने त्याला कळसाला टिपल्या इतका आनंद झाला. आता स्वामींनी प्रवचनास सुरवात केली.

''बाबाहो आपलं देऊळ आता पुरं होतं आलं आहे, त्याचा कळसच आता राहिला आहे. तो झाल्यावर अक्षय तृतीयाच्या दिवशी आपण ब्राम्हणवृदांच्या हातून त्याची प्राणप्रतिष्ठा करु त्यानंतर त्या दिवशी आपण आपल्या सिध्देश्वराच्या देऊळापुढे अनुष्ठानाला बसु, सात दिवस ज्याला अनुष्ठानाचा पुण्यलाभ घ्यायचा असेल त्याने बसा ......ज्याला नसेल बसायचे त्याने नका बसू.''

बाबांच्या अनुष्ठानाचा महिमा सर्व शिष्यांना जातेगांव येथील गुढीपाडव्याच्या अनुष्ठानापासून चांगलाच कळालेला होता म्हणून

बाबाजींनी त्यांना त्यादिवशी अनुष्ठानाविषयीचे जास्त माहिती न देता बाबाजी पुढे म्हणाले, ''कधी पण साधूची सेवा करायला माग पुढ पाहू नये. कधीच कुणाची निंदा करु नका, कुणी जर तुम्हाला बोलला तर त्याला उलट बोलु नका, एखाद्याने तुमच्यावर अन्याय केला तर तुम्ही त्याच्यावर धावून अन्याय करु नका, कुत्रा जर तुमच्या पायाला डसला तर त्याच्या काय तंगड्याला डशीता काय? नाही कोणाचा सन्मान करता नाही आला तर त्याचा अपमान पण करु नका, देवालाच भजा फक्त, देवाला जे आवडतं ते त्याला द्या, विष्णूला तुळशीचं पान आवडतं , त्याला तुळशीचे पान वाहा. शिवाला बेलाचं पान आवडतं, त्याला बेलाचं पान वहा. ज्यानं विष्णूला तुळशीचं पान वाहिलं त्याचे पाप नाश झाल्यासारखंच समजा व जो तुळशीची माळ गळ्यात घालतो त्याला पुन्हा पृथ्वीवर राहायला मिळतं, कधीही द्यायचं शिका बाबाहो. देता –देता देव आपल्याला काय देईल याचा नेम नाही. कोणाला काही द्या याच्यातच आनंद माना ,कोणाचं काही घेण्यात नेहमी दुःख माना, ज्याच्या ईच्छा पूर्ण होतात तो परमार्थ आणि ज्यांच्या इच्छा अपूर्ण रहातात तो स्वार्थ, सारं परमेश्वराचेच म्हणा माझं–माझ काही म्हणू नका.

मी माझे म्हणती।
अवघड आहे सांगू किती ॥

देवाची भक्ती मनापासून करा, जो ज्या देवाची भक्ती करतो तो देव त्याच्याकडे जातो, उठल्या बरोबर ऑफीसला जायची तयारी करतो. पँट घालतो, थाटमाट करतो.... मग देवाची पूजा करायला काय व्हतं. ऑफीसला नाही गेला तर तडाखा, मग देवाला नाही जमले तर देव नाही का देणार तडाखा देवाची सेवा करायची असेल तर भागवत वाचा, भागवत सारं काही आहे. देवाला पाहून घ्यायचं असेल तर भागवत वाचत जा. भागवतात काय निघेल याचा पत्ता नाही. जे तिन्ही लोकांत आहे ते भागवतात आहे पण जे भागवतात आहे ते तिन्ही लोकांत नाही म्हणून भागवत वाचा कारण तुकाराम महाराज नेहमी म्हणायचे

गीता भागवत करीती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे।
तुका म्हणे मज घडो त्याची सेवा। परि माझ्या देवा पार नाही॥
गीता भागवत नसे शास्त्र त्रिभूवनी नाही निश्चित ॥

म्हणून सांगतो बाबाहो देव करा, सारं सुख लाभल तुम्हाला.'' अशा अनेक विषयावर चर्चा करुन बाबाजींनी त्यादिवशी प्रवचनास पूर्ण विराम दिला. बाबाजींचे प्रवजन आजन्माचा सोबती म्हणून घेऊन प्रत्येक भक्त घरी गेला. बाबाजींनी नित्यनियमाप्रमाणे कार्य झाल्यावर स्नान केले विधी वाचून कूटीयामध्ये ध्यानासाठी जाऊन बसले.

दुसऱ्या दिवसापासून बाबाजींच्या आशिर्वादाखाली पुन्हा शिवालयाचे काम सुरु झाले. बाबांच्या शिवालयाची प्रतिमा आता अवघ्या राज्यात पसरु लागली होती. त्याचमुळे ठिकठिकाणी बाबाजींचे प्रवचनाचे कार्य सुरु झाले. वेगवेगळ्या गावातील भक्तजण स्वामींना कार्यक्रमासाठी नेऊ लागले. स्वामीही आनंदाने तेथे जाऊ लागले, प्रवचने देऊ लागले, प्रवचनातून जगण्याचा उपदेश करु लागले व उपदेश करता करता धर्माचा, भक्तीचा, प्रसारही करु लागले व नुकत्याच परकीयांच्या जबड्यातून सुटलेल्या भारतास योग्य असे मार्गदर्शनही करु लागले. प्रवचनाला गेल्यावर बाबाजी भक्तजनास मार्गदर्शन देत होतेच परंतु त्यांना साक्षात्कार दाखवून तारतही होते. तारता-तारता कधी -कधी स्वामी त्यांना मायेने जवळही घेत होते, त्यांच्यावर एखाद्या आईप्रमाणे मायाही करत होते. व ह्या स्वामींच्या कार्यामुळे हजारो भक्त स्वामींचे शिष्य होऊन श्रमदान करत होते. अशा प्रकारे इ.स. १९६९ च्या अखेरीस स्वामींनी सिध्देश्वराचे शिवालय संपूर्णतः तयार केले होते. त्याचा जिर्णोध्दार झाला होता परंतु प्राणप्रतिष्ठा बाकी होती. स्वामींनी पंडीत काका वाकल्यांचे यांचे सोबत नांदगाव येथील गोविंदबाबा व बाजीरावबाबा यांना संगमरवरी नंदी व पिंड आणण्यासाठी जयपूर येथे पाठवले त्यांनी हवी तशी पिंडही आणली होती आता वेरुळात पिंडीची प्राणप्रतिष्ठेची व जपानुष्ठानांची तयारी एकाच वेळी सुरु झाली होती. स्वामींनी पिंड अजून प्रतिष्ठेत आणली नव्हती तत्पूर्वी ते अनुष्ठनाची तयारी व्यवस्थित करीत होते, बरेचसे भक्त अनुष्ठनास

बसण्याच्या तयारीत होते. अक्षयतृतीयेचा दिवस उजाडला होता. ठरल्याप्रमाणे अगोदर सिध्देश्वराची प्राणप्रतिष्ठा होणार होती. व तदनंतर अनुष्ठानास बसण्याची संमती मिळणार होती. प्राणप्रतिष्ठेच्या विधीसाठी खास त्र्यंबकेश्वर व नाशिक येथून ब्राम्हणांस निमंत्रण दिलेले होते व त्यांचेही आगमन त्या घृष्णेश्वराच्या दरबारी झालेले होते. स्वामींच्या नियोजनाप्रमाणे सर्व नियोजन झाले होते. ब्राम्हणवृंद आले स्वामींच्या सांगितलेल्या वेळात त्या घृष्णेश्वराच्या दक्षिण बाजूस सिध्देश्वराची प्राणप्रतिष्ठा फार मोठ्या दिमाखात पार पडली, प्राण प्रतिष्ठा झाल्यावर सर्वांनी जोराची घोषणा दिली.

**बोला सिध्देश्वर भगवान की जय**
**जनार्दन बाबा की जय**
**नागा बाबा की जय**
**पिनाकेश्वर भगवान की जय**
**नर्मदामाता की जय**

जशा ह्या गजरात सिध्देश्वरांची प्राण प्रतिष्ठा झाली तशाच त्या गजरात स्वामींना दान मिळालेल्या परीसरात भक्त जण अनुष्ठनास बसले. बरीचशी भक्तमंडळी त्या नाल्याशेजारी व शृंगारनाल्याशेजारी अनुष्ठनास बसले. नित्यक्रमाने सकाळी-सकाळी प्रवचन व्हायचे, तदनंतर फराळ, स्नान-जप व पुन्हा स्नान करुन बाबाजींचे प्रवचन व्हायचे, अनुष्ठान होऊन बाबाजी रात्रीचे प्रवचन झाल्यावर पुढील कार्याची महीमा मनातल्या मनात आखू लागले होते व मनात ठरवलेही होते. तो दिवस अनुष्ठानाचा सहावा दिवस असावा , सर्व शिष्य मंडळीजप करण्यास मग्न झाली होती. कारण कालच्याच दिवशी बाबाजींना सांगितले होते की भगवान कृष्ण अर्जूनास रणांगणावर सांगतात.

**यज्ञदान तप : कर्म न त्याग्यं कार्यमेव तत् ।**
**यज्ञी दानं तपश्चैव पावमानि मनीषिणाम ॥**

याचाच मतिदार्थ असा सांगतात की हे भरतश्रेष्ठ अर्जना आता त्यागा बद्दलचा माझा निर्णय ऐक हे पुरु।श्रेठा त्याग तीन करुन नये ती कर्मे केलीच पाहीजेत यज्ञ ,दान,तप या स्वरुपाच्या कर्माचा कधीही त्याग विद्वानांसहीत सर्वांना शुध्द करणारी आहेत त्यादिवशी ह्याच उपदेशाने ती भक्त मंडळी जप करण्यास मग्न झाली होती स्वामी तर भक्तांसह शेतीची बांध नीट करत होते वास्तविक बघता बाबाजींना शेतीचे बरेचसे ज्ञान होते कारण करंजगावच्या कर्मभूमीत त्यांनी बराचसा घाम गाळला होता स्वामीची त्या बांधावर बसलेले असतांना एक केदारनाथवरुन शिवजीचा भक्त त्यांना बघण्यासाठी सहज वेरुळात उतरला होता व स्वामींना बघत बघत तो त्या शेतीकडे गेला तो स्वामींच्या चरणापाशी जाऊन टिपला होता. परंतु स्वामींचे चरण न धरता तो स्वामींच्या चेहऱ्याकडे सारखे बघत होता त्या केदारनाथवरन आलेल्या पुजाऱ्याला स्वामींच्या नजरेत साक्षात केदारनाथाचेच दर्शन झाले

व तो जोरात ओरडला शिवजी आप यहा बाबांनी त्या शिवजीच्या पुजाऱ्याला कडकडून मिठी मारली, म्हणजेच लक्षात घ्या स्वामींच्या अवतारच शिवाचा असल्याने ते शिवजीच्या भक्तांना कधी सिध्देश्वराच्या तर कधी केदारनाथाच्या स्वरुपात दर्शन देत होते व कार्य पूर्ण करीत होते. उत्तरार्धात समाविष्ठ होणार होता म्हणजेच अनुष्ठानाचा सातवा दिवस उगवणाऱ्या सुर्याने वेरूळात उगवून दिला होता सकाळी सकाळी बाबाजीने सर्वांचे मान सोडले व प्रवचन देऊन कार्यक्रमाची सांगता करणार होते.सकाळी सुमारे अकरा वाजेच्या दरम्यान प्रवचनाच्या कार्यक्रमास सुरवात होणार होती त्याच दिवशी श्री क्षेत्र संभाजीनगर येथील काही भाविक भक्त बाबाजींना घेण्यासाठी वेरुळ येथे जमा झाले होते. त्यांना बाबाजींना औरंगाबादला नेऊन तेथे जनेश्वराच्या शिवालयाचा जिर्णोध्दार करायचा होता व त्यासाठी बाबांनी होकारही दिला होता नाहीतरी बाबाजी आपले कार्यपुर्ण झाल्यावर, साक्षात्कार झाल्यानंतर ते पिनाकेश्वराच्या कार्यासाठी जातेगावात रवाना झाले होते तदनंतर तेथील कार्य पूर्ण झाल्यावर पुन्हा ते साक्षात्कारानुसार सिध्देश्वराच्या कार्यासाठी वेरूळ येथे आले होते व आता नुकतेच त्यांचे वेरुळ येथील कार्य पूर्ण झाले होते परंतु आता मात्र त्यांना साक्षात्कार झालेला नव्हता तरीही नविन कार्यासाठी स्वामींना काहीतरी करावे लागणारच होते तितक्यात देवानेच ह्या भक्तांना स्वामींना कार्याप्रित्यर्थ बोलवण्यासाठी वेरुळ येथे जाण्याची बुध्दी दिली होती नाहीतरी बाबा नेहमी भक्तांना म्हणायचे बाबा हो , देवाचे काम देवच करुन घेतो तुमचं आमचं काहीच नव्हतं ह्या नुसार बाबांचे कार्य सातत्याने ह्या अवतारात चालू राहण्यासाठी स्वतः भगवान शंकरजीच त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी जाण्यासाठी तयार करीत होते. म्हणून त्यांनी त्यांच्या कार्याची धुरा अवघ्या महाराष्ट्रात मिरवली व यथायोग्य कार्य करुन भक्तीची व धर्माचा प्रसार करुन दैव अस्तित्वाची जाणिव करुन दिली , तसेच धर्मास लागलेल्या ग्लानिस तिलांजलीही दिली होती आणि आता ह्या अनुष्ठानाच्या सातव्या दिवशी त्यांच्या नविन कार्यासाठी नुतन प्रयोजनही झाले होते. घड्याळात बरोबर अकरा वाजले होते. बाबाजींनी प्रवचनाससुरवात केली होती, बरीचशी मंडळी अनुष्ठानाच्या सातव्या दिवशी वेरूळ नगरीत उपस्थित झाली होती. बाबाजी प्रवचनात सांगू लागले,

आज आपले वेरुळ येथील अनुष्ठान पूर्ण झाले आहे आणि आज सांगण्यास आनंद वाटतो की आपलं सिध्देश्वराचेही शिवालय पूर्ण झाले आहे , बाबाहो , मी तुम्हाला कायम सांगत असतो हे सारं देवाचंच आहे आणि देवाचं काम देव सांभाळून घेतो तुमचें आमचं काहीच नसत हे सारं देवाच आहे आणि तुम्ही देवाच काम समजूनच कामाची सुरवात करायची म्हणजे देव सांभाळून घेतो सार काही. बाबाजी पूर्णपणे आशिर्वाद देऊन बोलत होते भक्तगण एकेक एक शब्द एकाग्र व कुशाग्र बुध्दीने अंतः करणात टिपत होते बाबाजी पुढे म्हणाले , बाबाहो हे जिवन एक प्रवाह आहे ह्या प्रवाहात नेहमीची सुख, दूःख आशा, निराशा असा गोष्टी मिसळत असताता आणि त्याचमुळे हा जिवनप्रवाह नेहमीच अशुध्द होत असतो व

त्याला शुध्द करण्यासाठी भक्तीचा प्रवाह हा सातत्याने फवारावाच लागतो आणि हा फवारा मारण्यासाठी नेहमी संताच्याच सानिध्यात जावे लागते संत नेहमी तुमचे जीवन निर्मळ करण्यासाठी जगत असतात. तुम्ही सिध्देश्वराचे काम पूर्ण केले तुम्हाला लई आशिर्वाद मिळाला बाबाहो.

लोकाहो , ऐका बाबाचं म्हणणं , जो माणूस जन्माला येतो तो काही तरी आशा घेऊन येतो आणि त्या आशा पुर्ण करण्यासाठी तो सारं जिवनभर कष्ट घेतो एका गोष्टीने त्याचं भागत नाही , एक गोष्ट ,एक आशा पुरी झाली की तो लगेच दुसऱ्या गोष्टीसाठी सांजसकाळी राबतो तरीही त्याला त्याचे मन शांत बसू देत नाही , पण बाबाहो एवढी धडपड करण्यापेक्षा भक्ती करा ना , भक्ती करा , आणि भक्ती जर केली तर मुक्ती मिळते ना, मुक्ती ! अरे, देव हा नेहमी भावेचा भुकेला असतो, आई–बापाची जरी सेवा केली तरी देवाची सेवा करण्यासारखीच आहे. तुम्ही फक्त भक्ती करा , सार देतो देव. बाबा पुढं म्हणाले , एक गोष्ट सांगतो जरा निट ऐका पुंडलिकांचे नांव ऐकले का तुम्ही , ऐका पुंडलीक हा फार मोठा भक्त झाला पण आधि तो खूप जुगार खेळायचा तयाला सारीपाट कायम आवडायचा पण तो सारीपाटात कायम हारायचा एक दिवस तो त्याची बायको बी हारला होता . तो येडा झाला होता येडा. पहा पण त्याने आइ वडीलांची खूप सेवा केली आणि पंढरीच्या विठ्ठलाचीबी लई भक्ती केली , त्याने इतकी भक्ती केली की आज बी त्यानं विठ्ठलाला पंढरपूरला एका इटेवर उभं केलं आणि पहा भक्तीची ताकद, आज बी आधि त्याचं दर्शन घ्यावं लागत आणि मग विठोबाचं दर्शन घ्यावं लागतं, पहा भक्तीची ताकद , आणि त्याला सगळ्या भक्तात अगोदर मान द्यावा लागतो, म्हणूनच आपण म्हणतो ना

**बोला पुंडलीक वरदा हारी विठ्ठल**
**श्री ज्ञानदेव तुकाराम**
**पंढरीनाथ महाराज की जय.**

जरा ध्यानात घ्या बाबाहो भक्तीचा महिमा, भक्ती जर मनापासून केली तर परमेश्वराला सुध्दा तुमच्याकडे याव लागतं आणि जर परमेश्वर भेटला तर मग काय कमी आहे तुमच्या आशा पुऱ्या व्हायला, आरे जे मागाल ते मिळलं ना , कशाला तरफडत्यात इकडं तिकडं, देवाची सेवा करा. मेवा मिळलं ना खायला , म्हणून बाबा म्हणतो.

**ईश्वर भक्ती करा**
**देवच येईल घरा**

आणि जेव्हा नामदेव महाराजांचे वडील गावाला गेले तेव्हा त्यांची आई म्हणाली की बाळ , नामदेव जा देवाला नैवद्य देऊन ये, नामदेवांनी नैवद्याचे ताट घेतले आणि गेले विठ्ठलाच्या मुर्तीकडे व म्हणले खा ....... विठोबा ..... नैवेद्य खा, आता आपण भावाने देवापुढे प्रसाद ठेवतो म्हणून काय देव लगेच तो खात नाही , पण त्यांना वाटले देव का म्हणून

माझा प्रसाद खात नाही? रोज बरं माझ्या बाच्या हातून हा प्रसाद खातो आज का खात नाही? तेव्हा नामदेव महाराज विठ्ठलाला म्हणाले देवा ...... तुला हा प्रसाद खावाच लागेल, जर खाल्ला नाही तर मी माझे डोके फोडेल. तेव्हा देव सुरवातीला आलेच नाही कारण तुम्हाला माहीतच असेल, पण जेव्हा नामदेवांनी विठ्ठलाच्या पायापुढे डोके फोडायला सुरवात केली , स्वतः विठ्ठलाच्या पायावर रक्त पडले तेव्हा स्वतः विठ्ठल आले व नामदेवांचा नैवद्य आनंदाने ग्रहण केला म्हणजे पहा बाबाहो, ईश्वरावर भक्ती ठेवा , देव तुमच्याच घरी येईल याची जाणीव ठेवा आणि लक्षात ठेवा बाबाहो , बरं बाबा आता प्रवचनाला संपवित आहे. असे म्हणून त्यांनी प्रवचन संपवले . श्री क्षेत्र वेरुळ येथे भक्तीची बीजे प्रवचनातून पेरता पेरता त्यांनी प्रवचन संपवले परंतु प्रवचन संपल्यानंतर त्यांनी भक्तांना एक उपदेश केला आता मी काय सांगतो ते नीट ऐका. आता मी श्री. क्षेत्र संभाजीनगर येथे काहीतरी कामासाठी जाणार आहे. तिथंही इथल्यासारखं मंदीर बांधायचे आहे, तेव्हा आज संध्याकाळी बाबा तिकडं जाणारं आहे. तसं सारं काही काम इथचं करायचं आहे त्यामुळे पुन्हा बाबा कुठे गेले तरी परत इथच येतील. तोवर तुम्ही आपली शेती चांगली करण्याचा प्रयत्न करा , जर तुम्ही चांगल काम केल तर बाबा तुम्हाल काय देईल हे सांगता येणार नाही. आणि ही शेती बाबाची मुळीच नाही. ही सारी शेती तुमचीची आहे ह्या जनता जनार्दनाची आहे . तेव्हा नीट ध्यानात घ्या , नीट रहा, काम करा , काम !

त्यांनतर महाप्रसादात सुरवात झाली . सारे भक्तगण महाप्रसादाचा आस्वाद घेत होते. स्वामीजी पुढील संभाजीनगर येथील कार्यासाठी भक्तांशी बोलत होते. महाप्रसादाचा कार्यक्रम संपला , सारे भक्तगण महाप्रसाद खाऊन श्रमदानासाठी शेतीकडे कुच झाली होती , तर ही माऊली पुढील कार्यासाठी श्री. क्षेत्र संभाजीनगरकडे रवाना झाली होती कार्याचा महीमा गाऊन अवतार सिध्द करण्यासाठी ही जगद्वंदनीय माता माऊली आता संभाजीनगरकडे सरकत होती. सुर्य पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकत होता तर कार्य करणारा हा स्वामी वेरूळ हून पूर्वेकडे संभाजीनगरकडे सरकत होता.

सायंकाळी सहा-साडेसहाच्या दरम्यान जनार्दन स्वामी संभाजीनगर येथे कार्यासाठी पूर्णतः रुढ झाले होते. स्वामी संभाजीनगर येथे पोहचल्यावर मराठवाडा विद्यापीठाच्या उत्तरेला राहिले. तोपर्यंत स्वामींच्या कार्याची प्रचिती संभाजीनगरपलिकडे पोचलेली असल्याने बरीचशी मंडळी स्वामींच्या दर्शनाला तिथं जमली होती. स्वामी बरोबर श्री क्षेत्र वेरुळ वाकला व संभाजीनगर येथील ही काही भक्तगण होते. स्वामींना राहण्यासाठी त्यांनी तंबू टाकला. इतका मोठा अवतार रुपी मनुष्य ह्या जिल्ह्याच्या ठिकाणी इतक्या साध्या क्षेत्रात (ठिकाणी) राहाणार आहे. हे बघून संभाजीनगर येथील शहरी लोकांना बरेचसे विशेष वाटले. आतापर्यंत स्वामींनी श्री क्षेत्र जातेगांव येथे पिनाकेश्वराचे तर श्री क्षेत्र वेरुळ येथे सिध्देश्वराचे शिवालये बांधून समाजकार्य केले होते. स्वामींना आता त्यांचे कार्य

करण्यासाठी शहरात यावे लागले होते. स्वामींच्या जिवनातले ३ रे शिवालय त्यांना ह्या मराठवाड्याच्या केंद्र बिंदूत बांधावयाचे होते. हा देव अवतारी महापुरुष त्यांच्या कार्याची ध्वजा फडकवण्यासाठी चक्क शहरात आला होता. स्वामींचे राहणीमान हे त्या शहरातील लोकांच्या राहणीमानापेक्षा कितीतरी पटीने वेगळे होते. तरी देखील हे शहरी लोक त्या साध्या –सुध्या राहणीमानाच्या बाबाकडे दर्शनासाठी जमले होते. तरी देखील ते उच्च दर्जीय शहरी लोक त्या साध्या बोली भाषेच्या बाबाकडे आशिर्वादासाठी जमले होते.

नाहीतरी साधू संताला सर्व परिसर सारखाच असतो ते त्यांच्या कार्याची महिमा सर्वत्र गाण्यास सदैव तयार असतात. मग ते खेडे असो अथवा विपुल लोकांनी गजबजलेले शहर असो. स्वामींनाही इतर साधू संताप्रमाणे त्यांचे –त्यांचे कार्य करण्याचे होते. परंतु त्यांनी त्यांच्या कार्यात इतर संतापेक्षा बदल केला होता. स्वामींना त्यांचे कार्य शिवालये बांधून करायचे होते. त्यांना त्यांचे शिवालये श्रमदानातून उभी करायचे होते. श्रमदानातून त्यांना श्रमाची महती ह्या समाजाला पटवून द्यायची होती. श्रमदानाची महती पटवण्यासाठी त्यांना ठिक ठिकाणी प्रवचने करायची होती. वेगवेगळे प्रवचन देऊन त्यांना आशिर्वादात्मक उपदेश द्यायचे होते. उपदेशातून त्यांना समाजाला वळण लावायचे होते योग्य वळण लावता लावता भारतीय संस्कृतीची जाणीव करुन द्यायची होती. संस्कृतीला जपता–जपता त्यांना धर्माचे रक्षण करायचे होते . धर्माचे रक्षण करुन त्यांना भक्तींची लागवण करायची होती आणि भक्तीची लागवण करुन त्यांना अवतार रुपी कार्याची महीमा गायची होती त्याचसाठी त्यांनी आतापर्यंत दोन शिवालये बांधले होते. शिवालये स्थापन करत असतांना बरेचसे साक्षात्कार दाखवून बाबांनी समाजाला दैवाचे अस्तित्व दाखवून दिले. श्रमदानाची महती पटवून दिली, जगण्यासाठी योग्य असा उपदेश देऊन अनेक समाजाला वळण दिले आणि तेच कार्य शहरात करण्यासाठी ही सदगूरु माऊली आता औरंगाबादात बारदानाच्या कुटीया समोर बसली होती.

स्वामी कुटीयासमोर बसलेले होते. तेव्हा किती तरी भक्तांनी तेथे उपस्थिती दर्शवली होती. स्वामींनी त्यांना विभूती देण्याची क्रिया चालू केली होती. बराचसा सांजवात प्रकाश लुकलुकायला लागला असल्याने स्वामींनी दुसऱ्या दिवशी प्रवचनाचा कार्यक्रम ठेवला होता. आणि प्रवचनातून त्यांना बराचसा उपदेश करायचा होता, कुटीया (तंबू) समोर बसून बाबाजी भक्तांना विभुती देत काही वेळेने उद्याच्या प्रवचनाचे निमंत्रण देत होते. भक्तगण आनंदाने घरी परतेल ,स्वामी काही भक्तांसह तेथेच तंबूजवळ राहिले बाबाजी फार विशाली अंतःकरणाचे सिध्द पुरुष होते त्यांचा जीवन जगण्याचा दृष्टीकोन फार उच्च दर्जाचा होता. साधू संताबद्दल बाबाजीला फार आदर होता. त्यांच्या कतृत्वाची बाबाजीला पुरेपुर जाणीव होती. किंबहूना संतांच्या कतृत्वाबद्दल त्यांच्या मनात विशाल प्रेम साठलेले होते. साधू संतांची सेवा करण्यासाठी त्यांनी घृष्णेश्वराच्या शिवालयाजवळ आश्रम बांधला होता.

त्यांना वाटत होते की एखादे साधू- संत उन्हा-तान्हातून माझ्या आश्रमात येतील थोडे फार सुखावतील आश्रमातून होणाऱ्या अन्नदानातून त्यांचा आत्मा सुखी होईल व ते जाता-जाता आशिर्वाद देऊन जातील त्याचे पूण्य आश्रम बांधणाऱ्यांना होईल. त्यांचे पुण्य आश्रमात श्रमदान करणाऱ्याला होते. म्हणून त्यांना येथेही श्रमदानातून आश्रम उभा करायचा होता. आश्रम बांधता बांधता त्यांना ह्या शहरातील लोकांना बराचसा उपदेश करायचा होता त्यांना माहित होते की शहर म्हणजे श्रीमंत मानसांनी जमा झालेले ते एक औद्योगिक ठिकाण असते सर्व सामान्य मानसांना जगण्यापुरता पैसा मिळण्याचे ते एकमेव स्त्रोत असते त्यांना माहित होते शहरात विविध जातीत जन्मास आलेल्या लोकांचा भरणा असतो . शहरात गरीब श्रीमंत असा दोन गट असतो. श्रीमंत लोक पैशांचा वापर हौस, ऐश, विलासी जीवन जगण्यासठी करतात. विलासी जीवन जगून भारतीय संस्कृतीला तिलांजली देतात, हिंदू धर्माला विसरुन वेगळ्याच पध्दतीने जीवन जगण्यास सुरवात करतात. मग त्या जगण्यामध्ये निर्माण कर्त्यालाही महत्व दिलेले नसते. दैवावरील विश्वास संपुष्टात आल्याने भारत रुपी देवघर कुठेतरी कोलमोडून जाण्यास सुरवात होते. तर दुसरीकडे कसे बसे जिवन जगणारा गरीब परिवार गरीबीने अशिक्षित राहतो. त्यामुळेच त्यांना त्यांच्या जिवनाचा अर्थ ही कळत नाही असेच अशिक्षित राहून त्याना वेगळेच वळण लागते ह्या सर्वच गोष्टींचा विचार स्वामींनी पुरेपुर केलेला होता व त्या प्रित्यर्थ त्यांनी श्री क्षेत्र संभाजीनगर येथे एक शिवालय एक आश्रम व एक वस्तीगृह बांधण्याचे ठरवले होते. काळासाठी विचार करणारा हा साधू त्या दिवशी संकल्प करत होता.

दुसरा दिवस उजाडला गेला, नेहमी प्रमाणे शहरात सुध्दा स्वामींनी पहाटे चार वाजता आंघोळ केली, पहाटे पहाटे विधी सुरु केली . भगवान शिवाची आरती म्हटली व सकाळी आठ वाजता स्वामी प्रवचन करण्यास तयार झाले संभाजीनगर येथील बरेचसे भक्तगण तेथे जमा झाले बाबाजी प्रवचनातून बोलले आज बाबा इथं आले फार बरं झालं इथली ही जमीन बाबानं विकत घेतली आहे. जसे पिनाकेश्वराचे मंदीर आहे जसे सिध्देश्वराचं मंदीर आहे. तसेच इथेही मंदीर बांधावे अशी बाबाची इच्छा आहे. इथं आपण एक शिवालय बांधू, एक आश्रम उभा करु पण बाबाहो तुम्ही श्रमदान कलं पाहिजे . जी गोष्ट आपण कष्टानं करतो त्या गोष्टीला जास्त महत्व असतं हे लक्षात घ्या अशा अनेक विषयावर चर्चा करुन बाबांनी प्रवचनास सांगता दिली. श्रमदानाबद्दल बाबांना संभाजीनगर येथे जास्त प्रवचन देण्याची गरज पडली नाही. त्यांना (लोकांना) पिनाकेश्वर शिवालयाची व सिध्देश्वर शिवालयाची उभारणी चांगल्या रितीने माहीत होती. बाबाचा शिवालय बांधण्याचा निर्णय ऐकूण भक्तगणांना आनंद झाला. बाबाजीचा आशिर्वाद आपल्याला ह्या शिवालयाद्वारे अखंड मिळेल ह्या संकल्पाने जनसमुदाय आनंदाने टाळ्या वाजवत ओरडला

**बोला श्री संत जनार्दन स्वामी महाराज की जय**

पिनाकेश्वर भगवान की जय
सिध्देश्वर भगवान की जय

बाबाजींनी सर्व प्रथम विहीर खोदण्यास सुरवात केली विधी आरती करत त्यांनी विहीरीचा शुभारंभ केला अनेक शहरी भक्तगण स्वामींनी हाती घेतलेल्या कामात श्रमदान करु लागले होते. स्वामीजी स्वतः विहीरीजवळ बसले होते आपल्या भक्ताला काही होऊ नये यासाठी ते सदैव तत्पर्यक होते. क्षणोक्षणी ते भक्तांची चिंता करत होते कारण भक्तगण त्यांचेच चिंतन करत होते. विहीरीवर बसून ते भक्तांना संकटापासून दुर करत होते, संकटातुन तारत होते. विहीरीचे काम करता करता बाबाजी भक्तांना प्रवचने देत होते. प्रवचनातून त्यांना अनुसरुन यथोयोग्य उपदेश करत होते शहरातील उच्च वर्गातील लोकांना दैवाचे अस्तित्व प्रकट करण्यासाठी ते वेळोवेळी साक्षात्कार दाखवत होते व साक्षात्कारातून दैवाची, धर्माची, संस्कृतीची जाणिव करुन देत होते. स्वामींना येथे येऊन सुर्य बऱ्याच वेळा मावळता होता. आता विहीरीचे काम पूर्ण झाले होते. स्वामींनी शुभ मुहर्तावर शिवालयाचा पाया घेतला. पिनाकेश्वर व सिध्देश्वराइतका वेळ येथील शिवालयाच्या पायास लागलाच नाही काही बोटावर मोजता येणाऱ्या दिवसात शिवालयाचा पायाही पूर्ण झाला.

अखंड श्रमदान तेथे चालू झाले होते. असंख्य शहरी व ग्रामिण भक्तगण तेथे राब–राब राबत होते. वेळोवेळी स्वामी त्यांना चांगला आशिर्वाद देऊन आनंदी करत होते. विहीरीतील पाण्याने मंदीराचे काम पुढे सरकत होते. अशातच स्वामींनी तेथे त्वरीत आश्रमाचेही काम सुरु केले होते.

इ.स. १९७१ हा कालखंड बराचसा उलटून चालला होता स्वामींना पटापट कार्य करण्याची घाई लागली होती. जनतेच्या सुचनेनुसार किंबहूना जनतेच्या इच्छेनुसार स्वामींनी जनेश्वर हे नाव त्या मंदीराला दिले होते. जनेश्वर महादेवाचे काम आता बरेचसे उरकत आले होते. स्वामींनी तेथील आश्रमात एकूण शंभर खोल्या बांधण्याचा संकल्प केला होता स्वामींना वाटायचे येथे जवळच विद्यापीठ आहे, महाविद्यालय आहे, विद्यापीठात आणि महाविद्यालयात बरेचसे तरुण मुलं शिक्षण घेतात परंतु शहरी अशा ह्या वैफल्यपूर्ण वागणुकीमुळे मुलांचे शिक्षणावर मन लागत होते. ते शालेय शिक्षण व्यवस्थित घेत नाही आणि आपला देश खर तर ह्या तरुणांवरच उभा आहे हे तरुणच खर आपल्या देशाचे रक्षक आहे त्यासाठी बाबांना वाटायचे आपण येथे आश्रमात जास्त खोल्या बांधू महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मुलांना राहण्यासाठी सोय करु शहरात राहूनही मुलांना घरच्या परिस्थितीची जाणीव राहण्यासाठी भारतीय संस्कृतीचे भान राहण्यासाठी, देव ही गोष्ट आजही अस्तित्वात आहे हे दाखविण्यासाठी येथे शालेय शिक्षणासह अध्यात्मीक शिक्षणही चालू करु. यासाठीच स्वामींनी जनेश्वर शिवालयाबरोबर १०० खोल्यांच्या आश्रमाचेही कार्य हाती घेतले होते . इस. १९७२ चा महिना उजाडला होता जनेश्वर शिवालयाचे काम पूर्ण झाले होते मात्र आश्रमाचे काम अजून

पूर्णत्वास गेलेले नव्हते. एक दिवशी रात्री अचानक स्वामींना भगवान शिवाचा साक्षात्कार झाला हा स्वामींना भगवान शिवाचा तिसरा साक्षात्कार होता. यापूर्वी त्यांनी स्वामींना अंदरसूल येथे साक्षात्कार दाखवून पिनाकेश्वराचे मंदीर बांधायला लावले होते आणि जातेगाव येथील पहाडावर साक्षात्कार दाखवून सिध्देश्वराचे मंदिर बांधायला लावले होते व आता औरंगाबाद येथील मंदिरात साक्षात्कार दाखवून श्री. क्षेत्र पालखेड येथे परमेश्वराचे मंदीर बांधण्याचा आदेश दिला होता. भगवान शिव स्वामींना ठिकठिकाणी साक्षात्कार दाखवून ठिकठिकाणी कार्य करण्यासाठी प्रेरीत करत होते स्वामीही तेथे जाऊन त्यांच्या कार्याची ध्वजा फडकवत होते आणि मंदिराचा कळस पूर्ण झाला होता. त्यावर हिंदवी भगवा पताका अभिमानाने फडकत होती कारण संभाजीनगर तसे ऐतिहासिक शहर होते आणि त्या जिल्ह्यात बराचसा हिंदू धर्म मोगली सत्तांनी व परकीयांनी बाटावला होता. त्या प्रित्यर्थ ही भगवी ध्वजा एका हिंदू धर्माच्या कार्याचे प्रतिक म्हणून हवेत अलिशानपणे फडकत होती आश्रमाचे काम चालू होते त्यामुळे बरेचसे भक्तगण श्रमदान करत होते. पण म्हणतात ना

**आता माझी चिंता तुज नारायण**
**होईलं ते सगळं प्रारब्धाच्या हाती**

ह्याच उक्तीप्रमाणे सारे काही होत होते, अगोदरच्या दिवशी स्वामींना साक्षात्कार दाखवला होता दुसऱ्या दिवशी श्रमदानासाठी पालखेडचा लोक समुदाय कामासाठी जमला होता.हिच तर खरी परमेश्वराची लिला असते अगोदरच्या दिवशी भगवान शिवाने स्वामींना पालखेड येथे परमेश्वराचे मंदिर बांधायचे सांगितले होते व दुसऱ्या दिवशी जणू काय त्यांनीच स्वामींचा आदेश ऐकवण्यासाठी त्यांना औरंगाबाद येथे पाठवले होते.

स्वामींनी पालखेडच्या भक्तांना जवळ बोलवून घेतले व सांगितले आपल्याला तेथे तुमच्या पालखेडला परमेश्वराचे मंदिर बांधायचे आहे तरीपण तुम्ही तेथे जाऊन दगड घडवण्यास सुरवात करा हे मंदिर पूर्ण होताच मी तिकडं येणार आहे हे नारळ घ्या आणि जा कामाला लागा. स्वामींचे नारळ घेऊन लोक त्वरीत पालखेडला गेले व दगड घडवायला लागले स्वामींचे नारळ म्हणजे स्वामींचा प्रत्यक्ष आशिर्वाद व अप्रत्यक्ष रुप होय. आशिर्वाद रुपी नारळ घेऊन पालखेडची भक्तमंडळी आता कामाला लागले होते तर बाबा संभाजीनगर येथे श्री जनेश्वर मंदिराच्या प्राणप्रतिष्ठेसाठी पुढे सरसावले होते. स्वामींनी जातेगावच्या पंडीतकाकांना काही भक्तगणांसोबत जयपूरला नंदी व पिंड आणण्यास पाठवले. लवकर जनेश्वर महाशिवालयाची प्राणप्रतिष्ठा होणार म्हणून बरीचशी भक्तमंडळी वाढू लागली होती. स्वामींचा भव्य आश्रम व दिव्य तेज दिपून टाकणारे शिवालय बघून भक्तगण आश्चर्य चकीत होत होते त्याच दरम्यान काही भक्तांनी तेथे दानपेटी ठेवली होती लोक भक्तीभावाने दान करत असायचे. परंतु काही दिवसानंतर एक अल्पबुध्दीवान मनुष्याची बुध्दी फिरली व त्याने ती दानपेटी चोरली. सर्वीकडे चर्चा झाली लोक बाबाजीकडे पळत पळत आले व सांगायला

लागले. तेव्हा बाबाजी म्हणाले घाबरु नका पेटी संध्याकाळ पर्यंत जागेवर येईल. सारे भक्तगण सायंकाळची वाट पाहू लागले त्यांना वाटू लागले पेटी पळवणारा सायंकाळी परत येतो की नाही, परंतु हा बाबांच्या अवताररुपी अस्तित्वाचा प्रश्न होता. देवाला त्या चोराला पुन्हा जनेश्वर मंदीरात पाठवावे लागणारच होते. बघा वाचकांनो काय चमत्कार झाला तो चोर ज्याही गाडीकडे प्रवासासाठी जायचा त्या गाड्याच बंद असायच्या, तो एस.टी.स्टँडवर गेला तिथे सर्व एस ट्या बंद होत्या, तो रेल्वे स्टेशनवर गेला तिथेही रेल्वे बंद झाल्या होत्या, दिवसभर चालून चालून थकला आणि शेवटी सायंकाळी जनेश्वर शिवालयात पेटीसह परतला आणि लोकांना बाबाजीचा महीमा कळला. लोकांना बाबाजीच्या अस्तित्वाची पूर्णतः जाणिव झाली. चोराने बाबांचे पाय धरले व बाबाजीने त्याला उदार अंतःकरणाने माफही केले बाबांचा महीमा किती आणि कसा गांवा हेच कळत नाही असो.

पंडीत काकांनी जयपूरहून पिंड, नंदी आणले, स्वामी हे स्वतः शिल्प तज्ञ होते की काय हे माहीत नाही परंतु स्वामींनी त्या मुर्त्या निरखून बघितल्या व अक्षयतृतीयाच्या शुभ मुहर्तावर त्या मुर्तीची प्राण प्रतिष्ठा करायचे ठरवले. अक्षय तृतीयेचा दिवस उजाडला स्वामींनी त्र्यंबकेश्वर व नाशिक येथून ब्राम्हणांना बोलवले होते. त्याप्रमाणे ब्राम्हण संभाजीनगर येथे उपस्थित झाले होते. अक्षयतृतीयाच्या शुभ मुहर्तावर बरोबर वेळेवर स्वामींनी ब्राम्हणांकडून भगवान शिवाच्या जनेश्वराची विधिवत प्राणप्रतिष्ठा करुन घेतली प्राण प्रतिष्ठा झाल्यावर स्वामींनी शहरी लोकांच्या संस्कृतीवरच प्रवचन दिले अनेक विषयावर उपदेश करत त्यांनी लोकांना यथायोग्य प्रवचन दिले . बाबांनी दिलेले प्रवचन संभाजीनगर शहरातील लोकांना पुरेपुर रुजले. बाबाजींच्या प्रवचनाचा बराचसा प्रभाव त्या शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन भिनला व शहरातील लोकांच्या भविष्यासाठी शिदोरी बनून राहीला काही वेळेनंतर प्रवचन संपले.प्रवचनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम सुरु झाला.

**श्री संत जनार्दन स्वामी महाराज की जय**

**श्री. जनेश्वर भगवान की जय**

अशा घोषणा देत लोकांनी प्रसाद खाण्यास सुरवात केली तर तिकडे बाबाजींनी आश्रमाच्या कामाची जबाबदारी इतर शिष्यांवर टाकून श्री. क्षेत्र पालखेड (ता. वैजापूर) येथे जाण्याची तयारी चालू केली.

आपल्या कार्याची महिमा जगाला पटवून ही माऊली आता कार्यासाठी दुसरीकडे चालली होती . संभाजीनगर सारख्या शहरात श्री.जनेश्वराचे मंदीर बांधून वस्तीगृहयुक्त आश्रम स्थापून ही जगदवंदनीय जनार्दन माऊली आता पालखेडला जाण्यासाठी आतूर झाली होती. शहरात कार्याची महिमा गिरवून स्वामींनी एक आगळेवेगळे कार्य केलं होते. शहराची महती लक्षात घेऊनच त्यांनी तेथे अविश्वसनीय असे असामान्य कार्य केले होते आता बरीचशी वेळ झाली होती ही माऊली संभाजीनगर सोडून बरेचसे अंतर दूर निघून

गेली होती.

स्वामींच्या शहरातील कार्याची प्रचिती आजही संभाजीनगर येथील जनेश्वर शिवालय दिल्याखेरीज राहत नाही. स्वामींच्या विशाल धोरणी अवर्णनिय बुध्दीची जाणिव आजही तेथील १०० खोल्यांचा आश्रम दिल्याखेरीज राहत नाही. आजही असंख्य भाविक भक्त तेथे जातात. स्वामींच्या फोटोचे दर्शन घेतात , जनेश्वर शिवापुढे नतमस्तक होता मनातील भावना प्रकट करतात व बाबाजी इच्छा पूर्ण करतील अशी आशा व्यक्त करुन घरी जातात. आजही स्वामींचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरीजी महाराज तेथे जातात. जनेश्वरापुढे लीन होता. सत्कार्यासाठी प्रेरणा मागतात. आश्रमाची व्यवस्था बघतात व स्वामीप्रमाणेच कार्य करण्याचा प्रयत्न करतात. कार्यासाठी अहोरात्र झगडणारी ही जनार्दन माऊली आता औरंगाबादहुन रेल्वे स्टेशन म्हणून प्रचलित असणाऱ्या परसोडा या गावी पोहचली तिथे छोटासा कार्यक्रम आयोजित केलेला होता. स्वामींनी त्या कार्यक्रमात एक तास भर प्रवचन करुन आपली भक्तीची आगगाडी त्या परासोडा रेल्वे स्टेशनवर सुरु करुन दिली व भावी कार्यासाठी ही महान मुर्ती पालखेडकडे रवाना झाली श्री क्षेत्र पालखेड हे गांव बाबांच्या मुळगांवापासून पश्चिमेला दीड किलोमीटर अंतरावर विराजमान झालेले आहे. स्वामींनी पालखेडला जाण्यास तो रस्ता नाकारला व स्वामी दुसऱ्या रस्त्याने श्री क्षेत्र पालखेड येथे पोहचले स्वामींनी देहगावहून जाण्याचा रस्ता नाकारला याचा अर्थ स्वामींना देहगावचा राग होता असे नव्हे पण स्वामींच्या जिवनाचा एक अनमोल नियम होता. एकदा जर एखाद्या गावात कार्य पूर्ण झाले तर स्वामी तेथे पुन्हा कधीच परत जात नव्हते. मुळगांव असलेल्या देहगांवातील स्वामींचे कार्य पूर्ण झालेले होते म्हणून स्वामी पुन्हा कधीच दहेगावात परत गेले नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी. एका महान कार्यासाठी ही अतिमहान विभूती श्री क्षेत्र पालखेड येथे जाऊन पोहचली होती. स्वामींसह तेथे श्री. क्षेत्र वेरुळ , जातेगांव, अंदरसूल,औरंगाबाद येथील भक्तगण उपस्थित होते. स्वामी आल्याचे समजताच पालखेड येथील त्र्यंबकराव शेळके , गोविंदराव शेळके , भाऊसाहेब थोरात,भाऊसाहेब जाधव व इतर भक्तगण स्वामींकडे गेले आणि स्वामींची रहाण्याची व्यवस्था करु लागले रात्र झालेली असल्याने बाबाजींनी पालखेड येथील भक्तांना दुसऱ्या दिवशी सकाळी बोलवले होते.

स्वामी ज्या पालखेडात आले होते ते पालखेड ऐतिहासीक दृष्ट्या व अध्यात्मिक दृष्ट्या फार नावाजलेले गाव होते. ह्या पालखेड गावाच्या चरा-चरात साधू -संताचा आशिर्वाद पसरलेला होता. त्यामुळे गाव बरेचसे पुण्यवान झालेले होते स्वामींचे पुण्यचरण ह्या गावाला लागलेले होते. त्यामुळे गाव बरेचसे पुण्यवान झालेले होते. स्वामी सारखे अनेक महान ऋषी साधू संत या गावात राहून भक्तीच्या जोती लावून गेलेले होते आणि त्याच भक्तीच्या ज्योती अजून प्रखर करण्यासाठी ही जनार्दन माऊली आता तेथे उतरली होती असे म्हटले जातात. औरंगाबाद जिल्ह्यात पालखेड (ता.वैजापूर) या गावात पूर्वी पाराशर

ऋषी राहिले होते, त्यांनी तपश्चर्या करुन , यज्ञ, होम हवन करुन या गावात परेश्वर महादेवाची स्थापना केली होती. परंतु काळाच्या ओघात व परकिय राजवटींच्या जुलमाने ह्या महादेवाची स्थिती बरीचशी बिकट झाली होती.

हे मंदिर बरेचसे जिर्ण झाले होते. आणि त्याच शिवालयाच्या जिर्णोध्दारासाठी ही महान माऊली आता पुढे सरसावली होती म्हणूनच श्री क्षेत्र पालखेड हे आध्यात्मिक दृष्ट्या बळकट गाव होते. अध्यात्मिक बरोबरचं हे ऐतिहासिकही गाव होते ह्या गावात पूर्वी मोगली सत्तांचे वर्चस्व होते. राजा शिवाजीला परेशान करणारे मोगल बादशहा निजामशहा व आदिलशहा ह्याच क्षेत्रात रुजले होते. त्यांनी ह्या परिसरात भयंकर धुमाकूळ माजवलेला होता त्यांना ह्या पूण्यवान परिसरातून काढून देण्याचा राजा शिवाजीने आटोकाट प्रयत्न केला होता परतुं राजा शिवाजी तसा यशस्वी झाला नाही. जंजिरा किल्ल्यासारखे त्याला इथेही पराजय स्विकारावा लागला परंतु मराठी सत्ता थेट उत्तरेत पोहचवणाऱ्या पहिल्या बाजीराव पेशव्याने ह्या भागात प्रमाणापेक्षा जास्त विजय मिळवला होता ह्याच पहिल्या बाजीरावाने इ.स. १७२७ मध्ये पालखेड मध्ये मुक्काम केला होता आणि येथेच निजामाचा पराभव करुन त्याच्या जिवनातील पेशवेपदाचा पहिला विजय नोंदविला होता. ह्या पालखेडातील महादेवांसारख्या देव-देवतांचे रक्षण केले होते आणि त्याच पालखेडात श्रीमंत बाजीरावाने रक्षण केलेल्या देव -देवतांचं जिर्णोध्दार करण्यासाठी ही माऊली आली होती. अध्यात्मिक दृष्ट्या आणि ऐतिहासिक दृष्ट्या प्रचलित असलेल्या पालखेडचे काय वर्णन करु. (वाचकांनो मी स्वतःला भाग्यवान समजतो , माझ्याच गावाचे वर्णन हे माझ्याच हातून होत आहे.)

दुसरा दिवस उजाडला गावच्या उत्तरेला गावातील लोकांना बसण्या उठण्यासाठी एक वडाच्या झाडाखाली ओटा बांधलेला होता. तिथे शेजारीच येणाऱ्या जाणाऱ्याचे स्वागत करण्यास जुनाट वेस आहे. तिथेच स्वामींनी दुसऱ्या दिवशी भक्तांना जमण्यास सांगितले होते. कार्यकर्त्यासह बरेचसे भक्तगण तिथे उपस्थित झाले. त्यावेळी स्वामींनी भक्तांना उपदेश केला बाबाहो ह्या वर्षी आपण आपल्या गावातील पारेश्वरचो मंदीर बांधून त्याची प्राणप्रतिष्ठा करणार आहोत. तरीबी साऱ्यांनी श्रमदान केले पाहिजे, आपल्याला कुणाच्या दोन पैशाची आशा नाही. बाबाला फक्त श्रमदान पाहिजे, श्रमदानातून काय मिळत याच काय वर्णन करु. श्रमदान केल्याने पुण्य मिळते पुण्य मिळाल्याने जे मागाल ते मिळते म्हणून आज पासूनच आपल्या कामाला सुरवात करु असे म्हणून स्वामी थांबले भक्तांना स्वामींच्या कार्याची , अस्तित्वाची पुरेपुर जाणिव होती त्यामुळे भक्तांनी त्वरीत श्रमदानाची तयारी दर्शवली नाहीतर स्वामींनी जनेश्वर शिवालय बांधत असतांनाच पारेश्वराची घोषणा केली होती आणि त्या प्रित्यर्थ पालखेड्याच्या लोकांना दगडे घडवण्याची आज्ञाही केली होती. त्यानुसार मंदिराला पुरुन उरतील इतकी दगडे ह्या पुण्यवान लोकांनी घडवून ठेवली होती.

स्वामींनी भक्तांना दगडांबाबत विचारणा केली नंतर भक्तांनी स्वामींनी बैलगाडीवर बसवले व पांदीतून दूरवर नेले जेथे त्यांनी दगडे घडवले होते. पालखेड वासियांनी घडवलेले दगडे बघून स्वामींना इतका आनंद झाला की त्यांना झालेला आनंद जणू काय क्षणात महादेवाला भेटून आला. स्वामी हे वास्तुशिल्पतज्ञ होते की काय ? हे मला माहित नाही. परंतु त्यांनी एकेक दगड पारखून घेतला, ज्या दगडांमध्ये त्यांना बदल करावसा वाटला त्या दगडांमध्ये त्यांनी बदलही केला होता, सर्व दगडामध्ये घडामोडी झाल्यानंतर स्वामी भक्तांसह वेशीत परतले त्यांनी गावच्या वेशीपासून साठ सत्तर फूट अंतरावर जमिन मोबदला देऊन दान म्हणून घेतली आणि तेथेच त्या पारेश्वर शिवालयाचा जिर्णोध्दार करायचे ठरवले स्वामींनी सर्व प्रथम तिथे विहीर खोंदण्याचे काम हातात घेतले. भक्तांनी सढळ हाताने विहीरीसाठी श्रमदान चालू केले होते. स्वामींनी ह्या मंदिराचे काम इ.स. १९७२-७३ मध्ये हाती घेतले होते आणि तो कालखंड दुष्काळाचा होता अवघा भारत दुष्काळग्रस्त झाला होता महाराष्ट्रावर तर त्या दुष्काळाची झालर अतिदाट पणे पसरली होती. आणि मराठवाडयात तर दुष्काळाला काही पर्यायच उरलेला नव्हता अशा कालखंडात स्वामींनी देवाला (वरुण राजाला) निमंत्रण म्हणून श्री क्षेत्र पालखेड येथे पारेश्वराचे काम चालू केले होते.

दुष्काळाला सिमा राहिलेली नव्हती. बाबांनी हाती घेतलेली विहीर टिकमा-टिकमाने खाली खाली चालली होती. दुष्काळग्रस्त झालेल्या लोकांना कुठेही काम उपलब्ध नव्हते. सारा पालखेड बाबाजीमागे श्रमदानाला सरसावला होता. बाबाजी परिस्थितीने व्याकूळ झालेल्या व श्रमदान करणाऱ्या भक्तांजवळ रात्रंदिवस बसले होते. विभूती देत होते विभूतीतून बराचसा आशिर्वाद देत होते त्यातूनच त्यांची जगण्याची पालवी फूटत होती तर स्वामींची विहीर बरीचशी तळाला जाऊन पोहचली होती. बाबाजींनी हाती घेतलेली विहीर पूर्ण झाली होती विहीरीला बरेचसे पाणी लागले होते. त्याच पाण्यावर सारे गाव जीवन जगू लागले होते आणि त्याच पाण्यावर आता मंदिराचे काम सुरु झाले होते स्वामींनी विधीवत शुभ महर्तावर सोमवारच्या दिवशी मंदिराचे काम सुरु केले होते. एवढ्या दुष्काळात बाबाजीच्या विहिरीला इतके पाणी लागल्याचे बघून सारे गांव हर्षित झाले होते व तन मन धन अर्पण करुन मंदिराचा पाया घेऊ लागले होते दिवसा मागून दिवस निघून चालले होते. स्वामींनी चालु केलेल्या मंदिराचा पाया पूण झाला होता एकाच वेळी पाचशे बैलगाड्या भक्तांनी बैलासह जुंपल्या व घडवलेल्या दगडांच्या जागेवर नेल्या त्या पालखेडवासी भक्तांनी एकाच वेळी ते दगड आश्रमात आणले त्यावेळी बाबांनी त्यांचा आनंद आणि भक्तांचे स्वागत टाळ्या वाजवून केले होते. यावेळी बाबाजींसह माधवगिरीबाबा, परमानंदगिरी बाबा, मधूगिरीबाबा होते, आश्रमाच्या आणि मंदिराच्या जागेत तो सर्व दगडं उतरवला गेला आणि मंदिराचे काम झटापट सुरु केले भराभर दिवस मावळत होते, मंदिराचे बांधकाम जमिनी पासून उंचावत होते. स्वामी भक्तांजवळ बसत होते योग्य त्यावेळी सूचना देत होते. सुचनेसह

साक्षात्कारही दाखवत होते मंदिराचे काम थोडेसे राहिले त्याचवेळी स्वामींनी छोट्याशा आश्रमाचेही काम सुरु केले होते. बाबांची जिवनसरणीय कशी अनोखी होती हेच कळत नाही बाबाजी जेव्हाही भक्ती कार्य करत होते त्यावेळी ते कशाचीची अपेक्षा करत नव्हते. अपेक्षा ठेवणारे तुम्ही आणि आम्ही म्हणून तर आपण असे आहोत. स्वामींनी जनतेला फक्त श्रमदान करायला लावले त्या मोबदल्यात त्यांनी किती आशिर्वाद दिला असेल याचे वर्णन हे अवर्णनीयच आहे . ह्या महान संताने लोकांच्या श्रमदानातून लाकांनाच पुण्याचा मार्ग दाखवून दिला होता. स्वामींनी हाती घेतलेल्या पारेश्वर मंदिराचे काम बरेचसे उंचावर गेले होते व आश्रमाच्या भिंतीही आता उभ्या राहिल्या होत्या स्वामींची आश्रमे बांधण्यासाठी नियमावलीच फार वेगळी होती. आश्रमाचे बांधकाम करतांना सर्व प्रथम ते विधी करायचे , तेव्हा ते भक्तांना विधी बद्दल वेगवेगळी माहिती द्यायचे. विधीला किती महत्व आहे, हे ते वेळोवेळी पटवून देत होते. बांधकाम चालू असतांना सातत्याने श्रमदान चालत असायचे , त्यातूनच नवे भक्त स्वामींच्या दर्शनाला यायचे ते झाले की स्वामी त्यांनाही श्रमदान करण्यास सांगायचे अशा वेळी कुणीतरी रोगी यायचे किंबहूना काहीतरी आपत्ती कोसळायची मग स्वामी त्यांनी विधी द्यायचे व विभुतीतून वेळोवेळी साक्षात्कार द्यायचे व साक्षात्कारातून भक्तांना खूप काही विशेष वाटायचे बऱ्या वेळा स्वामी प्रवचन सांगायचे , प्रवचनातून भक्तांना बरेचसे उपदेश मिळायचे , उपदेशातून त्यांना आश्रम बांधण्याचे मोल कळायचे , त्यातूनच ते भक्तींची सुरवात करायचे मग काय ? भक्त गण मन लावून श्रमदान करायचे , भक्तीचा मळा उभारण्यात रात्रंदिवस तयार असायचे यातूनच स्वामींचे काम पुढे सरकायचे व पुढे सरकलेल्या कामातून स्वामींच्या अवताराची कार्यपूर्ती व्हायची . भर दुष्काळात हाती घेतलेले श्री क्षेत्र पालखेड येथील पारेश्वराचे मंदीर संपूर्णतः पूर्ण झाले होते. त्यावर सुंदरसा कळस ही बसावला गेला होता कळसावर हिंदवी धर्माची भगवी ध्वजा पूर्व पश्चिम वाऱ्याने दक्षिणोत्तर दिमाखात फडकत होती पण स्वामींना प्राण प्रतिष्ठेची घाई झाली होती. आश्रमाचे छत पूर्ण करण्याचे काम भक्तगण करत होते. अखेर बऱ्याच कमी दिवसानंतर आश्रमाचे काम मंदिराबरोबर पूर्ण झाले . स्वामींनी वाकल्याला (ता. नांदगाव) निरोप पाठवून पंडीत काकांना बोलवण्याचे आमंत्रण दिले होते. पंडीत काका नियमानुसार हातातले काम टाकून स्वामींच्या आदेशाचे पालन करण्यासाठी श्री क्षेत्र पालखेड येथे आले व म्हणाले, 'काय बाबा ?' बाबा हसत हसत म्हणाले, 'आहो काका हे देऊळ पुरं झालं', आता येथे प्राण प्रतिष्ठा करायची आहे तेव्हा तुम्ही जयपूरला जा आणि चांगल्या मुर्त्या घेऊन या.

'बरं बाबा, जातो.'

असे म्हणत , काही क्षणानंतर काका पालखेडच्या लोकांसह जयपूर येथे गेले आणि स्वामींनी सांगितल्या तशा मुर्त्या घेऊन पालखेडला परतले . स्वामींनी मुर्त्यांच्या प्राण प्रतिष्ठेची तारीख जाहिर केली आणि त्यानुसार पालखेडची प्रजा कामाला लागली. १९७२

चा कडक दुष्काळ असून फार मोठा कार्यक्रम पालखेडच्या लोकांनी आयोजित केला होता. ठरलेला दिवस उजाडला त्र्यंबकेश्वर व नाशिकहून महान ज्ञानी ब्राम्हण त्या ऐतिहासिक पालखेडात आले व स्वामींच्या इच्छेनुसार विधीवत पारेश्वराची प्राणप्रतिष्ठा करु लागले , प्राण प्रतिष्ठा पूर्ण झाल्यावर महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला होता याच दरम्यान श्री क्षेत्र पूणतांब्याचे भक्त गण श्री.क्षेत्र वेरुळ येथे स्वामींना भेटण्यासाठी गेले होते तिथे गेल्यावर त्यांना कळाले की स्वामी पालखेडात आहे मग ते पालखेड्यात आले व स्वामींना भेटले. नंतर ते स्वामींना पुणतांबा येथे नेण्यासाठी विनवणी करु लागले होते व स्वामींनी त्यांना पुणतांब्याच्या काशिविश्वेश्वराच्या जिर्णोध्दारासाठी संमतीही दिली होती . प्राण प्रतिष्ठा पूर्ण होताच स्वामींना बराच आनंद झाला व त्यांनी त्वरीत प्रवचन चालू केले आणि त्यांच्या आनंदाची प्रचिती त्यांनी लोकांना दाखवून दिली प्रवचनातून स्वामींनी पालखेड वासीयांना बरेचसे अनमोल उपदेश केले, देव देवतांचे महत्व प्रकट करुन दिले. देवाची जाणिव यथायोग्य पध्दतीनी समजावून सांगितली . आश्रमात नियमीत विधी पूजा करण्यास सांगितले अनेक गोष्टींवर प्रवचन देऊन बाबांनी प्रवचनास निरोप दिला. दुष्काळग्रस्त भागात एवढे विशाल शिवालय नि आश्रम बघून भक्तांना खुपच आनंद झाला. पालखेड वासीयांनी प्रवचनानंतर मनमुराद पणे महाप्रसादाचा आस्वाद घेतला. आता बराच वेळ निघून गेला होता स्वामींच्या काही कार्याचा महिमा ह्या पालखेडात आता पूर्ण झाला होता. आणि उरलेल्या कार्यासाठी ही महान विभूती श्री क्षेत्र पुणतांब्याला जाणार होती धर्माचा कार्याचा भक्तीचा देवाचा योग्य असा महिमा गाजवून हा थोर अवतारी पुरुष पुणतांब्याला जाण्यासाठी निघाला होता. जिवनातले चौथे शिवालय बांधून आयुष्यातले काही कार्य करुन हा थोर संत आता पालखेड सोडून पुणतांब्याकडे रवाना झाला होता.

पिनाकेश्वराचे मंदिर स्वामींनी पहाडावर बांधले होते. सिध्देश्वराचे मदिर त्यांनी खडतर जमिनीत बांधले होते, जनेश्वर मंदिर त्यांनी शहरात बांधले होते तर पालखेड मधील पारेश्वर मंदिर त्यांनी भर दुष्काळात बांधले होते. आजही तेथे भक्तगण कार्तिकी अमावस्याला यात्रा भरवतात. सोमवारी ,गुरुवारी भक्तीने किर्तने भजन गातात. स्वामींचे नाम स्मरण करतात. आजही श्री क्षेत्र पालखेड येथे स्वामींचे उत्तराधिकारी १००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरी महाराज जातात. भक्तांना एकत्र घेतात वेगवेगळी सत्कार्य करण्यास लावतात व स्वामींच्या कार्याचा महिमा गातात. इ.स. १९९७-९८ मध्ये पालखेड येथे महामंडलेश्वर स्वामी शांतीगरीजींनी फार मोठा यज्ञ आयोजित केला होता. त्या कार्यक्रमासाठी श्री क्षेत्र पालखेड येथे अवघ्या वैजापूर तालुका एकत्र आला होता. स्वामींच्या कार्याचा महीमा गावून त्या जनसमुदायाने महात्म्यांनी पुरेपुर मदत केली होती आजही येथील जय जनार्दन भक्त मंडळ महात्म्यांना स्वामींच्या प्रचारासाठी अहोरात्र मदत करते व त्यांच्या आदेशाचे पालन करते. स्वामींचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरीजी महाराज खरोखर

एक दैवी शक्ती आहे याची प्रचिती आजही श्री क्षेत्र पालखेड येथील भक्तगण मोठ्या अभिमानाने देतात.महात्मांच्या आशिर्वादात्मक आदेशाने आज तेथे महेंद्र गिरी महाराज कार्य पहात आहे.

जनार्दन बाबा खरोखर एक अनोखे संत आहे याची जाणिव आता वेगवेगळ्या ठिकाणातील प्रजाजनांना झाली होती तसेच स्वामींनी भुतलावर जन्म घेतल्यापासून तर आतापर्यंत सारं आयुष्य ह्या समाजाच्या सेवेसाठी समाजाच्या उध्दारासाठी वेचले होते.एकेक दिवस उगवत होता स्वामींचे कार्य फुलंकित करुन मावळत होता. स्वामी कार्याची व धर्माची प्रचिती भक्तजनांना देत होते मानवी रूपाने जन्म घेतलेल्या ह्या भगवान शिवाच्या अवताराला संताचे वळण देत होते मागील संतांच्या कार्यासारखे महान कार्य रेखाटण्यासाठी स्वामी आता पुणतांब्याच्या भक्तांसह पुणतांब्याला जायला निघाले होते स्वामींनी आतापर्यंत बारा वर्षे अंदरसूल येथे तपश्चर्या केली , दैव प्राप्ती नंतर त्यांनी त्यांच्या कार्याची सुरवात जातेगांव क्षेत्रातील पिनाकेश्वराचे शिवालय बांधून केली हे शिवालय बांधता बांधता किती तरी साक्षात्कार दिले, जीवन जगण्यासाठी निरंतर उपयोगी पडतील असे उपदेशही प्रवचनातून दिले 'बाबाहो दान –धर्म करा , बाईला सांभाळ , परनिंदा ,परस्त्री यांचा त्याग करा'. असाच सल्ला प्रवचनातून देऊन त्यांनी धर्माचा व अवताराचा कार्य महिमा गाजवला होता देवाचा प्रसार त्यांनी संत तुकाराम , नामदेव, ज्ञानेश्वरी सारखाच केला. ह्या संतांनाच वेळेचे महत्व समजलं व वेळेनुसार ते देहाचा वापर करतात. जे कार्य देव करु शकत नाही ते कार्य संत करु शकतात. आणि म्हणूनच स्वर्गातील देव नेहमी मृत्यूलोकात येऊन राहण्याचा प्रयत्न करतात. नाहीतरी तुकाराम महाराज उगीचच म्हणत नाही

**स्वर्गाचे अमर इच्छिताती देवा**
**मृत्युलोकी व्हावा जन्म आम्हा**
**नारायण नामे होऊ जीवनमुक्त**
**किर्तने अनंत गाऊ गिते ।।**

तुम्हा आम्हासारख्या सर्व सामान्य लोकांना देह मिळाला आहे मात्र कळालेला नाही म्हणूनच आपण आपल्या देहाचा वापर सध्या वागतो तसाच करतो. श्री संत तुकाराम महाराजांच्या सांगण्यानुसार केवळ जगने आहे म्हणून जगायचे व वेळ संपली की तो नाशवंत देह पृथ्वीवर सोडून कुठेतरी निघून जायचे. एवढेच कार्य सर्व सामान्य मनुष्य मिळालेल्या देहातून करतो देवाला मात्र देहाचे महातम पुरेपुर कळाले आहे परंतु काय करणार त्यांना देह कळाला पण मिळाला मात्र नाही म्हणूनच तुकाराम महाराज म्हणतात की स्वर्गात अमर झालेले देव नेहमीच इच्छा प्रकट करतात की ह्या मृत्यूलोकात मानवी स्वरुपात जन्म व्हावा मानवाला जरी देह मिळाला पण कळालेला नसला किंबहूना देवाला जरी देह कळालेला असला पण मिळालेला नसला तरीही संतांना मात्र तो देह मिळालाही आणि पुरेपुर कळालाही

म्हणूनच स्वामी जनार्दन बाबा पुणतांब्याला चालले होते. स्वामींना मिळालेले आयुष्य हे परीसासमान होते म्हणूनच त्यांनी जागोजागी जाऊन प्रवचनातून , शिवालये स्थापून भक्तीचा महिमा गाऊन ह्या लोखंड युक्त गंजलेल्या जनतेला सुवर्णाचे स्वरुप दिले आयुष्यभर त्यांनी त्यांचे जीवन जनतेसाठीच खर्च केले आणि म्हणूनच जगदगूरु तुकोबा महाराज म्हणतात ते खरे आहे.

ह्या विश्वात भारत देश हा प्रगती पथाकडे वाटचाल करणारा विकसनशील देश म्हणून प्रख्यात आहे. परंतु संस्कृती या गोष्टीची विचारणा केली तर माझा भारत देश हा सर्वात अग्रगण्य आहे परंतु ही संस्कृती कुणामुळे टिकली ? हाच प्रश्न तुम्ही जर मनात आणला तर मन सहज भूतकाळात जाऊन सांगेल संतांमुळे . ह्या संतांनीच ह्या संस्कृतीला आधार देऊन जतन करण्याचे कार्य केले आणि तेच कार्य स्वामी जनार्दन करत होते. ते जागोजागी शिवालय स्थापित करत होते कारण त्यांना ठाऊक होते सर्व हिंदू बांधवांना मनशांती देणारे एकच ठिकाण आहे आणि ते म्हणजे शिवालय आणि म्हणूनच त्यांनी शिवालये बांधून जगाचे कल्याण करण्याचे कार्य कले. एक लक्षात घ्या , हा सूर्य ज्याच्यावर सारं जग चालतं , तो किती तास प्रकाश देतो फक्त बारा तास पण संत सदगुरु जनार्दन बाबा चोविस तास प्रकाशीत करत होते. स्वामी नेहमी प्रवचनातून बोलायचे' संतापाशी जाशाल तर कल्याण होईल वाईटापाशी जाल तर वाईट होईल. संताचे मनोगत ओळखा संताचा कोस काढू नका, संताचे दर्शन घ्या पाप कुठल्या कुठ जाईल.

झाले पाप ताप तुटी
दैन्य गेले उठाउठी ।।

एक विचार करावासा वाटतो ईश्वराने प्रत्येक भक्ताला निर्माण करतांनाच सर्व गोष्टी मोफत दिल्या आहेत एकाच वेळी सर्वत्र भ्रमण करणारे चंचल मन दिले आहे, क्षणात बदलणारी व सर्वांना सामावून घेणारी नजर दिली आहे दुसऱ्यावर प्रेम करण्यासाठी हृदय दिले आहे परंतु ईश्वराने एकच गोष्ट दिली नाही ती म्हणजे शांती. देवानं जर शांती ही आपणास दिली असती तर आपण एकदाही 'देवा' हा शब्द मुखाबाहेर काढला नसता आणि म्हणून आपल्याजवळ सर्व काही असले तरीही आपण ह्या शांतीसाठी देवापुढे लीन होतोच हिच शांती देण्याचे काम संतांनी केले. संत जनार्दनांना माहित होते की इंग्रजांच्या जाचामुळे हिंदवासी यांची शांती कुठल्या कुठ मावळली असेल, ह्या हिंदवी ध्वजेचे काय झाले असेल ह्या भक्तीच्या मळ्याचे काय झाले असेल आणि त्याच कारणावरुन त्यांनी ह्या मृत्यूलोकात संत रुपाने जन्म गेतला होता. त्यांना ठाऊक होते की शांती मिळण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे देवालय, भगवान शिवाचे शिवालय आणि म्हणूनच स्वामींनी जागोजागी शिवालये बांधले होते. त्यांना चांगलेच ठाऊक होते ह्या शिवालयात मन रमते, हृदय फुलते. निसर्गाचे निखारे फुलतात , जीव शांत होतो, अंतःकरणात शांततेचेच झरे उमटतात. म्हणूनच स्वामींनी

ह्या हिंदूसाठी किंबहूना त्यांना शांती मिळण्यासाठी शिवालय बांधले व शांती पसरवण्याचा प्रयत्न केला त्यांना चांगलेच ठाऊक होते की सामान्य माणूस आणि देव यांना भेटण्याचा सर्वात महत्वाचा महामार्ग म्हणजे शिवालय, शिवालयात गेले तर परमेश्वराशी संबंध साधता येतो. मन शुध्द करुन परमेश्वराशी मोकळ्या मनाने गप्पा मारता येतात. मनातली दुःखे व्यथित करुन काहीतरी सुख मिळण्याची अपेक्षा धरता येते आणि म्हणूनच त्यांनी संताचे कर्तव्य म्हणून शिवालये बांधण्याचाच निर्णय गेतला होता व ह्याच कार्याप्रित्यर्थ स्वामी पुणतांब्याला रवाना होण्यासाठी गाडीत जाऊन बसले होते.

गाडी भरधाव वेगाने पालखेड सोडून पुणतांब्याकडे धावू लागली होती बराच वेळ प्रवासात घालवल्यानंतर स्वामी सायंकाळच्या वेळी पुणतांबा ह्या गावी पोहचले होते. स्वामींना घेण्यासाठी पुणतांबा येथील आप्पासाहेब धनवटे, भाऊसाहेब फोफसे, आले होते त्यांच्यासह पंडीत काका व वेरुळ येथील काही भक्तगण होते. गेल्या गेल्या स्वामींनी योगीराज चांगदेव महाराज यांच्या समाधीस्थळी मुक्काम करण्याचे ठरवले व मुक्कामास गेले. बाबा पुणतांब्यास आले ही चर्चा पुणतांब्यात आणि जवळच्या गावात लवकर पसरल्याने तेथील भक्तगण अगोदर स्वामींच्या स्वागतासाठी पुणतांब्यात आलेली होती सर्व बाबाजीस सांगू लागले की पुणतांब्यास काशिविश्वेश्वराचे मंदिर आहे परंतु ते मंदिर काळाच्या ओघात प्रमाणापेक्षा जास्त जीर्ण झाले आहे, डबघाईसही आले आहे, तो जिर्णोध्दार तुमच्या हातून व्हावा ह्यासाठी आम्ही तुम्हाला घेण्यासाठी आलो होतो. त्यांनी बाबाजीस हेही सांगितले की ह्या गावातील बरेचसे भक्तगण श्रमदान कार्यास तयार आहे बऱ्याच वेळचर्चा झाल्यानंतर बाबीजी म्हणाले, 'बरं उद्या या.' आलेले भक्तगण बाबाजींचे दर्शन घेऊन परतले. बाबांनी नित्य नियमाने स्नान करुन विधी केली व ध्यानही केले. आता उद्यापासून स्वामी काशिविश्वेश्वराच्या जिर्णोध्दाराच्या कार्यात मग्न होणार होते स्वामी ज्या पुणतांबे गावात कार्यासाठी आले होते ते पुणतांबे गांव अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामांच्या नावाने प्रचलीत असलेल्या श्रीरामपूर तालुक्यातील छोटसं पुर्ण दैववादी गाव आहे, हे गांव त्र्यंबकेश्वर येथे उगम पावलेल्या शिवशिखरी गोदावरीच्या तिरावर बसलेले आहे व गोदावरी सारख्या तिरावर असलेले गाव जरा प्रमाणापेक्षा अधिक पुण्यवान समजले जाते नाहीतरी संतजण कायम म्हणत असतात.

**मुळ स्थळ ज्याचे गोदामाता तिरी**
**तो हा सांभाळीत दोरी**

असे हे पुणतांबा गांव आहे. निसर्गाच्या कुशीत फुललेलं व दैव साधूसंताच्या वास्तव्याने पुनीत झालेले हे एक पुण्यवान गांव, गावाच्या दक्षिणेस गोदावरी माता दक्षिण वाहीनी म्हणून सदैव वाहत असते. हेच ते पुणतांबे की ज्या गावात महर्षि चांगदेव महाराजांची समाधी आहे, ह्याच गावात चांगदेव महाराजांनी बरेचशे वर्ष भगवान शिवाचे तप करुन

चौदाशे वर्ष आयुष्य मिळवले होते . ह्याच गावात त्यांनी भगवान शिवाला आपले सगळं रुप प्रकट करण्यास भाग पाडले होते. असे म्हटले जाते की भगवान शंकराने चांगदेव महाराजंना कधी काशिविश्वेश्वराच्या रुपात तर कधी रामेश्वराच्या रुपात तर कधी वटेश्वराच्या रुपात दर्शन दिले होते आणि म्हणूनच या गावास कधी रामेश्वर तर कधी वटेश्वर म्हणतात कठोर तप साधना करुन साक्षात शिवाला तीन वेळा एकाच गावात दर्शन देण्यास भाग पाडणाऱ्या या श्री चांगदेव महाराजाची समाधी ह्याच पुण्यवान पवित्र पुणतांब्याच्या भूमित आहे.

अशा ह्या पुण्य पवित्रवान पुणतांब्याच्या भूमीचे स्वामींनी आल्या आल्या हात जोडून दर्शन घेतले होते व नीट बारीक नजरेने बघितले ही होते. स्वामींनी त्याच वेळी विचार केला असावा श्री चांगदेव महाराजांना भगवान शिवानेच आशिर्वाद दिला होता अशा ह्या शिष्याच्या समाधी शेजारीच शिवाचे शिवालय आहे परंतु हे शिवालय प्रमाणापेक्षाही जिर्ण आहे व ह्याच्या जिर्णोध्दारासाठी बरेचसे ध्यान करावे लागेल. याचं कारणावरून स्वामींनी आल्याच्या पहिल्याच रात्री बराच वेळ ध्यान केले दुसऱ्या दिवसापासून विधी करुन कोटाच्या कामासाठी नारळ आणले गेले होते . सकाळी सकाळी आठ नऊ वाजेच्या सुमारास सर्व शिष्यगण चांगदेव महाराजाच्या समाधी स्थळी जमा झाले होते बाबाजी अजूनपर्यंत चांगदेव महाराजांच्या समाधीस्थळातून बाहेर आलेले नव्हते.तेथे त्यांची विधीच चालूच होती, विधी झाल्यावर मात्र स्वामी पंडीतकाकासह बाहेर आले. विशाल तेज त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते चालता चालता बाबा म्हणाले, आले का रे चला दोन जण इकडं तो झाडू घ्या आणि करा साफ पटांगण . पटांगण काही वेळेत साफ केले गेले . गौंड गावच्या भक्तांनी गवंड्याला सोबतच आणले होते बाबाजींनी सर्व प्रथम शुभ मुहर्त पाहीला व विधी पूजा करुन नारळ फोडले आणि सर्वप्रथम कोटा च्या पायासाठी जमीन खोदायला सांगितली कार्याला सुरवात झाली बाबाजींचा महीमा पुणतांबावासियांना कळू लागला, श्रमदान करणाऱ्या भक्तांमध्ये विलक्षण वाढही होऊ लागली कोटाचा पाया आता जवळ जवळ पूर्ण होत आला होता तो पर्यंत बाबाजींनी कीतीतरी साक्षात्कार त्या पूण्यपवीत्र भूमीत दाखवून दिले होते . किर्ती समजून घेण्यासाठी तेथील भक्तगणांना फारसा वेळ लागला नव्हता त्यामुळे इतक्या लवकर कोटांच्या पायाचे काम पूर्ण झाले होते. नाहीतरी बाबाजी आता सिध्देश्वरांच्या शिवालयापासून कार्याची आखणी पिनाकेश्वरापेक्षा कितीतरी अधिक वेगाने करुन लागले होते दिवसभर उन्हातान्हात भक्तांजवळ बसत होते . त्यांची जबाबदारी अंगावर असल्यामुळे त्यांच्यासाठी ते तेथेच बसत होते हळूहळू चालणाऱ्या कार्यास चैतन्यरुप मिळत होते पूर्व गोदावरीच्या उत्तरेस व काशिविश्वेश्वराच्या बाजूस कोट ही तयार झाला होता लगेचच दुसऱ्या दिशेचा कोट बांधण्याचे कार्य बाबाजीने हात घेतलेले होते . दगड कमी येण्याची शक्यता तीव्रतेने जाणवू लागली होती . भक्तगण बाबाजीजवळ दगड कोठे मिळेल ही प्रश्नावली सांगत होते बाबाजी त्यावळीआप्पासाहेबांना म्हणाले ''चला मला घेऊन गोदावरीच्या

पायाजवळ'' काही भक्त जेवढे दगड आहे तेवढ लावत होते बाकीचे बाबाजी बरोबर गोदावरीच्या तिरी गेले. पहारीवाल्या भक्तांना बाबाजी म्हणाले ,

एकदा जोरात आरोळी द्या
श्री काशिविश्वेश्वर भगवान की जय
गोदावरी माता की जय
पिनाकेश्वर बाबा की जय
नागा बाबा की जय

भक्तांनी फार मोठ्या उत्साहाने घोषणा दिली व बाबाजीकडे टक लावून बघत राहीले बाबीजी म्हणाले,

अरे काय पहाता खंदा ..... ना .......खंदा पहाना दगड. पाहरीवाल्यांनी पहार गोदामाताच्या तिरावर चिरकालापासून विसावा खाणाऱ्या जागेत रोवली तिन चार फूट पहारी जमीनीत रुतल्यावर अचनाक टन टन आवाज येऊ लागला भक्तांना आश्चर्य वाटले भक्तांनी अजून खाली खोदण्याचा प्रयत्न केला बघता तर काय सारा लाल दगड भक्तांमध्ये काही क्षणात बाबाजींनी नवचैतन्य फुलवलं भक्तांचा आनंद क्षणात गोदामातेचा तिर पार करुन आला बांधकाम दगडापरी दगडाने वर चालले होते. गोदातिरावरील दगड क्षणोक्षणी शिवालयाकडे सरकत होता कोटाचे कामही आता पूर्ण झाले होते, अत्यंत सुंदर सुबक व मजबूत असा कोट आजही त्या पुणतांब्यात त्या जनता जनार्दनांचे स्वागत फार दिमाखाने करतो आहे. फार मजबूत व कणखर असा कोट त्या जिर्ण काशी विश्वेश्वरापुढे तयार झाला होता . आता स्वामींनी त्यानंतर काशिविश्वेश्वराचे शिवालय बांधण्याचा निर्णय घेतला होता ह्या नुतन कामासाठी मुळ गर्भगहिका गळून जमिनदोस्त झाली होती व त्यातील भगवान शिवाचे शिवलिंग जमीनीपासून सतरा अठरा फूट खोलीवर बसलेले होते. शिवलिंग जमीनीपासून बराच खोलवर जाऊन बसले असल्याने यापूर्वी शिवभक्त ह्या शिवाचे दर्शन घेण्यासाठी भूयारी मार्गाने खाली जात असायचे सध्य स्थितीला शिवलींग जरी जमिनीपासून सतर आठरा फूट खोलीवर असले तरीही ते वरती काढणे गरजेचे होते आणि शिवलिंग जमिनीपासून इतक्या खोल अंतरापासून दूर काढायचे म्हणजे त्या शिवलिंगाचे किती हाल होंणार याच कारणामिमांसेमुळे स्वामींना तेथेच अनेक वेळा ध्यानाला बसावे लागत असायचे जणू काय त्यांना ह्या शिवशंकराला होणाऱ्या त्रासाची भिती वाटली म्हणून सर्व जबाबदारी डोक्यावर घेऊन बाबाजी काळजीने शिवलिंगाकडे बघत होते व एक एक लाखमोलाचा निर्णय भक्तगणांना सांगत होते जमिनीपासून अठरा एकोणावीस फुटाचा खड्डा सर्वप्रथम खोदण्यास लावत होते खोदता खोदता मजूरपक्ष किती तरी अंतर खोलीवर जावून पोहचला होता तेथुन शिवलिंगापर्यंतचा प्रवास काही क्षणाचा व काही अंतराचाच उरला होता. सारे पुणतांब्याचे भक्त कामात तल्लीन झाले होते बाबाजींची पालखी ही दररोज रात्रंदिवस

काशिवविश्वेश्वराच्या दरबारात हजर रहायची खड्डा खोंदल्यनंतर बाबाजींनी क्षणाचाही विलंब न लावता भक्तांना चारही बाजूंना पहारी लावण्यास सांगितल्या बराच वेळ प्रयत्न करुनही भक्त गण त्यात अविजयी झाले बाबाजीही शेजारीच होते त्यांचा चेहरा विलक्षण बदललेला होता त्यांच्या कपाळपट्टीवर कितीतरी घामाचे दवबिंदू जमा झाले होते डोळ्यात विलक्षण अश्रू तरळत होते आणि हे बघून भक्तांच्या अंगावर केवळ रोमांचच उठत होते बाबांना काळजी लागली भक्तांना आता मातीत रुजलेला काशिविश्वेश्वराची व समोर बसलेल्या जनेश्वराची काळजी लागली होती पण भक्त तरी काय करणार त्यांनी जोराची घोषणा दिली

**काशिविश्वेश्वर भगवान की जय**
**जनेश्वर भगवान की जय**
**गोदामाता की जय**

बाबाजी पिंडीजवळ बसले सर्व अंगाला भस्म लावला काही क्षणात भक्तांना बरेच अंतर दूर करून ध्यानाला बसले . बाबांनी स्वतःला सावरण्याचा बराचसा प्रयत्न केला आता बाबांच्या डोळ्यातील अश्रू कुठल्या कुठे निघून गेले होते बाबाजींनी दोन्ही हातात शिवलिंग धरले बरेचसे ध्यान केले , डोळे मिटले भक्तांना समोर काय चालू होते हेच कळाले नाही त्यावेळी सारा खेळ जनेश्वरांनी व काशिविश्वश्वरांनीच रंगवला होता . काही क्षणानंतर भक्तांनी बाबाजी हाताकडे बघितले व चकितच झाले, त्यांचा त्यांच्यावर विश्वास बसेना समोरचे चित्र फारच बदलले होते काशिविश्वेश्वराचे शिवलींग ह्या टापरगांव येथे जन्मलेल्या जनेश्वराच्या हातात होते सर्वांनी स्वामींचा जयजयकार केला , लिंग बाहेर काढल्यावर विधी नियमाने त्याची पूजा केली व मोठ मोठयाने जयघोष करत रामेश्वराच्या मंदिरात ठेवला व नवचैतन्याने गर्भगृहाचा पाया खोदण्यास सुरवात झाली . बाबाजींच्या साक्षात्काराची जाणीव भक्तांच्या मनात अजूनही रेंगाळत होती व तितक्याच गतीने ती भक्तमंडळी गर्भगृहाचे कामही पूर्ण करण्याचा प्रयत्न करीत होती आजूबाजूच्या भिंतीनी काशिविश्वेश्वराचा शिवालयाला अजोड असे रुप दिले प्रवेशद्वार ही फार दिमाखाने रोवले गेले त्यावेळी मात्र दगड पूर्णतः संपष्टात आला होता दगड संपण्याआधिच देवाने स्वामींच्या दगडाची तरतूद करुन ठेवली होती व त्यानुसार वेरुळ येथे कुणीतरी कशासाठी तरी योग्य प्रतिचा दगड घडवून ठेवला होता. बाबांनी वेरुळवरुन दगड पूणतांब्याला बोलवला भक्त ट्रकमधून वेरुळच्या घृष्णेश्वराच्या दरबारातून दगड पुणतांब्याच्या काशिविश्वेश्वराच्या दरबारात मोठ्या आभिमानाने आणत होते . बघा काय प्रभूची लीला अपार होती ह्यावेळी एक शिव अवतारी पुरुष एका शिवाच्या दरबारातून दुसऱ्या शिवाच्या दरबारात त्याचा दगड आणत होता आणलेल्या दगडाने मंदिराचे काम पुन्हा एकदा अनोख्या वेगाने सुरु झाले. बाबाही थोडे फार आनंदमयी वाटत होते बाबांचा आनंद बघून भक्तही आनंदाने नाचायचे व नाचता

नाचता शिवालय पुर्ण करण्याचा प्रयत्नही करायचे.

आठ दिवसात तोही दगड संपला, बाबांनी पुन्हा भक्तांना आदेश दिला व पुणतांब्याच्या उत्तरेतील खाणीचा दगड घडवण्यास सांगितला भक्तांनी बाबांच्या आदेशाचे पालन करून दगड काढला नि घडवण्यास सुरवातही केली. एकेक दिवस जाऊ लागला बाबाजी विलक्षण घाई करु लागले त्यांचे मन कसे होते हे कुणालाच सांगता येत नव्हते यावरुन कसे काय करावे हे भक्तांना कार्याखेरीज काही समजत नव्हते . तरी देखील बाबाजी फार मोठ्या आशेने भक्तांना दिलासा देत होते. असे सांगतले जाते दगड घडवत असतांना एक कारागिर त्याच्या शक्तीपेक्षा किती अधिक पट जड दगड घेऊन वर चढत होता प्रथम तो दगड उचलनेच अशक्य होते व नंतर तो घेऊन वर चढत होता प्रथम पराकोटीचे अशक्य होते तरी देखील त्याने इतके बळ कोठूण आणले असावे हीच चिंता इतरांना लागली होती व तो दगड घेऊन कदाचित पडेल असे चिन्ह डोळ्यासमोर दिसत होते. अखेर तेच झाले त्याचा तोल गेला व तो दगडासह खाणीत कोसळला. क्षणात वातावरण बदलले सगळीकडे हाहाकार माजला त्याला उचलून बाबाजींकडे आणले बाबाजींनी त्याला पाणी पाजले तो पुर्णतः शुध्दीवर आला व जोरात म्हणाला,

**बोला जनार्दन बाबा की जय.**

ह्या संताची कृपाछायाच अपार होती की त्या कृपाछायेत भक्त निश्चीत होता त्या उंच शिखरावरुन खाली दगडासह कोसळलेल्या बाबाजींच्या शिष्यास साधा वरखडाही बसला नव्हता म्हणजे कीती उदात्त अंतःकरण होते या संताचे, किती शक्ती होती ह्या बाबांची

सन १९७१-७२ चा कालकंड असावा तो परंतु डिसेंबर महिना होता. नोव्हेबरच्या अखेरीस बाबांनी हाती घेतलेल्या काशिविश्वेश्वराचे शिवालय संपुर्णतः पुर्ण झाले होते. चांगदेव महाराजांसारख्या पुण्यवान संताने वास्तव्य केलेल्या पुणतांब्याच्या भूमीत ह्या शिवावतारी संत जनार्दनाने आता काशि विश्वेश्वराचे शिवालय पुर्ण केले होते. गोदावरीच्या तीरी भव्य दिव्य असे अनोखे शिवालय चांगदेवांच्या समाधी शेजारी फार दिमाखाने येणाऱ्या भक्तांचे स्वागत करत होते. जसा एखादा विद्यार्थी वर्षभर कसून अभ्यास करतो, परंतु त्या वर्षभर केलेल्या अभ्यासाचा इतिहास तो तीन तासात त्या पेपरात उतरवतो तसेच बारा वर्ष तपसाधना करणाऱ्या ह्या साधकाने त्याच्या भविष्यकाळ व भूतकाळाचा इतिहास अवघ्या तीन महिन्याच्या वर्तमानात त्या पुणतांब्याच्या भूमित उभा केला होता. याची साक्ष आजही तुम्हांला पुणतांब्याचे काशिविश्वेश्वराचे शिवालय दिल्याखेरीज राहणार नाही. चौदा जुनी लाल रंगाचे बडलेल्या दगडाचा कोट रक्षक म्हणून उभा केला होता.वेरुळहून व खाणीतून बडवलेल्या दगडाने काशिविश्वेश्वराचे शिवालय पुर्णपणे गोदावरी तिरावर उभे झाले होते. त्याच्या कळसावर स्वामींनी त्यांच्या अवताररूपी कार्याची ध्वजा हिंदवी प्रतिकेची ध्वजा

म्हणून रोवली होती. अवघ्या विश्वास पाणी देणाऱ्या त्या शिवशिखरातून निघालेल्या गोदावरीतीरावर वसलेल्या ह्या काशिविश्वेश्वराच्या मंदिरावरील ध्वजा स्वामींच्या कामाची पावती जगाला सदैव देण्यासाठी फडकत होती व आजही फडकत आहे. डिसेंबर महिन्यात बाबांनी वेरुळ प्रमाणे जपानुष्ठानाचा कार्यक्रम घेण्याचे ठरवले. जवळजवळ साठ ते सत्तर भक्तगण बाबाजींच्या अनुष्ठानास तयार जाले. शुभ योग म्हणून दत्तजंयतीचा दिवस घेतला. स्वामींना शिवशंकराप्रमाणे दत्तांची पुजा करणेही फार आवडायचे आणि म्हणूनच त्यांनी दत्त जयंतीच्या शुभमुहूर्तावर अनुष्ठान घेतले होते. काशिविश्वेश्वराच्या शिवालयापुढे स्वामींचे अनुष्ठानार्थी बसले. नित्यप्रमानुसार सर्व काही पार पडत होते. बाबाजी साक्षात्कार दाखवत होते. भक्तजण वेळोवेळी जप करत होते. बरेचसे उपदेश बाबाजी प्रवचनातून करत होते व अशातच अनुष्ठानाचे दिवस पुढे सरकत होते. मंदिरातील जिर्णोद्धाराचे कार्य पुर्ण झाले होते मात्र प्राणप्रतिष्ठेचे कार्य अजुन बाकीच होते. तीच जुनी पिंड तिच्या जागेवर काही विधी न करता ठेवण्यात आली होती. सप्ताहाचा शेवटचा दिवस उगवला होता. दत्त जयंती जपानुष्ठानानिमित्ताने गोंडगाववाले व पुणतांबावाल्यांनी बराच मोठा महाप्रसादाचा कार्यक्रम ठेवला होता, नाहीतरी भक्तांना आता माहित झाले होते की बाबाजींना श्रमदानाबरोबरच अन्नदानही आवडते. बरोबर सकाळी नऊच्या सुमारास बाबाजींनी भक्तांचे मौन सोडले. गोदावरीच्या तिरावर चांगदेव महाराजांच्या साक्षीने व काशिविश्वेश्वराच्या साक्षीने स्वामींनी प्रवचन चालु केले, प्रवचनास बाबांनी सुरुवात केली.

बाबाहो आपले काशिविश्वेराचे काम पुरे झाले, माझं काम फक्त शिवालय बांधायचे होते ते मी केले. आता तुम्ही लक्षात घ्या देवाचं काम देवच करतो, तुम्ही मला इथ आणलं, मला मदत केली व मी एका संताच्या रुपानंच तुम्हाला काम सांगितलं होतं. म्हणून मी सांगतो देवा सारखाच संताला भजा, संत सापडला की देव सापडलाच समजा. पण संताची भेट व्हायलाही फार मोठं पुण्य लागतं. मिराबाईला संताचा सहवास झाला होता आणि म्हणूनच तिनं देवाची भेट घेतली, आपण नेहमी ऐकतो ना,

**आई म्हणे धांगड झाली , फुगड्या संता संगे खेळू लागली ।**
**बा म्हणे मारा ईला । पाजा जहेराचा प्याला ।**
**जहर प्याली न मिराबाई । जहर पिऊन मरण नाही ।**
कशी मरल...
**सद्‌गुरु सारखा पाठीराखा असता ।**
**इतरांचा लेखा काय करील ।।**

ऐकलं का लोकोहो, जहर पाऊन बी मिराबाई मेली नाही. कशी काय मरल, तिचा पाठीराखा तिचा रक्षण करणारा सद्‌गुरु होता. म्हणून म्हणतो संताजवळ जा, तुकाराम महाराज म्हणतात ना,

तुका म्हणे पापे ।
जातील संताचिया जपे ।

संतासंगे राहिले तर पाप बी निघून जातं लक्षात घ्या.

संताजवळ गेल्यावर धर्म कळेल, हा धर्म इतर ठिकाणी नाही . धर्म फक्त संताजवळच आहे. संताशिवाय धर्म कोणाला कळला का नाही. आणि ह्याच धर्माच्या रक्षणासाठी संत लोक इथ जन्म घेतात.

धर्म रक्षावया श्री हरी ।
धरीती अवतार भुतारी ।

कुठेही गेले तर सुख मिळणार नाही सुख मिलेल ते फक्त संताच्या पायापाशी म्हणूनच तुकाराम महाराज म्हणायचे

सुख उपजे ज्या नयी । मरे त्याच ठायी ।
सुखाला तरणोपाय नाही । सुख लागते संतांच्या पायी ।
संत चरणावेगळा ठाव नाही ।

बाबाजी बोलत होते, भक्तजण बाबांचा उपदेश कानातून मनात उमटवत होते. हा सारा खेळ धर्मप्रसाराचा व कार्याचा चालु होता. स्वर्गमंचकरतील देव मृत्युलोकाबाबत निश्चित झालेले होते.

बराच वेळ प्रवचन झाल्यानंतर बाबा कार्यक्रमाच्या टोकाला गेले. बाबाजी बराच मोठा लाखमोलाचा उपदेश देऊन प्रवचनास सांगताही दिली होती, महाप्रसाद प्रमुखाने स्वामींच्या आशिर्वादासाठी स्वामींपुढे महाप्रसादाच्या पाट्या ठेवल्या त्यावर हात ठेवत अन्नविषयीचे मंत्र पठण केले व आदेश दिला की कुणीही महाप्रसादाचा लाभ घेतल्याशिवाय जाऊ नये. स्वामी अजुनही स्टेजवर बसलेले होते. समोर कितीतरी भक्त महाप्रसादाच्या लाभांसाठी पंगती धरून बसले होते, सर्वांना हळूहळू पकवान्न वाढले गेले, स्टेजवरून एका अनुभवी म्हाताऱ्याने मोठ्याने आवाज काढला,

पुंडलिक वरदा हारी विठ्ठल
श्री ज्ञानदेव तुकाराम
पंढरीनाथ महाराज की जय,
काशिविश्वेश्वर महाराज की जय
चांगदेव महाराज की जय
संत जनार्दन बाबा की जय

बसा, सर्व जणांच्या मुखात जाणारा महाप्रसाद स्वामींनी डोळे भरून बघितला व निर्णय घेतला त्र्यंबकेश्वरला जाण्याचा स्वामींनी प्रमुख कार्यकत्या भक्तांना बोलावले व सांगितले 'मला त्र्यंबकेश्वरला लगेचच जायचे आहे. माझं काम जेवढं होत तेवढं मी केलं

आता मी जातो.

भक्तांच्या पुर्णतः नाईलाज झाला. स्वामींना थांबवण्याचा त्यांनी आटोकाट प्रयत्न केला. परंतु स्वामींचे मन टाळण्यास ते असमर्थ ठरले. सध्याच्या त्यांच्या कार्यात तरी स्वामींनी घेतलेला निर्णय दुनियाची कोणतीही ताकद मोडू शकत नव्हती. का ? कुणास ठाऊक पण स्वामींना शिवाचे दुसरे घर म्हणजे त्र्यंबकेश्वर येथे जाण्यास फारच घाई झाली होती. त्यांना कधी एकदा त्र्यंबकेश्वर येते असे झाले होते. त्यांनी घेतलेल्या निर्णयामुळे पुणतांब्याच्या भक्तगणांनी त्यांना त्र्यंबकेश्वर येथे नेण्याचा निर्णय घेतला. त्यांच्याबरोबर पंडित काका, पांडु देवा सोनवणे, कासार व इतर असे बरेचसे शिष्य होते. शिवाय संन्यासी वृंदही बरोबर होतेच. बरोबर दुपारी दोन – तीनच्या सुमारास पुणतांबा शिष्यमंडळाने स्वामींना त्र्यंबकेश्वरला नेण्यासाठी सुरुवात केली.

स्वामी निघून गेले होते. मंदिराचा जिर्णोद्धार झाला होता परंतु मंदिरातील काशिविश्वेश्वराची प्राणप्रतिष्ठा मात्र बाकीच होती. स्वामी प्राणप्रतिष्ठा न करता निघून गेले होते. प्राणप्रतिष्ठेविना हे मंदिर संकटातच वावरत होते, विना प्राणप्रतिष्ठा ह्या शिवालयाने बारा वर्ष उनपावसासी झुंज दिली. बारा वर्षे वनवास पूर्ण झाल्यावर मात्र पुन्हा ऑगस्ट महिन्याचा शुभमुहूर्त पाहून स्वामी पुणतांब्यात आले तो पर्यंत स्वामींच्या कार्याची ध्वजा अवघ्या महाराष्ट्रात फडकू लागली होती. तत्पुर्वी पिनाकेश्वर सारखी , औरंगाबाद येथील जनेश्वर, पालखेड येथील पारेश्वर, त्र्यंबकेश्वर येथील हृदयेश्वर शिवालय पुर्ण झाले होते. वेरूळ गावात विद्यार्थ्यांसाठी गुरुकुलही चालु झाले होते. टुनकी, उपखेड, वेरूळ गावांमध्ये आश्रमे उभारली गेली होती आणि एवढे कार्य करुन दहेगावात जन्म घेणारी ही महान विभुती सन १९८४ मधील ऑगस्ट महिन्यातील पंधरा तारखेला पुणतांब्यात येऊन उतरली होती. सगळीकडे मनांपेक्षा जास्त आनंद पसरला गेला होता. स्वामींनी गावातील दोन चार भक्तांना पंडीत काकांसह जयपूरला पाठवले होते तेथून लिंग व पिंड मागवले होते. नंतर १९ ऑगस्ट १९८४ चा शुभ दिवस लक्षात घेऊन मोठमोठ्या विद्वान ब्राम्हणांच्या हातून त्या काशिविश्वेश्वराची प्राणप्रतिष्ठा केली होती. कदाचित इतर कार्यानंतरच काशिविश्वेश्वराची प्राणप्रतिष्ठा करावी हा आदेशच स्वामींना स्वतः त्यांच्या अवताराने म्हणजेच सदाशिवाने दिला असावा. म्हणून स्वामीनी महाप्रसादाचा कार्यक्रम बघितल्या बघितल्या त्र्यंबकेश्वर येथे जाण्याचा निर्णय घेतला असावा.

कोपरगांव–सिन्नर–नाशिक मार्गे बाबा त्र्यंबकेश्वरला सायंकाळी आठ वाजता पोहचले असावे. पुणतांबा भक्त परिवाराने स्वामींना त्यांच्या माहेरघरी सोडले व आशिर्वाद घेऊन जाण्यास निघाले स्वामींनी फार उदार अंतःकरणाने त्यांना आशिर्वाद दिला. बाबाजींचा आशिर्वाद पुणतांबा भक्तांना पुरलाही व पुरुण उरलाही. आजही तेथील काशिविश्वेश्वराची देखभाल स्वामी शांतिगिरीजींच्या आशिर्वादात्मक प्रेरणेने दरेगाव येथील श्री केश्वानंदगिरी

बाबा फार आनंदाने करता. तेथे दर दत्तजयंतीला उत्तराधिकारी (स्वामी शांतिगिरी) येऊन जपानुष्ठान करतात, वेगवेगळे कार्यक्रम घेतात, सायंकाळी साडेपाच ते साडे सातचा दरम्यान वृध्द व स्वामी शांतिगिरीजींच्या प्रेरणेने तरुण भक्तमंडळी त्या गोदावरीच्या खळखळत्या पाण्याच्या तीरावर बसलेल्या काशिविश्वेश्वराच्या शिवालायात जमतात व फार मोठ्या मधुर आवाजाने नि सुरेख तालाने आरती म्हणतात व विधीही म्हणतात. पुणतांबा भक्तगण श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरातून गेल्यावर स्वामी इतर भक्तांसह स्नानासाठी गेले. स्नान झाल्यावर विधी वाचली व थोडे ध्यान केले. स्वामींना वेरूळ जसे सर्वाधिक आवडायचे तसेच त्र्यंबकेश्वर ही आवडायचे. दरवर्षी ते श्रावण वारीस वेरुळहून त्र्यंबकेश्वरला येत असायचे. बराच वेळ उलटल्या नंतर भक्तगण झोपी गेले. स्वामींची त्र्यंबकराज्याशी काय बोलणी झाली हे त्यांनाच माहिती पण फार उशिरा ते त्या शिवालयाबाहेर आले. दुसऱ्या दिवशी स्वामी भक्तांसह पहाटे साडे-तीन वाजेच्या सुमारास उठले, स्नान झाल्यावर स्वामींनी नित्यनियमाने विधी वाचली, आरती म्हटली, ध्यान लावले व थोडा वेळ झाल्यावर त्यांनी भक्तांना 'वेरुळ चला' सांगितले व भक्तही स्वामींना न्यायला तयार झाले. स्वामींचे प्रत्येक शिष्य निस्वार्थपणे स्वामींची सेवा करत होते, स्वामी जेव्हा म्हणतील तेव्हा जिथे म्हणतील तिथे ते स्वामींना नेत होते, स्वामींचा आदेश ते मिळणाऱ्या आशिर्वादाप्रमाणे झेलत होते. स्वामींचे कार्य करतांना त्यांनी कधीही स्वतः मध्ये कमरता भासु दिली नाही. ह्या निष्काम कर्मयोगी साधकाची सेवा ते निस्वार्थपणेच करत होते. त्याचमुळे स्वामींचा आदेश ऐकताच ते स्वामींना घेऊन वेरुळला निघाले. वेरुळ गेल्यानंतर स्वामींनी सिध्देश्वराच्या शिवालयातच मुक्काम केला. स्वामी बऱ्याच दिवसानंतर त्या दिवशी वेरुळला गेल्यामुळे स्वामीची बातमी अख्या वेरुळला लागताच सारी वेरुळ नगरी त्या घृष्णेश्वराकडे लोटली गेली. शिष्यांना पहाताच स्वामींनी त्यांची डोली शेतात न्यायला लावली व स्वामींनी त्यावेळी एक उपदेश केला, ' मी इथं असो नसो तुम्ही इथे येऊन काम करत जा, आपल्याला इथं गुरुकुल उभं करायचं आहे. ज्या गुरुकुलात तुमचे किंवा तुमच्या सारख्या गरीबांचे मुल शिक्षण घेतील, ज्या गुरुकुलातून काहीजण डॉक्टर होऊन समाजाची सेवा करतील, काहीजण शिक्षक होउन धर्माचा प्रसार करतील तर काहीजण सैनिक होऊन आपल्या भारत मातेचे रक्षण करतील'. तुम्ही फक्त मी आल्यावरच येतात नि काम करतात, बाबाहो हे सारं तुमचंच आहे. मी आता पुन्हा त्र्यंबकेश्वरला जाणार आहे. तिथं जाऊन हृदयेश्वर भगवानाच्या मंदिराची प्राणप्रतिष्ठा करायची आहे. ते झालं का बाबा पुन्हा इथं येणार आहे. तोपर्यंत आपली जेवढी सत्तर ऐशी एकर जमीन आहे ती निट करा, बाबाची सेवा केली तर मेवा मिळेल, देव कायम आपल्यावर लक्ष ठेवतो, ज्याला काम करायचं असल त्यानेच काम करा, त्याला करायच नसेलं त्याने नका करू, बाबाची बळजबरी काहीच नाही. चला, घ्या टिकाव फावडे आणिक काढा ते बांदावरच गबळ.

बाबाजींच्या उपस्थितीत श्रम कसे उरकायचे हेच कळत नसायचे. बाबाजींचा

उपदेश हा नेहमीच साध्या नि सरळ वाणीचा असायचा. तो उपदेश भक्ताच्या मनात पुरेपुर रुजायचा व श्रमदानातून त्या मातीत फुलकित व्हायचा. बाबाचा महिमाच फार अपार होता. बाबाजीने इ.स. १९७० ते ७२ दरम्यान औरंगाबादचे जनेश्वर, पालखेडच्या पारेश्वर नि पुणतांब्याचे काशिविश्वेश्वर हे तीन शिवालय पूर्ण केले होते. ह्या डिसेंबर १९७२ मध्ये बाबाजी वेरुळचे कामकाज व्यवस्थित लावून पुन्हा देवाचे कार्यसमजून हृदयेश्वराची उभारणी करण्यासाठी त्र्यंबकेश्वरला जाणार होते. त्यानी धनसिंग भावसार, माहेगावकर, बाबुराव पानगव्हाणे व दोन सन्यासी शिष्य आदी व्यक्तीवर वेरुळच्या भुमीची जबाबदारी टाकून स्वामी पांडू बाबा, गंगाबाबा, जगनबाबा, पंडीत काका, बोठरे गुरुजी यांच्यासह दुसऱ्याच दिवशी नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर कडे निघाले. (सध्याचा तालुका) एका घृष्णेश्वराची वाट सोयिस्कर करून इतर ठिकाणीही शिवाचे शिल्पउभारून ही साधक मुर्ती आता दुसऱ्या शिवाच्या घरी चालली होती. बरोबर दुपारच्या समयानंतर स्वामी घृष्णेश्वरास निरोप देऊन त्र्यंबकेश्वरांच्या दरबाराकडे निघाले. सायंकाळच्याच वेळी स्वामी पुन्हा त्र्यंबकेश्वरात पोहचले. बाबाजींचे त्र्यंबकेश्वर येथे वेरुळप्रमाणे कायमचे येणे-जाणे असल्याने बाबाजी वेरूळ प्रमाणेच तेथे ही बरेचसे प्रसिध्द होते. शिवाय त्र्यंबकेश्वर येथील मुरलीधर शिखरे यांचे बरेचसे धार्मिक ज्ञान बाबाजींना चारिधामात लाभले होते. बाबाजींनी बऱ्याचशा ज्ञानाचे पाठ यांच्याकडून समजुन घेतले होते आणि म्हणूनच बाबाजी येथे एक थोर साधु म्हणून प्रचिलीत होते. ते त्र्यंबकेश्वर येथे गेल्यावर बरेचसे शिष्यगण जमले होते. बराच वेळ निघुन गेल्यावर बाबांनी त्यांना ''उद्या येण्यास सांगितले'' व निवास्थानी निघुन गेले.

बाबाजींचा संकल्प होता की आपण श्री क्षेत्र वेरुळ सारखे येथे शिवालय बांधु, येथे बरीचशी शेती विकत घेऊन गुरुकूल बांधु, गोशाळा बंधु गायींची सेवा करु व त्या संकल्पासाठी बाबांनी शिष्य गणांना उद्या सकाळीस बोलवले होते. त्र्यंबकेश्वर हे फार फार पुण्यवान ठिकाण मानले जाते. असंख्य देवअवातारी पुरुष त्या त्र्यंबकेश्वराच्या भुमित देवाच्या आदेशानुसार नांदुन गेले होते. सर्व प्रथम आपण असेच म्हणून कि जशी चांगदेव महाराजांची तपोभूमी ''पुणतांबा'' म्हणून ओळखले जाते अगदी तसीच श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराची भुमी ही महान मुर्ती गौतम ऋषींची कर्म भुमी म्हणूनच ओळखली जाते. ह्याच त्र्यंबकच्या भुमीत गौतमऋषींना कर्म करून वास्तव्य केलेले होते. याच ठिकाणी कर्मयोग व कठोर तपश्चर्येच्या बळावर शंकराने स्वर्गलोकीची देवनदी गोदावरी माता जगदउध्दारासाठी भुतलावर आणली आहे. ह्याच गोदावरी मातेच्या तिरावर गौतमऋषींना स्नान संध्येला पाठवून त्यांच्या पत्नीच्या म्हणजेच अहिल्या मातेच्या रुपाला उपभोगून घेण्यासाठी देव राजा इंद्र आला होता. ह्याची उकल जेव्हा ऋषींना कळाली तेव्हा ह्याच नदीतीरावर इंद्राला शाप दिला होता व ह्याच नदीतीरावर त्यांनी अहिल्याला शिळा बनवले होते. बऱ्याच दिवसानंतर कैकयी मातेच्या आदेशानुसार प्रभुश्रीरामांनी बारा वर्षांचा वनवास पत्कारला होता. त्यांना माहित होते की

त्यांच्याच पदस्पर्शनाने गौतमांनी शाप दिलेली अहिल्या शिळामुक्त होणार आहे. प्रभुरामचंद्र ह्या गोदावरीच्या तीरावर, ह्या त्र्यंबकेश्वराच्या भूमीत आले होते व पतिव्रता अहिल्यामातेस आपल्या पद स्पर्शाने शिळेतून मुक्त ही केले. अशा त्या पूण्यपवीत्र भुमित त्या रात्री स्वामी कार्यासाठी येऊन पोहचले होते. स्वामींना त्र्यंबकेश्वराच्या भुमीचे सखोल असे महत्व माहित होते. म्हणूनच त्यांनी त्यांच्या अवतार रूपी कार्यासाठी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराची निवड केली होती. त्र्यंबकेश्वर हे बारा ज्योर्तिलिंगातील एक महत्वाचे ज्योर्तिलिंग म्हणून प्रसिध्द आहे. अशा ह्या ज्योर्तिलिंगाच्या क्षेत्री बारा वर्षातुन एकदा संपूर्ण देशातून सांधुसंत ऋषीमुनी व असंख्य भाविक कुभमेळ्याच्या निमित्ताने एकत्र येतात. त्र्यंबकराजाचे दर्शन घेतात, कुशावर्तावर स्नान करतात व पुण्यपवित्रवान होऊन आप आपल्या कार्यासाठी तयार होतात. नाहीतरी स्वामी हे नागा बाबांचे शिष्य होते. म्हणूनच ते जुन्या आखाड्याचे सदस्यही झाले होते आणि जुना आखाडा हा अवघ्या भरतात सत्कर्यासाठी प्रसिध्द आहे. अशा ह्या आखाड्यातील साधु संत येथे बारा वर्षातुन एकदा येतात व ह्या भुमिस पवित्र करून जातात म्हणुनच स्वामी जुण्या आखाड्याचे एक थोर कार्य म्हणून त्र्यंबकेश्वर येथे आले होते.

प्रत्येक श्रावणामध्ये याच त्र्यंबकेश्वरात महाराष्ट्रातून असंख्य भाविक भक्त ब्रहमगिरी पर्वताची प्रदक्षिणा करण्यासाठी येतात याच ठिकाणी श्री संत ज्ञानेश्वर माऊली, यांचे गुरू व बंधु श्री निवृत्ती महाराज यांची समाधी आहे. त्यांचेप्रमाणे निवृत्तीमहाराजांचे गुरू श्री. गहरीनाथ यांचीही समाधी येथेच आहे.ह्याच त्र्यंबकेश्वराच्या भुमित विविध जाती धर्मांचे आश्रमे आहेत सर्व साधु -संताचे मठ्ही आहेत. ब्रहमगिरी पर्वताच्या समोर श्रीरामभक्त हनुमानाचे जन्मठिकाण अंजनेरी पर्वतही आहे.

अशा ह्या पवित्र अंजनेरी व ब्रम्हागिरी पर्वताच्या कुशीत हे छोटसं त्र्यंबकेश्वर हे गाव वसलेले आहे, निसर्गाच्या कृपाछायेत व देवाच्या आशिर्वादात हे त्र्यंबकेश्वरगाव हालत-डोलत होते व ह्याच त्या त्र्यंबकेश्वरात स्वामी त्यांच्या कार्याची सुरवात उदयापासून करणार होते. स्वामींनी दुसऱ्यादिवशी पहाटेच शिष्यांना विधी वाचायला लावले. सकाळी सहा सातच्या दरम्यान सर्वांची विधी वाचुन पूर्ण झालेली होती. बाबाजी त्र्यंबकेश्वरातील शिष्यांची प्रतिज्ञा करत होते. आठ वाजेपर्यंत सर्व शिष्यगण स्वामींच्या चरणापाशी जमा झाले बाबाजी म्हणाले, ''आले, का?

या, बसा''

सर्व शिष्य बाबाजी जवळ जाऊन बसले, बाबाजींनी बोलण्यास सुरूवात केली, ''सारे जण ऐका, आपल्याला इथ एक हृदयेश्वराचे मंदिर बांधायचे आहे.'' सर्व भक्त गण आनंदित होऊन म्हणाले. ''हो... हो... बाबा तुम्ही सांगाल ते करू''

स्वामींनाही भक्तांचा आनंद झाला. कारण स्वामींना त्यांच्या कार्याची ध्वजा पुण्यवान जागेवर रोवायला मिळणार होती. ह्या नगरीतुन त्यांना हवा तेवढा भक्तीचा प्रसार

कसा करता येणार होता. म्हणूनच स्वामी भक्तांचा प्रतिसाद बघताच सुखावले होते. तो कालखंड १९७२ चा अखेरचा होता. त्र्यंबकेश्वराच्या उत्तरेला मंदिर बांधण्यासाठी जागा निवडली गेली. योगा-योग असा होता की ज्या स्त्रीची ती जागा होती. तिलाही बाबाविषयीच्या दैवाचा भाव वाटत होता. बाबाजींची किर्ती त्या भाग्यवान स्त्रीने आतापर्यंत बरीचशी ऐकलेली होती. म्हणून तीने बाबाजीस ती जमीन दानं करण्याचे ठरवले. पण बाबाजी फुकटचे दान कधीच स्विकारत नव्हते. थोड्या फार प्रमाणात पैशाचा मोबादला देऊन बाबाजींनी श्रीमती चंद्रभागाबाई घोडके याची जमिन दान घेतली. आतापर्यंत बराचसा पैसा वर्गणीच्या स्वरुपात बाबाजींकडे जमा झालेला होता. बाबाजी त्याच पैशावर शिवालये बांधण्यासाठी जागा घेत होते व त्याच लोकांच्या वर्गणीवर त्यांच्याचसाठी गुरुकुले व आश्रमे बांधायचे होते.

श्रीमती चंद्रभागाबाई घोडके यांची जमिन घेतल्यावर बाबाजींनी तेथेच पाचटाची कुटीया बनवली व आता बाबाजी तेथेच राहु लागले होते. बाबाजींनी घेतलेली जमीन ही डोंगराच्या पोटाला होती हा जमिनीचा भाग हुबेहुबे जाते गावातील जमीनीच्या भागाशी जुंळत होता. त्याचप्रमाणे जमिनीत माती पेक्षा खडकच अधिक विसावलेला होता. पूर्णतः उतार त्या जमिनीला लाभलेला होता. बाबाजींनी सर्वप्रथम शिष्यांना त्या जमिनीतील विणाकारी दगड डोंगराच्या एका बाजूस ठेवण्यास सांगितले, तद्नंतर तेथील खडक फोडायला लावला, एकेक भक्त कित्येक घामाच्या धारा त्या जमिनीत गाळु लागला होता, बाबाजी रोज सातत्याने तिथेच जमिनीत बसत होते, आठ दिवसाच्या अंतराने शिष्यगंणांनी शेतातील सर्व दगड बाजुला केला होता व आता खडक फोडण्यास सुरवातही केली होती. बाबाजींनी हाती घेतंलेल्या शिवालयाची चर्चा पूर्ण त्र्यंबकेश्वरात पसरल्याने बाबाजीला श्रमदान करणाऱ्या शिष्यांमध्ये आता वाढ होत होती. याशिवाय त्र्यंबकेश्वरात त्र्यंबक राज्यांचे दर्शन घेण्यासाठी आलेले शिवभक्त बाबाजींकडे जात असायचे. बाबांची हातपाय दाबुन घटकाभर सेवा करायचे व सेवेचा मेवा मिळण्यासाठी ते श्रमदानही करायचे. दिवसभर राबराब राबल्यावर सांयकाळी बाबाजींजवळ बसायचे बाबाजी जातेगांव प्रमाणे येथेही अन्नदान द्यायचे. बाबाच्या कुटीयातला दोन घासाचा प्रसाद पोटात टाकला की बाबाजी जवळून विभुती घेऊन घरी जायचे व पुन्हा एकदा दुसऱ्या दिवसापासून बाबाच्या कार्यासाठी शेतात यायचे.

इ.स. १९७३ चा जानेवारी महिना उजाडला. नवीन वर्षास सुरुवातही झाली होती. बाबाजींना लवकरात लवकर कार्य पूर्ण करण्याचा कयास लागलेला होता. बाबाजींना विधी पठन करून शुभ मुर्हूतावर श्रीफळ फोडून नीट केलेल्या जागेत हृदयेश्वर शिवालयाच्या पाया खोदण्यास सुरुवात केली होती. बरेचसे भक्त बाबाजींच्या नुतन शिवालयासाठी त्र्यंबकेश्वराच्या भुमीत नांदत होते. बाबाजी चे कार्य म्हणजे एखाद्या अनोख्या झोपेत पूर्ण

झालेल्या स्वप्नच होते, एखाद्या व्यक्तीने दिवसभर काम करावे व रात्री पोटभर जेवून झोप घ्यावी. त्यालाही गाढ झोप लागावी, लागलेल्या झोपेत एखादी पहाट फुलावी त्या फुललेल्या पहाटेत एखादे मने फुलवणारे स्वप्न पडावे व त्या स्वप्नात त्याला वाटेल ते मिळावे आणि काही क्षणानंतर झोप मोडली की ते स्वप्न मृगजळ व्हावे. ही घटना जशी त्या व्यक्तीच्या जीवनात काही क्षणात व्हावी तसेच स्वामींनी हाताळलेले कार्य हे काही बोटावर मोजता येणाऱ्या क्षणात पूर्ण व्हायचे. स्वामीच्या हृदयेश्वरांचा पाया केव्हाच पूर्ण होऊन गेला होता. तिथल्याच डोंगरावरील दगड बाबाजींनी मंदिरासाठी निवडला व गवंड्यास पाया घेण्यास लावला स्वामींच्या नियमानुसार सर्वप्रथम पूर्वपश्चिम पाया घेण्यास त्याने सुरुवात केली. दिवसामागून दिवस वाऱ्यासारखे जात होते. भक्तगणात बऱ्याच प्रमाणात वाढ ही झाली होती. बरेचसे भक्तजण बाबाजींना पैशाच्या स्वरूपात वर्गणीही देत होते. बऱ्याच दिवसाच्या अंतराने स्वामींनी संकल्प केलेल्या हृदयेश्वराच्या भिंतीही होत आल्या होत्या. इ.स. १९७३ च्या अखेरीस रामरावजी कोरडे नावच्या माणसाकडून स्वामीजी वीस–बावीस एकर जमीन विकत व दान स्वरूपात घेतली, आता हृदयेश्वरा बरोबर स्वामी घेतलेली शेतीही निट करु लागले होते. शिष्यमंडळी दोन्हीकडे श्रमदान करण्यासाठी तळमळत होती. बाबाजी प्रवचनातून त्यांना मुक्त करत होते व सायंकाळी ''शांती मिळावी म्हणुन विभुतीही देत होते''.

बाबाजी स्वतःहुन काही भक्तांना मंदिराच्या कामासाठी ठेवत तर काहींना स्वतः बरोबर घेऊन शेतीकडे नेत असे. बाबाजींनी शिवालये उभारण्याबरोबरच शेती करायला फार आवडायचे, बाबाजींची ''शिवालय, शेती, आश्रम, गोशाळा, अन्नदान, श्रमदान, गुरूकुल'' या गोष्टींवर नितांत श्रध्दा होती.

इ.स. १९७३ च्या अखेरीस घेतलेल्या जमिनीत स्वामी रात्रंदिवस राहायचे स्वामींनी शिष्यांकडून खडकाळ जमिनीची चांगली परिस्थिती निर्माण करायला लावली. शिष्यांनी पहारी घेऊन खडकाळ भागाला शेतीचे स्वरूप देण्याचे ठरवले. ते खडक फोडून शेती तयार करू लागले. बऱ्याचशी ठिकाणाची जमिन ही शेती लायक तयार झालेली होती. बाबाजींचा शेती हा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. जमिन म्हणजे आपली माता अशी त्यांची विचारसरणी होती. ज्या जमिनीत काहीच येणार नाही अशी जमीन बाबाजींनी त्र्यंबकेश्वरात घेतली होती. जसे निपुत्रीक स्त्रीला पुत्रप्राप्ती झाल्यावर आनंद होतो. तसा बाबाजीला नापिक जमीन सुपीक झाल्यावर आनंद व्हायचा. बाबाजींनी आता बरीचशी जमीन सुपिकतेच्या लायकीच्या बनवली होती. जमिनीच्या सुधारण्याबरोबरच आता हृदयेश्वर शिवालयाच्या कळसाचेही कार्य पूर्ण झाले होते. त्र्यंबकेश्वर महाराजाच्या उत्तरदिशेला गावाला शोभून दिसेल असेच शिवालय स्वामींनी त्या खडकाळ मातीत उभे केले होते. अजुन मंदिराची प्राणप्रतिष्ठा बाकी होती. परंतु खडकाळ मातीवर इतके अतिभव्य मंदिर उभे राहिले याचे नवल गावाबरोबर येणाऱ्या वाटसरूनांही वाटू लागले होते व मंदिराचे

काम बघून साहजिकच ते स्वामींकडे ओढावत होते.

स्वामींनी आता शेतीकडेच सर्वदृष्टी ठेवली होती. हृदयेश्वराची प्राण प्रतिष्ठा त्यांनी अजुन पुढे लोटली होती का ? कुणास ठाऊक! पण स्वामींनी आता सर्वच भक्तांना शेतीत नेले होते. एकीकडे शेती सदन करणे चालु होते तर दुसरीकडे विहीर खोदण्याचे काम बाबाजींनी हाती घेतले होते. बाबाजी शेती करणाऱ्या किंबहुना तेथे श्रमदान करणाऱ्या शिष्यांना योग्य ते मार्गदर्शन देऊन विहिर खोदणाऱ्याजवळ जाऊन बसत होते. बाबाजींना भक्तांची नेहमीच काळजी वाटायची विहिर खोदण्याची वेळी ते योग्य त्या वेळी भक्तांना सावध करायचे व अचानक काही झाले तरीही ते साक्षात्काराने त्वरित निटही करायचे. हा......हा...... म्हणता शिष्यांनी बाबाजींनी घेतलेली सर्व खडकाळ जमिन सुदन बनवली. ज्या ठिकाणी स्वामींनी सांगितले त्या ठिकाणी विहिरीही खोदल्या होत्या. खोदलेल्या विहीरीस साक्षात्काराने पाणीही लागले होते. स्वामींनी त्याच जमिनीत छोटे–छोटे वाफे करण्यास सांगितले तेथे साळ लावली. जमिनीची प्रत ठसळू नये म्हणून चौबाजुंनी आंबा, काजु, चिकु, नारळ इत्यादी फळझाडे लावली. खडकाळ माळरानावर बाबाजींनी स्वर्गाहून सुंदर नंदनवन फुलवले होते. निरनिराळ्या प्रकारची झाडे त्या डोंगराच्या कुशीत नाचत–हालत डोलत होती स्वामींच्या कार्यात श्रमदानासाठी येणारी भक्तमंडळी बाबाजीच्या भक्तीच्या मळ्यात सुखावत होती.

शेतीचे, विहीरीचे, शिवालयाचे कार्य पूर्ण झाल्यावर स्वामींनी त्र्यंबकेश्वर येथे आश्रम बांधण्यास सुरूवातही केली. मात्र अजून ही हृदयेश्वराची प्राण प्रतिष्ठा बाकीच होती. त्र्यंबकेश्वर येथे आश्रम उभारून आपल्या भक्तांना निवारा मिळावा यासाठीच त्यांची आता धडपड चालली होती. त्याचकारणास्तव स्वामींनी इ.स. १९७४ च्या मध्यनी आश्रमाची पाया खोदण्यासाठी शुभ सुरूवात झाली. स्वामींचे एकेक कार्य बघुन भक्तजण आर्श्चचकित होत होते. तेथेही असेच महान कार्य चालू होते. स्वामीजींच्या आदेशाप्रमाणे वेरुळात सारे ठिकठाक चालु होते. बाबाजी वेरुळचे कार्य ऐकून सुखावत होते व नुतन कार्यास सुरूवातही करत होते. आश्रमाच्या कामाबरोबर स्वामींजी अजुन जमिन विकत घेत होते व पूर्वीप्रमाणेच ती फुलवीत होते व त्यातुन येणाऱ्या पिकातुन नित्य नियमाने त्यांना आश्रमातून अन्नदान करायचे होते. याचसाठी त्यांनी आता आश्रमांच्या उभारणीचे काम हाती घेतले होते. बरेच दिवस एकामागून एक असे करत दिवस निघुन गेले होते. इ.स. १९७५ चा फ्रेबुवारी महिना लागला होता. स्वामी अचानक हृदयेश्वरात च्या प्राणप्रतिष्ठेची तयारी करु लागले. त्यामुळे त्यांनी काकाला बोलवून घेतले काकांनी स्वामींजवळ गेल्या – गेल्या स्वामींचे दर्शन घेतले. स्वामी सद्‌गदीत होऊन म्हणाले, 'आले काका या..'.

''काय तातडीचा सांगावा सांगितला बाबा''.

''काका, आपलं हे देऊळ उभारून एक वर्ष झालं, आता आपल्याला त्याच्यात श्री हृदयेश्वराची प्राणप्रतिष्ठा करायची आहे आणि त्यासाठी आपल्याला लिंग, पिंड व नंदीश्वर

आणायचा आहे.''

''बाबा, कधी जायचं आहे.''?

स्वामी पुढे म्हणाले, ''काका तुम्ही ह्या त्र्यंबकेश्वराच्या कार्यकर्त्याबरोबर जा आणि नेहमी आणतो तेथुन चांगल्या प्रकारची मुर्ती घडवून आणा, बरका.....का.....का''

''हो ...... बाबाजी।'' असे उत्तर देऊन पंडीत काका स्वामी च्या चरणाजवळ विसावले. दुसऱ्या दिवशी स्वामींच्या आदेशानुसार पंडीत काका इतर शिष्यांसह जयपूरला हृदयेश्वराच्या प्राण प्रतिष्ठेसाठी शिवलिंग आणण्यास निघाले, जाता-जाता त्यांनी स्वामींचे दर्शन घेतले. व येतो बाबाजी म्हणून त्र्यंबकेश्वर सोडले. स्वामींनी बांधलेले शिवालय पूर्णत: स्वच्छ करण्यास सांगितले, आजुबाजुच्या परिसर स्वामींनी अगोदरच निरनिराळ्या तऱ्हेचे फुलझाडे लावुन सुशोभित केला होता. आसपासचे दगड मंदिराच्या चारही बाजूला व्यवस्थितपणे एखाद्या घडीप्रमाणे रचण्यात आलेले होते. काकांनी इतरभक्तासह मार्च महिन्याच्या अखेरीस जयपूरहून शिवलींग व नंदेश्वराची मुर्ती आणली. शिवलिंग निवडण्यात पंडीत काका आता बरेचसे निपुण झाले होते, नाहीतरी त्यांनी आता पर्यंत पिनाकेश्वर, सिध्देश्वर, जनेश्वर व पारेश्वर इत्यादी मुर्त्या आणल्या होत्या तरीही स्वामी त्या मुर्त्या पुन्हा एकदा नजरेखालून घालत असे. स्वामी एक शिल्पतज्ञ होते कि काय? कुणास ठाऊस? परंतु ते त्या मुर्तीस सर्वबाजूनी अत्यंत चोखपणाने तपासुन बघत व मगच इतर गोष्टीस प्राधान्य देत होते. स्वामींनी त्याच दिवशी त्र्यंबकेश्वरातील भक्तजणांना सांगितले कि, ''येत्या अक्षयतृतियाच्या शुभ मुहर्तावर आपल्या हृदयेश्वराची प्राणप्रतिष्ठा होणार आहे.''

हे ऐकताच सर्व शिष्यांना आनंद झाला, स्वामींनी पुण्यवान झालेल्या भूमित त्र्यंबक राजाचेच दुसरे रूपच रहायला येणार आहे. ह्या कल्पनेने अवघे त्र्यंबक गरजले, तो पर्यंत स्वामिंनी संकल्प केलेल्या आश्रमाचा पाया पूर्ण होत आला होता. त्र्यंबकेश्वरातील मोठ-मोठ्या ब्राम्हणास स्वामींनी प्राणप्रतिष्ठेसाठी निमंत्रण दिले होते सकाळी नऊ ते आकराच्या दरम्यान प्राणप्रतिष्ठा होणार होती. तद्नंतर स्वामींचे प्रवचन व नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार असे प्रयोजन ठरले गेले. अक्षयतृतीयाचा शुभदिवस इतर ठिकाणांप्रमाणे त्र्यंबकेश्वरातही उगवला गेला. स्वयंपाकवाले शिष्यमंडळी प्रवचन ऐकण्यासाठी तराळून गेले होते. सकाळच्या नऊचा समय झाला. निसर्गाच्या नियमाप्रमाणे स्वामींनी ब्राम्हणांच्या हातून हृदयेश्वराच्या प्राणप्रतिष्ठेची सुरूवात केली. विधी ध्यान, आरतीच्या गजरात हृदयेश्वराच्या प्राणप्रतिष्ठेची सुरूवात केली. विधी ध्यान, आरतीच्या गजरात हृदयेश्वरा भगवंताची प्राणप्रतिष्ठा ब्राम्हणबुवा करू लागले. बरोबर आकराच्या दरम्यान प्राणप्रतिष्ठा झाली. स्वामींनी स्वत:हून आनंदाने आरोळी दिली, बोला-

**हृदयेश्वर भगवान कि जय,**
**त्र्यंबकेश्वर भगवान कि जय,**

नर्मदा माता कि जय,
गोदावरी माता कि जय,

बाबाजींनी थोड्याच वेळात प्रवचनास सुरुवात केली, बाबाजींचे प्रवचन म्हणजे लाखमोलाचा शाब्दीक आशिर्वादच होय, बाबाजी प्रवचनातून कोणालाही आशिर्वाद द्यायचे आणि तो खराच ठरायचा त्यात शंकाही नव्हती. बाबाजांनी बोलण्यास सुरुवात केली. ''लोकोहो आज आपलं हृदयेश्वर भगवानाचं काम पुरं झाले, हे सारं पुण्य तुम्हाला मिळलं, देवाच चरित्र वर्णन केलं तर साऱ्या पापाचा नाश होतो. परमेश्वराची जो सेवा करील तो कुलशिल राहिल. आणि जो परमेश्वराला मानणार नाही तो एक दिवस कुलभ्रष्ट होईल, सेवा केल्याशिवाय निष्कामता मिळत नाही पण तिही चांगल्या मनाने केली पाहिजे, नाहीतर येळ बी वाया जाईल आणि सारचं जाईल. देवाला जर पहायचं असलं किंवा देवाचा आशिर्वाद घ्यायला असेल तर भक्ती करा, तुम्हाला देव हामखास आशिर्वाद देईल. त्यामध्ये प्रणिवात, कथाश्रवण, स्तुती, सर्वकर्म समर्पन, उपासना, चरण स्मरणं जसं तुम्ही तुमच्या संसरावर प्रेमकरता तुमच्या बायकोवर प्रेम करता तसचं देवावर बी कराना, शेतीवर करा, प्राण्यांवर करा, आरे मिळल ना। जे मागाल ते देईल ना देव। आपण जे जीवन जगतो ते कोणावर, ह्या.... ह्या... काळ्या मातीवरचना। मग शेती कराना चांगली, तिची सेवा करा, मन शांत होत तिथं, सार सुख-दुख निघुन जातं, इकडे-तिकडे फिरण्यापेक्षा शेतीत जाऊन काम करा, तीला फुलवा, ती फुलली कि तुम्ही पुन्हा फुलशालं पा, शेतीची सेवा करता-करता, गायींची पण सेवा करा. बाबा पुढे म्हणाले, गाय जणत असतांना अर्धे पिल्लु आत नि अर्धे बाहेर असल्यावर गायीला प्रदक्षिणा मारावी, पूर्ण पृथ्वी प्रदिक्षणेचे पुण्य मिळते, म्हणून गायाचीही सेवा करा.

आपण इथं आश्रम उभारत आहे. त्या आश्रमात सर्वजण मिळून हातभार लाऊ आणि देवाचं काम समजून पुरं करू आपण जर आश्रम पूर्ण केला तिथ जर चार साधू उन्हा पावसात राहिले तर ते किती आशिर्वाद देऊन जातील. आपल्याला म्हणून सांगतो, जसं आपलं हे हृदयेश्वराचे काम पुरे झाले जशी शेती फुलवली, तशीच आपण आश्रमाचीही उभारणी करू आश्रम पुरा झाल्यावर आपण गायींसाठी ही गोशाळा उभी करू आपल्याला देव कधी काय देईल याचा भरवसा नाही. बाबाहो, म्हणून सांगतो देवाचं काम करायला कधीच मागे पुढं पहायचं नाही.'' स्वामी सांगत होते. भक्तजण आनंदाने प्रतिसाद देत होते. त्यांच्या प्रतिसादामुळे स्वामींचे आनंदी मन अजुनच फुलत होते. त्यांच्या कार्यांचा प्रसार आता शिवलोकातून भुतलावर आलेल्या गोदावरी तिरावरी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वरात पुरेपूर झाला होता. बाबाजींनी भक्तांना आशिर्वाद देऊन प्रवचनास सांगता दिली. भक्तांनी महाप्रसादाचा पुरेपूर लाभ घेतला आणि स्वामींच्या आश्रमाच्या जागेवर श्रम दानासाठी हजेरी लावली. स्वामींचे त्र्यंबकेश्वरातील सत्कार्य जवळ-जवळ ब्रम्हागिरी पर्वताच्या टोकावर

जाऊन पोहचले होते. ह्याच ब्रम्हगिरी पर्वतावरून स्वामींनी धर्माच्या व भक्तीच्या कार्याची ध्वजा नाशिक जिल्ह्यासह अवघ्या देशात फडकवली. धन्य आहे त्र्यंबकेश्वर आणि धन्य होते आपले, सर्वांचेच लाडके स्वामी जनार्दन बाबा, प्राणप्रतिष्ठा झाल्यानंतर सर्वच शिष्यगण त्र्यंबकेश्वराच्या आश्रमाच्या उभारणीसाठी श्रमदानात तल्लीनराहू लागले होते. नाशिक जिल्हयात आडगांव शिवारात सौ. मंजुळा महादू भडके, ह्या महिला राहत होत्या त्या प्राणप्रतिष्ठे नंतरच्या तिसऱ्या दिवशी स्वामींकडे गेल्या व म्हणाल्या ''बाबा मला काही जमिन दान करायची आहे.''

स्वामींनी त्या स्त्रीचा सर्व परिचय करून घेतला, नंतर मग त्यांनी काही मोबदला देवून त्या श्रीमतांची जमिन दान घेण्याचे ठरवले. व त्या स्त्रीला सांगितले, ''बाई नंतर जमिन बघायला येतो.'' दिवसभर तेथेच श्रमदान करून सायंकाळी आशिर्वादसह स्वामींचा प्रसाद घेऊन त्या घरी परतल्या. त्यानंतर स्वामींनी आश्रमाच्या कामातच आधिक लक्ष घातले. इ.स. १९७५ मधील ऑगस्ट महिन्यात स्वामींनी नाशिकची जमिन बघण्यासाठी जाण्याचे ठरविले, त्याच महिन्यात मावशींनी जाधव साहेबांना बाबाजींकडे जमिन बघण्यासाठी यावे हा सांगावा पाठवण्यासाठी लावले. दुसऱ्या दिवशी जाधव साहेब, बाबाजींसह ट्रकद्वारे अडीच वाजता दुपारी पूजा झाल्यानंतर त्र्यंबकेश्वरहून निघाले. अर्ध्या एक तासाच्या अंतराने स्वामी नाशिकच्या आडगाव परिसरात उतरले, चार-पाच वाजेच्या दरम्यान स्वामींनी भडके ताईंची जमिन बघितली व स्वामींना औरंगाबाद रोडवरील जमिन मनापासून आवडली व स्वामींनी तीच जमिन शर्वायेश्वर शिवालयासाठी निवडली. जमिन बघून झाल्यावर स्वामी पुन्हा त्याच ट्रकमध्ये त्र्यंबकेश्वर येथे परतले.

स्वामी पुन्हा एकदा त्र्यंबकेश्वरांत आश्रमाच्या कामात मंत्रमुग्ध झाले होते. कारण त्र्यंबकेश्वरातील आश्रम स्वामींना सर्वात महत्वाचा वाटत होता. दिवसामागून दिवस जात होते. श्रमदानातून आश्रमाच्या भिंती उभारल्या जात होत्या. इ.स. १९७५ चा नोव्हेंबर महिना लागला होता. ह्या महिन्यात एक विशेष घटना घडली. बाबाजी आश्रमजवळ बसलेले होते. निफाड तालुक्यातील लाखलगांवातील काही लोक एका मुलास घेऊन स्वामींकडे आले व सांगितले. ''ह्या मुलाचे डोळे गेले आहे, बरेचसे उपचार करून झाले, पण काहीच फरक नाही.''

बाबांजींनी त्या मुलाचे नाव विचारले, तिकडणं उत्तर आले.... 'बाबु'. स्वामींनी त्यामुलाला विभुती प्यायला दिली डोळ्याला लावली व तीन दिवस तेथेच राहयला लावले. घरातील आई-वडिलांसह सर्वजण बाबाच्या कुटीयात राहिले, तिन दिवस झाले, त्या बालकाला स्वामींनी नेत्रदान दिले. मुलाच्या मातापित्यास भयंकर आनंद झाला. त्यांना होणारा आनंद जणू काय अवघ्या ब्रम्हगिरी पर्वतालाच फेरा मारून आला. मुलाचे आई-बाप, मुलाला घेऊन जाणार तितक्यात बाबाजी म्हणाले,

''तुम्हाला एक सांगु, ह्या बाबुला माझ्याच जवळ राहू द्या''. आणि हाच योग्य योग होता त्यांच्या भेटीचा. घरातील आईला विलक्षण दुःख झाले, आईला नाही म्हटली, परंतु वडीलांना देवाच्या कार्याची चांगल्या पध्दतीने माहिती असल्याने त्यांनी बाबुला स्वामींच्या आश्रमात राहण्याची परवानगी दिली. आईला समजुत घालुन घरी नेले. स्वामींनी स्वतःहुन मागितलेल्या बाबुनामक शिष्याला बाबाजीने नेत्रदान केले होते व पूर्वीच्या साथीदार म्हटले होते, तोच इ.स. १९७५ च्या नोव्हेंबर महिन्यातला बाबु आज त्यांच्या कार्याचा शान ठरला, तो त्या फुलामातेचा लहानगा बाबु आज स्वामींच्या कार्याचा वारसदार आहे. तो ''बाबु'' दुसरे तिसरे कुणी नसुन तुमचे आमचे, आपल्या सर्वांचे श्री संत जनार्दन बाबांचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर, १००८ साक्षात प्रभु अवतार स्वामी शांतीगिरीजी आहे. (स्वामी शांतिगिरीजींना ''बाबु'' म्हणून उल्लेखल्या बद्दल मनापासून क्षमस्व, इथुन पुढे त्यांचा उल्लेख केवळ महात्मा म्हणून असेल. कृपया वाचकांनी याची नोंद घ्यावी.)

''होता पूर्वीचा ठेवा।
तो ह्या भावा सापडला।''

ह्या यथायोग्य युक्तीप्रमाणे महात्मा बाबाजींकडे भक्तीचे रसग्रहण करू लागले. बाबाजी आता सर्वच कामे त्या सोळा वर्षीय महात्म्यांना सांगु लागले होते. महात्मा बाबांच्या भक्तीच्या कसोटीला पुरेपूर पात्र झाले होते, बाबांजींनी त्या त्र्यंबकेश्वरातच सर्वकाही शक्तीचे दान दिले व भाकित केले ''हा फार मोठा माणुस होईल, हा जिथं जाईल, तिथ ह्याचं तोंड दिसणार नाही इतके लोक राहतील. माझे संकल्पीत उर्वरित कार्य हाच पुरे करील.'' दृष्टी आलेले माहात्मे आता त्र्यंबकेश्वरातील नुतन आश्रमासाठी दगड विटा वाहू लागले होते. स्वामींना अनेक भक्त होते, त्यात हे तर त्यांचा एक अवतार होता. आता स्वामींच्या कार्यास काही आंगळे वेगळेच स्वरूप प्राप्त झाले होते. स्वामी साक्षात्काराने एकेक भक्तांना घडवत होते. एकेक भक्त स्वामींकडे सन्यास स्विकारण्यास तयार होत होते. महात्मांनंतर एक अजून स्वामींचा अनोखा साक्षात्कार त्या ह्रदयेश्वराच्या दरबारात घडला. डिसेंबर १९७५ मध्ये मालेगांव दरेगांव येथील एक ग्रहस्थ बाबाजींपुढे संकट येऊन उभे राहिले. ते मनुष्य अचानक पांगळे झाले होते. त्यांचे कंबर निकामी झाले होते. त्यांचे गुढगे प्रमाणापेक्षा अधिक सुजले होते. त्यांना चालणे सुध्दा अशक्य झालेले होते. अशा परिस्थितीत त्यांच्या सोबत आलेले लोक बाबांचा वेळोवेळी सांगत होते, तर ते सदगृहस्थ बाबाजी नीट करतील ह्याच आशेत भावी जीवनाचा स्वर्ग बघत होते.

थोडा, वेळ झाल्यानंतर बाबाजींनी त्यांना विभुती दिली व एक महिना तिथचं थांबायला लावले बरोबर एक महिन्यानंतर त्या सदगृहस्थाला अचानक चालता यायला लागले. त्यांना झालेला आनंद काही क्षणात मालेगांव तालुक्यातील दरेगाव फिरून आला, परंतु त्या सदग्रहस्थाला बाबाजींचा दरबारच सोडू वाटेना, त्यांनी घरच्यां बरोबर जाण्यास

तिव्र विरोध केला. घरातील व्यक्तींनीही त्यांना तिथेच बाबांच्या चरणात विलीन केले. ते सदगृसहस्थ आज बाबाजींच्या पुणतांबा आश्रमातील केशवानंदगिरी महाराज म्हणून प्रसिध्द आहे. आजही ते उत्तराधिकारी स्वामी शांतिकगिरीजींच्या आशिर्वादात्मक आदेशाखाली पुणतांब्याच्या काशिविश्वेश्वराच्या शिवालयात कार्यरत आहे. ह्या संतांच्या खुणा संतानाच कळु जाणो. हेच ह्या वरील दुष्टांतावरून आपणास दिसून येते. म्हणूनच असे म्हणता येईल.

''जय जय सद्‌गुरू देव खांबसुत्री ।
चौऱ्यांशी लक्ष पुतळ्या यंत्री ।
नाचविशी निच तंत्री ।
प्राचीन दोरी स्वभावे ॥''

ह्या नव्या जुन्या सत्कार्यामध्ये दिवस कसे कळत नि कळतपणे निघुन जात होते हेच कळत नव्हते. इ.स. १९७६ चा फेब्रुवारी उजाडला होता. स्वामी त्र्यंबकेश्वर सोडण्याचा तयारीला लागले होते. स्वामींनी महात्मांना त्यांचे सारे विधी पुजनाचे साहित्य ट्रकमध्ये ठेवण्यासाठी लावले होते. महात्मांनी सर्व सामान ट्रकमध्ये ठेवले. बाबाजींनी सांगितले कि चला आडगावला (नाशिक) तिथं आज आपल्याला भूमिपूजन करायचं आहे

स्वामीजी, आश्रमाची शेतीची शिवालयाची सर्व जबाबदारी त्यांच्या अतिविश्वासु भक्तांवर टाकून, ते सायंकाळच्या वेळी नाशिककडे रवाना होण्यास निघाले. स्वामींनी त्यांच्या कार्याचा घडा अत्यंत यशस्वीपणे त्र्यंबकेश्वरात मिरवला होता. त्यांच्या अवताररूपी कार्याची ध्वजा त्यांनी उभारलेल्या आश्रमापुढे व हृदयेश्वरापुढे अत्यंत प्रखरतेने फुलकित होऊन फडकत होती. त्या फडकणाऱ्या ध्वजेचा मोह जणू काय उंच अशा निळ्या भोर आकाशात भरारी मारणाऱ्या फिनिक्स पक्षाला लागला असावा व त्याच कारणास्तव तो एवढे मोठे आकाश सोडून त्या त्र्यंबकेश्वरमध्ये काही क्षणाच्या विसाव्यासाठी थांबला असावा. स्वामींनी केलेल्या कार्यासाठी माझ्या सारख्या पामराने कोणती उपाधी वापरावी हेच कळत नाही.

एखाद्या सासरी गेलेल्या मुलींच्या आई वडीलांनी प्रत्येक वर्षी रहाण्याचे ठिकाण बदलावे नि त्या सासरवाशी मुलीने सासरचे सर्व व्यवस्थित बघुन प्रतिवर्षी आई वडिलांना भेटण्यासाठी किंबहुना माहेरी जाण्यासाठी ठिकाणे बदलावी. असाच उपक्रम ह्या माऊलीने चालवला होता. एक जण कल्याणाचे कार्य समजून ह्या माऊलीने जगापुढे एक शिल्प उभे करायचे, सकाळपासून ते सांजवात लावण्यापर्यंत भक्तांना उपदेश करून श्रमदान करण्यास लावायचे. श्रमदान करता करता भक्ताची सारी जबाबदारी अंगी सांभाळायचे अशा रितीने सारा खेळ हा प्रभु जगापुढे मांडायचे व कार्य संपले कि आपल्या शिवाच्या दुसऱ्या माहेरघरी मुक्कामाला जायचे. असाच जीवनाचा आराखडा स्वामींनी तयार केला होता आणि जगाला होता. इ.स. १९१४ मध्ये म्हाळसाईनं पेटवलेली ज्योत त्यांच्या हृदयात अजुनही तशीच

पेटलेली होती त्यांच्या ज्योतीचा प्रकाश हजार पटीने वाढलेला होता. त्याच प्रकाशाचा वापर त्यांना जगाला रस्ता दाखवण्यासाठी करायचा होता व तोच रस्ता दाखवण्यासाठी स्वामी सायंकाळी सहा साडे सहा वाजता नाशिक कडे निघाले होते.

इ.स. १९७६ फेब्रुवारीच्या सहा तारखेला सायंकाळी आठ वाजेच्या दरम्यान स्वामी आडगाव नजीक ''भडके'' यांच्या मळ्याजवळ जाऊन पोहोचले. कित्येक भाविक स्वामींची तेथे वाट बघत बसले होते. स्वामी तिथे गेल्यावर त्यांना फारच आनंद झाला. दुसऱ्यादिवशी स्वामिंनी विधी आरतीच्या जयघोषात आश्रमाच्या जागेचे पूजन केले व त्याच दिवशी म्हणजे ७ फेब्रुवारी १९७६ रोजी आश्रमाच्या कामास सुरुवातही केली. नाशिकच्या भुमित स्वामींनी सर्वप्रथम आश्रम बांधायचे ठरवले होते. तद्नंतर शर्वायेश्वराचे शिवालय त्यांना उभे करायचे होते.स्वामींचा प्रत्येक गोष्टीत बघण्यांचा कटाक्ष हा अनन्य साधारण होता. बाबाजी कोणतेही कार्य करण्यापूर्वी त्याला किती महत्व आहे हे सर्व प्रथम जाणून घेत होते. आणि नंतरच मग त्या कार्याचा शुभारंभ करत होते. परंतु कार्य करतांना मात्र हे सारे कार्य परमेश्वराचे आहे तोच सारं काहि सांभाळून घेतो. असे ते बिनधास्त बोलत होते. त्यांनी हाती घेतलेले कार्य हे अल्लड व्यक्तीस पडलेल्या स्वप्नासारखे होते. त्यांचे कार्य कधी पुर्ण होईल याचा कुणी अंदाज देखील काढु शकत नव्हते. स्वामी आता नवनुतन कार्यासाठी नाशिकच्या पवित्र भुमित आले होते. देवकी पुत्र भगवान श्रीकृष्णाविषयी त्यांच्या मनात जशी श्रध्दा होती त्या भगवंताच्या गितेविषयी जशी त्यांना आशा होती, तशी त्यांच्या मनात कौशल्यापुत्र प्रभु श्रीरामचंद्राबाबतही आदर्शाची ज्योत लुकलुकत होती. त्यांनी त्यांच्या प्रवचनातून आतापर्यंत कित्येकदा प्रभुरामचंद्राचे बंधुप्रेम, एकवचनीच्या आदर्श राजा इ. गोष्टीचे दाखले जनतेपुढे मांडून लाखमोलाचा उपदेशही केला होता. ह्या त्या भूमित पूर्वी श्रीरामजी येउन गेले होते व त्याच ह्या भूमित कार्याची ज्योत घेऊन आता जनार्दन बाबा आले होते. प्रभू श्रीरामाविषयी स्वामींच्या मनात पराकोटीचा आदर सामवलेला होता. कैकयी मातेच्या आदेशानुसार जेव्हा प्रभुश्रीराम बारा वर्ष वनवासाला आयोध्या सोडून गेले होते तेव्हा ते माता सीता व बंधु लक्ष्मण यांच्यासह नाशिक येथील तपोवनात थांबले होते. तपोवन ह्या श्रीरामांच्या चरणांनी पवित्र झालेले होते व तेथे जर आपण आश्रम बांधला तर अनेक राम भक्त तेथे येतील राहतील, जेवतील व जाता-जाता काहीतरी आशिर्वाद देऊन जातील ह्याच हेतून स्वामींनी तपोवनात आश्रम बांधायचे ठरवले होते. स्वामी नेहमीच म्हणायचे ''श्रीराम, हनुमान, विठोबाराया हे सारे सारखेच आहे'', त्यामुळेच त्यांनी साऱ्या देवांच्या भक्तांना रहाण्यासाठी आश्रमाची सोय केली होती म्हणूनच आपण अभिमानाने म्हणतो.

''मुखामध्ये नाम संताचे दर्शन।<br>
जगी जनार्दन ऐसा भाव।<br>
हेचि मज घडो जन्मोजन्मांतरी।

मागणे श्री हरी नाही दुजे ॥''
नाही तरी बाबाजी प्रवचनातून नेहमीच भक्तांना उपदेश करायचे.
''संत चरण रज लागता सहज ।
वासनेचे बिज जळून जाये ।
मग रामनामे उपजे आवडी ।
सुख घडोघडी वाढू लागे ।''

स्वामींनी आतापर्यंत ज्याही ठिकाणी शिवालये उभारले होते. त्याही ठिकाणी काहीतरी आगळे वेगळे म्हात्म्य घडलेलचं होते. काहीतरी विलक्षण महत्त्व त्याठिकाणी प्राप्त झालेलं होतें पूर्वी काही तरी महिमा त्याठिकाणी घडलेलाच होता. कितीतरी पुण्य त्याठिकाणाला प्राप्त झालेलचं होत व आता तर स्वामी प्रभुरामचंद्राच्या मुक्कामाच्याच जागेवर आश्रम उभा करत होते.

स्वामी आल्यापासून लगेच आश्रमाच्या पायाला सुरूवात झाली होती. प्रभुरामचंद्राच्या जयघोषात स्वामींनी आश्रमाचा पाया खोदण्यास शुभारंभही केलेला होता. स्वामींची किर्ती श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वराने अवघ्या राज्यात पसरवली होती व त्याचमुळे नाशिक आश्रमात मदतीसाठी लोकांची रांग तयार झाली होती. भक्तजणात वाढ होत होती. स्वामी वेगवेगळी मार्गदर्शन करत होते. महात्मे स्वामींची निरंतर सेवा करत होते, तर भक्तगण पाया रचण्याचे कार्य पूर्ण करत आले होते. जोपर्यंत आश्रमाचे कार्य पूर्ण होत नव्हते तो पर्यंत स्वामी श्रीमतींच्या विहीरीजवळ बारदानाचा तंबु करुन महात्म्यांसह राहत होते. ह्या लहाणग्या महात्म्याची विलक्षण किर्तीप्राप्ती असलेल्या रूपाची त्यांना आता विलक्षण साथ मिळत होती. दमलेले भक्तगण रात्री स्वामींच्या चरणाजवळ विसावा घेत होते. स्वामी वेळोवेळी त्यांच्यापाठीवरुन मायेचा हात फिरवत होते. प्रसाद देत होते. साक्षात्कार दाखवत होते व अशातच आश्रमाचे कार्य दिवसेंदिवस पूर्ण होत होते.

साधरणतः १९७६ च्या अखेरीस आश्रमाच्या खोल्या पूर्ण होत आल्या होत्या, किंबहुना जवळ-जवळ पुर्णच झाल्या होत्या, बाबाजींनी अक्षयतृतीयाच्या शुभमुर्हुतावर कुटीयात एक ओटा तयार करून घेतला होता. आता स्वामीजी तेथेच बसत होते. असेच स्वामी त्यादिवशी सकाळी-सकाळी कुटीयात ध्यान लावून बसले होते. आश्रमाच्या उर्वरित कार्याची संपुष्टात येणेकडे विलक्षण ओढ लागली होती. आश्रमाच्या कामाबरोबरच भक्तांनी स्वामींच्या आदेशानुसार विहिरीचे काम चालु केले होते. त्याचवेळी नाशिक जिल्ह्यातील वसंतराव सोनवणे, फुलसामडीकर, नारायण भाऊ, मधुकरराव इत्यादी गण विहीरीसाठी बाबाजींकडे गेले व सांगू लागले ''बाबाजी विहिरीला पाणी लागले.'' स्वामींना विलक्षण आनंद झाला. त्यांच प्रभु रामचंद्राच्या कुशीतल्या पाण्याने भगवान शिवाच्या मंदिराचे बांधकाम करण्याचे त्यांनी ठरवले.

स्वामींनी ध्यान लावले व आलेल्या भक्तास सांगण्यास सुरूवात केली. ''देव कुणी असो पण तो ईश्वर आहे. तो श्रीराम असो वा श्रीकृष्ण असो पण तो ईश्वर आहे, ह्या भुमित प्रभुरामचंद्र विसावलेले आहे. व त्यांनी स्वत:भक्तांना उपदेश केला होता.

''औकऊ एक गुपुत मत सबही कहपुकर जोरि।
संकर भजन बिना नर भगति न पावइ मोरि।''

तेव्हा या सर्व संदर्भानुसार आपण येथे ''शर्वयेश्वर भगवानाचे शिवालय बांधु.'' असे सांगत होते. लगेच स्वामींनी भक्तांना मंदिर बांधण्याच्या जागेवर नेले व म्हणाले ''धरा पोराहो दोरी टाका चुना, घ्या ईश्वराचं नाव आणि मारा टिकाव.'' यावरून बाबाजींनी कधीच कुणाला कमीपणाचे श्रेय दिले नाही. त्यांनी ह्या नाशिकच्या भक्तांना शर्वयेश्वराच्या पाया घेण्यास अनुमती दिली. पाया खांदण्याचे कार्य विलक्षण गतीने सुरू झाले, टिकाव हळूहळू जमिनीच्या भुगर्भाकडे सरकु लागले व हाहा म्हणता मंदिराचा पाया घेण्याचे कार्य काही बोटावर मोजण्या इतक्या दिवसात पूर्ण झाले. दिवसांमागून दिवस नाकातल्या श्वासाप्रमाणे निघुन गेले. इ.स. १९७७ चा पहिला महिना फार अभिमानाने नाशिकच्या भुमित उगवला. तो दिवस रविवारचा होता. सकाळी सकाळी बाबाजींनी प्रवचन घेतले व त्या प्रवचनात बाबाजी बोलले, ''आज पासून विहीर बांधण्याच्या आणि मंदिर बांधण्याच्या कामास सुरुवात करा.''

बाबाजींच्या आदेशाप्रमाणे भक्तांनी लागलीच कामास सुरूवात केली भक्तजण गवंड्याच्या हाताखाली श्रमदान करत होते तर आकरा बारा गवंडी मंदिराच्या व विहीरीच्या कामांत दंग झाले होते जेव्हा भक्तांनी गवंड्यास विचारले की तुम्ही एवढे जण एकाच वेळी कसे जमा झाले.'' तेव्हा एकेक गवंडी सांगु लागला, ''रात्रीच स्वामिंनी दृष्टांत दिला होता की, उद्या आश्रमात या व म्हणूनच आम्ही आलो.'' यावरून वाचकांनो तुम्ही स्वामींच्या लिलेचा विचार करा. स्वामींच्या कार्याचा विचार करा व त्यांचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरीजींना भावी आयुष्यात सत्कार्यासाठी मदत करा. गवंडी, भक्तजण स्वामींच्या शिवालयाच्या व विहीरीच्या कामात मंत्र मुग्ध झाले होते. काम सुरू होऊन वीस-एकविस दिवस झाले असावे. रात्रीची वेळ होती. विहीरीत लाईट सोडून त्या लाईटच्या प्रकाशात विहिरीचे काम सुरू होते. बाबाजी तेथेच रात्रीचे विहिरीजवळ बसले होते तितक्यात त्र्यंबकेश्वर येथील भक्तजण एका ब्रम्हणास घेऊन बाबाजींजवळ आले व म्हणाले, ''बाबाजी यांना वाचवा'' बाबाजींनी त्या ब्राम्हणाकडे दृष्टीक्षेप टाकून बघितले ब्राम्हण झटके देत होता. तोंडातून फेस येत होता. ब्राम्हणाचे डोळे लागलेले होते. हृदयातील श्वसनाचा आवाज पुसटसा झाला होता. फुफुस श्वसन करण्याच्या आजिबातच तयारीत नव्हते. एकंदरीत तो ब्राम्हणबुवा काही क्षणात मृत्युलोक सोडणार होता. बाबाजी म्हणाले, ''हा भस्म घ्या लावा त्याच्या कपाळावर, आणि पाजा त्याला घोटभर'' बाबांनी सांगितल्याप्रमाणे शिष्यांनी सर्व

काही केले. बाबाजींचा भस्म त्याच्या पोटात जातो ना जातो तितक्यात मरणाला घट्ट मिठी मारलेला ब्राम्हण जोरात ओरडला.

''श्री संत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज कि जय'' असे होते आपले बाबाजी,

''ज्याचे नाव ऐकता कानी।
यम काळ कापती दोन्ही।
ब्रह्म विष्णू रूद्र तिन्ही।
हात जोडून दिष्ठाती।''

अशा ह्या बाबाजींचे कार्य बघुन स्वर्ग मंचकात विराजमान झालेले देव-देविका मृत्यूलोकाकडे बघून स्वामींना वंदन करत होते. तर बाबाजी एक एक साक्षात्कार घडवून कार्याचा महिमा गातच होते. इ.स. १९७७ मध्ये स्वामी एक दोन दिवसांकरिता त्र्यंबकेश्वरला परत आले होते. त्यांना त्यांच्या आश्रमाची फारच काळजी लागली होती. त्यांना असे वाटायचे की आपला आश्रम लवकरात लवकर तयार व्हावा नि भक्तांच्या उपयोगासाठी यावा, स्वामी त्र्यंबकेश्वर येथे गेले तेव्हा त्यांचे आश्रमाचे काम केव्हाच पूर्ण झाले होते आणि त्यांचे गोशाळेचेही काम जवळ-जवळ पूर्ण होत आले होते. स्वामींना नेहमी वाटायचे गाय म्हणजे आपली माता, त्या गायीला आपण आपल्या मातेप्रमाणे जीव लावले पाहिजे. त्र्यंबकेश्वरातील शेतीची, आश्रमाची गोशाळेची पाहणी करत दुसऱ्या दिवशी पुन्हा नाशिक आश्रमात पोहचले.

नाशिक आश्रमाचे काम पूर्ण झाले होते. मंदिराच्या कामास बराचसा वेगही प्राप्त झाला होता. विहीरीचे काम आता जवळ-जवळ अवघ्या दोन परसावर आले होते. स्वामी नेहमी प्रमाणेच आश्रमात बसलेले होते. तितक्यात माडसांगवीचे बर्वे नामक ग्रहस्थ आश्रमात आले. आल्या आल्या त्यांनी नेहमी प्रमाणे आवाज दिला.

''श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज की जय''

नंतर स्वामींचे दर्शन घेतले, नेहमी प्रमाणे मनमोकळ्या मनाने न बसता, ते निरागस,शिन्न चेहऱ्याने स्वामीजवळ जाऊन बसले, स्वामी बर्वेना म्हणाले,

''फिकीर न करना वे।
साहब की मर्जी रखना बे।''

बाबाजींना बर्वे म्हणाले, ''स्वामी मी दोन वेळा इन्सपेक्टरची परिक्षा दिली पण नंबरच लागला नाही.'' यावर बाबाजी म्हणाले, ''उद्या ये'' बर्वे साहेब दुसऱ्या दिवशी सकाळी आश्रमात गेले, स्वामी विधी म्हणत होते. बर्वेनी संपुर्ण विधी ऐकली. तद्नंतर स्वामींनी त्यांना भस्म दिला. बर्वेनी स्वामींच्या भस्मावर विश्वास ठेवला व परिक्षा दिली, एक महिन्याच्या अंतराने निकाल लागला. बर्वेच तिसरा क्रमांक आला. त्यांचा आनंद जणु काही पाहिल्या फेरीतच सात समुद्रपार करून आला. परंतु जेव्हा बर्वे इन्सपेक्टरच्या मुलाखातीस जाणार होते, तेव्हा बाबाजी म्हणाले, ''नको जाऊ बाबा, ५ रु वरून तुझी नोकरी जाणार

आहे.'' यावरून बघा बाबाजी काय करू देणार नव्हते? त्यांनीच त्यांचा तिसरा नंबर आणला होता व आता त्यांना नोकरी देणार नव्हते. कारण बाबाजीला त्या बर्वेना पोलीस होऊ न देता दुसऱ्याच नोकरीस लावायचे होते. म्हणूनच एवढे रामायण घडले होते.

''करिल ते काय नव्हे महाराज
काय हे बाबाजींचे सामर्थ्य
काय त्या भस्माचा साक्षात्कार।''

बाबाजींना बर्वे म्हणाले, ''बाबाजी मी वकील होऊ का? यावर बाबाजी म्हणाले, वकील... पण तसाच आहे पण पोलिसापेक्षा बरा आहे. कारण काही वकिल खऱ्याचं खोटं आणि खोट्याचं खरं करतात. पण तु तसं करू नको, मी तुला आशिर्वाद देतो. तु वकिल होशिल. बर्वेनी वकिलांची परिक्षा दिली व ते चांगल्या मार्कांने पासही झाले. आणि वकिलीही करू लागले. अशा प्रकारचे एकाहून अनेक साक्षात्कार दाखवुन स्वामी जगाला एक आगळेवेगळे वळण देण्याचे कार्य करीत होते. भक्तगणही बाबाजींच्या कार्यात भरभरून प्रतिसाद देत होते.

मंदिराच्या भिंतीपर्यंत काम आले होते. स्वामींजीनी मंदिराचे काम भक्तांवर सोपवले व वेगवेगळे मार्गदर्शन करून श्रीक्षेत्र वेरुळ येथे जाण्याचा निर्णय घेतला. इ.स. १९७८ च्या सुरवातीच्या काळखंडात स्वामींनी वेरुळात आगमन केले. आतापर्यंत वेरुळच्या भक्तांनी बाबाजींची सर्व जमिन व्यवस्थित करुन ठेवली होती, सिध्देश्वराची पूजा आर्चाही अत्यंत चोखपणे पार पाडली होती. स्वामींनी आश्रमासमोरच एक गुरूकूल बांधायचे ठरवले व तो संकल्पही त्यांनी पूर्ण केला होता. ह्या गुरुकुलापाठीमागे स्वामींचा एकच हेतु होता कि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आध्यात्मिक व शैक्षणिक शिक्षण मिळण्याचा एकमेव मार्ग म्हणजे गुरुकूल. गुरूकुलात शिक्षण घेणारा माझा प्रत्येक विद्यार्थी हा भावी जीवनात समाजाला घडवणारा गुरू असावा, समाजाला वळण लावणारा तत्वतज्ञ असावा यासाठी स्वामींनी वेरूळ आश्रमात गुरुकूल बांधण्याचा निर्णय घेतला होता. अत्यंत शुभमुर्हतावर बाबाजींनी इ.स. १९७८ मध्ये गुरुकुलाचा पाया घेण्यास भक्तांना सांगितले व भक्तांनी घृष्णेश्वराच्या, सिध्देश्वराच्या जयघोषणेत गुरुकुलाचे काम सुरु केले, स्वामींनी बांधलेले हे पहिले गुरुकूल होते. त्यामुळे स्वामी तेथे अत्यंत बारकाईने लक्ष देत होते, स्वामी सकाळ पासून सायंकाळ पर्यंत तेथेच बसत होते. भक्तजण गुरुकुल पूर्ण करण्याच्या बेतात येत होते. गुरुकुलांचे बांधकाम दिवसागणिक पुढे जाऊन पूर्ण होत आले होते. किंबहुना जवळ-जवळ सर्वच पूर्ण झाले होते. स्वामींनी इ.स. १९७९ मध्ये अनाधिकृतपणे इयत्ता ५वी व ८वीचा वर्ग सुरू केला. विद्यार्थ्यांसाठी स्वामींनी त्वरित शिष्यांना सांगुन वसतीगृहाची बांधणी करून घेतली. विद्यार्थी आता गुरूकुलात आध्यात्मिक व शालेय शिक्षण एकाच वेळी घेऊ लागले होते व मुक्कामासाठी वस्तीगृहात राहु लागले होते. वस्तीगृहाच्या विद्यार्थ्यांसाठी जेवणाचे

भांडारगृह स्वामींनी तेथेच बांधून घेतले होते. शिक्षक वृंद सेवकवृंद बाबाजींच्या गुरुकुलात सेवेला हजर झाले. आता बाबाजी आधिका-आधिक वेळ गुरुकुलातील विद्यार्थ्यांसाठी देऊ लागले होते. स्वामींचे विद्यार्थ्यांसाठी गुरूकुल बांधण्याचे स्वप्न अखेरीस पूर्ण झाले होते. मात्र अद्याप गुरूकुलास शासकीय मान्यता मिळालेली नव्हती. तरीदेखील स्वामींनी ह्या मान्यतेची प्रमाणापेक्षा अधिक चिंता वाटत नव्हती. कारण बाबाजींचे कायमचे वाक्य असे होते ''देवाचे काम देव खुद करून घेतो.'' घृष्णेश्वराच्या दरबारातील बाबाजींची शेती आता फुलू लागली होती. येळगंगेच्या काठी बाबाजीने लावलेल्या भक्तीच्या परिजातकाची फुले केव्हाच उमलली होती. त्याचा सुहास अवघ्या वेरूळ नगरीत घुमू लागला होता. सकाळी सकाळी अध्यात्मिक शिक्षणापासून तर सायंकाळी विधीपर्यंत प्रत्येक विद्यार्थी आश्रमात मनपुर्वक आदराने कार्यरत होता. बाबाजी आश्रमाची, गुरूकुलाची, वस्तीगृहाची तेथील शेती, तेथील प्रत्येक विद्यार्थ्यांची जबाबदारी सन्यासी शिष्यांवर व इतर कार्यकारी भक्तांवर सोपवून पुन्हा नाशिकला परते. नाशिकमध्ये कार्य अजून अपूर्णच होते. त्यामुळे स्वामीजी तातडीने गुरुकुलाची सोय लाऊन नाशिकला उतरले. नाशिक चे आश्रम तर केव्हाच पूर्ण झाले होते. तद्नंतर विहीरीचे काम ही शिष्य मंडळीने पुर्णतः पार पाडले होते. आणि शर्वायेश्वराचा शिवालयाचा कळस ही आकाशाला टीपण्याइतका पुर्ण झाला होता. स्वामींनी आल्या आल्या बांधकामाची चौकशी केली, बांधकामाचा निकाल ऐकून स्वामींना बराच आनंद झाला होता. बाबाजींना शर्वायेश्वरा शिवालयाचे प्राण प्रतिष्ठा करावेसे वाटले. व त्यांनी त्यासाठी मुहर्तही बघितला. त्यांना अक्षयतृतीयाचा योग अत्यंत योग्य वाटला त्यानुसार त्यांनी वाकल्याच्या पंडीतकाकास निरोप पाठवून बोलावून घेतले. स्वामींच्या कार्यात विलक्षणीय गती होती, निरोप ऐकताच पंडीतकाका हातातले काम टाकून नाशिकला आले व स्वामींच्या कृपाआज्ञेनुसार ते त्वरित जयपूरला शर्वायेश्वराची लिंग व नंदीराज आणायला गेले. काकांनी आणलेल्या मुर्त्या स्वामींनी निट पारखून घेतले. व १९७९ च्या एप्रिल महिन्यातील २९ तारखेस प्राणप्रतिष्ठा करण्याचे ठरवले. नेहमी प्रमाणे स्वामींनी सकाळी सकाळी विधी वाचून ब्राम्हणांच्या हातुन शर्वायेश्वर भगवानाची प्राण प्रतिष्ठा करून घेतली व बारा वाजेच्या दरम्यान प्रवचनास सुरूवात केली, ''बाबाहो, बाबा तुमच्या गावाला आले आणि आज काम पूर्ण करून चालले, तुम्ही कामासाठी ही जी मदत केली, त्याचं तुम्हाला किती पुण्य मिळलं याचं काय वर्णन करू, आपल्या ह्या आश्रमात किती साधु पुण्य देऊन जातिल याचा विचारच करू नका. जन्माला आल्यावर जीवनात सारं काही मिळवता येतं पण गेलेली वेळ पुन्हा परत आणता येत नाही. जी ही वेळ येईल तिचा उपयोग करुन घ्या, आणि काही वेळ या देवाच्या नावासाठी राखून ठेवा, बाबाहो दिवसातून थोडं जरी देवाचे नाव घेतले तर सारं पाप कुठल्या कुठ निघुन जाईल, शहरातले लोक देव धर्मावर विश्वास ठेवत नाही. यामुळे ते साधु-संताकडे कधी जातचं नाही. पर्यायाने त्यांना देव मिळतच नाही. पण

बाबाचं तुम्हाला एक सांगणे तुम्हाला एक सांगणे आहे. काहीच करू नका. फक्त धर्म करा, लगेच महात्मा बोलले.

''धर्म करा, धर्म करा,
धर्म पांडवांनी केला
अंगी देव राबविला''।

(महात्मांना जवळ घेतल्या शिवाय बाबाजी कधीच प्रवचनास सुरुवात करत नव्हते, महात्मे बुध्दीने फार हुशार होते त्यांना एस.एस.सी. ला. ८५% आहेत. त्यामुळेच त्यांच्या धार्मिक ओव्या जशाची तशा पाट होत्या.... धन्य ते बाबाजी... धन्य आहे महात्मे.... (स्वामी शांतिगिरी) बाबाजी पुढे म्हणाले.)

''बाबाहो धर्म करा, दारासमोर आलेल्या गायीला एक कोरभर (१/४) तुकडा वाढत जा, ब्रम्हणांची सेवा करा पण ब्राम्हणाचे तत्वज्ञ वाटुनच सेवा करा, अन्नदान करा अन्नदानाने भुकेलेलल्याचे पोट भरते व तो थंड झाल्याने आशिर्वाद देऊन जातो. श्रमदान करा, श्रमदानाने हे असे शंकराचे देऊळ उभे रहाते आणि साऱ्या जन्माचे पुण्य पदरात पडते. नित्यनियमाने विधी करत जा'', लगेच महत्मा म्हणाले,

''ज्याच्या मुखी विधी जाण
तोचि खरा पुण्यवान''

बाबाजी पुढे म्हणाले, ''ज्याच्या तोंडात विधी असेल तो सगळ्यात जास्त पुण्यवान ठरतो म्हणून विधी थोडा वेळ काढून का होईना पण म्हणत जा. संताच्या सानिध्यात जात जा. संत हा देवापर्यंत नेणारा सर्वात गरीब नावाड्या आहे. तो पाण्यातून देवापर्यंत नेतांना आपल्याला कधीच मरू देत नाही. नेहमी तो आपल्याला तारतच असतो. आणि तारता-तारता एक दिवस देवाची भेट घालून देतो. म्हणून काहीच करून संत सेवा करा,'' तितक्यात महात्मे बोलले,

''करू नका काही संत संग करा,
पूर्वीचा दोहरा उगविला, पूर्वीचा दोहरा उगलेला''।

नाशिक शहरातील भक्तगण बाबाजीचे प्रवचन मन लावून ऐकत होते. स्वामीजी प्रवचनातून पुढे बोलले , ''हरभरा पेरल्यावर हारभराच उगवतो. आपण जशी काम करतो तसच आपल्याला भोग मिळतात. इंद्र देवाचा राजा होता पण नजर फिरली आणि आहिल्या भोगली, मग काय झालं पडली हजार भोकं त्याच्या शरीराला, पहा बाबाहो, देवाला सुध्दा त्यांच्या कर्माचे भोग मिळतात, तवा तुम्ही आम्ही काय आहे, काहीच नाही. म्हणून आज एवढंच सांगणार आहे. काही करू नका, पण चांगल काम करा. बाबाहो पोरांना चांगल वळण लावा, शाळेच्या शिक्षणात पोरिंबरोबर फिरू देऊ नका, एकदा हुकले का हुकले, पुन्हा कधीच सापडणार नाही. पोरोहो, परस्त्रीला परमुलीला आई बहिणी सारखाच समजा, नाही तर

कुठं जाशाल हे बाबालाही सांगता येणार नाही, आणि जी बायको करशाल तिला लक्ष्मी माना. तिला सांभाळा नाही तर तुम्ही गेले मग बाराच्या भावात. लगेचच महात्मा बोलले.

ज्याची नं बाई गेली
त्याची सर्व हानी झाली
त्याची सर्व हानी झाली

बाबाजी पुढे लगोलग म्हणाले, ''ज्याची बायको गेली, त्यांनं लगेच समजायचं आवरा, कारण त्यांची सारीच हानी होती'', बाबाहो,

ज्याचा बैल चांगला
त्याची शेती चांगली,
ज्याची बाई चांगली
त्याचा संसार चांगला

लोको हो ऐका चोरी आणि छिनाली करु नका. कोणाची वस्तु घेऊ नका, नितिमत्ता सुटु देऊ नका. निती सुटल्यामुळंच रावणाची सुवर्ण लंका हनुमंताने पेटवली, काही न करता रोज थोडा टाईम का होईना पण ह्या मंदिरात येत जा. सारे पाप मुक्त होतील. सार सुख मिळलं।''

तितक्यात महात्मा बोलले व बाबाजींनी प्रवचनात निरोप दिला.

देवाचीये दारी उभा क्षणभरी।
तेणे मुक्तीचारी साधीयेल्या ॥

बाबाजीचे प्रवचन संपले मात्र ते प्रवचन अवघ्या शहर वासीयांच्या रोमारोमात भिनले. नंतर सर्वांनी ''शर्वायेश्वर भगवान कि जय जनार्दन स्वामी महाराज की जय,'' अशा घोषणा दिल्या व महाप्रसादाचा बाबाजींचा आशिर्वाद समजून पुरपुरे अस्वाद लुटला. बाबाजींनी प्रवचनानंतर लगेचच नाशिकच्या भूमिस निरोप देऊन त्र्यंबकेश्वर गाठले. स्वामींनी त्यांच्या कार्याची ज्योत अत्यंत योग्य अशा ठिकाणी पेटवली होती. नाशिक सारख्या जिल्ह्यातून त्यांच्या कार्याचा प्रसार हा अत्यंत गतिनेच होणार होता आणि झालाही. स्वामींनी त्यांच्या जीवनात कधीच आराम घेतला नाही. सारे आयुष्य त्यांनी सत्कार्यासाठी झिझवले होते. आज इथे तर उद्या तिथे, असे करत त्यांनी अवघा महाराष्ट्रच भक्तीमय करुन टाकला होता. त्यांच्या कार्यांची काय महती गावी हेच कळत नाही. स्वामींनी उभारलेल्या नाशिकच्या आश्रमात आजही परंपरेनुसार अनुष्ठान चालते. शर्वायेश्वर महाराजांची हवी तेवढी सेवाही दररोज होते. आज ही तेथे भक्त गण दर्शनाला जातात. आजही भक्तांना तिथे त्यांचे जनार्दन स्वामी दिसण्याचा भास होतो. आजही त्यांच्या सन्यासी शिष्यांना स्वामी दिसतात. त्यांच्याशी बोलतात आणि त्यांना आशिर्वादही देतात. अशा त्या पुण्यपवित्र ठिकाणी आज स्वामीचेच परमशिष्य माधवगिरीजी महाराज कार्यरत आहे. स्वामींच्या कार्याची धुरा

माधवगिरी महाराज महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी प्रमाणेच सांभाळत आहे.

प्रवचन झाल्यावर स्वामींनी शिष्यांसह त्र्यंबकेश्वर गाठले. त्र्यंबकेश्वर येथे इ.स. १९८० मध्ये कुंभमेळ्यांची शेवटची पर्वणी होती. बाबाजी कुंभमेळ्याच्या वेळेतच आपल्या ग्रहस्थी व सन्यासी शिष्यांसह त्र्यंबकेश्वरात पोहचले होते. कुंभमेळ्याच्या वेळी अनेक साधु संत स्वामींच्या आश्रमात मुक्कामास होते. बरेचसे साधु संतांनी स्वामींनी बांधलेल्या हृदयेश्वराचे दर्शनही घेतले होते. कुंभमेळ्यात पंचदशमान आखाड्यातील बरेचसे साधु-संत उपस्थित होते. त्यांना स्वामींच्या कार्याचा महिमा चांगलाच ठाऊक होता आणि शिवाय बाबाही आखाड्याचे एक सदस्य होते. नाहीतरी बाबाजींचे गुरू नागाबाबा हेही त्या आखाड्यातले एक होते व त्यांनीच बाबाजीस दिक्षा दिली होती. त्यामुळे बाबाजींनी पुर्णत: आखाड्यात प्रवेश केलेला होता. जेव्हा बाबाजी त्र्यंबकेश्वरात गेले तेव्हा १०८ पु. गगनगिरी महाराज, स्वामी शिवगिरी महाराज हे ही आलेले होते. गगनगिरी महाराजांनी विधी करून शिवगीरी महाराजांहस्ते जगत गुरू शंकराचार्यांची थोर परंपरा लाभलेल्या पंचदशनाम जुण्या आखाड्यात प्रवेश केला होता. काही वेळानंतर शिवगीरी महाराज हे स्वामींच्या कुटीयात येऊन बसले त्याचवेळी बाबाजींनी आपल्या सन्यासी शिष्यांना शिवगिरी बाबांच्या हस्ते दिक्षा देण्याचे ठरवले होते. तद्नंतर शिवगिरी महाराज म्हणाले,

''जावा बावडीवर नाहाकर आव और आपके कपडे उधर ही फेक दो और नंगे इधर आना।''

बाबु महात्म्यांबरोबर पाच सहा जणांना दिक्षा द्यायची होती. शिवगिरी महाराजांनी एका एकाला हाक मारून बाबाजींना त्यांचे जुने नांव विचारले. त्यानंतर त्यांनी एक-एकाला नविन नावाने आरोळी मारून बोलविले व दिक्षा दिले.

बाबु महत्म्यांना बोलवण्यात आले. त्यावेळेस त्यांनी ''आओ ब्रहमगिरी जी।'' आओ शांतिगिरी '' असे नामकरण करून त्यांना दिक्षा दिली. महात्मांना, स्वत: शिवगिरीजींनी ब्रहमागिरीजी नावाने हाक मारल्यामुळे व शांतिगिरीजी असे नामकरण केल्याने बाबाजींना फार आनंद झाला, तेव्हा त्यांनी त्यांचा आनंद हस्तमुखाने टाळ्या वाजवत केला होता. सर्व दिक्षा पुर्ण झाल्यावर बाबाजींनी त्र्यंबकेश्वराची सर्व व्यवस्था लावून वेरूळला जाण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या कार्याला दिवसेंदिवस एक अनोखेच महत्व प्राप्त होत होते. शर्वयेश्वराचे शिवालय पुर्ण होताच स्वामींनी त्र्यंबकेश्वर गाठले होते. त्र्यंबकेश्वरात जाताच त्यांनी सन्याशांना दिक्षा शिवगिरी महाराजांच्या हातून दिली होती व तेथील आश्रमाची सर्व सेवा करून ते आता वेरूळला निघाले होते. एक पाय गमावून त्यांनी भक्तांसाठी ''किती जीवाचे रान केले होते?'' हे आपल्या लक्षात आले असेलच. त्र्यंबकेश्वरात आश्रमाची गोशाळा ची सर्व व्यवस्था तेथील जबाबदार व्यक्तींवर टाकून ते वेरूळला जाण्याच्या तयारीत लागले होते.

आजही त्र्यंबकेश्वरातील ह्दयेश्वराचे शिवालय भाविक भक्तांचे फार मोठ्या अभिमानाने स्वागत करते. आजही तेथील आश्रम भक्तांसाठी राहण्यासाठी निवारा देते. आजही तेथील शेती भक्तास पोटभर अन्नपुरवते, आजही तेथील गायी भक्ताला जगाचे दर्शन घडवून देतात आणि हे सर्व बघताच, आजही तेथे प्रत्येक जाणारा भक्त स्वामी जनार्दनांपुढे लिन होतो. सकाळ सायंकाळी नियमीतपणे तेथे विधी आरती होते. स्वामींच्या प्रथेप्रमाणे आजही तेथे श्रावण महिन्यात स्वामींचे उत्तराधिकारी १००८, महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांच्या आशिर्वादात्मक मार्गदर्शनाच्या उपस्थितीत अनुष्ठान होते व सध्या तेथे स्वामी शांतिगिरींच्या आशिर्वादात्मक आदेशानुसार चंद्रकांत गिरीजी महाराज कार्यरत आहेत. इ.स. १९८१ मध्ये स्वामी त्र्यंबकेश्वर सोडून वेरूळात येऊन दाखल झाले. तेथे आल्यावर स्वामी त्यांच्या गुरूकुलाची पहाणी केली. गुरूकुलातील प्रत्येक विद्यार्थ्यास जवळ घेऊन विचारणा केली. त्यांच्या पाठीवरून ममतेने हात फिरवला. त्यांचे सुख–दु:ख विचारले, शेतीची पहाणी केली, डोंगर उताराची जमीन सपाट केली, उजाड जमिनीत नंदनवन फुलवले, दगड, गवत यांची योग्य अशी विल्हेवाट लावली. शेतीच्या उत्पादनातून गुरूकुल आणि आश्रमाच्या अन्नासाठी पाठ पुरवठा केला. पाण्यासाठी ठिकठिकाणी विहिरी खोदल्या व अशातच त्यांनी ३ मे १९८१ रोजी वेरूळात अनुष्ठान, भागवत पारायण, ज्ञानेश्वरी पारायण, गुरू चरित्र पारायण, अखंड हरिनाम सप्ताह चालु होता. तेथील सर्व कार्यक्रम आटोपल्यावर त्यांनी गावोगावी जाऊन प्रवचन केले, तेथे अवताररूपी कार्याचा विस्तार केला, भक्तीचा दिवा घरोघरी लावला. त्या प्रकाशात अनेकांना जीवन फुलवायला लावले, अनेकांचे घरे बसवले, अनेकांना वारसा दिले, अनेकांना जीवन दिले व वेरूळ सोडून पुन्हा त्र्यंबकेश्वरला जाण्याचे ठरवले. गाय कोणत्याही रंगाची असो तिचे दुध एकाच रंगाचे असते. साखर कोणत्याही कारखान्यात तयार झालेली असो तिची गोडवी सारखीच असते. तसेच स्वामी कुठेही असो तिथे भक्तांची उपस्थिती सारखीच होती. मग ते पुणतांबाच्या काशिविश्वेश्वर यांचे शिवालयात असो, अथवा जातेगांवच्या पहाडावर असो, किंबहुना पारेश्वराच्या पालखेडात असो. त्यांच्या भक्तांची सेवा करण्याची गर्दी सारखीच होती. आता कुणीही स्वामींसाठी गाड्या घेऊन यायचे व स्वामी जेथे म्हणतील तेथे ते घेऊन जायचे आता वेरूळ आश्रमातील अनुष्ठान संपले व त्र्यंबकेश्वरला जायचे होते. मालेगांव तालुक्यातील सौंदाणे येथील केवळ आप्पा पवार यांच्या गाडीत स्वामी जाऊन बसले व त्र्यंबकेश्वरकडे निघाले. सायंकाळी सहा वाजता त्र्यंबकेश्वर येथे स्वामींचा कार्यक्रम होता. चार वाजेच्या दरम्यान स्वामी वेरूळहून निघाले. गाडी वडाळा, खेडगाव, करनुद, बोरगांव, ढेकु, न्यायडोंगरी, अंदरसुल मार्गे त्र्यंबकेश्वर जाणार होती. गाडी नाशिकच्या शर्वायेश्वराजवळ काही क्षणासाठी थांबली व पुन्हा त्याच गतीने गाडी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर रस्त्याला लागली. परंतु एक साक्षात्कार घडला. गाडीमागे शंभर फुट अंतर सोडून एक गाढव गाडी मागे पळत

सुटले. केवळ आप्पा स्वामींना म्हणाले ''बाबा गाडीमागे एक गाढव पळतं येतयं''.

बाबा म्हणाले, ''गाडी थांबवा व मला खाली उतरावा,'' भक्तींनी त्यांना खाली उतरवले. स्वामींनी चक्क त्या गाढवाला नमस्कार केला. नमस्कार पहाताच गाढवानेही स्वामींना नमस्कार केला व आल्या रस्त्याने परत गेले. स्वामी पुन्हा गाडीत बसले व भक्तांना म्हणाले,

'' बाबाहो, देव कधी कशातून दर्शन देतो, हे सांगता येणार नाही.'' गाडी त्र्यंबकला पोहचली. बाबांनी केवळांना विचारले, ''केवळ किती टाईम झाला रे.''

अप्पांनी घड्याळ बघितले तर तितकाच वेळ घड्याळ दर्शवित होते. जितका वेळ ते पूर्वी दर्शवित होते त्र्यंबकेश्वरला गेल्यानंतर स्वामींनी तेथे प्रवचन केले. व पुन्हा स्वामी वेरूळला परतले, तदनंतर स्वामींनी अनेक ठिकाणी प्रवचने केली. त्यामध्ये बोरवाडी, बोरगांव, कातरणी, विखरणी, सारगांव, शिरवाडे, मालेगांव तालुक्यातील सौंदाणे ही ठिकाणी बरेच प्रचलित आहे. स्वामी जेव्हा सौंदाणे गावात केवळ आप्पांच्या शेतात प्रवचनास गेले तेव्हा मालेगांव तालुक्यातील अनेक भक्त तेथे जमले होते. आता स्वामींच्या कार्याचा प्रसार उत्तर महाराष्ट्रातही झाला होता. स्वामींनी त्या केवळ आप्पांना आशिर्वाद म्हणून पाणी दिले, आजही त्यांच्या कुटीया जवळील विहीरीला प्रचंड प्रमाणात पाणी आहे. (तद्नंतर फार दिवसा नंतर स्वामी जेव्हा मालेगांव तालुक्यातील वऱ्हाणे गावात आले होते, तेव्हा आमच्या जळगांव (निं.) येथील सखाहरी मुरलीधर दुकळे व पोपट मुरलीधर दुकळे यांनी मला स्वामींना बघण्यासाठी वऱ्हाणे येथे नेले होते. मी स्वामींना प्रथमचे व अखेरचे बघितले होते.)

ठिकठिकाणी प्रवचने करून स्वामी इ.स. १९८२ मध्ये पुन्हा वेरूळात परत आले होते. त्याच वर्षाच्या फेब्रुवारी मार्चच्या महिण्यांत स्वामींना नेण्यासाठी टुणकी या गावातील भक्तमंडळ आले होते. यापूर्वी स्वामी टुणकी या गावात एकदा प्रवचनास गेले होते. टुणकी या गावात तुकाराम बीज यादिवशी मोठी यात्रा भरते. कारण असे म्हटले जाते की मार्ग शुध्द दशमीला तुकाराम महाराजांनी विठोबा रायांना भिक्षा वाढली. होती म्हणून या गावास ''भिक्षुक वाडी'' असे ही म्हणतात. तुकाराम महारांजामुळे ह्या गावास अनन्य साधारण महत्व असल्याने तेथे तुकाराम बीज या दिवशी मोठी यात्रा भरते आणि त्याच यात्रेप्रित्यर्थ स्वामींनी तेथे एकदा प्रवचन केले होते. त्या प्रवचनाचा प्रभाव टुणकीवासींवर जबरदस्त पडल्याने ते स्वामींना बोलवण्यासाठी वेरूळ येथे आले होते.

जेव्हा टुणकीचे भक्तमंडळ वेरूळात आले होते तेव्हा स्वामी कैलास लेणीच्या बाजुला खाणीजवळ बसले होते. दगडे बाजुला काढून विहीर खोदण्याचे काम चालु होते. महात्मे स्वामींची सेवा करत होते. इतर संन्यासी वृंद ज्याच्या-त्याच्या कामात गुंतलेले होते, त्याचवेळी गणेश नगर साखर कारखान्याचे चेअरमन आले, त्यांनी स्वामींकडून नारळ घेतले,

स्वतः चेअरमनांनी श्रमदान केले आणि थोड्या वेळाच्या अवधीनंतर जाण्यास निघाले, जाता-जाता ते हळूहळू खाली उतरत होते, तितक्यात एक दगड डोंगरावरून घसरला तो त्यांच्या डोक्यावर पडणार, तितक्यात बाबा खाणजवळूनच म्हणाले, ''अरे रे बाजुला व्हा....''

बाबाचे शब्द त्या घसरणाऱ्या दगडाच्या वेगापेक्षा किती तरी अधिक पट वेगाने त्या चेअरमनच्या कानात गेले व ते बाजुला झाले, चेअरमन वाचले आणि दगडाने त्याचा मार्ग बदलला. हा चालता-बोलता साक्षात्कार बघुन टुणकीचे भक्तजण आश्र्चचकित झाले. आणि अधिकच तन्मयतेने ते स्वामींच्या विनवण्या करू लागले, मग स्वामींनी श्रीक्षेत्र टुणकी येथे आश्रम व गुरुकुल बांधण्याचा निर्णय घेतला. स्वामी उद्या येणार त्याच्या आगोदरच्या दिवशी संपुर्ण टुणकी गावात गंगाबाबा द्वारे दवंडी देण्यात आली दुसऱ्या दिवशी सकाळी सडा-रांगोळी अवघ्या गावातील अंगणात शोभून दिसत होती. अंगणातील तुळशी वृंदावण आनंदाने नाचत होते व स्वामींच्या येण्याच्या प्रतिक्षेत होते. गुरू जनार्दन स्वामी आपल्या गावात येणार म्हणून गोठ्यातल्या गायीने स्वामींची आराधना केली, स्वामी टुणकीत कार्यासाठी येणार म्हणून निसर्गाच्या प्रत्येक आपत्याने यथायोग्य आनंद दर्शवला तुकाराम बीजाच्या दिवशी सकाळी-सकाळी स्वामी टुणकीत आले, भक्तजनांना आनंद झाला.

''जनार्दन स्वामी की जय,
म्हाळसा माता कि जय''

अशा नामसागराच्या जयघोषात भक्तांनी स्वामींचे स्वागत केले. या अगोदरच भक्तांनी स्वामींना जमिन दान करण्याचे ठरवले होते. कारण स्वामी यापूर्वी टुणकी शेजारील निमगांवात नेहमी प्रवचनास येत असत तेव्हा ते नेहमीच म्हणत असायचे ''भुदान करा.... अन्नदान करा..... श्रमदान करा.....'' यावरून भक्तांनी मनोमनी स्वामींना जमिन देण्याचे ठरवले होते. स्वामी गावात आले, ठरल्या वेळेवर प्रवचन झाले, प्रवचन संपणार तितक्यात शिवाजी माधवराव निकम, नारायण आण्णा निमगांवकर व इतर भक्त स्वामींकडे गेले व जमिन दान करण्याचा प्रस्ताव मांडला तितक्यात स्वामी म्हणाले, ''बाबा कधीच कुणाचं फुकटचं घेत नाही.''

मग नारायण आण्णांनी काही मोबदला बाबाचा आशिर्वाद म्हणून स्विकारला व जमिन दान केली. सुरुवातील, त्यांनी बाबाजीस सुमारे चौदा एकर जमिन दिली व नंतर दोन वर्षानी पुन्हा ९ एकर जमीन मिळाल्यावर बाबाजीने तेथे आश्रम बांधण्याचे ठरविले. योग्य असा निर्णय घेऊन बाबाजींनी प्रवचनास निरोप दिला व टुणकीच्या दक्षिणेला घेतलेल्या जमिनीत पाय टाकला, टुणकीचा परिसर म्हणजे दगड गोट्यांचा माळपसारा होय, त्र्यंबकेश्वरचा डोंगर पायथाचा, जातेगावचा पहाड, वेरूळचा शृंगारनाला, तसाच टुणकीचा चढता परिसर होता. जमिन मध्यम प्रतिची होती, निसर्गरम्य परिसरात फुललेली होती.

गावाच्या चौबाजुंनी मन शांत होईल इतके झाडे नेहमीच मनाला हेलकवना देत होती. पाने-फुलांनी बहरलेलं आणि नाजुक फुलपाखरांनी मोहकलेलं हे छोटसं पण टुमदार गाव हया राष्ट्रसंताच्या पदस्पर्शानं पुणीत झालं होतं. स्वामींनी तिथेच टेकडावर तंबु टाकण्यास सांगितला, शिष्यांनी भर उन्हात तिथे तंबु ठोकला, स्वामींनी तिथेच रहाणे पसंद केले, स्वामींनी आश्रमा अगोदर विहीरीचे काम हाती घेतले, भक्तांनी स्वामींच्या आशिर्वादात्मक आदेशानुसार विहीर खोदण्यास सुरूवात केली. स्वामी हे टुणकी परिसरात प्रमाणापेक्षा जास्त प्रसिध्द असल्याने तेथे जमणाऱ्या भक्तांची उपस्थिती ही प्रमाणापेक्षा अधिकच होती. भक्तगण स्वामींच्या दर्शनाला येत होते. स्वामी त्यांना प्रथेप्रमाणे श्रमदानासाठी सुचना देत होते. भक्तगणही स्वामींच्या सुचनेस अनुमोदन देऊन त्यांच्या कार्यास प्रचंड साथ देतच होते, स्वामींनी हाती घेतलेली विहीर दोन दिवसात चार परसाच्या कामावर जाऊन भिडली होती. वार सोमवारचा होता, शिवाजी पाटील, चित्तरखेडकर व इतर भक्तगण आणि संन्यासी वृंद विहीर खोदण्याचे काम तन्मयतेने करत होते, विहीर खोदता खोदता एक कपार आडवी आली. भक्तांनी ती कपारच खोदुन काढण्याचे ठरवले व त्यानुसार ते पहाराचा घाव त्या कपारीच्या मुळाशी घालत होते. स्वामी विहीरीच्या वर कठड्यावर डोलीत बसलेले होते. त्यांना काय समजले नि काय नाही, हे कुणास ठाऊक परंतु त्यांनी उजवा हात वर केला व शिष्यांना वरती येण्यास सांगितले. शिष्यांना काहीच कळाले नाही. बाबाजीच्या आदेशानुसार सर्वजण वरती आले व म्हणाले, ''काय बाबा''?

बाबा म्हणाले, ''सारेजण आले का?'' शिष्यगणांनी 'हो' म्हणून उत्तर दिले. ''हो'' हा शब्द ऐकताच स्वामींनीवर केलेला उजवा हात खाली घेतला. शिष्यगण बघता तर काय चमत्कार, स्वामींचा उजवा हात खाली घेताच मुळावर घाव सोसणारी कपारच खाली कोसळली. भक्तगण गहिवरले, त्यांना बाबाच्या ममतेची विशाल अशी पावती मिळाली. बाबाजींच्या ताकदेची जाणीव झाली. लक्षात घ्या वाचकांनो स्वामींचा महिमा, स्वामींचे प्रेम, स्वामींची माया, स्वामींचे साक्षात्कार, स्वामींची कार्य प्रतिमा, आपल्या भक्तांना काही होऊ नये याची किती काळजी स्वामी घेत होते याची जाणिव आपल्याला झाल्याखेरीज राहणार नाही, स्वामींना नेहमीच शिष्यांची काळजी वाटत होती. आणि म्हणुनच ते सदा न कदा भक्तजण जेथे काम करत असायचे, तेथे ते जाऊन बसायचे.

हा विलोभनीय साक्षात्कार बघुन शिष्य गहिवरले, ''श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज की जय'' अशा घोषणा देत विहीरीत उतरले, आणि विहीरीला तळाशी घेऊन जाण्याच्या तयारीस लागले. सहा-सात दिवसांच्या अंतराने विहीर पूर्णतः खोदून झाली. विहीरीत भरपूर पाणी लागले. स्वामींनी त्या विहीरीचे पाणी तेथुन तीन किलोमीटर अंतरावर घेतलेल्या ज़मिनीत नेण्याचे ठरवले व त्या जमिनीत आश्रम आणि गुरूकुल बांधयचे योजले, स्वामींनी काही भक्तांना खडकाळ परिसर भुईसम करण्याचा

ईशारा दिला तर काहींना पाईप लाईन करण्यासाठी चारी खोदण्यास लावले. एकाच ऋतुत, एकाच एकाच वेळी दोन ठिकाणी श्रमदान होतं होते, स्वामी रात्रंदिवस भक्तांजवळ हेऱ्याफेऱ्या मारत होते. एकीकडे पाईपलाईन पूर्ण झाली तर दुसरीकडे आश्रमालायक जमिन तयार झाली. मग स्वामींनी चांगला मुहर्त बघितला व आश्रमाचा पाया घेतला.

देव माझा मी देवाचा ।
तुझ माझ आहे नात ॥

या उक्तीनुसार सारी शिष्यमंडळी आश्रमाच्या कामास लागली, आश्रमाचा पाया मावळत्या सुर्याप्रमाणे केव्हाचं पूर्ण झाला. एका–मागून एक दिवस जाऊ लागले, आश्रमाचे कामही पूर्ण होऊ लागले, काही दिवसातच तेही पूर्ण झाले. आश्रम पूर्ण होताच. शिष्यांनी स्वामींच्या सुचनेनुसार गुरुकुलाच्या निर्मितीची तयारी केली. गुरुकुलाचाही पाया आता पूर्ण व्हायच्या बेतात आला तोही पूर्ण झाला.

पाया पूर्णतवास आल्यानंतर स्वामी डिसेंबरच्या अखेरीस सर्व जबाबदारी वरिष्ठ ग्रामस्थांवर व परिक्षेस पात्र झालेल्या शिष्यांवर सोडून वेरूळला गेले. वेरूळ येथे आल्या नंतर स्वामी लगोलग शृंगार नाल्यातील कारभार बघण्यास गेले, तेथील शिष्यांची श्रमदाने बघुन स्वामी ना पराकोटीचा आनंद झाला. जे ही गुरूकुलात बरेचशे विद्यार्थी शिक्षण घेत होते. तेही बघुन स्वामी खुलावले होते. मात्र त्यांचा एकच गोष्टीची नाराजी वाटत होती ती म्हणजे गुरुकुलाला अजुनपर्यंत महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेली नव्हती. शासन विनाअनुदान तत्वावर सुध्दा मान्यता देत नव्हते. शासकीय दरवाज्यांच्या कड्या वाजवून भक्तगणांचे हात दुखू लागले होते. तरीदेखील मान्यता मिळण्याचे कुठेही पुसटसे किरण नजरेस दिसत नव्हते. मात्र काही दिवसांनी गुरुकुल बंद पडेल याची दाट चिन्हे अत्यंत स्पष्टपणे नजरेस पडत होती. त्यादिवशी सन १९८३ च्या सुरूवातीस स्वामींनी श्रीक्षेत्र वेरूळ येथे प्रवचन घेतले व त्यांनी प्रवचनातून सहज प्रकट केले.

''बाबाहो, देवाचे काम आपण करतो, ही देवाची शाळा आहे. आपण जर खऱ्या मनोभावे सेवा करत असु तर देवाला इथं येवून मान्यता द्यावी लागेल.'' आणि खरोखर तेच झाले. त्यावेळी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री जनाब ए.आर.अंतुले हे होते, ते स्वतः सरकारी विमानाने श्रीक्षेत्र वेरूळ येथे गेले, त्यांनी धर्माला बाजूला सारुन स्वामींना नतमस्तक होऊन दर्शन केले व जागेवरच स्वामींच्या पहिल्या–वहिल्या गुरुकुलास मान्यता दिली. भक्तांनो लक्षात घ्या, बाबाजींचा महिमा, त्यांच्यात इतकी ताकद होती कि स्वतः मुख्यमंत्री तेथे येऊन गुरुकुलास परवानगी देऊन गेले. किती अधिकार होता ह्या सृष्टीवर हेच या साक्षात्कारातून बघण्यास मिळते. आता गुरूकुलातील विद्यार्थी संख्या तीनशे साडे तीनशे झाली होती. बाबाजींच्या स्वप्नाला एक खरेपणा आला होता, वेगवेगळ्या ठिकाणाहून गोरगरिबांची बालके आता गुरुकुलात होते. शिक्षक शिक्षण देता–देता आध्यात्मिक

शिक्षणही विद्यार्थ्यांच्या मनापर्यंत पोहचवत होते. यातुनच एकेक विद्यार्थी सुसंस्कृत बनत होता. सकाळी उठल्यावर स्नान आटोपल्यावर सर्वप्रथम विधी आरती, तद्नंतर शेतीतील कामे, जेवण, शिक्षण, अभ्यास, थोडा फार कर्म, विधी आरती असे क्रमानं नित्यक्रम आश्रमातील गुरुकुलात चालु झाले होते. आश्रमातील सर्व कामे धर्मासाठी, भक्तीसाठी दिवसेंदिवस फुलत असल्याने बाबाजी मनोमन खुलत होते.

इ.स. १९८३ चा फेब्रुवारी मार्च महिमा उजाडला असावा. त्याच दरम्यान जळगाव जिल्ह्यातील, चाळीसगांव तालुक्यात, ''उपखेड'' या गावातील शिष्यगण स्वामींना ''उपखेड'' येथे नेण्यासाठी आले होते. नाहीतरी जळगांव जिल्ह्यापर्यंत स्वामींच्या कार्याची ध्वजा फडकलेली असल्याने तेथील ग्रामस्थाना स्वामींना तेथे नेण्याची विलक्षणीय आशा लागलेली होती व ते खास निमंत्रण देण्यासाठी श्री. क्षेत्र वेरुळ येथे आले होते.

स्वामींनी विचार केला आणि तेथे येण्यास संमती दर्शवली. कदाचित स्वामींनाही वाटले असावे. कि उत्तर महाराष्ट्रातही भक्तीचा मळा फुलवावा. याचसाठी त्यांनी आता त्यांच्या कार्याचा मोर्चा खान्देशाकडे कुच केला. दक्षिण महाराष्ट्रात नेतृत्व केल्यावर हिंदवी ध्वजा फडकवणाऱ्या शिवाजी राजासही एकदा उत्तर भागात जाण्याची इच्छा झाली होती. आणि कार्याची एक प्रतिमा म्हणून त्यांनी उत्तर भागात त्यांची मोहिम उभारली होती. अगदी तसेच ह्या संतास वाटले असावे. याच कारणास्तव त्यांनी खान्देश प्रदेशातील आमंत्रण स्विकारले होते. ''उपखेड'' गावातील भक्तांना येण्याची तारीख देऊन, येतो म्हणून सांगितले व पुन्हा शृंगार नाल्याकडील भागात श्रमदान करणाऱ्या भक्तांकडे ते जाऊन बसले, स्वामी दर्शनास येणाऱ्या प्रत्येक भक्तास म्हणायचे ''सतत उद्योग करा, काम करा,

**बायोंनो काम करा,**
**माणसांनो काम करा,**
**चला उठा कामाला लागा ।।**

स्वामींना नेहमी काम आवडायचे म्हणून त्यांनी उपखेड ग्रामस्थांनाही शृंगारनाल्याकडे श्रमदानासाठी नेले होते.

दुसरा दिवस उजाडला, स्वामी महत्म्यांसह इतर शिष्यांना घेऊन उपखेडला जाण्यास निघाले, काही तासांनंतर स्वामी कन्नड घाटातून चाळीसगांव मार्गे उपखेडात उतरले, स्वामी येण्या अगोदरच उपखेड वासीयांनी त्यांच्या स्वागताची पूर्णपणे तयारी केलेली होती. स्वामींना बघताच भक्तगणांना विलक्षण आनंद झाला. स्वामींच्या अंगावर सुवासिक फुले टाकून ''श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज कि जय'' अशा घोषणा देऊन त्यांनी स्वामींचे यथायोग्य स्वागतच केले. स्वामींनी उपखेड येथील मराठी शाळेतच त्यांचे रहाणे पसंद केले. छोट्याशा खेड्यात जन्म घेऊन अवघ्या देशात कार्य करण्यासाठी अवतार घेतलेल्या ह्या संताने त्यांचा पहिला मुक्काम उपखेड्याच्या मराठी

शाळेतच केला होता. औरंगाबाद, अहमदनगर, नाशिक इत्यादी जिल्हयातील दिशा–दिशात कार्याचा प्रसार केल्यानंतर ही महान विभुती आता कार्यासाठी ''जळगांव'' जिल्हयात उतरली होती. जळगांव जिल्ह्यातील, चाळीसगांव तालुक्यात समाविष्ठ होणाऱ्या ह्या छोट्याशा उपखेड या गावात ही महान माऊली कार्यासाठी आता सरसावली होती. दुसऱ्या दिवशी सकाळीस आठ नऊ वाजेच्या दरम्यान स्वामींनी मराठी शाळेच्या आवारातच प्रवचन घेण्याचे ठरवले होते. प्रचंड गर्दी त्या मराठी शाळेच्या प्रंगणात उपस्थित झाली. प्रवचन संपताच उपखेडातील सौभाग्यवती कौशल्याबाई नागदेव निकम उर्फ ''तापाई'' यांनी स्वामींना नऊ एकर जमिन दान केली. परंतु स्वामींनी आतापर्यंत कुणाचीच जमिन फुकट घेतलेली नव्हती. म्हणुनच त्यांनी चौदा हजार रुपये तापाईस मोबदला देऊन नऊ एकर जमिन दान म्हणून घेतली. पण त्या स्त्रिच्या मनात देवाविषयी फारच अविर्भाव होता. स्वामींनी तिला चौदा हजार देताच त्या पुण्यवान स्त्रीने तेच चौदा हजार पुन्हा स्वामींना दान म्हणून त्यांच्या दान पेटीत टाकले. स्वामींना फार आनंद झाला. स्वामींनी त्यांना आशिर्वाद म्हणून श्रीफळ दिले व प्रवचनात निरोप दिला. स्वामी भक्त गणासह तापाईने दान दिलेल्या जमिनीकडे गेले. स्वामींना कार्यासाठी मिळालेली जमिन गिरणानदी तिरावरील खडकाच्या कुशीत शांत निद्रावलेली होती. आजुबाजुला गावाचे वैभव वाढवणारी दाट झाडी होती. ह्याच झाडांवर दिवसभर भ्रमण करणारे वेगवेगळे पक्षी सायंकाळी विसाव्यासाठी जमत होते, जमिनी शेजारीच विपुल प्रमाणात पाणी साठा असल्याने स्वामींनी सर्वप्रथम आश्रम बांधायचे ठरवले. त्यासाठी त्यांनी पुन्हा एकदा भक्तांना एकत्र केले व आश्रम बांधण्याची कल्पना सांगितली. आश्रम बांधण्याचे ऐकताच शिष्यांना मनापेक्षा जास्त आनंद झाला. स्वामींनी उपखेडात आल्यानंतर सतत तिन दिवस प्रवचन केले. प्रवचनातून त्यांनी बरीचशी जगकल्याणी कल्पना जगापुढे पर्यायाने उपखेडवासीयांपुढे मांडली असल्याने बरचशी शिष्यमंडळी आश्रम बांधण्यासाठी तयार झाली होती. काही वेळेनंतर स्वामींनी आश्रमासाठी जागा निश्चित केली. ''हीच जागा आश्रमासाठी अनुकूल आहे.'' असे भक्तांना त्यांनी सुचवले. मात्र स्वामींनी सुचवलेली जागा ही पूर्णपणे खडकांच्या कुशीत जन्मास आलेली होती. त्या जागेत फार परिश्रम घ्यावे लागणार होते. खडकाळ जमिनीत आश्रम उभारायचा म्हणजे साधी गोष्ट नव्हती. तरी देखील स्वामींच्या उपस्थित ही गोष्ट म्हणावी इतकी अवघड ही नव्हती. म्हणतात ना

**काही करारे साधन ।**
**जेणे जोडे नारायण ।।**

ज्याने साधना केलेली आहे. त्याला नारायणाची देखील जोड असते व ज्या कार्यासाठी दोघांची जोड असेल त्या कार्यासाठी काहीच उणे नसते. म्हणजेच बारा वर्ष साधना करणाऱ्या ह्या साधकाला नारायणाची जोड होती त्यामुळेच खडकाळ जमिनीत आश्रम उभारणे ही

तेथील भक्तगणांसाठी वाटते एवढी अवघड गोष्टही नव्हती. स्वामींच्या उपस्थितीत विधी वाचुन स्वामींच्या नावाचा जयघोष करीत उपखेड ग्रामस्थांनी खडकावर घाव घातला व खडकाळ भागात आश्रमलायक जमिन तयार करण्यासाठी प्रत्येक भक्तगण धावू लागला. टिकाव, पावडे, कुदळ, पाट्या असे कितीतरी साहित्य घेऊन भक्तगण खडकावर राबू लागले, खडक फोडू लागले व गिरणानदीच्या तिरावर सदन अशी जमिन तयार करू लागले.

आठ दिवस सारखे श्रमदान झाल्यानंतर आश्रमासाठी अनुकूल अशी जमिन तयार झाली. स्वामींच्या हस्ते शुभदिवसावर श्रीफळ फोडून भक्तांनी आश्रमाचा पाया घेण्यास सुरूवात केली. बरेचसे भक्तगण आश्रमाच्या कामासाठी राबत होते तर वृध्द मंडळी आश्रमाच्या आजुबाजूस खड्डे खोदून नारळ, चिक्कू, जांब अशी फळझाडे नि फुलझाडे लावत होते. लहान लहान बालके त्या झाडांना पाणी घालण्याचे कार्य क्षणोक्षण करत होते. यातून स्वामींच्या कार्याचा भक्त मळा त्या गिरणातिरावर फुलत होता.

दिवसामागून दिवस उगवणारा सुर्य काही क्षणात घेऊन जात होता. स्वामींच्या अवताररूपी कार्याचा एकेक दिवस पुढे सरसावत होता. आश्रमाचा पाया तयार होऊन पुर्ण आश्रमच तयार होण्याच्या मनस्थितीत होता. एकेक भक्त श्रमदान करत होता. स्वामी वेळोवेळी लहान मोठे साक्षात्कार दाखवून भक्तांना दैवाची जाणीव करून देत होते. वेळोवेळी उपदेशासाठी प्रवचने घेत होते. यातच एक एक दिवस निघुन जात होता, अखेर स्वामींनी संकल्प केलेला पूर्ण झालाच. स्वामींच्या कार्याचा कळस जळगांव जिल्हयातील शिखरावर राजमुकुटाप्रमाणे जाऊन बसला नि स्वामींच्या कार्याची ध्वजा उत्तर महाराष्ट्रात फडकली.

आश्रम पुर्ण झाल्यावर स्वामींनी एक अखेरचे प्रवचन घेतले व आश्रमाची सर्व जबाबदारी काही निवडक भक्तांवर टाकून वेरूळला निघून गेले. सकाळी-सकाळी दहा वाजता स्वामींनी आश्रमासमोरच प्रवचन घेतले. प्रवचनातून उपखेड ग्रामस्थांना स्वामींनी दैवाचं महात्म्य समजून सांगितले, प्रवचनात ''दारू पिऊ नका'' असे भक्तांना स्वामींनी अवर्जुन सांगितले तसेच कुणाचे धन बुडवू नका, कुणाला फसवू नका, प्राणीमात्रांवर दया करा, ''आईला'' जिवनाचा खरा-खुरा रथ माना, गाईला देव माना, भुदान करा, श्रमदान करा, अन्नदान करा, जिवन जगता-जगता शेतीवरही प्रेम करा, शेतीतून येणाऱ्या उत्पन्नावरच आपण जगतो, त्यामुळे तनमनधनाने शेती करत जा. असे कितीतरी लाखमोलाचे उपदेश स्वामींनी भक्तांना केले व अखेर एवढेच म्हणाले ''बाबाहो, हे सारे देवाचे होते, तुम्ही जे केले ते तुमच्या साठी आणि देवा साठीच केले, बाबाचं याच्यात काहीच नाही आहे, सर्व मिळून आश्रमात येत जा, देवाचं नाव होत जा, आश्रमाची शेती आपल्या सगळ्यांची शेती समजून करत जा, आश्रमाच्या शेतीचं उत्पन्न मात्र आश्रमात देत जा. चोरी करू नका, चोरी केल्याने ते जय जाणार नाही आणि त्यामुळे होणारे पाप सात जन्म फिटणार नाही. शेतीचं उत्पन्न आश्रमत द्या, त्यातुनच येणाऱ्या साधु-संताना, गोर-गरिबांना, अन्नदान करत जा, हे

संभाळा आता सारं बाबाचं काम झालं, बाबा आता चालले, देवाचे काम मन लावून करत जा, देव कधी काय देईल याचा नेम नाही.''

असे उपदेश करून स्वामींनी प्रवचनास पूर्णविराम दिला व श्रीक्षेत्र उपखेडला नमस्कार केला. सर्व काही व्यवस्था निट लावून हा कार्यार्थी जन्मास आलेला महापुरूष उपखेड सोडून पुन्हा एकदा श्रीक्षेत्र वेरूळ येथे निघुन गेला.

स्वामींची खडकाळ जमिनीतून आश्रम उभारण्याची श्रेणी अत्यंत उच्च दर्जाची होती, याची पावती आजही गिरणा तिरावर खडकाच्या कुशीत स्वामींनी उभारलेला उपखेड येथील आश्रम आपणास दिल्याखेरीज रहाणार नाही. तेथे जांबाच्या वनात छोटासा का होईना पण हृदयाला शांत करणारा, बुध्दीला स्मित करणारा, जिवाला आराम देणारा, मनाला पुन्हा एकदा आपल्या सद्गुरुंच्या कार्याची आठवण आणून देणारा आणि निसर्गाच्या कुशित नि गिरणाच्या तिरावर उभा असलेला उपखेड येथील आश्रम आजही भक्तांचे स्वागत आनंदानेच करत आहे त्यातुन येणाऱ्या उत्पादनातून सातत्याने अन्नदान होते व काही उत्पन्न श्रीक्षेत्र वेरूळ येथे अन्नदानासाठी जाते. या आश्रमाची सर्व जबाबदारी श्री सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराजांचे उत्तराधिकारी, महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरीजी वर आहे व ते त्यांच्या कार्याची धुरा पुरेपूर स्वामी च्या कार्याप्रमाणेच सांभाळत आहे, म्हणतात ना ...

**पाहू जाता एक देव ।**
**त्याने निर्मियेले सर्व ।**
**अन्न पाणी तोची देतो ।**
**प्रेमे सर्व सांभालीतो ।**

अवतार रूपी जन्मास आलेल्या कार्याचा महिमा म्हणून स्वामींनी उपखेडात फार अभिमानाने आपल्या कार्याची ध्वजा रोवली. उपखेडच्या माळरानावर खळाळणाऱ्या पाण्याच्या गिरणातीरावर स्वामींनी त्यांच्या कार्याची ध्वजा रोवली, तीच ध्वजा आजही गगनचुंबी आकाशाला टिपण्याचा प्रयत्न करते. स्वामींच्या कार्याची महती गाते आणि एकविसाव्या शतकातही माझ्या बरोबर स्वामींचे गीत गाण्यास तयार होते.

उपखेड येथील प्रवचनास पुर्ण विराम देताच स्वामींनी उपखेड सोडले नि वेरूळ गाठले. उपखेड येथील कामाची सांगता करून इ.स. १९८३ च्या उत्तरार्धात स्वामी वेरूळात परतले व इ.स. १९८४ च्या सुरुवातीपर्यंत ते वेरूळातच होते. त्या काळखंडात स्वामींनी आजुबाजूच्या खेड्यापाड्यांमध्ये प्रवचने केली. सर्वच प्रवचनातून अनमोल असाच उपदेश केला. ठिकठिकाणी वेळोवेळी साक्षात्कार दिले. जास्तीत जास्त घरांमध्ये भक्तीचा दिवा पेटवण्याचे सत्कार्य केले. भारतभुमीवर धर्माची ग्लानि दूर करण्यासाठी त्यांनी उतारवयात बरेचशे परिश्रम केले. ह्या कालखंडात स्वामींनी वेरुळ सहसा सोडलेच नव्हते. बाबाजींच्या

कार्याची सर्वात महत्वाची भूमी म्हणून श्री क्षेत्र वेरूळ ओळखले जाते, या नगरीत बाबाजीचे पहिले वहिले गुरुकुल होते. बाबाजींच्या स्वप्नातले राजकुमार त्याच वेरुळच्या गुरुकुलात शिक्षण घेत होते, जास्तीत-जास्त सुपीक व सदन जमीन तयार करण्याचा हातखंड स्वामींनी जवळ जवळ पूर्णच केला होता.

अशातच फेब्रुवारी १९८४ चा महिना उजाडला. बाबाजी वेरूळ येथे विहिरीजवळ बसलेले होते. श्रमदानाचे कार्य नित्यनियमाने चालुच होते. तितक्यात निमगांव येथील स्वामींचे भक्तगण स्वामींना तेथे नेण्यासाठी आले होते. निमगांव येथील श्री. गोविंद पाटील यांनी स्वामींना अकरा एकर जमिन दान दिली, मात्र स्वामींनी त्यांच्या जमिनीचा स्विकार काही मोबदला देऊन केला. व तेथे जाण्याचे निश्चित केले. पुन्हा एकदा काही संन्यासी शिष्यांवर, अनुभवी शिष्यांवर वेरुळची जबाबदारी टाकून स्वामी निमगावात गेले. स्वामींनी आतापर्यंत निमगावात पाच ते सहा वेळा प्रवचन केलेले असल्याने ते इतर ठिकाणांसारखे निमगावतही बऱ्याचशा प्रमाणात प्रचलित होते. स्वामी निमगावात पोहचतात भक्तांना विलक्षण आनंद झाला. त्यांनी त्यांच्या उपस्थितीनेच बाबांना त्यांच्या आनंद दर्शवण्याचा प्रयत्न केला. बाबाजींनी त्या दिवशी गावातच प्रवचन घेतले व तेथेच देवालयात मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी मात्र गावाच्या उत्तरेस मिळालेल्या जमिनीत आश्रमाबाबतचे शुभकार्य करण्याचे ठरवले व तसेच केले, बाबाजी शिष्यगणांसह दान मिळालेल्या जमिनीत गेले. गेल्या-गेल्या त्यांनी भक्तांना तिथेच रहाण्यासाठी तंबु ठोकण्यास सांगितला व स्वामींनी आता तेथे रहाणे पसंद केले होते, तद्नंतर स्वामींनी त्या जागेत आश्रम बांधण्याची विस्तृत अशी संकल्पना शिष्यांना दिली. जागा ही सुबक आणि सुंदर असल्याने तिथे लगेच स्वामींनी विधी करुन पाया घेतला व आश्रमाच्या उभारणीस सुरूवात झाली. नाशिकच्या शर्वायेश्वर शिवालया सारखे येथेही एकीकडे आश्रमाच्या पायाचे काम चालु होते तर दुसरीकडे विहीर खोदण्याचे काम स्वामींनी चालु केले होते तशातच स्वामींनी दोन ते तीन वेळा टुणकीला जाणे पसंद केले, तेथे स्वामींच्या दुसऱ्या गुरुकुलाचे काम चालु होते. काम बरेचसे पुर्ण होत आले होते. म्हणजेच जवळ-जवळ ते पुर्णच झाल्यातच जमा होते, तरी देखील इतर किरकोळ कामाची सुचना देऊन स्वामी पुन्हा निमगावात परतले, इतर आश्रमांप्रमाणे हेही काम लवकरच होणार होते यात शंकाच नव्हती. एखाद्या प्रवाशाने गाडीत बसावे व बसल्या-बसल्या दहा मिनिटात अवघ्या बारा तासांची झोप काढावी. तशीच कृती स्वामींच्या अंगात होती एखाद्या आश्रमाचे कार्य त्यांनी हाती घ्यावे व वर्ष दोन वर्षात पुरणारे ते आश्रमाचे कार्य त्यांनी काही दिवसात पूर्ण करावे. अशी त्यांच्या कार्यार्थी जीवनाची व्याख्याचं बनुन गेलेली होती. तीच व्याख्या श्री क्षेत्र ''निमगांव'' येथेही लागु झाली. दिवसेंदिवस साक्षात्कार दाखवून प्रजाजणांना उपदेश करून भक्तांनी श्रमदान करुन निमगावातील विहिरीचे कार्य केव्हाच पुर्ण केले होते आणि आश्रमाचा पायाही पूर्ण झाला होता. विहीरीतील पाणी

आश्रमाजवळ आणण्यात आले. त्या पाण्यावर आश्रमाच्या भिंती उभ्या करण्याचे कार्य निमगावात सुरू झाले. निसर्गाच्याच कुशीत विसावलेले हे छोटेस निमगाव आता दिवसेंदिवस स्वामींच्या वास्तव्याने पुण्य पवित्रवान होत होते, स्वामींचे पुण्य भक्तगण आनंदाने टीपत होते. स्त्रीया दान मिळालेल्या जमिनीतील कचरा-गवत बाजुला काढून टाकत होत्या. तरूण मंडळी गवंडयाच्या हाताखाली भिंतींसाठी लागणारा कच्चा माल तयार करुन देत होते. स्वामी रात्रदिवस त्यांच्याजवळ बसत होते. अशातच आश्रमाचे कामही आता पुर्णत्वास आले होते. अनेक दिवसांच्या निर्वाणानंतर आश्रमाचे छत पुर्ण झाले व स्वामींचे आश्रम बाधण्याचे स्वप्न साकार झाले. ''निमगाव'' गावात स्वामींनी विहीर बांधली होती. शेतीही सदन केली होती. दैवाचे प्रतिक म्हणून मानल्या जाणाऱ्या गायींसाठी गो शाळेची ही तयारी केली होती आणि आश्रमही फार अर्विभावाने उभा केला होता. आश्रम पुर्ण झाल्यावर दुसऱ्या दिवशी निमगावातील अखेरचे प्रवचन केले, बरेचसे भक्तगण स्वामींच्या अखेरच्या प्रवचनासाठी निमगावात हजर झाले, दुसऱ्या दिवशी सकाळी बरोबर दहा वाजता स्वामींनी प्रवचनास सुरूवात केली. स्वामी प्रवचनातून बोलले, ''बाबाहो, तुमच्या गावातील लोकांनी बाबाच्या आश्रमासाठी मदत केली, त्यामुळे बाबाला फार आनंद झाला, पण बाबाहो ह्या कामातून तुम्हाला किती पुण्य मिळलं याचं मी काय वर्णन करू, आज तुमच्या गावात इतका मोठा आश्रम तयार झाला आहे. ह्या आश्रमात किती साधु संत येतील, जातील, खातील याचा नेम नाही पण आशिर्वाद किती देतील याचा बी नेम नाही. बाबा, आज तुम्हाला एवढंच सांगणार आहे, की रोज सकाळी उठत जा, सकाळी लवकर उठणारे जातीचेच लागतात, साडे तीन वाजेच्या दरम्यान ब्रह्मनाडी जागृत होते, ''लगेच महात्मा बोलले,

उठा - उठा साधू संत ।
साधा आपुलाले हित ।
जाईल हा नरदेह ।
मग कैसा भगवंत ।

पुन्हा स्वामींनी प्रवचनास सुरूवात केली. ''झोपेतुन लवकर उठा बाबाहो । जाग आल्यावर अंगावरचा मायावी कपडा बाजुला सारा, जर पोरगा लवकर उठला आणि स्नान करून पुजा आर्चा करायला लागला तर आई दिवसभर लोकांना सांगते पण तोच जर लवकर उठला नाही, तर आई म्हणते. बाळ्या ..... उठना, अर मेल्या उठ, खातो खुशाल झोपतो, कामाचा ना धामाचा, नकट्या नाकाचा मेला, म्हणजे लक्षात घ्या जरा बाबाचं म्हणनं, म्हणुन बाबा सांगतात, जास्त झोपत जाऊ नका.''

तितक्यात महात्मा बोलले,

हैव त्याला दैव ।
करंट्याला झोप ।

**झोप काळाची बहिण।**
**तिचे नाव चांडाळीन।।**

निमगांववासी भक्तगण बाबाजीचे प्रवचन ऐकण्यात गुंग झाले होते. बाबाजींनी पुन्हा एकदा प्रवचनास सुरूवात केली, ''सकाळी उठल्यावर इथ येत जा, आरती विधी करत जा, आपल्या आश्रमात गायींसाठी गोशाळा बांधण्याचे काम करत जा, आपल्या आश्रमात गायींसाठी गोशाळा बांधण्याचे काम आता लवकरच चालु होणार आहे. तवा बाबा नसले तरी कामासाठी येत जा, देवाचं काम आहे. मन लावुन करत जा, आई–वडील – गाय – शेत यांची सेवा करा, पत्नीला लक्ष्मी माना, अन्नास परब्रम्ह माना व देवाचे नाव घेऊन झोपा नि देवाचेच नाव घेऊन उठा, बाबा आता वेरूळला जाणार आहे. तिथं अक्षय तृतियांच्या शुभमुर्हतावर अनुष्ठान बसणार आहे. ज्याला मनापासून देवाची सेवा करायला आवडते. त्याने जरुर अनुष्ठानाला या, बाबाचं काम नाही, तुमचं–आमचं सर्वांचं काम समजुन गोशाळेसाठी मदत करा. बाबाला मदत फक्त श्रमदानाची लागते, पैशाची नाही, पैसा माणसाला वाईट करतो. पैशापासून कायम दुर रहा, त्याला जर जवळ घेतलं तर कुठही घेऊन जातो, बाबाचं म्हणनं मन लावुन ऐका, बाबा काही पुन्हा सांगणार नाही.''

अशा अनेक विषयांना एकत्र करुन स्वामींनी प्रवचनाचा काला भक्तगणांपर्यंत पोहचवला. जिवनात आलेल्या कार्याप्रित्यर्थ स्वामी निमगावात आले होते, मनात धरलेला संकल्प आता त्यांचा पुर्णपणे संपला होता, मनाजोगता, ''आश्रम'' निमगावात भक्तीसाठी तयार झालेला होता. निमगावातील आश्रमाची सर्व जबाबदारी त्यांनी भोलेगिरी बाबांवर व रमेशगिरीबाबांवर टाकली व त्यांना गोशाळे संबंधीचे सर्व नियम सांगितले तद्नंतर काही वेळेनंतर ते निमगांव सोडून महात्मांसह वेरुळला निघुन गेले.

कार्याची ध्वजा निमगावात फडकवून स्वामी वेरूळला निघुन गेले. पण जाता–जाता भोलेगिरी बाबांना व रमेशगिरी बाबांना उर्वरित कार्यासाठी तेथेच सोडून गेले, स्वामीजींच्या अनुपस्थितीत भोलेगिरी बाबांनी काही दिवसातच गोशाळा निमगावांत बाबाजीच्या अप्रत्यक्ष आशिर्वादाने उभी केली. निमागांवात सुरवातीस बाबाजींना आकरा एकर जमिन मिळालेली होती. नंतर मात्र त्या जमिनीत वाढ झाली, भक्तगणांच्या श्रमदानातून शेती होत गेली, हळुहळू उत्पन्न वाढत गेले, त्यातून अन्नदान होतं गेले, त्यातुनच स्वामींच्या कार्याची माहिती प्रचारात येत गेली, स्वामींचा संकल्प होता कि महाराष्ट्रात बारा ज्योर्तिलिंगासारखे बारा शिवालये उभे करावे पण दुर्देवाने मात्र त्यांच्या हयातीत नऊच शिवालये पुर्णत्वास आले. तीन शिवालय अपुर्ण राहिले. मात्र त्यांनी त्याच्याच उत्तराधिकाऱ्यांना महानिर्वाणापूर्वी तिन्ही मंदिरे पुर्ण करण्याचा आदेश दिला होता. तो आदेश स्वामींच्या उत्तराधिकाऱ्यांनी (साक्षात शिवाचाच अवतार अगदी स्वामींप्रमाणेच) अत्यंत तंतोतंत पाळला त्यामुळे त्यांनी निमगावात ''रुद्रायेश्वराचे'' शिवालय बांधण्याचे कार्य

हाती घेतले आहे, उत्तराधिकारी, महामंडलेश्वर, १००८ स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या आशिर्वादाने भोलेगिरी बाबा आजही निमगावात भक्तांकडून ''रुद्रायेश्वराचे'' शिवालय पूर्ण करण्याच्या मागे लागले आहे. आजही तेथे स्वामी शांतिगिरी महाराज जातात, भोलेगिरीबाबांशी विचारपुस करतात व योग्य अशा आशिर्वादात्मक सुचना देऊन स्वामीजीप्रमाणे दुसऱ्या कार्यासाठी श्रीक्षेत्र वेरुळ येथे निघुन येतात. आज श्रीक्षेत्र निमगाव येथे काळ्या दगडांच्या बांधकामात ''रुद्रायेश्वराचे'' शिवालय जवळ-जवळ पुर्ण होत आले आहे. साठ सत्तर एकर जमिन आश्रमाशी संलग्न आहे, शेतीतून बरेचसे उत्पादन निघते, यातुनच आश्रमाचा सर्व खर्च चालतो. स्वामींच्या सुचनेनुसार दररोज येणाऱ्या जाणाऱ्यांना अन्नदान होते, गुरूपौर्णिमा, ललित पंचमीस येथे मोठमोठे कार्यक्रम होतात. स्वामींच्या नित्यनियमाप्रमाणे रोज सायंकाळी आरती-पुजा-विधी सातत्याने होते, दररोज भक्तगण एक जागृत दैवस्थळ म्हणून निमगावातील आश्रमास भेट देतात नि स्वामींच्या जीवनाचा महिमा बरोबर घरी घेऊन जातात. इ.स. १९९९ मध्ये एक विलक्षण घटना ह्या आश्रमात घडली, ती म्हणजे बाबांच्या हयातीतील एक बैल विषारी गवत खाऊन फुगला, त्या बैलाचे नांव स्वतः बाबाजींनी ''कृष्णा'' बैल असे ठेवले होते. रात्री आकरा वाजेच्या दरम्यान हा ''कृष्णा'' बैल पुर्णतः फुगला, बघा काय बाबाजींचा चमत्कार, बैल आपोआप बांधलेल्या दोरातून मुक्त झाला नि निमगांव पासून सहा सात किलोमीटर अंतरावरील ''लोणी'' या गावात गेला. गावात प्रवेश करताच ''कृष्णा'' बैल हा इतरत्र कुठे न जाता सरळ डॉक्टरच्याच घरी गेला. दुसऱ्या दिवशी चौकशी अंती ही घटना भोलेगिरी बाबांना समजली. यावरून एकच विचार करावासा वाटतो. बाबाजींचे अस्तित्व हे आजही चरा-चरात समाविष्ठ झालेले आहे.

श्रीक्षेत्र निमगावाची सर्व व्यवस्था भोलेगिरी व रमेशगिरी बाबांवर सोपवून स्वामी आता संन्यासी शिष्यांसह वेरुळात पोहचले होते, त्या संन्यासांमध्ये स्वामी शांतिगिरी महाराज, स्वामी मधुगिरी, स्वामी परमानंदगिरी, स्वामी महेशगिरी, स्वामी कैलासगिरी, स्वामी शंकरगिरी होते. स्वामी माधवगिरी महाराजांना बाबाजींनी श्रीक्षेत्र नाशिक येथे ठेवलेले होते. आतापर्यंत स्वामींनी नागाबाबा प्रमाणे फक्त सहा शिष्यांनाच दिक्षा दिलेली होती. त्यात स्वामी शांतिगिरी, स्वामी मधुगिरी, ~~स्वामी माधवगिरी,~~ स्वामी कैलासगिरी, स्वामी शंकरगिरी, स्वामी महेशगिरी हे होते, असो पण मागे सांगितल्याप्रमाणे स्वामी काही सन्यांसी शिष्यांसह अक्षयतृतीया अगोदरच्या दिवशी वेरूळात पोहचले, अक्षय तृतीया इ.स. १९८४ मध्ये तेथे स्वामींनी जपानुष्ठान व यज्ञपुजेचा सोहळा घेतला. नेहमीप्रमाणे अनुष्ठानातून, प्रवचनातून स्वामींनी जनहित साधण्याचा प्रयत्न केला. अत्यंत काळजीपूर्वक स्वामींनी तेथे भक्तांना उपदेश केला. कार्याचा महिमा म्हणून त्यांनी आहोरात्र कार्य करण्याचा प्रयत्न केला. अक्षय तृतियाच्या सर्व कार्यक्रमाचे नियोजन आटोपल्यानंतर एक-दिड महिना स्वामींनी

तेथेच वास्तव्य केले.

१५ ऑगस्ट १९८४ मध्ये स्वामी पुन्हा भक्तगणांसह श्रीक्षेत्र पुणतांबा येथे गेले. तेथील काशिविश्वेश्वराचा जिर्णोध्दार झालेला होता, मात्र काशिविश्वेश्वरची प्राणप्रतिष्ठा झालेली नव्हती. त्याच कारणास्तव स्वामी श्री क्षेत्र पुणतांब्यात गेले व १९ ऑगस्ट १९८४ च्या शुभमुहर्तांवर प्राणप्रतिष्ठा केली. प्राणप्रतिष्ठा आटोपताच स्वामी पुन्हा श्री क्षेत्र वेरूळ येथे परतले. वेरूळात आल्यानंतर स्वामींनी अनेक खेड्यापाड्यात प्रवचने घेतले. अनेक भक्तगणांनी मनाची श्रध्दा समजून त्यांच्या जमिनीच्या क्षेत्रात कुटीया बांधुन स्वामींना प्रवचनासाठी नेले. अशा कालखंडात स्वामींनी ''नांदुर्डी'' या गावात प्रवचन घेतले, स्वामीच्या प्रवचनामुळे नादुर्डी येथील ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले त्यांनी तेथेच एक कुटीया बांधायची ठरवली व बांधलीही. तद्नंतर स्वामी त्या कुटीयात पुर्ण आकरा वेळा गेलेले आहे. इ.स. ऑक्टोंबर १९८४ मध्ये बांधलेल्या कुटीयाचा महिमा आजही एकविसाव्या शतकात स्वामींची आठवण करुन देतो. सर्पदंश झालेल्या व्यक्तीस तेथील कुटीयातील विभुती जरी लावली तरीही ती व्यक्ती बरी होते. स्वामींजींनी स्वतः प्रवचनातून सांगितले होते, ''पान लागलं तर नादुर्डीला (ता. निफाड) जा, तिथं सारा उपचार आहे. ''आतापर्यंत जवळ – जवळ ३००० ते ३५०० लोक ह्या कुटीयातील विभुतीमुळे मरता-मरता वाचले आहे.'' आजही तेथे गोरठान, मारवाई, कुंभारी, रानवड, ब्राम्हणगांव, वनसगाव, उगाव, कुंदेवाडी, दिवपुर येथील लोक भक्तीभावाने जातात, दिवसभर रहातात व दर्शन घेऊन परत घरी परतात. याठिकाणी आजही बाबांचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरी महाराज वर्षातून एक वेळा जातात. तेथे कार्यक्रम घेतात व स्वामींच्या पाऊलावरच पाऊल ठेवण्याचा प्रयत्न करतात. इ.स. १९८४ अखेरीस स्वामी पुन्हा वेरूळात परतले.

इ.स. १९८४ मध्ये स्वामी वेरुळात आल्यानंतर त्यांना काशीची विलक्षण ओढ लागली होती. असे म्हणतात मनुष्याने एकदा तरी काशी करावी, श्रीक्षेत्र काशीला फार महत्व आहे. काशिच्या तिर्थस्थळी मरण आले तर जीव तृप्त होऊन जाते. ग्रामिण भागात आजही वयोवृध्द माणसे म्हणतात, ''मरावे तर काशीत नाहीतर गावच्या वेशीत.'' स्वामींनाही काशीत जाण्याची मनिषा प्रकट झाली. एवढेच नव्हे तर त्यांना तिथे ''काशीविश्वनाथाचे'' शिवालयही बांधायचे होते. स्वामी जर महाराष्ट्र सोडून काशित वास्तव्याला गेले असते तर महाराष्ट्रातील कार्यमहिमा अपुर्णच राहिली असती. जेव्हा स्वामींनी काशीत जाण्याचा निर्णय घेतला तेव्हा एक महान साधु पुरुष स्वामींना भेटला व म्हणु लागला.

''बाबा तुमची गरज काशीत नाही, ह्या पुण्यपवित्र महाराष्ट्राच्या पवित्र भुमित आहे. साधु-संत जेथेही जातात तेथे ''काशी'' तयार करतात, जितके महत्व काशीला असेल तितकेच महत्व तुम्ही जेथे जाल त्या जागेला असेल.

''नाम आहे ज्याच्या पाशी
जेथे बसेल तेथे काशी''

बाबा, महाराष्ट्रात कुठेही काशिविश्वनाथाचे मंदिर बांधा तेथे काशी तयार झाल्याशिवाय रहाणार नाही.''

स्वामींना लाखमोलाचे बोल देऊन साधु पुरूष क्षणार्धात मृगजळ झाले. स्वामींनी स्वत:शीच विचार केला. जगामध्ये अनेक धर्म आहे, पण जो हिंदु धर्माला मानतो तो काशिला मानतो. ह्या हिंदुधर्मातील प्रत्येक मानवाच्या मनाचा संबंध हा काशिशी प्रमाणापेक्षा जास्त जवळचा असतो. प्रत्येक हिंदू मानवाला काशिमध्ये विराजमान असलेल्या काशिविश्वनाथाच्या दर्शनाची व पवित्र पावन गंगामातेच्या पाण्यातील स्नानाची ओढ लागलेली असते. त्याकरता ह्या भूतलावरील प्रत्येक मनुष्य अंतरिक मनाने तळमळत असतो. आपण आपल्या भक्तांसाठी इथेच महाराष्ट्रात काशिविश्वनाथाचे शिवालय बांधु. जरी श्री क्षेत्र काशीत गंगामातेच्या तिरावर काशिविश्वेनाथाचे मंदिर असेल तरीही आपण इथेच गोदावरी मातेच्या तिरावर काशिविश्वेनाथाचे शिवालय बांधु. असा सुयोग्य विचार केल्यानंतर स्वामींनी काशिविश्वेनाथाच्या मंदिरासाठी गोदावरी तिरावरील नगरजिल्ह्यातील ''कोपरगांव'' भुमीची निवड केली.

जो दगड काशीविश्वेनाथाच्या मंदिरासाठी श्रीक्षेत्र काशी येथे जाणार होता तोच दगड आता कोपरगावात जाऊ लागला. इ.स. १९८४ च्या अखेरीस स्वामी वेरूळ सोडून कोपरगावात आले. शिर्डीपासून उत्तरेला बारा-तेरा किलोमीटर अंतरावर स्वामींनी जमिन विकत घेतली. कोपरगांव पासुन दोन अडीच किलोमीटर अंतरावर स्वामींनी जमिन विकत घेतली. कोपरगांव पासुन दोन-अडीच किलोमीटर अंतरावरील ही भूमी गोदावरी मातेच्या खळाळणाऱ्या पात्राच्या उदरात जन्मास आलेली होती. विशाल असा निर्सगरम्य वातावरणात गोदावरीच्या दक्षिण पात्रावर विराजमान झालेली ही भूमी जणु काय श्रीक्षेत्र काशिचेच प्रतिबिंब दिसत होते. वेरूळला घडलेला सगळाच दगड कोपरगावात आणला गेला. स्वामी सन्यासी वर्गासह श्रीक्षेत्र कोपरगावात उपस्थित झाले होते. स्वामींनी आतापर्यंत बराचसा लालदगड काशीविश्वनाथाच्या मंदिरासाठी जपून ठेवला होता. त्यांना काशिविश्वेनाथाचे शिवालय हे पुर्णपणे लाल दगडात बांधायचे होते. त्याच कारणाप्रित्यर्थ बराचसा लाल दगड कोपरगावात जमा झालेला होता. स्वामींनी तेथेच त्यांना रहाण्यासाठी कुटीया बनवली होती. शिवालयपुर्वी स्वामींनी छोटासा आश्रम बांधण्यास सांगितला भक्तगण कोपरगांवतही इतर ठिकाणांप्रमाणे श्रमदानासाठी जमा झाले होते. नेहमी प्रमाणे स्वामींनी शुभ मुहर्तावर पुर्व-पश्चिम दिशेला आश्रमाचे काम सुरू केले. दिवसामागून दिवस इथेही पटापट जाऊ लागले, भक्तगण श्रमदानासाठी वाढू लागले, स्वामी दररोज प्रवचन देत होते, भक्तगण स्वामींचे प्रवचन अमृतवचने समजून ग्रहण करत होते, आश्रमाचा पाया पूर्ण होऊन

भिंती कळसाला टिपण्याइतक्या उंचावल्या होत्या. शिष्यगणांसह सन्यासी शिष्य अहोरात्र कोपरगावच्या भुमित राबत होते. अशा परिस्थितीत स्वामींनी संकल्प केलेला छोटासा आश्रम पुर्ण झाला. काशिवेश्वेनाथाच्या मंदिरा अगोदर स्वामींनी विहीरीचे काम हाती घेतले. आश्रमाप्रमाणेच विहीरीचेही काम पूर्ण झाले. गोदावरीच्या तिरावर तयार केलेल्या ह्या विहीरीस प्रचंड प्रमाणात पाणी लागले. हेच पाणी पाईपलाईन द्वारा शिवालयासाठी वापरण्यात आले.

श्री क्षेत्र निमगांव येथील श्री प.पुं. रमेशगिरी बाबांना कोपरगांवात बोलवण्यात आले. येथील शिवालयाची जबाबदारी स्वामी रमेशगिरी बाबांवर सोपवून स्वामी परत वेरुळात जाणार होते. तद्‌नंतर अत्यंत शुभमुहर्तावर विधी पुजन करुन स्वामींनी श्रीकाशिविश्वनाथ शिवालयाचा पाया घेतला. पाया घेण्यास बरेचसे शिष्यगण उपस्थित होते. त्यांनी स्वामींच्या आदेशानुसार पाया घेण्यास सुरूवात केली. गोदावरी मातेच्या तिरावरील स्वामींनी बांधलेले हे चौथे शिवालय होते, तत्पुर्वी श्रीक्षेत्र पुणतांबा येथे काशिविश्वेश्वर, श्रीक्षेत्र नाशिक येथे शर्वायेश्वर, श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे हृदयेश्वर हे बांधलेले होते. आणि आता हे चौथे काशिविश्वनाथ होते. स्वामींनी पाया घेतलेल्या काशिविश्वनाथाचे शिवालय हे काशिचे प्रतिक म्हणून महाराष्ट्रात गणले जाणार होते. बऱ्याच दिवसागणी मंदिराचा पाया पुर्ण होत आला होता. बराचसा दगड पायासाठी कामी आला होता. अजुन दगडाची पुर्तता करावी लागणार होती. भक्तगण श्रमदानात तल्लीन झाले होते, नविन दगड सापडला गेला होता, स्वामी रात्रदिवस दगड घडवणाऱ्यांजवळ बसत होते. एकेक दगड घडला जात होता.

बरेचसे दगड घडल्यानंतर स्वामींनी पुन्हा भक्तांना मंदिराचे उर्वरित कार्य करण्यास लावले. गोदावरीच्या तिरावरील काशिविश्वनाथाचे शिवालय काही दिवसातच पुर्ण होणार होते. स्वामींनी एकीकडे मंदिर पुर्ण करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले होते तर दुसरी कडे बागायती शेतीमध्ये सुर्यफूल पेरले होते. बाबाजींची शेती ही नेहमीच सदाबहार असायची. शेतीची व मंदिराची सर्व जबाबदारी रमेशगिरी बाबांवर टाकून स्वामी टुणकीला गेले. टुणकीमध्ये बाबाजीच्या दुसऱ्या गुरुकुलाचे काम पुर्ण झाले होते. शिवाजी निकम, निमगावकर व इतर टुणकीवासीयांनी अत्यंत परिश्रम करुन टुणकीच्या खडकावर स्वामीच्या जीवनाचा गुरुकुलरुपी आरसा तयार केला होता. ''गुरुकुल'' हे संताच्या जीवनातील सर्वात मनोरंजक ठिकाण मानले जाते. स्वामीनी हे गुरुकुल खास गोरगरिबांच्या मुलांसाठी बांधले होते. बाबाजीला नेहमी वाटायचे समाजाने सुशिक्षित व्हावे. प्रत्येकाने शिक्षण घ्यावे . बाबाजीचे शिक्षण जरी इयत्ता चौथी पर्यंतचे झालेले असले तरीही आपल्या गरीब भक्ताचा मुलगा डॉक्टर झाला पाहिजे, इंजिनिअर झाला पाहिजे , देशासाठी लढणारा सैनिक झाला पाहिजे असे त्यांना नेहमी वाटायचे यासाठीच त्यांनी ''टुणकी'' येथे दुसरे गुरुकुल उभारले होते.

विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तका पोटभरू शिक्षणच नाही घेतले पाहिजे तर आध्यात्मिक शिक्षणही घेतले पाहिजे. असा त्याचा अट्टाहास होता. आई, वडील, गुरु समाज इत्यादी गोष्टीची सेवा करणारे धर्म व संस्कृती टिकवणारे नागरिक तयार झाले पाहिजे. त्याचसाठी त्यांना बालवयातच संस्कार दिले पाहिजे, म्हणून आपण त्याच्यासाठी गुरुकुल उभारले पाहिजे असे स्वामींना नेहमी वाटायचे व कार्याचा एक भाग म्हणून त्यांनी ''श्री क्षेत्र वेरुळ'' व ''श्री क्षेत्र टुणकी'' येथे गुरुकुल उभारले होते. ''टुणकी'' गावात उभे राहिलेले स्वामीचे गुरुकुल अवघ्या पंचक्रोशिला स्वामींच्या कार्याची जाणीव करुन देत होते. इ.स. १९८५ मध्ये स्वामी श्री क्षेत्र कोपरगावहून गुरुकुलच्या उद्घाटनासाठी ''श्री क्षेत्र टुणकी'' येथे आलेले होते. भक्त गणांनी अपार कष्टाने तयार कलेले गुरुकूल बघुन स्वामींना आनंद वाटला.

शुभ मुहर्तावर स्वामींनी गुरूकुलांचे उद्घाटन केले व त्यानंतर थोड्याच वेळात प्रवचनास सुरूवात केली.

''बाबाहो, आज आपल्या गावात गुरूकुल पुर्ण झाले. बाबाला आनंद झाला, पुर्वी आत्तासारख्या शाळा नव्हत्या असेच गुरुकुल असायचे, लांबून-लाबून लोक यायचे आणि गुरूकुलात शिक्षण घ्यायचे, भगवान परमात्मा श्रीकृष्ण भगवान सुद्धा गुरूकूलातच शिकले होते, ते पण आश्रमातच राहिले होते. गुरुकुलात जर पोरगं राहिलं तर त्याच्यावर चांगले संस्कार पडतात. तो मोठा होऊन आईबापाची निदान सेवा करील, लगेच महात्मा म्हणाले,

''ऐसा पुत्र देगा गुंडा।
त्याचा तिन्ही लोकि झेंडा''

पुन्हा बाबाजी बोलले,

''आज टुणकीचे गुरुकूल पुर्ण झाल बाबाला आनंद वाटला, आपल्या गुरूकुलात साऱ्या गरिबांचे पोरं शिकतील. लहानवयातच त्यांच्यावर चांगले संस्कार पडतील. इथल्या सारखेच गुरूकुल वेरुळात पण झाले, आज वेरूळात ३५० पोरं शिक्षण घेतात, सकाळी सकाळी चार वाजता उठतात, विधी आरती करतात, बाबाजींच्या शेतामध्ये दोनतास काम करतात. दुपारी शाळेत जातात. तिन वेळेला जेवण करतात, रात्री विधी आरती करून जेवण अभ्यास करतात, शाळेचे शिक्षण घेता-घेता, देव-धर्माचही शिक्षण घेतात. देवाच्या सानिध्यात रहातात. आपण हिंदू धर्मात जन्माला आलो आहे आणि आपल्या हिंदू धर्मात ऋषींना फार महत्व आहे, ऋषींचे पुण्य जर बालकाला मिळाले तर ते बालक पुढे जाऊन अजरामर होते. आपल्याला जर समाजसेवा व देशाभिमान वाढवायाचा असेल तर आध्यात्माचा प्रचार केला पाहिजे, जर आध्यात्माचा प्रचार करायचा असेल तर मुलाला गुरुकुलात टाकले पाहिजे. असे अनेक गुरुकुला विषयीचे अनन्य साधरण महत्व त्यांनी प्रजाजनांना सांगितले. लोकांवर बाबाजीच्या बोलण्याचा बराचसा प्रभाव पडला. बाबाजींच्या नुतन गुरुकुलात सुरूवातीला ४० ते ५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. बाबाजीच्या

जीवनातले हे दुसरे टुणकीचे गुरूकुल बाबाजीच्या अवताररूपी कार्याला शोभा आणुन देत होते.'' बाबाजींचे प्रवचन संपले ''गुरुकुल व आश्रम'' अशा दोन – वास्तु ठिकाणी स्वामी दोन – चार दिवस तिथेच होते. सर्व व्यवस्था नीट लावून स्वामी श्री क्षेत्र कोपरगांवी काशीविश्वनाथाच्या शिवालयासाठी जाणार होते. अहोरात्र परिश्रम करुन, सलग तीन वर्षे टुणकीच्या क्षेत्रात राबुन एक भव्य – दिव्य असे आश्रम व गुरुकुल स्वामींनी तयार केले होते. एक आठवड्या नंतर सर्व व्यवस्था लाऊन हा कार्यारूपी साधक पुन्हा श्रीक्षेत्र कोपरगांवात उर्वरित कार्यासाठी निघुन गेला. खडकाळ मातीत, उंच–खोल, दऱ्याखोऱ्याच्या वातावरणात स्वामींनी एक अद्भूत गुरुकूल बांधले होते.ते संपुर्ण दिवसभर काम करणाऱ्यांजवळ बसायचे, गवंड्यांना योग्य असे मार्गदर्शन द्यायचे, विहीरी बांधणाऱ्या जवळ काळजीने बसायचे, वेळोवेळी साक्षात्कार दाखवयाचे, वारंवार प्रवचन करायचे, जगाच्या कल्याणासाठी उपदेश करायचे, भुकेलेल्या शिष्याला मायेने जवळ घ्यायचे, काम करणाऱ्या शिष्याला मायेने गळ्याशी लावायचे, चुकल्यावर दोन शब्द रागानेही बोलायचे, अशाच हालचालित दिवस निघुन जायचे व स्वामींच्या जीवनातील कार्य पूर्ण होत जायचे. अगदी अशाच पद्धतीने कार्याची हातोटी वापरून स्वामींनी ह्या खडकाळ माळरानावर मानवाला सुख शांती देण्यांसाठी एक आश्रम बांधला होता. गोरगरिबांचा मुलगा सुद्धा शिकुन मोठा झाला पाहिजे याचसाठी त्या आडाणी वास्तव्यात गुरुकुल बांधले होते. आजही श्री क्षेत्र टुणकी येथील आश्रम व गुरुकुल स्वामींच्या उच्चदर्जाच्या श्रेणीची पावती दिल्याखेरीज राहत नाही. तेथे गेल्यावर स्वामींची आठवण येते, तेथील आजुबाजुचा परिसर बघितल्या वर स्वामींच्या कष्टमय कार्याची जाणीव होते, तेथील ''आश्रम'' बघितल्या वर मन शांत होते. तेथील गुरुकुल बघितल्यावर बुद्धी स्मित होते, तेथील ''शेती'' बघितल्यावर जीवनाची खरीखुरी व्याख्या समजते, तेथील सर्वचं परिसर बघितल्यावर बाबाजीची आठवण येते, मन द्रवरूप होऊन भुतकाळाकडे वाहु लागते, जिकडे बघितले तिकडे भक्तीचेच मळे फुललेले दिसतात व फुललेल्या मळ्यात आजही स्वामी तेथे असल्याचे दिसतात.

सध्या श्रीक्षेत्र टुणकी येथे ६४/६५ एकर जमीन आहे. त्यात नवीन ३५ एकर जमिन श्री. आर.एम. वाणी साहेबांनी (वैजापूर) दिली आहे, त्या जमिनीत एक मंगल कार्यालय उभारलेले आहे. हे मंगलकार्यालय आश्रमाशी संलग्न आहे. जमिनीत ऊस, बाजरी, मका, गहू, ज्वारी इत्यादी पिके पिकतात. त्यातून आश्रम व गुरुकुल चालते. गुरुकुलात एकुण १०० मुले शिक्षण घेत आहे. तेथे सहा शिक्षक सेवेत रुजु आहे, या आश्रमाची व गुरुकुलाची सर्व देखभाल स्वामींचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतिगिरी महाराजच बघता. त्यांचे जीवन हे पाऊलो – पाऊली स्वामी प्रमाणेच आहे. त्यांनी तेथे पुन्हा चार खोल्या बांधल्या असुन मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कार्यालय उभारले आहे हे गुरुकुल संपुर्णतः श्री क्षेत्र वेरुळशी संबंधीत आहे. स्वामी शांतिगिरी महाराज कायम सातत्याने

श्रीक्षेत्र टुणकी येथे जातात, स्वामींप्रमाणेच सर्व चौकशी करतात, गुरुकुलातील सर्व विद्यार्थ्यांसह विचारपूस करतात व स्वामींच्या जीवनाला शोभेल असेच कार्य करतात. आज तेथे त्याच्या आशिर्वादात्मक आदेशानुसार एक सन्यासी महाराज राहातात. सकाळ संध्याकाळ आरती–विधी पुजा करतात. शिक्षणाकडे काळजीने बघतात व विद्यार्थ्यांना परिपुर्ण बनवण्याचाच प्रयत्न करतात.

श्रीक्षेत्र टुणकी प्रमाणेच गुरुकुल श्रीक्षेत्र वेरूळात चालु झाले होते. बाबाजींचे १९८१ मध्ये स्थापन केलेल्या गुरुकुलात आज आठशे ते हजार मुलं शिक्षण घेत आहे. श्रीक्षेत्र टुणकी प्रमाणेच सर्व देखभाल स्वामींचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरी महाराज करतात. येथील गुरुकुलातील दहावीचा निकाल ९७% पेक्षा खाली आलेला नाही. सर्व धार्मिक कार्यात गुरुकुलातील विद्यार्थ्यांचा सक्रीय भाग असतो. जनार्दन बाबाच्या कृपेने व स्वामी शांतिगिरी महाराजांच्या आशिर्वादाने दोन्ही गुरूकुले व्यवस्थित चालु आहे. (त्यानंतर स्वामी शांतिगिरीनी उगाव खेड येथे नवीन गुरूकुल स्थापन केले आहे याचा उल्लेख पुढे केला आहे.) टुणकी येथील कार्याची प्रतिमा पूर्ण झाल्यावर स्वामी पुन्हा कोपरगावात पोहचले. कोपरगावात आल्यावर स्वामींनी सर्व प्रथम मंदिराची पहाणी केली. तद्नंतर संपुर्ण शेतीत एका काठीच्या आधारावर –नि– शिष्याच्या आधारावर एक चक्कर मारला. ''आश्रम'' नेहमी स्वामीच बांधायचे पण उल्लेख करतांना ते असेच म्हणायचे भोलेगिरी बाबांचा आश्रम, माधवगिरी बाबाच आश्रम... असो. यावरून स्वामींचे शिष्यांशी व आश्रमाशी कसे दृढ नाते होते. याचीच जाणीव आपल्याला दिसुन येते. याचनुसार शेतातून आल्या–आल्या स्वामीं म्हणाले, ''काय रमेश? तुझा आश्रम कसा आहे? तुझ्या आश्रमातील मंदिर कुठपर्यंत झाले?'' यावर शिष्यगण म्हणत बाबा, हे काय आमचं आहे. हे तुमच चं आहे। ''...... नंतर बाबा हसत–हसत म्हणायचे,

''बाबाहो हे तुमचं आणि जनता जगार्दनाच आहे। बाबाचं काहीच नाही।''

बाबा जेव्हा इ.सं. १९८५ मध्ये कोपरगावांत आले होते तेव्हा ह्या शिवालयांचे काम चालुच होते, बाबांच्या हातुन ह्या शिवालयांचे प्राणप्रतिष्ठा झालीच नाही, ते केवळ बांधले गेले व त्यांची प्राणप्रतिष्ठा लवकर व्हावी ह्याच निमित्ताने स्वामींनी समाधी स्थळ म्हणून कोपरगांवचीच निवड केली होती. आल्यानंतर स्वामीं बऱ्याच वेळा भक्तांना उद्देशून म्हणायचे, ''बाबाहो... काम करा.... उद्योग करा..... सतत उद्योग करा.'' स्वामी इ.सं. १९८५ चेपुर्ण वर्षे कोपरगांवात होते, मंदिराकडे काळजीपूर्वक लक्ष देत होते, काशिविश्वनाथाचे शिवालय कोपरगावात बांधुन त्यांना काशीची प्रतिमा कोपरगावांत उमटायची होती, यासाठी रात्रदिवस स्वामी तेथे राबत होते, भक्तांना उपदेश करत होते. प्रवचनातून अवताररूपी कार्याचा महिमा घडवण्याचा आटोकाट प्रयत्न करत होते. स्वामींचे वय आता एकाहत्तर झाले होते. आतापर्यंत मानवी देहासारखे दोन ऑपरेशनही झाले होते,

ईश्वर भक्तीसाठी एक पाय गमवला होता. तप साधणेमध्ये शरीर गमावले होते व जणकल्याणासाठी अवघे आयुष्यच वेचले होते. वय झाल्याने त्यांना आता एकाठिकाणी जास्त कालखंड रहाता येत नव्हते. त्यांचा जीव कमी वेळात जास्तीत-जास्त प्रवचन देण्यामागे लागला होता. शिवालय बांधण्यासाठी पुर्वी सारखे त्यांचे मन रमत नव्हते, त्यांनी पुढील मोजके दिवस गुरुकुलातील विद्यार्थ्यांजवळ घालावसे वाटत होते, कमी वेळात सर्व आश्रमातील नापीक जमीन फलीत करून समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, व्यसन, दुर करुन जास्तीत-जास्त भक्तीमार्ग दाखवासा वाटत होता. इ.स. १९८५ च्या अखेरीस स्वामींना वेरुळ जाण्याची इच्छा लागु लागली. इकडे कोपरगावातील ''काशिविश्वनाथ'' महाराजांचे शिवालय बांधणे चालुच होते. स्वामींनी प्रवचन घेतले.

त्या प्रवचनात अनेक भक्तगण समाविष्ट झालेले होते. स्वामींनी प्रवचनातून एक मुद्दा अतिमहत्वाचा बोलला, ''लोकाहो, हे काशिविश्वनाथाचे मंदिर मन लाऊन बांधा, हेच मंदिर काशित आहे तेच आपण इथं बांधत आहोत, तेव्हा मन लावून श्रमदान करा, माझा ''रमेश'' हा इथेच राहिल त्याला त्रास देऊ नका, ते माझे आडाणी पोरंग आहे, त्याने चांगली शेती फुलवली आहे, त्याला अशीच मदत करुन मंदिराचे काम पुर्ण करा, बाबा काय आशिर्वाद देईल हे सांगता येणार नाही.''

ह्या छोट्याश्या मुद्दयावरुन आपल्याला स्वामींचे सन्यासीवृंदा वरील प्रेम दिसून येते. आपल्या भक्तांला काही देऊ नये म्हणून ते किती जपत होते यांची जाणीव आपल्याला स्वामींच्या बोलण्यातून दिसून येते.

प्रवचनानंतर दोन-तीन दिवस स्वामी कोपरगांवात थांबले, तद्नंतर सर्व मार्गदर्शन करून ते वेरुळ जाण्याच्या बेतात होते. जाण्यापूर्वी त्यांनी रमेश गिरी बाबांना जवळ घेतले, मायाचा हात त्यांनी त्यांच्या अंगावरुन फिरवला व सांगितले, ''बाबा संभाळ चांगलं, येतो मी.'' आता असेच सांगुन स्वामी वेरूळात निघुन गेले. तद्नंतर तेथील शिवालयाची सर्व जबाबदारी पार पाडली. नंतर स्वामी अधुन-मधुन कोपरगावात येत राहिले. मंदिराचे बांधकाम बघत राहिले, मार्गदर्शन करून पुन्हा जात होते. आज त्या गोदावरीतीरावरील कोपरगावात नगर मनमाड महामार्गावर एक भव्य-दिव्य असे काशीविश्वनाथाचे शिवालय फार मोठ्या आविभार्वाने निसर्गाच्या कुशीत उभे आहे. एकविस कळसाचे स्वामींचे समाधीमंदिर त्याच्या शेजारी एका तपसाधकाची समाधी स्थळ शोभून दिसते. आजु-बाजुला रंग बेरंगी फुलांची झाडे आहे. ८०-९० एकरच्या आसपास जमीन आश्रमाशी सलग्न आहे. वेगवेगळी पिके निघून आश्रमाचा खर्च चालतो, एक गोशाळा आहे, नवीनच इंग्लीश मेडियम स्कूल तयार झालेली आहे. एक संत निवास, एक भक्त निवास संत निवासाला आकर्षुन होत आहे. समाधी मंदिरात तिन्ही सांजेला विधी-आरती होते. महामार्गावर विसावलेल्या ह्या काशिविश्वनाथांच्या दरबारात हजारो भाविक भक्तीभावाने भेटी देतात. त्यावर बेलफुल

वाहतात, स्वामींच्या समाधी मंदिरात जातात, मंदिरातील घंटा वाजून स्वामींच्या फोटोकडे बघतात. तेथे स्वामी रात्रदिवस हसतमुखाने भक्तांचे स्वागत करत असतात. भक्तगण स्वामीच्या चरणाशी लीन होतात. मनात आजही तेथे स्वामी आहे असे समजून काहीतरी मागणे मांगतात. प्रथेप्रमाणे स्वामीच्या फोटोकडे बघत – बघत दहा–मिनिटे विसाव्यासाठी बसतात. स्वामींच्या प्रतिमा हृदयात उमटून आल्यानंतर रस्त्यान घरी जातात. जनार्दन बाबांचे कार्यच असे होते की त्यांचे वर्णन करणे खरोखर मला पुरेसे वाटत नाही कितीही केले तरीही ते अपुरे आहे असे वाटते असो.

कोपरगांवचे सर्व जबाबदारी स्वामी रमेशगिरी बाबांवर सोपवून हा कार्यरुपी सुर्य वेरूळात गेला. इ.सं. १९८६ च्या सुरूवातीस स्वामीनी वेळात गेल्यावर सर्व गुरुकुलातील विद्यार्थ्यांची चौकशी केली. तद्नंतर शेतीची पहाणी करून पुन्हा एकदा श्रमदानाने सुरूवात केली. अशाच कालखंडात ''उपखेडच्या'' सिमेलगतच्या मालेगांव तालुक्यातील काही शिष्यगण बाबाकडे दर्शनास आले होते. बाबाजींनी त्यांना त्यांचे नाव विचारले, भक्तांनी फार मोठ्या आनंदाने त्यांची नावे सांगितली, त्या शिष्यांनी बाबाजी जवळून श्रीक्षेत्र ''उपखेड'' येथे अनुग्रह घेतलेला होता त्यातल्या फक्त दोघानीच घेतलेला नव्हता बाबाच्या दर्शनास आलेल्या एका शिष्याने १०० बिगे जमिन दान केली व सांगितले ''बावाजी तुम्ही आमच्या खेडेगावात या, तुमचे पाय आमच्या गावाला लागु द्या,''

बाबाजी फार मोठ्या विनोदाने म्हणाले, ''कोणते गांव'' भक्तगण म्हणाले, ''साकूर'' ता. मालेगांव ''बरं येईन'' असे सांगुन त्यांनी भक्तांना श्रमदान करण्यास लावले, फार प्रयत्नानंतर स्वामींचा होकार घेऊन साकूर भक्तगण घरी गेले. ठरल्या दिवशी बाबाजी संन्यासी शिष्यांसह ''साकूर'' या गावात गेले. साकूर हे गाव नाशिक व जळगांव जिल्ह्याच्या सीमेवर आहे. पर्यायाने साकूर हे गांव उपखेड पासून केवळ दोन किलोमीटर अंतरावर आहे. लोकसंख्येने छोट्या पण निसर्ग सौदर्याने बहरलेल्या ह्या गावात स्वामी सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान पोहचले. श्रीक्षेत्र उपखेड फारच जवळ असल्याने साकुरात बाबाजींच्या अगोदर बऱ्याच प्रमाणात भक्तगणांची उपस्थिती होती. भक्तगणांनी फार मोठ्या आनंदाने स्वामींचे स्वागत केले. बाबाजीसाठी खास स्टेज तयार केलेले होते. बाबाजी स्टेजवर गेले, त्यांच्याबरोबर संन्यांसी शिष्य होतेच, बाबाजीने पुरेपुर एक तास प्रवचन केले. भक्तगणांनी ते प्रवचन फार मोठ्या आनंदाने ग्रहण केले. बाबाजींचे प्रवचन संपण्या अगोदर गावातील लोकांनी बाबाजीस ७ एकर जमिन दान केली. बाबाजींनी मात्र त्यांना त्याबदल्यात साडेवीस हजार रूपये दिले तद्नंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला नि बाबा पुन्हा वेरूळात आले. वेरूळात आल्यानंतर स्वामी आता कमी वेळात जास्तीत–जास्त कार्य करण्याच्या पाठीमागे लागले होते. ते आरती पासून तर रात्रीच्या जेवणापर्यंत गुरुकुलातील विद्यार्थ्याजवळ राहू लागले होते, तास–न–तास ते नापीक जमिनीत नंदनवनरूपी स्वर्ग तयार करण्याच्या

मागे लागले होते, जास्तीत जास्त प्रवचने घेऊन उपदेश देऊन ते समाज प्रबोधन करण्याच्या मनीषेत राहू लागले होते. वेरूळात शेतीजवळ बसले असतांनाच ''दिक्षी'' गावातील काही भक्तगण स्वामीकडे आले व स्वामींना प्रवचनासाठी निमंत्रण देऊ लागले. स्वामींनी बऱ्याच वेळेनंतर त्यांचे प्रवचन निमंत्रण स्विकारले. मग दिक्षी ग्रामस्थ स्वामींचे निमंत्रणाचे श्रीफळ घेऊन गावी गेले. स्वामींनी वेरूळची सर्व जबाबदारी सन्यांसावर टाकली व श्रीक्षेत्र दिक्षी येथे जाण्यास निघाले.

ठरल्या दिवशी स्वामी वेळेवर श्रीक्षेत्र दिक्षी येथे पोहचले. गावातील पानाफुलांसह सर्व व्यक्तींनी

**''श्री संत सद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज''**

ह्या जयघोषात स्वामींचे स्वागत केले. स्वामींनी नाहीतरी आता जास्तीत–जास्त प्रवचन करण्याचे ठरवले होते. दिवसेदिवस स्वामींचे वय वाढतच चालले होते शरीर पुर्वीसारखे साथ देण्यास तयारच नव्हते व मनही एका जागी बसण्यास तयार नव्हते. याकारणास्तव स्वामी श्री क्षेत्र कोपरगांवातील सर्व जबाबदारी प.पू. रमेशगिरी बाबांवर सोपवून खास प्रवचने करीत होते. प्रवचनातून जास्तीत–जास्त समाज प्रबोधन घडवण्याचा ते प्रयत्न करीत होते. त्याच समाज प्रबोधनाप्रित्यर्थ स्वामी आता ''श्रीक्षेत्र दिक्षी'' यागावी उतरले होते. आल्या–आल्या स्वामींनी श्रीक्षेत्र साकुरप्रमाणे येथेही एक तास प्रवचन दिले. याप्रवचनातुन स्वामी बोलले.

''बाबाहो आज बाबा तुमच्या गावात आले, खुप आनंद झाला, बाबाचा खान्देशतला हा तिसरा योग आहे. तेव्हा आज बाबा जे सांगतील ते नीट ऐका, बाबाच किर्तन ऐकून विसरुन जाऊ नका, बाबा नेहमी तुम्हाला आशिर्वाद देता–देता बोलत असतात,म्हणून बाबाचं बोलणं नेहमीच आशिर्वाद समजून घेत जा, बाबाचं बोलणं वायफळ रहात नाही. स्त्रियांनी प्रतिव्रता धर्माचे पालन करावे, जर स्त्रिजवळून थोडी जरी चुक झाली तरी तिचा जन्म वाया जातो. ती एकदा चुकली की पुन्या जीवनासाठी चुकली समजा, मग तीचे महत्व हे कुत्रीपेक्षा ही कमी बनते म्हणून स्त्रियांनी प्रतिव्रता रहा. मुलांना चांगले संस्कार द्या, मुलाला चांगले संस्कार नेहमीच त्याच्या जीवनासाठी उपयोगी ठरतात. बायावो असे पोरं निर्माण करा कि एखादा डॉक्टर होऊन समाजाची सेवा करील, एखादा सैनिक होऊन देशाची रक्षा करील.''

लगेच महात्मा बोलले,

**''ऐसा पुत्र देगा गुंडा**
**त्याचा तिन्ही लोकि झेंडा.''**

पुन्हा बाबाजी बोलले असे

''पोर निर्माण करा कि त्याचं नाव तिन्ही लोकांत गायायला पाहिजे. नाही तर

आपला बाळ्या आला....''

काय...? .. आणि गेला काय? खातो आन् खुशाल झोपतो.

तसंच आपल्या घरी आलेलया पाहुण्यांना नेहमी देव माना, त्यांना पाणी दिल्याशिवाय आपल्याला अतिथ्यांच पुण्य मिळत नाही, कोणत्याही वाटसरुला अन्न दिल्याशिवाय राहू नका, अन्नदानाने त्याचा आत्मशांत होतो व तो आपल्याला शांत आत्म्याने आशिर्वाद देऊन जातो, फार पुण्य मिळतं. बाबाहो नीट ऐका, आहार सात्विक व पवित्र असावा, तो दोषाविरहीत असावा. पूजा, आरती, भजन नियमित पवित्र अंत:करणाने करावी. परधनाचा कधीही स्विकार करु नका, परधनाने लालसा तयार होते. म्हणून परधनाचा नेहमीच त्याग करा, परान्नाचा नेहमी त्याग करावा, ते कधी आपल्याला कसे मिळते याचा कधी भरवसा नसतो म्हणून परान्नाची निषेध करावा. आपल्या घरची भाजी-भाकरीच आवडीने खा. दुसऱ्यांच्या पोळीची अपेक्षा करु नका. दुसऱ्यांची निंदा कधीच करत जाऊ नका, परस्त्रीला आई-बहिण माना. स्त्री ही एक महाशक्ती अदिदेवीची शक्ती स्वरुप आहे. म्हणून परक्या स्त्रीची अभिलाषा मनात आणू सुद्धा नका.

आपण कुठल्याही परिस्थितीत सुखात दु:खात, अडीअडचणीत, सदैव भगवंताचे किंवा सद्गुरुचे नामस्मरण करा. त्यांचे नामस्मरण केल्याने परमेश्वर कधी... कुठे... केंव्हा.... भेटेल हे बाबालाही सांगता येणार नाही. आपली भक्ती श्रीराम भक्त हनुमंतासारखी असु द्या, कुंतीपुत्र अर्जुनासारखी असु द्या, देहूच्या तुकोबायांसारखी असु द्या, तुम्हाला देव भेटल्याखेरीज रहाणार नाही.''

असे कळकळीचे भक्तीरुपी बीजे भक्तांच्या मनात रुजवुन स्वामींनी प्रवचनास पुर्णविराम दिला. प्रवचन संपताच श्रीक्षेत्र दिक्षी येथील भक्तांनी तिथे आश्रम बांधण्यास विनवणी केली. नाहीतरी स्वामींना आता जास्तीत-जास्त पटापट कार्य करण्याची जबदरस्त मनिषाच लागली होती. म्हणून त्यांनी त्वरीत श्रीक्षेत्र दिक्षी येथील गावकऱ्यांची इच्छा पूर्ण करण्यास संमती दर्शविली. दिक्षी वासियांना फार आनंद झाला. बाबाजीचा आश्रम इथे झाला तर शतश:शत युगाचं पुण्य आपणास लाभल्याखेरीज राहणार नाही. हयाच मनातील उत्कंठेने त्यांनी मनात भक्तीचे वारे आणून जोरात घोषणा दिली.

**''बोला... श्री संत जनार्दन स्वामी**
**मौनगिरी महाराज कि जय''**

स्वामींनी पुन्हा एक दोन दिवसांसाठी तेथेच मुक्काम ठेवला. भक्तांची गर्दी विपुल प्रमाणात वाढू लागली. श्रीक्षेत्र उपखेड येथील बरीचशी मंडळी श्रमदानासाठी धावु लागली. एका दिवसात आश्रमाची जागा व्यवस्थित बनवली व तिसऱ्या दिवशी योग्य असा मुहूर्त बघून स्वामींनी आश्रमाचा पाया घेण्यास सुरवात केली. आश्रमाचा पायाचे काम सुरु झाले नि तितक्यात श्री क्षेत्र साकुर येथील मंडळी स्वामींच्या चरणी विलीन झाली त्यात श्री चंद्रकांत

धोंडू पाटील यांनी स्वामींच्या चेहऱ्याकडे बघत – बघत मनातली एक गोष्ट सांगण्यास परवानगी मागीतली, बाबांनी अनुमोदन देताच पाटील बोलले, ''बाबाजी श्री क्षेत्र साकुर येथे एक महादेवाचे मंदिर व्हावे अशी आमची इच्छास्तव मागणी आहे, तरीही तुम्ही ती मागणी नाकारु नका.''

बाबाजींनी डोळे मिटले व फार वेळेनंतर होकार दिला. साकुर भक्तगण फार आनंदात गावी गेले व आश्रमासहित शिवालयासाठी जागा निट करु लागले. स्वामींनी श्रीक्षेत्र दिक्षी येथील सर्व जबाबदारी येथील परिपूर्ण भक्तांवर टाकली व साकुरात महादेवाच्या शिवालयासाठी निघून गेले. दिक्षी सोडल्यानंतर स्वामी दुपारी तीन चारच्या सुमारास साकुरात पोहचले. परंतु स्वामींना त्यांच्या कार्यात जास्तच घाई केली, त्यांची ही घाई भक्तांच्या १९८९ मध्ये लक्षात आली. तरीदेखील साकुरात पोहताच स्वामींनी महादेवाच्या शिवालयासाठी मुहूर्त बघितला. स्वामींनी मुहूर्त झाल्यानंतर भक्तांना विचारले '' काय रे बाबा हो काय नाव दयायचे हया मंदीराला.''

भक्तांनी एका तालासुरात बाबांना सांगितले ''बाबा संभाजीनगरला जसे जनेश्वर तसे साकुरला मौनेश्वर.''

बाबाजींना आनंद झाला, भक्तांनी सुचवलेल्या महादेवाच्या मंदीराचे नाव बरेच काही सांगुन जाते, त्यांनी सुचवलेल्या नावात बराच काही अर्थ दडलेला होता. स्वामींनी पाया घेण्यास सांगितले, भक्तांनी पाया घेण्यास सुरुवात केली मात्र त्यांनी पाया हा संभाजीनगर येथील शिवालयाच्या तिरकस दिशेने घेतला. आता साकुरात येऊन स्वामींना तीन दिवस झाले होते, पाया घेण्याचे काम रणांगणावरील युद्धासारखे गतीने पूर्ण होत होते, दगड घडले जात होते. बाबाजी साक्षात्कार दाखवत होते. भक्तगण श्रमदान करत होते, यातच स्वामींच्या आयुष्यातील एकेक दिवस पुढे सरकत होते. स्वामींना भावी कारकिर्दीनुसार एका ठिकाणी पूर्वीसारखे बसणे आता त्यांना आवडत नव्हते, त्याच प्रित्यर्थ त्यांनी साकुरातील मौनेश्वराची जबाबदारी श्री मधुगिरीबाबांवर सोपवली व वेरुळात जाण्यास तयारी केली.

मार्च– १९८६ मध्ये स्वामी खानदेशात पताका रोवून वेरुळात परत आले, त्यांनी वेरुळात दहा–पंधरा दिवस मुक्काम केला. परंतु त्यांनी केलेल्या मुक्कासात अनेक ठिकाणी प्रवचने केली. तद्नंतर अलहाबाद येथे हरिद्वार कुंभमेळा निमित्ताने जाण्याची तयारी केली. स्वामींनी आपले सर्व सन्यासीशिष्य गोळा केले व कोपरगाव येथे मुक्कामास आले. नाशिकहून उत्तरभारत यात्रेकरीता स्वामींनी कोपरगावाहून जाण्याचे ठरवले असल्याने ते पाच एप्रिल १९८६ मध्ये कोपरगावात पोहचले. श्रीक्षेत्र कोपरगावात ''श्री काशिविश्वनाथाचे'' शिवालय पू. रमेशगिरी बाबांच्या नेतृत्वाखाली हळूहळू पूर्ण होत होते. स्वामींनी तेथील सर्व पहाणी केली, आवश्यक तेवढे मार्गदर्शन केले, शेतीत एक तास भर श्रमदान केले, दुसऱ्या दिवशी सकाळी विधी केली, विधीनंतर प्रवचन केले, प्रवचनातुन

बाबांनी शिष्यांना सांगितले., ''बाबाहो आपली गाडी सोडायची नाही, लई लांब-लांब जायचे नाही.'' प्रवचन झाल्यानंतर ते उत्तरभारताच्या यात्रेस निघाले. ८.ए.१९८६ मध्ये बाबाजी सोरटी सोमनाथ येथे पोहचले. सोरटी सोमनाथ पासून पुढील सर्व रस्ता भक्तांनी व्यापून गेला. गर्दी तुफान एकाचवेळी त्या रस्त्याहून वाहू लागली, स्वामीची गाडी त्या गर्दीत सापडली. हरिद्वार येथील कुंभमेळ्याची मुख्यनिदर्शने टळून जाण्याची चिन्ह पुर्णत: नजरेसमोर तराळत होती. काय करावे हा प्रश्न स्वामींना पडला होता. परंतु देवाच्या पुढे कुणालाच जाता येत नाही, अगदी त्याचप्रमाणे तेथे गर्दी दुर करण्यासाठी मोठमोठी पोलीस कमिशनरे दाखल झाले होते. त्यातल्या त्यात प्रमुख कमिशनराचे खुप पोट दुखू लागले होते. तेथील आसपासचे डॉक्टर त्यांचे पोट दुरुस्त करण्यात असमर्थ ठरले होते. बाबाजींना हे कळाले. तेंव्हा बाबाजींनी त्या पोलीस कमिशनरला जवळ बोलवले व विभुती देऊन ते म्हणाले,

''ही कपाळाला लाव आणि पाण्यासंगे पे.''

पोलीस कमिशनराचा अशा बाबांवर विश्वास नव्हता परंतु त्या वेळेस विलाजच नव्हता. त्याने ती विभुती डोळे लावुन प्राशन केली. त्या पोलीस कमिशनरला हा बाबा कसा होता हे अगोदर माहितच नव्हते. परंतु विभुती प्राशन करताच बाबा कसा आहे हे त्यांना त्वरीत कळाले. विभुती पिताच पोलीस कमिश्नराचे पोट बरे झाले व त्याने बाबाचे पाय धरले, पाय धरताच कमिशनर साहेब बोलले,

''काय सेवा करु बाबा,'' बाबा म्हणाले, ''आम्हाला त्वरीत हरिद्वारला जायचे आहे, तेवढं तिथं पोहचवं.'' स्वत: कमिश्नर साहेब गाडीत बसले व बाबाजीची खास राजमार्गाने हरिद्वाराकडे जाण्याची सोय केली. ज्या राजरस्त्याने फक्त उच्चमंत्र्यांच्या गाडया जातात त्याच रस्त्यानं बाबाजीची गाडी हरिद्वाराकडे जात होती. हरिद्वारावर बाबाला सोडून पोलीस कमिशनर पुन्हा त्यांच्या सेवेच्या ठिकाणी कार्यरत झाला. हरिद्वाराच्या कुंभमेळात बाबाजींनी जुन्या आडाखाडाच्या पद्धतीने त्यांच्या १३ सन्यांसी शिष्यांना दिक्षा दिली, त्या संन्यासी वृंदामध्ये स्वामी शांतीगिरी, स्वामी बालगिरी, स्वामी किसनगिरी, स्वामी लक्ष्मणगिरी, स्वामी रमेशगिरी, स्वामी माधवगिरी, स्वामी कैलासगिरी, स्वामी परशुरामगिरी, स्वामी परमानंदगिरी, स्वामी सेवागिरी, स्वामी अर्जुनगिरी, स्वामी भोलेगिरी, स्वामी विश्वेरानंदगिरी हे होते. त्याच दरम्यान एके दिवशी स्वामी सर्व शिष्यांसह स्नानासाठी नदीवर गेले. स्नान झाल्यावर सर्वजण बाबाजींसह नदीत बसले होते, विधी नुकतीच संपलेली होती. तेवढयात एक अवाढव्य विक्राळ धारण केलेला एक नंदी बाबाजींच्या दिशेने आला, बाबाजीने त्याला दुरुन पाहिले व शिष्यांना म्हणाले,

''याला काहीतरी खायला द्या'', भक्तांनी बाबाजीजवळ खोबऱ्याचे लाडू दिले. बाबाजींनी ते लाडू त्या नंदीला खाऊ घातले. लाडू खाऊन झाल्यावर नंदी काही अंतर दुर

गेला व क्षणात गुप्त झाला. तो नंदी कोण होता हे बाबालाच कळाले होते. तिसऱ्या दिवशी बाबाजीने अचानक घाई केली, व म्हणू लागले,

''चला आपल्याला घरी जायचं आहे.''

खरं तर बाबजींच्या शिष्यांना लवकर महाराष्ट्रात परतावेसे वाटत नव्हते. तिथेच अजुन एकदोन दिवस रहावेसे वाटत होते. पण बाबाजींपुढे बोलताही येत नव्हते. बाबांच्या सुचनेनुसार सर्व शिष्य गोळा झाले. लाकडी पुलावरुन घरी महाराष्ट्राच्या भुमीकडे येण्यासाठी रवाना झाले. येता–येता भक्तांमध्ये तीव्रतेची नाराजी पसरली होती. मात्र बाबाजींपुढे सर्व जण हसत–खेळतच वागत होते. महाराष्ट्रांत आल्यानंतर शिष्यांना कळाले, हरिद्वार जवळचा लाकडीपुल कोसळला व कित्येक लोक गंगा–यमुना–सरस्वतीला अर्पण झाले. हे वृत्त वाचताच शिष्यांना कमालीचे नवल वाटले त्यांच्या डोळ्यातून दु:खाच्या धारा वाहू लागल्या, त्यांना त्यांच्या आमच्या बाबाजींचा महिमा कळालाच पण बाबाजींचे आईहुन जास्त असलेल्या प्रेमाची मायाही कळाली. शिष्यांनी बाबाजींजवळ नाराजपणाप्रित्यर्थ क्षमा मागितली व ती थोर माऊली शिष्यांसह वेरुळात परतली. वेरुळात गेल्यावर त्यांनी प.पू. रमेशगिरी बाबांना श्रीक्षेत्र कोपरगावात पाठवले, प.पू. परमानंदगिरी बाबांना अंदरसुलात पाठवले, माधवगिरी बाबांना श्रीक्षेत्र नाशिक येथे पाठवले, प.पू. किसनगिरी बाबांना श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे पाठवले तर उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतीगिरीजांना आपल्या सोबत ठेवले.

वेरुळात पोहताच त्यांनी गुरुकुलातील विद्यार्थ्यांची चौकशी केली. थोडे फार अपुर्ण कामे पुर्ण करण्याचा निश्चय करुन भक्तांकडून ते काम श्रमदानान्वये करुन घेतले, वेरुळात गेल्यानंतर पंधरादिवसांनी खानदेशातील ४० गांव भागातील ''धमाने'' या गावातील काही शिष्यमंडळी स्वामीकडे दर्शनाप्रित्यर्थ वेरुळात दाखल झाली. बाबाजींनी त्यांची विचारपुस केली. काही वेळेनंतर बाबांनी त्यांना श्रीक्षेत्र साकुर येथील आश्रमाचीही विचारणा केली. सर्व खुशाली ऐकल्यानंतर स्वामींनी भक्तांना श्रमदान करण्यास सांगितले. स्वामींनी सांगितलेले श्रमदान धमाने गावकऱ्यांनी मनलावून केले. काम झाल्यावर धमाने गावांतील भक्तमंडळी स्वामींना म्हणाली ''बाबा, तुम्ही आमच्या गावाला यावे आणि ''उपखेड'' सारखा एखादा आश्रम बांधावा अशी आमची इच्छा आहे.''

बाबांनी डोळे मिटले व धमाने गावातील भक्तगणांना तारीख सांगून श्रीफळ दिले व जाण्यास सांगितले. ''धमाने '' गावातील भक्तांना विलक्षण आनंद झाला. त्यांना झालेला आनंद काही क्षणात श्रीक्षेत्र साकुरीसही उपखेडला गरका मारुन आला. त्यांनी स्वामींच्या स्वागताची जबरदस्त तयारी केली. स्वामी कधी आपल्या गावाला येतील कधी नाही असे कुतुहल धमानेवासीयांना वाटू लागले. तितक्यात स्वामी महात्मासह ''श्री क्षेत्र धमाण्यात उतरले. स्वामींचे आगमन श्रीक्षेत्र धमाण्यात होताच भक्तांनी जोरात आरोळी दिली,

'' अरे बोला, श्री संत सद्गुरु
जनार्दन स्वामी मौनगिरी बाबाचा
विजय असो,
जनेश्वर भगवान कि जय
मौनेश्वर भगवान कि जय.''

भक्तांचा जयघोष बघुन स्वामींनाही बराच आनंद झाला. त्यांना झालेल्या आनंद बघून भक्तांनी नाचायला सुरुवात केली. त्यांच्या देहात एक अनोखी वीजच संचारली होती. त्यांच्या मनात स्वामींची मुर्ती जशीच्या तशी उमटली होती, पायात एक वेगळाच ताल बहरला होता, हातांच्या टाळ्या चालू झाल्या होत्या, तोंडातून स्वामींचा जयघोष अखंडीतपणे हवेत संचारत होता.

बऱ्याच वेळेनंतर स्वामींची पालखी कार्यक्रमाच्या ठिकाणी व्यवस्थीत रुजू झाली. कार्यक्रमास जवळ-जवळ सुरुवात झाली होती. बाबाजींनी भगवान शिवाच्या जयघोषात प्रवचनास सुरवात केली. बाबाजींनी भक्तांना जास्तीत जास्त उपदेश करण्याचा प्रयत्न केला. समोरील एकविसाव्या शतकाच्या घडामोडी लक्षात घेऊनचं स्वामींनी तेथे प्रवचन दिले. प्रवचनातून भक्तांनी त्यांनी विपुल प्रमाणात सामाजिक शिकवण दिली. सामाजिक शिकवणीतून धार्मिक शिकवणीस प्रेरणा दिली. देव जगात असुन निस्सिम भक्ती केली पाहिजे या वाक्यास त्यांनी संजिवनी दिली. अवघ्या दीड तासाच्या प्रवचनातुन त्यांनी भक्तीचा दिवा अवघ्या ''धमाने'' गावात पेटवला. स्वामींनी पेटविलेल्या दिव्याने खरोखर अवघे गावच उजळले. आणि त्या उजळलेल्या गावात आजही स्वामींनी बांधलेला आश्रम दिसल्याखेरीज रहाणार नाही. अनेक नैराश्यवादी लोकांच्या निराशेला तिलांजली देऊन स्वामींनी दैववादी भक्तांचीच शिकवण दिली. स्वामींनी जन्माला आल्यापासून तर थेट १९८६ पर्यंतच्या श्री क्षेत्र धमाने येथील प्रवचनापर्यंत धर्मावरील ग्लानिच दुर करण्याचा प्रयत्न केला. अवघे आयुष्य ह्या जनार्दनांनी जनतेसाठी अर्पण केले होते. म्हणून तर वयाच्या ७२ व्या वर्षी ते श्री क्षेत्र धमाने येथे प्रवचनास आले होते.

सर्व दृष्टीकोनातून प्रवचनादात्मक उपदेश केल्यानंतर त्यांनी प्रवचनास निरोप दिला. प्रवचनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम झाला. प्रवचन आटोपताच स्वामी आश्रमासाठी घेतलेला जमिनीकडे गेले. तेथेही सर्व भक्तगण त्याच्या पाठीमागेच होते. स्वामींनी नेहमीप्रमाणे सर्वप्रथम जागा व्यवस्थित करण्यास सांगितली, तदनंतर त्यांनी विहिरीचे काम हाती घेतले, दोन दिन आठवडयाचा मुक्काम झाल्यावर स्वामींनी विधी, आरती, म्हणून सर्व ठिकाणीप्रमाणे शुभमुहूर्त बघून आश्रमाच्या कामास सुरवात केली. आश्रमाच्या कामाची सर्वच जबाबदारी तेथेही वरिष्ठ ग्रामस्थांवर टाकून स्वामी पुन्हा वेरुळात परतले. स्वामी वेरुळात परतले तेव्हा श्री क्षेत्र कोरगांव येथे काशिविश्वनाथ शिवालयांचे बांधकाम चालू होते. श्री क्षेत्र साकुर येथे

मौनेश्वेर शिवालय बांधणे चालू होते. दिक्षी व धमाणे येथील आश्रमही बांधणे चालू होते. आशातचं स्वामींचे प्रवचनेही चालूच होते. वेरुळात एक आठवडा राहिले असेल नसेल तितक्यात स्वामींनी श्रीक्षेत्र नाशिक येथे जाण्याचे ठरवले. नाशिकला आल्यानंतर स्वामींनी आजूबाजूच्या बऱ्याच खेडयापाड्यामध्ये प्रवचने घेतली. त्यामध्ये नांदुर्डी, पिंपळगाव, ओझर असे बरेचसे गावे समाविष्ठ होते. सप्टेंबर महीना लागला होता, चौदा तारीख जवळ येत होती, ललित पंचमीचा शुभ दिवस पुण्यपवित्र नाशकात उगवणार होता. तोपर्यंत स्वामींचे कार्य बरेचसे कळसाला टिपण्याइतके झालेले होते. अशातच सन्यासीवृंदासह गृहस्थी शिष्यांनी स्वामींचा ७२ वा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. व अखेर तो दिवस उगवलाच. सकाळी–सकाळी विधी झाली, लगोलग आरतीही झाली. बरीचशी भक्तमंडळी रात्रीच शर्वायेश्वर शिवालयात मुक्कामास आली होती, त्याप्रित्यर्थ सकाळची विधी–आरती बरीच ताला–सुरात झाली, बाबाजींचे प्रवचन झाले. महाप्रसादाचा कार्यक्रम फारच मोठा ठेवला होता सर्व भक्तांनी ''जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज की जय'' हया जयघोषीत बाबाजींना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या, बाबाजींच्या सन्यासी शिष्यांनी स्वामींना आनंदाने मिठ्या मारल्या, स्वामीच्या प्रतिमेमध्येच त्यांना त्यांची आई दिसली, त्यांच्याच रुपामध्ये त्यांनी भावी आयुष्यांची शिदोरी पाहिली. स्वामीचं त्यांची आई होती, स्वामीचं त्याचा पिता होता, स्वामीचं त्यांचे आयुष्य होते, स्वामीचं त्यांचे जीवन होते, होते नव्हते ते सारे स्वामीच होते. स्वामींनी त्यांना जवळ घेतले. मायेने त्याच्या अंगावर हात फिरवला, प्रेमाने त्यांच्या तोंडात अन्नाचे घास भरवले, स्वामींचे व त्यांच्या संन्यासी शिष्यांचे नातेच कसे होते हेच कळत नाही. काही वेळेनंतर स्वामींनी महाप्रसादासाठी इशारा दिला व भक्तांनी महाप्रसादाचा आस्वाद घेतला. सर्व कार्यक्रम आटोपल्याचे जाहिर केल्यानंतर बरेचसे भक्तगण घरी परतले. बाबाजींनी शिष्यांना योग्य असे नियोजनात्मक आदेश दिले व श्री क्षेत्र वेरुळ येथे जाण्याचा निर्णय घेतला, ठरल्याप्रमाणे स्वामी श्री क्षेत्र वेरुळात आले. वेरुळ पूर्वीसारखेच कार्यक्रम राबवले. येथील सर्व व्यवस्था लावून श्रीक्षेत्र दिक्षी येथे गेले, येथील स्वामींचा आश्रम पुर्णत: पूर्ण झाला होता. श्रीक्षेत्र दिक्षी येथे स्वामी दोन दिवस थांबले व त्याच्या नंतर ते श्री क्षेत्र साकुर येथे गेले. साकुर येथील मौनेश्वर शिवालयाचा पाया पूर्ण बांधून झालेला होता. तेथे आठ दिवस मुक्काम केला. तदनंतर ते श्री क्षेत्र धमाणे येथील आश्रमांचे काम बघुन पुन्हा वेरुळात आले. वेरुळात एक दोन दिवस थांबते न थांबते तोच कोपरगावात गेले. रमेशगिरी बाबान्वये तेथील शिवालयांची माहिती घेतली, चार–पाच दिवस तेथेच स्थानिक झाले. मंदिरांची नीट पहाणी केली, शेतीची नीट जोपासना केली, दररोज दोन–दोन प्रवचने केली व पुन्हा वेरुळात परत आले. स्वामींनी त्यांचे जीवन आता गतीमान बनवले होते, किती विलक्षण घाई त्यांच्या बोलण्यातून नि वागण्यातून दिसत होती. त्यांच्या कार्यात कितीतरी पटीने गतिमानता तयार झाली होती. अवघ्या दोन महिन्याच्या कालखंडात स्वामी श्रीक्षेत्र

दिक्षी, धमाने, साकुर व श्रीक्षेत्र कोपरगांव फिरून आले होते. हा कार्यरुपी सुर्य पूर्व-पश्चिम फिरता-फिरता अनेक अंधारमय भागात प्रकाश टाकत होता, कित्येकांना वाचवत होता. कित्येकांना प्रेरीत करत होता, कित्येकांना मार्ग दाखवत होता, हे सगळं करता-करता हा तेजोमय महाकार्यकारी सुर्य श्रीक्षेत्र वेरुळ येथे जाऊन बसला होता.

इ.स. १९८७-८८ मध्ये श्रीक्षेत्र काल्ही येथील भक्तमंडळ स्वामींकडे आले व आश्रम बांधण्यसाठी विनंत्या करु लागले. काही क्षणाचाही विलंब न लावता स्वामींनी कोल्हीला येण्यास होकार दिला, ठरल्या दिवशी श्री संत जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज श्रीक्षेत्र कोल्ही येथे दाखल झाले. कोल्ही हे गाव मानले तर फार पूण्यवान आहे. हया गावात बालब्रम्हचारी हनुमंतागिरी महारांजी समाधीपुर्वेकडे तोंड करुन विराजमान झालेली आहे. संभाजीनगर वैजापूर या रस्त्यावर उताराच्या टोकाला विसवलेलं हे छोटसं पण टुमदार गाव आजही भक्तांचे विनम्र होवुन स्वागत करतांना दिसते. निसर्गाच्या कुशीत जन्मास आलेलं हे कोल्ही गाव स्वामींच्या पदस्पर्शाने पुरेपुर पुनीत होऊन गेलं, स्वामींचे आगमन होताच विलक्षण टाळ्यांचा गजराने त्यांचे स्वागत केले, सर्वत्र शांतता पसरल्यावर स्वामींनी दिड-दोन तास प्रवचन केले, स्वामींचे प्रवचन येथेही फलदायी झाले, प्रवचन आटोपल्यावर महाप्रसादाचा कार्यक्रम फार धडाकेबाजात पार पडला. ठरल्याप्रमाणे लक्ष्मण पाराजी पाटील यांनी सुरवातील २० गुंठे जमीन दिली, त्याच जमिनीत स्वामींना आश्रम बांधायचा होता, गावच्या पश्चिमेस थोड्याशा उंचभागात ही जमीन होती, त्या जमीनी शेजारीचं एक छोटासा बंधारा होता, त्यामुळे आश्रमासाठी पाण्याची टंचाई फारशी भासणार नव्हती. तरी देखील भविष्याचा विचार करुन स्वामींनी विहिरीचे काम हाती घेतले. येणाऱ्या काही दिवसांत कोल्ही भक्तमंडळाने ते काम पूर्ण केले, तदनंतर चांगल्या योगाचा दिवस बघून स्वामींनी विधी, आरती करुन आश्रमाचा पाया घेतला. आश्रमाचा पाया हळूहळू पुर्ण होऊ लागला, स्वामींचे वय वाढते असल्याने त्यांची मनस्थिती ढासाळू लागली होती, तब्बेत पूर्वीसारखी साथ देत नव्हती तरीही स्वामी भक्तांना म्हणायचे ''उठा कामाला लागा, काम करा... काम करा'' तब्बेतीकडे लक्ष न देता त्यांनी भक्तांना प्रवचनातुन आदेश केले. वेळोवेळी सावरुन घेतले, कार्याची पताका लावतांना हालआपेष्टेत दिवस काढले. तरीही अवतार रुपी कार्यासाठी ते रात्र दिवसं उभेच होते. श्रीक्षेत्र कोल्ही येथे पाया पूर्ण होताच त्यांनी सर्व कार्य तेथील ग्रामस्थांवर टाकले व श्रीक्षेत्र वेरुळ येथे निघून गेले. वेरुळात एक आठवडा राहिले व लगेच श्रीक्षेत्र कोपरगांव येथे गेले. तेथे मंदिराचे काम अजून चालू होते, तेथील शिवालय लाल दगडातच व्हावे अशी त्यांची इच्छा असल्याने दगड सापडून घडवण्यास उशिर लागत होता त्याच प्रित्यर्थ शिवालयाचे काम हळूहळू पुर्ण होत होते. स्वामींनी तेथे जास्तीत जास्त वेळ मंदिराजवळ घालवला, मंदिरानंतर काही दिवस शेतीकडे लक्ष दिले, पंधरा वीस दिवस कोपरगावत काढल्यावर स्वामी पुन्हा श्रीक्षेत्र वेरुळात आले, वेरुळात आल्यावर नेहमीप्रमाणे

गुरुकुलाची चौकशी केली व तद्नंतर ही कार्यरुपी मुर्ती श्री क्षेत्र साकुरला गेली. साकुर येथील मौनेश्वर शिवालय बरेचसे पूर्ण होत आले होते. तेथील कार्य बघून स्वामींना बराचसा आनंद झाला, तेथे काही मौलिक सल्ला मधुगिरी बाबांना देऊन ते श्री क्षेत्र धमाणे येथे गेले. श्री क्षेत्र धमाणे येथील आश्रम पूर्णत: उभा राहिला होता. आश्रम पूर्ण झाल्यावर स्वामींनी तेथे प्रवचने घेतली, प्रवचनातून बराच काही मौलिक सल्ला दिला, आश्रम पूर्ण झाल्याने स्वामींना फार आनंद झाला होता. खानदेशातील हा आश्रम आजही स्वामींची आठवण करुन देतो. आश्रमात दोन दिवस मुक्काम केल्यानंतर स्वामी श्री क्षेत्र कोल्ही येथे गेले. श्री क्षेत्र धमाणे येथील आश्रम आजही जमिनींशी संघटीत असलेल्या शेती उत्पान्नावर चालतो, आश्रमात आजही विधी-आरती, अन्नदान, श्रमदान नित्यनियमाने चालतात. बरेचसे खानदेशातील लोक येथे भक्तीभावाने येतात. आश्रमात मुक्काम करतात व जीवनाचा आनंद पुन्हा धेऊन घरी जातात. आजही हा आश्रम स्वामींचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतीगिरी महाराज यांच्या आगमनाने फुलकित होतो. तेथे उत्तराधिकारी जातात, आश्रमांची सर्व देखभाल पहातात, भक्तांची काळजीपूर्वक विचारपुस करतात व स्वामींना शोभेल असेच कार्य करतात. इ.स. १९८६ ते १९८८ हा कालखंड स्वामींनी फार घाईत काढला. हया कालखंडात त्यांनी जास्तीत-जास्त कार्य केले. अवघ्या महाराष्ट्राला फेरी मारत राहिले व अवताररुपी कार्याचा कळस गाठत राहिले. इ.स. १९८७ च्या अखेरीस धमाणे या गावातील सर्व व्यवस्था लावून स्वामी लगेचच श्री क्षेत्र कोल्ही या गावात गेले. कोल्हीत आल्या-आल्या त्यांनी फार आनंद व्यक्त केला. कारण फार कमी दिवसात श्री क्षेत्र कोल्हीचा आश्रम पूर्ण झाला होता. आपला कोल्हीचा आश्रम पूर्ण झाल्याने स्वामींना झालेला आनंद पाहून भक्तांना खुपच आनंद झाला. किरकोळ काम पुर्ण झाल्यानंतर स्वामींनी तेथे अनुष्ठान घेण्याचे ठरवले व घेतले. सात दिवसाचे अनुष्ठान घेतल्याने तेथे बरेचसे भक्तगण उपस्थित होते. रात्रं-दिवस जपतप करुन अनुष्ठानाचे सहा दिवस कसे गेले हे कळालेच नाही. अनुष्ठानाचा शेवटचा दिवस उगवला, सकाळी-सकाळी स्वामींनी प्रवचन घेतले, प्रवचनातून नेहमी प्रमाणेच उपदेश केले, प्रवचनानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात पार पडला, महाप्रसादाचा कार्यक्रम होताच स्वामींनी तेथे सन्यासी शिष्यांची नेमणुक केली. व ते पुन्हा वेरुळात निघुन गेले. आजही कोल्ही आश्रम त्या संभाजीनगर वैजापूर रस्त्यावरुन जाणाऱ्या भक्तांचे स्वागत करतो. त्यांना सांज सकाळी विधी करण्याचे सुचवत असतो. व एकविसाव्या शतकातही जनार्दन स्वामी कोल्ही गावात प्रत्यक्ष रुपाने आहे याचीच जाणीव करुन देतो. सध्या त्या आश्रमाशी पंचेचाळीस एकर जमीन सलग्न आहे. जमीनीचे उत्पन्न आश्रमात जमा होते. आश्रमशेजारीच स्वामींची कुटीया आहे. दोन गाई, दोन बैल कुटीया समोर शोभून दिसतात. स्वामी शांतिगिरी नित्यनियमाने तेथे जातात. आश्रमाची देखभाल करतात व भक्तांनी त्यांच्या रुपाने स्वामी जनार्दनच आहेत याची

जाणीव करुन देतात. स्वामींचे उत्तराधिकारी नेमका कोणता अवतार आहे तेच कळत नाही. असो कोल्हीत महाप्रसाद झाला व स्वामींनी कोल्ही सोडले व वेरुळात परतले. वेरुळात आल्या–आल्या श्री क्षेत्र सवंदगाव येथील भक्तांनी स्वामींचे स्वागत केले. सर्व विचारपूस झाल्यावर स्वामींनी सवंदगाववाल्या भक्तांना विचारले ''काय काम आहे?''

भक्तांनी ''सवंदगाव'' येथे आश्रम बांधण्याची इच्छा प्रकट केली, स्वामींनी त्वरीत संमती दिली, सवंदगावातील भक्तगण स्वामींचे नारळ घेऊन गावी परतले, गावात आल्यानंतर त्यांनी सर्व गाव साफ केले, गावात सर्वत्र सडा रांगोळी टाकली, अवघे गाव सजवले, पशु पक्षी देखील त्यादिवशी सकाळी–सकाळी गावातल्या झाडावर हजेरी लावून उपस्थित झाले. ठरल्या दिवशी इ.स. १९८८ मध्ये स्वामी श्री क्षेत्र सवंदगावात उतरले. गावात एकच हाहाकार उडाला,

''या – या गावाचा महिमा
स्वामी उतरले रामा'',

सर्वत्र शांतता नि स्तब्धता पसरली. बाबाजींनी प्रवचनास सुरवात केली.

''ॐ मृत्युंजयाच रुद्राय निलकंठाय शांभवे ।
अमृतेशाय शर्वाय महादेवाच ते नम: ।।
त्र्यंबकेश्वर महाराज कि जय, श्री गुरुदेव दत्त दत्त अलख निरंजन
हरी प्रीतीस उपाय । धरावे संताचे ते पाय ।।
तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सापडला ।।
संत दर्शनी हा लाभ । पद्मनाम जोडीला ।।''

असे म्हणून स्वामींनी भक्तांना उपदेश करण्यास सुरवात केली, सर्व क्षेत्रावर उपदेशात्मक प्रवचन देत–देत स्वामी सवंदगावात दोन तास बोलत होते.

अखेर स्वामी एवढेच बोलले

''बाबाहो, आज बाबाजी तुमच्या गावाला आले आणि प्रवचन देऊन लगेच जाणार आहे. ज्या जमिनीत आपल्याला आश्रम बांधायचा आहे. त्या जमिनीत आता आपण लगेच जाऊ व आश्रमाच्या कामास सुरवात करु. बरं महाप्रसाद घेतल्यानंतर लगेचच तिकडं या.'' असे म्हणून स्वामींनी प्रवचनाची सांगता केली. भक्तांना आपली डोली शेताकडे न्यायला लावली, दुपारी तिनचा समय झाला असावा, भक्तांनी बाबजींच्या आदेशानुसार त्वरीत जमीन साफ करण्यास सुरवात केली. त्या दिवशी आश्रमाचा पाया घेण्याची कुठलेही चिन्ह नजरेसमोर येत नसल्याने स्वामींनी सकाळी–सकाळी विधी आटोपताच पाया खोदण्याची सुचना केली. स्वामींच्या सुचनेनुसार भक्तगणांनी

''जय जनार्दन बाबा की जय''

या जयघोषात पाया खोदण्यास सुरवात केली. दुपार पर्यंत पूर्वपश्चिम पाया कमरेपर्यंत आला

असेल तोच स्वामींनी श्री क्षेत्र शिवपुरी येथे जाण्याचा निर्णय घेतला. इ. स. १९८७ मध्ये स्वामींनी स्वत:हून श्री क्षेत्र शिवपुरी येथे आश्रम घेण्याचे ठरवले होते. शिवपुरी हे गाव श्री क्षेत्र टुणकी व श्रीक्षेत्र निमगाव यांच्या केंद्रबिंदुतील त्रिकोणात विसावले आहे. काळ्या कसदार जमिनीत उदय झालेल्या शिवपुरीत आश्रमाचे कार्य सुरु झालेले होते. ''शिवपुरी '' हे आवडते ठिकाण होते. शिवपुरीत निर्माण होणारा आश्रम हा स्वामींचा शेवटचा व आवडता आश्रम असल्याने ते कुठेही असले तरीही मुक्कामास शिवपुरीतच येत होते. त्याचप्रित्यर्थ त्यांनी सवंदगाव येथील आश्रमाचे भुमिपूजन केले व शिवपुरी गाठले. सवंदगावातील सर्व जबाबदारी तेथील इच्छुक भक्तांवर टाकून ते शिवपुरीतील विहिरीजवळ पोहचले होते. शिवपुरीत विहिरीचे काम चालू होते. स्वामी आता शिवपुरीतच राहू लागले होते, शिवपुरीतील ''धनगर'' भावांनी स्वामींना अकरा एकर जमिन दान केलेली होती. त्याच जमिनीत स्वामींना त्यांचा आवडता आश्रम बांधायचा होता. स्वामी नेहमीच त्यांच्या सन्यासी शिष्यांना सांगायचे ''ये पोराओ हया शिवपुरीत पूर्वी भगवान शंकर आणि माता पार्वती विसाव्याला येत होते, म्हणून हया जागेला फार महत्त्व आहे.'' का? कुणास ठाऊक पण स्वामी कुठेही गेले तरी रात्री शिवपुरीतच परत यायचे. इ. स. १९८८ मध्ये स्वामी अचानक त्यांच्या संन्यासी शिष्यांना म्हणाले, – ''आरे दोन वेळा ते वरचे लोक मला घ्यायला आले होते आणि दोन्ही वेळेला मी त्यांना परत लावले, पण आता जर ते आले तर मला जावं लागलं, म्हणून पटापटा काम करा, अरे बाबु संभाळ बरं का सारं, नीट जीव लाव सर्वांना.''

बाबाचे हे बोलणे ऐकुण शिष्यांच्या डोळ्यात पाणी आले, स्वामीचं त्यांची माता माऊली होती. सारे काही त्यांचे स्वामीच होते, स्वामींनी शिष्यांना जवळ घेतले, त्यांच्या डोळ्यातले पाणी पुसले, आईप्रमाणे त्यांच्या अंगावरुन हात फिरवला, त्यांना पोटाशी धरुन अन्न त्यांच्या मुखात भरवले, स्वामी जणु काय त्या शिष्यांची एक मातारुपी चिमणीच होती. स्वामीचे व शिष्यांचे दृढ नाते लिहितांना डोळ्यातही पाणी जमा होते. स्वामी जणु काय ममतेचा सागर होता. त्या विशाल सागरात शिष्यगण त्यांचे जीवन रेखाटत होते, स्वामी मात्र त्यांचे जीवन चंदनासारखे समजत होते, स्वत: मात्र झिजून भक्तांनाच सुगंध देत होते.

दुसऱ्या दिवसापासून सर्व संन्याशी शिष्य एक वेगळ्याच गतीने कार्य करु लागले होते, विहिरीचे काम पूर्ण होत आले होते. टुणकी व निमगांव येथील बरीचशी मंडळी कामासाठी तराळत होती, ही जनार्दन माऊली रात्रंदिवस विहिरींच्या काठावर बसलेली होती, विहिर पूर्ण होताच आश्रमाच्या कामास सुरवात झाली होती. महात्मे स्वामींसह शेतात कार्य करत होते. सेवागिरी बाबा व इतर संन्याशी शिष्य आश्रमाजवळ राबत होते. स्वामी वेळोवेळी प्रवचने देत होते, वेळोवेळी भक्तांना संकटातून वाचवत होते. एकेक साक्षात्कार देऊन भक्तीचा मळा उभारत होते, अशातच आश्रमाचे काम पूर्णत्वास येत होते.

सकाळी–सकाळी स्वामी सर्व सन्यासी शिष्यांसह विधी आरती म्हणायचे, नंतर

दोन तास प्रवचन द्यायचे, तद्नंतर दिवसभर काम करायचे, पाच-सहा वाजेच्या सुमारांस ते त्यांना जवळ घ्यायचे, जे पदार्थ जवळ असायचे ते त्यांना खायला द्यायचे, भगवान परमात्मा श्रीकृष्ण प्रमाणे सायंकाळी आश्रमाच्या सर्व गायी स्वामींजवळ येऊन बसायच्या, स्वामी नेहमीच त्यांना शिळे बाजरीच तुकडे, चारा द्यायचे. नाहीतरी ''गाय'' ही स्वामींना आई इतकी महाप्रिय होती. सायंकाळी पुन्हा स्नान पुजा करायचे, जेवण झाल्यावर सर्वांना आपल्या जवळ घेऊन झोपी जायचे. अशातच दिवस निघून जायचे.

इ.स. १९८८ च्या अखेरीस सवंदगाव येथील आश्रम पूर्ण झाला, त्या प्रित्यर्थ स्वामी सवंदगावाला गेले. तिथे एक दिड तास प्रवचन देऊन श्री क्षेत्र साकुरला गेले. तेथिल मंडळी स्वामींचीच वाट पहात होती. मौनेश्वर शिवालयाचा कळस पुर्ण झालेला होता मात्र मंदीराची प्राण-प्रतिष्ठा अजुन बाकी होती. स्वामींनी तिथे गेल्या-गेल्या वाकल्याच्या पंडीत बाबांना निरोप पाठवला, निरोपासरशी वाऱ्याहून अधिक गतीने काका साकुरात पोहचले व स्वामींच्या आदेशानुसार ते जयपुरला पिंड व नंदी आणण्यास निघाले, मंदीराच्या प्राणप्रतिष्ठेच्या काळात स्वामी दहा-पंधरा दिवस श्री क्षेत्र साकुर येथेच होते. मंदिराचा सर्व खर्च स्वामींनीच केला. गावकऱ्यांनी केवळ श्रमदान केले. पंडीत काका नेहमी प्रमाणे सर्व वस्तू नंदीपिंडीसह साकुरात हजर झाले.

स्वामींनी मुहूर्त बघुन प्राणप्रतिष्ठेची तारीख ठरवली व श्री क्षेत्र नाशिक व श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील ब्राह्मणांना निमंत्रण दिले. प्राणप्रतिष्ठेचा दिवस उगवला गेला. ब्राह्मनांनी सकाळी आठ वाजेच्या दरम्यानच साकुरला हजेरी लावली. श्री क्षेत्र सवंदगाव, श्री क्षेत्र उपखेड, श्री क्षेत्र धमाने व श्री क्षेत्र दिक्षी येथील बऱ्याच प्रमाणातील भक्तगण श्री क्षेत्र साकुरात जमा झाले, बराच वेळ टळून गेलेला होता. प्राणप्रतिष्ठेचा मुहूर्त अत्यंत जवळ येत होता. मात्र शंभर माणसांनी ही नंदी जागचा हालत नव्हता भक्तगण परेशान झाले होते, काय करावे हेच कळत नव्हते, ते जसेच्या तसे स्वामींकडे गेले व स्वामींना सांगू लागले. मग स्वामी स्वत: उठून नंदीकडे व नंदीला हात लावून काहीतरी म्हटले, बघा काय साक्षात्कार दोनच माणसांना नंदी उचलला नंतर शिवालयात पिंडीची व नंदीची प्राणप्रतिष्ठा पुर्ण झाली सर्वत्र एकत्र घोषणा ऐकू येत होत्या.

**''श्री संत सदगुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**श्री मौनेश्वर भगवान की जय**
**श्री जनेश्वर भगवान की जय''**

प्राणप्रतिष्ठा नंतर स्वामीचे प्रवचन झाले प्रवचनानंतर फार मोठा महाप्रसादाचा कार्यक्रम पार पडला. खानदेशातले स्वामींचे हे अखेरचे कार्य होते. सर्व कार्यक्रम आटोपल्या नंतर स्वामींनी सर्व जबाबदारी प.पू. मधुगिरी बाबांवर टाकली. तद्नंतर त्यांनी साकुर सोडले व शिवपुरी गाठले.

स्वामीनंतर मधुगिरीबाबांनी १,२०,००० रु. देऊन दहा एकर जमिन विकत घेऊन आश्रमाशी व मंदीराशी सलग्न केली आहे. येथे गुरुपोर्णिमा, ललीतपंचमी व इतर कार्यक्रम फार मोठ्या आनंदाने पार पाडतात. जमिनीतील उत्पन्नावर आश्रम चालवतात, स्वामींना आवडत असलेले अन्नदान सातत्याने येथे चालत असते. सांज-सकाळी आरती-विधी नित्यनियमाने हाते, स्वामी अजुनही आहे असे मानुन अजूनही भक्तगण श्रद्धेने तेथे जाता व शिवाची पुजा करतात. स्वामी इ.स. १९८८ च्या अखेरीस श्री क्षेत्र साकुरहून शिवपुरीत दाखल झाले. स्वामीच्या जिवनातील अखेरचा व आवडता शिवपुरी आश्रम आता पुर्ण झाला होता. स्वामी शिवपुरीत आल्यावर जसे घरी परतल्या सारखेच वाटायचे. बाबाजींना आवडत असलेल्या शिवपुरी आश्रमात प.पू. सेवागिरी बाबा कार्यरत आहे. सध्या चाळीस-पन्नास एकर जमिनी आश्रमाशी सुसंघटीत आहे. सर्व आश्रमाचा खर्च जमिनीतील उत्पादनावर चालतो. स्वामीचे उत्तराधिकारी महामंडलेश्वर १००८ स्वामी शांतीगिरीजी महाराज आजही शिवपुरीत जातात. सर्व देखभाल करतात, सेवागिरी बाबांना योग्य ते मार्गदर्शन करतात, स्वामी शांतिगिरी महाराज खरचं कोणती शक्ती आहे. हेच कळत नाही. स्वामींच्या संकल्पानुसार जसे उत्तराधिकाऱ्यांनी शांतिगिरी महाराजांनी भोलेगिरीबाबांच्या नेतृत्वाखाली श्री क्षेत्र निमगाव येथे रुद्रायेश्वराचे शिवालय बांधण्याचे कार्य सरु केले आहे. तसेच श्री क्षेत्र टुणकी येथे अमृतेश्वरचेही कार्य ते त्वरीत चालू करण्याच्या तयारीत आहे. आणि तसेच बाबाजींच्या आवडत्या आश्रमात (शिवपुरीत) श्री नर्मदेश्वरांचे शिवालय बांधण्याच्या तयारीत आहे.

शिवपुरीतील आश्रम पुर्ण झाल्याचा बघुन स्वामींना फार आनंद झाला. स्वामींना झालेल्या आनंदात इ.स. १९८८ चे अखेरचे दिवस कसे गेले हेच मुळात कळाले नाही. स्वामींनी फार मोठ्या आशेने आनंदाने शिष्यांना जवळ घेत इ.स. १९८९ चे स्वागत केले. स्वामी त्यांच्या जिवनातील कार्यामुळे फार आनंदीत झाले होते. मात्र त्यांना थोडेसे दु:ख वाटत होते ते काशिविश्वनाथाच्या शिवालयाचे. श्री क्षेत्र कोपरगांव येथील इ.स. १९८५ मध्ये सुरु केलेल्या काशिविश्वनाथाच्या शिवालयांचे बांधकाम अजुन अपुर्णच होते. त्याचा कळस बघण्याचे स्वप्न बाबांशी अशी तराळत होते. जन्मापासून ते आतापर्यंत सातत्याने कष्ट करुन त्यांनी त्यांच्या जीवनातील मुळाक्षरे गिरवली होती; आराम, चैन, विलास, ऐश, मद, मत्सर इत्यादी गोष्टींना त्यांनी जन्मापासूनच तिलांजली दिलेली होती. जिवनात फक्त भक्ती करणे. आईला व गाईला खरेखुरे दैवत मानने, सातत्याने ईश्वराची सेवा करणे, शेतीला आईचे महत्त्व देऊन तिचे पालनपोषन करणे, साऱ्या जिवनाचा सार एक विधीत मानने, रात्रं दिवस काम करणे, लोकांना शांती मिळण्यासाठी शिवालये बांधणे, भारत भुमीच्या रक्षणासाठी वेळोवेळी प्रवचने देणे, वाटसरुंच्या आशिर्वादासाठी आश्रमे बांधणे, गोरगरिबांच्या मुलांना उच्च शिक्षण मिळण्यासाठी गुरुकुले बांधणे व एकविसाव्या शतकातही

दैवाचे अस्तित्व आहे हे दाखवण्यासाठी अवघे जीवन वेचणे हेच काम त्यांनी आयुष्यभर केले होते.

इ.स. १९१४ प्रमाणे फुललेली पालवी इ.स. १९८९ मध्येही फुलली. स्वामींना हया चालू वर्षी काय करावे नि काय करु नये असेच वाटत होते. इ.स. १९८९ चे वर्ष हया भगवान शिवाचा तो शेवटचा मृत्यु लोकातील मुक्काम होता. स्वामींनी आता आश्रमे व शिवालये बांधणे बंद केले होती. कमी वेळात जास्तीत-जास्त कार्य करण्याचे ठरवले होते. स्वामींचे अखेरचे वर्ष म्हणजे सध्याच्या क्रिकेट सारखे होते. जसा एखादा फलंदाज मैदानात उतरावा संपुर्ण षटके त्याने आनंदीत खेळावी आणि अखेरच्या षटकात जास्तीत जास्त सुंदर खेळी करण्याचा प्रयत्न करावा. अगदी तसाच प्रयत्न स्वामी करत होते. जीवनातील ७४ वर्ष त्यांनी अत्यंत यथायोग्य कार्याने पार पाडले होते. हे ७५ वे वर्षही त्यांना तसेच पार पाडावेसे वाटत होते. इ.स. १९८९ मधील जानेवारीत ते श्री क्षेत्र वेरुळला गेले. वेरुळातील आश्रमाची, गुरुकुलाची, शेतीची नीट पहाणी केली. पहाणी करतांना स्वामी शांतिगिरी महाराजांना ते नेहमी म्हणायचे ''ए बाबु, हे सारं तुच संभाळ, नीट जीव लाव साऱ्यांना हे आता तुझंच आहे, हया ठिकाणी तुझं तोंड दिसणार नाही इतके लोक येतील , इथं विमाने उतरतील.'' स्वामींनी महाराजांना (महात्यांना) बोललेले उद्‌गार ''विश्व शांती धर्म सोहळ्याच्या निमित्ताने इ.स. १/१२/२००० मध्ये खरे ठरले.''

वेरुळचे काम बघुन स्वामी श्री क्षेत्र कोपरगावात गेले, तेथील मंदीर हळूहळू कळसा इतके उंचावले होते मात्र अद्याप पुर्ण झालेले नव्हते. रमेशगिरी बाबांना सारं निट मार्गदर्शन करुन त्यांनी शेतीची पहाणी केली, आठ-पंधरा दिवस कोपरगावात राहिल्यानंतर त्यांनी श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वराकडे कुच केले. त्र्यंबकेश्वर म्हणजे महाराष्ट्रातील कैलासच होयं, त्र्यंबकेश्वरात पोहचताच स्वामींना बरे वाटले, स्वामींनी तेथील आश्रमातही पाच सहा दिवस मुक्काम केला, तेथील सर्व शेतीची नि आश्रमाची पहाणी केली. तेथील श्रवणगिरी महाराजांना योग्य मार्गदर्शनानंतर ते नाशकात आले. नाशिकातील माधवगिरी बाबा आश्रमाची व शर्वायेश्वराची जबाबदारी पार पाडत होते. तेथील भक्तीचा मळा बराच फुलकित झाला होता. शर्वायेश्वर शिवालया शेजारील भक्तींचा मळा बघून स्वामी आनंदाच्या महासागरात बुडून गेले. त्यांना त्या गोदावरीतीरावरील आश्रम बघुन पराकोटीचा आंनद झाला.

थोडयाच दिवसात त्यांनी नाशिक सोडले नि शिवपुरी गाठले. दहा-पंधरा दिवस शिवपुरीत मुक्काम केल्यानंतर श्री क्षेत्र कोल्ही येथे अखेरचा चक्कर मारला. तेथील आश्रमाची पहाणी करुन ते श्री क्षेत्र साकुरला गेले. तेथे मधुगिरी बाबा कार्यरत होते. त्यांचे कार्य बघून त्यांना मनापासून आनंद झाला. तेथील सर्व व्यवस्था नीट लावून ते श्री क्षेत्र अपखेडला दोन दिवसांसाठी गेले. तेथून ते धमाने, सवंदगाव आश्रमाला भेटी देऊन मालेगांव तालुक्यात

वऱ्हाणे येथे (जळगांव (नि.) पासून ३ कि.मी. उत्तरेला) गेले व तेथून सरळ शिवपुरीत आले.

जुलै १९८९ मध्ये स्वामी शिवपुरीत होते. संपुर्ण वर्षभर प्रवास केल्याने ते विलक्षण थकले होते, मी तर असेच म्हणले स्वामी हे सुर्याप्रमाणे होते रात्र असो अथवा दिवस असो, आकाश निरभ्र असो अथवा ढगाळलेलं असो, ते त्यांचे कार्य नियमीतपणे सातत्याने करत असतो. अगदी तसेच स्वामी होते, वर्षभर थकून सुद्धा ऑगष्ट मध्ये अखेरचे अनुष्ठान घेण्याचे ठरवले होते व सहा ऑगष्ट १९८९ मध्ये त्यांनी त्यांचे शेवटचे अनुष्ठान श्रीक्षेत्र दिक्षी येथे घेतले. स्वामींच्या जीवनातील सर्वात पहिले अनुष्ठान त्र्यंबकेश्वर येथील व सर्वात शेवटचे अनुष्ठान६ ऑगष्ट १९८९ मधील श्री क्षेत्र दिक्षी येथील.

ठरल्याप्रमाणे ६ ऑगष्ट रोजी स्वामींनी श्री क्षेत्र दिक्षी येथे अनुष्ठानासा सुरवात केली. इतर दिवसांप्रमाणे अनुष्ठाचे सहा दिवस कसे गेले हेच कळाले नाही. शेवटच्या दिवशी बाबा प्रवचन घेणार होते. तर महाप्रसादाने अनुष्ठान संपणार होते. अखेर अनुष्ठानाचा अखेरचा दिवस उगवला गेला, सकाळी ९ वाजता स्वामींनी प्रवचनास सुरुवात केली.

सर्वप्रथम महात्मा बोलले,
ॐ मृत्युंजयाय रुद्राय निलकंठाय शंभवे ।
अमृतेशाय शर्वाय महादेवाय ते नमः ।।
सोहम् शंकर पंच अक्षर वाचे उच्चार । सोहम्
सोहम् शंकर पंचअक्षर वाचे उच्चार । सोहम शंकर ।।

त्र्यंबकेश्वर महाराज कि जय, हदयेश्वर महाराज कि जय..... गोपाल कृष्ण भगवान की जय,

श्री गुरुदेव दत्त दत्त अलख निरंजन ।
सदगुरु जनार्दन स्वामी महाराज की जय ।।
गुरुविण देव नाही दुज । पाहाता त्रैलोकी ।।
''गुरु-अक्षर दोन । जो करील अनुष्ठान,
जो करीन अमृतपान ।।,''
''जप, तप, अनुष्ठान । करीती ऋषी मुनी, जन ।।''

लगेच बाबाजींनी महात्मांनी गायलेल्या ओवींवर प्रवचन देण्यास सुरवात केली. जशी स्वामींनी पिनाकेश्वर शिवालयासमोर भक्तगणांना अनुष्ठानाची महिमा वर्तवली तशी अनुष्ठानाची महीमा त्यांनी श्री क्षेत्र दिक्षी येथे दिल्यानंतर स्वामी भक्तगणांना उद्देशुन म्हणाले,

''दानाचे दोन हेतु असतात, 'श्रद्धा आणि शक्ती'. श्रद्धेशिवाय आपले सर्वस्व जरी दान दिले तरी ते फळ देणारे ठरत नाही. कारण श्रद्धा म्हणजेच धर्म आहे. आपला प्रपंच भागवून ठरलेले द्रव्य सत्पात्री दान केल्याने शिव प्रसन्न होतो. सुखी जीवनाकरीता संतांशी स्नेह बंधन जोडा, राग असल्यासं मौन पाळा, चिंता करु नका, परमेश्वराचे चिंतन करा, संताजवळ मुक्ती नाही सेवा मागा. चांगले जीवन जर जगायचे असेल तर

''उदयोग व शीलाची बेरीज करा
मैत्रीतून मत्सर वजा करा
सुखभावाला प्रेमाने गुणा
दु:खाला मनोरंजाने भागा
परनिंदेचा लघुत्तम काढा.''

अशा अनेक विषयांवर उपदेश करुन स्वामींनी प्रवचनास पुर्णविराम दिला. प्रवचनानंतर महाप्रसादाचा फार मोठा कार्यक्रम झाला. महाप्रसादाच्या कार्यक्रमानंतर स्वामी पुन्हा शिवपुरी आश्रमात आले.

त्यानंतर जवळ–जवळ एक मास बाबाजी शिवपुरीतच राहिले, बाबाजींच्या संन्याशी शिष्यांनी बाबाजींचा ७५ वा वाढदिवस फार आनंदाने साजरा करण्याचे ठरवले होते व बाबाजींनीही त्यांना फार मोठे प्रोत्साहन दिले. बाबाजींना शेवट–शवेट शिष्यांचे मन मोडायचे नव्हते व शिष्यांनाही बाबाजींचा हा अखेरचा वाढदिवस आहे हे माहित नव्हते. सप्टेंबर २४ तारखेस भक्तपरिवाराने महाराष्ट्राची आर्थिक गुरुकिल्ली म्हटल्या जाणाऱ्या निफाड तालुक्यात बाबाजींचा वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले होते. त्याचप्रमाणे २३ सप्टेंबर १९८९ मध्ये रात्रीला बाबा संन्यासी शिष्यांसह श्री क्षेत्र निफाड येथे मुक्कामास आले. बाबाजी यापुर्वी १९८५ मध्ये साखरकारखान्याच्या उद्घाटनास येथे आले होते. बाबाजींचे संन्याशी शिष्य निफाड मध्ये त्यांच्या सोबतच होते. ग्रहस्थी भक्तांनी तर निफाडचे मैदानच भरवुन टाकले होते. सकाळी–सकाळी बाबाजींच्या संन्याशी शिष्यांनी बाबाजींना फार मोठ्या मायेने स्नान घातले, जन्मदात्या मातेप्रमाणे त्यांनी स्वामींना स्नान घातले, वडिलांच्या प्रेमासारखे त्यांनी बाबाजींचे अंग पुसले, बाबाजींना नवीन कपडे घातले, बाबजींनी प्रवचनानंतर त्यांच्या सर्व शिष्यांना मायेने जेऊ घातले. स्वामी जणु काय त्या संन्यासी शिष्यांची माताच होती. मातेच्या ममत्वाने त्यांनी शिष्यांना जवळ जवळ घेतले, त्यांचे पटापट गोड मुके (पापे) घेतले, त्यांना कुशीत धरले, त्याचवेळी स्वामींच्या डोळ्यातून पाणी टपकले होते. परंतु स्वामींच्या डोळ्यातल्या पाण्याचा अर्थ कुणालाच कळला नाही. जेंव्हा कळाला तेंव्हा मात्र फार उशीर झालेला होता. कार्यक्रम संपल्यावर बाबजींनी सर्व शिष्यांना कामाला लावले, ज्याला त्याला ज्याच्या त्याच्या आश्रमात पाठवले, परंतु कार्यक्रमाच्या अखेर स्वामी सर्व शिष्यांना एवढेच बोलले, ''बाबाहो, भांडत जाऊ नका, ज्यांच त्यांच निट संभाळा, एकमेकाला सावरुन घ्या.''

कार्यक्रमानंतर जो तो त्याच्या त्याच्या घरी गेला. स्वामी महात्म्यांसह शिवपुरीत आले, आता शिवपुरीत आल्यावर बाबाजींची तब्येत अजुनच ढासळली, त्यांचे मृत्युलोकातील कार्य जणु काय पुर्ण होत आले होते व ते आता जणु काय मृत्युलोक सोडण्याच्या विचारात होते. बघा काय चमत्कार होता त्या माऊलीचा, किती महत्त्व होते त्याप्रभुच्या हृदयात, कि

ज्या माऊलीने सर्व संन्यासी शिष्यांना एकत्र आणुन सर्वात मोठा आनंदाचा क्षण दाखवला होता, सर्वांना एकत्र जेवण घातले होते, सर्वांना एकत्र बोलवुन मायेने एक अनमोल सल्लाही दिला होता. त्यानंतर स्वामींचे सर्व संन्यासी शिष्य एकत्र कधीच आले नव्हते, जेंव्हा आले तेंव्हा स्वामी सर्वांना सोडून निघुन गेले होते.

आणि म्हणून जीवनरुपी कार्याच्या अंतिमक्षणी स्वामी महात्मांना अत्यंत काळजीपुर्वक मार्गदर्शन करत होते. अशातच ५ डिसेंबर १९८९ ला स्वामी ची तब्बेत अचानक बिघडली होती. बुधवारचा दिवस असावा. स्वामी बुधवारी कुठे प्रवास करत नव्हते. (तसेच स्वामी शांतीगिरीजी बुधवारी कुठेच प्रवास करत नाही.) तरीदेखील भक्तांनी स्वामींना शिवपुरीतून नाशिक येथे माऊली इस्पितळात दाखल केले. माऊली इस्पितळात स्वामींना आणल्यावर स्वामींच्या आजरपणाची सर्वत्र बातमी पसरली. स्वामींचे जवळेचे भक्त ज्यांनी स्वामीबरोबर दिवस घातले ते सर्व नाशिकला हजर झाले होते. तर दत्त जयंती अनुष्ठान प्रित्यर्थ काही भक्त लाखलगाव कार्यक्रमाची तयारी करत होते. माऊली इस्पितळात डॉ. कुलकर्णीने स्वामींवर उपचार करण्यास सुरवात केली. मानवी देहाप्रमाणे स्वामींनी त्यांचे शरीर पुर्ववत केले. मात्र पुन्हा-पुन्हा स्वामी मृत्युलोकास निरोप देण्याचीच वाट बघत होते, म्हणूनच काही क्षणानंतर ते पुन्हा अस्वस्थ होत होते. डॉक्टर त्यांना जागतिक घडामोडीत आणण्याचा कसोसीने प्रयत्न करत होते, तरी स्वामी प्रत्येक वेळी जागतिक घडामोडीतून जाण्याचा प्रयत्न करीत होते. आठ डिसेंबरचा दिवस उगवला, स्वामींनी डॉक्टरला उपचार बंद करण्यास लावले तर भक्तांना नाशिक आश्रमात न्यायला लावले. (९ ता.) तेथे सर्व संन्यासी शिष्यांनी एकत्र बघून स्वामींच्या डोळ्यात पाणी आले, ती माऊलीच त्यांची माता आणि पिता होती. घरदार सोडून आलेल्या वासरांची ती गाय होती व ही जगद्वंदनीय माऊली आता त्यांना सोडून जाणार होती म्हणून शिष्यांच्या पदराआड ती अश्रू टिपत होती, अखेर स्वामींनी स्वत:ला सावरले व सर्वांना जवळ घेतले.

सर्व जवळ आल्यावर स्वामी म्हणाले, ''भांडू नका, हे सारं तुमचं आहे, नीट सांभाळा, एकमेकांना जीव लावा,'' असे म्हणून कुटीयात निघून गेले. मग नंतर सर्व जण आश्रमात कामाला लागले. रविवारची पहाट फुलली, त्या फुललेल्या पहाटेत स्वामी ४.०० वाजता उठले स्वामींनी शिष्यांना स्नान करुन विधी करण्यास सांगितली, विधी झाली, बाबाजींनी कुटीयातून भक्तांना उपदेश केला, ''उठा... कामाला.... लागा.... भांडू नका.... नीट संभाळा.'' हा अखेरचा अनमोल उपदेश करुन ही जनार्दन माऊली सर्वांना सोडून मृत्युलोकाच्या सिमेतून सिमापार झाली. जेंव्हा शिष्य पुन्हा स्वामींकडे गेले तेंव्हा ही माऊली ब्रम्हमुर्हूतावर दि. १० डिसेंबर १९८९ रोजी ४.३५ वा. गाढ झोपलेली होती. ती कायमचीचं! हा कार्यरुपी तेजस्वी सुर्य दहा डिसेंबरला पहाटेच्या वातावरणात न उगवता कायमचाच मावळतीला निघून गेला होता.

स्वामींचे शरीर थंडगार झालेले बघून शिष्य रडायला लागले. 'बाबाजी... बाबाजी...' म्हणून अश्रू गाळू लागले. त्यांना आता काय करावे हेच सुचत नव्हते कारण जनार्दन बाबा म्हणजे त्यांना जीवन जगवणारी एक माता होती, त्यांचे सुख, दुःख जाणून घेणारी एक माऊली होती, त्या सर्व संन्यासीरुपी नद्यांना एकत्र साठवणारी एक सागरी महाकाया होती. आकाशवाणी केंद्राने अवघ्या महाराष्ट्रात पसरली, सारा महाराष्ट्र हळहळला, भक्तगणांनी जेथे बातमी ऐकली तेथेच अश्रू गाळण्यास सुरुवात केली, तर नाशिकच्या आश्रमातील गाईनेही हंबरडा फोडण्यास सुरवात केली, पशु-पक्षांपासून तर झोपडीतल्या म्हातारी सर्वांच्या डोळ्यातून अश्रूंचा महापूर वाहू लागला होता. स्वामींचा देह नाशिकहून लाखलगाव, चांदोरी , निफाड, येवला, अंदरसुल मार्गे कोपरगावला न्यायचा होता. सर्वत्र रडारड सुरु झाली होती. हळूहळू भक्तगणांनी मिळेल त्या साधनाने नाशिकला येण्यास सुरुवात केली होती. मुंगीलाही जागा सापडणार नाही इतकी भक्त मंडळी उपस्थित झाली होती. टापरगाव, दहेगांव, करंजगाव, मालेगांव इत्यादी ठिकाणची मंडळीही रडत-रडत नाशिकला पोहचली होती. फार मोठ्या शोक-कालात स्वामींची देहरुपाची अखेरची मिरवणूक निघाली. ४ ते ५ लाख लोकांच्या उपस्थितीत हा कार्यरुपी शिवअवतारी महापुरुष आता श्री काशिविश्वेश्वनाथाजवळ समाधिस्त होण्यासाठी श्री क्षेत्र कोपरगावकडे चालला होता. २ वाजता स्वामींचा देह काशिविश्वनाथाच्या मंदीराशेजारी ठेवला होता. इतकी गर्दी झाली होती की, आई मुलाला ओळखत नव्हती. स्वामीरुपी माऊली सर्वांना सोडून निघून गेली होती. त्यामुळे भक्तांच्या नजरेत अश्रूंची धार मावत नव्हती.

२ वाजून १० मी. देशभरातील जुना आडाखतील प्रमुखांनी व बाबांच्या संन्यासी शिष्यांनी त्यांना विधी पंचमृताने स्नान घातले. देशमाने या गावातील श्री प्रभाकर यांनी लिहिलेल्या आरतीने व भक्तांच्या ''श्री संत सद्‌गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज की जय,'' या घोषणांनी स्वामींना समाधी दिली. आता ही माऊली एक विशिष्ट अशी सावली दाखवून कायमचीच लीन झाली होती.

काही वेळेनंतर शिष्यगण रडत-रडत परतू लागले होते. संन्यासी शिष्यमंडळ तिथचं रडत बसले होते, तर सुर्यनारायणही हया माऊलीस वंदन करुन निघून गेले होते.

श्री संत जनार्दन स्वामी महाराज खरोखर एक कायार्थी पुरुष होते, हया विश्वाच्या रक्षणासाठी हया भारतभुमीरुपी देवघरात जन्म घेतलेले एक शिव अवतार होते. हया विश्वास शांती मिळण्यासाठी भारतभुमीचे रक्षण करणे गरजेचे होते, त्याचप्रित्यर्थ हया शिवअवताराने भारतात जनार्दन रुपाने जन्म घेतला होता, खेड्यापाड्यात भक्तांची व ज्ञानाचा प्रसार होण्यासाठी त्यांनी शेतकरी कुटूंबात जन्म घेतला होता. साध्या लोकांमध्ये भक्तीची बिजे रुजून त्यांना अवघा भारत यथायोग्य बनवायचा होता. त्याचसाठी त्यांनी बालपणापासून शिवभक्ती करण्यास सुरवात केली होती. सामान्य मनुष्याप्रमाणे मनुष्यरुप धारण केल्यानंतर

ईश्वरांची स्वत: खडतर भक्ती करुन समाजातील प्रजेला भक्तीचा मार्ग दाखवून दिला. देव ही संकल्पना समजल्यापासून तर जिवनातील अखेरचे क्षण मोजेपर्यंत स्वामी पहाटे साडेतीनला उठायचे, थंड पाण्याने स्नान करायचे, विधी वाचायचे, मारुतीला पाली घालायचे, दिवसभर काम करायचे, दुपारी पुन्हा स्नान करायचे, सायंकाळ झाली की पुन्हा विधीपुजा करायचे.

मनुष्यांचा आहार व वेष हा साधा पद्धतीचा राहून तो उच्चसरणीचा असावा, हे दाखवून देण्यासाठी स्वामींनी साध्या राहाणीचा अवलंब केला होता. डोक्यावर जटा, पायात खडवा, अंगात कपनी, बसायला बारदान, राहायला पर्णकुटी पण विचाराने जगाचे कल्याण करणे हीच स्वामींची वेशभुषा होती. आहार हा त्यांच्या जिवनात फार अल्पकालच आला होता. अंदरसुलात आल्यापासून त्यांनी आहार वर्ज्य केला होता, साध्या एक लवंगेवर नि एक कप दुधावर त्यांनी अठरा-अठरा तास तपश्चर्या केली होती. मानवी देहाप्रमाणे हया भक्तीमुळे स्वामीचा एक पाय गेला होता. शरीरांचे दोन वेळा ऑपरेशन झाले होते. ऑपरेशन नंतर मात्र स्वामींनी वैदयकिय सुचनेनुसार फलाहार स्विकारला होता.

बाबाजींचा दान फार आवडायचे, बाबाजी नेहमीच म्हणायचे, ''बाबाहो दान करा... दान... पूण्य लाभलं. श्रमदान करा....

**जो करेल श्रमदान ।**
**त्यांसी घडेल चारीधाम ।**

''अन्नदान करा, भुदान करा..'' दाना बरोबरच बाबाजींना काम फार आवडत असायचे. लहानपणापासून ते अखेरच्या मुक्कामापर्यंत त्यांनी कामालाच जवळ घेतले होते, स्वामींनी बालपणापासून फार काम केले होते. गुरे चारण्यापासून तर थेट पिक उगवण्यापर्यंत सर्वच शेतीचे काम त्यांन अवगत होते. कोणतीही गोष्ट श्रमाने सिद्ध होते हेच स्वामींनी मनाशी धरले होते. त्याचप्रित्यर्थ ते भक्तांना सातत्याने काम करण्यास लावत होते. स्वामींनी भक्तांना नेहमीच प्रवचनातून उपदेश केले होते. हया प्रत्येक उपदेशात ''कामाचा'' सगळयात जास्त वाटा असायचा. स्वामींनी जगाच्या कल्याणासाठी उपदेश दिले, भक्तांनी त्यांच्या उपदेशातून श्रमदान केले, कष्टाने सर्व काही मिळवता येते हे स्वामींनी १९६१ मध्ये जातेगावच्या डोंगरावर दाखवून दिले होते. स्वामींनी धर्माच्या रक्षणाकरता शिवालय बांधणे गरजेचे वाटत होते, म्हणूनच त्यांनी भक्तांना उपदेशातून श्रमदान करण्याचे शिकवले. त्यांच्या श्रमदानातून ठिकठिकाणी शिवालये उभारले. स्वामींच्या जिवनातील श्रमदानाचे महत्त्व आजही जातेगावातील पिनाकेश्वराचे शिवालय देईल. आजही श्री क्षेत्र उपखेड, टुणकी, शिवपुरी, येथील आश्रम स्वामींच्या कार्याचीच महती गातात, स्वामींच्या अशा हया विलोभनीय कार्यामुळे सारा मृत्युलोक सावरला होता तर स्वर्गलोक आश्चर्याने सद्‌गदीत झाला होता.

स्वामींनी त्यांच्या जिवनात तर फार मोठे समाज कार्य केले होते. हया भारतीय समाजाच्या रक्षणासाठीच तर खरं हया माऊलीने जन्म घेतला होता. त्यांना माहित होते, समाजाचे रक्षण करायचे असेल तर समाजात ''शांती'' मिळाली पाहिजे व समाजात जर शांती पसरवायची असेल तर समाजाला भक्ती करायला लावले पाहिजे आणि त्या प्रित्यर्थ शिवालयेच उभारली पाहिजे. त्याच कारणास्तव स्वामींनी त्यांच्या जीवनात ''नऊ'' शिवालये उभारले होते. शिवालये उभारुन त्यांनी जागोजागी भक्तीचा मळा उभारला होता. आजही भारतीय मनुष्य स्वामींनी बांधलेल्या शिवालयात गेला तर दहा-वीस मिनिटे शांत बसतो. त्या शिवालयातील स्वामींचा फोटो बघून शांत होतो. तेथील शिवाचे दर्शन घेऊन प्रसन्न होतो. आणि शांती मिळाल्याचे सुख घेऊन आनंदाने घरी जातो. समाजाला धर्माची व भक्तीची जाणीव करुन देण्यासाठी स्वामींनी अखेरच्या क्षणापर्यंत प्रवचने दिले, समाजाला चांगले वळण लावण्यासाठी राज्यातील कान्याकोपन्यात अनुष्ठाने केली, अनुष्ठानाद्वारे त्यांनी अनेकांना एकत्र येऊन प्रवचने दिले. प्रवचनातून जिवनातील आपल्यासाठी पुरले इतका उपदेश केला, स्वामींच्या प्रवचनामुळे समाज प्रबोधन झाले, त्यांच्या प्रवचनामुळे कित्येकांच्या विझलेल्या चुली पेटल्या, कित्येकांच्या माळरानावर नंदनवन फुलले, कित्येकांच्या उद्वस्त घरात आशेची किरणे लावली, कित्येकांच्या घरात भक्तीचे दिवे पेटले व दिव्याने त्यांचे सारे जीवनच फुलले. स्वामींनी समाजासाठी भक्तीची शिकवणं दिली, सान्या जिवनाचा सार हा ''विधीत'' आणि ''आईत'' आहे याची जाणीव त्यांनी प्रत्येक भारतीय व्यक्तीस करुन दिली.

''धर्म करा धर्म करा
त्याने देवही येईल घरा।
धर्म पांडवांनी केला
देव अंगी राबविला।
धर्मविना नाही गती
धर्म जिवाचा सोबती॥''

या ओवींचा वापर करुन त्यांनी समाजात प्रबोधन घडवून आणले व समाजाला एक आगळी वेगळी दिशा प्राप्त करुन दिली.

बाबाजी वाचासिद्धी लाभलेले सिद्ध पुरुष होते. बाबाजींना नागाबाबांनीही मंत्र दिले होते. त्यांत बाबाजींनी विधी मंत्राचा वापर समाजासाठी केला होता. बाबाजींच्या विभुतीतून कित्येकांना मुले झाले, लोकांची घरे सुधारली, कित्येकांना जीवदान मिळाले, बाबाजींनी त्यांचे सर्व आयुष्य हया समाजसेवे करताच वेचले म्हणूनच आता आपण बाबाजीस अभिमानाने ''जगत्गुरु जनार्दन स्वामी मौनिगरी महाराज'' म्हणतो.

बाबजींनी समाजाच्या रक्षणासाठी शिवालये बांधली, त्यांचबरोबर समाजाचा

धार्मिक व अध्यात्मिक ज्ञानाची शिकवण मिळण्यासाठी आश्रमेही बांधले. आश्रमात येणाऱ्या प्रत्येक भक्तास आजही स्वामींची आठवण येते. तो आजही त्या आश्रमात स्वामींना शोधण्याचा प्रयत्न करतो. आश्रमात आल्यावर त्याला जेवण मिळते. व तो सुखी आत्माने आशिर्वाद देऊन घरी जातो. स्वामीच्या प्रत्येक आश्रमात सातत्याने अन्नदान चालते. स्वामींना श्रमदाना बरोबरच अन्नदानाचही फार आवड होती. ते प्रवचनातून नेहमीच म्हणायचे ''कायम अन्नदान करा, जर भुकेलेल्याला अन्नदान केले तर त्याचा आत्मा तृप्त होतो. व तो तृप्त आत्म्याने आपल्याला आशिर्वाद देऊन जातो.'' प्रत्येक आश्रमात अन्नदान होण्यासाठी स्वामींनी प्रत्येक आश्रमात जमिन सलग्न केली आहे. आश्रमाचा सर्व खर्च हा जमिनीवरच चालत असतो. कृषीमध्ये कष्ट करायचे व त्याच्या उत्पन्नावर अन्नदान करायचे हा स्वामींचा नियम होता. नाहीतरी शेती हा विषय स्वामींचा फार जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, वेरुळ, नाशिक, उपखेड, कोपरगांव व इतर आश्रमाच्या ठिकाणी सुपीक जमिनी तयार केल्या, जमिनीत श्रमदान करुन जमिनी सदन केल्या व त्याच उत्पन्नातून अन्नदान केले. म्हणूनच स्वामी नेहमी म्हणायचे,

''ऋषी व कृषी हीच ईश्वर सेवा''

बाबाजींना शेतीप्रमाणे प्राणी मात्रांवर दया करणेही फार आवडायचे, त्यातल्या त्यात स्वामींना 'गाय' फार आवडायची. स्वामीनी आईला जेवढे महत्व दिले तेवढे महत्व गायीलाही दिले आहे. परमात्मा श्रीकृष्णास जशी गाय आवडायची तसेच स्वामींनाही गायच आवडायची. म्हणूनच त्यांनी गायीची सदैव व्यवस्था व्हावी म्हणून श्रीक्षेत्र वेरुळ व टुणकी येथे गोशाळा उभारली होती.

जीवनात सगळीकडे लक्ष ठेवता ठेवता स्वामींनी शिक्षणाकडेही बारकाईने लक्ष ठेवले होते. बाबाजींना माहित होते, देशाला जर घडवायचे असेल तर अगोदर तरुण लहान , सहान बालकांना घडवले पाहिजे. आणि जर बालकांना घडवायचे असेल तर गुरुकुले उभारली पाहिजे. याचसाठी स्वामींनी श्रीक्षेत्र वेरुळ व श्रीक्षेत्र टुणकी येथे गुरुकुले उभारली.

जीवनातील पाढा खास समाजासाठी गाणाऱ्या ह्या जगदवंदनीय संतास आता समाधीस्त होऊन पंधरा दिवस झाले होते. पंधरा दिवस पंधरा वर्षाप्रमाणेच वाटत निघून गेले होते. बाबाजींचे काम, बाबाजींचे उपदेश, बाबाजींची डोली, बाबाजींचे प्रेम, बाबाजींची माया आठवून संन्यासी शिष्य रडत होते. आखाड्याचे सर्व सदस्य जमले होते. नियमानुसार षोडशीच्या दिवशी चादर ओडून उत्तराधिकारी नेमण्याचा कार्यक्रम होणार होता. जुना आखाड्यातील संतानुसार व बाबाजींच्या ह्यातील बोलण्यानुसार बाबाजींचे परशिष्य स्वामी शांतिगिरीजी (महात्माजींना) उत्तराधिकारी पदाची शाल चार लाख लोकांसमोर परमपुज्य स्वामी शिवगिरीजी महाराज, स्वामी रामनंद गिरी महाराज (सेक्रेटरी जुना आरखडा) व इतर प्रमुखांच्या हस्ते कार्यासाठी अहोरात्र तळपणाऱ्या सुर्याच्या साक्षीने पांघरण्यात आली.

(२५ डिसेंबर १९८९)

बाबाजी सोडून गेल्याचे सारे दुःख बाजुला सारुन महात्मांनी नव्या जोमाने कार्यास सुरुवात केली. सोळाव्याच्या कार्यक्रमानंतर जे ते ज्याच्या त्याच्या आश्रमात गेले. तेथून आप–आपल्या परीने कार्य करु लागले स्वामींचे उत्तराधिकारी पद मिळालेले स्वामी शांतिगिरी महाराज स्वामींच्या धार्मिक कार्याचे मुळे ठिकाण श्रीक्षेत्र वेरुळ येथे गेले. तेथे जाऊन त्यांनी त्वरीत बाबांच्या कार्यास सुरुवात केली. स्वामी शांतिगिरीजींनी बाबाजींसारखी तपश्चर्या केलेली नव्हती. परंतु बाबाजींनी त्यांना विनातपाचे सर्व काही ज्ञान प्राप्त करुन दिले होते. बाबाजींनी महात्मांना शांतता , विवेकता, कार्यसिध्दता, विभुतीमंत्रता सर्व काही खुल्या हाताने दान केलेले होते. वेरुळला जाऊन महात्मांनी खुप कष्टे केले. त्यांनाही बाबाजीप्रमाणेच श्रमदान आवडते, श्रमदानातून त्यांनी वेरुळला संपुर्ण परिसर स्वच्छ करुन भक्तीमय बनवला, महात्मांनी स्वामींचे पहिले पुण्यस्मरण फार थाटा माटात साजरे केले. पहिल्या पुण्यस्मरणानंतर मात्र महात्मांच्या कार्यास फारच गती मिळाली.

पहिल्या पुण्यस्मरणानंतर त्यांनी क्षणोक्षणी स्वामींना हृदयात साठवले व त्यांच्या चरणांचेच अनुकरण केले. स्वामीप्रमाणे महात्मांनी प्रवचने करण्याचे ठरवले. त्यांनी स्वामींजीप्रमाणेच श्रमदानाचा वापर करण्याचे आयोजिले. त्यांनी बाबाजींप्रमाणे ह्या भारतातील लोकांसाठी आश्रमे बांधण्याचे ठरवले व तसेच केले.

सन १९८७ स्वतःचे वडील वारले तरीही हे महात्मा वडींलाजवळ जात नव्हते, जेव्हा बाबांनी सांगितले तेव्हा गुरुचा आदेश म्हणून महात्मांनी वडीलांचे अखेरचे दर्शन घेतले होते. इतके वैराग्य धारण केलेली ही महात्मारुपी विभुती स्वामींची उत्तराधिकारी पद घेऊन कार्यास पुर्णावती देत होती. स्वामी शांतिगिरी महाराज हे दैवाच्या कार्यकारी मंडळातील जणु काय एक सदस्य होते. ह्या विश्वातील शांतीसाठीच ही शांतीगिरीजी नामक विभुती आता कार्यासाठी अहोरात्र झटत होती. स्वामींच्या कार्याचा प्रसार त्यांना गावोगावी पोहचायचा होता. स्वामींना अवताररुपी कार्याची जाणिव त्यांना गावातील घरा घरात करुन द्यायची होती. धार्मिक कार्यातून पुन्हा एकदा स्वामींची प्रतिमा ह्या विश्वात उमटण्यासाठी त्यांना एकविसाव्या शतकात सुधारलेल्या शहरातही प्रचार करायचा होता व त्याच प्रित्यर्थ स्वामी शांतिगिरीजींनी त्यांच्या अवताररुपी कार्यास आता प्रारंभ केला होता.

नागाबाबांकडे ज्ञानाचा विपुल साठा होता, त्याचप्रमाणे स्वामी जनार्दनामध्ये प्रचंड प्रमाणात भक्ती होती तसेच उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरी महाराज यांच्या हृदयात अतिप्रचंड प्रमाणात वैराग आहे. स्वामींची भक्ती पाहून नागाबाबांनी संपूर्ण ज्ञान दान केले होते. पण स्वामी शांतिगिरीजींची भक्ती पाहून स्वामीजींनी त्यांना नागाबाबांचे ज्ञान तर दिलेच परंतु तपसाधनेत मिळवलेली सर्व शक्तीही दान केली आहे. त्याच ज्ञानाच्या व शक्तीच्या जोरावार स्वामी शांतिगीरी महाराज आता कार्य करु लागले होते. महात्मांनी स्वामींच्या

आठव्या पुण्यस्मरणाप्रित्यर्थ फार मोठा कार्यक्रम घ्यायचा ठरवले होते. त्यासाठी महात्मा आता गावोगावी येत होते. गावोगावी स्वामींचा, स्वामींच्या कार्याचा प्रचार करण्यास त्यांनी सुरुवात केली होती. महात्मांनीही स्वामींप्रमाणे शेतीकार्य व श्रमदान कार्य ह्या मोहीमा हाती घेतल्या होत्या. सर्वप्रथम शिष्यांना स्वामींची उणिव न होऊ देता प्रवचने करुन श्रीक्षेत्र वेरुळ येथे श्रमदान करण्यास लावले. श्रमदान करुन वेरुळ येथील सर्व नापिक जमीन त्यांनी सुपीक केली. स्वामींनी घेतलेल्या जमिनीत त्यांनी भक्तींचा विशाल मळा फुलवला व त्यांच्या सुंगधाने अवघा महाराष्ट्र मोहकला, त्यानंतर स्वामी शांतिगिरीकडे बाबाजींइतके गर्दी होवू लागली, धावत्या युगानुसार त्या भक्तात पुर्वी पेक्षा वाढही होऊ लागली होती. नागाबाबांनी दान दिलेल्या विभुती मंत्र बाबाजींनी जसा न तसा महात्मांना दान केला होता. व महात्मांही स्वामीप्रमाणे विभुती मंत्राचा वापर करु लागले, त्यांच्या विभुतीने अनेक तरु लागले, अनेक बरे होऊ लागले, अनेकांची संसार भर भराटीस येऊ लागले, अशातच भक्तगण स्वामींना महात्मानमध्ये बघु लागले व स्वामींच्या कार्याची पूर्ती करण्यासाठी ते महात्मांना वेळोवेळी मदत करु लागले. स्वामींचे संकल्प पुर्ण करण्यासाठी महात्मांना हजारो भक्त मदत करु लागले. अठव्या पुण्यस्मरणार्थ महात्माजी गावोगावी स्वामींच्या प्रचाराप्रित्यर्थ जाऊ लागले, त्यांच्या कार्याची जाणिव प्रवचनाद्वारे देऊ लागले, विभुतीतून साक्षात्कार दाखवू लागले, साक्षात्कारातून श्रमदान होऊ लागले, श्रमदानातून जागोजागी आश्रमे उभे राहु लागले, आश्रमातून वेळोवेळी आरती विधी व विविध कार्यक्रम होऊ लागले, कार्यक्रमातून बाबाजी आठवण होऊ लागली, आठवणीतून बाबाजींची शिकवण पुन्हा एकदा डोक्यात येऊ लागली, शिकवणीतून पुन्हा एकदा भक्तीचे दिवे पेटू लागले, दिव्यातून जगण्यासाठी प्रकाश मिळू लागला व मिळालेला प्रकाशात स्वामी शांतिगिरीचीच प्रतिमा उमटु लागली.

महात्मांनी बाबाजींच्या पाऊलावर पाऊल ठेवून अनुष्ठान घेण्यास सुरुवात केली. इ.स. १९९१ ते १९९७ या कालावधीत त्यांनी लाखो भक्तांना अनुग्रह देऊन भक्तींच्या मळ्यात समाविष्ट करुन घेतले. ठिकठिकाणे आश्रमे उभारून स्वामींनी पेटवलेल्या भक्तींच्या शेतीस अजुनच उजाळा दिला. आश्रमाशी संलग्न असलेल्या जमिनी वाढवल्या, जमिनीतून येणाऱ्या पिकातून अन्नदान वाढवले, प्रत्येक आश्रमातून गुरु पौर्णिमा , प्रदोष, ललीत पंचमी, म्हाळसाई पुण्यातिथी असे कित्येक कार्यक्रम चालू केले कार्यक्रमातून स्वामींच्या कार्याचा व धर्माचा प्रसार करुन स्वामींच्या कार्याची शान वाढवली, अवघ्या महाराष्ट्राच्या कान्याकोपऱ्यात स्वामींनी तयार केलेली हिंदवी भगवी पताका त्यांनी मिरवली, महाराष्ट्रात प्रचार करता करता त्यांनी गुजरात राज्यातही स्वामींच्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली, गुजरात राज्यात भावनगर जिल्ह्यातील श्री आखातारिया येथे अनुष्ठान बसवले, अनुष्ठानास प्रमाणापेक्षा जास्त प्रतिसाद मिळाला यावेळी श्री क्षेत्र कोकमठाण येथील प.पु. जंगलीदास महाराज यांनी महात्मांचे हसतमुखाने गुणगौरव केले होते. याच्यातूनच आठव्या पुण्यस्मरणाची

गगनचुंबी बीजे रोवली गेली होती. महात्मांनी (स्वामींनी) एकवीस हजार अनुष्ठांनार्थींना आठव्या पुण्यस्मरणाप्रित्यर्थ अनुष्ठानास बसवायचे होते. त्यांनी तसा संकल्पही केला होता.

१९९७ चा डिसेंबर महिना उगवला आठवे पुण्यस्मरणार्थ श्रीक्षेत्र वेरूळ येथे अनुष्ठान बसले, त्यावेळी २१ हजार एवेजी ५० हजार भाविक अनुष्ठानास बसले. महात्मांचा आनंद गगनात मावेनासा झाला. कारण आठव्या पुण्यस्मरणार्थ घेतलेल्या अनुष्ठानातील लोकांची उपस्थिती म्हणजे स्वामी शांतिगिरीजी हे योग्य पुर्ण उत्तराधिकारी आहे. याची ती एक पावतीच होती. चैतन्यस्वरुप गगनगिरी महाराज यांनी स्वामी शांतिगिरीजीचे अस्तित्व प्रकट करून दिले. जुना आखाड्यातील वरदहस्त दिलेल्या गुरुजनांनी स्वामी शांतिगिरीजींना भरभरून आशिर्वाद दिला. ठरल्या प्रमाणे सात दिवस अनुष्ठान झाले. या वेळी स्वामींच्या अवताराची बरीचशी उदाहरणे घडली व त्यातूनच भक्तांना स्वामी शांतिगिरीजी हेही रिद्धी सिध्दी प्राप्त असलेले एक कर्तव्य सिध्द पुरुष आहे याची प्रचिती झाली.

फार मोठ्या थाटा माटात स्वामींचे अष्टम पुण्यस्मरण महात्मांनी साजरे केले. त्याच दिवशी स्वामींनी (महात्मांनी) संकल्प केला. 'स्वामींच्या ११ व्या पुण्यस्मरणाप्रित्यर्थ ५१,००० अनुष्ठानार्थी अनुष्ठानास बसण्याचे व त्याच दिवशी महात्मांनी मौन धरले.

आता महात्मांना मौनी अवस्थेत अवघ्या भारतात स्वामींच्या कार्याचा प्रचार करायचा होता. परंतु म्हणतात ना...

**सद्गुरु सारिखा असता पाठीराखा । इतरांचा लेखा काय करील ॥**

स्वामी जनार्दन बाबांसारखा सद्गुरु महात्मांच्या पाठीमागे सातत्याने आशिर्वाद घेऊन उभा असल्याने महात्मांना काहीच कमी नाही, महात्मांनी जरी मौन धारण केले असले तरी श्रीक्षेत्र कोपरगावात जन्मास आलेल्या लहानगा अतुल पगारे स्वामीजींनी महात्मांच्या प्रवचनासाठी बोलता केला होता. स्वामींच्या समाधीस्त गावी जन्मास आलेले हे अतुल पगारे नामक ८ ते ९ वर्षीय मुलं स्वामी शांतिगीरीजी संभाळीत असलेल्या वेरुळच्या गुरुकुलात फुलत होतं. महात्मांनी त्याला पुर्ण आशिर्वाद देऊन बोलते केले व तेच आता मौन धारण केलेल्या महात्मांचा प्रचार करु लागले होते.

स्वामींचे ११ वे पुण्यस्मरण एकविसाव्या शतकाच्या प्रारंभी येणार होते. परंतु आधुनिक युगातील कवडी शुल्लक बुध्दीवान लोकांनी धुमाकुळ मानवला होता. वेळेनुसार मन बदलुन मनानुसार बुध्दी बदलुन व बुध्दीनुसार स्वतः हात बदल करून पुन्हा एकदा हिंदु धर्मास ग्लानी आणली होती. भारतीय संस्कृतीला एकविसाव्या शतकांचे स्वागत करणाऱ्या हौसी, चैनी, विलासी लोकांनी तिलांजली दिली होती. भारतीय हिंदु धर्माची पताका रोवण्यासाठी राजा शिवाजी जन्मास आला होता. तीच ध्वजा विसाव्या शतकाच्या प्रारंभात इंग्रजी वाऱ्याने कोलमडून पडली होती. ती हिंदवी धर्माची ध्वजा पुन्हा एकदा विश्वातील भारतरुपी देवघरात फडकवण्यासाठी स्वतः महादेवाने जर्नादनानाम धारण करून भुतलावर

जन्म घेतला होता. व आता पुन्हा एकदा धर्मास ग्लानी येऊ लागली होती. भारतीय संस्कृतीच्या काळाच्या ओघात लोप पाऊ लागली होती. जनार्दन स्वामींनी सजवलेले देवघर आता कलीयुगातील फॅशनेबल लोकांनी विसरुन टाकण्यास सुरुवात केली होती. त्याचसाठी महात्मांनी पुन्हा एकदा धर्मावरील ग्लानी टाळण्यासाठी हिंदु संस्कृतीला जपण्यासाठी व अवघ्या विश्वाला शांती देण्यासाठी स्वामींच्या ११ व्या पुण्यस्मरणाप्रित्यर्थ 'विश्वशांती धर्म सोहळा' आयोजित करण्याचे ठरवले होते. आता महात्मांनी अतुल पगारेला बरोबर घेऊन कार्यक्रमास जाऊ लागले होते. तिथे जाऊन अतुलच्या अंगावर शांतीची फुले टाकु लागले होते. महात्मांच्या फुलात्मक आशिवार्दाने अतुल प्रवचने सांगु लागला होता. महात्मांच्या उपस्थितीने सारा जनसमुदाय जमा होऊ लागला होता, अतुलला प्रेरित केलेल्या शांतिच्या फुलातून अवघा परिसर जनार्दनमय होऊ लागला होता, आणि अशातच विश्वशांती धर्म सोहळ्याचा प्रचार लोक लागला होता. स्वतः शांतिगिरी (महात्मांनी) स्वामींच्या महार्विनानंतर श्री श्रेत्र एरंडगांव , कातरणी, (उगाव) खेडे, लाखलगांव, ओझर, गंगा पाडळी, सायळे, मिटसागरे, हिवरगाव, चिंचपुर, घोडगांव , शहाजतपुर इ. ठिकाणी विस्तृत आश्रमे उभारली, पुरक अशा जमिनी आश्रमाशी सलंग्न केल्या, भक्तीच्या मळा गावोगावी उभारला, त्या उभारलेल्या मळ्यात फक्त विश्वशांती धर्म सोहळ्याचाच ध्वज फडकला. कमी वेळात मौन धारण करुन कितीतरी अधिक पटीने महात्मांनी केलेले कार्य बघुन भक्त समुदाय गहिवरून गेला व शांतिगिरी महाराजांसह विश्व शांती धर्म सोहळ्याचाच प्रचार करु लागला.

अशातच स्वामी शांतिगिरींनी बाबांजींच्या उपदेशातून (उगाव) खेडे येथे गुरुकुल सुरु केले. बरेचसे मुले तिथे शिक्षण घेऊ लागले, शिक्षण घेता घेता, बाबांजींचा व महात्मांचा आदर्श घेऊ लागले, यांच्यातूनच ते गावोगावी स्वामींच्या कार्याची महती गाऊ लागले. महात्मानी मौन धारण करुनही दोन वर्षाच्या कालावधीत संपुर्ण महाराष्ट्रात स्वामींच्या कार्याचा व विश्वशांती धर्म सोहळ्याचा प्रसार केला.

ज्या प्रमाणे राजा शिवाजीने हिंदवी स्वराज्याशी स्थापना करुन, हिंदवी ध्वजा अवघ्या महाराष्ट्रात रोवली आणि १७०० मध्ये जन्म घेणाऱ्या प. बाजीरावाने तीच ध्वजा आपल्या अतुलनीय कौशल्याच्या जोरावर व बलशाही मनगाटच्या हिंमतीवर अवघ्या भारतात मिरवली. त्याने दक्षिणेत नेतृत्व केले होते. तर उत्तरेत प्रभुत्व गाजवले होते. त्याप्रमाणे जनार्दन स्वामीने धर्माचा व कार्याचा प्रचार अवघ्या महाराष्ट्रात केला पण त्यांचेच उत्तराधिकारी पद भुषवणाऱ्या स्वामी शांतिगिरीजींनी मौन धारण करुन त्याच धर्माचा व कार्याचा प्रसार अवघ्या भारतात करणे चालु केले होते. दक्षिणेत सोलापूर, पुणे भागात प्रवचने घेऊन त्यांनी भक्तीचा मळा फुलवला होता तर उत्तरेत अलाहाबाद, गुजरात, वैष्णौदेवी इ. क्षेत्रात विश्वशांती धर्म सोहळ्याचा ध्वज फडकवला होता. नंतर ते एकीकडे अतुल पगारेना बरोबर घेऊन

प्रवचनातून विश्वशांतीची बिजे रोऊ लागले. तर दुसरी कडे मंत्रमुग्ध केलेला विजयरथ पाठवुन वेरुळला येण्याचे निमंत्रण देऊ लागला. अखेर तो दिवस उजडलाच १ डिसेंबर २००० ते ७ डिसेंबर २००० या दिवसात होणाऱ्या अनुष्टान सुरुवात झाली तरी ५१००० संकल्प केलेल्या अनुष्ठार्थ्यांची संख्या १,४५,००० झाली. इतर किती हजार भाविक वेगवेगळ्या धार्मिक कामासाठी व श्रमदानासाठी वेरुळात हजार झाले. प्रत्येक दिवशी जप, तप, अनुष्ठान, प्रवचने, किर्तने होत होती. देशातील प्रमुख आखाड्याची प्रमुख देवता वेरुळात येऊन खुष होते होती. प.पू. जंगलीदास महाराज, अवधेशानंदगिरी महाराज असे किती तरी महान साधू संत वेरूळात येऊन लक्षदिप जनसमुदाय बघून स्वामी शांतिगिरीकडे आश्चर्याने बघत गुणगान गाऊन जात होते.

अखेरच्या दिवशी वेरूळच्या भूमीत लोक समुदाय मावत नव्हता इतका जनसमुदाय तेथे जमला होता. १५ ते १९ लाख दरम्यान जनसमुदाय शेवटच्या दिवशी वेरुळात जमा झाला होता. स्वामी शांतिगिरींचे गुणगान गात करत होता. टाळ्या वाजवत, जपतप, करत होम यज्ञ करत भक्तांचे गुणगान गात होता. अशातच धर्मावरील ग्लानी टळून गेली होती. भारतातील धार्मिक कार्य बघून देव देवता खुश झाली होती, एकविसाव्या शतकांचे अशा तऱ्हेचे स्वागत बघून अवघे विश्व आश्चर्याने बघत होते. भारतीय संस्कृतीची एकदा जाणिव पुन्हा अवघ्या विश्वाला झाली होती.

न भुतो न भविष्यति असा विलोभनीय 'विश्वशांती धर्म सोहळा श्रीक्षेत्र वेरूळ येथे पार पडला व अवघा भारत स्वामी शांतिगिरीच्या कार्याने आश्चर्यचकित झाला. विश्वशांती धर्म सोहळा कशा वातावरणात साजरा झाला याचे वर्णन' करण्यात माझे शब्दही अपुर्ण आहे. परंतु मी एवढेच म्हणू शकतो.

'जसे बाराव्या – तेराव्या शतकात जन्म घेणाऱ्या 'ज्ञानेश्वरांनी ह्या विश्वासाठी महाराष्ट्रात जन्म घेऊन पसायदान मागितले तसेच विसाव्या शतकात जन्म घेणाऱ्या स्वामींच्या उत्तराधिऱ्यांनी (महात्मांनी) ह्या विश्वासाठी महाराष्ट्रात जन्म घेऊन 'विश्वशांती 'मागितली.

नावात शांत असून स्वतःही शांत असून ह्या विश्वासाठी शांति मागणाऱ्या स्वामी शांतिगिरीचे मी काय वर्णन करु वाचकांनो जरा लक्षात घ्या.

पृथ्वीवरील दानवांचा नाश करून विश्वाला शांत करण्यासाठी स्वतः भगावन श्रीकृष्णाने भारतातील मथुरेत जन्म घेतला होता. पुन्हा एकदा विश्वासाठी किंबहुना विश्वाच्या सुखासाठी तेराव्या शतकात ज्ञानेश्वरांनी जन्म घेतला होता. विसाव्या शतकात भारतातील हिंदु धर्मास ग्लानी आल्याने विश्वाची शांती निस्तनाबुत होण्यास सुरुवात झाली होती. म्हणून विश्वाच्या शांतीसाठी व हिंदु धर्माच्या रक्षणासाठी भगवान शिवाने जनार्दन नांव धारण करुन महाराष्ट्रात जन्म घेतला होता. असो आतापर्यंत ह्या विश्वाच्या

शांती व धर्माच्या रक्षणासाठी कुणाला (कोणत्या तरी देवाला) तरी भारतात जन्म घ्यावा लागला होता. परंतु एकविसाव्या शतकात निर्माण होणाऱ्या ग्लानि पासून हिंदू धर्माचे रक्षण होण्यासाठी व विश्वास शांति मिळण्यासाठी ह्या जनार्दन स्वामींच्या उत्तराधिकाऱ्यांनी, स्वामी शांतिगिरीजींनी वेगवेगळ्या महान साधु संताना आमंत्रित करुन १५ लक्ष लोकांच्या उपस्थितीत चंद्र सुर्याच्या साक्षीने विश्वशांती धर्म सोहळा आयोजित केला होता.

किती जबरदस्त कल्पना होती ह्या महात्मांची, किती जबरदस्त प्रचार होता स्वामींच्या कार्याचा, किती जबरदस्त आशा होती एकविसाव्या शतकात दैव प्रकट करण्याची, किती जबरदस्त अधिकार होता दैवावर.

'विश्वशांती धर्म सोहळा' साजरा करुन स्वामी शांतिगिरींनी स्वामींच्या कार्याची प्रतिमा भारतातच नव्हे तर अवघ्या विश्वात उमटवली, स्वामींच्या कार्याचा ध्वजा त्यांनी अवघ्या भारतात फडकवली. स्वामी शांतिगिरींनी ह्या कलीयुगातील जगातील लोकांना जाणिव करुन दिली की जनार्दन स्वामी एक शिवतार दैवत होते. जनार्दन स्वामींचे कार्य हिंदु धर्मास लाभलेली एक संजीवनी होती. विश्वशांती धर्म सोहळा साजरा करुन स्वामी शांतीगिरीजींनी दाखवून दिले, की तेच खरेखुरे स्वामींचे कृपापात्र शिष्य होते, तेच त्यांचे वारसदार आहे आणि तेच त्यांचे उत्तराधिकारी आहेत.

विश्वशांती धर्म सोहळा बघून अवघा भारत आनंदाने हसू लागला. स्वामी शांतिगिरींचे हे अनोखे, अकल्पनीय, असामान्य कार्य बघून अवघ्या भारतातील साधू आश्चर्यचकित झाले तर जुना पिठाधिश्वर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांनी स्वामी शांतिगिरींना महामंडलेश्वर १००८ हे पद बहाल केले. स्वामी शांतिगिरीजींना मिळालेले महामंडलेश्वर पद म्हणजे विश्वशांती धर्म सोहळ्याचे एक अनोखी अवर्णनीय पावतीच होती. २८ जाने. २००१ या दिवशी संपूर्ण जगताचे सर्व साधू ऋषी, मुनी जनसंहित पूजनिय विविध आखाड्यांचे महामंडलेश्वर, जगत्गुरु आदि मान्यवरांचे साक्षीने श्री अनंत कोटी ब्रह्मांड नायक महाराजाधिराज प्रातः स्मरणिय ब्रह्मनिष्ठ मुनी परमहंस परिब्राजकाचार्य योगीराज निष्काम कर्मयोगी श्री संत सद्गुरु जनार्दन स्वामी मौनगिरी महाराजांचे उत्तराधिकारी, संपुर्ण विश्वशांतीचा शांतीदुत प.पू. शांतिगिरीनी महाराजांवर महामंडलेश्वरचा पट्टाभिषेक झाला आणि महामंडलेश्वर पदाची प्रथम शाल ब्रह्मनिष्ठ जुना पीठाधीवर आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानन्दगिरीनीनी घातली.

सर्व संत महंत आचार्य महामंडलेश्वर स्वामी अवधेशानंदगिरीजी महाराज यांना पुन्हा एकदा 'स्वामी शांतिगिरीजी' हेच पुजनीय संत जनार्दन बाबांचे उत्तराधिकारी आहे हे सिध्द करुन घोषित केले.

सर्वत्र आनंद झाला. टाळ्यांचा कडकडाट झाला. निळ्या भोर आकाशातील तेजस्वी सूर्यही क्षणभर लाजून हसला आणि सर्वत्र जनार्दन स्वामी मौनगिरी महाराज की

जय हा जय जयकार झाला.

'महामंडलेश्वर १००८ उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरीजी महाराज की जय' अशा घोषणा दिल्या होत्या. महात्माजींना मिळालेले महामंडेलश्वर हे पद म्हणजे स्वामी जनार्दनांच्या कार्याची अवघ्या भारतभर केलेल्या प्रसाराची महात्मांना मिळालेली पोहच पावती होय.

महामंडलेश्वर पद मिळाले नंतर महात्मांकडे येणाऱ्या भक्तामध्ये किती पटी वाढ झाली अशातच महात्माजी अजुनही गावोगावी जातात आणि स्वामींच्या कार्याचाच प्रचार करतात. आजही महात्मा श्रीक्षेत्र वेरुळ, टुणकी खेडे इ. गुरुकुलात जातात तेथील भक्तांची विचारपुस करतात, बाबाजींप्रमाणे विद्यार्थ्यांची चौकशी करतात, गुरुकुलातील मुलांची अति दक्षता घेतात. त्यांना आध्यात्मिक व शैक्षणिक शिक्षण देतात. स्वामींनी उभारलेल्या प्रत्येक आश्रमात व स्वामीचे नाव देऊन त्यांनी उभारलेल्या प्रत्येक आश्रमात जातात. तेथील संन्यासी शिष्यांची विचारपुस करतात. तेथील जमिनीत जाऊन श्रमदान करतात. भावी संकल्पासाठी योग्य ते आशिर्वादात्मक आदेश देतात.

स्वामीं जनार्दनबाबाचा संकल्प होता की पंढरपुरात माझ्या शिष्यांसाठी आश्रम पाहिजे, स्वामी शांतिगिरीजींनी तिही इच्छा पूर्ण केली व श्री क्षेत्र पंढरपुर येथे १ हेक्टर २५ आर जमिनविकत घेऊन चंद्रभागेच्या उत्तरेला आश्रम बांधण्यास सुरुवात केली, गुरुपौर्णिमा २००१ मध्ये श्रीक्षेत्र पंढरपुर येथे अनुष्ठान घेऊन सोलापुर जिल्ह्यात स्वामी जनार्दनाची कार्यात्मक ध्वजा रोवली. हे कार्य त्यांच्या उत्तराधिकारी पदाची निळ्यागार आकाशात फडकलेली ध्वजाच आहे.

महात्माजी स्वामींच्या पादुकांचे, चरणांचे , डोलीचे दर्शन घेऊन जागोजागी जातात. कार्याची महिमा स्वामींच्या गातात व स्वामींच्या कार्याची एक शान म्हणून भक्तांच्या नजरेत वावरतात.

प्रभुरामचंद्र जरी शरयु नदीत सामावुन मृत्युलोकांतुन निघून गेले होते. तरी हनुमंतरायांनी जशी त्यांची पदोपदी सेवा केली होती, जसी त्यांच्या कार्याची महिमा गायली होती. तसेच स्वामी शांतिगिरी महाराज हे स्वामींच्या कार्याची गाथा गातात , स्वामींच्या कार्याचा पदोपदी प्रचार करतात व आजही स्वामींच्या असित्त्वाची जाणिव करुन देतात. महात्मांच्या कार्याचे काय वर्णन करावे. मी अखेर अखेर एवढेच म्हणाले श्री संत जनार्दन बाबांनी ह्या हिंदु धर्मातील लोकांना जन्माला कसे यावे हे शिकवले, तर त्यांचे उत्तराधिकारी स्वामी शांतिगिरीजींनी जन्माला आल्यावर कसे जगावे हे शिकवले.

जनार्दनबाबांनी खडतर तपश्चर्या करु नागेश्वरांच्या मंदिरात हिंदवी धर्माची, कार्याची व भक्तीची जी ध्वजा तयार केली होती तीच ध्वजा त्यांचे उत्तराधिकारी पद भुषणाऱ्या

महामंडलेश्वर १००८ श्री स्वामी शांतिगिरींनी अवघ्या विश्वात फडकवली.

श्री संत जनार्दन स्वामींनी १२ वर्ष तपश्चर्या करुन घृष्णेश्वरांच्या दरबारात येळ गंगेच्या तिरावर एक छोटसं भक्तीस रोपटं लावलं होतं. त्यांनी जागोजागी प्रचार करुन त्यांची वाढ केली होती. त्या छोट्याश्या रोपट्याला जेव्हा पाने फुले येण्यास सुरुवात झाली होती तेव्हाच स्वामींचे महानिर्वाण झाले होते. परंतु स्वामींचे उत्तराधिकारी पद सांभाळणाऱ्या स्वामी शांतिगिरीजींनी त्या भक्तीच्या झाडाची मनापासून जोपसना केली. ह्या भक्तीच्या झाडाची इतकी वाढ झाली की त्या झाडाची मुळे दक्षिणेत थेट पंढरपुरपर्यंत पोहचली, तर त्या झाडाच्या फांदया उत्तरेत गुजरातसह अलाहाबाद घेऊन वैष्णौदेवी पर्यंत पोहचला. स्वामी शांतिगीरीजींनी जोपासलेल्या भक्तीच्या झाडाला इतकी फुलं आली की ती 'विश्वशांती धर्म सोहळ्याच्या ' रुपाने जगापुढे साकार झाली. वाचकांनो ती फुलं दुसरं तिसरं कुणी नसून तुम्ही आम्ही शांतिगिरीजींनी जोपासलेल्या बाबाजींच्या भक्तीच्या झाडांची 'शांतीची फुलं' आहेत.

चला चला बाबांच्या कार्याचा प्रसार करु या, महात्माजींना बाबाजींचे संकल्प पूर्ण करण्यास मदत करु या. जनार्दन बाबांना श्री शांतिगिरी महात्मांच्या स्वरुपात बघु या, आणि शांतिच्या फुलात सहभागी होऊ या.

चला चला डोळे बंद करुन स्वतःचा शोध घेऊ, इतरत्र भ्रमण करणारी बुध्दी स्मित करु, हृदयाची स्पंदने शांत करु, काळजाची तार छेडून भक्तींचा नाद करु, सुटकेचा श्वास टाकुन जनार्दन बाबांपुढे लीन होऊ, महात्मांना बाबाजींच्या स्वरुपात बघून शांतीच्या फुलात सहभागी होऊन आपण आनंदाने आता बाबाजींची आरती गाऊ.

आरती निष्काम यतीवर मौनगिरी मुनिची।
पुत्र म्हाळसा स्वामी जनार्दन, त्यागी वृत्ती ज्यांची ॥ धृ ॥
जन्मभूमि ज्या पुनित वसती, असे दहेगाव।
पवित्र केला परिसर ज्यांनी पाडुनी दिव्य प्रभाव ॥ १ ॥
बाळपणी ज्या शिवनामाचे बाळकडून पाजिले
माय म्हाळसा पाटील स्वकुळा कळसा चढविले ॥ २ ॥
अध्यात्माचा छंद जडतसे अंजनीसुत सेवा।
त्यागुनी गृह संसार शोधित, हरि हर प्रभुमेवा ॥ ३ ॥
देह कष्टुनि खडतर तप हे उभे जळामाजी।
अपंग पद हे झाले ज्यांचे, खन्त न सौख्य त्यजी ॥ ४ ॥
नागाबाबा गोरखजती गुरु नागेश्वर मंदिरी
दिक्षा दे सन्यासा साधक, बनले मौनगिरी ॥ ५ ॥
दिव्य पिनाकेश्वर सिध्देश्वर तुल्य जनेश्वर

पारेश्वर श्री विश्वनाथ ये हृदयश्वेर ज्याते।
शर्वायेश्वर बांधी मंदिरा श्री काशीविश्वनाथ बांधी मंदिरा
शिवालये हाते। ६ ॥
यज्ञ याग हे सदैव चाले अन्नदान दीना।
स्वधर्म सेवा वृत्ती सनातन, कथी प्रभुचा महिमा ॥ ७ ॥
काढुनि वसतिगृह गुरुकुल ते विनामुल्य सेवा।
भस्मांकित तनु कंठनाची, कफनी मिळवी दुवा ॥ ८ ॥
लीन प्रभाकर कर जोडितसे सद्गुरु नत चरणी।
स्वामी जनार्दन मौनगिरी मुनि, दैवत प्रिय भुवनी ॥ ९ ॥

शांतिची फुलं
लेखक – विजयकुमार बाळकृण शेळके
पालखेड (वैजापुर)
एम.ए.इंग्रजी
जन्म– २२ फेब्रुवारी १९८१